# साद देती हिमशिखरे

REFBK-0019004

: अनुवादक :

डॉ. रामचंद्र ज. जोशी

मनोहर ग्रंथमाला,
प्रकाशन : १७४

प्रकाशक :
**मनोहर महादेव केळकर,**
मनोहर ग्रंथमाला,
१६०९ सदाशिव, पुणे ४११०३०

•

मुखपृष्ठ
विश्वनाथ मराठे

•

दसरा १८९५
६ ऑक्टोबर १९७३

•

किंमत
वीस रुपये

•

मुद्रक
**न. वा. लिमये**
महाराष्ट्र मुद्रणालय,
४६१/१ सदाशिव,
पुणें ४११०३०

# प्रकाशकाचे मनोगत

१९६८ साली या कादंबरीच्या अनुवादकाचा आणि माझा परि[illegible] चय झाला. अनुवादाच्या वह्या नजरेखालून घातल्या. पण पुस्तक आवडले [illegible] असूनही मी [illegible]ङमय–शोभेसाठी ते स्वीकारावयाचे नाही असे विचारांती [illegible] रविले. वास्त[illegible]वक मूळ इंग्रजी पुस्तक–Towards The silver crest of t[illegible] Himalayas लेखक G. K. Pradhan–मी आधीच योगायो[illegible] वाचले होते आणि नेहमीपेक्षा वेगळे असूनही ते मला [illegible] खूप आवडले होते. ती नेहमीसारखी [illegible] [illegible]दबरी नव्हती. संसार टाकून परमार्थाची कास धरावी आणि अखेरीस हिमालयातील गुहेत–जेथे आपली जागा नियतीने राखून ठेवली आहे आणि जी आपणाला स्वप्नात दिसली होती–जाऊन परमात्म्याशी अनुसंधान साधावे अशी ओढ एका अत्यंत बुद्धिमान आणि उत्तम खेळाडू असलेल्या तरुणाला लागते. पराशरालाही ही ओढ लागली होती. पण या कादंबरीचा नायक ‘ मत्स्यगंधे ’ च्या मोहात न पडताच हिमालयाकडे गेला. त्याच्या जीवित-प्रवाहाची ही कथा, मला आवडली असली तरी वाचकांना कितपत आवडेल याची शंका वाटत होती. पण थोडे दिवसांपूर्वी पुन्हा एकदा मराठी अनुवादाच्या वह्या आणल्या आणि वाचल्या. कारण एवढेच की वाङमयशोभेत येणारा अध्यात्म विषयावरील मजकूर पुष्कळ वाचकांना आवडतो असे आढळून आले होते. ‘ बकुलफुले ’ हे सदर वाचकांना किती आवडते हे प्रत्यही येणाऱ्या पत्रांवरून लक्षात येते.

अशा परिस्थितीत या कादंबरीचा अनुवाद वाङमय-शोभेतून क्रमशः द्यावा अशी ऊर्मी आली. मूळ लेखकाच्या वारसांबरोबर संपर्क साधून त्यांची परवानगी मिळविली. एवढ्यात या कादंबरीची एक अद्‌भुत शिफारस हाती आली. ‘ मराठा ’ पत्राच्या १० नोव्हेंबर १९६३ च्या अंकात आचार्य अत्रे यांनी कादंबरीचे लेखक ठाण्याचे श्री. जी. के. उर्फ बाबा प्रधान यांच्यावर एक अग्रलेख आणि तोही मृत्युलेख लिहिला आहे. हा अंकच आमचे हाती आला. तो सबंध लेख येथे स्थलाभावी छापता येणार नाही, पण त्यात

" ट नेवर्ड दी सिल्व्हर क्रेस्ट ऑफ दी हिमालयाज् " या कादंबरीची भलावण आचार्यांनी केली आहे, त्यातल्या थोडया ओळी देतो : " या पुस्तकाचे पहिले पान आम्ही वाचले आणि गंगेच्या ओघात पडावे अशी आमची स्थिती झाली. या पुस्तकाची २८० पाने आम्ही अवघ्या दोन अडीच तासांत एका बैठकीत वाचून काढली. ते पुस्तक वाचताना आम्ही आपले देहभान विसरून गेलो. एक मराठी माणूस इतकी सुंदर इंग्रजी भाषा लिहू शकतो, हे पाहून तर आम्ही बेहद खूष झालोच पण त्या पुस्तकाचा विषय आध्यात्मिक असूनही एखाद्या का...पेक्षासुद्धा अधिक मनोरंजक नि आकर्षक शैलीने ते लिहिण्यात आले आहे. आरंभा... ...खेरपर्यंत ते वाचकांना मंत्रमुग्ध करून टाकते."

वाङमय-शोभेतून ही कादंबरी फेब्रुवारी १९७३ च्या अंकापासून ऑक्टोबर अंकापर्यंत क्रमशः प्रसिद्ध होत असताना अनेक प्रशंसापर पत्रे सारखी येत होती व पुस्तकरूपाने ही प्रसिद्ध करणार का अशी विचारणा होत होती. आगाऊ मागण्या नोंदल्या जात होत्या. वाचकांचा हा उत्साह पाहून अनुवादकाच्या श्रमाइतकेच माझ्याही धाडसाचे चीज झाले म्हणून मलाही खूप बरे वाटले. आता खात्री वाटते की या कादंबरीची स्तुती करणारे वाचक हे पुस्तक विकत घेऊन तिचे सक्रिय स्वागत करतील.

—म. म. केळकर

# हिमालयाच्या पायथ्याशीं

फेब्रुवारी १९६५ सालच्या अखेरच्या चार-सहा दिवसांमधली ही गोष्ट आहे. माझे एक अध्यात्ममार्गात असलेले स्नेही व सहकारी कै. श्री.बाळकृष्ण महादेव दीक्षित (श्री योगेश्वर विष्णु भास्कर लेले यांचे 'जीवनदर्शन' या छोटेखानी पुस्तकाचे लेखक) यांनीं मला एक पुस्तक आणून दिले; व ते वाचण्यात मी इतका रंगून गेलो की तहान-भूक विसरून मी एका बैठकीत ते वाचून काढले. अध्यात्मासारखा तत्त्वजड विषय, पण तोहि इतक्या हृदयंगम भाषेत सांगितलेला! पुस्तक वाचल्यावर मन अक्षरशः भारून गेले. नंतर मुखपृष्ठावर लेखकाचे नाव पुन्हा वाचले जी. के. प्रधान! मी तर स्तंभितच झालों. इतके सुबोध तेंहि गूढवादासारख्या किचकट विषयावर लिहिणारा लेखक महाराष्ट्रीय?—अभिमानाने ऊर भरून आला. पुस्तकांत प्रसिद्धिलेल्या लेखकाच्या पत्त्यावर अभिनंदनाचें पत्र तावडतोब लिहून भेटीची याचना केली.

पत्रोत्तराची आतुरतेने वाट पाहात होतों. पण, तें कधी आलेंच नाहीं. पुस्तकाचा विषय, त्याची केलेली मांडणी व वाचकाला भुरळ पाडणारी पुस्तकाची भाषा याचा परिणाम मनावर इतका खोलवर झाला होता कीं लेखकानें इतकें उच्चाभिरुचीचें सुंदर पुस्तक इंग्रजीत कां लिहिलें? लेखक स्वतः महाराष्ट्रीय असून मराठी वाचकांना या आनंदापासून का वंचित व्हावें लागावें? या पुस्तकाच्या वाचनाचा आनंद मराठी वाचकाला मिळायला हवाच ही भावना मला चैन पडूं देईना. मी त्या पुस्तकाचा मराठीमध्ये अनुवाद करायला सुरवात केली; व ज्या कैफात मी तें पुस्तक तीन-चार वेळा वाचलें, त्याच भारावलेल्या स्थितीत मी सतत तीन दिवस लिहीत होतों. लिहिण्याचा आनंद दाटून राहिला होता कीं कैफ वाढत होता, सांगता येत नाहीं. पुस्तक परत करण्याचा तगादा कै. दीक्षितांकडून येण्यापूर्वी हें अनुवादाचें काम पुरें झालें पाहिजे हीहि मनाची ओढ होतीच!

हें लेखन चालू असतांनाच श्री. प्रधानांचे उत्तर नाहीं म्हणून, त्या पुस्तकाचे प्रकाशक श्री. के. के. आशर यांना पत्र लिहिलें—त्यांत श्री. प्रधानांची

भेट व्हावी व या सुंदर पुस्तकाचे मराठी रूपांतर करण्याच्या माझ्या इच्छेला त्यांनी रुकार द्यावा अशी विनंति केली होती.

दि. ५ मार्च १९६५ रोजीं श्री. आशर यांचे टंकलिखित उत्तर माझ्या हाती पडलें. त्यांत त्यांनी कळविले की, " माझे सहकारी व भागीदार श्री. जी. के. प्रधान यांस हृदयविकाराचा झटका येऊन ७ नोव्हेंबर १९६३ ला देवाज्ञा झाली. त्यांच्या ' टोवर्डस दि सिल्व्हर क्रेस्ट्स ऑफ दि हिमालयाज ' या पुस्तकांचे प्रादेशिक भाषांतून रूपांतर व्हावें असें मलाहि वाटतें. तुम्ही फोनवर अगोदर वेळ ठरवून मला भेटा; आपण मग बोलूं."

मला तो दिवस नक्की आठवतोय्—अजूनहि डोळ्यासमोर सर्व जसेंच्या तस्सें दिसतें आहे—गुरुवार दि. ११ मार्च १९६५ रोजी मी श्री. आशर यांच्या ' लेंटिन चेम्बर्स 'मधील ऑफिसांत गेलों. त्यांचे वैयक्तिक चिटणीस श्री. कर्वे यांनीं झुलते दार उघडून श्री. आशरसमोर मला नेलें.

खोलींत अगरबत्तीचा घमघमाट सुटला होता. त्यांतच फुलांचा मंदसा सुगंध दरवळत होता. फोर्टमधील कचेरींत असा अनुभव अभिनवच ! एखाद्या मंत्र्याला शोभेल अशा कडक इस्त्रीच्या पांढऱ्या शुभ्र वेषांत आशरसाहेब होते. तोंडावर श्रीमंती तेज, व बोलण्यात कमालीचें आर्जव. त्यांनी उभें राहून हस्तांदोलनाकरितां हात पुढे केला; समोरच्या खुर्चीवर बसायला सांगितले.

उदबत्तीचा धूर निघत होता त्या डाव्या बाजूला बोट करून ते म्हणाले, " तो समोर पुष्पहार घातलेला फोटो दिसतो ना ?—ते आमचे श्री. सद्गुरु शंकर महाराज; व त्यांच्याजवळच चष्मा लावलेला तो फोटो आहे ना ?—ते कै. प्रधान, माझे एके वेळचे परमस्नेही व धंद्यातले भागीदार. तुम्ही म्हणता त्या पुस्तकाचे लेखक ! श्री. केशवजीभाई आशर यांच्या टेबलावरहि छोटया चांदीच्या फ्रेममध्ये श्री. शंकर महाराजांचा फोटो होता. समोर फुलांची अंजली व सुवास फेंकीत असलेली छोटीशी अगरबत्ती ! गुरुवार म्हणून माझ्या हातावर पेढयाचा ' प्रसाद ' ठेवण्यात आला. चहाची आठवण श्री. कर्वे यांना करून देण्यात आली नि श्री. केशवजीभाई आशर म्हणाले, " जोशीसाहेब, बोला आतां तुमचें काय म्हणणें आहे तें !" महा-

राजांच्या फोटोकडे पाहात मी म्हटले, "महाराज तर अगदी लहान मुलासारखे दिसतात, नि त्यांच्या हातापायांत व्यंग आहे का ?" आशरसाहेब हंसत म्हणाले, "तीच तर गंमत आहे. कोणच्या वेळी कोणचें रूप महाराज घेतील याचा नेम नसे. पंगु म्हणावे तर केव्हांहि गिरी-पर्वत चढून जात; वयाने लहान म्हणावेत तर त्यांचे नक्की वय कुणालाच केव्हांहि समजलेंच नाहीं. त्यांच्या वृद्ध म्हणजे ८०-९० वय ओलांडलेल्या भक्तांजवळ चौकशी केली तर ते सांगत आम्ही यांना आमच्या लहानपणापासून पाहातों-ओळखतो आहोंत. त्यावरून अंदाज बांधायचा तर १९४८ सालीं महाराजांनी इहलोकची यात्रा संपविली. त्यावेळीं त्यांचे वय १४० तरी असावें असें म्हणतात. पुणे-सातारा रस्त्यावर पद्मावतीला त्यांची समाधि आहे. कै. प्रधानांनीं आपल्या पुस्तकाच्या अर्पणपत्रिकेंत ज्यांचा उल्लेख केला आहे ते हेच श्री. सद्गुरु शंकर महाराज ! पद्मावतीला तुम्ही जरूर जा; तिथे त्यांचे राजयोगी स्वरूपांतहि तुम्हांला फोटो पाहावयाला मिळतील. त्यांचा संचार राजे-रजवाड्यांपासून कुग्रामातील एकाद्या चंद्रमौळी घरापर्यंत असे. गंधर्व नाटक मंडळींत त्यांनी नाटकाचे पडदेहि ओढलेले आहेत. तर बालगंधर्वांना तास न् तास गायला लावले आहे. एकाद्या गरीब घरांतील अडल्या अडचणींतल्या बाळ-बाळंतिणीची त्यांनी सेवा केली आहे तर दारूच्या नशेंत तर्र होऊन, लालबुंद डोळ्यांनी इकडे तिकडे पाहात, सिगारेट्स वर सिगारेट्स ओढीत बसलेले त्यांना आपण पाहिलें असेंहि सांगणारे तुम्हांला भेटतील. त्यांना चहाणारा, ओळखणारा, त्यांच्या अनुग्रहाने जीवनदिशा साफ बदलून गेल्याने जन्मोजन्मीचे ऋण मानणारा, हिंदुधर्मातील सर्व जातींतील स्त्री-पुरुषांचाच नव्हे तर पार्शी, ख्रिश्चन, मुसलमान इ. सर्व धर्मांतील व प्रांतातील लोकांचा अफाट असा त्यांचा भक्तवर्ग आहे. मी व कै. प्रधान त्या भाग्यवंतांपैकी आहोंत. महाराजांच्या अनेक वस्तु-त्यांचा 'हंटर,' पादत्राणे, टोपी, अंगुठी वगैरे माझ्या संग्रहात आहेत; तर प्रधानाने आमच्यापुढें दौड मारली-महाराजांपासून (आतम) 'ज्ञान' प्राप्त करून घेऊन त्यानें मुक्ति मिळवली. महाराजांना जाऊन इतकी वर्षे झाली खरीं, पण जेव्हां केव्हां त्यांच्या साहाय्याची आम्हांला गरज वाटते तेव्हां त्यांची

आळवणी करतांच अजूनहि आम्हांला ते भेटतात; आमच्याशीं बोलतात, अडीअडचणींतून बाहेर पडण्याचा मार्ग दाखवतात. तुम्हांला खोटे वाटेल, पण एके रात्रीं पद्मावतीला प्रधान त्यांच्या समाधीजवळ राहिला होता. त्या समाधींतून उठून महाराज प्रधानांना प्रत्यक्ष भेटले आहेत. "तुम्ही सांगता त्यांत खोटेपणा आहे अशी मला तरी तिळमात्रसुद्धा शंका नाही." मी म्हटले, "पण यामुळेच माझें कुतूहल वाढलें आहे. तें मी बोलून दाखवतों. कै. प्रधानांसारख्या आंग्लविद्याविभूषित अद्ययावत् इंग्रजी पोषाखांत वावरणाऱ्या पदवीधराची व महाराजांची भेट तरी कशी झाली ?" श्री. केशवजीभाई आशर सांगू लागले, "१९४२ साली मी सासवड शुगर फॅक्टरीचा मॅनेजर होतो व श्री. प्रधान मॅनेजिंग डायरेक्टरांचे सेक्रेटरी होते. अकलूज येथें आमची फॅक्टरी होती; व आमची दोघांची कुटुंबे तेव्हां मुंबईतच होतीं.

त्या दिवशी प्रधान मुंबईला जायला निघाला होता. समोरून एका बैलगाडींतून शंकर महाराज येत होते. मोटारींतील मंडळींनी महाराज आले—महाराज आले असा गलका सुरू केला; व कुतूहल व भक्तिभावानें त्यांच्या दर्शनाकरितां त्यांच्याकडे पाहण्याचा प्रयत्न केला. प्रधानानें त्यांच्याकडे ढुंकूनहि पाहिलें नाहीं. कारण बुवा—स्वामी—महाराज यांच्याबद्दल आंग्लविद्याविभूषित पदवीधर प्रधानांना मनांतून अत्यंत घृणा व तिटकारा होता. पहिल्यापासूनच त्यांच्या नास्तिकपणाला तिरस्काराची अति तीव्र धार होती. महाराज वेडेविद्रे चाळे करीत बैलगाडींतून जात होते; त्यावेळीं नाहीं म्हटलं तरी महाराजांची व प्रधानाची दृष्टिभेट झालीच ! त्या काळांत बावड्याचा पूल बांधून झाला नव्हता. तेव्हां होडींतून नदीपार व्हावें लागे. तिथे 'बस' यायची नि मग पुढचा प्रवास; त्याप्रमाणें नदी ओलांडून बसची वाट पहात प्रधान उभा होता. त्याला नदीपर्यंत पोचवायला आलेली गाडी ऐल तीरावरून परत गेली. थोड्याच वेळांत प्रचंड वादळ सुरू झालें,

मुसळधार पाऊस पडूं लागला. 'बस' आलीच नाहीं रात्रभर, त्या पावसांत, सामानासह एका झाडाखालीं उभें राहायची प्रधानावर पाळी आली. अंधार

पडला; पावसामुळें होडीची जा–ये वंद झालेली. मध्यरात्रीपर्यंत पाण्यात निथळत प्रधानाला राहावें लागलें. मध्यरात्रीनंतर कुणा एका माणसाची नि त्याची गाठ पडली व त्या माणसानें प्रधानाला आपल्या झोपडीकडे नेलें. झोपडी कसली? गोठाच तो! दिवस उजाडेपर्यंत या स्थितींत धड ना माझा वंगला नि धड ना मुंबईकडे परतीचा प्रवास अशा स्थितींत राहावें लागलें. अंग तापानें फणफणूं लागलें. सकाळीं एका सायकल स्वाराबरोबर मला निरोप आला–' कालपासून नदीपलिकडे मी अडकून पडलों आहे. ताप आला आहे. मला परत अकलूजला न्यायची व्यवस्था करा.' कारखान्याची गाडी मी पाठविली व दोन तासांत प्रधान वंगल्यावर परत आला. डॉक्टरने तपासून म्हटलें, 'थंडीवाऱ्याचा ताप आहे. काळजीचें कारण नाही' व एक इंजेक्शन देऊन डॉक्टर निघून गेले. दुपारची ३ वाजतांची गोष्ट. ताप थोडा कमी झाला होता; पण अंग दुखत होतें; डोळे जड होते. तेवढ्यांत त्यांना हंसण्याचा आवाज ऐकूं आला. डोळे उघडून पाहातात तो शंकर महाराज समोर उभे! "काय रे, मुंबईला जायची घाई होती ना? मग काय झाले?" एवढे बोलून मूर्ति नाहींशी झाली.

"शंकर महाराज त्या वेळीं, त्यांचे शिष्य गोविंद जानुजी गिरमेबुवा यांच्याकडे येत अकलूजपासून १॥–२ मैलांवर एका वागाईत वस्तीवर त्यांचा बंगला होता. तेव्हां कधीं कधी ते माझ्याकडेहि येत. तोंपर्यंत आम्ही कुणीच त्यांच्याकडे आकर्षित झालेले नव्हतों.

"तापांतून प्रधान उठला होता, नि वंगल्यांत बसला असतांना वाहेरून माणसांचा गलका ऐकूं आला. थोड्याच वेळांत सात–आठ जणांसह शंकर-महाराज माझ्या बंगल्यांत आले. महाराजांनी लांडी विजार घातली होती. अंगात एक असा–तसा सदरा. तोंडाची एक बाजू वाकडी झालेली. हातांत दारूची बाटली. अशा ध्यानाला पाहून यांना कोण म्हणणार 'योगी' पुरुष? वंगल्यांत येतांच तेथे ठेवलेल्या रेडिओच्या किल्ल्या त्यांनी वाटेल तशा फिरवायला सुरवात केली. प्रधानाला हें कुठलें सहन व्हायला? तो ओरडला, 'तुम्हांला या रेडिओची कांहीं माहिती नसतांना तुम्ही त्याच्याशी कशाला खेळता आहात? रेडिओ मोडायचाय् कीं काय?' बरोबरीची

मंडळी हे उद्गार ऐकून घाबरलेल्या आवाजांत म्हणूं लागली, ' अहो, ते शंकर महाराज आहेत ! त्यांना असं बोलूं नका !' थोडया वेळानें मी बाहेर आलों तेव्हां प्रधानानें मला विचारलेंच, ' हे कोण महाराज आणले आहेस भाई ?' प्रधानाला मी म्हटलें, ' अरे, ते एक योगी पुरुष आहेत. त्यांच्या पाया पड !' प्रधान उत्तरला, ' असले महाराज तर आपल्या घरचे ! मला काय करायचंय त्यांच्याशी ? असे छपन्न महाराज बघितलेत. मी कोणाला नमस्कार करीत नाही. जो मला ईश्वरीसाक्षात्कार घडवून आणील त्याचे फक्त मी पाय धरीन !'

" मी काय बोलणार ?" श्री. आशर पुढे सांगू लागले. महाराज बसले होते त्या दिवाणखान्यांत मी आणि प्रधान येऊन बसलों. श्री शंकर महाराजांनीं मला चांदीचा पेला आणायला सांगितला. घरांतून पेला आणून. महाराजांच्या हातांत दिला. हातांतल्या दारूच्या वाटलींतून, चांदीच्या भांड्यात, भडाभडा दारू ओतून, पितां पितां माझ्याकडे पाहात महाराज म्हणाले, " दारू पिणें फार वाईट असतें नाहीं का रे आशर ?" इकडे महाराज हंसत हंसत दारूचे घोट घेत होते व दारूला कधीहि स्पर्श न करणाऱ्या माझ्या तोंडाला दारूची घाण यायला लागली. भोंवतालचे लोक या चमत्काराने एकमेकांकडे पाहात आश्चर्य करीत होते. प्रधान माझ्या जवळच बसला होता. माझ्यावर तर दारूची नशा चढायला लागली. प्रधान हें सर्व पाहात होता; मनांतून तो खात्रीनें चपापला असेल. मला वाटतें, मग मी चांगलाच झिंगलों होतों तेव्हां प्रधानानेंच मला पलंगावर झोपवलें असावें. मी शुद्धीवर आलों तो प्रधान, त्याच खोलींत झोपला होता."

" दुसरे दिवशीची गोष्ट." प्रधानांनी सांगितलेली प्रत्यक्ष माहिती म्हणून कै. प्र. के. अत्रे यांनी त्यांच्या ' मराठा ' दैनिकाच्या दि. १० नोव्हेंबर १९६३ च्या अंकात **कै. बाबा प्रधान** या शीर्षकाखाली लिहिलेल्या–(श्री. प्रधान यांचा ७ नोव्हेंबरला मृत्यु झाल्यावर लिहिलेल्या मृत्युलेखांत–प्रसिद्धिली आहे.) " त्या रात्रीं मी व आशर एकाच खोलींत झोपलों होतों. बारा वाजायचा सुमार असेल. कुणीतरी मला वर उचलून नेत आहे असा मला भास झाला. मी जागा होऊन पाहातों तों आशर अंथरुणावर नव्हते.

म्हणून मी बंगल्याच्या पोर्चमध्ये आलों. पाहातों तों तेथें एक मोटार उभी. नि पाठीमागच्या बाजूला श्री शंकर महाराज, आशर व महाराजांचे शिष्य गोविंद जानजी गिरमेबुवा. महाराजांनी मला विचारले, "काय उठलात?" तेव्हा मोटारीचे दार उघडून मी म्हटले, 'होय, मलाहि यायचेंय तुम्ही जाता तिकडे' नि मी मोटारींत बसलों." त्यानंतर घडलेली हकीगत सांगतांना आशर म्हणाले, "आमची मोटार अकलूजपासून दोन मैलांवर असलेल्या गिरमेबुवांच्या वस्तीकडे निघाली. शेतामध्ये असलेल्या बंगलीत मोटार शिरतांच, चाहूल लागून मंडळी झोपेतून उठली. बागाईतदारांची बायको म्हणाली, 'महाराज फार उशीरा आलांत. अशा वेळी मी तुम्हांला काय देऊं?' महाराज म्हणाले, 'चहा द्या.' बाई म्हणाली, 'दूध विरजलें आहे. त्यापेक्षां मी भात पिठलं करते' महाराज म्हणाले, 'अग, बकऱ्या तर आहेत ना परसांत? त्यांचे दूध काढून चहा कर; नि पिठलेंभाताऐवजी खिचडी पकवा.' आम्ही त्या दुधाचा चहा घेतला. खिचडीचें जेवण घेतलें. तोपर्यंत कितीतरी उशीर झाला होता. ते वातावरणहि असे होते—आशर सांगतात, "की तिथे फार बसवेना. श्री शंकर महाराजांनी नंतर सांगितलें या प्रधानाच्या तोंडांत अक्कलकोटच्या स्वामींचा थोडा अंगारा टाका.तेथल्या एका गोसाव्याने तसे केले मात्र! प्रधानाचा देह लाकडासारखा अचेतन झाला." आशर पुढे सांगूं लागले, "मी तर त्या जागेंत थांबायला अगदी नाराज होतो. नि प्रधानाची ही स्थिति! मनांतून घाबरलोंच होतों—महाराजांना मी म्हटलेंहि 'हें काय करून बसलात? बिचारा मेला—बिला तर?' महाराज नुसते हंसले. जवळ जवळ सात तास प्रधानाची ती अवस्था टिकून होती; व आतां काय होतें अशा विचारांत जीव मुठींत घेऊन, व मन नको नको म्हणत असतां आम्ही सर्व बसून होतों." त्यावेळचा अनुभव सांगतांना कै. श्री. प्रधान म्हणतात—

"मी एकदम समाधि अवस्थेंत गेलों. मी जणूं कांहीं माझ्या शरीराच्या बाहेर पडलों; आणि निळ्याभोर नक्षत्रांकित आकाशांत विहार करूं लागलो. नाना तऱ्हेचे सुमधुर नाद आणि सुगंध ह्यांचे आस्वाद त्या अवस्थेंत मिळाले. मी जेव्हां जागा झालों तेव्हां सकाळचे आठ वाजले होते.

बाहेर उन्हं पडलीं होतीं. म्हणजे जवळ जवळ सात तास मी त्या समाधींत होतों. समोर शंकर महाराज माझ्याकडे पाहात हंसत होते. त्याबरोबर मी त्यांच्या पायांवर डोके ठेवलें; आणि म्हणालों, "आपल्या सामर्थ्याची मला कल्पना नव्हती. आजपासून तुम्हीच माझे गुरु!"

"अशा रीतीनें बावा प्रधानांची नि शंकर महाराजांची गांठ पडली." आशर सांगतात, "आदल्या दिवशीं प्रधानाने महाराजांना नमस्कार करण्याचें नाकारतांना जे उद्‌गार काढले होते ते लक्षांत घेऊन; कीं काय, दुसरेच दिवशीं महाराजांनी प्रधानाला साक्षात्कार घडवून आणून आपल्या चरणीं वाकायला लावलें. नंतर महाराजांनीं प्रधानाला सांगितलें, "अरे तूं खरा अक्कलकोटच्या स्वामी महाराजांचा शिष्य! तो म्हातारा माझ्या पाठीमागे सारखा तगादा लावून माझ्याकडून हें सर्व करून घेतोय!"

हें ऐकतांच माझ्यांतलें कुतूहल बरेंच ताणलें गेलें. त्या भरांत मी विचारलें, "कै. प्रधान यांच्या पुस्तकांतील गुरुदेव म्हणजेच श्री शंकरमहाराज तर नव्हेत?"

"अगदीं बरोबर!" श्री आशर उत्तरले.

कै. प्र. के. अत्रे यांनी वर उल्लेख केलेल्या मराठाच्या अंकांत जे प्रधानांच्या मुखातून ऐकलेले किस्से प्रसिद्ध केले आहेत ते मोठे मनोवेधक व उद्‌बोधक आहेत :

"एकदां बाबा (म्हणजे कै. प्रधान) नॉर्वेहून जर्मनीत येत असतांना विमानांत बिघाड झाला" कै. अत्रे यांनीं प्रधानांच्यावर मराठ्यांत लिहिलेल्या मृत्युलेखांत लिहिलें आहे–"सर्व उतारूंनी आपल्या प्राणांची आशा सोडली होती. बाबांनी शंकर महाराजांचे स्मरण केलें आणि आश्चर्य हें कीं विमान कांहीं वेळानें विमानतळावर सुरक्षितपणें उतरलें. हा चमत्कार झाला कसा, तें विमान चालवणाऱ्या पायलटालाहि समजलें नाहीं. हिंदुस्थानांत परत आल्यावर बाबांची व शंकर महाराजांची जेव्हां पहिली भेट झाली तेव्हां महाराजांनींच त्यांना पहिला प्रश्न केला–"काय रे, त्या दिवशीं तूं विमानांत फारच घाबरला होतास नाहीं का?" बाबा आश्चर्यचकित झाले. त्यांनी महाराजांना विचारलें, "तुम्हांला काय माहीत?" "मला काय

माहीत ? " महाराज हंसत म्हणाले, " अरे, मी तुझ्या शेजारींच वसलों होतों कीं ! "

' जिथें जातो तेथें तूं माझ्या सांगातीं ' या संतोक्तीमध्यें अनुस्यूत केलेला अनुभव खऱ्याखुऱ्या गुरूकडून मिळतो तो असा ! नाहींतर दैनंदिन जीवनांत गुरु पुष्कळ भेटतात; पण ज्या शिष्याची जिम्मेदारी एकदां पत्करली त्या शिष्याला शेवटपर्यंत साथ देऊन ' पहुँचा हुवा ' करायचे तें कितीक गुरु करतात ? ' आधीं मनुष्यजन्म दुर्मिळ, त्यांतून साधनमार्गाकडे मनाची ओढ उत्पन्न होणें हें त्याहिपेक्षां दुर्मिळ ' येवढेंच नेहमी म्हटलें जातें, पण त्याहीपुढें जाऊन म्हणावेंसें वाटतें कीं साधकाचें बोट धरून त्याला ईश्वरदर्शन घडवून आणणारे श्री शंकर महाराजांसारखे सद्‌गुरु किती दुर्मिळ ? साधना कठोर खरी, ती करीत असतां अपरंपार कष्ट, मनाचा कडेलोट करणारा निर्धार, व शेंडी तुटो वा पारंबी तुटो असा निदिध्यास लागतो हें सर्व खरें. पण त्या मार्गांत असतांना आपल्या पाठीमागें भरभक्कम आधार आहे असा विश्वास केवढें मोठें कार्य करीत असतो; आणि नेमकी ती साद या मार्गांत वावरणाऱ्या कितीकांना मिळते हा खरा महत्त्वाचा प्रश्न आहे, भक्तानें हाक मारतांच गुरुचें साहाय्य मिळणें हें परमभाग्य शंकर महाराजांच्या शिष्यांनाच मिळालेलें आढळतें. आपलें बोट समर्थ गुरुदेवांच्या हातांत आहे, तेव्हां कुठेंतरी भरकटत जाण्याचा सुतराम् संभव नाहीं असा विश्वास उत्पन्न करण्यानेंच साधकाची उत्तरोत्तर केवढी तरी प्रगति होत असते.

प्रधानांची ज्येष्ठ कन्या सौ. बाबी (परुळकर) यांनीं सांगितलेली ही सत्यकथा या दृष्टीने मननीय आहे.

" १९४६–४७ मध्यें पपा (श्री प्रधान) धंद्याच्या निमित्तानें इंग्लंडला गेले होते. ते त्यांच्या लॅण्डलेडीकडे राहात. ती बाई वयोवृद्ध असली तरी फार प्रेमळ होती. १९४६ च्या ऑक्टोबरमध्यें माझे आजोबा (प्रधानांचे वडील) वारले. तेव्हां पपा लंडनला होते. ही बातमी त्यांच्या कानांवर पडतांच त्यांना फार दुःख झालें. वडिलांची व आपली शेवटची भेटहि होऊं शकली नाही या एका गोष्टींचे राहून राहून त्यांना फार वाईट वाटत होतें.

अशा विमनस्क स्थितींत, आपल्या खोलींत, एकटेच बसले असतांना श्री शंकर महाराज आले. महाराजांना पाहून पपांचा दुःखावेग उफाळून आला, त्यांना उमाळा आवरेना. महाराजांच्या मांडीवर डोकें टेकून पप्पांनी खूप वेळ आपल्या भरून आलेल्या दुःखाला अश्रुरूपाने वाट करून दिली. आवेग ओसरल्यावर महाराजांनीं त्यांचें प्रेममय वाणीने सांत्वन केलें; व म्हणाले, "चल माझ्याबरोबर" पपांना घेऊन श्री शंकर महाराज गिरनार पर्वतावर आले. तेथें श्री मच्छिंद्रनाथ व श्री गोरखनाथांचे दर्शन घडवलें. पपांनीं त्या दोघांच्या पायांवर मस्तक ठेवलें. जरा वेळाने त्यांना दोन कुत्रे दिसूं लागले; व पाठोपाठ श्री भगवान दत्तप्रभूंचें दर्शन घडवलें. दुःखभार हलका झाला होता. पपा लंडनला परत आले. सकाळीं नेहमीप्रमाणें पपांचे बूट साफ करतांना लॅण्डलेडी म्हणाली, "काय रे, तूं गेला तरी कुठे होतास ?" प्रधानांना या प्रश्नाची तेव्हा उकल झाली नाही. पण लॅण्डलेडी जेव्हां म्हणाली, "ही बुटांच्या तळाला लागलेली लाल माती इंग्लंडमधील नव्हे; इंडियांतील दिसते. मग तुझ्या बुटांना इथं कशी चिकटलीय् ?" पपा चपापले. त्यांनीं लॅण्डलेडीला म्हटलें, "तुला काय करायच्या आहेत या चवकशा ? तूं आपली तुझं बूट साफ करायचं काम कर म्हणजे झालं !" पपांनी पुनः डोळे मिटलें व दत्तदर्शनाचा तो आनंद पुनः अनुभवला. त्या दर्शनाचा ठसा त्यांच्या मनावर इतका खोलवर उमटला होता कीं त्या दिव्यदर्शनाची कल्पना नंतर त्यांनी चित्रकाराला देऊन त्याच्याकडून श्री दत्तात्रेयांचे चित्र काढून घेतले. विश्वास ठेवा अगर नका ठेवूं. या गोष्टी बाबा प्रधानांच्या जीवनांत घडलेल्या आहेत, व त्यांनीं स्व–मुखानें हे अनुभव सांगितलेले आहेत.

"एकदा महाराज माझ्या बंगल्यावर आले असतां" श्री आशर सांगत होते प्रधान महाराजांना म्हणाला-"कुरुक्षेत्रावर सैन्य समोरासमोर उभें असतांना अर्जुनाला श्रीकृष्णानें गीता सांगितली हें पटत नाहीं !"

महाराज म्हणाले "हं बस पाहूं माझ्यासमोर !" आणि त्यांनीं प्रधानाकडे अशा कांहीं दृष्टीनें पाहिलें कीं प्रधानांची समाधि लागली. दोन अडीच तास ते त्या स्थितींत होते. समाधींतून जागे झाल्यावर प्रधानांनीं महाराजांचे

पायांवर डोके ठेवले व म्हणाले, " महाराज, आज मी धन्य झालों. प्रत्यक्ष श्रीकृष्णाच्या तोंडून मला गीता ऐकवलीत; सर्व कुरुक्षेत्राचा देखावा याच देहीं याच डोळ्यांनीं पाहिला !"

" संपूर्ण पक्का नास्तिक प्रधान, महाराजांनीं पाहातां पाहातां, केवढा बदलून टाकला !" आशर सांगतात–" तो रोज नियमानें पूजा करी, 'नेमा' ला बसे. ज्ञानेश्वरी, गुरुचरित्राचें पारायण करी. एका बैठकींत आठ-दहा तास बसून त्यानें गुरुचरित्राचीं पारायणें केलेलीं मी पाहिलीं आहेत–एक-दोन नव्हेत तर शंभरांवर !! योगवासिष्ठ हा त्याच्या नेहमीच्या वाचनांत असलेला आणखी एक ग्रंथ !"–प्रधान ज्ञानमार्गी होता. महाराजांजवळ तो बौद्धिक वाद घाली; आम्हांला तें धाडस कधीं झालें नाहीं. पण बुद्धीला पटलें की त्यानें महाराजांनी केलेल्या उपदेशाचें अनुसरण करण्यांत कधींहि लाज-लज्जा बाळगली नाहीं; कुचराई केली नाहीं; अशी असीम निष्ठाहि त्याचेजवळ होती."

महाराज खुषींत असले कीं काय देतील याची कुणाला कल्पनाहि करतां येणार नाहीं. प्रधानाला ते एके दिवशीं म्हणाले, " बाबा, तूं वाटेल ते माग तें मी तुला आज देणार आहे. सत्ता–संपत्ति–दौलत काय म्हणशील ते !" प्रधान म्हणाले, 'पाहा बरं मी मागितल्यावर मग म्हणाल–हें नको यापेक्षां वेगळें काही तरी माग !'

" कांही हरकत नाहीं." महाराज म्हणाले, मी देईन म्हटलें ना ? मग वाटेल ते तूं माग मी तुला देईन म्हणजे देईन !" प्रधानांनी म्हटलें, " मला ज्ञान द्या " त्यावर महाराज एकदम ओरडले, " बेटा, तूं तर माझ्या लंगोटीलाच हात घातलास की रे ! हरकत नाहीं. तथास्तु !"

कै. बाबा प्रधान हे नाथपंथीय होते. श्री, ज्ञानदेव व सोपानदेव यांच्या दर्शनाला आपण गेलों असतांना 'आल्लख' असें पुकारतांच त्या उभय सत्पुरुषांनीं प्रत्यक्ष दर्शन दिल्याचा निर्वाळा प्रधानांनी दिल्याचे कै. प्र. के. अत्रे यांनी मराठ्यांत लिहिलेल्या लेखांत नमूद केलें आहे.

सौ. बाबी (परुळकर) यांनीं सांगितलेल्या एका गोष्टीनें या घटनेवर

आणखी प्रकाश पडतो, व कै. प्र. के. अत्रे यांच्याप्रमाणेंच आपलीहि खात्री होते कीं कै. प्रधान हे एक साक्षात्कारी पुरुष होते.

सौ. परुळकर सांगतात, " आम्ही सर्वजण रोज रात्रीं दत्ताची प्रार्थना करीत असूं. पपा उदबत्ती लावायचे व आम्ही सर्वजण जवळ जवळ अर्धा तास भजनें-प्रार्थना म्हणत असूं. आमच्यामध्यें आमची ८२ वर्षांची आजी-पप्पांची आई-वसत असे. ती नेहमीं म्हणायची " सर्व लोक मला सांगतात, तुझा मुलगा (म्हणजेच माझे पप्पा-बाबा प्रधान) अध्यात्ममार्गांतील फार मोठा अधिकारी आहे. अशा मुलाला मी जन्म दिला म्हणजे मी किती धन्य नाहीं का ?" तिला आमच्या पपांबद्दल असा अभिमान होता. ती पपांना नेहमी म्हणायची ' मला तरी एकदां दत्ताचं दर्शन दे ना करून !"

" मला वाटतं, दत्त-जयंती होती. त्या दिवशी नेहमीप्रमाणें, झोपण्या-पूर्वी आम्ही प्रार्थना म्हणत होतों. इतक्यांत आमची आजी मोठ्याने ओर-डली " बाबी बाबी अबब ! काय तेज हें ? " आजीच्या तोंडून पुढे शब्द फुटत नव्हता. पपांना वाटलं, म्हातारी मागच्या मागें पडणार ! परंतु, तसें झालें नाही. फक्त आजीच्या मिटल्या डोळ्यांतून ' अश्रूंचीं फुलें ' पारि-जातकाच्या फुलांप्रमाणे टपटपां गळायला लागली. तोंडानें ती इतकेच म्हणाली, " बाबा, तुझा शब्द तूं खरा केलास पण, मला आधीं सांगायचं तरी ! मला त्या मूर्तीचे पाय धरायचंसुद्धां सुचलं नाहीं-तें तेज पाहून ! " बाबीने हा किस्सा पुरा करतांना म्हटले, " मी आजीशेजारीच बसलें होते. पण दत्तदर्शनाचा हा साक्षात्कार इतकी जवळ असूनहि मला कांही झाला नाही ! "

ईश्वरप्राप्ती हा एक आध्यात्मिक अनुभव आहे. तो अनुभव निर्विकल्प समाधींतच साधकाला प्राप्त होतो. तो प्राप्त झाला की विकार कमी होत जातात. व्यक्तित्व विकसित होतें. अन्तःकरणाची उदारता वाढत जाते; ' मी ' पणा गळून जातो आणि साधक अनंतांत विलीन होतो. समुद्राला गंगा मिळाली की परतीचा प्रवास उरतोच कुठे ? अंतकाळींसुद्धा " माझं काम झालं, मी सुंदर जीवन जगलों " हें समाधान म्हणजेच ईश्वरप्राप्ती. संत तुकाराम महाराजांसारखें " याचसाठीं केला होता अट्टाहास, शेवटचा दिस

गोड व्हावा" असं म्हणतां आलं पाहिजे–हाच परमार्थ, हेंच आत्मदर्शन, हाच साक्षात्कार !

कै. प्रधानांच्या ज्येष्ठ कन्या सौ. बाबी (परुळकर), श्री. केशवजीभाई आशर व त्यांचे वैयक्तिक चिटणीस श्री. कर्वे यांनी कै. प्रधानांच्या मी केलेल्या अनुवादाला लवकरांत लवकर प्रसिद्धी मिळावी म्हणून थोडे प्रयत्न नाहीं केले ! परंतु, स्वर्गीय शंकर महाराज व त्यांचे सत्‌शिष्य कै. प्रधान यांची तशी इच्छा नव्हती म्हणून की काय, माझें हस्तलिखित अनेक प्रकाशकांकडे जाऊनहि, 'अशा लेखनाचा भोक्ता वाचकवर्ग पुरेसा नाहीं' या सबबीवर परत आले.

प्रत्येक गोष्टीला, काळ-वेळ ठरलेला असतो, हेंच खरें !

आज आठ वर्षानंतर हेंच हस्तलिखित मनोहर ग्रंथमालेचे चोखंदळ संचालक श्री. मनोहरपंत केळकर यांनीं स्वीकारून तें प्रकाशित करण्याचा साहसी निर्णय घेतला याबद्दल माझ्याप्रमाणे मराठी वाचकहि त्यांचा ऋणी राहील.

श्री. केशवजीभाई आशर, त्यांचे वैयक्तिक चिटणीस श्री. कर्वे व प्रधान कुटुंबीय यांचे आभार मी मानले तर त्यांना तें परकेपणाचें वाटेल, अतएव आवडणार नाहीं; पण म्हणून त्यांच्याबद्दल उल्लेखहि करायचें मी टाळलें तर औद्धत्याची रुखरुख मला वाटेल; म्हणून त्यांचा नामनिर्देश मात्र आवर्जून करीत आहें.

या अनुवादाच्या वाचनाने थोडेबहुत वाचक जरी साधना मार्गाकडे वळले तरी माझ्या श्रमांचे सार्थक झालें असें मी समजेन.

रामचंद्र ज. जोशी

# अनुवादकाचा परिचय

या कादंबरीचे अनुवादक डॉ. रामचंद्र जनार्दन जोशी यांचे सबंध नाव वाङमय–शोभेत कादंबरी येत असता जाहीर केले नव्हते. केवळ राम हे टोपण नावच प्रसिद्धिले जात होते. हेतू येवढाच की, 'होमिओपाथिक प्रथमोपचार' या पुस्तकाचा लेखक असल्या कादंबरीच्या फंदात पडेल यावर वाचकांनी विश्वास ठेवला नसता.

डॉ. जोशी हे वयाच्या अठराव्या वर्षी वडिलांच्या अकाली मृत्यूमुळे सरकारी नोकरीत शिरले. त्यांचा जन्मदिन ५ ऑगस्ट १९१०. शिक्षण पुण्याला इंटरपर्यंत झाले. १९२८ साली मध्यवर्ति सरकारच्या पुरवठा ते ्यात त्यांना नोकरी मिळाली. तेथे ३५ वर्षे नोकरी करून १९६३ मध्ये या शासाले. नोकरीत असतानाच त्यांनी बायोकेमिस्ट्री व होमिओपाथी मिळविले,चा अभ्यास करून परीक्षा दिल्या आणि त्यात उत्तम यश लहान ेली दहा वर्षे ते होमिओपाथीचे डॉक्टर म्हणून प्रसिद्ध आहेत.

'जीवन णापासून त्यांना लेखनाचा नाद होता. १९३६ मध्ये त्यांची अनुवाद ोत' ही कादंबरी प्रसिद्ध झाली. नंतर ३० वर्षांनी त्यांनी हा येत आहेहून ठेविला, पण तो प्रसिद्ध व्हावयाचा योग या विजयादशमीस होमिओपा अनुवाद वाचल्यानंतरही तो बाजूला ठेवायला सांगून मी त्यांना लावली व प्रथमोपचार ही लेखमाला वाङमयशोभेसाठी लिहायला पाथीवरील पुस्तकरूपाने प्रसिद्धही केली. त्यांची आणखी दोन होमिओ- लेखमाल पुस्तके मी लवकरच प्रसिद्ध करणार आहे आणि बाराक्षरावरील मनोह व पुस्तकही यथावकाश प्रसिद्ध करणार आहे. वाङमय–शोभा व उत्त ग्रंथमाला याद्वारे शास्त्रीय लेखन लालित्यपूर्ण भाषेत लिहिणारा एक म लेखक मराठी वाचकांना देता आला याचा मला अभिमान वाटतो.

'साद देती हिमशिखरे' या कादंबरीमुळे त्यांचे सव्यसाचित्वही सिद्ध झाले आहे.

दि. १८ सप्टेंबर १९७३

**मनोहर महादेव केळकर**



# साद देती हिमशिखरे....



# साद देती हिमशिखरे....

पहिला भाग

साद देती हिमशिखरे

प्रवास ... ९८००४

# १

मी टेकडी चढत होतो. सगळीकडे अंधुक अंधुक दिसत होते. दिशा फाकून बराच वेळ झाला होता; परंतु धुक्याने आसमंत व्यापले असल्याने सूर्यदर्शन घडत नव्हते. सभोवताली नीरव शांतता पसरली होती. शांत गंभीर...दूर दूर कुठेतरी पक्ष्याच्या कूजनाने त्या शांततेचा भंग होत होता तेवढाच. किती कठीण होती ती चढण ? पण ती चढून चालण्याचे श्रम झाल्याने इतकी झोंबरी थंडी असूनही, अंगभर एक गोड उबदार शिरशिरी जाणवत होती. कसल्याशा गाण्याची लकेर गुणगुणत मी गिरिशिखरावर आलोहि.

एव्हांना सूर्यबिंब कितीतरी वर आले होते; आणि त्यामुळे आसमंत उजळून निघून जे दृश्य समोर ठाकले होते ते इतके आल्हादक होते की जीव नुसता उल्हासाने फुलून आला. मनात येऊन गेले; 'एवढे श्रम घेतले त्याचे चीज झाले. किती सुंदर, किती नयनमनोहर! जिकडे पाहावे तिकडे सभोवतालची वर्फाच्छादित शिखरे सुवर्णमुकुट घातल्यासारखी दिसत होती. खालच्या सपाटीवरही बर्फच वर्फ पसरले असून जिथे जिथे ते सूर्याच्या उष्णतेने वितळले होते, तिथे तिथे हिरवळीची छटा अधूनमधून डोकावत होती. भोवतालचे हृदयंगम दृश्य, बालसूर्याचे ते गोजिरवाणे लाल लाल रूप, मंदशीतल वाऱ्याची झुळुक, नि:स्तब्ध शांतता; सारे सारे इतके आल्हाददायक होते की माझे भानच हरपले. सारे अवयव गोठवणाऱ्या त्या थंडीतही मला हलके फुलके झाल्यासारखे वाटत होते, उत्साहाला जणू उधाण आले होते. त्या भरात, " समोर दिसणाऱ्या दुसऱ्या टेकाडावरहि चढून

जावे; किती मजा होईल," अशा विचाराने मी दोन पावले टाकली देखील. तो पाठीमागे कुणीतरी असल्याची जाणीव झाली. जनता-संपर्कापासून खूपच दूर दूर, अभूतपूर्व अशा सौंदर्याचा अखटक अनु-भव घ्यायला मी या गिरिशिखरावर आलो आहे अशी माझी कल्पना! पण, त्या बेभान स्थितीत चाहूल लागल्याने मी एकटा नाही या जाणीवेने थरकलो नि एकदम दचकून मागे पाहिले.

माझ्यापासून थोडयाच अंतरावर भगवे वस्त्र परिधान केलेला एक सन्यासी उभा होता. इतके भव्य व्यक्तिमत्त्व मी यापूर्वी पाहिल्याचे मला आठवत नव्हते. उंचच उंच पण धिप्पाड शरीराची ठेवण, ओठ जरासे विलग होऊन स्मित फुटलेले; पण केवढे मनोहारी! अति सुंदर चेहरा. गोरी–गुलाबी कांति, तेजस्वी पण सहृदयता ओसंडत आहे असे नेत्र, शक्तीचा स्रोतच जणू असा बलिष्ठ देह. गोऱ्या उघडया गळयात रुद्राक्षमाला तर शिरोभागी सोनेरी जटांचा मुकुट, उजव्या हातात त्रिशूळ नि पायात खडावा. माझी स्वतःची उंची सहा फुटांपेक्षा जरा जास्तच असल्याने मी स्वतःला उंच समजत असे. पण माझ्यापुढे उभी असलेली मूर्ती माझ्याहिपेक्षा आठ–दहा इंचांनी जास्तच उंच होती.

मी दचकून वळलो आणि स्तिमित दृष्टीने त्या संन्याशाकडे पाहात होतो; याची त्याला गंमत वाटत असावी असे दिसले. हुकमी पण अत्यंत मधुर आवाजात तो म्हणाला, "एकहि पाऊल पुढे टाकशील तर प्राणाला मुकशील. समोर दिसते आहे ती टेकडी नाही; ती प्रचंड हिमराशी आहे. त्याखाली हजारो फूट खोल अशी घळई आहे. या रस्त्याने जाऊ पाहाशील तर त्या गर्तेमध्ये तुझी नामोनिशाणीही राहणार नाही. या गिरिपरिसराची तुला माहिती दिसत नाही; आणि अशा ठिकाणी वाटाडयाशिवाय हिंडणे धोक्याचे आहे. मौजमजा करायला जाशील नि जीव मात्र गमावून बसशील. तेव्हा शाहण्या-सारखा माझ्या पाठोपाठ ये; मी तुला तुझ्या मुक्कामावर सुखरूपपणे पोचवितो." केवढ्या भयंकर संकटातून मी वाचलो, या कल्पनेने मी

लीन होऊन अभिवादन केले नि म्हटले, " महाशय, आपण कोणीही असा; माझा जीव वाचवल्यावद्दल मी आपला अत्यंत ऋणी आहे. " माझे वाक्य ऐकताच तो संन्यासी मोठ्याने हसला, पांढऱ्याशुभ्र मोत्यासारख्या त्याच्या दंतपंक्ती चमकून गेल्या. " अगोदरच उशीर झाला आहे; तेव्हा झपाझप पाय उचल नाहीतर वितळणाऱ्या बर्फातून डोंगर उतरून जाणे धोक्याचे होईल ! " तो म्हणाला. एकहि शब्द न उच्चारता मी त्याचे पाठोपाठ चालू लागलो. उतार उतरून जाणे तसे सोपे होते; पण वितळणाऱ्या बर्फाने पाय घसरून केव्हा कपाळ-मोक्ष होईल याची भीति वाटत होती. तो अगदी सहजपणे चालला होता; धोक्याच्या वळणावर मला जपून नेत होता. असे कितीतरी अंतर चाललो असू; नि तेवढ्यात एक बर्फाच्छादित खडक समोर आला. संन्याशाने तो केव्हाच ओलांडला. मला मात्र तो ओलांडायला जरा वेळ लागला.

लवकरच गुहेच्या तोंडाशी आम्ही पोचलो. त्याने हलकीशी 'शीळ' घातली. त्यावरोबर महाभयंकर नि क्रूर दिसणारे दोन कुत्रे बाहेर आले. साधूला पाहाताच, माणसासारखे त्याच्या पायाशी ते नतमस्तक झाले. त्याने त्या दोन्ही धुडांना सहज नि ममतेने उचलून आपल्या बाहूत घेतले. त्याच्या शक्तीची मला कल्पनाच करता येईना. " घाबरू नकोस." साधू म्हणाला, " भीतिदायक दिसतात खरे हे कुत्रे पण आहेत अगदी गरीब. त्यांच्यापासून काही अपाय नाही पोचणार कुणाला ! " गुहा चांगली ऐसपैस, सुंदर नि आरामशीर होती. आत चांगले उबदार वाटत होते. स्वच्छता इतकी दिसत होती की त्या-करिता कुणीतरी चांगलीच मेहनत घेत असला पाहिजे असे स्पष्ट जाणवत होते. व्याघ्रांबर, मृगाजिन नि काळविटांची कातडी यांनी सर्व जमीन आच्छादलेली होती. पण त्यातहि सौंदर्यदृष्टी होती. एका कोपऱ्यात मऊमऊ लोकरीची पांघरुणे नीट घड्या घालून ठेवली होती, तर दुसऱ्या कोपऱ्यात चौकोनी स्थंडिलामध्ये अग्नी धुमसत होता. वरच्या झरोक्यातून साऱ्या गुहेत उजेड पडला होता; पण

कुठूनही त्यामधून बर्फ किंवा पाणी ओघळताना दिसत नव्हते. कसला तरी मंद–मधुर–सुवास साऱ्या वातावरणात दरवळत होता. सारे दृश्य नि वातावरणच इतके स्वर्गीय सुख-शांति-समाधानाचे वाटत होते की, नास्तिकातल्या नास्तिकालाही तेथे काहीतरी दैवी-पवित्र-असामान्य आहे असे कबूल करायला लागले असते. साधूने मला बसायला सांगितले नि म्हटले, " तू दमला आहेस, थोडी विश्रांती घे; तुझा श्रम-परिहार करण्यासारखे काही मला देता येते का पाहातो." त्याने आपले हात पसरले. नि काय नि कसे झाले मला कळले नाही, त्याने आपल्या हाताने, गरमगरम दुधाचा लोटा माझ्या पुढ्यात ठेवला. नि म्हटले, "एवढे दूध घे; म्हणजे तुला कसे, ताजेतवाने वाटेल ! गाईच्या दुधासारखी, या जगात उत्साह नि शक्तिवर्धक दुसरी वस्तू नाही !" मी खरोखरच थकलो होतो; मला तहान लागली होती. त्या स्थितीत गरमागरम दूध म्हणजे जे हवे ते मिळाले असे केवळ नसून जणू परमेश्वरी वरदानच वाटले. किती मधुर नि आल्हाददायक होते ते ! मी ते सारे दूध प्यालो; नि रिकामा लोटा खाली ठेवला. माझ्याकडे स्मित मुद्रेने पाहात तो साधू म्हणाला, " वत्सा, ही गुंफा तुझीच आहे; एके दिवशी तू इथेच येणार आहेस." माझा स्वभाव जात्या फार चौकस नि वडवड्या; कुठेहि वावरणारा किंवा स्वत:कडे कमीपणा पत्करून गप्प बसणारा नव्हे; पण त्या गुहेतील ते धीर-गंभीर नि पवित्र वातावरण व साधूची मनावर पडलेली मोहिनी यामुळे मी अवाक् झालो. साधू काय म्हणाला ते मला जरी समजले नाही, तरीही मी त्याला उलट कोणताही प्रश्न विचारला नाही. मझाया गोंधळलेल्या मनाचे प्रतिबिंब चेहऱ्यावर उमटलेले त्याला दिसले की काय, नकळे. तो म्हणाला, " मी जे काही म्हटले त्याचा अर्थ तुला आज समजणार नाही. पण कालांतराने सत्य तुला आपो-आप समजून येईल. घरी परतायला तुला आधीच उशीर झाला आहे, तेव्हा तुला आणखी थांबवीत नाही." असे म्हणून मनुष्याला सांगतात त्याप्रमाणे त्या दोन्ही कुत्र्यांना त्याने मला टेकडीच्या खाल-

पर्यंत सोबत करायला सांगितले. मीही उठलो; आदराने त्या साधू-पुढे नतमस्तक होऊन, त्याने केलेल्या उपकाराबद्दल पुनः त्याचे आभार मानले नि कुत्र्यांपाठोपाठ गुहेबाहेर पडलो. सूर्य बराच वर आला होता; भोवतालचे बर्फ वेगाने वितळत होते. एका दरडीवरील निसरडी वाट टाळता टाळता, पाय घसरून मी चांगलाच कोसळलो. माझ्या डोळ्यांपुढे अंधारी आली. डोळे उघडले पण सगळीकडे काळोखच काळोख दिसला. डोक्याला तर लागले नाही ना म्हणून डोके चाचपू लागलो; तर तिथे मऊमऊच स्पर्श जाणवला. मला आश्चर्य वाटले. मी सावध झालो नि उठून बसलो; आणि काय आश्चर्य ! मी माझ्या खोलीत मऊमऊ अंथरुणावर, उबदार पांघरूण लपेटून बसलो होतो. दिवा लावून घड्याळ पाहिले तो पहाटेचे ४ वाजले होते. एकूण मला स्वप्न पडले होते तर ! इतक्या लवकर उठून काय करायचे ? दिवा मालवून मी पुनः झोपण्याचा प्रयत्न करू लागलो. झोप येणे अशक्य होते ! त्या विलक्षण पण सुखद स्वप्नाने माझ्या डोक्यात विचारांचा कल्लोळ उसळला !! त्या स्वप्नातील दृश्यांची नि अनुभवांची संगती लावण्याचा मी तासभर प्रयत्न केला, पण तो निष्फळ ठरला. मी शेवटी उठलो; कपभर चहा करून प्यायलो नि टेनिसची रॅकेट घेऊन खोलीबाहेर पडलो.

## २

जुन्या, गर्भश्रीमंत, खानदानी कुटुंबात माझा जन्म झाला होता. आमचे घर–दार, शेतीवाडी वगैरे मिळून मोठी स्थावर नि जंगम मिळकत होती. समाजात नि सरकारदरबारी आम्हाला मोठी मान्यता होती. जातीने ब्राह्मण नि धर्माने आम्ही हिंदू असलो तरी सुधारक म्हणवून घेण्यात आम्हाला मोठेपणा वाटत होता; आणि त्यामुळे आमच्या घरात धार्मिक सोहाळे काहीही होत नसत. धर्म म्हणजे

थोतांड आहे; आणि त्याच्या नावाने केले जाणारे सारे संस्कार आमच्या घरात घृणास्पद ठरले होते. हिंदू समाजाच्या, नि पर्यायाने साऱ्या देशाच्या अध:पतनाला जर काही कारण असेल तर हा धर्म, त्याची ती तंत्रे, उत्सव, त्यातील जातिभेद, स्पर्शास्पर्शता, गल्ली-गल्लीतली देवळे, वेड्यावाकड्या मूर्ती नि ध्याने होत अशी आमची ठाम समजूत होती. या नि असल्या वेडगळ धार्मिक समजुतींनेच आम्ही इतके नेभळे बनलो की मूठभर परकीयांना आमच्या एवढ्या प्रचंड देशाला वर्षानुवर्षे सत्तेखाली भरडता आले; एवढ्या मोठ्या जनतेला दास्यत्वाच्या शृंखलेत जखडता आले, याबद्दल आमची खात्री पटली होती.

त्यामुळेच की काय, माझे वडील उत्तर आयुष्यात ब्राह्मो समाजाचे सदस्य झाले. मला वाटते, त्यांच्या मित्रमंडळींच्या संगतीने असेल किंवा त्या काळातील सुशिक्षितांची फॅशन म्हणून असेल, प्रार्थना समाजिस्टासारखा त्यांनी कुठलासा पंथ स्वीकारला होता खरा पण, आपली पंथीय मते त्यांनी घरात कधीच आणली नाहीत. त्यामुळे लहानपणापासून मी निरीश्वरवादी–अभक्त–पाखंडी–मताचा होतो; त्यामुळे पूजा–अर्चा–प्रार्थना करणे किंवा देवळात वगैरे जाणे मला माहीतच नव्हते.

माझे वडील सुप्रतिष्ठित वकील होते नि माझी आई त्याकाळच्या मानाने बरीच शिकलेली म्हणजे तिच्या लग्नाच्या वेळी कॉलेजात जाणारी, अशी सुशिक्षित स्त्री होती. बापाची एकुलती एक, धनाढ्य नि सुप्रसिद्ध पित्याची लेक म्हणून फार मोठ्या संपत्तीचा वाटा आईने आपल्या लग्नाबरोबर आमच्या घरात आणला होता. माझे दोन्ही वडील बंधू कामधंद्याला लागून सुस्थिर झाले होते. सर्वात ज्येष्ठ बंधू कायदेपंडित होते, तर त्यानंतरचे दुसरे बंधू विलायतेहून जास्तीत जास्त उच्च पदवी घेऊन विख्यात भिषग्वर्य म्हणून मुंबईत मान्यता पावले होते. पुण्याच्या डेक्कन कॉलेजमध्ये तिसऱ्या वर्षात शिक्षण चालू असून मी कॉलेजच्या वसतिगृहातच राहात होतो. आमच्या घरातील

सर्वांचेच उच्च शिक्षण याच कॉलेजात झालेले असल्याने हे कॉलेज म्हणजे एक कुटुंबीय संस्थाच आम्ही समजत होतो. अभ्यासात मी बऱ्यापैकी विद्यार्थी होतो; पण त्यापेक्षा खेळाकडे माझे लक्ष जास्त असल्याने शिष्यवृत्त्यांपेक्षा खेळातील प्रावीण्यात मी जास्त पुढे होतो. निरनिराळया खेळात, मी इतरांपेक्षा, कितीतरी उत्तम खेळाडू म्हणून गणला जात होतो. उत्तम शरीरयष्टि सहा–फुटांपेक्षा थोडी जास्त उंची व देखणे रूप, त्यातच उत्तम कुस्तीगीर व उत्कृष्ट नेमबाजी करणारा अशी माझी कॉलेजात प्रसिद्धी होती.

टेनिसकोर्टावर दोन डाव खेळून मी खोलीत परतलो, न्याहारी उरकली नि कॉलेजात गेलो. दररोज जे करीत होतो तेच आजही करीत होतो, पण स्वप्नात दिसलेला साधुपुरुष नि ती गुंफा माझ्या डोळयांपुढून हालेचना ! आंतर–विद्यालयीन क्रिकेटच्या मॅचेस जवळ आलेल्या; प्रॅक्टिसकरिता म्हणून संध्याकाळी क्रीडांगणावर मी हजर होणे जरूर होते. परंतु डोके दुखण्याचे निमित्त करून मी प्रॅक्टिसला गेलो नाही. प्रकृती उत्तम असूनही,माझे कसल्याच कामात मन लागेना; मन स्थिर होईना. तेव्हा, लांबवर कुठेतरी फिरून यावे किंवा बोट मिळाली तर नदीत बोटिंगला जावे असे ठरवून मी खोलीबाहेर पडलो.

नदीवर एका वळणाशी वळत होतो तो कुणीतरी मागून हाक मारली ती ऐकली. वळून पाहातो तो, तो रमेश होता. जवळ येऊन तो म्हणाला, "अरे, क्रिकेट ग्राऊंडवर तू असायचास तो आज इकडे कुठे ? काही खास काम की विशेष गाठीभेटीचे आमंत्रण ?"

मी म्हणालो, "छे : रे ! तसले काहीएक नाही. आज खेळावेसे वाटेचना. तेव्हा म्हटले, बोट असेल तर बोटिंग करावे नाहीतर दूर दूर कुठेतरी चालत जावे झाले !"

त्यावर कॉलेजची बोट नादुरुस्त असून आणखी आठवडाभर तरी ती दुरुस्त व्हायला लागणार अशी माहिती रमेशने दिली. 'सर्व्हंट्स ऑफ इंडिया' मध्ये एका विख्यात साधूचे हिंदू तत्त्वज्ञानांची एक-वाक्यता यावर व्याख्यान आहे ते ऐकायला गावात तो जाणार होता.

तो म्हणाला, " तू जर मोकळाच असशील तर चल ना माझ्याबरोबर गावात ! व्याख्यान मनोरंजक वाटले तर दोघेही बसू; नाहीतर येऊ मध्येच उठून ! "

मी नि रमेश दोघेही एकाच वर्गाचे विद्यार्थी होतो. त्याचा विषय होता तत्त्वज्ञान तर माझा होता अर्थशास्त्र इतकाच फरक. तो प्रथम श्रेणीचा विद्यार्थी होता, नि त्याला शिष्यवृत्त्याहि बऱ्याच मिळालेल्या होत्या. खिलाडू स्वभाव. नि त्यात उत्तम वक्ता असल्याने कॉलेजात तो सर्वांचा आवडता होता. त्यामुळे, आमच्या आवडी नि विषय वेगळे असले तरी आम्ही एकमेकांचे चांगले मित्र होतो. नदीकाठी एकटे भटकण्यापेक्षा त्याच्या संगतीत जरा मनाला हलके वाटेल असे वाटून मी त्याच्यासह व्याख्यानाला जायचे मान्य केले. पण, उगाच नाही कशाला म्हणू–स्वप्नात दिसलेला साधुपुरुष आणि आजचे व्याख्यान देणारा साधु यात काही साम्य आढळले तर तेही पाहावे हाही विचार मनात तरळून गेल्याशिवाय मात्र राहिला नव्हता.

आम्ही व्याख्यानाच्या जागी पोचलो तो, हॉल भरगच्च भरलेला होता. आम्ही कशीबशी जागा मिळवली, तेथून व्याख्याता दिसत होता; व व्याख्यानही नीट ऐकायला येत होते. प्रास्ताविक ओळख वगैरे औपचारिक भाषणे झाल्यावर स्वामीजी बोलावयास उठले. स्वप्नात दिसलेले साधू नि व्याख्याते यांत काहीच साम्य न आढळल्या-मुळे, नाही म्हटले तरी, माझी थोडीशी निराशाच झाली. ते चांगले वक्ते होते; नि त्यांची तयारीही उत्तम होती. श्रीमत् शंकराचार्यांच्या संन्यासधर्माबद्दल बोलताना त्यांनी हिंदू व पाश्चिमात्य तत्त्वज्ञान्यांच्या विचारांचे सहज सुलभ दर्शन घडवून दिले, आधारांनी व विद्वत्ता-प्रचुर भाषणांनी आपल्या मुद्यांचे सखोल विश्लेषण केले, विरोधकांचे खंडण केले, त्यामुळे आमच्यासह सर्व श्रोत्यांचे समाधानच झाले. रमेश तर व्याख्यान ऐकून इतका प्रभावित झाला की ते व्याख्यान म्हणजे मोठी बौद्धिक मेजवानी वाटली त्याला. तत्त्वज्ञान हा माझा विषय नसल्याने रमेश जे काय सांगत होता ते मला सर्व समजत होते

असे नव्हे. व्याख्यान संपल्यावर रमेश आपल्या आप्तांना भेटायला गेल्याने मी एकटाच राहिलो. मनात विचार आला. सिनेमाला जावे झाले. अनेक चित्रपटगृहांपर्यंत गेलो पण कुठेही मनोरंजक चित्रपटच आढळला नाही. थिएटरच्या मालकांच्या व सर्वसामान्य प्रेक्षकांच्या चित्रपटाबाबतच्या हलक्या-फुलक्या आवडीबद्दल त्यांना शिव्या देत मी खोली गाठली. रात्रीचे ९ वाजले होते. मी खोली उघडून आत शिरलो मात्र, वसतिगृहाच्या शिपायाने धावत येऊन माझ्या हातात पिवळा लिफाफा दिला.

ती तार होती. हबकलेल्या मनानेच मी अधीरतेने पाकीट फोडले. का नकळे पण तार म्हटले की मी नेहमीच मनाने बेचैन होतो. लिफाफ्यात काय असेल नि तेही इतक्या तातडीचे हा विचार तर नाही ना माझ्या अस्वस्थतेचे कारण ? मी सुटकेचा निःश्वास टाकला. ती वडिलांची तार होती. दुसऱ्या दिवशी सकाळी ते येणार असून स्टेशनवर येण्यास त्यांनी सांगितले होते.भोजनाची शेवटची घंटा वाजू लागल्याने मी जेवायला गेलो.मला भूक बेताचीच होती.पण, माझीच वाट पाहात रमेश बसल्याचे मला आढळले. तो गावातून आला तो थेट क्लबातच आला होता. स्वामीजींच्या तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाबद्दलच तो माझ्याशी पुनः अति उत्साहाने बोलत होता.खोलीत मी परतलो नि ठरवले लवकरच झोपी जावे. कारण आदल्या दिवशीची राहिलेली झोप नि दुसऱ्या दिवशी पुनः लवकरच उठायचे होते. पहाटे पाच वाजण्याचा गजर लावला म्हणजेच वडिलांना स्टेशनावर भेटायला वेळेवर पोचता येईल ! दिवा मालवून अंथरुणावर आडवा होणार तोच दारावर ‘ टकटक् ’ ऐकू आले. जरा नाराजीनेच मी दार उघडले. दोघा खेळाडूंसह क्रिकेट टीमचा कर्णधार आत घुसला.माझ्या प्रकृतीची त्याने आस्थेने चौकशी केली. पुढच्या आठवड्यात होणाऱ्या अंतिम सामन्याबद्दल अघळपघळ गप्पा मारल्या. कॉलेजच्या प्रिन्सिपॉलसकट सर्वचजणांना या सामन्याबद्दल कुतूहल होते. कारण सामना जिंकण्याने कॉलेजच्या कीर्तीत भर पडायची होती. मी प्रॅक्टिसला न गेल्या.

मुळे माझ्या प्रकृतीची चौकशी करायला प्रिन्सिपॉलसाहेबांनीच कर्ण-धाराला माझ्या खोलीवर पाठविले होते. ते तिथे जाईपर्यंत झोपायला रात्रीचे ११ वाजले. झोप लागेल की नाही याबद्दल जरा मी साशंकच होतो. परंतु दिवा मालवला नि उसे नीट करून डोके टेकले मात्र, मला गाढ झोप लागली.

# 3

उठलो तो धसक्यानेच. पहाटेचे पाच वाजले होते नि गजर चालू होता. मला इतके बरे वाटत होते नि हुशारी वाटत होती की त्या-वरूनच वाटते, मला शांत झोप लागली असावी. चहा घेतला नि स्टेशनावर जाण्याकरिता वसतिगृह सोडले. सकाळच्या रामपाऱ्यात गावापासून दूर असलेल्या आमच्या कॉलेजजवळ स्टेशनला जायला वाहन मिळणे सोपे नव्हते. लांववर पायी फिरायला मला नेहमीच आवडते; वेळही होता वराच. स्टेशनवर कळले गाडीला चांगला ४० मिनिटे उशीर होणार. म्हणून नुकताच आलेला, ताजा 'टाईम्स ऑफ इन्डिया'चा अंक घेण्याकरिता स्टॉलवर गेलो. वर्तमानपत्राचे पैसे देत असताना स्टॉलवरच्या एका पुस्तकाकडे माझे लक्ष वेधले. Mystics of India. 'भारतातील गूढवादी संत.' वस्तुतः असे पुस्तक विकत घेण्याची इच्छा मला कधीच झाली नसती. कारण माझा तो विषय नाही. मला त्यात तथ्य वाटत नाही. तरीही का नि कसे नकळे, मी त्या पुस्तकाची किंमत विचारली नि पुस्तक विकत घेतले. पुस्तक नि वर्तमानपत्र घेऊन मी माझा मोर्चा वेटिंगरूमकडे वळवला. माझ्या-शिवाय कोणीच त्या जागेत नव्हते. पुण्याहून इतक्या लवकर कोठ-लीही गाडी सुटत नसल्याने, जी वेटिंगरूम नेहमी भरलेली असते ती त्यावेळी अगदी मोकळी होती.

भल्यामोठ्या वर्तुळाकार मेजावर मी वर्तमानपत्र पसरले; व

खुर्ची सरसावून बातम्या पाहू लागलो. वर्तमानपत्र वाचून संपले; म्हणून नीट घडी करून ठेवले, व पुस्तक उघडून वाचायला सुरुवात करणार तो वेटिंगरूमच्या दारात कुणीसे उभे आहेसे दिसले. गोखल्यांचा ड्रायव्हर हरि माझ्याकडे पाहून हसत होता. तो माझ्याजवळ आला नि म्हणाला, " मला वाटलंच होतं तुम्ही याल म्हणून. मालकांनी पाठवलंय गाडी घेऊन तुमच्या वडिलांना आणायला; म्हणून मी आलो स्टेशनवर. "

श्री.गोखले हे माझ्या वडिलांचे बालमित्र, पुण्यातील प्रसिद्ध वकील. खोऱ्याने पैसा ओढतात अशी त्यांची वकिली धंद्यातील प्रसिद्धी. माझे वडील आणि ते एकाच कॉलेजचे विद्यार्थी. पदवीधरही बरोबरच झाले. फार कशाला धंदा दोघांचा एकच असल्याने एकत्रितपणे काही दिवस वकिलीहि केली दोघांनी, विशिष्ट मुकदम्यामधून !! आम्ही लहानपणापासून त्यांना गोखलेकाका म्हणत असू. दोन्ही कुटुंबांत घरोबा इतका की जेव्हा जेव्हा आम्ही पुण्याला येत असू तेव्हां नि:संकोचपणे गोखल्यांकडे राहात असू. पुण्याला जरी मी वसतिगृहात राहात होतो तरी या ना त्या निमित्ताने, विशेषत: सुट्टीच्या दिवशी त्यांच्याकडे मला जेवायला जावेच लागे.

गाडी येत असल्याची निदर्शक घंटा वाजली. आम्ही प्लॅटफॉर्मवर आलो. गाडी सावकाशपणे स्टेशनात शिरली. प्लॅटफॉर्मवरील लोक उतरावयाला आलेल्या पाहुण्याला हेरत उभे होते. माझे वडील, नेहमीप्रमाणे, नखशिखांत साहेबी वेशात, शांतपणे डब्याच्या दाराशी उभे होते. ते खाली उतरले नि हरीने त्यांचे सामान बाहेर काढले. मी नमस्कार करायला वाकलो. त्यानी पाठीवर थोपटत माझ्या अभ्यासाची नि प्रकृतीची चौकशी केली. माझे वडील अगदी नेहमीप्रमाणे हसतमुख होते. त्यांच्या चालण्यात—बोलण्यात एक तऱ्हेचा खानदानी रुबाब होता, पन्नाशी उलटलेली होती तरी चेहऱ्यावर तेज होते; आकर्षकपणा होता; त्यामुळे या वयातही ते देखणे वाटत.

बोलत बोलत आम्ही स्टेशनबाहेर पडलो; तोपर्यंत हरीने गाडी पुढे घेतली होती. आम्ही गोखल्यांच्या बंगल्याकडे निघालो.

आमची गाडी बंगल्यात शिरायला नि गोखलेकाका सकाळचे फिरून परत यायला एकच गाठ पडली. सौ. गोखल्यांसह आमच्या स्वागताला ते बंगल्याच्या दाराशीच उभे होते. वडिलांना दिवाणखान्यात सोडून मी श्रीकांत व मालतीला शोधीत घरात गेलो. श्रीकांत चहाकरिता खालच्या मजल्यावर येण्याच्याच तयारीत होता; तर माझा आवाज ऐकून, मालती हसत हसत आपल्या खोलीतून माझ्या स्वागताला बाहेर आली. आम्ही तिघेही खाली जेवणघरात आलो. वडीलमंडळी चहाफराळाकरिता तेथेच एकत्रित बसली होती. आम्ही तिघे एकत्रितपणे गप्पा–गोष्टी करीत होतो; तर वडीलमंडळी आपसात बोलत होती.

गोखले यांना दोन मुलगे नि एक मुलगी. थोरला मुलगा लंडन युनिव्हर्सिटीचा एम्. डी. होण्याकरिता गेला तो तिकडेच राहिला; परत आलाच नाही. त्याचा तिकडे चांगला जम बसला होता. श्रीकांत कॉलेजात इंटरला होता तर मालती मॅट्रिकला बसणार होती. श्रीकांत चांगला धट्टाकट्टा, उंचनिंच पण स्वभावाने अबोल होता. तो कुणाशी मिसळत नसे. हुशार होता पण त्याच्या या एकांडेपणाने तो त्याच्या मित्रांत तितका आवडता नव्हता, त्यांना तो आढ्यताखोर वाटे; आमच्यात मात्र तो चांगला मिळूनमिसळून असे. मालती प्रकृतीने सुदृढ असून, लक्ष वेधून घेण्याइतकी गोड व सुंदर मुलगी होती. चांगली बोलकी, खेळकर नि मोठी आनंदी ! तीही हुशार नि कलाकौशल्यात विशेष वाकबगार होती.

चहा झाल्यावर वडिलांनी मला सांगितले की कोर्टाचे काम झाल्यावर ते मला वसतिगृहात येऊन भेटतील. तेव्हा गोखलेकाकांची अनुज्ञा घेऊन मी कॉलेजवर वसतिगृहात परतलो.

सायंकाळी बऱ्याच उशीरा मी खोलीवर परत आलो तो कळले की प्रतीक्षागृहात काका गोखले व वडील माझी वाट पाहात बसले

आहेत. तिकडे मी जाणार तो समोरून तेच दोघेजण माझ्या खोलीकडे येत असलेले दिसले. सर्वसाधारण सर्वच पालक पाहातात त्याप्रमाणे खोलीत शिरताच वडिलांनी सगळीकडे दृष्टी फेकली. दोघांनी माझ्या अभ्यासाची नि प्रकृतीची चौकशी केली; आणि माझी प्रकृती उत्तम नव्हे तर चांगलीच असल्याचे पाहून त्यांना समाधान वाटल्यासारखे दिसलें. त्यांच्यावरोवर बाहेर पडण्याकरिता मी कपडे करीत होतो. तेवढ्यात वडिलांनी तेथेच पडलेले Mystics of India हे पुस्तक उचलले. पुस्तकाचे नाव पाहताच वडिलांना विस्मय वाटला असावा त्यांनी चौकशी केली की, हे पुस्तक माझ्याकडे कसे ?—'सकाळी स्टॉलवर मीच खरेदी केलें' असे मी म्हटल्यावर तें काहीच बोलले नाहीत; परंतु घाईघाईने मी जेव्हा म्हटले की फुरसतीच्या अभावी मी त्या पुस्तकातील एक ओळही अजून वाचली नाही तेव्हा मात्र ते जरा हसले. आम्ही तिघेही गोखलेकाकांच्या मोटारीतून बरेच हिंडलो नि त्यांच्या बंगल्यावर पोचेपर्यंत सायंकाळचे ६ वाजले होते. जेवायला अजून खूपच वेळ होता, तेव्हा श्रीकांत घरी असणार नाही हे मी धरूनच चाललो होतो. पण व्हायोलिन वाजवीत बसलेली मालती नक्की तिच्या खोलीत असेल याची मला खात्री होती. इतक्यात नोकरांनी कुणीतरी भेटायला आले आहे असे गोखलेकाकांना सांगितले तेव्हा मी मालतीच्या शोधात वरच्या मजल्यावर प्रयाण केले. अपेक्षेप्रमाणे श्रीकांत वर नव्हताच; पण सौ. गोखले घरात नसल्याने त्यांच्याकडे आलेल्या कुणा पाहुण्यांशी बोलत मालती गोखलेकाकांच्या खोलीत जाऊन बसली आहे असे कळले. मी सरळ श्रीकांताच्या खोलीत जाऊन बसलो व जवळच पडलेले पुस्तक चाळायला सुरवात केली. तेवढ्यात मला वडिलांच्या हाका ऐकू आल्या. मी खाली येऊन पाहातो तो आदल्या सायंकाळी सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीमध्ये व्याख्यान देणारे स्वामीजी मजेत गप्पागोष्टीत रंगलेले आढळले.

माझ्या वडिलांची नि स्वामीजींची ओळख असल्यासारखे दिसले. मला पाहाताच त्यांनी स्वामीजींशी माझी ओळख करून दिली. स्वामीजींच्या संभाषणात एक अपूर्व गोडी होती. त्यामुळे तिथे जमलेले सर्वजण विशेष लक्षपूर्वक स्वामीजी बोलत असलेले ऐकत होते. गप्पा चालल्या होत्या इकडल्या तिकडल्याच. त्यापेक्षा विशेष गंभीर चर्चा नव्हती. त्यांच्या भाषणाला मी आदल्या दिवशी सायंकाळी हजर होतो असे स्वामीजींना मी म्हटले. तेव्हा साहजिकपणे त्यांनी उलट प्रश्न केला की कसे काय आवडले भाषण ? मी तावडतोब उत्तरलो की,"तत्त्वज्ञान हा माझा विषय नसल्याने त्यावर मत देण्याइतके मला काही समजलेच नाही." माझे हे उत्तर ऐकून वडिलांसह माझ्याकडे सर्वजण पाहू लागले. त्यांना माझे उत्तर अनपेक्षित नसले तरी ते ज्या तऱ्हेने दिले गेले ती तऱ्हा आवडली नसावी. तेव्हा मी माझे म्हणणे स्पष्ट करण्याकरिता म्हटले, "मी व्याख्यानाला गेलो होतो तो एकटाच नव्हे तर तत्त्वज्ञानाची आवड असलेला माझा स्नेही रमेश याच्याबरोबर म्हणून व्याख्यानाला हजर होतो इतकेच." तेवढ्यात भेटायला आलेल्यांशी मुलाखत संपवून गोखलेकाका आत आले नि आमच्या गप्पांत येऊन मिसळले.

,माझ्या वडिलांनी स्वामीजींना विचारले की, गूढवादाबाबत त्यांना काही अनुभव आला आहे का नि दैवी शक्ती म्हणून जे काही म्हणतात त्यात कितपत तथ्य आहे ? त्यांनी आणखी असेही विचारले की संपूर्ण सत्याचा अनुभव घेतलेला ज्ञानी पूर्णत्वाप्रत गेलेला पुरुष स्वामींना कधी कुठे भेटला आहे का ?

स्वामीजींनी माझ्याकडे पाहात पाहात म्हटले, "माझ्या तरुण वयात मी संपूर्ण निरीश्वरवादी होतो, देव–ईश्वर–परमेश्वर अशी काही दैवी वा अतींद्रिय शक्ती आहे व तिची आराधना–पूजा–आळवणी वगैरे करायला हवी यावर माझा मुळीच विश्वास नव्हता."

कुणीही ते काय हे न समजावून घेता सहज धुत्कारून टाकावे. तसे करणारांचा तो निव्वळ दंभ आहे. सर्वसाधारणपणे सारी मानवजात, आपले जीवन सुख–शांति–समाधानाचे कसे होईल, याकरिता अविश्रांतपणे धडपडत आहे. जरा डोळसपणे आवतीभोवती पाहा. जिकडे तिकडे तीव्र कलह दिसतो. आपणाला स्वतःला काही तरी व्हायला पाहिजे याकरिता सारी शक्ती पणाला लावून आपली अखंड धडपड चालली आहे, ध्येयापाठीमागे धा ो आहोत आपण, का ? तर काही तरी मिळवायचे आहे, हवे आहे आत्मसात् करायचे आहे. पण या धांवपळीमध्यें कुठेहि नावालासुद्धा मनःशांति नाही, समाधान नाही, सुखाचा लवलेश नाही. तेव्हा आपल्या पूर्वज ऋषि–मुनी नि द्रष्टच्या दार्शनिकांनी स्वानुभवाने दिलेल्या शिकवणुकीप्रमाणे सुखशांति-समाधानाचा अनुभव येऊ शकतो की नाही याचा जरा पूर्वग्रहदूषित दृष्टीने नव्हे, तर जास्त गंभीरपणे विचार व्हायला हवा. एखाद्या प्रश्नाचा गंभीरपणे विचारच करायचा नसला तर त्या प्रश्नाचे मूल्य तरी आकळावयाचे कसे ? विचारांनी अनुपयुक्तता सिद्ध झाली तर ते तत्त्वज्ञान नसून भंपकपणा आहे, थोतांड आहे म्हणून त्याचा जरूर निषेध करा; ते झटकून उडवून लावा. तुझ्यासारख्या सुशिक्षिताने तर या गूढवादाचा मूलग्राही विचार करून जे आढळेल, अनुभवास पटेल त्याचा सर्वसामान्य जनतेच्या मार्गदर्शनाकरिता प्रचार करायला हवा. या वादाचा पूर्वपक्ष–उत्तरपक्ष अनुभवावर आधारलेल्या मतांचा मागोवा घेत करायला हवा; इतरांच्या मतांचा हवाला नकोच मुळी !" यावर सौ. गोखले म्हणाल्या, "स्वामीजी, पुढच्या खेपेला याल ना तेव्हा आमचेकडेच उतरा, नि या मार्गातील तुमचे वैयक्तिक अनुभव आम्हांला सांगा." उशीर झाला होता; आणि स्वामीजींनाही आणखी कुणाला भेटायला जायचे होते. म्हणून ते उठले; व गोखले-काकांनी हरीला हाक मारून स्वामीजींना जिथे जायचे होते तेथे सोडून येण्यास सांगितले. आम्ही सर्वच उठलो आणि बंगल्याच्या दारात त्यांना निरोप दिला.

१८ . १९

# ५

वर्षे उलटली नि मी एम्. ए.ची पदवी प्रथम श्रेणीत संपादन करून कॉलेजातून बाहेर पडलो. वडिलांचे वय झाले असल्याने वकिली धंद्यातून ते जवळ जवळ निवृत्त झाले होते. मी पुढे काय करावे याची चर्चा घरात सुरू झाली होती; आणि त्यात एकमत होत नव्हते. माझ्या उभय बंधूंच्या मते मी विलायतला जाऊन ऑक्सफर्ड विश्वविद्यालयाचा शिक्षणक्रम पुरा करावा असे होते. वडील म्हणत माधवाने काय ते त्याचे त्याने ठरवावे नि आई म्हणे मी काहीही ठरवले तरी त्यात तिला आनंदच आहे. मी मात्र अजून काहीच ठरवले नव्हते. कारण माझा निश्चयच होत नव्हता. गेल्या तीनचार वर्षांत गूढवादाच्या तत्त्वज्ञानाने मी इतका भारावून गेलो होतो की माझ्यात अध्यात्माचे वारे शिरले होते नि मनाला तळमळ लागून राहिली होती. वाटे, अध्यात्म आणि गूढवादाच्या मूलतत्त्वांचा शोध घ्यावा. धर्मतत्त्वांतील गूढांची उकल करून घ्यावी. या कालात मी नि स्वामीजी बरेचसे जवळ आलो होतो. त्यांच्याबद्दल आत्मीयता उत्पन्न झाली होती. जुन्या नि आधुनिक, एतद्देशीय नि परदेशीय तत्त्व-ज्ञान्यांच्या अनेक पुस्तकांचे मी मोठ्या रुचीने वाचन केले होते. त्याकरिता मी संस्कृतचा विशेष अभ्यास करण्यात बराच वेळ घालवला होता. हेतू हा की त्यामुळे संस्कृतमध्ये ऋषि-मुनींनी संकलित केलेल्या ज्ञानाचा मूलग्राही अभ्यास करता येईल. कुठल्यातरी अपरिचित अशा शक्तीकडे मी ओढला जात आहे असे जाणवत होते. काहीतरी नवे संक्रमण माझ्या जीवितात साकारत होते. शरीराने मी अगदी आरोग्यसंपन्न होतो. कारण, व्यायामादि दैनंदिन गोष्टीत खंड पडला नव्हता. मनातदेखील कुठला गोंधळ नव्हता. माझ्या कॉलेजातच प्राध्यापकपद घेण्याबद्दल मला विनविण्यात आले. सरकारी नोक-रीही देऊ करण्यात आली. परंतु, काही दिवस तरी कोणत्याच

प्रकारच्या कामाला जुंपून घ्यायचे नाही असे मी ठरवले होते. एकटयानेच किंवा शक्य असेल तेव्हा स्वामीजींबरोबर हिंदुस्थानभर प्रवास करावा अशा निर्णयाला मी आलो होतो. लग्नाकरिता मुलीही सांगून येत होत्या; पण इतक्या लवकर विवाहबंधनात पडायचे नाही हे मुळी मी ठरवूनच टाकले होते. गोखलेकाकांनी वडिलांना सुचविले सुद्धा की माझे शिक्षण पुरे झालेले आहे तेव्हा त्यांच्या मालतीशी माझा विवाह व्हावयास काही प्रत्यवाय नसावा! कारण, एव्हाना मालती बी. ए. च्या वर्गात शिकत होती नि अत्यंत सुंदर दिसत होती. श्रीकांतही वकिलीची परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाला होता. मला काय किंवा माझ्या आईवडिलांना काय गोखल्यांच्या कुटुंबा-बद्दल किंवा त्यांच्या मुलीबद्दल काहीच बोलायचे नव्हते. काका गोखल्यांनी माझ्या वडिलांना लिहिलेल्या एका पत्रात माझ्या सध्याच्या प्रवृत्तीबद्दल भीतीही प्रगट केली होती. नि दूरान्वयाने सुचविले होते की स्वामीजींच्या प्रदीर्घ सान्निध्यात मी जर राहिलो तर एखादे दिवशी मी संन्यासी होईन.

माझ्या वडिलांनी उलट कळविले होते की, जीविताविषयी कोण-चाही विचार करण्याइतका मी आता मोठा झालेलो आहे. त्यांनी असेही कळविले होते की, उत्तमात उत्तम असे शिक्षण मला त्यांनी दिलेले आहे; मला माझ्या उर्वरित आयुष्यात निर्वेधपणे राहाता येईल एवढी माया ठेवली आहे; तेव्हां एका मुलाचा पिता या नात्याने जे कर्तव्य ते त्यांनी चांगल्या प्रकारे पार पाडलेले आहे. पुढचा मार्ग आता माधवने आपल्या मताने चोखाळायचा आहे. कामधंद्यात स्थिर झाल्याशिवाय लग्न करायला त्याला सांगण्यात काहीच अर्थ नाही; आणि आम्ही असं काही सुचवू लागलो तर तो ते ऐकणारही नाही. माझ्या वडिलांनी गोखलेकाकांना लिहिले, "माधवचे लक्ष दिवसानु-दिवस तत्त्वज्ञानाकडे जास्त जास्त झुकत आहे याची मला जाणीव आहे. पण म्हणून तो संन्यासी होईल—असे मात्र मला वाटत नाही! आणि समजा, त्याने शेवटी स्वामीजींचा मार्ग चोखाळायचेच ठरवले

तर अशा स्थितीत मालतीशी विवाहबद्ध होण्याचा आम्ही त्याला आग्रह करणे म्हणजे दुसरी घोडचूकच नाही का ? कारण त्यामुळे बिचाऱ्या त्या मुलीचे आयुष्यच बरबाद व्हायचे ! आपले कौटुंबिक जिव्हाळ्याचे संबंध लक्षात घेता माझ्या मुलाकरिता, मालतीने आपल्या जीविताची बाजी लावावी असे सांगण्याचे पाप मी तरी करणार नाही. सध्या माधव काहीही करीत नाही; पण असे आळशासारखे राहणे त्याच्या स्वभावालाच जमणार नाही अशी माझी खात्री आहे. त्याने दक्षिणेत फिरून येण्याचे ठरविले आहे व त्याप्रमाणे त्याने फार मोठी सफर आखली असून इतक्यातच तो प्रवासाला निघेलही. मला खात्री वाटते या प्रवासाने त्याचे मन सुस्थिर होऊन पुढील जीवितक्रमाबाबत निश्चय करण्याच्या दृष्टीने त्याची ही सफर उपकारकच ठरेल. नाहीतरी बी. ए. व्हायला मालतीलाही अजून एक वर्ष हवेच आहे. मग आताच घाई कशाला ? ”

माझी दक्षिण भारताची सफर खरोखरच यशस्वी झाली. प्रेक्षणीय नि ऐतिहासिक महत्त्वाच्या कितीतरी स्थळांना मी भेटी दिल्या. हिंदुस्थानचा हा भाग खरोखरच सुंदर आहे. दारिद्र्य असेल पण ती उणीव निसर्गसौंदर्याच्या श्रीमंतीने भरून निघाली आहे. निबिड अरण्ये, निलगिरीची गगनचुंबी शिखरे, लांबवर पसरलेला हिरवा हिरवा सपाटीचा प्रांत, नि सुंदर समुद्रकिनारा—केवढी ही संपन्नता, इतर बाबतीतील कमीपणा जाणवतच नाही. एकदा शिकाऱ्यांच्या संगतीत जंगलात जाण्याची मला संधी मिळाली. त्यावेळचे ते चित्तथरारक अनुभव; किंवा कुठे कुठे टेनिस किंवा बॅडमिंटनच्या खेळात मिळालेला आनंद ! वेळ कसा जात होता ते कळत नव्हते. मी फिरत फिरत म्हैसूरला आलो होतो. एका प्रगल्भ विचारशील राजाचे प्रागतिक संस्थानाचे राजधानीचे ते शहर आहे, सुंदर राजवाडे, विस्तृत राजपथ, अधूनमधून असलेले मोठमोठे बगीचे, रेशमावरील कलात्मक डिझाइन्स, लाकडावरचे कोरीव काम, चंदनाच्या सुगंधी नि सुंदर वस्तू वगैरे म्हैसूरची वैशिष्ट्ये माझ्या मनावर कोरली गेली.

बरेच दिवसांत स्वामीजींचा ठावठिकाणा नव्हता. आता त्यांची भेट व्हावी असे पुनःपुन्हा मनात येत होते. पण रोज नव्या जागी भमणाऱ्या फिरस्त्याचा पत्ता कसा मिळणार ? पण एका सायंकाळी, फिरून परत येत असता अचानकपणे रस्त्यात स्वामीजी दिसले. मला फार आनंद झाला, तसा त्यांनाहि झाला. त्यांची प्रकृती तर नेहमीच उत्तम, ताजीतवानी, निरामय असे. त्याच दिवशी सकाळी ते म्हैसूर-मध्ये आले होते नि त्यांच्याच म्हणण्यावरून कळले की तेही मला भेटायचा प्रयत्न करीत होते. मी विचारले, "पण मी म्हैसूरला आहे हे तुम्हांला कसे कळले ?" त्यांनी नुसते स्मित केले. मला माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळाले मी कुठे उतरलो आहे याची त्यांनी चौकशी केली नि सफरीची विशेष कटाक्षाने कांही आखणी केली आहे की काय असेही विचारले. काही ठरवून मी हिंडत नसल्याचे मी त्यांना सांगितले, नि पुढे म्हटलें, "उटकमंडहून निलगिरी उतरून म्हैसूरला आलोय नि पुढे मद्रासला जायचे म्हणतोय." ते उतरले होते त्या ठिकाणाचा पत्ता मला त्यांनी दिला व दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांच्याकडे बोलावले. ते एका देवळात उतरले होते. नि मी सकाळी तिथे पोचलो तर ते तयारच होते. दाक्षिणात्य स्थापत्यशास्त्राप्रमाणे भव्य नि विस्तृत प्रमाणात बांधलेले ते शिवालय होते. असंख्य कमानी नि सभोवताली लांबरुंद ओवऱ्या. सारे बांधकाम दगडी, प्रशस्त, त्या ओवऱ्यांतच कितीतरी संन्यासी वा यात्रेकरूंची आरामशीर सोय झालेली होती. देऊळ नि त्या भोवतालचा प्राकार कटाक्षाने स्वच्छ राखला होता. स्वामीजीनी सांगितले की ते रामेश्वरला जात असून तिथे त्यांची नि त्यांच्या गुरुदेवांची भेट होणार आहे. त्यांनी मला रामेश्वरला येतोस का म्हणून विचारले. रामेश्वर हेही पाहण्या-सारखे स्थळ आहे तेही पाहाता येईल नि शिवाय कुणी सांगावे, गुरुदेवांसारख्या सिद्ध पुरुषाचे दर्शन घडण्याची संधी मिळेल. यावेळ-पर्यंत स्वामीजीबद्दल माझ्यात निराळे आकर्षण उत्पन्न झालेलेच होते; आणि गुरुदेवांबद्दल ते नेहमीच इतक्या गुणविशेषात्मक आदराने

बोलत की त्यांच्या गुरुदेवांना पाहण्याची उत्सुकता माझ्या मनातही तीव्र झालेली होती. तेव्हा आलेल्या संधीचा फायदा घेण्याचे मी ठरवले आणि स्वामीजींच्या सत्संगतीत रामेश्वर करून मग परतीच्या प्रवासात मद्रास पाहाता येईल असा विचार केला.

स्वामीजी एक दोन दिवस म्हैसूरला राहून नंतर रामेश्वरला जाणार होते. त्या दोन्ही दिवसांत मी स्वामीजींबरोबरच निरनिराळ्या ठिकाणांना भेटी दिल्या. त्यांच्या ओळखीच्या अनेक लोकांना भेटलो. स्वामीजीही विशेष खुषीत होते. त्यांनी गुरुदेवांबद्दल कितीतरी मनोरंजक गोष्टी मला सांगितल्या. त्यावरून स्वामीजींचे गुरुप्रेम किती प्रगाढ नि आदर किती सखोल आहे याचीच मला प्रचीती आली. त्या गुरूंना मी भेटावे अशी स्वामीजींचीही तीव्र इच्छा असावी, असेही स्पष्ट दिसत होते. मला मात्र राहून राहून हेच आश्चर्य वाटत होते की स्वामीजींसारखा सुविद्य, आधुनिक शिक्षण घेतलेला, बुद्धीने अत्यंत प्रखर असलेला मनुष्य "गुरु गुरु" म्हणून एखाद्या मनुष्याला जवळजवळ देवपण देण्याइतका हुरळून जातो तरी कसा? माझे आध्यात्मिक, आधिभौतिक तत्त्वज्ञानविषयक वाचन या वेळेपर्यंत कितीतरी वाढले होते. पण एखाद्या व्यक्तीला गुरुपद देण्याइतकी मनाची तयारी झाली नव्हती. याबाबत मी स्वामीजींशी थोडचा वेळा नाही वाद घातला, परंतु प्रत्येक वेळी ते एवढेच म्हणत, "स्वतः याबाबत अनुभव घे नि मग तुझी मते काय मांडायची ती मांड. जरा धीर धर!" मला नेहमी वाटायचे की ही निव्वळ अंधभक्ती आहे नि सुदैवाने वा दुर्दैवाने तेवढी ती माझ्याजवळ नाही—हे मला कबूल करायलाच हवे. स्वामीजी माझ्याशी बोलताना प्रत्येक मुद्दा, पाश्चात्य नि पाश्चिमात्य दार्शनिकांची त्याबाबत मते, त्यांचा स्वतःचा अनुभव यांच्या संदर्भात अतिशय बुद्धिगम्य विचारसरणीने मांडीत, पण त्याने मती गुंग झाली तरी मनाला ते पटत मात्र नसे! माझ्या मनाची ही धारणा स्वामीजींना ज्ञात असावी. कारण ते नेहमी म्हणायचे, 'माणसाने पुस्तकी ज्ञानाच्या आहारी जाऊन इतरांच्या मतांचा पुरस्कार

करून आपली मते बनवू नये. आपल्या अनुभवावर नेहमी भर असावा ! त्यामुळे माझी धारणा काय आहे याबद्दल स्वामीजींनी कधीच फिकीर केली नाही. स्वामीजींचे म्हैसूरमधील काम संपले नि आम्ही रामेश्वराकडे कूच केले..प्रवासात स्वामीजींनी आपल्या जीवनातल्या कितीतरी घटना सांगितल्या. त्या जितक्या चित्तवेधक तितक्याच प्रगल्भ होत्या. नि स्वामीजींची सांगण्याची हातोटीही विलक्षण मनोवेधक होती. त्यामुळे हा सहप्रवास मोठा मजेशीर झाला.

त्यांनी साऱ्या भारतभर अथक प्रवास केला होता. किती वेळा कितीतरी प्रांतांतून ते फिरले असतील, त्यामुळे की काय त्यांना कितीतरी भाषाही अस्खलितपणे बोलता येत होत्या. आम्ही रामेश्वरला पोचलो नि त्यांनी मला एकच सावधपणाची सूचना दिली की गुरुदेवांबद्दल मी माझे मत घाईघाईने बनवू नये, शांतपणे व अधीर न होता निरीक्षण करावे. रामेश्वराला आम्ही एका ब्राह्मणाच्या घरी उतरलो होतो. तो स्वामीजींच्या परिचयाचा होता. इतकेच नव्हे तर नंतर आढळले की रामेश्वरला स्वामी बहुजनांच्या परिचयाचे आहेत, जवळजवळ सर्वजणांच्या. यजमानांकडे चौकशी करता कळले की गुरुदेव तोपर्यंत आलेले नव्हते; पण ते केव्हा येतील याहीबद्दल काही अटकळ करता येत नव्हती. हे ऐकून माझी जराशी निराशाच झाली. परंतु स्वामीजींना त्याबद्दल काहीच वाटल्यासारखे दिसले नाही. ते म्हणाले, "गुरुदेव नक्की येणार. त्यांना भेटायला आपण फक्त सन्मुख असायला हवे !" समुद्रस्नान करून देवदर्शनाला गेलो. दक्षिणेत मी प्रथमतःच येत असल्यामुळे इतके विस्तृत नि प्रचंड देवालय पाहण्याचा मला कधीच योग आलेला नव्हता. आज कितीतरी शतके ही भव्य वास्तू उभी आहे. हजारो माणसे त्या प्राकारात सहज समावून जातील. सर्व इमलाच इतका सुंदर नि त्यातही आजतागायत सर्व देवस्थान उत्तम स्थितीत राखलेले आहे. मला नंतर कळले की हे एक अति श्रीमंत देवस्थान आहे. राजा-महाराजांकडून क्रोडो रुपयांच्या देणग्या हिंदुस्थानच्या कानाकोपऱ्यातून या देवालयाला येतात. हजारो

यात्रकरू रामेश्वराला अभिवादन करण्याकरिता सर्व हिंदुस्थानातून येथे रोज येत असतात. त्यांचे पारमार्थिक आकर्षण अजून आहे तसे आहे. स्वामीजींनी मला देऊळभर हिंडवले, प्रत्येक महत्त्वाची गोष्ट दाखविली नि ती महत्त्वाची का हेही समजावून सांगितले.

आम्ही तो दिवस मऊ मऊ वाळूत समुद्रकाठी घालवला. ब्रह्मसूत्रावर श्रीमत् शंकराचार्यांनी लिहिलेल्या शांकरभाष्य या टीका ग्रंथातील वेचक छेदकांचा अर्थ स्वामीजींनी मला रात्री समजावून सांगितला. मी ती टीका तत्पूर्वी स्वतः वाचलेली होतीच. परंतु, स्वामीजींनी ज्या तऱ्हेने विषय समजावून दिला, ज्या सहजतेने त्याचे निरूपण केले, ज्या दृष्टिकोनातून अर्थाची उकल करून दिली, तीत प्रतीत होणारी विद्वत्ता, प्रगाढ अभ्यास, अपूर्व होता. आचार्यांनी मांडलेले वेगवेगळे सिद्धांत नि त्यावर रूढ असलेल्या टीका—प्रतिटीका यांचीही स्वामीजींनी ओळख करून दिली. ब्रह्मसूत्रावर आचार्यांच्या पूर्वी व आचार्यांच्या काली टीका—प्रतिटीकांचा नि मत—मतांचा गलबला उठला होता. नि तेच कारण आचार्यांना शाङ्करभाष्य लिहिण्यास प्रवृत्त करते झाले. स्वामीजींचे संस्कृत भाषेवरील प्रभुत्व निखालस असामान्य, परंतु शंकराचार्यांनी कोणत्या परिस्थितीत ब्रह्मसूत्रावर आपले भाष्य लिहिले याची जी मूलग्राही चिकित्सा स्वामीजींनी केली त्यावरून मला त्यांच्या बुद्धीचे राहून राहून आश्चर्य वाटले. तत्त्वज्ञानावरील स्वामीजींचे प्रवचन म्हणजे खरोखरच बौद्धिक मेजवानीच ! स्वामीजी जर माझ्या कॉलेजात प्राध्यापक झाले असते तर मला खात्रीने वाटते की जगातील सर्व पंडितांनी त्यांचे शिष्यत्व पत्करिले असते. इतका अवघड विषय पण ते असा समजावून सांगत की ऐकणारा त्यांच्या व्याख्यानातील एकही मुद्दा विसरू शकणार नाही. मी म्हणालोही, "स्वामीजी, तुम्ही आपले हे ज्ञानभांडार" विद्यार्थ्यांपुढे खुले कराल तर विद्यार्थीजगतावर केवढे उपकार होतील ! नेहमीप्रमाणे ते फक्त हसले नि म्हणाले, "हा सारा गुरुकृपेचा प्रसाद आहे. पढवणे हा माझा जीवनहेतु नाही. नि कुठल्याही धंद्याला किंवा

स्थळाला मी स्वत:ला कायमचा वाहून घेऊ शकत नाही."

झोपायला कितीतरी उशीर झाला होता. सकाळी स्नान उरकून देवळात जात असताना स्वामीजीना मी विचारले, "गुरुदेवांच्या आगमनाबद्दल काही बातमी ?" स्वामीजी एवढेच उत्तरले, " ते येणार आहेत असा त्यांच्याकडूनच खात्रीदायक संदेश मला आला आहे, आणि ते येतीलही लवकरच. आपण त्यांची वाट पहात थांबायला हवे थोडेसे. त्यातून त्यांच्या कार्यक्रमात बदल झालाच तर तो मला कळविल्याशिवाय राहणार नाहीत."

## ६

गुरुदेवांबद्दल काहीही बातमी नाही असे दोन दिवस उलटले. स्वामीजी मात्र शांत होते; त्यांच्यात यत्किंचितही चलविचल दिसली नाही. ते मोठ्या खुषीत असत नि कितीतरी बोलत. त्यांच्या संगतीत वेळ कसा पाखरासारखा उडून जाई. सकाळी जाग येऊन मी डोळे उघडले. स्वामीजी उशाशी उभे होते. आनंद जणू त्यांच्या डोळ्यांतून ओसंडत होताः तेजस्वी नजरेने नि त्याहीपेक्षा हर्षोत्फुल्ल चेहऱ्याने ते माझ्याकडे पाहात म्हणाले, " माधव ऊठ, आपल्याला देवळात लवकरात लवकर पोचायला हवे. गुरुदेव कोणत्याही क्षणी येतील नि आपण त्यांच्या स्वागताला हजर असायला हवे." स्नान झटपट उरकून आम्ही देवळाकडे निघालो. दर्शन घेतले नि देवळाबाहेर पडून समुद्राकडे जाण्याकरिता वळणार तो मोठा थोरला जनसमूह मोठमोठ्याने बोलत देवळाकडेच येत असलेला दिसला. काय झाले म्हणून स्वामीजींना मी विचारण्यापूर्वीच त्यांनी माझा हात धरला. आणि धावतच त्या जमावाकडे मला घेऊन चालले. ज्याच्याभोवती लोकांनी गराडा घातला होता ती व्यक्ती दृष्टिपथात आली. स्वामीजींनी माझा हात सोडला, नि जमावात घुसून त्यांच्या चरणी आपले मस्तक ठेवले.

स्वामीजींच्या मुखावाटे हुंदका आलेला मी स्पष्ट ऐकला. आनंदाश्रू ओघळत होते त्यांच्या डोळ्यांतून–गालांवर! ती व्यक्ती म्हणजे स्वामीजींचे गुरुदेव असावेत हे मी ओळखले. त्यांनी स्वामीजींना उचलले व डोक्यावर हात ठेवून आशीर्वाद दिला. स्वामीजी बाजूला होऊन उभे राहिले आणि माझेही हात जुळून गुरुदेवांना मी नमस्कार केला. प्रथमदर्शनी तरी मला गुरुदेव चारचौघांसारखे सामान्य पुरुषच दिसले काही आश्चर्यकारक वा असामान्यत्व मला तरी आढळले नाही–भासले नाही. साधारणपणे साडेपाच फूट उंच, शेलाटी अगयष्टी, लांबलचक हात, रुंद कपाळ, गहूवर्ण. डोळे मात्र लक्षात येण्याइतके मोठे तेजस्वी. लांबसडक केस–पण त्यांची निगा राखलेली नाही. पांढरी पायघोळ कफनी नि पांढरेच फडके डोक्याला गुंडाळलेले, दोन्हीही मळलेली. हालचालीत कमालीचा मोकळेपणा आणि किती चित्तवेधक हास्य! माझ्याकडे त्यांनी पाहिले, हसल्यासारखे केले, बोलले मात्र काही नाहीत! मनात विचार सरकून गेला माझ्यात त्यांना काहीच गम्य दिसत नाही. त्यांच्या आगमनाची बातमी गावात आगीसारखी पसरली असावी. कारण त्यांच्या दर्शनाकरिता झुंडीच्या झुंडी लोटत होत्या. त्यांनी देवळाकडे प्रयाण करायला सुरुवात केली व लोकांनी त्यांच्या मागोमाग यावे असे सुचविले. देवळाचे पुजारी नि अधिकारी वर्गही त्यांना ओळखत असावा असे दिसले. कारण मोठ्या आदरातिथ्याने त्यांनी गुरुदेवांचे स्वागत केले. दर्शन घेऊन झाल्यावर देवळाच्या ओवरीतच ते येऊन बसले. ओवरी चांगलीच प्रशस्त असल्याने कितीतरी लोक सहजरीत्या तिथे मावले होते. गटागटाने दर्शनाकरिता लोक सरसावत नि प्रत्येकाशी गुरुदेव काही ना काही प्रेमाने बोलत होते. प्रत्येकाची ते अशा प्रेमळपणे विचारपूस करीत होते की ते सर्वांनाच इतक्या जवळिकीने ओळखत असावेत असे वाटे. प्रत्येकाला त्यांना काहीतरी विचारायचे होते नि तेही प्रत्येकाचे बोलणे लक्षपूर्वक ऐकत होते. दाक्षिणात्य भाषांतून ते इतक्या सहजपणे बोलत होते की मला

आश्चर्यच वाटले. हे सर्व संपायला नि उठून मुक्कामावर जायला त्यांना दुपारचे दोन वाजले. वाटेत मी त्यांना विचारले, "आपण थकला असाल ?" उत्तरादाखल ते फक्त हसले. आमचा यजमान सहकुटुंब त्यांच्या स्वागताकरिता सामोरा आला होता. गुरुदेव आपल्याकडे राहायला आले हा आपणावर केवढा दैवी अनुग्रह झाला अशी भावना यजमानाच्या चेहऱ्यावर व प्रत्येक हालचालीत दिसत होती गुरुदेवांच्या स्नानाची तयारी झाली.स्नानविधी म्हणजे एक समारंभच होता आणि असले समारंभ मी यापूर्वी पाहिले नसल्याने मला ते दृश्य एकंदरीत नवीनच होते. स्नानानंतर गुरुदेव खूपच ताजेतवाने दिसत होते, नि त्यांच्या लांबसडक काळ्या कुरळ्या केसांकडे पाहातच राहावे. स्नानानंतर भोजन झाले. गुरुदेवांनी फारच थोडे अन्नग्रहण केले. मी नि स्वामीजींनी मात्र जेवणावर चांगलाच ताव मारला. विश्रांतीकरिता गुरुजी जेवण झाल्यावर आपल्या खोलीत गेले. स्वामीजींनी मलाही विश्रांती घेण्यास सांगून ते स्वतः गुरुदेवांच्या सेवेकरिता त्यांच्या खोलीत गेले.

माझ्या खोलीत जाऊन मला अर्धा तास झाला असेल नसेल, तोच स्वामीजींकडून मला बोलावणे आले. त्यांच्या खोलीत मी प्रवेश केला. गुरुदेव विश्रांती घेत लेटले होते. तर स्वामीजी त्यांच्या पायाशी बसून होते. गुरुदेवांनी माझ्याकडे पाहिले व आपल्या जवळच मला बसायला सांगितले. माझ्या नि माझ्या माता–पित्यांच्या प्रकृतींची त्यांनी चौकशी केली. जणू काय आमच्या घरातील सर्वांचा त्यांना परिचय आहे, अशा आपुलकीने त्यांची विचारपूस नि गप्पा चालल्या होत्या, त्यामुळे मला किंचितसुद्धा परकेपणा किंवा अवघडल्यासारखे वाटले नाही. गुरुदेवांच्या आवाजात गोडवा तर होताच; पण त्यातही एक विशिष्ट तऱ्हेचा 'नाद' होता. एवढे तेजस्वी डोळे पण कधी कधी शून्याकार लय लागून, कुठेतरी दूरवर ते पाहात आहेत. विचारमग्न झाले आहेत असे वाटायचे. मद्रासला माझे काही तातडीचे काम आहे की काय ? याबद्दल त्यांनी चौकशी केली. मी सांगितले, "मजेत

फिरायला म्हणून मी इकडे आलो आहे नि पहिल्यांदाच येत असल्याने आल्यासारखा मद्रासला असलेल्या माझ्या प्रोफेसर मित्राला भेटणार आहे इतकेच." माझ्याशी ते मराठीतून बोलत होते; अन् तेही इतक्या सहजतेने की ते महाराष्ट्रीय नसावेत आणि त्यांची मातृभाषा मराठी नसावी असे कुणाला वाटणार नाही. सकाळपासून मी पाहतो आहे ते इतक्या भाषांतून बोलत होते की ते स्वत: नेमके कोणत्या प्रांताचे नि त्यांचे वय तरी काय असावे याचा मला तरी अंदाज करता येईना. त्यांनी जणू सहज मला विचारले, की मी लग्नाचा काय विचार केला आहे ? आणि मालतीबद्दल माझ्या भावना काय तऱ्हेच्या आहेत ? हा प्रश्न तर मला इतका अनपेक्षित होता की क्षणभर मी स्तंभितच झालो. माझ्या चेहऱ्यावरून त्यांनी माझी ही .अवस्था ओळखली असावी. नि माझ्या उत्तराची वाट न पाहता, स्वामीजीजवळ त्यांनी आणखी इतर विषयांबद्दल बोलायला सुरुवात केली. माझ्याकडून उत्तराचीही त्यांना अपेक्षा नाही की काय या विचाराने तर मी पुरा गोंधळलो. माझ्या दृष्टीने परस्परांशी काहीही संबंध नसलेले त्यांचे प्रश्न विचारणे, आणि त्यांचे एकंदर बोलणे यावरून त्यांच्याबद्दल मत बनवणे मला अशक्यच झाले त्यांनी मला विश्रांती घेण्याकरिता जायला सांगितले नि तासाभराने त्यांच्यासह बाहेर जायला तयार राहाण्याबद्दलही सुचविले. आमची मुलाखत संपली नि मी आपल्या खोलीत परतलो. गुरुदेवांबद्दल मला काहीच मत बनवता येईना, यामुळे मी मात्र कमालीचा अस्वस्थ झालो. गुरुदेवांइतकी चमत्कारिक व्यक्ती मी यापूर्वी पाहिलीच नव्हती. स्वामीजींनी त्यांच्या गूढ शक्तीबद्दल, सखोल व विशाल ज्ञानाबद्दल नि साधनामार्गातील तयारीबद्दल बऱ्याच गोष्टी सांगितल्या होत्या. त्या सर्वच जशाच्या तशा खऱ्या असतील असे मी कधीच धरून चाललो नव्हतो. पण आताही त्यांच्याबद्दल मला काही निश्चितस्वरूपाची कल्पनाच करवेना. त्यावेळी तरी गुरुदेव म्हणजे कुणी अपूर्व चैतन्यशक्तीचे थोर संत आहेत असे वाटले नाही. त्यावेळी तरी त्यांचे व्यक्तित्व म्हणजे

एक कोडेच होते माझ्यासमोर. तेव्हा आताच काही मत बनवण्यापेक्षा त्यांच्या सहवासात राहून पुढे काय काय होते ते पाहावे असेच मी ठरविले. त्यांचे गूढ व्यक्तिमत्त्व म्हणजे माझ्या बुद्धीला एक आव्हान होते. मी वाचण्याचा प्रयत्न करून पाहिला, पण मन लागेना. एक तऱ्हेची चमत्कारिक अस्वस्थता उत्पन्न झाली होती.विशेष आदर किंवा भक्तीमुळे अशी मनःस्थिती होती असे म्हणाऊ तर तसे निश्चित नव्हते. परंतु त्यांच्याबद्दल जास्त काहीतरी आपणाला समजावे असे मात्र जरूर वाटत होते. गुरुदेव ही व्यक्ती आहे तरी काय आणि खरोखरच पारलौकिक वा आध्यात्मिक दृष्टचा त्यांनी काय साध्य केले आहे हे जाणून घेण्याची मला ओढ लागली होती. काहीतरी अतिमानुष किंवा असामान्य बुद्धीचे ते आहेत असे मानायला मात्र मन त्यावेळी तरी मुळीच तयार नव्हते.

"तयार आहेस का ?" असे स्वामीजींनी मला विचारले तेव्हा सायंकाळचे चार वाजले होते. त्यांच्या खोलीत गेलो तो चहा तयार होता असे दिसले. चहापान होते न होते तो घराबाहेर थांबलेला जनसमुदाय गुरुदेवांच्या दर्शनाला घरात जमायला सुरुवात झाली होती. गुरुदेवांनी जाहीर केले की ते रामेश्वर मंदिरामध्ये जाणार आहेत नि ज्यांना भेटायचे असेल त्यांनी तेथे यावे. गुरुदेव देवळाच्या एका ओवरीत स्थानापन्न झाले नि त्यांचे चरण–रज मस्तकी धारण करण्याकरिता, चरणस्पर्श करण्याकरिता, भक्त जनांची गर्दी उसळली. ते प्रत्येकाला आशीर्वाद देत होते. इतक्या साध्यासुध्या दिसणाऱ्या माणसाच्या दर्शनाकरिता येवढी गर्दी का व्हावी आणि या लोकांना देण्याजोगे यांच्याजवळ आहे तरी काय हेच मला समजेना. कुतूहलाने मी त्यांच्या सर्व हालचाली लक्षपूर्वक पाहात होतो. जमलेल्यांतील अनेक लोकांनी आपल्या अडचणी, दुःखे, संकटे त्यांना निवेदन केली. कितीतरी निरनिराळचा प्रकारचे प्रश्न विचारले आणि आश्चर्य हे की विचारलेल्या प्रत्येक प्रश्नाला गुरुदेवांजवळ उत्तर होते. आणि त्यांनी त्यांच्या अडचणी निवारणाकरिता जे जे सांगितले त्यांनी

श्रोत्यांचे समाधानही होत होते. उत्तर देण्यात वा बोलण्यात कोठेही आत्मप्रौढी दिसत नव्हती किंवा प्रश्न विचारणाऱ्याबद्दल उपेक्षेची भावना नव्हती. एक गोष्ट मात्र कटाक्षाने नमूद करायलाच हवी नि ती ही की श्रोतृवर्गातील सर्वांना गुरुदेवांबद्दल कमालीचा आदर स्पष्ट दिसत होता. आणि कोणीही अर्वाच्यपणा करून तेथील मोकळ्या वातावरणाचा वेरंग करण्यास धजावणार नाही अशी एक आदर-मिश्रित जरबही होती. जमलेल्या लोकांशी पितृवत् वात्सल्यभावाने ते बोलत होते. त्यांच्या समस्या नि प्रश्नांची तन्मयतेने उकल करीत होते. मग ते प्रश्न पुष्कळदा किती का मामुली स्वरूपाचे असेनात ? व्यक्ति–व्यक्तीप्रमाणे प्रत्येकाला ते वेगवेगळे उपाय सांगत, साधना कशी करावयाची ती समजावून सांगत, नि सांगितल्याप्रमाणे मनःपूर्वक वागल्यास अपेक्षित आराम मिळेल याबद्दल ग्वाही देत होते. त्यांच्या एकाही शब्दावर माझा विश्वास बसत नव्हता. लोकांना येनकेन प्रकारेण ते वाटेला लावत आहेत असेच मला वाटत होते.

सायंकाळचे सात वाजायला आले होते.माझ्याकडे वळून ते म्हणाले, " हा अनुभव तुम्हांला पहिल्यांदाच आला असेल नाही ? तुम्ही त्यामुळे अगदी कंटाळलेले दिसताहात. चला आपण पुळणीवर जाऊ या; थोडेसे पाय मोकळे करू." बरेच चांगले चालल्यावर, वाळूतच आम्ही बसलो. महाराष्ट्रात घरी परतायची मला घाई आहे का अशी त्यांनी विचारणा केली. प्रश्नाचा रोख न समजल्यामुळे मी उलट, विचारले, "का मी थांबायला हवे आहे असं का आपणाला सुचवायचं आहे ? " त्यावर त्यांनी स्पष्ट केले की स्वामीजी दुसऱ्या दिवशी सकाळीच पंजाबच्या दौऱ्यावर जाणार आहेत. तेव्हा मी त्यांच्या-बरोबर मद्रासला येऊ शकत असलो तर मद्रासला मला माझ्या मित्रांना भेटता येईल नि मद्रासही मला पाहायला मिळेल. माझ्या-प्रमाणे स्वामीजींनाही हे ऐकून काहीसे अनपेक्षित नवल वाटल्याचे त्यांच्या चेहऱ्यावरून स्पष्ट दिसत होते. पण ते काही बोलले नाहीत. गुरुदेवांच्या सहवासात प्रवास करायला मला आनंदच वाटेल असे

मी म्हटले. पण मनात आली ती शंकाही प्रदर्शित केली की साधु पुरुषांबरोबर असण्याची माझ्या आयुष्यातली ही पहिलीच वेळ असल्याने मी बरोबर असण्याने गुरुदेवांना माझा उपयोग कितीसा होईल, निदान कमीत कमी माझी अडचण तर होणार नाही ना याबद्दल मी साशंक आहे. मी असेही सांगून मोकळा झालो की कुणाची सेवा कशी करावी हेही मला तितकेसे अवगत नाही; मग साधु पुरुषाची तर राहीच ! त्यावर गुरुदेव मनापासून हसले नि याबाबत तरी कसलीहि फिकीर बाळगण्याचे कारण नाही, असे म्हणाले. नंतर मी तत्त्वज्ञानविषयक काय काय वाचन केले आहे आणि त्याबाबत पाश्चात्य नि पौर्वात्य दार्शनिकांचा दृष्टिकोन मला कितीसा आत्मसात झाला आहे याची त्यांनी चाचणी घेतली. आंग्ल, फ्रेंच नि जर्मन तत्त्वज्ञान्यांचा दृष्टिकोन त्यांनी मला समजावून सांगितला, तेव्हा त्यांचे वाचनसुद्धा किती विस्तृत नि सखोल आहे या विचाराने माझे मन तर स्तंभितच झाले. विन्हाडी परतण्याला बरीच रात्र झाली होती. जेवणे झाल्यावर मी झोपी गेलो.

सकाळी जाग आल्यावर मला कळले की स्वामीजी केव्हाच निघून गेले आहेत. नि गुरुदेवांची सरबराई व देखभाल आता मी करायची आहे. घाईने मी माझे स्नानादी प्रातर्विधी उरकले व गुरुदेवांकडे गेलो. ते माझीच वाट पाहात होते. त्या दिवशी रामेश्वराच्या देवळात जाण्याऐवजी एका स्थानिक धनिक गृहस्थाकडे आम्ही गेलो. त्या श्रीमान गृहस्थाकडे आम्ही पोचलो तो आमच्या स्वागताची कडेकोट तयारी झालेली असून गुरुदेवांच्या दर्शनाला लोकही जमलेले आढळून आले. ‘गाड्याबरोबर नळ्याची यात्रा’ प्रमाणे गुरुदेवांबरोबर मी होतो. म्हणून मलाही जमलेले लोक मानसन्मानाने वागवू लागले, तेव्हा लाजेने मी तरी घाबराघुबरा झालो. तुमच्यासारखाच मी एक आहे, यापेक्षा माझ्यात नि तुमच्यात काहीही फरक नाही, असे समजावून सांगण्याचा मी प्रयत्न केला. पण, माझे ऐकून घ्यायलाही कुणी तयार दिसेना. माझी ही धडपड पाहून गुरुदेवांना गंमत वाटत

असावी. आमच्या यजमानांची आई आजाराने अंथरुणाला खिळलेली असल्याने तिला सामोरे येता येणे शक्य नव्हते. गुरुदेवांनी तिच्याबद्दल आस्थेवाईकपणे चौकशी केली नि स्वतःच ती झोपली होती त्या खोलीत ते गेले. ऐंशी वर्षांची ही वृद्धा जीवनाचे जणू शेवटचे क्षण मोजीत होती. गुरुदेवांना अभिवादन करायला उठण्याची ती धडपड करीत होती. पण गुरुदेवांनी आपल्या मधुर वाणीने तिला 'उठू नका' असे सांगितले; व स्वतःच रुग्णाइताच्या उशाशी बसून तिच्या शुभ्र धवल केसांवरून हात फिरवीत राहिले. वृद्ध मातेच्या डोळयांतून घळाघळा अश्रू वाहात होते. जणू परब्रह्म भेटल्याच्या सुखद कल्पनेने ती वृद्धा गुरुदेवांकडे पाहण्याचा प्रयत्न करीत होती. तिच्या चेहऱ्यावर एक प्रकारचे अतीव सुख नि समाधान व 'धन्य धन्य' झाल्याचा भाव सुस्पष्टपणे प्रतिबिंबित झाला होता. याचे एकमेव कारण गुरुदेवांचे सान्निध्य ! वृद्धेने माझ्याबद्दल चौकशी केली नि मी एक त्यांचा स्नेही आहे असे गुरुदेवांनी सांगितले. गुरुदेवांना त्या खोलीत सोडून मी बाहेर आलो. यजमान उभेच होते. मी त्यांना सरळ प्रश्न विचारला,'गुरुदेवांचा नि त्यांचा परिचय किती दिवसांचा आहे ?''आपल्या जन्मापूर्वीपासून गुरुदेवांचा आपल्या कुटुंबाशी संबंध आहे.' असे जेव्हा त्यांनी म्हटले तेव्हा मला आश्चर्यच वाटले. मग गुरुदेवांचे वय तरी काय असावे याची मी चौकशी केली. आमचे यजमान उत्तरले, 'शंभरीच्यापेक्षा खात्रीने जास्तीच !' मी तर धरून चाललो होतो की गुरुदेव फार तर पन्नाशीच्या आसपास असतील. वर वर बघणाऱ्याला तरी तसेच वाटणे साहजिक होते. एकंदरीत गुरुदेव म्हणजे एक अजब कोडे आहे म्हणायचे ! सायंकाळी आम्ही मद्रासला जायला निघालो. स्टेशनावर ही गर्दी जमली होती—निरोप देणारांची ! इतका थोडा वेळ राहून ते निघाले याबद्दल प्रत्येकाच्या चेहऱ्यावर एक प्रकारची नाराजी दिसली. दर्शन घेणारांचा लोंढा एवढा मोठा होता की गाडी सुटायला सुद्धा वेळ लागला. रेल्वे अधिकारीही याबाबत असहाय्य दिसले, कारण त्यांचा हा अनुभव

नेहमीचा असावा. माझे शिक्षण, बुद्धिमत्ता, माझी संस्कृती आणि माझ्या साऱ्या समजुती नि कल्पनांना गुरुदेवांनी जबरदस्त धक्का दिला होता. आमचा सहप्रवास अभूतपूर्व होता. अनेक स्टेशनांवर गुरुदेवांना हार घालणारांची ही गर्दी उसळत होती. मोठ्या पहाटे आमच्या गाडीने मद्रास टर्मिनसमध्ये सावकाशपणे प्रवेश केला. फुलांच्या असंख्य करंड्या घेऊन गुरुदेवांना हार घालण्याकरिता केवढा मोठा समुदाय स्टेशनवर जमलेला होता. त्यांत दाक्षिणात्य स्त्रियाही होत्या. गुरुदेव प्लॅटफॉर्मवर उतरले मात्र त्यांच्या गळयात अक्षरशः हारांचा ढीग पडला होता नि पदस्पर्शाकरिता लोकांची झुंबड उडाली होती. मद्रासमधील सुप्रसिद्ध लक्षाधीश श्री. चेट्टियार यांच्याकडे आम्ही उतरणार होतो,म्हणून तेही जातीने स्टेशनवर आले होते. गुरुदेवांच्या नि माझ्या सामानाचा तावा त्यांच्या नोकराने घेतला व मी गुरुदेवांसह त्यांच्या करिता तयार ठेवलेल्या अलिशान मोटारकडे वळलो.

## ७

श्री. चेट्टियार यांचे नाव मद्रासचे उद्योगपती म्हणून महशूर होते. चेट्टियार कुटुंबीय गुरुदेवांच्या शिष्य–वर्गात त्यांच्या वडिलांपासून मोडत असत. स्वतः चेट्टियार अति आनंदी वृत्तीचा, धडधाकट प्रकृतीचा जवळजवळ पन्नाशीचा गृहस्थ. सौ. चेट्टियारही उच्चकुलीन, प्रसिद्ध घराण्यातल्या, मध्यम वयाच्या, नि समाजकार्यकर्त्या म्हणून प्रसिद्ध. त्यांना एक मुलगा नि एक कन्यका. मुलीचे लग्न एका धनाढ्य श्रीमंताच्या मुलाशी झालेले असून मुलगा वडिलांच्याच धंद्यात लक्ष घालीत होता. त्याचेही लग्न होऊन वर्षच झालेले होते. शहराबाहेर सुखवस्तू वस्तीत चेट्टियार यांचा प्रशस्त अलिशान बंगला होता. चोखंदळपणे बंगल्याची सजावट केलेली होती. सामानसुमानात सुद्धा एक विशिष्ट सौंदर्यदृष्टी जाणवत होती, नि सभोवतालचा

बगीचा तर सुंदरच होता! ठिकठिकाणी पाहुण्यांची देखभाल करायला नोकरवर्ग सज्ज होता. अशा या कुटुंबात वावरताना मला तर मोठा आराम वाटला, बरे वाटले. गुरुदेवांच्या खोलीसमोरच मलाही खोली देण्यात आली होती. दाढी नि स्नान उरकून मी गुरुदेव ज्या प्रशस्त दिवाणखान्यात बसले होते तिथे आलो. गुरुदेवांचे दर्शन घेण्याकरिता बरीच मंडळी जमली होती. माझी नि चेट्टियार यांच्या मुलाची नि मुलीची गाठ दिवाणखान्यातच पडली. बंगला दाखवायला मला ती दोघे घेऊन गेली. सर्व बंगला पाहून झाल्यावर मनात येऊन गेले, "केवढा पैसा ओतला आहे या वास्तूत! कुठेही येवढा म्हणून हात आखडता घेतलेला नाही. आराम आणि सौंदर्यही!" दोन्ही भावंडे सुशिक्षित होती. दोघांनीही उच्च शिक्षण घेतले होते, नि त्यांच्या वागण्याबोलण्यात एक विशेप लाघव होते. बोलता बोलता गुरुदेवांनी काय काय चमत्कार केले आहेत, वगैरेच्या कितीक गोष्टी त्यांनी मला सांगितल्या. त्यांच्याही मते गुरुदेवांजवळ बुद्धीला बधिर करण्यासारखे काहीतरी विशेष होते. अतींद्रियच नव्हे तर अति-मानुष असे किती तरी चमत्कार त्या दोघांनी स्वत: अनुभवले असल्यामुळे गुरुदेवांजवळ दैवी शक्ती आहे याबद्दल त्यांची बालंबाल खात्री पटल्याचे त्यांनी कबूल केले. गावातून दर्शनाला आलेल्या काहींनी या आमच्या गप्पात भाग घेऊन, गुरुदेवांच्या ठायी असलेल्या दैवी सामर्थ्याबद्दल ग्वाही दिली. येवढ्या लहान वयात गुरुदेवांचे सान्निध्य मला कसे मिळाले याची त्यांनी खोदून खोदून चौकशी केली, नि त्यांच्या सान्निध्यात हिंडण्याफिरण्याची संधी मला मिळत आहे हे माझे परम भाग्य आहे असाही अभिप्राय त्यांनी अनाहूतपणे व्यक्त केला.

दर्शनाकरिता अव्याहत लोक येत होते, नि त्यातून मोकळे होऊन गुरुदेवांना उपाहार घ्यायला एक वाजला! आम्ही सर्वजण जेवण घरात आपापल्या आसनावर स्थानापन्न झालो. कितीतरी तऱ्हतऱ्हेचे प्रकार जेवणात केले होते. मी चवीने जेवलो. खरोखरच मला स्वयं-

पाक फार आवडला होता. जेवण झाल्यावर सायंकाळचे सहा वाजेपर्यंत मला मोकळीक असल्याने वाटल्यास माझ्या मित्रांना भेटायला मी जावे असे गुरुदेवांनी मला सुचविले. श्री. चेट्टियर यांनी, मी एक गाडी घेऊन जावे असे आग्रहाने सांगितले. माझा विश्वविद्यालयीन सहाध्यायी त्यावेळी मद्रासच्या कॉलेजात प्राध्यापक होता. मी त्याला भेटायला गेलो. मला भेटल्याचा त्याला खरोखरच आनंद झाला; नि त्याचा लेक्चरचा तास सपताच त्याच्या घरी जायचे ठरले. कॉलेजच्याच क्वार्टर्समध्ये तो सपत्निक राहात होता. त्याची पत्नीही पदवीधर असून शिक्षिका होती. आम्ही घरी पोचतो तो तीही आपले शाळेतील काम उरकून घरी आलेली होती. त्या उभयतांनी गुरुदेवांबद्दल ऐकले होते पुष्कळ, पण प्रत्यक्ष भेटीचा योग आला नव्हता. त्याच गुरुदेवांचा सहप्रवासी म्हणून मी आलो आहे हे समजताच त्यांना आश्चर्यच वाटले. गुरुदेवांबद्दल त्यांच्या भक्तगणांकडून उभयतांनी इतक्या प्रशंसनीय गोष्टी ऐकल्या होत्या की त्यांना भेटण्याची त्या पति–पत्नीला कमालीची उत्सुकता होती. महात्मता किंवा अतींद्रिय शक्तीवर त्यांचाही विश्वास नव्हता, नि निसर्गालाही नमविणारी शक्ती मनुष्याला संपादन करता येणे शक्य होईल हे त्यांना मान्य नव्हते. तरीही या तथाकथित पुरुषोत्तमाला पाहायची उत्सुकता मात्र त्यांना होती. निवळ कुतूहलात्मक ! गुरुदेवांबद्दल त्यांनी मला किती तरी प्रश्न विचारले. ते कोण कुठले, ते राहातात वागतात कसे, विशेषत: ते जे काय चमत्कार करून दाखवितात असे बोलले जाते त्याविषयी तर प्रामुख्याने ! त्यांना जेव्हा मी सांगितले की गुरुदेवांचा नि माझा सहवास फार फार तर आठवडयाचा असेल, त्यामुळे त्यांच्या जीवितावद्दल नि जीवनाबद्दल मी अनभिज्ञ आहे नि चमत्कार म्हणाल तर माझ्या समोर तरी अजून एकही चमत्कार त्यांनी घडवून आणलेला माझ्या पाहण्यात नाही. तेव्हा तर त्या दोघांची निराशाच झालेली दिसली. मात्र मी असेही सांगितले की ' गुरुदेव ही एक फार सज्जन व्यक्ती आहे नि त्यांच्या व्यक्तित्वाभोवती अनाकलनीय

असे चमत्कारिक वलय आहे हे मात्र खरे." अशा प्रकारे कित्येक विषयांवर आमची बराच वेळ चर्चा झाली नि मी पुढील आयुष्यात काय करायचे ठरवले आहे, या प्रश्नावर गोष्टी येऊन थडकल्या. मी मोकळेपणाने सांगितले, "सध्यातरी मी काहीच ठरवलेले नाही. मजेत वेळ घालवतो आहे झाले !" माझ्या स्नेह्याने नि त्याच्या पत्नीने अजीजीने मला सांगितले की जीवनात आता स्थिर व्हायलाच हवे. मी कुठेतरी नोकरी पत्करावी किंवा सरळ इंग्लंडला जाऊन उच्च पदवी तरी संपादन करावी. तसेच मी आता लग्न मुळीसुद्धा लांबणी-वर न टाकता लवकरात लवकर विवाहबद्ध व्हावे. चहा फराळ झाला तोपर्यंत सहा वाजून गेल्याने मला वाटले,आपणाला उशीर होत आहे. माझ्या स्नेह्याला नि त्यांच्या पत्नीला गुरुदेवांना पाहायचे होतेच. तेव्हा, त्या उभयतांना घेऊन मी चेट्टियार यांचे घर गाठले. मी पोचलो तो आढळून आले की दिवाणखाना खच्चून भरुन गेला असून पाय ठेवायला जागा नसल्याने लोक मिळेल त्या जागेवर दाटीदाटीने उभेही होते. उशीर केल्याबद्दल मी स्वत:ला दूषणेही दिली. त्या गर्दी-तच लोकांना दूर करून माझ्या दोन्ही पाहुण्यांसकट मी आत प्रवेश केला. पण गर्दी इतकी ठेचून होती की पुढे पुढे जाणेच अशक्य होऊन बसले.

गुरुदेवांना बसण्याकरिता किनखापी, जरीचे काम केलेले, उच्चासन व टेकायला लोड ठेवला होता. शुभ्रधवल पेहराव त्यांनी केला होता. नि त्यांचा प्रभाव जनसमुदायावर स्पष्ट दिसत होता. तोंडावर दिल हरखून घेणारे स्मित होते, नि विशाल डोळे तेजाने झळकत होते. मला दिवाणखान्याच्या एका दाराशी उभा असलेला पाहून, त्यांनी बसलेल्यांना विनंती करून मला नि माझ्याबरोबरच्या पाहुण्यांना स्वत:पर्यंत यावयाला वाट करून दिली.मी त्यांच्यापर्यंत पोचलो तेव्हा कपडे बदलून येण्यास त्यांनी सांगितले. मी स्वत:च्या खोलीत जाऊन स्वच्छ परीट घडीचा पायघोळ पायजमा नि वर लांब बाह्याचा सैल कुडता घालून त्यांच्या समीप आलो. माझे मित्र व त्यांच्या पत्नी

गुरुदेवांच्या समोरच वसली होती. गुरुदेवांनी मला त्यांच्या स्वतः-जवळ बसायला सांगितले, नि त्यामुळे सर्वच हजर असलेल्यांना माझा फार मोठा सन्मान झाल्यासारखे वाटले. साहजिकच माझ्याकडे सर्वांच्याच नजरा कुतूहलाने वळल्या.

दिवाणखान्यात समाजातील सर्व थरांतील लोक जमले होते.पण मध्यम स्थितीतील दर्शनार्थीची संख्या जास्त असावी. सर्वच चांगले सुशिक्षित दिसत होते नि तरीही येवढ्या मोठ्या संख्येने त्यांनी दर्शनार्थ का यावे हे मला समजेना. चमत्कार पाहायला मिळावे किंवा गुरुकृपा व्हावी म्हणून ते सर्वजण आले होते असे मानायला माझे मन तयार होईना. मी गुरुदेवांकडे पाहिले, ते शांत, गंभीर होते, त्यांच्यात यत्-किंचित्‌ही चलविचल आढळली नाही; आणि समोर येवढा जनसमु-दाय बसला आहे याची त्यांना जणू काय जाणीव नाही असे ते मन-मोकळेपणाने वसले होते. टाचणी पडली तरी तिचा आवाज होईल अशी नीरव शांतता पसरली होती. आतुरतेने डोळे गुरुदेवांकडे लागले होते; पुढे काय होते याची जणू सर्व इंद्रिये एकतानतेने वाट पहात होती. एक वहुशिक्षित सद्‌गृहस्थ श्रोतृवर्गातून उठला आणि म्हणाला, " गुरुदेव, आपल्या मुखातून काही तरी अमूल्य असा विचार ऐकण्या-करिता आम्ही सर्वजण उत्सुक आहोत." "प्रवचन किंवा भाषण करण्यापेक्षा" गुरुदेव म्हणाले, "तुम्ही आपल्या वैयक्तिक अडचणी काय आहेत त्या मांडा म्हणजे त्याबाबत ऊहापोह करीत असताना जे सांगितले जाईल त्याचा उपयोग इतर श्रोत्यांनाही होईल व तुम्हालाही मार्गदर्शन घडेल." त्या सद्‌गृहस्थाने विचारले, "सुख नि शांती मिळविण्याचा सोप्यात सोपा उपाय किंवा मार्ग कोणता ?" दिवाणखान्यातील प्रत्येक श्रोत्याने उत्तर ऐकण्याकरिता आपले कान टवकारले.

"जगात सुख नि शांती मिळविण्याकरिता प्रत्येकजण प्रयत्ना-धीन आहे" गुरुदेव म्हणाले, "व्यक्ती-व्यक्तीप्रमाणे प्रयत्नांचे प्रकार वेगवेगळे असतील. परंतु खरी अडचण ही आहे की

, सुख–शांति ' म्हणजे नक्की काय हे समजावून घेण्याचा मात्र कुणी प्रयत्न करीत नाही. जितक्या तीव्रतेने या प्रश्नावर आपली बुद्धी वळवायला हवी, मन केंद्रित करायला हवे तेवढे केले जात नाही. सुख नि शांती हे जर आपले खरेखुरे साध्य असेल तर साकल्याने ते काय आहे हे समजून घ्यायला हवे. नुसते शब्द किंवा तात्त्विक वडवड करून काही उपयोग होणार नाही. मनाला भंडावून सोडणारा, सतत टोचणी लावणारा तो प्रश्न झाला पाहिजे. समजावून घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न करून पाहाल तर आढळून येईल की आपण ज्याला सुख–समाधान मिळवायचे म्हणतो ते दुसरे काही नसून ज्यामुळे असुख उत्पन्न होऊन त्यामुळे मन:शांती बिघडते ते असुख उत्पन्न करणारे अडथळे वा कारणे नाहीशी व्हावीत अशी आपली मनापासूनची इच्छा असते. तेव्हा, या सुखसमाधानाला झाकळून टाकणाऱ्या, काय नि कोणकोणत्या गोष्टी आहेत हा ज्याचा त्याने विचार करायला हवा. हा विचार सुरू झाला की आढळते ते असे आपल्या इच्छा, ईर्षा किंवा महत्त्वाकांक्षा, वासना, अतृप्ता किंवा हावरेपणा, असूया इ. कांनी सारे जीवन गढूळते नि असुख नि अशांती निर्माण होऊन केविलवाणी स्थिती उत्पन्न होते. ह्यांना जर कोणत्याही रीतीने वा युक्तीने टाळता आले, त्यांचा निरास करता आला, किंवा त्यांची योग्य ती वासलात लावता आली तर सुख, शांती समाधान उत्पन्न होऊ शकेल. अमळ शांतपणे आणखी विचार कराल तर हेही स्पष्ट होईल की विघातक कारणे म्हणून ज्यांच्याकडे आपण अंगुलिनिर्देश करीत आहोत, ती आपणच उत्पन्न केलेली आहेत. तुम्ही ज्या समाजात राहाता, ज्या तऱ्हेचे जीवन जगता, ज्या धार्मिक विचारधारा उराशी बाळगता, ज्या जातीशी वा विशिष्ट मताशी तुम्ही स्वत:ला निगडित करता किंवा भल्याबुऱ्या पण वैयक्तिक कल्पना तुम्ही घट्ट धरून राहण्यातच जिवंत राहणे शक्य आहे असे मानता त्या एकेकीमध्ये किंवा त्यांचा एकत्रित परिणाम म्हणून त्या कारणांचा जन्म झालेला आहे. याचाच अर्थ तुम्ही आपली शरीरे कितीतरी

उवदार पांघरुणांनी झांकून टाकली आहेत. आणि तरीसुद्धां इच्छा मात्र करीत असता मोकळ्या जीवनदायी वाऱ्याच्या झुळकेची ! तेव्हा तुमचे तुम्हालाच तुमच्या प्रश्नाचे सोपे उत्तर गवसेल. पांघरुणे फेकून द्या तरच मोकळ्या वाऱ्याची झुळूक मिळून तुम्ही ताजेतवाने व्हाल. जे आपले नाही ते मिळवण्याचा हव्यास, आपण जसे नाही तसे होण्याची महत्त्वाकांक्षा, जे आपले नाही ते धरून ठेवण्याची आणि आपण कोणी तरी आहोत हे सतत दाखविण्याची धडपड ही ती फेकून देण्याच्या लायकीची असलेली पांघरुणे होत. जीवनावश्यक गोष्टींच्या शिवाय आपण कितीतरी इतर गोष्टी मिळविण्याकरिता उगाच धडपडत असतो. हा जो पसारा आपल्या भोवती आपण निर्माण करून ठेवतो तोच जीवनात अपेक्षित सुख व समाधानाच्या वाटा रोखून धरीत असतो. जगात राहायचे तर जगराहटीप्रमाणे वागावयाला हवे, असा मूर्खपणाचा मुद्दा पुष्कळदा पुढे करण्यात येतो.आजचे जग कसे आहे हे पाहिले तर जिकडे तिकडे निरनिराळे धर्म–पंथ–जाती–उपजाती नि निरनिराळे 'वाद' व मतप्रणाली यांचा नुसता गोंधळ माजला आहे. मी जी मते मानतो तीच खरी, मी आचरीत असलेली जीवन सरणीच काय ती खरी नि विचारपूर्वक आखलेली नि, तिचा अवलंब प्रत्येकाने करायला हवा हाच आग्रह पावलोपावली चाललेला असून आपली मते दुसऱ्यावर लादण्याचाच आटोकाट प्रयत्न सगळीकड चाललेला आजच्या जगात दिसतो. त्यामुळे होते असे की, आपले प्रभुत्व वा पुढारीपण, आपली प्रभावळ वा अनुयायी, आपले व्यक्तित्व, आपली सत्ता नि मत्ता इ. कायम टिकविण्याकरता अव्याहत झगडा हेच जणू जीवन अशी चुकीची विचारसरणी बद्धमूल होऊन बसली आहे. भोवताली चाललेल्या या धुमश्चक्रीत तुम्हाला सुख हाती लागायचे कसे ? तुम्हाला नीरव शांतता हवी असली तर ती या बाजारी गलबल्यात मिळायची कशी ? इथे देणे नि घेणे–माझे नि तुझे याशिवाय भाषा नाही. हालचाल नाही. कर्तव्य नाही ! तुम्ही येथे बहुसंख्येने जमला आहात. 'ऐका हो, ऐका !' असे एकमेकांना

सुनावत जर सगळेच ओरडू लागलात तर मी काय बोलतो ते कुणाला तरी नीट ऐकू येऊ शकेल का ? कधीच नाही !! प्रत्येकजण स्वतः शांत राहिला तरच या दिवाणखान्यात शांतता राहू शकेल. नि तेव्हाच सर्वांना ऐकण्याचा आनंद मिळू शकेल. त्याचप्रमाणे आपली जीवनसरिता ज्यामुळे गढूळ होत आहे त्या त्याज्य गोष्टीपासून जेव्हा आपण दूर असू वा त्यांचा अडथळा जेव्हा आपण आपल्या हाताने बाजूला करू, तेव्हाच जीवन सुख–शांतिपूर्ण होईल. नीरव शांततेचा लाभ बाजारातल्या गोंगाटात कधी तरी होईल काय ?

"तेव्हा मूळ प्रश्नाचे स्वरूप समजावून घेणे हेच तो प्रश्न सुव्यवस्थितपणे सोडवण्याचे एकमेव साधन आहे. जीवनविषयक या प्रश्नाचे उत्तर आपल्याबाहेर कुठे शोधू पाहाल तर तो निवळ मानवी शक्तीचा नि कालाचा अपव्यय ठरेल. जिथे जे नाही तिथे तुम्ही शोधीत आहा. ग्रंथ–पोथ्या–पुराणे यांचे वाचन किंवा धार्मिक उपचार याने तुम्ही फार तर आधार-पंडित व्हाल; पांडित्याचा अहंकार मात्र वळावेल. यापेक्षा जे मूलतःच तुमच्याजवळ आहे ते तुम्हाला मिळवून देण्यात त्यांचा काहीही उपयोग व्हायचा नाही.कारण पोथ्यापुराणातून, धार्मिक आचरणातून किंवा तांत्रिक उपचारातून पठण–पारायणातून चालविलेला हा सुखासमाधानाचा शोध वरवरचा–बाहेरचा–आहे.दुर्दैवाचा भाग हा आहे की तुम्ही आपले जीवन अशा काही चाकोरीत ठाकून ठोकून बसवले आहेत की त्यामुळे अचूक विचार करणे तर राहोच, पण स्वतंत्रपणे विचार करण्याची शक्तीच तुम्ही गमावून बसला आहात. तुम्हाला आवडणार नाही, माझे बोलणे, पण वस्तुस्थिती अशी आहे की ऐकावे कसे, लक्ष देणे म्हणजे काय हे सुद्धा तुम्हांला मुळीच ठाऊक नाही. तुम्ही म्हणाल आम्ही आता जे करीत आहोत ते लक्षपूर्वक ऐकणेच नाही का ? पण जरा अंतर्मुख होऊन पाहा की इथे ऐकता ऐकता तुमच्या मनात त्याच वेळी काय चालले आहे! एकीकडे तुम्ही ऐकता आहा पण मनात मात्र तुमची तुलना चालू आहे–तुमच्या स्वतःच्या ज्ञानाशी, मी काय सांगत आहे त्याची ! तुमची

श्रवणभक्ती एकीकडे चालली असताना मी बोलतो आहे त्या अनुरोधाने कितीतरी गोष्टींची उजळणी तुमच्या अंतर्मनात चालू आहे. फार काय ज्याचा माझ्या बोलण्याशी संबंध नाही अशा गोष्टीचाही विचार तुमच्या मनात याच वेळी चालू आहे. मनाची ही केवढी प्रचंड धडपड आहे ? तेव्हा हे उघड नाही का, की, मी जे काय सांगत आहे त्याचे मर्म समजण्याकरिता जे अवधान हवे त्याला कितीतरी अनावश्यक गोष्टींची गळती लागल्याने मी जे सांगत आहे ते ऐकण्याची शक्तीच खरे पाहाता, राहिलेली नाही. आणि असलीच तर ती इतक्या क्षीणप्रद अवस्थेत आहे की त्याला 'ऐकणे' म्हणणेच चुकीचे होईल ! तेव्हा, खरे म्हटले तर मी काय म्हणतो आहे हे साकल्याने समजण्याकरिता सारे लक्ष ऐकण्याच्या क्रियेत केंद्रित करून म्हणजेच साऱ्या शरीराचे कान करून ऐकलेत तरच त्यापासून फायदा ! मन जेव्हा सपूर्णतया मोकळे ठेवाल, खुले ठेवाल तेव्हा ते ऐकण्याचे काम कार्यक्षमतेने करील व मग तुम्हांला जे समजेल ते खरे समजणे !

"माझ्या सांगण्यावर स्वमताचे शेरे मारण्याचा उतावीळपणा ऐकत असतानाच करू नका; त्यामुळे तुमचा नि इथे जमलेल्या इतरांचाही व्यर्थ कालक्षेप होईल. मी तुमच्या अडचणी सोडवण्याचा व प्रश्नांची उत्तरे देण्याचा प्रयत्न करीत आहे, याकडे दुर्लक्ष होऊ देऊ नका. सत्याचे दर्शन व्हावयाचे, प्रश्नाची उकल जशी व्हायला हवी तशी व्हावयाची तर समजून घेण्याच्या तळमळीने, खऱ्याखुऱ्या कळकळीने मी जे बोलत आहे ते ऐकण्याचा तुम्ही प्रयत्न करायला हवा. तुमचे तुम्ही तर्क लढवाल किंवा माझी उलट तपासणी करण्याचा प्रयत्न कराल तर त्यातून सत्याचे स्वरूप सुस्पष्ट व्हायचे राहील बाजूलाच; सत्याभोवती नसता गढूळपणाच जमा होण्याचा संभव जास्त. तुमच्या पांडित्याचे प्रदर्शन माझ्यापुढे किंवा इथे जमलेल्यांपुढे आपण केले म्हणजे त्यातून काही निष्पन्न होईल असे समजणं चुकीचे होय. त्याने फक्त कालाचा अपव्यय होणार आहे."

श्रोत्यातून एकाने विचारले, "मन विचाररहित निःस्तब्ध

पाहिजे म्हणता तर ते कसे करायचे? कोणत्या मार्गाने वा प्रक्रियेने मन स्थिर करता येईल?" गुरुदेव म्हणाले, "प्रक्रियेचा किंवा मार्गाचा तुमचा अर्थ जर एखादा मंत्र सांगणे, पूजेसारखा-ध्यानादि आचार सांगणे किंवा एखाद्या साधनेचा अवलंब करायला सांगणे असा विचारणाराला अभिप्रेत असेल तर मग मी आतापर्यंत जे बोललो ते त्याला समजलेच नाही असे म्हणावे लागेल. मंत्र-तंत्र-साधना याबद्दल जेव्हा लोक बोलतात ना, तेव्हा काहीतरी सबब सांगून अंगचुकारपणा करण्याचा तो एक प्रकार असतो. कारण जे काही खरे करायचे आहे ते हेच की त्रयस्थपणे मनाच्या हालचालींचे सूक्ष्म अवलोकन करून आपले मन आहे तरी कसे हे स्वतःचे स्वतः समजावून घ्यायचे आहे. तुमच्या सुखदुःखाचे मूळ तुमच्या मानसिक घालमेलीत दडलेले आहे. जे काय व्हायचे आहे ते मनात व्हायला हवे आहे, बाह्य जगात नव्हे. मनात चाललेल्या घडामोडींचे अवलोकन करायचे आहे. ते मन कसे काम करते, विचार कसे उद्भवतात, महत्त्वाकांक्षा किंवा हावरेपणा उत्पन्न होतो म्हणजे नेमके मनात काय काय घडते? वगैरे गोष्टींचा कानोसा घ्यायचा आहे. जितक्या तटस्थपणे नि अलिप्त राहून तुम्ही मनाच्या या सूक्ष्म हालचालींचे निरीक्षण करून त्यांचे नक्की स्वरूप समजावून घ्याल तेवढ्या प्रमाणात तुमच्या जीवनविषयक प्रश्नांची उकल तुम्हाला होऊ लागेल, पडलेल्या प्रश्नांची उत्तरे मिळू लागतील. अडचणीतून बाहेर पडण्याचा मार्ग सुस्पष्ट दिसू लागेल. तेव्हा, तुमच्या सुख-समाधान शांतीच्या आड येणाऱ्या अडचणींची उकल होणे,अडथळ्यांचे खरेखुरे स्वरूप समजणे हे तुम्ही आत्मसंशोधन केल्यानेच साध्य होणारे आहे. दुसऱ्याने केलेले मार्गदर्शन मग तो केवढाही अधिकारी मार्गदर्शक पुरुष, गुरु किंवा ग्रंथराज असो-दिलेला मंत्र, दाखविलेले तंत्र,सांगितलेला पूजा-अर्चनेचा प्रकार, पठण-पारायणाचा मार्ग या कशानेही सत्यदर्शन होणार नाही. हा, आपण काहीतरी करतो आहोत अशी वंचना मात्र निश्चित उत्पन्न होईल कारण, तो मार्ग खरा नसून ती निव्वळ पळवाट आहे, पाऊल-

वाट नव्हे; फार तर तिला मळलेली वाट म्हणू पाहिजे तर!"

कोणीतरी म्हणाले, "माफ करा, पण गुरुदेव, गुरु किंवा वाटाड्या अगर मार्गदर्शक यांनी दाखविलेला मार्ग किंवा केलेला उपदेश यामुळे साक्षात्कार किंवा दर्शन घडत नसते असे का आपणाला सुचवायचे आहे ? त्यांच्या बद्दल जे आजपर्यंत बोलले गेले वा बोलले जाते ते सर्व मूर्खपणाचे असून त्यात काहीही अर्थ नाही असे का आपले म्हणणे आहे ?"

गुरुदेवांनी स्मित केले नि म्हटले, "तुम्ही एकाच प्रश्नात अनेक प्रश्नांची गल्लत करीत आहात. आता, मी काय सांगतो ते जरा लक्ष-पूर्वक ऐका. जग झपाट्याने बदलत आहे. जीवन–विषयक जुनी मूल्ये झपाट्याने बदलत आहेत, नव्हे बदलली आहेत. जुन्या जमान्यात 'गुरु' या शब्दाला एक वेगळा अर्थ होता, आगळे स्थान नि महत्त्व होते ते महत्त्व केव्हाच नाहीसे झाले आहे. पूर्वीच्या काळी 'गुरु' शब्दामागे एक प्रकारचे वैशिष्ट्यपूर्ण असे सामाजिक, धार्मिक नि नैतिक अधिष्ठान होते. त्याचा आता मागमूससुद्धा उरलेला नाही. पूर्वीच्या जीवनात भौतिकतेला स्थान नव्हते. असले तर अत्यल्प. आजच्या जमान्यात त्याच्याशिवाय दुसऱ्या कशाला महत्त्वच उरलेले नाही. आजची सारी जीवनमूल्ये भौतिक सुखे कशी मिळतील या एका कसावर पारखली जातात. पूर्वीच्या जीवनात ज्या विचारसरणीने जीवन सुखी, शांत, समाधानी राहायचे, त्या विचारसरणीचा बळी देऊन नवी भौतिक जीवनपद्धती आपण अधिकाधिक पत्करीत आहोत. जीवनातील शाश्वत मूल्यांकडे दुर्लक्ष होत आहे हे त्यामुळे आपण विसरलो आहोत. उपदेश, प्रार्थना, पवित्र नि आदरणीय ग्रंथ वा धार्मिक पुस्तके यांचा पूर्वीच्या जीवनाशी घनिष्ट संबंध होता. सध्याच्या भौतिकवादी विचारसरणीत त्याचे काही महत्त्वच उरलेले नाही. आजच्या जीवनात त्यांना स्थान नाही. '

" 'अर्थकारण' हाच नव्या जमान्याचा 'धर्म' होऊन बसला आहे. पूर्वी ज्यामुळे जीवन सुखी नि समाधानी राहात होते; त्या मूल्यांचा

अर्थ, मर्म किंवा महत्त्व न कळण्याइतक्या झपाट्याने नव्या आर्थिक नि भौतिक विचारधर्माने जनमानसावर आपली पकड घट्ट केलेली आहे. जर काही शिल्लक असेल तर ते जीर्ण–शीर्ण अवस्थेत. प्रत्यक्ष जीवनात त्याचे प्रतिबिंब कधीच उमटत नाही. शब्दांनी फक्त वड-वडीच्या रूपाने त्याचे प्रदर्शन काय होईल तेवढे ! दुर्दैवाने सध्या अशी स्थिती उत्पन्न झालेली आहे की, भक्ती कशाशी खातात, श्रद्धा म्हणजे काय, प्रेम कशाला म्हणतात, सत्याचे खरे स्वरूप कोणते, नीति–सदाचार असा काही पदार्थ असू शकतो का ? याचाच जिथे पत्ता नाही. तिथे ईश्वराचे अस्तित्व कसे मानायचे ? अर्थ न समजता या शब्दांचा उच्चार केला जातो. किंवा उपयोग केला जातो सध्या ! मग अशा स्थितीत गुरु, गुरुसेवा, नि गुरूपदेश यामागील खरा भाव आजच्या जमान्यात कसा काय नि कितपत समजणार ? आज लोकांना गुरु का हवा असतो ?–तर दैनंदिन जीवनाच्या विवंचनांपासून सुटका होण्यासाठी ! अपेक्षित उतारा नाही सापडला की चालले हे दुसऱ्या गुरूच्या शोधात! थोडक्यात, म्हणजे, सध्या 'गुरु' शब्दाला बाजारी-पणा आला आहे; ती एक खरेदी करण्याची बाजारी वस्तू झाली आहे. जर एकादा गुरु जास्त शारीरिक सुखे नि पैसा मिळवून देतो असे तुम्ही ऐकलेत तर तुम्ही सध्याचा गुरु सोडून हमखास नव्या गुरूच्या भजनी लागता; कारण त्याच्या भक्तीने तुमची सांसारिक सुखे नि सुखसाधने वा आर्थिक सुबत्ता यात वाढ होणार आहे असे तुम्ही इतरांचे ऐकून, पाहून, मनाशी निश्चित केलेले असते. अशा प्रकारे लोक या गुरूकडून त्या गुरूकडे अशा गुरुशोधात अखंडपणे फिरत अस-तात. गुरु या स्थानाची नि शब्दाची ही निवळ घृणास्पद थट्टा आहे. अशाप्रकारे वस्तुत: जे गुरूबद्दल विचार करतात त्यांना निश्चितपणेच गुरूची गरजही नसते; तुमच्या आर्थिक वा ऐहिक अडीअडचणीच्या वेळी उपयोगी पडणारी गुरु ही कोणी पेढी नव्हे की उतारा नव्हे; पळवाट किंवा साधन नव्हे. 'गुरु' हा आयुष्यातला व्यवसाय होऊ शकत नाही की ना कधी तो धंदा होऊ शकेल ! गुरू म्हणजे थोतांड

नाही. तो पंथही होऊ शकत नाही. ती संस्थाही नसते. कारण असे की सत्य–खरेपणा, श्रद्धा–भक्ती, प्रेम–समर्पणवृद्धी, नि आनंदमय स्थिती यांची तुम्हांला कधी अनुभूतीच नाही. त्यामुळे त्यांचे खरे अर्थही तुम्हांला कधी समजलेले नसतात. सध्याच्या गुरूचीही हीच स्थिती आहे. त्यामुळे आंधळयाने आंधळयांना मार्गदर्शन करायचे अशी आजची स्थिती आहे. स्वत: अज्ञानी दुसऱ्याला उपदेश तो काय करणार ? माझे तुम्हाला स्पष्ट सांगणे आहे की अगदी मनापासून खोलवर विचार करा नि तुम्हाला गुरूची आवश्यकता का भासते या प्रश्नाचे उत्तर शोधून पाहा. माझी खात्री आहे की तुमचे प्रश्न सोडवण्यासाठी कष्ट करायला तुम्ही तयार नसल्याने स्वत:ला काही कष्ट न पडता कुणीतरी अन्य तुमचे प्रश्न समजावून घेऊन व सोडवून तुम्हाला आराम देण्यास मदत करील तर ते तुम्हाला हवे असते. ' गुरु ' याच शब्दाची जादू तुम्हाला वाटत असली तर मी हेच म्हणेन की ज्याचा त्याने ' गुरु ' व्हावे. सत्याचे दर्शन होण्याला स्वत:चा गुरु स्वत:च होण्यापेक्षा अन्य उत्तम मार्ग नाही ! पुस्तकांचा उपयोग फक्त संदर्भ शोधण्यापुरता. त्यांच्या पासून काही मार्ग सापडेल म्हणाल तर त्याने तुमची फक्त प्रगती खुंटेल. तुम्ही स्वत:च तुमच्या सुखासमाधानाच्या आड नसते अडथळे उत्पन्न करीत आहात; आणि अपेक्षित सुख नि समाधान जर तुम्हांला मिळत नसेल तर त्यावद्दल इतर कुणी दोषी नसून तुमचे तुम्हीच दोषी आहात. मी येवढेच म्हणेन की कुणाच्याही कच्छपी लागू नका; आणि ' गुरु ' वगैरे बावतीत नसते खूळ डोक्यात आणूच नका."

गुरुदेव बोलायचे थांबले. त्यांचा मृदु–मधुर आवाज तरीही कानात घुमत होता. श्रोतृवर्ग चित्रासारखा तटस्थ होता; क्षणभर का होईना सर्व दिवाणखान्याभर नीरव शांतता होती.

तेवढ्यात श्रोत्यातून कुणीतरी विचारले, " माफ करा, पण ग्रंथ जर मार्गदर्शन करीत नसतील, तर मग ते लिहिले तरी कशाला ? आतापर्यंत कित्येक महापुरुषांनी नि प्रवक्त्यांनी ग्रंथांचे मनन करा

म्हटले ते सारे चूकच की काय ?"

' कुणाही प्रवक्त्यावर वा महापुरुषावर टीका करण्याकरिता किंवा त्याचे गुणगान करायला मी इथे बसलेलो नाही." गुरुदेव उत्तरले, " किंवा कुणा ग्रंथकारावरही मला टीका करायची नाही, तुम्हांला वाटते त्याप्रमाणे ! पण मी निक्षून सांगतो की पुस्तकांमध्ये मार्गदर्शक म्हणून काहीही सामर्थ्य नाही. आधाराकरिता, त्यांचा निश्चित उपयोग आहे. प्रत्येक संताने वा दार्शनिकाने त्याला जे अनुभव आले ते शब्दांत ग्रथित करण्याचा प्रयत्न जरूर केलेला आहे. त्या संतमहंतांची ' वाट पुसत ' जे आपला जीवनक्रम घालवीत आहेत, त्यांनाच केवळ, त्या ग्रथलेखकाप्रमाणे जेव्हा जेव्हा अनुभव येतील तेव्हा तेव्हा त्या उपासकांना त्या ग्रंथातून त्या संत–महंतांनी नमूद केलेल्या अनुभवाचा आधार मिळेल, उपयोग होईल. इतरेजनांना नव्हे. तेव्हा निवळ पुस्तक वाचण्याने किंवा प्रवचने ऐकण्याने काहीही साध्य होणार नाही. अपेक्षित ' साध्य ' ही अंतःस्थिती आहे नि केवळ, बाह्य प्रयत्नाने त्याप्रत पोचता येणारच नाही. साधकाने घेतलेले अनुभव यथातथ्यपण शब्दांकित करताच येत नाहीत; तेथे शब्द उणेच पडतात, त्यांचे सामर्थ्य लटके पडते. अनुभव शब्दातून विशद करण्याचे प्रयत्न थोडे नाही झाले ! पण म्हणून त्या शब्दांनी अनुभवाची जी विशिष्ट स्थिती ती ते कधीच उत्पन्न करू शकलेले नाहीत. कारण अनुभव हे शाब्दिक नसतातच मुळी; नि म्हणून शब्दांनी अनुभव मिळणेच शक्य नाही. ग्रंथ–वाचनाने माहिती जमा होईल; वस्तुस्थिती समजेल, विद्वत्ता संपादन करता येईल. पांडित्य साधेल. जीवनात त्यामुळे विशिष्ट स्थान प्राप्त होईल, समाजात मान–मरातबही मिळेल. व्यावसायिक यशापयशात ग्रंथवाचनाचा मोठा वाटा आहे. त्याने व्यावसायिक पारंगतता मिळविता येईल. कित्येक विषयांत अगर शास्त्रात तज्ज्ञ म्हणून तुम्ही ओळखले जाऊ शकाल इतकेच ! "

गुरुदेव जरा वेळ थांबले. कोणी काहीच प्रश्न उपस्थित केला

नाही. दिवाणखान्यात शांत—गंभीर वातावरण होते. जागेवरून उठून त्यांनी हात जोडले. त्या दिवशीचा प्रवचनाचा कार्यक्रम संपल्याची ती खूण होती. त्यांचे दर्शन घेण्याकरिता श्रोतृवर्गात गडबड उडाली. पण कोणीही आपली जागा सोडू नये असा गुरुदेवांनी आदेश दिला. सावकाशपणे जनसमुदायातून ते चालू लागले त्यामुळे सर्वांनाच विना-सायास दर्शन घडू शकले. दिवाणखान्यातून बाहेर पडेपर्यंत रात्रीचे आठ वाजून गेले होते. मी त्यांच्या पाठोपाठ बाहेर पडलो तेव्हा ते म्हणाले, " माधव, आपण जरा मोकळचा हवेत फिरायला जाणार आहोत. " मी माझे स्लीपर पायात चढवले; नोकराने त्यांच्या खडावा त्यांच्यापुढे ठेवल्या. जिना उतरून आम्ही खाली आलो नि दाराशी उभ्या असलेल्या मोटारीत बसलो. श्री. चेट्टियारही तेवढचात येऊन गाडीत बसले. बंगला सोडून आम्ही मद्रासच्या सुप्रसिद्ध पुळणीवर आलो.

## ८

गुरुदेवांचे आंतरिक दर्शन सावकाशपणे मला होत होते; किंवा गुरु-देव करून देत होते असे म्हणू या ! काही क्षणापूर्वी ऐकलेला त्यांचा आवाज माझ्या कानात अजूनही घुमत होता. ते ज्ञानाचे प्रदर्शन नव्हते; ना पांडित्याचा आविर्भाव होता. त्यात वक्तृत्वही नव्हते. त्या जिवाभावाच्या गोप्टी होत्या. अनुभवातून प्रगटलेल्या ! मला तर असेच वाटले की त्यांचे सायंकाळचे बोल ही तत्त्वमीमांसा नसून ते जणू स्वतःचे अनुभवच निवेदन करीत होते. त्यांच्यात काहीतरी दुस-ऱ्याला ओढ लावणारे सामर्थ्य आहे नि मी त्याप्रमाणे त्यांच्याकडे आकर्षिला जात आहे, खेचला जात आहे,असे मला राहून राहून वाटत होते. गुरुदेवांना समजून घेणे ही साधी गोष्ट नाही याची मला स्पष्ट कल्पना आली, पण असेही वाटले की जर त्यांच्या सहवासात बरेच

दिवस राहाता आले तर, अत्यल्प का होईना, गुरुदेव कोण आहेत नि कसे आहेत याचे मला आकलन होईल. त्यांचा इतक्या लोकांवर पडणारा प्रभाव, आणि लोकांनाही त्यांच्याबद्दल वाटणारे प्रेम यामागील मर्म काय याचा उलगडा मला हळुहळू का होईना पण आपोआप होत होता. थोडेसे चालल्यावर आम्ही वाळूत बसलो. सायंकाळच्या प्रवचनाचे बद्दलच मी अजूनही विचार करीत होतो. त्यांचा शब्दन् शब्द स्मरणिकेत लिहून ठेवायचा; म्हणजे पुढे जेव्हा जरूर लागेल तेव्हा ते वाचता येतील असेही मी मनात ठरवीत होतो. गुरुदेव चेट्टियार यांच्याशी बोलत होते नि मी श्रोत्याचे काम करीत होतो. तेवढ्यात मी कशाचा विचार करीत आहे असा प्रश्न मला गुरुदेवांनी विचारला.

मी तावडतोब उत्तरलो, "तुमच्या प्रवचनाबद्दल!" त्यावर ते म्हणाले, "आता त्याबद्दल विचार नको. भाषण झाले, गेले, त्याचे निर्माल्य झाले!" जणू काही त्यांनी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तरच ते देत आहेत अशा शब्दात ते पुढे म्हणाले, "माधव, तुझ्या समस्या तुझ्या तूच विचारपूर्वक सोडवशील ना, तर कोणतेच प्रश्न सुटणे कठीण नसते याचा तुला अनुभव येईल. फक्त प्रश्नाबद्दल विचार करताना माणसाने स्वतःबद्दल प्रामाणिक असायला हवे व खऱ्या तळमळीने प्रश्न सोडवण्याची जिद्द हवी." मी म्हटले, "थोडक्यात म्हणजे गुरुदेव, तुम्ही 'गुरु' व त्यांनी दाखविलेले मार्ग' यांच्याबद्दल निषेधच व्यक्त केलात आज. पण मला ते आवडलेही नाही नि तितकेसे समजलेही नाही." "मी काय बोललो हे समजण्याचा तू प्रयत्न करीत आहेस की तू जे आतापर्यंत वाचीत आलास किंवा चार जणांकडून ऐकलेस त्या संदर्भात माझे बोलणे तू तोलीत मापीत बसला आहेस?–गोंधळ होतो तो यामुळेच. मी भवाशी सांगितल्याप्रमाणे श्रवण कसे करावे–ऐकावे कसे–हे जर तुला कळू शकले असते तर तू जे आता म्हणत आहेस ते म्हणाला नसतास. गुरु नि गुरुउपदेश यांना आता काही अर्थच उरलेला नाही.

स्वतःवरची जबाबदारी टाळण्याकरिता या गोष्टींचा सध्या उपयोग केला जात आहे. केवळ पळवाट म्हणून, सुटका म्हणून ! भौतिक नफा-तोट्याच्या माध्यमाने, आराम–विरामाच्या कल्पनेने केवळ या दोन शब्दांचे, सध्याच्या या ऐहिक जीवनात, मूल्यमापन केले जात आहे. खरी गोष्ट अशी आहे की गुरु शोधावा लागत नाही; की तो पसंत करायचा नसतो,तर गुरु स्वतः आपला शिष्य पारखून निवडत असतो. त्याचे अज्ञान नाहीसे करण्याकरिता तो त्याला ज्ञानदान करतो. असे भाग्य ज्या शिष्यांना मिळते ते शिष्य गुरूला जीवनात नि आपल्या आयुष्यात सर्वोच्च स्थान आपणहून देतात नि त्याच्याकरिता कसलाही त्याग करायला ते मागेपुढे पाहात नाहीत. कारण, गुरुकृपाप्रसादापुढे तो त्याग कःपदार्थ वाटतो त्यांना ! गुरूवरील त्यांचा विश्वास इतका उत्तुंग नि अढळ असतो की त्याला ते परमेश्वरस्वरूपच समजतात नि त्यामुळे गुरूच्या ज्ञानाबाबत, कर्तुमकर्तुम् शक्तीबद्दल शिष्यांना संदेहच नसतो मुळी ! गुरूलाही शिष्याचे कल्याण कशात आहे याची पुरेपूर माहिती असते नि कसलीही अपेक्षा न बाळगता तो त्याचे हितच पाहातो. शिष्या–शिष्यागणिक, प्रत्येकाच्या मानसिक व शारीरिक घडणीप्रमाणे गुरु शिष्याला धडे देत असतो,त्याचे जीवन घडवीत असतो. कारण, व्यक्तिशः प्रत्येकाची त्याला माहिती असते, नि म्हणून प्रत्येकाला वेगवेगळ्या पद्धतीने झेपेल तसे ज्ञान–दान केले जाते. आता तूच सांग या वर्णनाशी मिळते जुळते गुरुजन नि शिष्य तुला आजपर्यंत आढळले आहेत ?" मी माझे याबाबतचे अज्ञान कबूल करून म्हटले, "तुम्ही म्हणता ते खरेही असेल. कारण गुरु नि शिष्य या परंपरेचा मला काहीच अनुभव नाही." आम्हाला घरी परतायला उशीर झाला. जेवणे उरकल्यावर गुरुदेव म्हणाले, "माधव, तू आता विश्रांती घे," मी माझ्या खोलीत परतलो नि त्या सायंकाळी गुरुदेव जे जे कांही बोलले त्याची मला आठवली तशी मी माझ्या दैनंदिनीत सविस्तरपणे नोंद केली. मी जे आतापर्यंत ऐकले वा वाचले ते समजावून कसे घ्यायचे याबद्दल नवा दृष्टिकोन गुरुदेवांनी आज दिला

असे मला वाटले. माझ्या ठाम मतांना हादरा बसत होता तर काही अपरिवर्तनीय म्हणून उरी बाळगलेल्या कल्पना गळून पडत होत्या. एक नवी आंतरदृष्टी येत आहे असे मला वाटले पण या उलथा-पालथीने मनही कमी अस्वस्थ नव्हते झाले ! मला वाटले की निखा-लस स्वच्छ व सुस्पष्ट विचारसरणी ती ही, आणि गुरुदेव जे जे बोलत होते ते त्यांच्या वैयक्तिक अनुभवातूनच ! त्या दिवशी झोपा-यला मला बराच उशीर झाला असावा.

मला जाग आली तेव्हा नुकताच सूर्योदय झाला होता. डोक्या-वरचा मोठा थोरला भार कमी झाल्याने हलके हलकेसे वाटावे त्याप्र-माणे मला वाटत होते. मी ताजातवाना झालो होतो. एक वेगळीच हुशारी वाटत होती. व्यवस्थित कपडे करून मी गुरुदेवांकडे गेलो तो ७ वाजले होते. चेट्टियार मला दिवाणखान्यातच भेटले; नि त्यांनी सांगितले की गुरुदेव त्यांच्या पित्याशी बोलत बागेत बसले आहेत. त्यांनी मला चहाकरिता नेले, टेबलाशी सौ. चेट्टियर, चेट्टियार यांच्या मातोश्री आणि भगिनी चहाकरिता माझी वाटच पाहात बसलेली आढळली. गुरुदेवांनी दूध अगोदरच घेतले होते. चेट्टियार यांनी चहा घेतला. बागेत गुरुदेवांकडे मी गेलो तो वृद्ध चेट्टियारशी बागेतील फुलझाडांबद्दल फुलांच्या ताटव्यांबद्दल नि त्यांच्या पद्धतशीर निगराणी-बद्दल त्यांच्या गप्पा चाललेल्या आढळल्या. वनस्पति-शास्त्राचीही गुरुदेवांना चांगली माहिती असून, बागबागायतीच्या त्यांचा अभ्या-सही असल्याप्रमाणे ते ठामपणे बोलत होते. एव्हाना दर्शन घेणारांची गर्दी जमायला सुरुवात झाली होती. म्हणून चेट्टियार दिवाणखान्यात चलावे असे म्हणत होते. पण गुरुदेवांनीच सुचविले की बागेत एखाद्या झाडाखाली बसणेच त्यांना आवडेल. त्याप्रमाणे चेट्टियार यांनी नोक-रांना सूचना दिल्या नि एका अशोक वृक्षाच्या छायेत गालिचा पसर-ण्यात येऊन, गुरुदेव स्थानापन्न झाले व लोकांना समोर गालिच्या-वरतीच बसायला सांगितले. तो दिवस रविवार असल्याने, येणाऱ्या लोकांपाठीमागे व्यवसायाचा तगादा नव्हता, आणि त्यामुळे थोड्याच

वेळात आम्ही वसलो होतो त्या भागातील तो बागेचा विभाग लोकांच्या गर्दीने भरून गेला. काही थोडे लोक वगळल्यास बहुतेक लोक गुरुदेवांबावत काही ना काही अपेक्षा बाळगून आलेले दिसत होते. त्यांच्याकडून आपणाला काही तरी दिलासा मिळावा अशी त्यांची अपेक्षा दिसत होती. सर्वांनाच देण्यासारखे गुरुदेवांजवळ काही आहे की नाही यावद्दल मी स्वतः साशंक होतो. पण जमलेल्यांची गुरुदेवांकडे पाहण्याची दृष्टी मात्र वेगळी होती. गुरुदेवांजवळ दैवी शक्ती असल्याने त्यांच्याकडे येणाऱ्या प्रत्येकाला त्यांच्याकडून 'कृपा'–प्रसाद मिळेलच मिळेल अशी खात्री जमलेल्यांच्या डोळ्यात स्पष्ट दिसत होती. क्षणभर का होईना, मनाला असा ओझरता विचार स्पर्शून जाई की कायेने गुरुदेव आमच्या कितीही जवळ असले तरी त्यांचे विचार आमच्यापासून अति दूर आहेत अथवा कुणा दूरस्थाशी ते समरस झाले आहेत. ते प्रत्येकाशी बोलत होते, थट्टा-मस्करी करीत होते, मोकळेपणाने नि आनंदी वृत्तीने वागत होते. पण, त्यातही एक तऱ्हेचा अलिप्तपणा आहे याची मनोमय जाणीव होत होती.

एकामागून एकेकजण गुरुदेवांच्या पायाला स्पर्श करून त्यांना अभिवादन करीत होते. प्रत्येकाजवळ थोडेसे बोलून गुरुदेव आशीर्वाद देत होते. दर्शनार्थींच्या ज़मावातील एकजण नंतर म्हणाला, "गुरुदेव, देवावर विश्वास ठेवून, एखाद्या मूर्तीची पूजाअर्चा करूनसुद्धा आत्म-दर्शन वा साक्षात्कार घडणार नाही असे का गुरुदेवांना म्हणायचे आहे?" तात्काळ सर्वत्र शांतता पसरली. प्रत्येकजण गुरुदेवांचे उत्तर ऐकण्यास उत्सुक दिसला. गुरुदेव म्हणाले, "देव-ईश्वर नि श्रद्धा वा-विश्वास या शब्दांचा उपयोग दुर्दैवाने,फार गलथानपणे अर्थ समजावून न घेता केला जातो. भोवतालची परिस्थिती, कौटुंबिक परंपरा, आपण ज्याप्रकारे वाढवले जातो, ज्या प्रकारचे आपणाला शिक्षण मिळते, या नि अशा कित्येक गोष्टींच्या चाकोरीतून जाण्याची आप-णास अशी सवयच पडून गेली आहे आणि त्याचा एकत्रित परिणाम

असा झाला आहे की विशिष्ट नि संकुचित चौकटीतच विचार करण्याची आपल्याला नकळतपणे सवयच झाली आहे. त्यामुळे आपण जे बोलतो त्याला विशिष्ट अर्थ असतो, तोल असतो, मोलही असते याची जाणीवच आपणाला नसते, नि शब्दांचा अर्थ नि महत्त्व वा मर्म न समजताच आपण त्यांचा स्वैर वापर करीत असतो. आपण समजतो त्यापेक्षा एकेका शब्दाचा वेगळा अर्थ असू शकेल असा विचार कधी आपल्या मनाला स्पर्शसुद्धा करीत नसल्याने, आपण समजून चालतो की आपले तेच बरोबर; त्यामुळे निराळा विचार करण्याची गरजच वाटत नाही आपल्याला ! आपले विचार कसे चालतात याचे आपण कधीच निरीक्षण केलेले नसल्याने, नि कृतिपाठीमागेही डोळसपणाची वैचारिक बैठकच नसल्यामुळे आपण जे जे करतो तेच बरोबर; त्यात बदल किंवा सुधारणा करायला हवी असे कधी आपणाला वाटतच नसते. मनाची ही फसवणूक दीर्घकालच नव्हे तर अव्याहत चालू असते. देव म्हणजे तुम्ही काय समजता हे तर मला कळू दे ! तुमची आराध्यदेवता-मूर्ती म्हणजे काय ? तीवर तुमची श्रद्धा वा भक्ती आहे म्हणता, म्हणजें काय आहे याचा नीटसा उमज तरी तुम्हाला झाला आहे का ?" उत्तराकरिता न थांबता गुरुदेव म्हणाले " तुमची याबाबतची विचारसरणी कशी चुकीची आहे, विचारशून्य आहे, याची चर्चा करण्यात मी वेळ घालवू इच्छित नाही. पण माझ्या बोलण्याशी पडताळून तुम्ही आपापल्या समजुती पारखून घ्या म्हणजे झाले. श्रद्धा म्हणजे ठाम विश्वास. जी कशाचीही अपेक्षा बाळगत नाही, जीमध्ये फायदा-तोटयाचा ओझरतासुद्धा विचार संभवत नाही नि त्यामुळे जीमध्ये कधीही बदल होत नाही अशी मनाची अविचल स्थिती ! अशी अविचलित भक्ती तुम्ही तुमच्या देवाबद्दल बाळगता का ? मला वाटते, तुम्ही देव सर्वत्र आहे, सर्व व्यापून राहिला आहे नि सर्वशक्तिमान आहे असे मानता, एवढेच नव्हे तर या म्हणण्यावर तुमची श्रद्धा आहे, विश्वास आहे. त्यामुळेच न्यायी, सत्याचाच त्राता, सुष्टांचे पालन करणारा नि दुष्टांचे निर्दालन करणारा, तुमच्या

इच्छा–महत्त्वाकांक्षांची परिपूर्ती करणारा असा तो आहे असे तुम्ही विश्वासाने धरून चालता. तसे असेल तर तुम्हांला मूर्तिपूजाही मान्य असता कामा नये. कारण ज्यांचा त्या सत्–चिद्घन परमेश्वरावर विश्वास आहे, श्रद्धा आहे, त्याने त्या चैतन्यस्वरूप ईश्वराशिवाय इतर रूप धारण करणाऱ्या कुठल्याही मूर्ती वा प्रतीकापुढे नतमस्तक होण्याचे, त्याची पूजा–अर्चा करण्याचे, कारणच नाही. कारण, त्यामध्ये अनन्यभक्ती नाही. श्रद्धेचे खरे मर्मच समजलेले नाही, असा त्याचा स्पष्ट अर्थ होतो. श्रद्धा उडाली असे म्हणावे तर ते तर मर्माघात केल्यासारखे होईल; कारण श्रद्धा ही कधीही नाहीशी होत नसते. तुम्हाला जर ईश्वर खऱ्या अर्थाने समजला असेल तर त्याच्या रागा–लोभाचा, रागावण्या–रुसण्याचा, त्याला संतोष देण्या–घेण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, हे स्पष्ट व्हायला अवघड पडू नये. त्याची स्तुती करणे, त्याला भोग चढवणे, त्याला नैवेद्य म्हणून लाच देणे, बळी देणे, विशिष्ट प्रकाराने नि उपचारानेच पूजा–अर्चना करणे, विशिष्ट ठिकाणीच त्याला पाहणे, भेटणे, त्याची प्रार्थना करणे ह्या सर्व गोष्टी फोल ठरतात. यावरून हे स्पष्ट होते की देवभक्तीच्या नावाखाली तुम्ही जे जे करता वा त्याबाबत जे जे बोलता त्यामागे कुठलीही वैचारिक वा बुद्धीला पटणारी भूमिकाच नाही. म्हणून तुम्हाला माझे सांगणे आहे की तुम्ही या गोष्टींच्या जंजाळात स्वतःला अडकावून घेऊच नका, तर आपल्या मानसिक हालचालींचा मागोवा वा कानोसा घेण्याचा पद्धतशीर नि तीव्रतेने प्रयत्न करा. माझी खात्री आहे त्यामुळे तुम्हाला सत्याचे दर्शन घडेल. फार कशाला ? तुमच्या प्रश्नांना मी दिलेली उत्तरेही याबाबतीत तुम्हांला कोणत्याही प्रकारे साहाय्यभूत होऊन तुम्हाला पुढील मार्ग स्पष्ट करतील, असेसुद्धा मला वाटत नाही, तर उलट त्यामुळे तुमचा मानसिक गोंधळच होण्याचा संभवच जास्त ! कारण माझी उत्तरे तुम्हाला फक्त याबाबत जास्त माहिती पुरवू शकतात, अनुभव देऊ शकत नाहीत. जीवनात अत्यंत महत्त्वाची गोष्ट की ज्यामुळे तुम्हांला सत्याचे दर्शन

होते किंवा आत्मसाक्षात्कार होतो, ती म्हणजे अनुभूती अथवा अनुभव ! ”

पाठोपाठ कुणीतरी दुसरा प्रश्न विचारील असे मला वाटत होते तोच त्या बागेच्या खालच्या बाजूला काहीतरी गडबड उडाली. एका मोठ्या झाडाच्या दिशेने नोकरवर्ग आरडाओरडा करीत धावत जात होता. काय झाले हे समजावून घेण्याकरिता मी नि चेट्टियार उभे राहून पाहू लागलो. गुरुदेव मात्र स्वस्थ नि शांत होते. आणि श्रोत्यांनी आपली जागा सोडू नये असे सांगत होते. नोकरांचा जमाव जमला होता. तिकडे सर्व सभेचे लक्ष गेले होते. चौकशी करता कळले की एक मोठा साप बागेत आढळला नि त्याच्यामागे नोकर धावले. त्या झाडाच्या बुंध्यात जाऊन सापाने दडी मारली होती. नोकर व माळी यांनी त्या झाडाभोवती फेर धरून, सापाला कसा मारायचा याचा बेत चालवला होता. चेट्टियारच्या मुलालाही बंदूक घेऊन येण्याकरिता निरोप पाठवला गेला होता, नि त्याप्रमाणे बंदुकीसह तो त्या जागी येत असलेलाही आम्ही पाहात होतो. तेवढ्यात गुरुदेवांनी स्पष्ट शब्दात चेट्टियारांच्या मुलाला थांबवले व गरीब बिचाऱ्या सर्पाला मारू नको म्हणून सुचविले. गुरुदेव उठून त्या झाडाशी आले. त्यांनी नोकरांना बाजूला व्हायला सागितले, व साप बाहेर पडला तर त्याला कसलीही इजा होता कामा नये अशी ताकीद दिली. सर्पाची लपून बसण्याची जागा नोकरांनी दाखविली. गुरुदेव झाडाशी गेले व त्यांनी शीळ घातली. एक सातफुटी नाग चटकन् बाहेर आला नि आपली फडा उभारून उभा राहिला. अत्यंत भयंकर जनावर होते ते ! त्याला पाहताच भीतीने प्रत्येकजण मागे सरला. मला स्पष्ट दिसत होते की गुरुदेवांच्या समोर साक्षात प्राण संकट उभे होते. स्वतःला विसरून मी पुढे सरसावलो नि गुरुदेवांचा हात पकडला. आश्चर्य असे की ते नुसतेच हसत होते; माझ्या हातात असलेल्या त्यांच्या हाताचे सामर्थ्य केवढे मोठे आहे याची मला जाणीव झाली. ते म्हणाले, “माधव, भिऊ

नकोस. तू उभा आहेस तेथेच राहून काय होते ते नुसते पाहा.'' नागाने फणा पसरला, थोडा वेळ शांतपणे ताठ उभा राहिला. त्याने गुरुदेवांच्याकडे पाहिले, नि सावकाशपणे तो त्यांच्याजवळ आला. त्यांच्या पायाला त्याने विळखा घातला; नि गुरुदेवांनीही पाळीव जनावराप्रमाणे त्याला उचलून वर घेतले. गुरुदेवांच्या हातात तो इतका साळसूद दिसत होता.की ते जनावर महाभयंकर विषारी आहे हे मी विसरूनच गेलो. गुरुदेवांनी त्याला हळुवार थोपटले नि भोवतालच्या लोकांना म्हणाले सर्पाची भीती बाळगण्याचे काहीही कारण नाही. तो सर्प कुणालाही चावणार नाही. त्यांनी नोकरांना आपली कामे करायला जाण्यास सांगितले व सर्प घेऊन ते स्वस्थानी अशोक वृक्षाखाली आले. आता या नागापासून कसलाही धोका नाही असे कितीही सांगितले तरी गुरुदेवांजवळ नाग असताना त्यांच्याजवळ जायला कुणीही धजावले नाही. साप निघाल्याची बातमी तोपर्यंत घरात पोचली होती. तेव्हा, चेट्टियार घराण्यातील स्त्रियाही नाग पाहायला बागेत येऊन पोहोचल्या. गुरुदेवांनी सांगितल्याप्रमाणे दूध मागविण्यात आले नि नागाला त्यांनी ते पाजले. प्राणघातक सर्प गुरुदेवांशी खेळत होता हे दृश्य मी प्रथमच पाहात असल्याने मी थक्क झालो होतो. गुरुदेव म्हणाले,"कुणाला कसलीहि इजा न करणारा पवित्र असा हा नाग आहे. तो दंश करतो तो फक्त स्व–संरक्षणाकरिता ! त्याला कुणी दुखावले, जखमी केले तरच ! ! मनुष्याला सुद्धा डिवचले तर त्याला राग येतो. नि विवेकाविवेकबुद्धी असूनही बदला घेण्याची वृत्ती बळावते. मग या प्राण्यालाही तसे करावेसे वाटावे हे निसर्गनियमानुसारच नाही का? पण प्राण्यांनाही प्रेम समजते नि त्याबाबत त्यांची खात्री पटली की कुठलेही जनावर कुणालाच कसलीही इजा करीत नाही. गुरुदेवांचे म्हणणे जसेच्या तसे मान्य होणे कठीणच होते. परंतु समोरचे दृश्य पाहूनही त्यांच्या बोलण्याबद्दल अविश्वास दाखवणे अवघडच होते. नागाला स्वतःच्या गळ्याभोवती गुंडाळून गुरुदेव उठून घराकडे चालू लागले. चेट्टियार काळजीयुक्त स्वरात म्हणाले, "या सर्पाचे आता

काम करायचे ?" गुरुदेव म्हणाले, "तुम्ही याला खुशाल घरात बाळगा मी हमी देतो की तो कुणालाही इजा करणार नाही." चेट्टियर पति-पत्नी म्हणाली, "गुरुदेव माफ करा. पण सर्पाची आम्हांला भीती वाटते; तुमच्या गळ्यात तो आहे हे पाहूनही आम्हाला कसेसेच होते आहे. तेव्हा त्याला घरात बाळगण्याची तर गोष्टच सोडा." तेव्हा त्याला सुरक्षित ठिकाणी कुठेतरी सोडून द्यायचे ठरले. मोटार दाराशी आली आणि गुरुदेव व चेट्टियार नागाला घेऊन बाहेर गेले. जमलेले लोकही आपापल्या घरी गेले नि मी, चेट्टियारचे चिरंजीव नि घरातील महिलासमाज, सर्वजण बंगल्यात परत आलो.

## ९

आम्ही खोलीत पोचलो असू किंवा नसू, कुमारी चेट्टियार आपल्या भावाकडे वळून म्हणाली, "रवींद्र, पाहिलंस ना केवढा भयंकर नाग नि तो साळसूदपणे गुरुदेवांच्या हातावर खेळत होता ! मला तरी वाटते की एखादी दैवी शक्ती अंगी असल्याशिवाय असले चमत्कार घडणार नाहीत." तिच्या विस्तारलेल्या नेत्रात नि आवाजातील विशिष्ट नादावरून गुरुदेवांबद्दल तिला वाटत असलेली पूज्य बुद्धी आणि आदर स्पष्ट होत होता. तिने माझ्याकडे व भावाकडे अशा रीतीने पाहिले की जणु गुरुदेवांबद्दल तिच्या ठायी असलेल्या भावनांशी आम्हीही समरस व्हावे. दिवाणखान्यातील मोठ्या खिडकीशी बसून आम्ही गप्पा सुरू केल्या. रवींद्र म्हणाला, "गुरुदेवसुद्धा तुझ्यामाझ्यासारखे माणूसच ना ? तेव्हा झालेल्या चमत्कारामागे अतिमानवी शक्ती आहे असे मानावयाला मी तरी तयार नाही. झाले ते कसे झाले हे मला सांगता येत नसेलही. पण गारुडीसुद्धा नाही का हेच करून दाखवीत ? गुरुदेवांजवळ तशी काही युक्ती नसेल कशावरून ?" मृदुला नि रवींद्रच्या पत्नी यांना हे बोलणे आवडले नाही. विशेषतः

गुरुदेवांची साध्या गारुड्याशी केलेली तुलना तर त्यांना अगदी नापसंत होती. त्यांनी घडलेल्या गोष्टीवर माझे मत विचारले. मी म्हणालो," अतिमानुष वा दैवी शक्तीवर माझा फारच थोडा विश्वास आहे. पण गुरुदेवांच्या मी इतका सन्निध होतो की गुरुदेवांनी काही युक्ति किंवा जादू केली नव्हती याबद्दल माझी खात्री पटली आहे. नाग आम्हा दोघांनाही तुमच्या इतकाच अपरिचित होता; नि मी निक्षून सांगतो की आम्ही काही त्याला रामेश्वरहून घेऊन आलो नव्हतो. गुरुदेवांनी मंत्र म्हटल्याचे मी तरी ऐकले नाही. आणि गारूडी किंवा नजरबंदीचे प्रयोग करणारे ज्याप्रकारची हालचाल करतात तशीही त्यांनी केलेली नाही. मात्र गुरुदेवांनी बारीकशी शिळ घातली नि जणु काय त्यांतील भावार्थ ओळखून नाग बाहेर आला. स्पष्टच बोलायचे तर झाल्या गोष्टीवर प्रकाश पाडणारे बुद्धीला पटणारे किंवा बौद्धिक समाधान देणारे उत्तर देता येत नाही हे मात्र खरे. तेव्हा याबाबत काहीही मत बनविण्यापेक्षा आपण गुरुदेवांनाच विचारलेले बरे." मृदुलेला वाटले मी मूळ प्रश्नच डाव-लीत आहे—म्हणून ती म्हणाली, " तू एक सत्य तरी लपवीत आहेस. किंवा स्वतःचे मत द्यायची भीती वाटून टाळाटाळ तरी करीत आहेस." रवींद्र म्हणाला, " ते काही का असेना. हे कसे घडून आले असेल हे आपण तरी शोधले पाहिजे किंवा सरळ सरळ गुरुदेवांना तरी विचा-रायला हवे. मला नाही वाटत, की या घटनेबद्दल प्रश्न विचारले तर त्यांना राग येईलसे—कारण आपणा सर्वांची त्यांना चांगली माहिती आहे." मृदुलाचे हे ठाम मत होते की गुरुदेवांजवळ निश्चितपणे अशी दैवी शक्ती आहे की ज्याच्या साहाय्याने ते चराचर वस्तूवर ताबा मिळवू शकतात. रवींद्राची पत्नी सौ. चेट्टियर तेवढ्यात तेथे आल्या. त्यांचेही मत मृदुलासारखेच होते. रवींद्र म्हणाला " स्त्रियांची जातच भोळीभाबडी ! त्यामुळे ज्या घटनेचा त्याना अन्वयार्थ लावता येत नाही तो दैवी मानून त्या मोकळ्या होतात झाले ! " त्याच्या पत्नीने प्रतिजबाब दिला, "नाहीतरी पुरुषांना आपल्या हुशारीचा, बुद्धीचा नि

ज्ञानाचा गर्वच फार. त्यामुळे त्यांच्या समजूतदारपणाला नि बुद्धीला वावरून टाकणारा काहीही चमत्कार दिसला तरी ते कबूल करायचे नाहीत. कारण त्यांच्या अहंकाराचा पोकळ भोपळा फुटायची वेळ येते ना ? "

मला वाटले वादाचा मूळ मुद्दा बाजला राहून वितंडवादात त्याची परिणती होत आहे. म्हणून वादाला वेगळी कलाटणी देण्याचा मी विचार करीत होतो; इतक्यात चेट्टियार कुटुंबाच्या ओळखीची कोणी स्त्री तिथे आली आणि तिने सौ. चेट्टियारना विचारले," कसल्या गप्पा चालल्या आहेत येवढ्या ? " हा अडथळा माझ्या दृष्टीने तरी स्वागतार्ह होता. मी म्हटले, " सर्व नीट बसा पाहू नि मग आपण बोलू. " पुन: चर्चा सुरू झाली. रवींद्र एकसारखा गुरुदेवांना चार-चौघांसारखा एक माणूस म्हणे हे स्त्रीवर्गाला सहन होत नव्हते. सौ. चेट्टियर म्हणाल्या, " गुरुदेवांबद्दल असं बोलणं शोभत नाही आपल्याला. " रवींद्र आपला मुद्दा न सोडता म्हणे " जे जे घडते त्याला काहीतरी कारण असतेच. मग ते गुरुदेव यांचेकडून घडो नाही-तर त्यांच्याहून वरच्या श्रेणीतील व्यक्तीकडून घडो." त्यावर मी म्हटले, " रवींद्राच्या पत्नीशी मी थोडासा सहमत आहे. आपल्या बुद्धीच्या नि ज्ञानाच्या सीमा आपण ओळखायला हव्यात. मग त्यामुळे स्वतःच्या अहंकाराला थोडीशी मुरड घालायला का लागेना ! कारण असे आहे की आपणाला सर्व कळते, किंवा आपण जे शिक्षण संपादन केले आहे त्यामुळे आपणाला अनाकलनीय असे काही नाहीच असे वाटणे ही मोठी चूक आहे; भ्रम आहे आपला ! आपण जे पाहिले त्याच्याबद्दल बुद्धीला पटणारा वा गूढावर जास्त प्रकाश पाडणारा विचार आपण पुढे मांडू शकत नाही हे खरेच आहे. मलाच काय ते समजते हा अहंकार, झाले ते समजून घेण्याच्या आड येत आहे." मोटार–गाडी परतल्याचा आवाज ऐकताच आमचा वादविवाद थांबला. गुरुदेव व चेट्टियर दिवाणखान्यात येताच आम्ही सारेजण उठून उभे राहिलो. गुरुदेवांनी सर्वांकडे पाहून स्मित केले नि सरळ

ते आपल्या खोलीकडें वळले. चेट्टियर खाली बसले नि मृदुलाने अधीरतेने विचारले, "त्या नागाचे काय झाले?" चेट्टियर म्हणाले, "आम्ही गावाबाहेर लांब-दूरपर्यंत गेलो; नि एका टेकाडाशी गुरुदेव नागाला घेऊन् उतरले. जेथे झाडेझुडपे जराशी दाट होती तिथपर्यंत आम्ही चालत गेलो. गुरुदेवांनी हळुवारपणे नागाला खाली ठेवले; नि त्याच्या वाटेस न गेलेल्या कोणालाही दंश करू नकोस असे त्यांनी नागाला सांगितले. आश्चर्य असे की गुरुदेव जे म्हणाले ते नागाला समजल्यासारखे वाटले. कारण, त्याला मोकळा सोडताच नाग जरासा सरपटत पुढे गेला नि पुनः मागे वळून मी नि गुरुदेव उभे होतो तेथे तो आला. फणा उभारुन डोलू लागला; जणू काय जे सांगितले ते समजले याची ती कबुलीच होती. गुरुदेवांच्या दोन्ही पायांना त्याने स्पर्श केला, जणु त्यांचा निरोपच घेतला आणि सरळ त्या टेकडाकडे चालू लागला. एका मोठ्या झुडपात तो शिरेपर्यंत आम्ही पाहात होतो. गुरुदेव तरीही उभेच होते-कशाची तरी वाट पाहात! झुडुपे हलल्याचा मला भास झाला, नि खरोखरच त्या झुडुपावर नागाने आपली फणा वर काढली होती. तेथून नागाने इतकी कर्णमधुर शीळ घातली की ती अजूनही माझ्या कानात घुमत आहे. मला वाटते, ती केवळ याचकरिता होती की त्याचे तेथले वास्तव्य सुरक्षित आहे असे नागाला सुचवायचे होते. मग गुरुदेवांनी पाठ फिरवली नि आम्ही परत निघालो." सौ. चेट्टियारनी भक्तिभावाने हात जोडले नि त्या म्हणाल्या, "गुरुदेव प्रति ईश्वर आहेत यांत संशय नाही." त्या आपल्या मुलाला म्हणाल्या, "रवींद्र तू जर गुरुदेवांची कृपा संपादन करू शकलास तर तुझे जन्माचे कल्याण होईल. तू आपल्या खोट्या कल्पनांना तिलांजली दे नि पाखंडीपणा सोड. गुरुदेवांसारखे संत आपल्या घरात वास्तव्य करतात-इथे येऊन राहातात, नि आपणा सर्वांवर त्यांचे प्रेम आहे यासारखे आपले दुसरे सद्भाग्य नाही"

जेवण तयार असल्याची वर्दी आली. मी गुरुदेवांची तयारी झाली

की नाही हे पाहायला त्यांच्या खोलीत गेलो. नंतर जेवणघरात आम्ही पुन: सर्वजण एकत्र जमलो वाढप संपले नि दबलेल्या कुतूहलाला मृदुलेने वाचा फोडली. "सकाळच्या चमत्काराबद्दल गुरुदेव आम्हाला थोडेसे काही सांगाल तर बरे होईल." गुरुदेवांनी तिच्याकडे पाहिले नि म्हणाले, "जे काय झाले ते सर्वांनी पाहिलेच आहे. त्याबद्दल आणखी सांगण्यासारखे काही राहिले आहे असे मला तरी वाटत नाही. काही एक कारण नसता नागाचा जीव धोक्यात आला होता. मी फक्त बिचाऱ्याचे प्राण वाचविण्याचे प्रयत्न केले इतकेच !" रवींद्र म्हणाला, "येवढ्या विषारी सापाला तुम्ही बिचारा कसे म्हणता ? दंश केला असता तर कोणाचाही तात्काळ मृत्यू घडला असता. सर्पदंशाने अनेक मृत्यू झाल्याची उदाहरणे माहीत असताना अशा महाभयंकर प्राणघातकी जनावराला कोणीही दया दाखवू नये असे मला वाटते. त्या नागाचे प्राण वाचवावेसे तुम्हाला वाटले त्याची कारणे काहीही असोत; तुमच्याबद्दल यत्किंचितही अनादर न दाखवता मला जे वाटते ते सांगतो, तुमचा भलेपणा अस्थानी दाखविला गेला आहे. सर्पासारख्या भयानक प्राण्याला दयामाया न दाखविता तो दिसेल तिथे ठेचून ठारच करायला हवा." गुरुदेव म्हणाले, "तू हे सर्व भावनाविवश होऊन बोलत असल्याने त्यात तथ्यांश मुळीच नाही. कोणतेही बोलणे काय की कृती काय, तिचा जन्म भावनाविवशतेतून झालेला असेल तर त्याच्या मुळाशी अचूक विचार किंवा विवेकही नसतोच म्हणून अशी बडबड वा कृती बहुतांशी चुकीची असते. अगदी क्वचित् प्रसंगीच ती बरोबर ठरते— केवळ बोलाफुलाची गाठ पडून ! जीवित म्हणजे काय, मृत्यू म्हणजे काय, जन्म आणि मृत्यू का घडतात याचा कधी तू विचार केला आहेस का ? तुला जर असे वाटत असेल की तू कुणालाही ठार मारू शकतोस किंवा वाचवू शकतोस तर तो तुझा निवळ भ्रम आहे. जन्म देणे वा कुणाची जन्माला येण्याची क्रिया थांबवणे तुझ्या का हाती आहे ? तसे तुला वाटत असेल तर मला नाइलाजाने म्हणायला

हवे की हे संपूर्णतया चूक आहे. मारण्या वा तारण्याच्या गोष्टी कुणाच्याही हातच्या नाहीत; केवळ अज्ञान आणि अहंकार यापायी तू असे बोलत आहेस."

मृदुलाला वाटले विषयाला अकारण तात्त्विक कलाटणी मिळत आहे. तत्त्वज्ञानापेक्षा झालेल्या चमत्काराबद्दल तिला जास्त कुतूहल होते. ती मध्येच म्हणाली, "गुरुदेव, रवींद्राला तुम्ही मग पुन्हा केव्हांतरी तत्वज्ञान शिकवा. पण मला समजावून घेण्याची इच्छा आहे की तुम्ही शीळ घालताच लपलेला नाग बाहेर कसा आला? त्याला तुमची भाषा समजली का?" रवींद्राच्या त्या नको त्या पद्धतीने झालेल्या मत-प्रदर्शनामुळे वातावरण तंग झाले होते ते स्त्रीवर्गाला जरा असह्यच झाले होते; नि त्यात खेळकर वातावरण उत्पन्न होण्याकरिता सुद्धा असेल कदाचित् स्त्रीवर्गाने मृदुलेच्या प्रश्नाला साथच दिली. चेट्टियारनाहि त्यांचे चिरंजीव गुरुदेवांशी बोलले ते मुळीच पसंत नव्हते. गुरुदेवांनी सस्मितपणे म्हटले, "मला सापाची भाषा मुळीच येत नाही. परंतु, त्याची एका बाबतीत मी समजूत घालू शकलो की मी त्याला कोणत्याही प्रकारे इजा करू इच्छित नसून साध्या व सरळ प्रेमाने त्याला बोलावीत आहे. सर्पाबाबतच केवळ हे खरे नव्हे; तर या अवनीतलावरील प्रत्येक प्राण्याबद्दल मी हे बोलत आहे. न बोलता समजणारी हीच एकमेव भाषा आहे. खरे प्रेम कशाला म्हणतात हे जर तुम्हांला कळले, तर या जगात तुम्हांला कुणाचीही नि कसलीही भीती नाही, आणि कोणी तुमच्यापासूनही भीतीने दूर पळणार नाही. अति क्रूर नि भयंकर सिंहापासून खालीदृष्टीस पडताहेत न पडताहेत अशा कृमिकीटकांपर्यंत, उत्तुंग पर्वतापासून तो खाली समुद्रतलवासी वालुकामय प्रदेशापर्यंत प्रेमाची भाषा सर्वांना समजते. ती भाषा समजण्यात अडथळा उत्पन्न होतो तो अज्ञान, अहंकार, हाव, सत्ता व संपत्ती मिळविण्याची धडपड, या पायी."

मृदुला म्हणाली, "तुमच्या म्हणण्याप्रमाणें नागाला तुमची

भाषा समजली नसेल तर, माफ करा गुरुदेव, नाग बाहेर येऊन तुम्ही त्याला उचलल्याबरोबर तुमच्या पायांशी त्याने लोळण कशी बरं घेतली ? " गुरुदेव म्हणाले, " का ? या प्रश्नाचे उत्तर अगदी सोपे आहे. जेव्हा सर्पाच्या ध्यानी आले की त्याच्या जीविताला धोका नाही; तेव्हां उपकृत भावनेने तो लीन झाला, यापेक्षा निराळ्या कोणत्या मार्गाने त्याला आपल्या भावना प्रकट करता येणे शक्य होते ? " मृदुला पुढे म्हणत राहिली कीं, सिद्धी की कायसे म्हणतात ती अतींद्रिय दैवी शक्ती गुरुदेवांना प्राप्त झालेली असली पाहिजे. गुरुदेव यावर मनापासून हंसले नि म्हणाले, " बेटा, तुलाचसे काय, बहुतांश लोकांना तसेच वाटते. ज्या तऱ्हेच्या वातावरणांत तुम्ही वाढलात, तुमच्यावर ज्या शिक्षणाचे संस्कार घडले त्यानुसार तुम्ही या नि अशा घटनांबाबत असेच म्हणत असता. तुमचेच म्हणणे बरोबर, तुम्हाला वाटते तेच फक्त खरे अशी तुमची भावनाच होऊन बसते. ज्याचे बुद्धिगम्य उत्तर सापडत नाही, त्याला तुम्ही 'दैवी शक्ती' असे नाव देऊन मोकळे होता. तुम्हाला जे आज अनैसर्गिक वाटते, ते उद्या, तुमच्या ज्ञानाच्या कक्षा वाढल्यावर अगदी सहजसाध्य नि नैसर्गिक वाटू लागेल. तेव्हा, मनाची समजूत पटण्याच्या दृष्टीने फरक पडतो तो जाणणाऱ्याच्या ज्ञानाच्या नि अज्ञानाच्या मर्यादेतूनच ! " गुरुदेवांचा खुलासा सर्वांना पटलाच असे म्हणणे कठीण होते. पण रवींद्र नि मृदुला गप्प झाली येवढे मात्र खरे. जेवणे झाली नि मी आपल्या खोलीत परतलो.

माझ्या मुक्कामाबाबत माझ्या वडिलांना नि भावांना मला पत्रे लिहायची होती. दुपारी माझा मित्र सपत्निक मला भेटण्याकरिता आला होता नि आम्हां सर्वांचा दुपारचा चहाही एकत्रितपणे झाला. तो मला भोजनाचे आमंत्रण द्यायला आला होता. पण, मी ते स्वीकारले नाही. गुरुदेवांची ऊठबस करण्याचे माझे काम असल्याने नि शिवाय, गुरुदेवांचा सहवास जास्तीत जास्त मिळावा अशी माझी इच्छा असल्याने मी भोजनाचे निमंत्रण साभार नाकारले, नि त्या

दोघांना माझे म्हणणे पटलेहि. आदल्या दिवशीच्या सायंकाळी गुरुदेवांच्या झालेल्या प्रवचनाचा त्यांच्यावर खूपच परिणाम झाला असल्याचे त्या उभयतांनी मला पुन:पुन्हा सांगितले. सकाळचा नागावाबत घडलेला चमत्कारही त्यांच्या कानावर एव्हापर्यंत पोचला होता. जे काय घडले नि त्याबाबत गुरुदेवांनी जो काय खुलासा केला त्याचा थोडक्यात सारांश मी त्यांना सांगितला. गुरुदेवांचा खुलासा तितकासा पटण्यासारखा नाही असे माझ्याहि मित्राचे मत पडले; मी मात्र त्यावर एवढेच म्हटले की, "गुरुदेवांचा खुलासा मलातरी पटला. माणसाला प्रेमाचा त्या अति उच्च सीमेपर्यंत जर खरोखरच आविष्कार करता आला, तर जगातील चराचर सृष्टीवर मनुष्याला सहज तावा मिळविता येईल. प्रेमाच्या त्या कोटीपर्यंत आपण कसे पोचायचे हा प्रश्न अर्थातच अलाहिदा. पण, गुरुदेवांसारख्या श्रेष्ठांच्या मार्गदर्शनाखाली माणसाला प्रेमाच्या त्या उच्च श्रेणीपर्यंत पोचता येईल असे मात्र मला जरूर वाटते."

तेवढ्यात नोकराने येऊन वर्दी दिली की दिवाणखान्यात भक्तांचा मेळावा जमला असून गुरुदेव तेथे माझी वाट पाहात आहेत. दिवाणखान्यात पाय ठेवायला जागा नव्हती. तरी, आम्ही गुरुदेवांसन्मुख जाऊन बसलो. कालचेच सद्गृहस्थ पुन: उठून म्हणाले, "काल सायंकाळप्रमाणे चार शब्द आजही गुरुदेव सांगतील तर बरे होईल." गुरुदेव म्हणाले, "कोणालाही काहीही प्रश्न विचारायला हरकत नाही. पण प्रश्न मात्र वैयक्तिक असण्यापेक्षा सर्वसामान्य श्रोत्यांच्या दृष्टीने विचारलेला असला तर उत्तम. म्हणजे मी उत्तरादाखल जो खुलासा करीन त्याने इतर श्रोत्यांनाही त्यांच्या प्रश्नांची उकल झाल्याचे समाधान मिळेल."

"काल आपण म्हणालात की प्रत्येक मनुष्यच आपल्या आयुष्यातील सुखदु:खाला जबाबदार आहे. आपल्या आशा, इच्छा, आकांक्षांमुळेच मानवाने आपले जीवित दु:खमय केले आहे. हे जर त्याला नीट कळले, तर ज्याकरिता त्याची सतत धडपड चालू आहे

ते सुख तर त्याला प्राप्त होईलच पण ओघाने येणारी मन:शांतीहि मिळेल. यावर मी बराच विचार केला पण अजून मनाचे समाधान झाले नाही; होत नाही. भावना, शोक, राग, लोभ, नि वासना यांचे खरे स्वरूप ओळखून त्यांपासून अलिप्त राहायला शिकविल्याशिवाय, मार्ग दाखविल्याशिवाय, काय केले पाहिजे ते सांगितल्याशिवाय यांतून सुटका व्हायची कशी? आणि तुम्ही तर म्हणता की 'मार्ग ही पळवाट होते, पायवाट होऊ शकत नाही! साधनेला एवढा विरोध करून चालायचे नाही. सुख नि मन:शांति मिळविण्याची वाट दाखवायलाच हवी नि जो ती वाट दाखवितो त्यालाच 'गुरु' म्हणतात; अर्थात् या शब्दाला तुमचा आक्षेप नसेल तर!"

गुरुदेव म्हणाले, "तुम्ही म्हणता, माझ्या कालच्या बोलण्यावर तुम्ही खूप विचार केलात. असेलही. पण ज्याप्रकारे नि ज्या तऱ्हेचा विचार व्हावयाला हवा तसा तो केलेला दिसत नाही. अर्थात् हा तुमचा दोष नाही. ज्या परंपरेत, वातावरणात नि सामाजिक स्थितीत तुम्ही वाढलात नि आतापर्यंत वागत आलात, ज्याप्रकारचे तुम्हांला शिक्षण मिळाले नि सामाजिक परिस्थिती व कौटुंबिक अडचणींना तोंड देत सुखदु:खे भोगावी लागली त्या सर्वांचा तो परिपाक आहे. विचार कसा करायचा हेच मूलत: तुम्हांला कळलेले नाही; मग स्वत:चे प्रश्न स्वत: हाताळण्याची बाब तर दूरच राहो. जुन्या दु:खदायक आठवणी नि संस्कार व आगामी आशादायक कल्पना वा आशास्पद भवितव्य यांच्या माध्यमातून तुम्ही आपले प्रश्न सोडवू पाहाता. जुने समज--अपसमज, चुकीच्या वा बरोबर कल्पना, विकल्पाविकल्प, जुन्या भल्याबुऱ्या आठवणी यांचे ओझे जोपर्यंत मनावर आहे तोपर्यंत आजच्या प्रश्नाबाबत सुस्पष्ट समज, नि त्या प्रश्नाची उकल करणारी गुरुकिल्ली शोधू पाहणे दोषास्पद तर खरेच पण निष्फळही असते. प्रश्नाचे खरे स्वरूप तेव्हाच प्रगट होईल की जेव्हा माणूस समोर येणाऱ्या प्रत्येक प्रश्नाकडे पूर्वग्रहदूषित दृष्टीने पाहाणार नाही. तुम्ही जेव्हा तंत्र किंवा मार्ग म्हणता तेव्हा तुम्हाला अभिप्रेत असतो तो

बिनकाटयाकुटयाचा, बिन खाचखळग्यांचा, संतांनी साफसूफ करून ठेवलेला मार्ग !

"त्याच अनुषंगाने तुम्ही 'गुरू' अपेक्षिता नि गुरूच्या उपदेश-ग्रहणाला ' संतांची वाट पुसत' जीवन व्यतीत करणे म्हणत असता. संतांनी वा मोठ्या योगी पुरुषांनी सांगितल्याप्रमाणे वागले की पुढचा ध्येयाप्रत होणारा प्रवास निर्वेधपणे होणार अशी तुमची वेडी समजूत असते; नि त्याला तुम्ही श्रद्धा किंवा भक्ती म्हणता. कारण, जन्मभर तुम्हांला एकच शिकविले गेलेले असते की विशिष्ट ध्येय गाठायचे तर कुणा ना कुणाचे अनुयायित्व पत्करणेच जरूर आहे. निश्चित ध्येयाबाबतच्या अशा कल्पना आणि त्याप्रत पोचायचा म्हणून दाखविलेला सोपानमार्ग यामुळे होते ते हेच की पदरात निश्चितपणे फक्त विफलता व निराशा मात्र येते. कारण संपत्ती मिळवून श्रीमंत होण्याची इच्छा, किंवा तत्सम महत्त्वाकांक्षा बाळगणे इत्यादिकात समाधानाचे शेवटचे टोक अतएव मर्यादा नाही की ज्या बिंदूपर्यंत पोचल्याने प्रक्रिया संपेल ! मनुष्याला किती असले म्हणजे 'पुरे' होईल हे ठरलेले नाही. समाधान हा वृत्तीचा गुण आहे, देहाचा नाही. शिवाय ध्येये किंवा गाठावयाची अत्युच्च ईप्सिते ही तरी स्थिर कुठे असतात. हाती न लागणाऱ्या क्षितिजाप्रमाणे तुम्ही कितीही पुढे जा क्षितिज दूरदूरच जात राहाते; तसे या ध्येयसाधनेच्या मार्ग-क्रमणाचे आहे. परिस्थिती सारखी बदलत असते. म्हणून आपण आज जे फळ मागतो ते बदललेल्या परिस्थितीमध्ये सुखाचे होईलच याची खात्री नाही. जगामध्ये समाधान कुणी देत नाही आणि आपले समाधान कुणी घेत नाही. असमाधानाचा रोग सर्वांनाच असल्याने रोगांच्या यादीतून त्याचे नाव निघून गेले आहे. जगाची राहाटी ही अशी चाललेली आहे; नि म्हणूनच सर्वजण असुख व दुःखाचीच रडकथा सदैव सांगत राहातात. आपण जे करतो आहोत त्याने सुख वा समाधानाचा कणसुद्धा हाती लागलेला नाही—लागत नाही; याचे ज्ञान पावलोपावली नि जन्मोजन्मी होत असताही

मनुष्य अनुभवाने शहाणा होत नाही हे तर सर्वांत मोठे कारुण्य आहे !

"आश्चर्याची आणखी गोष्ट म्हणजे जीवनात येवढी दुःखे भोगूनही आपला मार्ग चुकीचा आहे याबद्दलची माणसाला खात्री वाटत नाही. खरे म्हणाल तर तुम्ही तुमच्या आयुष्याचे नि करीत असलेल्या कृतींचे निरीक्षण करा, बस्स ! आणखी कसल्याही साधनेची गरज नाही. मला सांगा, विष घ्याल तर मरून जाल हे तुम्हांला कुणी शिकवले आहे का ? त्याचप्रमाणे तुम्ही सांगू शकाल का की अमुक अमुक साधनामार्गाने तुम्हांला शिकवले की सर्पाला स्पर्श करू नका, जळत्या चितेत उडी घेऊ नका, स्वतःच्या कपड्यांना काडी लावू नका वा महासागरात उडी घेऊ नका ?–हे शिकवणारा तुमचा गुरू तरी कोण ?--जीवनात कितीतरी गोष्टी आपण गुरूच्या मार्गदर्शनाशिवाय व अमुक एक साधना केल्याशिवाय शिकत असतो. तुम्ही आज या शहराचे मान्यवर नागरिक आहात ; कुणा गुरूच्या शिकवणीने की त्याने दाखवून दिलेल्या साधनमार्गाने ? समाजात तुमचे जे आजचे स्थान आहे ते, माझ्या मते, तुम्ही विचारपूर्वक केलेल्या आचरणाचे नि निरीक्षणाचे फलित आहे. कारण, तसे आयुष्य घडविणे हेच महत्त्वाचे आहे अशी तुमची प्रामाणिक समजूत आहे नि होती. तुम्ही आपल्या आयुष्याची कित्येक वर्षे पैसा नि मानमरातब मिळविण्यात घालविलीत, कारण तुम्हाला वाटत होते की त्यामुळे तुम्ही सुखी व्हाल; मनाला शांती मिळेल. तुमचा हा अहंकार नाहीसा करण्याकरिता तुम्ही आजपर्यंत थोडा का वेळ नि पैसा खर्च केला आहात ? आता जरा धुंदी उतरली असल्याने तुमची कुरकूर सुरू झाली आहे की आतापर्यंत जे सर्व काही केले त्याने पदरी पडले फक्त केविलवाणे दुःख नि असुख. म्हणजेच तुमचे सारे प्रयत्न नि धडपड चुकीच्या मार्गाने चाललेली होती असेच नाही का त्यावरून ठरत ? यापूर्वीच जर तुम्ही थोडा विचार करता तर आपण जे करीत आहात त्याचा शेवट सुखशांतीमध्ये होणे अशक्य आहे हे तुमच्या लक्षात

आले असतेही. जिथे जी गोष्ट नाही तिथे ती शोधू पाहाता, सापडली नाहीतर पुढची शोधाशोध थांबवून मनुष्य गंभीरपणे विचार करून आपली चूक सुधारतो ना? त्याकरिता नाही कुठे गुरूची गरज लागत? वा त्याने सांगितलेल्या साधनामार्गाची?—तर आत्मसंशोधन, सद्विचार नि अनुभव यांची कास धरूनच ना आपण चुकीचा मार्ग सोडून, सन्मार्गावर येतो?

"ज्यात सुखसमाधानाचा लवलेशही नाही त्यामध्ये सुख धुंडाळ-ण्याचा तुम्ही आतापर्यंत प्रयत्न केलेला आहे. तेव्हा, अजूनही वेळ टळून गेली नाही, तोच तुम्ही अंतर्मुख होऊन विचार करायला हवा, समजून घेण्याचा प्रयत्न करायला हवा. मनात काय घडामोडी चाल-लेल्या आहेत ते निरखून पाहायला हवे. तुमच्या सुखशांतीच्या आड आशा–इच्छा–आकांक्षा–नि अतृप्ति–हव्यास इत्यादी येत आहेत. याची तुम्हाला जाणीव झाली की, विनासायास त्यांच्यापासून स्वतःला अलिप्त ठेवण्याबाबत प्रयत्नशील बनाल, जितक्या सहजतेने तुम्ही सगळे अग्निज्वाला नि विष यांपासून स्वतःला दूर ठेवता तितक्या सहजतेने मनाच्या या साऱ्या विकृती आपोआप गळून तरी जातील किंवा चुकीच्या एकमेव जाणीवेने तुम्ही स्वतःला त्यापासून मुक्त तरी करून घ्याल. आणि माझी खात्री आहे की याकरिता कुठल्याही गुरूची वा गुरूपदेशाची जरूर नाही. आत्मजागृती नि अनुभव यामध्ये क्षणालाही स्थान नसते. ज्या क्षणी तुम्ही आत्मबोधावर याल त्या क्षणी तुम्हाला आत्मसाक्षात्कार घडेल, तुम्ही मुक्त व्हाल. तेव्हा, साधनामार्ग वा गुरूपदेश यामध्ये, आत्मबोध नि अनुभव येणे यामधील कालावधी आवश्यक आहे असा जो अर्थ प्रत्येकाच्या मनात अभिप्रेत असतो ती कल्पना बरोबर नाही. साधना मार्गात अपेक्षा नि त्यांची पूर्ती हे दोन अध्याहृत नि अपरिहार्य मानले जातात नि म्हणूनच त्यांचा शेवट दारुण निराशा किंवा विफलतेत होणेच सुसंगत ठरते."

त्यावर एकाने मार्मिकपणे विचारले, "माफ करा, पण तुम्ही ज्या प्रकारे मानसशास्त्रीय अवलोकन करून विचार करायला सांगत

आहात तीही एक प्रक्रिया किंवा साधनामार्गच नव्हे का ? नि तो मार्ग अचूकपणे कसा आक्रमावयाचा हे सांगणारे तुम्ही 'गुरू' या संज्ञेला सार्थ ठरत नाही का ? असे जर आहे तर तुम्ही प्रक्रियेचा जो इतका निकराने निषेध करीत आहात याचा आम्ही अर्थ तरी काय समजावयाचा ? "

गुरुदेव म्हणाले, "तुमचा प्रश्न म्हणजे तुम्ही तुमच्या कल्पनेशी चालवलेला बौद्धिक विलास आहे. त्यामुळे आपण ज्याप्रकारे विचार करतो तो बरोबरच आहे अशी तुम्ही तुमची, स्वतःची फसवणूक करीत आहात. माझ्यापुरते म्हणाल तर मी कोणत्याच साधनामार्गाचा निषेध करीत नाही, करू इच्छित नाही. तुम्हाला एवढेच दाखविण्याचा माझा प्रयत्न आहे नि इच्छा आहे की, तुम्हाला वाटते त्याप्रमाणे गुरूपदेशजन्य मार्गदर्शनाने तुम्हाला सत्यदर्शन होणार नाही याची सुस्पष्ट जाणीव तुम्हाला व्हावी. गुरू व गुरूपदेशात्मक साधनामार्ग या शब्दांनी वरवर जो सीधा–साधा नि सोपा मार्ग अशी जी समजूत होते ना, ती तितकीशी खरी नाही. तुमच्यासारख्या बुद्धिवाद्यांचा अपवाद सोडू या; पण इथे जे मी बोलतो ते सर्वसामान्य लोकांची जी मला ओळख आहे तो जनसमाज, त्यांची समजूत, त्यांची विचार करण्याची पद्धत लक्षात घेऊन मी बोलत आहे. तुम्ही मार्ग वा साधनेच्या शोधात केव्हा लागता ? तर जेव्हा तुमच्यापुढे एखादा अनाकलनीय प्रश्न उभा राहतो, अनुल्लंघनीय अडचण उभी राहते, नि ध्येयाकडे तुमची घोडदौड चाललेली असते तेव्हा ! काय मिळविण्याकरिता तुम्ही विशिष्ट मार्ग पत्करला आहे याची तुम्हाला पुरेपूर जाणीव असते. ती अंधारात घेतलेली उडी नसते किंवा नुसतीच भ्रमंती वा भटकी वृत्ती नसते. तुम्ही, तुमच्या मनाशी, प्रश्न कोणता, त्याची उकल कशाने होईल, नि त्यातून निष्पन्न काय होईल, याबद्दल एक प्रकारची निश्चित कल्पना करूनच ठेवलेली असते. त्याचप्रमाणे तुम्हाला असेही वाटते की, जवळची वाट दाखविणारा कोणी वाटाड्या मिळाला तर

आपल्या ध्येयाप्रत आपण जरा लवकरच पोहोचू नि अचूकपणे पोहोचू !

"मग तुमचा असा गुरू मिळविण्याकरिता शोध सुरू होतो. कारण एकतर असे काहीसे होते, असे तुम्ही पोथी-पुस्तकात वाचलेले तरी असते किंवा तुमच्याभोवती या अशाच मार्गात असलेले गुरूभक्त तरी आपले अनुभव तुम्हाला सतत सांगत असतात ! त्यामुळे तुमच्या मनाची एक प्रकारची खात्री होते की, आपले ध्येय वा प्रश्न कसाही का असेना त्याप्रत जाण्याचा जवळचा मार्ग दाखविणारा गुरू मिळाला नि त्याने दिलेल्या उपदेशाचे वा मंत्राचे पालन केले की झाले. तेव्हा, आता कशाची जरूर असेल तर त्याची गाडी पकडायची नि आपल्याला ज्या गावाला जायचे त्या गावी पोचायचे इतके ते सोपे आहे असे तुम्हाला वाटते. तुम्ही गाडीत बसलात की तुम्ही धरूनच चालता की गावाला पोचण्याकरिता जे जास्तीत जास्त करणे इष्ट ते आपण केले आहे. गुरूंनी अनुग्रह देऊन उपदेश केला, मंत्र दिला, मार्गदर्शन केले की त्यांच्या आदेशाप्रमाणे आपण वागायचे येवढेच उरते. पण, तसे वागूनही जर ईप्सित साध्य होण्यात त्या मंत्रतंत्राची परिणती झाली नाही तर लागलीच मनाची चलबिचल सुरू होते, मनाचा गोंधळ उडतो नि कधी कधी आपण फसवले गेलो नि फसलोही अशी भावना वळावते. मग काय होते ?

"एकतर तो मार्गच तुम्ही अजिबात सोडून देता किंवा अन्य गुरूच्या शोधाला लागता. नवा गुरू, नवा उपदेश, नवी पहिल्यापेक्षा जास्त प्रभावी नि चांगली साधना ! क्वचितप्रसंगी आपले ध्येयच बदलून तुम्ही परिस्थितीशी मिळते घेता. आपली महत्त्वाकांक्षा साध्याच्या आटोक्यात आणण्याचा प्रयत्न करता. सारांश काय, तुमची ही सारी धडपड जीवनातील सत्यापासून दूर पळण्यासाठी असते. प्रश्न आहे तसा पाहण्याची टाळाटाळ असते. अपयशापासून शहाणे होण्याऐवजी गुरू नि त्याची साधना याच्या आड आपले तोंड परिस्थितीपासून लपवण्याचा तुम्ही प्रयत्न करीत असता. सत्य, आनंद,

साक्षात्कार नि ईश्वरी प्रसाद} ह्या अनुभवाच्या गोष्टी आहेत. त्यांचे कधी निश्चितपणे वर्णन करणे शक्य नसते. शब्दातीत असा तो अवर्णनीय अनुभव असतो. त्याची व्याख्या करिता येत नाही. अनुभव हा शिक्षणासारखा किंवा सांस्कृतिक साचेबंद माध्यप्रकार नाही. अनुभवाला भूतकाळ नसतो, ना भविष्यकाळ! सर्वच वर्तमानकालीन, आताच्या आता, या क्षणाला अनुभवावयाची ती गोष्ट आहे. साधने-मध्ये पायरीपायरीने शेवटाप्रत जायचे असते. त्यात मंथ वा शीघ्र गती असते. कालाचे बंधन असते. अनुभव हा देता घेता येत नाही. तो बक्षिसासारखा देता येत नाही. ज्ञानासारखा किंवा माहितीसारखा मिळवता येत नाही किंवा शब्दांनी त्याचे स्वरूप जसेच्या तसे सार्थपणे स्पष्ट करता येत नाही. तो निवळ अभ्यास नाही की परीक्षा देऊन पास होता येईल. समाधानाचे शास्त्र निराळेच आहे; तो अनुभव आहे. ईश्वर, सत्य, आनंद, ज्ञान, साक्षात्कार वा आत्मदर्शन या गोष्टी अनुभवाशिवाय कळल्या, जाणल्या, समजल्या असे म्हणणे फोल आहे. ती निवळ अज्ञानांधःकारात केलेली बौद्धिक कसरत होईल, पांडित्याचे आपण घेतलेल्या शिक्षणाचे, केलेल्या पठंतीचे ते केवळ पोकळ नि अहंकारी दंभाने भरलेले पुस्तकी ज्ञानाचे प्रदर्शन होईल. पेंढा भरलेला सिंह, सिंहासारखा दिसला तरी तो पशूंचा राजा गजेंद्र होऊ शकत नाही. तीच स्थिति शाळा–कॉलेजातून मिळविलेल्या ज्ञानाची–त्यात मिळविलेल्या प्रावीण्याची. त्याने वरवरचे ज्ञान होईल, उदर भरण्या-करिता त्याचा उपयोग होईलही, नव्हे ते आवश्यकही ठरेल पण त्याने अनुभवाचा ओझरताही स्पर्श होणे शक्य नाही. शिकलेला मनुष्य हा जास्त असमाधानी असायचाच. नारळाचे पाणी जितके गोड तितकी खोबऱ्याची चव कमी. जेवढी विद्वत्ता जास्त तेवढी निष्ठा कमी. विद्वान लोकांना कल्पना जास्त स्फुरतात. फार चिकित्सा करण्याने नुकसानच होते. म्हणून चिकित्सा मर्यादेतच असावी. कल्पनेचे खरे-खोटेपण अनुभवांती कळते म्हणून अनुभवानंतर कल्पना थांबली पाहिजे. गाण्यात नाव मिळवण्याकरिता तयारी करायची तर त्याला

गाण्याचा शिक्षक लागतो. ती प्रक्रिया आहे. तिथे प्रगती कालानुरोधाने मोजता येते. हाच नियम इतर सर्व शिकण्याला लागू आहे. योग हे मुद्धा एक दृश्यरूप शिक्षण आहे. त्यातला अभिज्ञ योगिराज, पाहणारांना विस्मयचकित करणारे कित्येक प्रयोग आपल्या योगसामर्थ्याने करू शकेल. पण म्हणून तो आत्मदर्शनाचा अनुभव देऊ शकेल असे मात्र नाही. योगी असूनही आत्मसाक्षात्कार झालेला असेलच असे नाही. तसेच योगविद्येचा गंध नसताही एखाद्याला आत्मसाक्षात्कार होईल. यावरून तरी लक्षात येईल की साधनेने साक्षात्कार प्राप्त करून घेता येणार नाही. अंतरंगात डोकावणे, निरीक्षण आणि श्रद्धा यात मानवाचे जीवन संपूर्णतया तात्काल बदलून टाकण्याचे, असीम सामर्थ्य आहे. त्या अंतरंगातील हालचाल आणि कोलाहाल यात पदार्पण करताच तुम्ही फक्त वर्तमानकाळात वावरतां. तुम्हाला भूतकाल नि भविष्यकाल उरतच नाहीत. परंपरेचे लोढणे किंवा संकल्प-विकल्पाचे घोर मनाला उरत नाहीत !

"म्हणून, तुम्ही आपल्या, मनाच्या सूक्ष्मात सूक्ष्म हालचालींचे दर्शन करून घेवून निरीक्षण करायला हवे. सुख व शांती हे ध्येय सामोरे ठेऊन तुम्ही सारा जन्म असीम कष्ट केलेत, आपण कुणीतरी आहोत,काहीतरी आपणाला मिळवायचे आहे या भावनेने धडपडलात. सुख नि शांती मिळविण्याच्या अपेक्षेत सारे फुकट गेले हे तुम्हाला आता समजायला हवे. तुमच्या पदरी आले काय तर फक्त 'अहंकार,' 'मी.' जो जो जीवनात कमाई अधिक तो तो अधिकाधिक प्रमाणात 'मी' चे दंभस्वरूपच फक्त फोफावत गेले. त्याने साऱ्या शरीराचाच नव्हे तर सगळ्या भावभावनांचा, मनाचा नि जाणीवांचा ग्रास घेतला; त्या सर्वांवर आपले अधिराज्य स्थापले. डोळ्यावर त्यामुळे सूज नि झापड येऊन कोणतीही गोष्ट यथातथ्य दिसेनाशी झाल्याने प्रामाणिकपणे समजावून घेणे किंवा योग्य पद्धतीने विचार करणे अशक्यच होऊन बसले. या बदलाने तुम्ही तुमचे केवढे नुकसान करून बसला आहात हे जरा पाहा. खरे सुख आणि, तुम्ही स्वतः, यामध्ये,

या सर्वांमुळे केवढी अनुलंघ्य भिंत उभी राहिली आहे याचा जरा विचार करा. तुम्ही प्रामाणिकपणे विचार करायला सुरुवात केलीत, मनाच्या आंतरिक हालचालीचे निरीक्षण आरंभलेत तर कारणे नि त्यांचे परिणाम यांचे सुस्पष्ट दर्शन तुम्हाला आपोआप घडेल. दंभ वितळू लागेल, नि 'अहं' कार जसजसा कमी होईल तसे हलके हलके वाटेल. तुमच्यापुढील समस्या चुटकीसरशा सुटतील. इतरांची मदत घ्यावी न लागता, अडचणीतून बाहेर पडण्याचा मार्ग दिसू लागेल. 'दंभ' स्फोट झाल्याने, अहंकार नाहीसा झाल्याने, जीवनात अडचणी नि प्रश्नच उद्‌भवणार नाहीत.

"तुम्हाला जेव्हा शांतता हवी असते तेव्हा तुम्ही आपल्या परिसरातील आवाज करणाऱ्या गोष्टींना फाटा देता किंवा त्यांची तोंडे उघडणार नाहीत अशी काळजी घेता. तीच गोष्ट आंतरिक शांततेची आहे. ती शांतता विघडवणाऱ्या गोष्टी–घटना–विचारांचा शोध घ्या, त्यांना मनातून हाकून लावा. सर्व गोष्टी विचारपूर्वक समजावून घेण्यानेच हे साधणार आहे; जाणीवपूर्वक, प्रामाणिकपणे, नि खऱ्या तळमळीने विचार केल्याशिवाय या जगात कुणीही काही साधलेले नाही. सुखाचा शोध जर तुम्ही प्रामाणिकपणे व मनाच्या खऱ्याखुऱ्या टोचणीने करायला सुरुवात कराल, मन:शांतीकरिता मनांतर्गत बाबींचा शोध घ्याल तर सुखासमाधानाच्या आड येणारी कारणे तुम्हाला सहज दिसतील. कारणे सापडली की ईप्सित साधलेच. मग तुम्हाला गुरुची किंवा एखाद्या साधनामार्गाची गरज वाटणार नाही. मला वाटते, मी माझ्या कुवतीप्रमाणे तुम्ही उपस्थित केलेला मुद्दा व्यवस्थितपणे विशद केला आहे, आणि माझे म्हणणे तुम्हाला समजले असेल."

गंभीर शांतता सर्व दिवाणखान्याभर पसरली होती. जो तो मनातल्या मनांत गुरुदेवांच्या भाषणाबद्दल गंभीरपणे विचार करीत होता. आणखी प्रश्न विचारले गेले नाहीत. किंचित् थांबून गुरुदेव उठले. आम्हीही त्यांना वाट दिली. थोड्याच वेळात दिवाणखाना

मोकळा झाला. बाहेर माझा मित्र आपल्या पत्नीसह माझी वाट पाहात होता. भारल्यासारखी ती दोघे, गुरुदेवांबद्दल बोलू लागली, "गुरुदेव म्हणजे खरोखरच मोठे महंत असून, निःसंशयपणे सद्गुरु आहेत." त्यांची इच्छा होती की गुरुदेवांना आपल्या घरी बोलवावे, नि त्या दृष्टीने मी त्यांना मदत करावी. गुरुदेवांच्या आवडीनिवडीची मला तितकीशी ओळख नसल्याचे कबूल करून मी म्हटले; ते निमंत्रण स्वीकारतील वा नाही ते मला निश्चितपणे काहीच सांगता येत नाही. दुसऱ्या दिवशी मी हा विषय गुरुदेवांशी अवश्यमेव काढीन नि तुम्हा उभयतांच्या वतीने त्यांना आमंत्रण देईन, असेही त्यांना मी आश्वासन दिले.

## १०

श्री. चेट्टियार यांचे स्नेही श्री. मुदलियार यांच्या घरी त्या रात्री बोलावणे होते. श्री. मुदलियारही एक धनिक उद्योगपती होते. आमचे चांगलेच आदरातिथ्य झाले. उपाहाराशिवाय गुरुदेवांच्या मनरंजनाकरिता संगीताचाही कार्यक्रम आयोजिला होता, नि गुरुदेवही त्यात रंगून गेले होते. घरी परतायला बरीच रात्र झाली होती. दुसऱ्या दिवशी सकाळीच माझे स्नेही सपत्निक गुरुदेवांच्या दर्शनाला आले होते. मी उभयतांना गुरुदेवांच्या खोलीत घेऊन गेलो. आम्हाला पाहाताच ते म्हणाले, "तुम्ही कशाला आला आहात ते मी ओळखले आहे. जडान्नाची मला सवय नसल्याने पक्वान्नादि खाणेपिणे माझ्या प्रकृतीला मानवत नाही. तरी तुमची निराशा करण्याची मला इच्छा नाही, मी दूध पचवू शकतो नि तेच कपभर घेण्याकरिता एके दिवशी तुमच्याकडे मी अवश्य येईन." माझ्या मित्राच्या पत्नीचा फारच आग्रह पडला म्हणून त्याच दिवशी सायंकाळी जाण्याचे गुरुदेवांनी कबूल केले; नि मलाही त्यामुळे जरा हायसे वाटले. त्याच वेळी मित्र-

वर्य श्री. मुदलियार यांच्यासह श्री. चेट्टियारही खोलीत आले. सर्वांचा चहा-फराळ गुरुदेवांच्या खोलीतच झाला. चहा घेत असता श्री. मुदलियार म्हणाले, " गुरुदेव, तुमची गेल्या काही दिवसांची वक्तव्ये मी मन लावून ऐकत आहे. पण आम्हां सर्वांचीच जीविते काहीतरी आमिषे नि ईप्सितांनीच चालली आहेत, असा जो तुमच्या बोलण्यात ध्वनी निघतो त्याच्याशी मी सहमत होऊ शकत नाही. स्पष्टच बोलायचे तर आम्ही संसार करतो, मित्रमंडळींना मदत करतो, दानधर्म करतो, सामाजिक कार्यही करतो ते काय त्यापासून आम्हाला काहीतरी मिळावे याच केवळ अपेक्षेने करतो. स्वार्थच असतो की काय हे सर्व करण्यात ?"

गुरुदेव म्हणाले, " प्रामाणिकपणे विचार कराल तर तुम्हाला आढळून येईल की तुमच्या प्रत्येक प्रयत्नात आणि कष्ट करण्यात काहीतरी अपेक्षा नि स्वार्थच दडलेला असतो. फार कशाला, तुम्हाला तुमच्या पत्नीकडून काही अपेक्षा असतात, मुलांकडून असतात, नि त्यांनी तुम्हाला अपेक्षित सुख द्यावे अशी तुमची स्वार्थी दृष्टीही त्यात असते. त्यात जरासे न्यून आले तर तुमचे स्वास्थ्य बिघडते. तुम्ही निराश होता, तुम्हाला राग आल्याशिवाय राहात नाही नि तुमची उपेक्षा होत आहे असंही वाटल्यावाचून राहात नाही. तुम्ही तुमच्या कुटुंबाबाबत नि कौटुंबिक जीवनाबाबत निश्चित असे आराखडे योजलेले असतात. त्यानुसार कुटुंबातील हरएक व्यक्तीने वागायला हवे अशी तुमची अपेक्षा असते. कारण, तुमची अशी महत्त्वाकांक्षा असते की कुटुंबात जे कुणाला होता आले नाही ते नि तसे कोणीतरी आपण व्हावे. जे कुणाला मिळाले नाही ते आपल्याला मिळावे. तुम्ही आपले कुटुंब चालवता ते निरपेक्षपणेच असे छातीठोकपणे तुम्ही म्हणू शकाल काय ? तुमच्या कुटुंबाबावत तुम्ही काही तरी अपेक्षा बाळगून असताच, नि त्या पुऱ्या व्हाव्यात यात तुमचा आनंद साठवलेला असतो. नेमक्या या अपेक्षांमुळेच प्रीतीतला सगळा आनंद तुम्ही गमावता. प्रेम हे उदात्त पवित्र अन् साधे असते. त्याचा

आधार भोग किंवा अपेक्षा हा नव्हे. तुम्ही जी प्रेमाची भाषा बोलता ना, त्यात फक्त परस्परांच्या सोईकरिता पत्करलेले बंधन असते. एकमेकांच्या महत्त्वाकांक्षा, अपेक्षा नि स्वार्थ पुरा करण्याकरिता तुम्ही मित्रांना मदत करता, दानधर्म करता, सामाजिक कार्यसुद्धा. पण कबूल करा अगर नका करू, त्यापासून आपणाला कीर्ती, नाव, सामाजिक प्रतिष्ठा, तुमच्या चांगल्या कार्याबद्दल जनतेकडून वाहवा अगर जाणीव, निदान उपकृत झाल्याची कबुली यांची अपेक्षा तुम्हांला असतेच. तुमच्या सत्कार्याची या प्रकारची संभावना झाली नाही तर तुमचा अनादर झाल्यासारखे तुम्हाला वाटते. त्यामुळे एक प्रकारची निराशाही तुमच्या मनाला ग्रासते. उपकृत झालेला जेव्हा आपल्या कृतीने वा शब्दाने तुमच्या मदतीची पावती देतो तेव्हाच तुम्हांला खराखुरा आनंद वाटतो. तुमच्या देणगीचे जेव्हा जनतेकडून कौतुक होते किंवा तुमच्या दानधर्माचा जेव्हा उदोउदो होतो, तेव्हाच तुम्हाला अंगावर मूठभर मास चढल्यासारखे वाटते. तुमचे देवदर्शन, तुम्ही देवाला अर्पण केलेल्या देणग्या अगर दागदागिने, वस्त्रप्रावरणे, किंवा यज्ञादि पूजासमारंभात केलेले हवन–दानधर्म–अन्नसंतर्पण यातही तुमच्या ईश्वरभक्तीचा डांगोरा पिटण्याचा, गाजावाजा करण्याचा हव्यास दडलेला असतोच. तुम्ही तुमच्या कृतींचा, भाव-भावनांचा, मानसिक प्रवृत्तींचा कानोसा घ्या. मी म्हणतो ते खरे आहे असेच तुम्हाला आढळून येईल. म्हणून माझे आग्रहाचे सांगणे आहे की तुम्ही एकदा प्रामाणिकपणे आत्मसंशोधन करा म्हणजे माझ्या बोलण्याचा तुम्हाला पडताळा आल्याशिवाय राहणार नाही. वाढते वय. अनुभव, यश, पैसा नि सामाजिक प्रतिष्ठा इत्यादींनी प्रत्येक मनुष्यात 'मी' रूपी अहंकारच जास्ती जास्ती फुलवला जातो. आणि तोच प्रत्येक स्त्री पुरुषाच्या जीवनातील प्रामाणिक समजूतदारपणा, आनंद सुख, शांती, प्रेम फार काय जीवनात जे जे भव्य अन् उदात्त आहे त्याच्या आड येतो."

मृदुला तिच्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे गडबड करीत रवीन्सह

खोलीत आली. गुरुदेव बोलण्याचे थांबले. सर्वांचे तिच्याकडे लक्ष वेधले. गुरुदेवांसमीप बसत ती म्हणाली, " गुरुदेव, माझी तुमच्या विरुद्ध एक मोठ्ठी तक्रार आहे. तुम्ही संत आहात नि सद्गुरुही. तुम्ही नेहमी म्हणता की आमच्यावर तुमचे प्रेम आहे. मीही तुम्हाला माझ्या लहानपणापासून ओळखते. पण तुम्ही आम्हाला काहीही दिलेले नाही की शिकवले नाही. आमचे स्नेही नि परिचित आम्हाला नेहमी विचारतात, 'गुरुदेवांच्या सान्निध्यात तुम्हाला काय मिळाले; तुम्ही काय शिकलात.' मोठ्या शरमेने आम्हाला खाली मान घालून कबूल करावे लागते की गुरुदेवांपासून आम्हाला काहीही मिळाले नाही. तुमचे प्रेम नि आशीर्वाद आम्हाला आहेत याबद्दल आमच्या-सारखे आम्हीच भाग्यवान असं आम्ही समजतो. पण, त्यापलिकडे भरभक्कम, लोकांना सांगण्या–दाखवण्यासारखे असे आमच्या वाटयाला काय साध्य झाले आहे ? तुमच्या दृष्टीने तुमच्या पासून ग्रहण करण्यास आम्ही योग्य नाही असे का तुमचे आमच्याबाबत मत आहे ? की तुम्ही आम्हाला काहीच देऊ इच्छित नाही की काही शिकवू इच्छित नाही ? "

गुरुदेव मोठ्याने हसले. तिच्या प्रांजल व मनमोकळ्या स्वभावाचे आम्हास कौतुक वाटले खरे; पण त्याहीपेक्षा तिच्या सरळ-सरळ रोख-ठोक प्रश्नाने आम्ही सर्वजण किंचित हादरलोच. गुरुदेव म्हणाले, " खरोखरच तू मोठी चिमखडी पोरगी आहेस. तू फक्त वयाने मोठी झालीस पण शहाणपणाच्या नावाने पूज्य ! तू मागितलेस नि ते मी दिले नाही असे काय आहे नि कधीतरी तसे झाले आहे काय ? याचे मला आधी उत्तर दे ! तू लहान होतीस तेव्हा माझ्या अंगाखांद्यावर तुला मी खेळवलेय. तू नि रविन् यांच्या बरोबर मी खेळलो आहे नि जे जे तुम्ही मागितले ते मी दिलेही ! तुझ्या डोक्यात कुणी हे काय वेड भरून दिले आहे, कोण जाणे ! " श्री. चेट्टियार मध्येच बोलणार तो त्यांना थांबवून गुरुदेव म्हणाले, " बोलू द्या तिला. मला तर हे फार आवडले !" मृदुला म्हणाली, " म्हणजे

तुम्ही मला नि रविन्‌ला एक प्रकारे फसवले असंच ना ? ज्याला शाश्वत नि चिरस्थायी म्हणता येईल असे तुम्ही आम्हाला काहीही दिलेले नाही. तुम्ही आम्हाला अजूनही कुक्कुली बाळेच समजता आहात; नि आम्ही आता मोठे झालो आहोत असंही तुम्हाला वाटत नाही तर ! " गुरुदेव म्हणाले, " अच्छा तर मग, मोठी बाळे समजून तसं तुमच्याशीं बोलतो. तर मग झालं ? तुमच्या या वयात, सर्वसाधारण माणसाला आयुष्यात जे जे हवेहवेसे वाटते ते ते सर्व काही तुम्हाला मिळालेले आहे. तुमचे जन्मदाते आईबाप चांगले श्रीमंत आहेत, तुझे लग्नही धनाढ्य, सुशिक्षित तरुण व सुंदर मुलाशी झाले आहे. तो तुझ्यावर अति प्रेम करतो तेव्हा वैवाहिक जीवनातहि तू सुखी आहेस. तुझी प्रकृती उत्तम आहे नि मला विचारशील तर थोड्याच दिवसांत छानसे बाळसेदार बाळ होणार आहे एका माण-साला !" आम्ही सर्वच जण हसलो. मृदुलाच्याही गालावर रक्तिमा पसरला. ती म्हणाली, " माझी थट्टा करू नका हं ! मी खरोखरच गंभीरपणे विचारीत आहे. माझी तुमच्याविरुद्ध अगदी खरोखरीच सार्थ तक्रार आहे नि तुम्ही काहीतरी मला दिल्याशिवाय माझे समाधान होणार नाही."

गुरुदेव म्हणाले, " सांग बरं, तुला काय हवं आहे ते ! असं काय घडलं आहे की तुला दुःखी नि असुखी वाटायला लागले आहे ? कशाबद्दल तुझ्या मनात असमाधान खटकत आहे ? खरं सांगू ? मालकीची भावना, जास्त मिळविण्याचा हव्यास, सत्ता, सामाजिक प्रतिष्ठा, मानमरातब व सर्वाधिकार या नि अशासारख्या गोष्टींना जीवनात शेवट नाही; कारण, यांच्या बाबतीत समाधानाचा सर्वोच्च बिंदूच अस्तित्वात नाही की तिथे मनुष्य थांबेल. बोटीतून प्रवास करायचा तर ती डोलणारच, हालणारच. त्यामुळे मळमळ, ओकाऱ्या येऊन अस्वस्थ वाटणारच, बोट ही लागायचीच. त्याचप्रमाणे ऐहिक जीवनात कटकटी या असायच्याच. त्यांना चुकविता येणार नाही. जोपर्यंत हे शरीर आहे तोपर्यंत त्याच्या व्याधीही आहेतच. तुम्ही

विवाहबद्ध झालांत आणि मूल व्हावे असे इच्छिता; मग डोहाळ्यांचा त्रास नि प्रसूति–वेदना तुम्हाला टाळता कशा येतील ?"

मृदुला म्हणाली, "तुम्हाला काय म्हणायचं आहे ते समजले मी; नि मला आता खात्री वाटते की, पूर्वीप्रमाणे केव्हाही, तुम्ही आमच्या अडचणीच्या वेळी, संकटसमयी नि अनिष्टकाळी आमच्या मदतीला धावून याल." तिच्या चेहऱ्यावरून हे स्पष्ट दिसत होते की ती जे बोलत होती ते मनापासून बोलत होती; खरं तेच बोलत होती. गुरुदेव म्हणाले, "एवढी जर तुला माझ्याबद्दल खात्री आहे, एवढा जर माझ्यावर विश्वास आहे मग तुला तक्रार करावीशी का वाटली ते नाही समजलं मला." रविन् म्हणाला, "गुरुदेव, मृदुला म्हणाली तेच बरोबर. तुम्ही आम्हांला अजून कुक्कुली बाळेच समजता नि काहीतरी सांगून आमची बोळवण करता झालं ! स्पष्टच बोलायचं तर तुम्ही आम्हाला अजूनपर्यंत असं काहीच दिलेलं नाही की, ज्याबद्दल आम्हाला विश्वास वाटावा, ज्याचा उल्लेख करण्यात आम्हाला आनंद व्हावा; आणि म्हणून मृदुलेची तक्रार बरोबर आहे." गुरुदेव म्हणाले, "तुम्हा दोघांच्याही मनाचा गोंधळ उडालेला दिसतो. तुम्ही दोघेहि काहीतरी मला विचारायला आला आहात हे निश्चित. पण, तो प्रश्न कसा विचारायचा, शब्दांकित कसा करायचा, हे तुम्हांला कळत नाही आहे. तुमचेच असे होते असे नाही तर बऱ्याचजणांची हीच स्थिती असते. ईप्सित स्पष्ट नसले ना, की प्रत्येकाचे हे असेच होते.

"तुझंच पाहा ना, तू काहीतरी विचारायला म्हणून आलास, म्हणजेच तुझ्याजवळ जे नाही ते तुला हवे आहे नि ते मागायला आला आहेस; किंवा असे म्हणू या पाहिजे तर की तुला काहीतरी व्हावेसे वाटते की जे तू नाही आहेस. यावरून हे स्पष्ट आहे की आज आहे या परिस्थितीत तू सुखी नाहीस. तेव्हा मला असं सांग, असं काय आहे की ज्याने तुला असमाधान वाटते; किंवा तुझ्या सध्याच्या जीवनात असे कोणते न्यून आहे की त्यामुळे तुला जीवनात बदल व्हावा असं वाटतय ? 'अतिपरिचयात् अवज्ञा' या

न्यायाने, कदाचित् दीर्घकालीन सान्निध्याने असेल, किंवा तू सतत भोगत असलेल्या ऐपआरामातून व समृद्ध जीवनातून तुला जो एक चित्तथरारक अननुभूत अनुभव हवा-हवासा वाटतो आहे तो आता कशात जाणवत नाही म्हणून असेल, कोणत्या गोष्टीमुळे वा कारणाने का होईना सद्य:स्थितीत तुला असमाधान वाटते आहे. ज्यामुळे तू जीवनात बदल करू इच्छितोस ते कारण तुझे तूच शोधायला हवेस. तुला वाटत असेल की मी तुला आध्यात्मिक गूढवादाचे धडे द्यावेत तर मी स्पष्टच सांगतो की ते तुझ्या वयाला झेपणारे नाहीत, की तुझ्या प्रकृति–स्वभावाला ! ''

चेट्टियार यांनी विचारले, '' आम्हाला गूढवादाचे धडे द्या म्हटले तर काहीतरीच होईल का हो ? '' गुरुदेव म्हणाले, '' छे, छे, तसंच काही नाही. अध्यात्म नि गूढवादाबद्दल जेव्हा सर्वसामान्य माणसे बोलतात ना, तेव्हा ते एक गोष्ट विसरतात की तेही एक शास्त्र आहे. त्यांची याबाबत एकच कल्पना असते की तो एक अतींद्रिय, काहीतरी अनैसर्गिक शक्तिसंपादनाचा मार्ग आहे इतकेच. त्यांना अध्यात्माबद्दल नि गूढवादाबद्दल फक्त आकर्षण असते ते एवढ्याच चमत्कारप्रदर्शनाच्या दृष्टीने. ह्या शक्ती तर खऱ्याच, पण त्या मिळविण्याकरिता किती वर्षांची खडतर तपस्या करावी लागते नि कितीक गोष्टींचा त्याग करावा लागतो याची त्यांना कल्पना नसते. मी सांगतो त्यावर विश्वास ठेवा, ज्यांनी ज्यांनी म्हणून अशा शक्ती संपादन केलेल्या आहेत त्यांनाही त्या संपादन केल्यावर त्यांबाबत कुतूहल राहात नाही नि त्यांचा ते त्याग करतात.

'' काय मिळवावे, किती मिळवावे, नि किती साठवावे याला परिमिती नाही. जसजसे मिळवीत जावे, साठवीत जावे, तो तो हव्यास वाढत जातो–विस्ताराने, नि तीव्रतेनेही ! अग्नीत तुपाची धार, असला प्रकार आहे तो. म्हणून तुम्हाला तुमच्या इच्छेच्या मुळाशी जाऊन त्याच्या उगमाचे कारण शोधून काढायला हवे. प्रत्येक इच्छा पुरी करण्याच्या धडपडीत, अहंकार नि दंभ वाढत जातो. 'मी'

ची भूक शमत नाही, नि अतृप्ती कायमच राहते. प्रामाणिकपणे विचार केला तरच हे कळून येते की सुख–समाधानाच्या अपेक्षेत कःपदार्थाकरिता आपण आपली सारी शक्ती नि हयात फुकट दवडली." गुरुदेव, मृदुला नि रविनकडे वळून म्हणाले, "हं, आता सांगा पाहू तुम्हाला निश्चितपणे काय हवे आहे ते !"

मृदुला नि रविन काही बोलली नाहीत. गुरुदेवांच्या साध्या पण सुस्पष्ट भाषणाने ती दोघे गोंधळलेली होती. मुलांना धुत्कारण्याकरिता गुरुदेवांनी तो प्रश्न विचारला नसून खरोखरच कळकळीने त्यांनी तो प्रश्न दोघांना विचारला होता. त्याचबरोबर गुरुदेवांसारख्या सत्पुरुषाने तुला काय पाहिजे असे विचारताच निश्चित उत्तर देणे किती कठीण आहे याचीही मला पुरेपूर कल्पना आली. येवढ्या महान व्यक्तीकडून मामुली काहीतरी मागून घेणे किती हास्यास्पद आहे नाही ? मृदुला व रविन–उभयतांजवळ पैशाला तोटा नव्हता; नि पैशाने जी सुखे मिळवणे शक्य ती त्यांच्यासमोर हात जोडून उभी होती. गुरुदेवांनी हाच प्रश्न मलाही विचारला असता, तर मला वाटते, तत्क्षणी निर्णय घेणे नि उत्तर देणे मलासुद्धा अशक्यच झाले असते. निरामय शरीर नि मनाचे समाधान व शांती पैशाने विकत घेता येत नसते. तेव्हा त्या प्रश्नावर खोलवर विचार करायलाच हवा.

श्री. चेट्टियार म्हणाले, "माफ करा गुरुदेव, पण ज्याला कशाचीही कमतरता नाही, कसलीही गरज उरलेली नाही, नि त्यामुळे जो संपूर्ण समाधानी आणि आनंदी आहे असा माणूस शोधून तरी दाखविता येईल का ?"

गुरुदेव म्हणाले, "असे कितीतरी आहेत की ज्यांना मी स्वतः ओळखतो ! ते अप्रसिद्ध आहेत. कारण, त्यांच्या गरजा अत्यल्प आहेत; नि ते काही इच्छित नाहीत, म्हणून ते ना पैशाच्या पाठीमागे ना कशाचा संग्रह करून ते जमविण्याचा हव्यास असलेले. ते ना कुणाची स्तुती करतात, ना कधी कुणाची मेहेरबानी संपादन करण्या-

करिता त्यांना आपली जागा सोडून जावे लागते; नि म्हणूनच त्या व्यक्ती तुम्हाला अज्ञात असतात.

" व्यक्तिश: मला तरी कशाची गरज आहे ? नि मला काही हवे असे मी तरी कुठे म्हणतो? त्यामुळे दु:खी नि असमाधानी होणें म्हणजे काय हे मला माहीतच नाही. माझी मन:शांती कधीही ढळत नाही. तुम्ही मला संत म्हणा अगर ढोंगी-लफंगा म्हणा, मी तुमच्यासारखाच एक साधासुधा माणूस आहे. माझ्याजवळ गमावण्यासारखे काही नाही की काही मिळवण्यासारखे ! मला ना धर्म, जात, पंथ, वा मते ! ना एखादा 'वाद', की ज्याचा प्रचार मी करू इच्छितो व त्याला मी घट्ट धरून बसू इच्छितो. ईश्वराने जे जे निर्मिले आहे त्यामध्ये नि माझ्यामध्ये कुठे कसला आडपडदा अडथळा मला भासतच नाही.

" मला भिण्यासारखे काहीच नसल्यामुळे मी निर्भय आहे. जे नाहीसे व्हायचे--अशाश्वत आहे--त्याबद्दल खंत नि खेद वाळगण्यासारखे काय आहे ? या जगात प्रत्येक गोष्ट नाहीशी व्हायची आहे. तिचा अंत केव्हा नि किती वेळाने व्हायचा हा काळ नि वेळेचा प्रश्न, केवळ निसर्गनियमनाने ठरायचा असतो इतकेच. उदाहरणार्थ, भाजी काही तास किंवा फार तर एकाद दुसरा दिवस टिकेल. पण टणक वस्तू त्यापेक्षा जास्त दिवस राहील. मानवी शरीरालाही हाच नियम लागू आहे; हे जर माणसाला नीटपणे कळेल तर मानवी शरीर मर्त्य आहे तेव्हा त्याच्याबद्दल सुखदु:ख वा फार फिकीर करण्याची जरूर नाही हे त्याला कितीतरी लवकर समजेल ! शरीराची काळजी घेणे इष्ट आहे हे मी नाकबूल करीत नाही पण कुठपर्यंत ? जोपर्यंत शरीर आत्म्याची गरज भागवते आहे तोपर्यंतच; त्यापलिकडे नाही. तुम्ही कपड्याची निगा कोठपर्यंत ठेवता ? जोपर्यंत ते घालण्यासारखे आहेत तोपर्यंतच. जीर्णशीर्ण झाले की टाकूनच देतो ना ते आपण ? तुमच्या लक्षात आले असेल की मला कशाचीही भीती वाटत नाही. त्यामुळे मी असमाधानी नाही व म्हणूनच माझी मन:शांती ढळू

शकत नाही. माझ्यात ढळण्यासारखेच जर काही नाही तर मला विघडवण्याचे सामर्थ्य आहेच कशात? त्यामुळे माझे मनःस्वास्थ्य कधीही नि कशानेही विघडत नाही. मी म्हणतो ते जर तुम्ही थोडेसे जरी समजू शकलात तरीही मी म्हणेन पुष्कळच झाले."

जेवण चालले असता गुरुदेवांनी मला मुंबईला त्याच रात्रीच्या गाडीने जाण्याची तयारी ठेव असे सांगितले नि त्याकरिता मित्रमंडळींना भेटायचे असेल किंवा कांही खरेदी करायची असेल तर ती उरक असे सांगितले. माझ्यासकट सर्वांनाच गुरुदेवांच्या या आदेशाचे आश्चर्य वाटले. मला कळेना, गुरुदेवांच्या सेवेत माझ्या हातून काही चूक झाल्याने ते रागावले आहेत, की माझ्या सेवेची त्यांना आता गरज उरली नाही. त्यांना माझ्या मनातील विचार तर कळले नाहीत ना! कारण ते म्हणाले, "तू गैरसमज होऊ देऊ नकोस. मला तुझा कंटाळा आला आहे असंही नाही; की मी तुझ्यावर नाराज झालो आहे हेही खरे नव्हे. परंतु, तुझ्या आई-वडिलांना तुझी तातडीची गरज आहे, नि म्हणून तुला जायलाच हवे." जेवणानंतर मी तडक माझ्या खोलीत गेलो नि सामानसुमान आवरून बांधाबांध केली. मृदुला नि रविन् यांचाही अपेक्षाभंग झालेला दिसला. ती दोघे माझ्या पाठोपाठच खोलीत आली नि "खरोखरच मी सामानाची बांधाबांध करतो की काय" असे त्यांनी विचारले. मी म्हटले, "हे पाहा, गुरुदेवांच्यावर माझा विश्वास वाढत चाललेला आहे. ते सांगतील ते माझ्या हिता-चेच याची मला खात्री असल्याने, त्यांच्या आदेशाप्रमाणे वागण्याचे मी ठरवले आहे. त्यांची बडदास्त ठेवायला म्हणून मी त्यांचेबरोबर मद्रासला आलो. त्यांनी म्हटले, 'मी जायला हवे' म्हणजे मी जायलाच हवे. माझी रवानगी का होते आहे हा प्रश्नच उद्भवत नाही नि तसा प्रश्न मी विचारू शकत नाही, इच्छितही नाही. त्यांच्या आदेशाबद्दल मला संदेहच नसल्याने त्या आदेशाप्रमाणे वागा-यचे एवढेच मला समजते. तुमच्या गोड सहवासाला मुकावे लागतेय

याबद्दल मला फार वाईट वाटते. तुमच्या घरातील प्रत्येकाने माझे जे आतिथ्य केले ते मी कधीही विसरणार नाही." सौ. चेट्टियार पति–पत्नीही खोलीत आली, नि इतक्या थोड्या वेळात, आकस्मिकपणे त्यांना सोडून जावे लागणार असल्याबद्दल वाटत असलेली हळहळ त्यांनी व्यक्त केली. पुढच्या वेळी जेव्हा मी दक्षिणेत येईन तेव्हा मद्रासला जरूर येईन; नि त्यांच्याकडेच राहीन असा दिलासा मी त्यांना दिला. शहरात जाऊन मामुली खरेदी करायची होती ती केली, मित्रमंडळींना भेटलो, त्यांचा निरोप घेतला नि घरी सायंकाळी परतलो. मी गुरुदेवांना त्यांच्या खोलीत भेटलो. ते मद्रासमध्येच आणखी काही दिवस राहणार होते. माझ्या वागण्याबोलण्याबाबत त्यांनी आपले समाधान व्यक्त केले. त्यांनी अशीही ग्वाही दिली की जेव्हा जेव्हा जरूर पडेल किंवा अडचण येईल तेव्हा तेव्हा नुसत्या माझ्या निवळ इच्छेनुसार ते असतील तिथून केव्हाही धावून येतील. तेव्हा माझ्यापासून ते दूर आहेत अशी भावना मी कधीही बाळगू नये. त्यांनी हेही सुचविले की, त्यांचे माझ्याकडे सदैव लक्ष राहील; नि माझ्या हिताची ते सदैव काळजी घेतील. या आश्वासनाने माझे हृदय हेलावले नि मी त्यांच्या पायांवर नतमस्तक झालो. तेवढ्यात चेट्टियार खोलीत येऊन चौकशी करू लागले की, मुंबईला जायला मला काही पैशांची वगैरे गरज आहे की काय ? त्यांनी माझ्या हाती रेल्वेचे तिकीट व रिझर्वेशन स्लिप ठेवली. मी साभारपणे त्यांच्या देणगीचा इन्कार केला, नि तिकिटाचे पैसे मी देऊ लागलो तर ते घेईनात. मोठ्या मिनतवारीने मी त्यांची खात्री पटवू शकलो की माझी सुस्थिती असल्याने, माझ्याजवळ पुरेसे पैसे असून मी मुंबईपर्यन्त जाण्याचा प्रवासखर्च सहज करू शकतो. आम्ही बोलत असता नोकराने खोलीत येऊन तार माझ्या हाती दिली. मी घाईघाईने लिफाफा फोडला. वडिलांची प्रकृती अस्वस्थ असल्याने तातडीने मुंबईला परतण्याबद्दल भावाने लिहिले होते. गुरुदेवांच्या सायंकाळच्या गाडीने मुंबईला जाण्याच्या आदेशाचा

अर्थ आता आम्हा सर्वांना समजला. मी गुरुदेवांकडे पाहिले. ते म्हणाले, "मला माहीत आहे की आजारी वडिलांना भेटण्याकरिता मुंबईला येण्याबद्दल तुझ्या भावाचा संदेश आलाय्!" ते पुढे म्हणाले, "त्यांची प्रकृती थोड्याच दिवसांत बरी होणार असल्याने चिंता करण्याचे कारण नाही." त्यांच्या या आश्वासनाने मला कितीतरी हलके हलके वाटले. मी त्यांच्या पायांना स्पर्श केला, त्यांनी आशीर्वाद दिला. सर्वांचा निरोप घेऊन मी स्टेशनवर जाण्यास निघालो. मला निरोप द्यायला चेट्टियार कुटुंबातील सर्व मंडळी स्टेशनवर आली होती.

●●●



# साद देती हिमशिखरे ....

दुसरा भाग

# ९

माझा मुंबईपर्यन्तचा प्रवास आरामाचा झाला खरा; पण कंटाळवाणा वाटला. गुरुदेवांनी धीर देऊनहि, वडिलांच्या प्रकृतीबद्दल मला कमालीची काळजी वाटत होती. चोवीस तासांच्या त्या प्रवासाने मी अगदी थकून गेलो होतो. स्टेशनवर बंधू आले होते. त्यांनी सांगितले की वडिलांना हृदयविकाराचा झटका आला होता; पण आता ते पुष्कळच बरे आहेत झपाट्याने सुधारत आहेत. मी घरी पोचलो नि माता-पित्यांना भेटलो. कुटुंबातील आम्ही सर्वच एकत्रित जमलो होतो. वडिलांच्या दुखण्यातला धोका संपला हे ऐकून मला कितीतरी हायसे वाटले. ते खूपच खंगलेले दिसत होते. मी भेटताच त्यांना फार आनंद झाला. त्यांनी गुरुदेवांबद्दल चौकशी केली नि त्यांच्या सान्निध्यात वेळ कसा काय गेला हेहि अगत्यपूर्वक विचारले.

आम्ही मुंबईला साधारणपणे १५ दिवस असू. वडिलांच्या प्रकृतीत चांगलाच उतार पडल्याने परत अहमदनगरला जाण्याचे ठरत होते. गेल्या वर्षी, मुंबई सरकारकडे नोकरीकरिता मी अर्ज टाकला होता. ती वरची जागा पत्करून मी रुजू व्हायला सध्या मोकळा आहे की नाही याची चौकशी करणारे पत्रहि आम्ही अहमदनगरला जायचे त्याच दिवशी माझ्या हाती पडले. त्यात मला मुलाखतीला बोलावणे होते. पुढे काय करायचे हे ठरविलेले नसल्याने मी त्या नोकरीबाबत

फारसा उत्सुक नव्हतो. थारेपालट म्हणून मी आलेली नोकरी पत्करावी अशी माझ्या मातोश्रींची नि बंधूंची इच्छा होती. नोकरीला सुरुवातच केली की पुढे काय करायचे याबद्दल विचार करायलाही भरपूर वाव नि वेळ मिळेल असा त्यांचा विचार! आईचे तर असे म्हणणे की आलेल्या संधीचा फायदा घ्यावा म्हणजे आज जे भटके जीवन मी जगत आहे त्याला जरा स्थैर्य तरी येईल. माझी दक्षिणेची सफर, नि गुरुदेवांचे सान्निध्य, यामुळे माझ्या भवितव्याबद्दल माझे मन अस्थिर झाले होते. मी काहीही करीत नव्हतो हे काही खोटे नव्हते; नि असे आळशासारखे दिवस काढण्यात काही तात्पर्यहि नव्हते. म्हणून मी आईची सूचना शिरोधार्य मानून सरकारी नोकरी पत्करायचे ठरवले. ठरल्या दिवशी आई-वडील अहमदनगरला जाण्यास निघाले नि मी मागे मुंबईतच राहिलो. माझ्या निर्णयाने त्यांना समाधानच वाटले आणि मी पत्करीत असलेल्या नोकरीत मला सुयश मिळो असा त्यांनी आशीर्वादहि दिला.

मी ठरल्या दिवशी मुलाखतीला गेलो, नि मुंबई सरकारच्या सचिवालयात माझी नेमणूकही झाली. मुंबईतच मी कामावर रुजू झालो. प्राथमिक कामाची ओळख आणि चांचणीचा वर्ष-सहा महिन्यांचा काल संपल्यावर मला नोकरीत कायम करण्यात आले नि पुण्यास माझी बदली झाली. पुण्यात मी गोखलेकाकांकडेच राहात होतो; नि तसे मी केले यामुळे त्यांना बरे वाटले. त्यांच्या कुटुंबीयांचीही तीच भावना दिसली. या वेळेपर्यंत श्रीकांत बॅरिस्टर होऊन इंग्लंडहून परत येऊन प्रॅक्टिस करू लागला होता. वडिलांबरोबरच तो सहकारी म्हणून काम करू लागला. मालती पदवीधर झाली होती. ती मुग्ध बालिका नसून एक सुंदर तरुणी दिसू लागली होती. गोखले काका नि काकी आता वृद्ध दिसू लागली होती. काकाहि धंद्यातून जवळ जवळ निवृत्त झाले होते, नि श्रीकांतच बहुतेक कामे करीत होता. त्यांनी पुष्कळच माया साठवली असल्याने कशाची म्हणून त्यांना ददात नव्हती. फक्त या दोन्ही मुलांचे जीवित सुरळीत मार्गावर

लागले की झाले, एवढ्याच काळजीत ती उभयता होती. दोघांहि मुलांच्या लग्नाची स्थळे पाहणे चालूच होते. त्यांत मीही एक उपवधू म्हणून, त्यांच्या दृष्टीने, अत्यंत लायक स्थळ होतोच! गोखले काकांनी त्याप्रमाणे माझ्या वडिलांना पत्र लिहिल्याचेहि मला कळले होते; नि मी जे म्हणेन तो शब्द शेवटचा असा परस्पर हवाला वडिलांनी दिल्याचेहि मला समजले होते. मी नोकरी पत्करल्याकारणाने त्यांची अशी सार्थ समजूत झाली होती की जीवनांत स्थिर होण्याच्या मी विचारात आहे. तेव्हा 'स्थळ' म्हणून माझ्याबाबत त्यांच्या विचाराने पुन: उचल खाल्ली होती. परंतु, इतक्यातच लग्न करण्याचा माझा विचार नव्हता; आणि जरी मी मालतीला चांगला ओळखत होतो; नि ती मला आवडतहि होती, तरी जीवनसाथी म्हणून मी तिच्याबद्दल विचारसुद्धा करू शकत नव्हतो. का नि कसे हे मला सांगता येणार नाही, पण मला असेहि वाटत होते की तीही माझ्याशी विवाहबद्ध होण्यास तितकीशी उत्सुक नसावी. अर्थात या संबंधात, मी काय किंवा मालतीने काय, निश्चित नकार कधीच कुणी कुणाला दिला नव्हता. पण, एकमेकांच्या पसंतीची परिणती विवाह–बंधनात होण्याइतके आमचे प्रेम बोलकेही झालेले नव्हते; वा तिथपर्यन्त त्या आपुलकीची प्रगती झाली नव्हती, हे मात्र खरेच! आमचे लग्न झालेच तर ते एकमेकांना सुसह्य होईल इतकेच, असे मला वाटत होते. ते कितपत सुखदायी वा सुखवर्धक होईल हा प्रश्नच होता. ती एक प्रकारची सोडतच होती, जुगार होता. आमचे दोघांचेहि, त्या कालानुसार लग्नाचे वय झाले होते; नि व्यक्तिश: माझ्या बाजूने विचार करायचा तर विवाहबंधन का नको याचे समर्थनीय कारण माझे मलाच सांगता येण्यासारखे नव्हते. मालती माझ्याशी अगदी मोकळेपणाने वागत होती; पण या दृष्टीने मी जेव्हा तिचे मत अजमावण्याचा प्रयत्न केला तेव्हा ती अबोलच राहिली होती. माझा स्नेही रमेश हा आता डेक्कन कॉलेजातच प्राध्यापक झाला होता; नि त्याचे गोखलेकाकांकडे येणे जाणे पुष्कळ वाढले होते. माझी नि गुरुदेवांची

ओळख नि त्यांच्या सान्निध्यात मी घालविलेले दिवस यावर जेव्हा आमचे दोघाचे बोलणे झाले तेव्हा ती सारी हकीगत ऐकण्यात त्याला खूप कुतूहल आणि आनंद वाटत होतासे दिसले. मात्र गोखलेकाका, काकू नि मालती यांना मात्र गुरुदेवांबद्दल मला वाटणारे प्रेम नि ओढ तितकीशी पसंत होतीसे दिसले नाही. स्वामीजी नि गुरुदेव यांच्या-बाबत वाजवीपेक्षा जास्त जवळीक मी बाळगतो आहे नि त्याचा शेवट मी त्यांच्याच मार्गाने जाण्यात होणार अशी भीती त्या तिघांच्या मनात उत्पन्न झाली असावी, अशी मला जबरदस्त शंका येत होती. मी शक्य तितक्या लवकर लग्नाचा विचार करावा, नि कोणत्याही सबबीवर आता मी लग्न लांबणीवर टाकू नये, असे माझ्या मनावर बिंबवण्याचा प्रयत्नही त्यांच्याकडून झाला. माझ्याच दर्जाचा सरकारी अधिकारी पुणे कँप मध्ये सरकारी बंगल्यात राहत होता, तो त्याने सोडल्यामुळे बंगला रिकामा झाला होता. मला तो देण्यात आला तेव्हा, का नकळे, मला बरे वाटले. फर्निचरसह सुसज्ज मोठा बंगला, नि जागोजागी नोकर माणसे असल्याने मला तिकडे जाऊन राहणे फार आवडले. माझे घर लावून देण्याकरिता आई नि वडीलही माझ्या-जवळ राहायला पुण्यात आले होते. माझी अशीही भावना आहे की गोखलेकाकांचे घर मी सोडल्याने मालतीलाही बरे वाटले असावे. आम्हां उभयतांच्या विवाहाबाबत तिच्या माता–पित्यांच्या विचारांचा दबावही कदाचित तिला असह्य झाला असेल. सरकारी कामाच्या भाराने मी अगदी दडपून गेलो होतो. त्यातच नोकरीत मिळावयाच्या पुढच्या बढतीकरिता आवश्यक असलेल्या खात्याच्या परीक्षेची तयारी करण्यात मी चूर होतो. तशातही गुरुदेव नि त्यांची शिकवण याबद्दल विचार करायला मला वेळ सापडत होता. मद्रासला असताना गुरु-देवांनी सांगितलेला–प्रामाणिक विचार करणे नि मनाच्या आंतरिक हालचालींचे निरीक्षण करणे–याचा माझा अभ्यास सतत चालू होता. परिणामी काय होईल याची मी फारशी फिकीर करीत नव्हतो. जीवनातील अनेक कूट प्रश्नांची उकल करण्याचे सामर्थ्य सतत

विचार-प्रबोध नि आत्मसंशोधन यात आहे नि त्यातूनच सुख व समाधान आपोआप मिळते, या गुरुदेवांनी शिकवलेल्या साधन मार्गाच्या खरेपणाचा पडताळा मला येऊ लागला होता. प्रामाणिक विचारसरणी आणि निरीक्षण यांनीच जगांतील अर्ध्याहून अधिक प्रश्न सुटून जगातील कितीतरी घोटाळे, तज्जन्य समस्या नि मानवी जीवनातील गुंतागुंती नाहीशा होतील, याबद्दल माझी दिवसानुदिवस खात्री पटू लागली होती. आपणच आपल्या आयुष्यात नसत्या गुंता-गुंती नि घोटाळे माजवून जीवन असह्य, ओढग्रस्त, नि कंटाळवाणे करून ठेवले आहे. बाहेरच्या जगात वाहणाऱ्या प्रतिकूल विचारधारा कमी प्रभावी नाहीत, हे खरेच. पण, त्याहीपेक्षा या सर्व आपत्तींचे मूलभूत कारण हे आहे की आपणच आपल्या स्वत:शी प्रामाणिकपणे नि सच्चेपणाने व्यवहार करीत नाही. उदाहरणच घ्यायचे तर माण-साने खोटे का बोलावे ? समाजात वावरत असता खरे बोलून त्याचे परिणाम भोगण्याचे धारिष्ट नाही म्हणून भित्रेपणाने मनुष्य खोटे बोलतो हे म्हणणे एकवेळ समजू शकते. पण, माणसाला स्वत:शी वागतानाहि सच्चेपणाने नि प्रामाणिकपणे वागता येऊ नये याला काही न्याय्य कारण तरी आहे का ? मनाच्या अशा वैचारिक अवस्थेत असूनही माझे मन शांत होते. याचे कारण असेही असणे शक्य होते की माझ्यामागे कसल्याही सांसारिक जबाबदाऱ्या नव्हत्या किंवा चिंताकाळजी याची भगभग नव्हती.

एके दिवशी जेवण झाल्यावर आम्ही सर्वजण दिवाणखान्यात बसून इकडल्या तिकडल्या घरगुती गप्पागोष्टी करीत होतो. त्यांतच आईने मध्येच अचानकपणे प्रश्न टाकला की लग्नाबद्दल माझा काय विचार आहे ? मी शक्य तो हा विषय टाळीत होतो. तो आता सामोराच येऊन ठाकला होता. प्रश्नाचे गांभीर्य हलके करण्याच्या हेतूने आईला मी विचारले की लग्नाची इतकी घाई करण्यासारखे माझ्या हातून काही घडले आहे, नि म्हणून का तिला काळजी वाटतेय ? का तिलाच मी आता हाताबाहेर गेल्यासारखा अवखळ वाटतोय की लग्नाच्या

बेडीत अडकविण्याचा ती विचार करू पाहते आहे. पुढे काही बोलायला संधी न देता, गंभीर चेहरा करून वडिलांनी भर घातली की,त्यांच्याही मनातून हा प्रश्न मला विचारण्याचे होतेच. "आयुष्यात इतरांपेक्षा काही वेगळेच करायचे ठरवले असले तर गोष्ट निराळी" ते पुढे म्हणाले, "नाहीतर लग्न आता आणखी लांबणीवर टाकण्यासारखे सध्या तरी काहीही सबळ कारण नाही." त्यांच्या दृष्टीने मला काय कमी आहे ? कशाची कमतरता आहे ? चांगली मानाची सरकारी कायमची नोकरी आहे, वढत्या मिळण्याचाही संभव मुळीच कमी नाही. प्रकृती छान, देखणे व्यक्तित्व, उच्च शिक्षण नि शिवाय जन्माला पुरून उरेल अशी वडिलांच्या इस्टेटीतील माझ्या नावावरची वाटणी. यापेक्षा देदीप्यमान भवितव्य ते काय असायचे ? ते पुढे असेही म्हणाले की, "अगदी नोकरी सोडून जमीनजुमला पाहायचे ठरवलेस तरी जन्मभर पुरेल एवढी मिळकत तुझ्याकरतां ठेवली आहे. आमची उभयतांची प्रकृती आता ढासळत चालली आहे; तेव्हा डोळ्यांदेखत तुझे दोनाचे चार हात व्हावे ही इच्छा." आईने ते सूत्र उचलून मला छेडले, "पत्नी या नात्याने मालतीच्या स्थळाबद्दल तुला काय म्हणायचे आहे ?" लहानपणापासून तिला पाहात असल्याने माझ्या आई-वडिलांना ती मुलगी सून म्हणून पसंत पडली होती. "चांगली पदवी-धर आहे; सुंदर आहे, प्रकृतीनेहि सुदृढ असून गोखले काकांचा कित्तीक दिवसांचा आग्रह चालला आहे हे लग्न घडवून आणण्याचा. तेव्हां, आता वेडवेडे विचार पुरे कर नि तू आता गोखलेकाकांच्या मागणीला होकार दे." मी सांगितले की, "लग्नाबद्दल मी अजूनहि गंभीरपणे विचार केलेला नाही; आणि तुम्ही दोघांनी मला विचार करायला वेळ न देता लग्न करण्याची माझ्यावर बळजबरी करू नये." माझ्या या बालिश उत्तरावर ते उभयता हसले नि म्हणाले, "तुला जरूर लागेल तेवढा वेळ घे. पण, वेळकाढूपणा मात्र नाही चालायचा!" आईने तर स्पष्टच विचारले, "तुझं कुठं तू जमवलं आहेस का; आम्हाला न कळवता ? असलं तर तसं सांग आता. जीवनसाथी म्हणून

मालतीला पत्करायला तुझा काही विरोध असेल तर तोही स्पष्टपणे सांग." मी काय उत्तर देतो ते ऐकण्यास माझे वडील उत्सुक दिसले. मी म्हटले, "हे बघ आई, माझे कुठेहि कुणावरहि प्रेम बसलं नाही याबद्दल तू अगदी निःशंक राहा. मालतीबद्दल म्हणशील तर तिच्या-सारखी मुलगी नाही. तिच्याबद्दल माझे फार चांगले मत आहे. आम्ही एकत्रितपणे काही दिवस काढले असल्याने मी तिला चांगला ओळखतो. पण म्हणून तिच्यावर प्रेमबिम करण्याचा विचार मला कधी चुकून-सुद्धा शिवला नाही; नि भावी वधू–जीवनसाथी–म्हणूनही मी तिच्याकडे कधी पाहिलेले नाही." नंतर मी त्यांना आश्वासनही दिले की त्यांच्या आताच्या बोलण्याचा मी गंभीरपणे विचार करीन नि मालतीचेही याबाबत काय मत आहे याचा अंदाज घेण्याचा मी प्रयत्न करीन. त्यावर आई म्हणाली "गोखलेकाकांनी हा विषय नुकताच पुनः धसास लावला आहे. तो त्यांनी मालतीला अगोदर विचारूनच ना असणार ?" त्यावर माझे वडील म्हणाले, "मला वाटते लग्नेच्छु मुलामुलींनी याबाबत एकमेकांजवळ प्रथम बोलावे नि त्यांनी आपला निर्णय आपणाला सांगावा हेच उभय कुटुंबाच्या दृष्टीने सर्वांत ठीक होईल." मी नंतर विषयच बदलला नि सायंकाळी आम्ही सर्वजण अधिकाऱ्यांच्या क्लबवर गेलो. पण माझ्या डोक्यात झालेले बोलणेच घोळत होते; नि लवकरात लवकर मालतीला भेटून या प्रश्नाचा एकदा सोक्षमोक्ष लावण्याचे मी ठरविले.

दुसऱ्या दिवशी कचेरीतही हाच प्रश्न मला सतावीत होता; नि त्यातून मार्गहि दिसत नव्हता. स्पष्टच बोलायचे तर माझे मलाच वाटत होते की माझी सध्याची मानसिक स्थिती लग्नाचा विचारही करायला अनुकूल नाही. कारण, मला आध्यात्मिक गूढवादाच्या मुळा-पर्यंत शोध घेण्याची आंतरिक तळमळ लागून राहिली होती; आणि म्हणून वैवाहिक जबाबदारीचे जू मानेवर घेण्याची माझी मुळीच तयारी नव्हती.शिवाय गुरुदेवांसारख्या सत्पुरुषाच्या आदेशांचा अवलंब करून सत्यदर्शन व्हावे आणि जीवनाच्या कूट समस्येवर तोडगा

विचारले. सौ. गोखले यांनी सुचविले की माझे लग्न आधीच उगाच लांबणीवर पडले आहे, आणि त्याबद्दल एकदा निश्चित काय ते लवकरात लवकर ठरवणे बरे. कोणताही औपचारिकपणा न पाळता मी या बाबतीत त्यांच्याशी खुल्या मनाने बोलावे असेहि काकांनी सुचविले. ते असेहि म्हणाले की मालतीबद्दल त्यांचे माझ्या वडिलांशी बोलणे झाले असून याबाबतीत मी काही ठरवले आहे की नाही याचीही त्यांनी वडिलांच्याजवळ चौकशी केली. यावर मी दोघांनाही सांगितले की, "पालकांनी लग्ने ठरविण्याचे दिवस आता निघून गेले आहेत. जग कितीतरी पुढे गेलेले आहे नि हे सुसंगतच आहे की लग्नाबद्दल वधू–वरांवरच सर्व काही सोपवावे. मालती सुशिक्षित आहे नि मीही ! लग्न ठरवण्याबाबत इतर सर्व गोष्टी अनुकूल आहेत. हे अध्याहृत धरूनही माझ्या दृष्टीने मुद्याची गोष्ट हीच की मालती नि माझ्यामध्ये याबाबत सर्व गोष्टी दिलखुलासपणे स्पष्ट व्हायला हव्यात." उभयता गोखले पतिपत्नी यावर हसली नि म्हणाली, "तुम्ही एकमेकांना लहानपणापासून ओळखता, तरीही पतिपत्नी या नात्याने एकत्रित येण्याच्या दृष्टीने एकमेकांच्या पसंतीच्या आड काय येते आहे ते आम्हांला समजत नाही." गोखले काकांनी पुस्ती जोडली, "अर्थात तुम्हांपैकी कुणी एकाने यापेक्षा निराळे ठरविले असले तर गोष्ट वेगळी." माझ्या घरी मी याबाबत चर्चा केली असल्याचे मी त्यांना सांगितले. "परंतु जोपर्यंत माझे नि मालतीचे याबाबत बोलणे झालेले नाही तोपर्यंत निश्चितपणे मी काहीच बोलू शकत नाही. याबाबतीत हा केवळ माझ्या संमतीचा प्रश्न नाही आहे. मालतीचीही संमती या संदर्भात निर्णायक समजायला हवी असा माझा याबद्दल दृष्टिकोण आहे. माझे नि मालतीचे वैवाहिक जीवन हे केवळ एकमेकांनी पटवून घ्यायचे या स्वरूपाचे, एकमेकांची सोय, किंवा परस्परांनी एकमेकांना सांभाळून घ्यायचे या स्वरूपाचे होण्याने आम्ही कोणीच सुखी होणार नाही. पतिपत्नीमध्ये संपूर्णपणे समजूत नसेल, एकमेकांची आंतरिक ओळख नसेल तर लग्न कधीच सुखावह होणार

नाही." मी उभयतांना आश्वासन दिले की माझे कुणाहि अन्य स्त्री-जवळ प्रेमाचे संबंध नाहीत किंवा कुठलीही दुसरी मुलगी माझ्या डोळ्यांसमोर नाही. मालतीला भेटण्याची संधी व वेळ मिळून एक-मेकांची मते समजावून घेतल्याशिवाय व मालतीने मला पसंत करी-पर्यन्त मला या प्रश्नावर काहीच निश्चितपणे बोलता येणार नाही. मी म्हणालो " ज्याप्रमाणे तुम्ही माझे मत विचारता त्याप्रमाणे तुम्ही मालतीचे याबाबत मत अजमावण्याचा प्रयत्न केला आहे का हे मी जाणू इच्छितो, " सौ. गोखले यावर घाईघाईने उत्तरल्या, " आमची मालती अशी मुलगी नाही आहे की ती तिच्या आई-वडिलांच्या म्हणण्याबाहेर वागेल. " माझ्या म्हणण्यातला मुद्दा श्री. गोखले यांना पटला, आणि ते म्हणाले " काही का असेना, आपण या बाबतीत माल-तीला प्रथम विचारू या, म्हणजे पुढील बोलणी करायला दोन्ही पक्षाच्या दृष्टीने सुकर होईल. " मालतीशी याबाबत बोलणे झाल्यावर तिचा दृष्टिकोण काय आहे तो मला कळविण्याचे त्यांनी मला आश्वासन दिले नि त्यानंतर मी व मालतीने याबाबत बोलणे बरे असेहि ठरले. ती दोघे, हा विषय संपताच निघून गेली, नि चमत्कार असा की मला कितीतरी हलके झाल्यासारखे वाटले. पुढील आठवड्यात माझ्या वडिलांचे पत्र आले; त्यात माझ्या प्रकृतीची व परीक्षेची तयारी कित-पत झाली याची चौकशी केली होती. लग्नाबाबत माझे नि मालतीचे काही बोलणे झाले की नाही याबद्दलही पत्रात विचारले होते. तिच्या-कडून याबाबतींत विरोध होणार नाही अशी त्यांची खात्री असल्याचे त्यांच्या लिहिण्यावरून स्पष्ट दिसत होते. पुणे सोडण्यापूर्वी गोखले पतिपत्नीशी त्यांचे नि आईचे बोलणे झाले होते अशी कबुलीही त्यांनी पत्रात दिली होती. फार कशाला, लग्नाची मागणी गोखले कुटुंबीयां-कडून प्रथमतः आली, आणि त्यांनी व आईने होकारही दिला आहे. फक्त शेवटचा निर्णय माझी संमती मिळाल्यावर घ्यायचा आहे. त्यांनी मला यापूर्वी याबाबत विचारले तेव्हा माझा विरोध न दिस-ल्याने ते लग्न जवळजवळ ठरल्यासारखे धरूनच चालले आहेत.

गोखले पतिपत्नीशी माझ्या झालेल्या बोलण्याचा संपूर्ण गोषवारा मी त्यांना उलट लिहिलेल्या पत्रोत्तरात दिला, नि त्यांना लिहिले की माझ्या इतकीच मालतीचीही पसंती महत्वाची आहे. गोखले काकांकडून याबाबत पुढील हालचाल काय होते याची मी वाट पाहात असून तोपर्यंत काहीही पुढाकार घ्यायचा नाही असे मी ठरविले आहे.

परीक्षा संपली होती. मी उत्तरे समाधानकारक दिली असल्यामुळे मला निव्वळ यशाची खात्री होती असं नव्हे तर प्रथम क्रमांकाने मी उत्तीर्ण होईन अशी मला आशा होती. गेले महिनाभर मालतीला मी भेटलेलो नव्हतो. पुढील जीवन कसे घालवायचे याचा मी काहीच आराखडा केला नसल्याने आणि लग्नाबद्दलही मी फारसा उत्सुक वा उतावीळ नसल्याने, मला हा प्रश्न इतक्या तातडीने धसास लावावा असेहि वाटत नव्हते. कोणीच काही बोलत नव्हते असा हा मधला काळ बरा वाटला. त्यामुळे मी शांत होतो. कसलीही रुखरुख नव्हती मनाला. परंतु, गोखले मंडळी इतके दिवस शांत का व कशी याबद्दल मात्र मला राहून राहून चमत्कारिक वाटत होते. कदाचित् मालतीलाच लग्न इतक्या लवकर व्हायला नको असेल. उच्च शिक्षणाचे विचार तिच्या डोक्यात असतील. ही सर्व माझ्याच मनाची तर्कटे होती. पण, त्यावेळी ज्या विशिष्ट मनःस्थितीत मी होतो, त्यानुसार याबाबत जास्त फोड करून घेऊन खरे काय हे अजमावण्याचा प्रयत्न करणे मला तरी मानवण्यासारखे नव्हते.

## ४

माझी बदली धारवाडला केल्याचे सरकारीरीत्या मला कळविण्यात आले, नि धारवाडला जाण्यापूर्वीच्या अल्प रजेत मी अहमदनगरला आईवडिलांकडे गेलो होतो. अहमदनगरला जातो तो आईने विचारले की माझी नि मालतीची भेट झाली का नि गोखले मंडळींकडून कांही

कळले का पुढचे ? मी पुणे सोडीपर्यंत तरी मालती मला भेटलेली नाही की गोखले कुटुंबाकडूनही काही बातमी नाही असे सांगितले, तेव्हा आईवडिलांना आश्चर्य वाटल्यासारखे दिसले. पण ते बोलले मात्र काही नाहीत ! आता काय कळायचे वा कळवायचे ते गोखले-मंडळीकडून; नि मालतीची या प्रश्नाबाबत नक्की भूमिका काय हे कळेपर्यंत मी तरी काहीही हालचाल करू इच्छित नाही असेही मी उभयतांना सांगितले. दोन दिवस राहून मी धारवाडला जाण्याकरिता अहमदनगर सोडले. धारवाडला कामावर रुजू होऊन तीन महिन्यांच्या-वर काळ लोटला होता; नि माझे सर्व ठाकठीक चालले होते. एके दिवशी सकाळी जाग आली तो टेलिफोनची घंटा खणाणत होती. धारवाडचे कलेक्टर बोलत होते. इतक्या पहाटे कलेक्टरांचा आवाज ऐकून मला आश्चर्यच वाटले. नुकत्याच झालेल्या खात्याच्या परीक्षेत मी प्रथमांकांत उत्तीर्ण झाल्याची गोड बातमी त्यांनी सर्वप्रथम मला दिली. माझी दुय्यम कलेक्टरपदाकरिता निवड झाल्याचेही त्यांनी सांगितले. त्यांनी हार्दिक अभिनंदन करून लवकर भेटायला यायलाही सांगितले. त्यांच्या पत्नीही टेलिफोनवर आल्या नि अभिनंदन करून मला सकाळी चहाला यायचे आमंत्रणही त्यांनी केले. घेतलेल्या मेहनतीचे चीज झाले या विचाराने मीहि सुखावलो होतो नि माझ्या निवडीची बातमी देणारी तार मी अहमदनगरला केली. दुपारपासून अभिनंदनाच्या तारा यावयाला सुरवात झाली. फोनवरूनही सारखा अभिनंदनाचा वर्षाव चालला होता. आईवडिलांनी, बंधूंनी, गोखले-काकांनी नि मित्रवर्य रमेशनेहि माझे अभीष्टचिंतन केले होते. परी-क्षेच्या यशाबद्दलच नव्हे तर असिस्टंट कलेक्टरपदी माझी निवड झाल्याबद्दल जवळजवळ सर्वजणांनाच माझ्याबद्दल काहीतरी विशेष वाटायला लागले आहेसे दिसत होते. नंतरचे दोन दिवस आलेल्या तारा-पत्रांची पोच देण्याच्या उद्योगात गेले. पुढच्या आठवड्यात धारवाडचे असिस्टंट कलेक्टर रजेवर जात असल्यामुळे त्यांच्या कामाचा ताबा घेण्याचा सरकारी हुकूम माझ्या हाती पडला.

कामाची मला चांगलीच माहिती असल्याने नव्या जागेवर आल्यावर मला काहीच कठीण वाटले नाही. इतर पत्रांबरोबरच मला नि माझ्या वडिलांना ओळखणारांकडून माझ्या लग्नाचा विचार काय आहे याची चौकशी करणारीही पत्रे आली होती. त्या पत्रांना मी एवढेच उत्तर दिले की त्यांची पत्रे माझ्या वडिलांकडे मी रवाना केली असून, याबाबत पुढील पत्रव्यवहार त्यांनी नगरलाच करावा. वडिलांनी मला लिहिले की त्यांनी गोखलेकाकांना लग्नाबाबत पुन: लिहिले आहे नि आता त्यांच्या उत्तराची ते वाट पाहात आहेत. वास्तविक एव्हाना उत्तर यायलाहि हवे होते. गोखले मंडळी एकदम इतकी शांत थंड कशी याबद्दल मलाहि अचंबा वाटू लागला होता. मालतीने कदाचित् नकार दिला असेल, किंवा विचार करायला आणखी वेळ मागून घेतला असेल. परंतु गोखलेकाकांनी मला नि माझ्या वडिलांना काय ती वस्तुस्थिती प्रांजलपणे कळविणे जरूर होते. कामानिमित्त मी पंधरा दिवस दौऱ्यावर होतो. दौरा संपवून मी धारवाडला परत आलो नि आलेले टपाल पाहात होतो. त्यात मालतीचे पत्र आढळले. सर्वांत शेवटी तिच्या पत्राचे पाकीट मी फोडले. कारण, मला ते पत्र निवांतपणे वाचावयाचे होते. पत्र फोडण्यापूर्वी मी ते पाकीट आलटून पालटून पाहिले; मनांत म्हणत होतो, पत्रात काय बरं लिहिलं असेल ? समजा, मालतीने होकार दिला असला तर माझ्या जीवनाचा सारा ओघच बदलून जाणार ! विवाहबंधनात मी अडकलो तर तो एक खोडाच उत्पन्न होणार नि त्यातून मुक्त होणे महाकठीण कर्म ! आध्यात्मिक गूढवादाच्या तळाशी बुडी मारून सत्याचा शोध घेण्याची माझी जी महत्त्वाकांक्षा आहे; ध्येय आहे त्याचा मला त्याग करावा लागणार. संसारचक्रात गुरफटणे म्हणजे काय याचा अर्थात मी कल्पनेने विचार करीत होतो. माझ्या माहितीतील कित्येक परिचित नि मित्र असे आहेत की लग्नापूर्वी 'यंव करूं नि त्यंव करूं' अशा त्यांनी गप्पा मारल्या होत्या. आपल्या ध्येया–महत्त्वाकांक्षेची किती उज्ज्वल नि भव्य चित्रे उराशी बाळगली

होती, पण लग्नानंतर त्यांचा जीवनप्रवाहच इतका बदलून गेला की ती ध्येये नि महत्त्वाकांक्षा कुठल्या कुठे वाहून गेली की आज त्यांची आठवण होण्याइतका सुद्धा मागमूस राहिलेला नाही. मालतीच्या सुबुद्ध सहवासात माझी उराशी बाळगलेली ध्येये जशीच्या तशी मूर्त स्वरूपात आणू शकेन की नाही याची माझी मला खात्री वाटत नव्हती. मनात विचारहि येऊन गेला आईवडिलांना बरें वाटावे म्हणून माझ्या ध्येयाला व आकांक्षांना मी मुरड घालायला नको होती. पत्र उघडण्यापूर्वी कितीतरी वेळ मी अशाप्रकारे विचार करीत होतो. मी ते पत्र एकदाच नव्हे तर दोनदा वाचले. त्यातील मजकूर असा होता–

प्रिय माधव,

हे पत्र लिहिण्याचा मी अनेकवार प्रयत्न केला. प्रत्येक वेळी मला काय म्हणायचे आहे ते त्यात नीटसे लिहिता आलेले नाही असे पाहून मी कित्येक पत्रे लिहिली नि फाडली; शेवटी हे पत्र तुला पाठवीत आहे. मला भरवंसा आहे की तू हे पत्र नीट वाचशील, आणि ज्या तळमळीने मी ते लिहिले आहे त्यामागील भावार्थ तू नीट समजून घेशील. गैरसमज करून घेणार नाहीस. मला काय म्हणायचे आहे ते जर याही पत्रात तितकेसे सुस्पष्ट होत नसेल तर मला माझ्या भावना स्पष्ट करायला योग्य ते शब्द सापडले नाहीत एवढंच खरं मानून राहा; नसते अर्थ मात्र काढीत बसू नकोस. मला वाटते मी हे पत्र तुला प्रथमच लिहीत आहे. तेव्हा, त्यात काही चुका असतील तर त्या तू सावरून घे. आपल्या उभय कुटुंबातील वडील मंडळीत आपल्या लग्नाबद्दल जो खल चालला आहे त्याबाबत माझे मत तरी काय अशी विचारणा करणारे पत्र प्रथम तुझ्याकडूनच येईल अशी मी अपेक्षा बाळगून होते. परंतु, बरेच दिवस होऊनही जेव्हा तुझे पत्रच नाही तेव्हा ठरविले की मीच तुला पत्र लिहावे. हे पत्र लिहीत असताना आपला असलेला प्रदीर्घ परिचय नि मैत्री किंवा तत्सम इतर औपचारिक विचार मी जरा वेळ दूर ठेवले आहेत. कारण असे

की ही 'आळी मेळी गुपचेळी' केव्हातरी संपून एकदा सोक्षमोक्ष व्हावा.

तुला आठवत असेल, तू पुण्यास असताना एका रविवारी सकाळी मी तुझ्या बंगल्यावर आले होते; नि त्यावेळी तूं म्हणाला होतास की एका गंभीर नि महत्त्वाच्या विषयावर तुला माझ्याशी बोलण्याची तीव्र इच्छा आहे. तुला काय सांगायचे होते हे मला ठाऊक होते. तरीही मी तो विषय बुद्धया टाळला. त्यावेळी आपल्या उभयतांची वडील मंडळी आपल्या लग्नाविषयी बोलणी करीत होती, ही गोष्ट तुला कदाचित ठाऊक नसेल, पण मला होती. आपल्या वयाच्या सोळा अठराव्या वर्षीच उभयतांच्या पालकांनी आपले लग्न ठरवलेले होते. परंतु, माझ्या सुदैवाने—मी म्हणते—आपली दोन्ही कुटुंबे सुसंस्कृत, सुशिक्षित, नि सुधारक मताची व पुरोगामी विचारांची असल्याने, मला माझ्या मनासारखे त्यांनी शिक्षण दिले. शिक्षण थांबवून माझे लग्न करण्याचा अधिरेपणा केला नाही. आपण दोघे तर लहानपणापासून एकत्र खेळलो—वागलो असल्याने एकमेकांना चांगले ओळखतो, नि माझी तर अशी समजूत होती की आपले दोघांचे खरेच जर लग्न झाले तर आपले संमीलन आदर्श ठरेल. आमच्या घरात तर तू म्हणजे जवळ जवळ सर्वगुणसंपन्न मानला जातोस. तुझे खेळातले प्रावीण्य, शाळा-कॉलेजातून तू मिळविलेली बक्षिसे नि शिष्यवृत्त्या, आणि तुझी सुशील वागणूक या सर्वांबद्दल मला तर नेहमी अभिमानच वाटत आलेल आहे. परंतु मी जशी वयाने मोठी होत गेले, नि माझे मला कळायला लागले तेव्हा, मला लिहायला वाईट वाटते, की मला असे आढळून आले की तुझे लक्ष मुलींकडे किंवा माझ्यासारखी तुझी मैत्रीण आहे याकडे असण्यापेक्षा क्रीडांगणावरील विजय, नि शालेय वा विद्यालयीन अभ्यास यातच तू जास्त रमतोस, रस घेतोस. तुझ्या वागण्यात, मला, माझ्याबद्दल एक प्रकारची बेफिकीरीच अनुभवास आली. असेहि असेल की तुझ्या मनात माझ्याबद्दल प्रेमाची ज्योत प्रज्वलित करण्यास माझे सामर्थ्य किंवा सौंदर्य लटके पडले

असेल. पण, नंतरहि मला जे समजले ते हेच की कॉलेजात सुद्धा तू एक नीरस तरुण म्हणून ओळखला जात होतास. वागणुकीने कितीही गोड वाटत असलास तरीही माझी त्यानंतर अनुभवाने खात्री झाली की आपल्या वयाची मुले–मुली तुझ्याबद्दल म्हणतात ते खरेच होते, नि स्त्रीला जे हवे–हवेसे वाटते ते तुझ्यात नाही. ते तू देऊ शकत नाहीस. स्त्रियांपासून इतके अलिप्त राहण्याचा तुझा स्वभाव कसा झाला हे मला माहीत नाही; मला अज्ञात अशा काही घटना तुझ्या जीवितात घडल्याहि असतील की ज्यामुळे स्त्री म्हटली की तू तिच्यापासून दोन हात दूरदूर राहाणेच पत्करतोस.

पुढे पुढे तत्त्वज्ञानाकडे–ऐहिक सुखापेक्षा पारमार्थिक वा आध्यात्मिकतेकडे तुझ्या मनाचा वाढता कल मला जेव्हा आढळला अनुभवास आला–तेव्हा तर माझी फार फार निराशा झाली. माझे अवलोकन जर खरे असेल तर, का नि कसे नकळे, मला असे वाटते की जीवनात हृदयस्थ भावनांपेक्षा तू बुद्धीला प्राधान्य जास्त देतोस. त्या निकषावर तू आपली जीवनमूल्ये घासून पाहात असतोस. माझी जीवनाकडे पाहण्याची दृष्टि भावमधुर असल्याने मला तुझी ही वृत्ति भयप्रद वाटते, मी तर अक्षरशः हादरून गेल्येय ! कुठला तो काळाकुट्ट दिवस उगवला, नि तुझी नि त्या स्वामीजींची आमच्याकडे गाठ पडली असे मला वाटते. कारण, त्या दिवसापासून तू साफ साफ बदललास !

मद्रासहून तू आलास तेव्हां तर मला आढळून आले की तुझ्यात केवढा थोरला बदल झाला आहे. तारुण्यसुलभ वृत्ति की ज्यामुळे वैवाहिक जीवन स्वप्नमय सुखाचे व्हायचे ती वृत्तीच नव्हे तर तरुणवयात हवी हवीशी असणारी जीवनाची मूल्येच तू गमावून बसलास. तुझ्या कर्तृत्वाबद्दल मला कित्ती कित्ती वाटायचे, तुझी रुबाबदार मूर्ति पाहून मी हरखून जायची; नि जीवनात तू जे हवे ते मिळवशील असा तुझ्याबद्दल मला मोठा विश्वास होता नि आहेहि !

मुद्याची गोष्ट इतकीच की आपण जर विवाहबंधनांनी निगडित होऊन जीवनात एकत्र आलो तर आपले जीवन यशस्वी होणार नाही

या निर्णयाप्रत मी आल्ये आहे. माझा आदर्श पती तू होऊ शकशील असं तुझ्यात आताशा काही उरलंच नाही असं दुर्दैवाने, मला म्हणावे लागते. जीवनाकडे पाहण्याच्या आपल्या उभयतांच्या दृष्टीत, जमीन–अस्मानाचे अंतर आहे, आणि अशा स्थितीत आपण विवाह-बद्ध झालो तर आपल्या वैवाहिक जीवनात गोड जीवनसंगीत उत्पन्न होण्याऐवजी तुझ्या मार्गात मी एक धोंड मात्र होऊन बसेन. आपले वैवाहिक जीवन बदसूर होईल, अयशस्वी होईल; आणि ही घटना उभयतानाहि सुखप्रद नव्हेच नव्हे.

मलाहि माझ्या जीवनात आशा-आकांक्षा नि ध्येये–महत्त्वा-कांक्षा आहेत, नि आता माझी खात्री झाली आहे की तुला जीवनसाथी केल्याने मला जीवनपूर्ती साधणार नाही. सूक्ष्मपणे विचार करशील तर तूहि कबूल करशील की आपल्या दोघांच्या स्वभावात मूलभूत, तत्त्वत: फार मोठे अंतर आहे. गेली दोन वर्षे, या प्रश्नावर, उलटसुलट विचार करून मी माझी ही निश्चित मते मांडीत आहे. पोरकट विचार म्हणून उडवून लावू नकोस. मी माझ्या हलक्या –फुलक्या भाव–भावनांची हळुवारपणे जोपासना केली असून जीवना-तील सारी सुखे उपभोगण्याची माझी इच्छा आहे. तू वृत्तीने शुष्क, व्यवहारी, नि आता तर तुझ्यात संन्यासी प्रवृत्तीचाच प्रभाव जास्त दिसतो. तुझी वृत्ती अरेरावीची आहे नि कुटुंबजीवनात तू कुठेहि नमते घेणारा नव्हेस. मीही कुणापुढे मान वाकवू इच्छित नाही; आणि साहजिकपणे माझा नवरा माझ्या मुठीत असावा अशी माझी महत्त्वाकांक्षा आहे; नि तसे माझे प्रयत्नही असतील. मी कुणाच्या मार्गात लोढणे होऊ इच्छित नाही. ती कल्पनाच मला असह्य वाटते. या सर्व विचारांनीच मी या निर्णयाप्रत आल्येय की आपण वैवाहिक बंधनांनी एकत्रित येणे शक्य नाही. मित्र म्हणून राहिलो तर कदाचित आपण एकमेकांना पूरक स्नेही ठरूहि; निदान तसे झाले नाही तरी एकमेकांच्या प्रगतीच्या आड तरी निश्चित येणार नाही. सुदैवाने, माझ्या वडिलांची आर्थिक परिस्थिति अत्युत्तम असल्याने, जीवनात

मला काहीही कमी पडणार नाही, अशी तुझ्यासारखीच माझी स्थिति आहे. मला शिक्षणहि इतके चांगले नि पुरेसे मिळाले आहे की स्वतंत्र-पणे माझ्या मनासारखे आयुष्य घालविण्याचे ठरविले तरी तेहि मला शक्य होईल.

तुला नकार द्यायचा म्हणजे माझ्या आई–वडिलांना काय वाटेल याची मला पुरेपूर जाणीव आहे. त्यांचा फार मोठा अपेक्षा–भंग होणार आहे, माझ्या निर्णयाने ! माझ्या म्हणण्याचा त्यांनी काही वेगळाच अर्थ केला तरीहि मला आश्चर्य वाटणार नाही. परंतु त्यांची जीवन–यात्रा शेवटच्या टोकाशी घुटमळत आहे तर माझ्या यात्रेला अजून सुरवातहि झालेली नाही. तेव्हा, त्यांना बरे वाटावे म्हणून माझ्या आशा–महत्त्वाकांक्षेचा बळी द्यायची माझी तयारी नाही. नाहीतरी तूच म्हणत असतोस ना की सत्य हे निर्भय् असते, नि त्यातूनच जीवनाचे सर्व प्रश्न सुटत असतात ! त्या सत्याची कास धरूनच माझा प्रश्न मी सोडवीत आहे; नि कबूल करायला मला हरकत वाटत नाही की, खरोखरच त्यामुळे माझ्यावरचे केवढे थोरले दडपण नाहीसे झाल्यासारखे मला वाटत आहे. दुसऱ्याचा विचार करायचा तर सत्याच्या गळयाला नख लावायला हवे, नि माझी खात्री आहे की या नि अशा फसवणुकीने वैयक्तिक जीवनाचा चक्का-चूर होत असतो. माझे अजूनतरी कुणावरहि प्रेम बसलेले नाही नि उर्वरित जीवनात काय करायचे ते अजून तरी काहीच ठरलेले नाही. मला वाटते माझ्या या म्हणण्यावर तू तरी अविश्वास दाखवणार नाहीस.

माझा असा, चुकीचा किंवा बरोबर समज झालेला आहे की माझे नि तुझे मातापिता हे लग्न तुझ्यावर लादीत आहेत. परंतु, माझ्या-कडून मी स्वत:ला सोडवून घेऊ इच्छिते की, तुझा निर्णय घ्यायला तू स्वतंत्र आहेस. तू आपल्या आवडीने केव्हाही नि कुणाशीहि विवाहबद्ध व्हायला मोकळा आहेस. तुझे लग्न होऊन, जीवनात तू स्थिर झालास तर माझ्याइतका आनंद दुसऱ्या कुणालाही होणार

नाही. पण मला मात्र वाटते की तू या जन्मी कधीच लग्न करणार नाहीस. लग्न हे तुझे कधीच ईप्सित नव्हते नि नसावे. फार काय, तुझ्या ध्येयाच्या आड जर कसला मोठा अडथळा असेल तर ते वैवाहिक जीवन अशीच तुझी धारणा आहे. मी माझ्या घरी माझा निर्णय कळविला आहे; तूहि तसेच करावेस. अति स्पष्ट पत्र लिहिल्यावद्दल माफ कर. मी तुझी सदैव मैत्रीण राहू इच्छिते. फार काय, कधी काळी तू तुझ्या गुरुदेवांच्या पदावर पोचलास तर तुझी शिष्या म्हणवून घेण्यात मला आनंदच वाटेल. हेच पत्री तुझ्या आईवडिलांना माझे नमस्कार प्रविष्ट कर; नि कृपा करून माझ्याबद्दल कसलाहि गैरसमज करून घेऊ नका असे माझ्यावतीने त्यांना सांग.

प्रकृतीला जप. मजेत अस.

तुझीच मैत्रीण
मालती

मालतीच्या पत्राने मी थोडासा अस्वस्थ झालोच. उलट–सुलट विचारप्रवाहांनी डोक्यात इतका गोंधळ उडवला की मी नीटसा विचारच करू शकलो नाही. परिस्थितीचा हा उमज, नि इतके सुव्यवस्थित विचार करण्याची तिची पात्रता पाहून मालतीचे मला कौतुकच वाटले. इतक्या सूक्ष्म अवलोकनानंतर आपला प्रश्न इतक्या सहजतेने सोडवू शकण्याची तिची पात्रता असेल असे मला कधीच वाटले नव्हते. माझ्या वागण्याचे तिने जे विश्लेषण केले ते मला तरी फार कठोर वाटले नि त्या अनुषंगाने तिने जे माझे व्यक्तिचित्र काढले ते फार भडक नि क्रूर वाटले मला. माझ्या स्वाभिमानाला धक्का बसलाच. शिवाय माझा अधिक्षेपहि झाल्यासारखे मला वाटले. तरीही ती म्हणते त्यात सत्यांश नव्हता असे नव्हे. मी तिच्यावर कधी प्रेम केले नाही ही वस्तुस्थिती खरीच. पण, त्याचे कारण मी माझ्या व्यापात गर्क होतो हे आहे, असे मला वाटते. माझ्या आतापर्यंत लक्षातच आले नाही की माझ्या जीवनात स्त्रीला स्थान नाही, आणि त्यांना हव्या तशा प्रकारे त्यांच्याबद्दल मी कधीच भावना बाळगल्या

नाहीत, दर्शविल्या तर नाहीच नाही. साहजिकच, तिच्या आई–वडिलांनी लग्नाबद्दल मला सुचविण्यापूर्वीच मी मालतीकडे वेगळे लक्ष द्यायला पाहिजे होते; तिच्यावर प्रेम करायला हवे होते अशी मालतीची अपेक्षा होती. तारुण्य, त्यातला थोडासा धसमुसळेपणा, प्रेयसीबद्दल, शारीरिक मीलनाबद्दल आकर्षण, नि त्याकरिता काहीही करायची तयारी अशा नि अशासारख्या भावनांचा मधुर मिलाफ परस्पर प्रेमात प्रतीत व्हावा अशी काहीशी स्त्रीची प्रेमाबद्दलची अपेक्षा असते, कल्पना असते. मालतीची प्रेमयाचना वा प्रेम संपादन न करिताच केवळ माझ्या मातापित्यांना बरे वाटावे म्हणून मी या लग्नाला मान तुकवीन ही नाहीतरी, अक्षम्य चूकच. प्रीतिशून्य विवाहबंधनात तिला अडकवून तिचे आयुष्य निष्प्रेम–दुःखी केल्यासारखेच त्यामुळे होणार होते. असे करायचा मला काय अधिकार होता ? मी फक्त माझ्या बाजूने विचार करीत होतो; जीवनसाथी म्हणून जन्मभर माझ्याशी जिची गाठ मारायची होती त्या मालतीचा विचार, तिच्या भावनांची कदर कुठे होती या माझ्या वागण्यात ? मालतीच्या पत्राने मी दुखावलो गेलो हे नाकबूल करण्यात अर्थ नाही; पण त्या पत्राने माझे डोळे उघडले हेहि खरेच. स्त्रीच्या मानसशास्त्राचे माझे गाढ अज्ञान त्यामुळे मला स्पष्ट जाणवले. पालकांनी लग्न ठरविण्याचे दिवस गेले–संपले आता; आणि विशेषतः मालतीसारखी सुशिक्षित सुसंस्कृत मुलगी त्या तऱ्हेचे निष्प्रेम वैवाहिक जीवन पत्करणे शक्यच नव्हते; याचीच मला तिच्या पत्राने जाणीव करून दिली.

दुसऱ्या दिवशी मी मालतीला पत्रोत्तर लिहिले ते खालीलप्रमाणे :

प्रिय मालती,

तुझे पत्र मिळाले, लक्षपूर्वक मी ते वाचले. पत्राबद्दल तुझा फार आभारी आहे.

माझ्या स्वभावाचे जे तू मनमोकळेपणाने विश्लेषण केले आहेस त्याबद्दल मी तुझा अधिक उपकृत आहे. माझे मला समर्थनहि करायचे

नाही किंवा त्या तुझ्या म्हणण्यांत चुका काय आहेत तेहि दाखविण्याचा माझा इरादा नाही. पुण्यास आपण जेव्हा भेटलो होतो तेव्हा याबाबत माझ्याबद्दल खुलासा करून तुझे मत अजमावण्याचा मी प्रयत्न केला पण तुझे तुलाच ठाऊक, काय कारण असेल ते, त्यावेळी तूच तो प्रश्न पुढे ढकललास, टाळलास. तुझे वडील जेव्हां मला याबाबत भेटले होते तेव्हा त्यांच्यापुढेही मी मोकळेपणे माझा दृष्टिकोण मांडला होता. त्यांनी तुझे मत अजमावले की नाही हे मात्र मला ठाऊक नाही. माझ्या तत्त्वज्ञानी नि पारलौकिक जिज्ञासेबद्दल व त्याकडे माझ्या मनाच्या वाढत असलेल्या कलाबद्दल तू लिहितेस ते खरेच आहे. पण त्या सर्वांचा माझ्या उत्तरायुष्यावर काय परिणाम व्हायचा आहे हे आजतरी, मी कोणत्याही प्रकारे सांगू शकत नाही. स्वामीजी नि गुरुदेव यांच्या जीवनाचा माझ्यावर ठसा उमटला आहे. येवढेच नव्हे तर माझ्या जीवनात त्यांचेच असे एक वेगळेच स्थान उत्पन्न झाले आहे, हेहि मी नाकबूल करू इच्छित नाही. सध्या जे सर्वसाधारण सरकारी नोकराचे जीवन असते तसले जीवन मी व्यतीत करीत आहे. पण त्यात केव्हा काय फरक पडेल, नि पुढील आयुष्यात काय बदल घडून येईल हे मला आज सांगता येत नाही. मैदानी खेळांची मला आवड असल्याने असेल कदाचित, माझे जीवन धोपटमार्गी बनले नि जीवनातील भावरम्य, तरळ, नि सूक्ष्म अनुभूतींचा मला कधी स्पर्श झालाच नाही. त्यामुळे स्त्री-जातीकडेहि माझे दुर्लक्षच झाले. प्रेमाचे खेळ मला कधीच खेळता न आल्याने मी तुला शुष्क वृत्तीचा वाटलो याबद्दल मी दिलगीर आहे. स्त्री-स्वभावाबद्दल माझे संपूर्ण अज्ञान असल्याने तुझ्या मनोवृत्तीची दखलही दुर्दैवाने मी कधीच घेऊ शकलो नाही. तू याबाबत मांडलेले विचार इतके सुस्पष्ट आहेत की त्यापाठी-मागील खरी भावना मी आज ओळखू शकतो, समजू शकतो.

तुझे मी सदैव भलेच चिंतिले आहे. तेव्हा, उत्तर आयुष्यात तुझे जीवन सुखी होवो हीच माझी इच्छा आहे. आपला जीवनसाथी निवडण्यास तू सर्वथा लायक आहेस, त्याचप्रमाणे आगामी जीवनाची

जडण घडण कशी करावी तेहि तुला सहज जमेल. तुला त्यात सर्वतोपरी यश येवो; नि जगात जे जे चांगले ते ते तुला लाभो हीच इच्छा.

तुला केव्हाही साहाय्यकारी होण्याम मला आवडेल हे मात्र तू जरूर लक्षात बाळग.

प्रकृतीला जपून अस.

तुझा

माधव

मालतीचा निर्णय कळविण्याकरिता मी माझ्या वडिलांना पत्र टाकले; नि पुढील आयुष्यात ब्रह्मचारी राहण्याचे मी ठरविले असल्याने, यापुढे लग्नाच्या कसल्याही मागण्यांचा त्यांनी विचारसुद्धा करू नये असेहि मी सुचवून टाकले.

मालतीला नि वडिलांना पत्रे टाकल्यावर डोक्यावरचा जबावदारीचा केवढा थोरला शीणभार एकदम हलका झाल्यासारखे झाले. हा प्रश्न अशाप्रकारे सोडवण्यात मला गुरुदेवांचेच फार मोठे साहाय्य घडले आहे हेहि माझ्या तेव्हाच लक्षात आले. माझे जीवन व्यतीत करायला मी आता मोकळा झालो होतो.

●

# ५

आठवडाभरात वडिलांकडून माझ्या पत्राची पोच आली. मालतीच्या नकाराने विषाद मानू नये; आणि झालेली घटना मनावरहि घेऊ नये. शक्य असेल तर थोडी दिवस रजा घेऊन घरी यावे. कारण अलिकडे त्यांची स्वत:ची नि आईचीहि प्रकृति तेवढीशी बरी नसते; अशावेळी काही दिवस मी नगरला आल्यास तेवढे उभयतांनाहि बरे वाटेल असेही त्यांनी पत्री सुचविले होते.

कचेरीत काम पुष्कळ असल्याने मी त्यात पुरा बुडून गेलो होतो. पण घरी आल्यावर अगदी एकटे एकटे वाटे. आमचे तारू कुठे भरकटत आहे हेहि मला कळत नव्हते. गुरुदेवांची सतत आठवण येत होती. नि ते भेटावेत अशीही उत्कंठा लागून राहिली होती. परंतु, त्यांचा ठावठिकाणा ठाऊक नसल्याने, गुरुदेव आणि स्वामीजी यांना गाठायचे कुठे नि कसे हा प्रश्नच होता. रवींद्र चेट्टियारला पत्र लिहून गुरुदेवांबद्दल त्याला काही माहिती आहे की काय ते विचारावे असाही विचार मनात येऊन जाई. शिवाय बरेच दिवसांत त्याला पत्र न लिहिल्याने माझे पत्र जाणे जरूरहि होते. त्याप्रमाणे मी रवींद्राला

लिहिलेहि; नि माझ्या धारवाडमधील उलाढाल्याहि त्याला कळविल्या. त्याचे पत्रोत्तर ताबडतोब आले त्याने स्वतःचे, पत्नीचे, आईवडिलांचे नि आपली बहीण मृदूला हिचे अभीष्टचिंतनपर संदेश पत्रात नमूद केले होतेच. पण गुरुदेवांबद्दल मात्र त्यालाहि काहीच माहीत नसल्याचे त्याने कळविले होते. त्यामुळे मी अस्वस्थ झालो होतो; माझे मन ताळ्यावर नव्हते. त्याच वेळी माझा मित्र रमेश याचे पत्र आले नि त्यात त्याने मला भेटायला यायला बोलावले होते. कारण तो उच्च शिक्षणाकरिता परदेशाला जायला निघत होता. दैनंदिन कार्यक्रमात ही बातमी म्हणजे एक इष्ट अशी कलाटणीच वाटली, नि मला असे वाटले की कंटाळा घालवून मन जरा ताजेतवाने व्हायला रमेशची अपेक्षित भेट पुष्कळच साहाय्यकारी होईल. मी त्याला तार करून माझा मुक्काम धारवाडमध्येच असल्याने त्याने इकडेच मिळेल त्या गाडीने यावे असे सुचविले.

ती शनिवारची सकाळ होती. मी रमेशला घ्यायला स्टेशनवर गेलो होतो. ऑफिसच्या जंजाळातून सुटून एक सबंध रविवार रमेशच्या संगतीत घालवायला मिळणार म्हणून मीही खूष होतो. गाडी वेळेवर आली, नि रमेश डब्यातून उतरला तेव्हा प्रवासाच्या थकव्याशिवाय त्याच्या चेहऱ्यावर कसलीहि अवकळा नव्हती. छान दिसत होती त्याची प्रकृति ! मी मात्र बारीक झाल्यासारखा दिसतो अशी तक्रार करून त्याने मला विचारलेहि की कसल्या चिंता लागल्या आहेत माझ्या पाठीशी ? मी फक्त हसलो व कामाला जुंपलोय यापेक्षा काही नसल्याचे त्याला सांगितले. घरी पोचल्यावर माझी मनोवृत्ति उल्हसित होत आहे याची माझी मलाच जाणीव होऊ लागली. रमेश नि मी जुने जानी–दोस्त होतो. नुसतेच मित्र नव्हतोच. एकत्रितपणे आम्ही बरीच वर्षे राहिलो असल्याने दोघांच्या आवडीनिवडीचे नि बोलायचे विषय कितीतरी सारखेच होते; नि गप्पाहि रंगत होत्या. भावी आयुष्याच्या दृष्टीने त्याची ही सफर फार महत्त्वाची ठरणार असे तो म्हणत होता. तो नुसताच हुशार नव्हता तर

मेहनतीही असल्याने तो विलायतेहून निवळ परीक्षा पास होऊन येईल असे नसून, चांगले भरदार यश संपादन करील याची मला खात्री होती. शनिवार अर्धा दिवस असल्याने मी घरी लवकरच परतलो होतो, रमेशचा आरामच चालू होता. चांगली विश्रांति मिळाल्याने प्रवासाचा शीण जाऊन तोही ताजातवाना झाला होता. चहा घेता घेता त्याने माझ्या नि मालतीच्या लग्नाबावत प्रश्न उपस्थित केला, तो म्हणाला, " तुझी हरकत नसेल व त्यात गुपित फोडण्यासारखे होणार नसेल तर माझी कळून घेण्याची उत्सुकता आहे की तुझे नि मालतीचे जवळ जवळ ठरलेले, नि सर्वजण हे लग्न होणार असे धरून चाललेले असता, एकदम असे काय झाले की ते लग्न आता होऊ शकत नाही ? तुझ्या नि मालतीच्या लग्नाची बोलणी फिस-कटली हे ऐकून आम्ही तर सर्वजण सर्दावलो बघ ! "

" खरं म्हणशील तर " मी उत्तरलो, " लग्न ठरले होते वगैरे फारसे खरे नव्हे; शिवाय असा काही बभ्रा गावात नि आम्हा उभय-तांच्या परिचितांत झाला होता ही मला तरी बातमीच आहे. माल-तीच्या नि माझ्याहि आईवडिलांची इच्छा आमचे दोघांचे लग्न व्हावे ही होती, येवढे मात्र खरे. पण नुसती इच्छा असून का कुठे तसे काही होत असते ? मालतीच्या नि माझ्या स्वभावात साम्य नाही येवढेच नव्हे तर एकंदर आवडीनिवडी आणि जीवनाकडे बघण्याच्या दृष्टी-तही मूलभूत तफावत आहे. आमची उद्दिष्टे, ध्येय, आदर्श कशा कशातहि साम्य नाही, आणि लग्ने पालकांनी जमवून होणारी नस-तात हे तूही जाणतोसच. शिवाय तुला हेही ठाऊक आहे की अलिकड माझ्या रुचीत असा काही बदल झाला आहे की तो वैवाहिक जीवन अवलंबण्याला फारसा उपयुक्त नाहीच. किंबहुना ज्या मार्गाने मी उत्तर आयुष्यात जायचे ठरविले आहे त्या मार्गात वैवाहिक जीवन हा एक मोठाच अडथळा ठरेल. कोणत्याहि प्रकारे नसत्या जबाब-दाऱ्यांचे ओझे स्वत:वर लादून घ्यायचे नाही असे मी ठरवले आहे. नि माझ्या नियोजित कार्यक्रमांत मला यश येणार असेल तर माझ्या

आयुष्यात माझ्या लग्नाचा दिवस कधीच उगवणार नाही हेहि निश्चित. तेव्हा, मला मालतीचे जीवन दु:खीकष्टी व्हायला नको होते."

माझे बोलणे ऐकून रमेश पुष्कळच गंभीर झाला आणि म्हणाला, " तुझा माझा इतक्या दिवसांचा परिचय असूनहि तुझं बोलणं मला खरोखरच समजत नाही. तुझ्यात इतक्या झपाटयाने दिवसानुदिवस बदल होत आहे की उद्या काय होणार हे सांगणं कठीण आहे. वास्तविक तत्त्वज्ञान हा विषय माझ्या आवडीचा नि मीच तुझ्यात त्या विषयाची आवड उत्पन्न केली. त्या विषयात जे जे प्रावीण्य मिळवायचे, शिष्यवृत्त्या मिळवायच्या त्या मी मिळविल्या नि त्यावरच खूष होऊन राहिलो. पण जीवनात तत्त्वज्ञान आणण्याचं किंवा तत्त्वज्ञानमय जीवन घडवण्याचे अवघड काम तू करू पाहतो आहेस. याचा शेवट काय हा प्रश्नच आहे. जीवनाशी भारी किमतीचा पण लावून तू जुगार खेळत आहेस. "

मी त्यावर उत्तरलो, " मी काही विशेष करीत आहे असे मला मुळीच वाटत नाही. प्रयत्न आहेत नि त्या उद्दिष्टाआड काही येऊ न देण्याची मी काळजी घेत आहे इतकेच. "

विषय बदलण्याच्या उद्देशाने मीच मग रमेशला विचारले, "मालती केव्हा भेटली होती–अलीकडे ?" " धारवाडला येण्यास निघण्यापूर्वी मी गोखल्यांकडेच होतो " असे रमेशने सांगितले. "मालतीलाहि कदाचित शिष्यवृत्ती मिळण्याचा संभव आहे आणि तशी ती मिळाली तर तीहि समाजशास्त्राचा अभ्यास करण्याकरिता इंग्लंडला जाईल," अशीहि माहिती त्याने पुरविली. रमेश दोनतीन दिवस होता तोपर्यंत दिवस मोठे मजेत गेले. मीहि मानसिक दृष्टया बराच ताळ्यावर आलो होतो. तो पुढे बंगलोरला निघून गेल्यावर मी पुन्हा स्वत:ला कामाला जुंपून घेतले; नव्या दमाने नव्या हुशारीने. मी मालतीला पत्र लिहून रमेशच्या आगमनाने तिच्या इंग्लंडला जाण्याची बातमी मला मिळाली आहे, नि लवकरच त्याबाबत अभिनंदन करण्याची संधीही मिळेल असे तिला आश्वासन दिले होते. किंबहुना तिचे मी

आगाऊच अभीष्टचिंतन केले होते. इंग्लंडला जाण्याकरिता बोटीवर चढण्यापूर्वी पुष्कळ दिवस आधी मला तिने कळवावे म्हणजे तिला निरोप द्यायला, 'शुभास्ते पन्थान:' म्हणायला, मी स्वतः जातीने हजर राहीन असेंहि तिला मी कळविले.

●

# ६

फौजदारी खटले नि चौकशांच्या कंटाळवाण्या कामात अपेक्षेबाहेर जास्त दिवस मला जिल्ह्यातून भटकावे लागत होते. यथाशक्ति काळजी घेऊनही या भागात सर्रहा असणाऱ्या हिवतापाच्या तडाख्यात मी सापडलो होतो. मी धारवाडला परतलो तो प्रकृती बिघडलेलीच होती. सिव्हिल सर्जनचाहि सल्ला पडला की काही दिवसांची रजा घेऊन मी विश्रांति घ्यावी. रजा मंजूर होताच काही दिवस बंगलोरला राहून नंतर उटकमंडला थारेपालट करण्याकरिता घालवावे असे मी ठरवीत होतो. धारवाड सोडणार त्याच दिवशी वडिलांकडून तार आली की गुरुदेव आमच्या एका ओळखीच्या गृहस्थांकडे सध्या मुंबईस आलेले आहेत. साहजिकपणे बेत बदलून बंगलोर ऐवजी मी मुंबईला निघालो.

माझ्या डॉक्टर बंधूंनी मला तपासून सांगितले, की मला हिवतापाची बाधा झाली आहे. औषधयोजना करून संपूर्ण विश्रांती घेण्याचा सल्ला दिला. सायंकाळी गुरुदेवांची चौकशी केली तो कळले की, ते मुंबई सोडून केव्हाच गेले. परंतु, गुरुदेवांनी मुद्दाम निरोप ठेवला होता की, मी अहमदनगरला जावे. तेथे ते मला निश्चितपणे

येऊन भेटतील. डॉक्टर बंधूंच्या परवानगीने मी त्याच रात्री अहमदनगरचे प्रस्थान ठेवले. माझ्या आईला नि वडिलांना मला पाहून विशेष आनंद झालेला दिसला. आई म्हणालीच, "किती वाळला आहेस रे! वजनही कमी झाले की," वडिलांनी पुस्ती जोडली. "हिवतापामुळे असेल." गुरुदेवांनी नगरला येण्याचे कबूल केले असून कोणत्याही क्षणी ते आपल्या घरी येतील, ही बातमी ऐकून तर आई-वडिलांना फारच आनंद वाटला. आईचा उत्साह तर विचारूच नका. "गुरुदेवांच्या स्वागताकरिता घर कसं लखलखीत केलं पाहिजे." ती म्हणाली. तिने सर्व नोकरांना बोलावून साफसफाईची ताकीद दिली; व स्वतः देखरेख चालविली. आपल्या हाताने सारखे काहीं ना काहीतरी ती करीत होती. वडिलहि म्हणाले की त्यांची नि गुरुदेवांची गाठ काही वर्षांपूर्वी पडली होती. पण त्यावेळी तरी तो एवढा कोणी मोठा सत्पुरुष असेल अशी त्यांची भावना झाली नव्हती. त्यांनी हेहि कबूल केले कीं अशा तऱ्हेच्या संन्याशी जीवनातही काही तथ्य असू शकते याची त्यांनी यापूर्वी कधीच गंभीरपणे दखल घेतलेली नाही. दोन दिवस आईच्या कामाचा झपाटा चालू होता. अगदी कोपरान्‌कोपरा धुंडाळून तिने साफसफाई केली होती. सामानाची व्यवस्थित हलवाहलव नि मांडणी चालली होती. गुरुदेवांना काय आवडते, त्यांच्या चवीपरी काय आहेत, की ज्या सांभाळल्याने त्यांना आमच्याकडील राहणे सुखाचे होईल; याची विचारपूस तरी तिने माझ्याजवळ किती वेळा करावी? "रामेश्वर नि मद्रास या दोनच ठिकाणी मी गुरुदेवांजवळ होतो तेवढाच." मी आईला सांगितले. "रामेश्वरात आमचा मुक्काम एका गरीब ब्राह्मणाच्या कुटुंबात होता नि तिथेही गुरुदेव अगदी आरामात राहात होते. मद्रासमध्ये कोट्याधीशाच्या घरी होतो पण म्हणून तेथील राहणे विशेष आवडले आणि तेथील श्रीमंती ऐषारामामुळे त्यांच्या वागण्यात बोलण्यात फरक पडला, असेहि दिसले नाही. तेव्हा यजमानाची आर्थिक परिस्थिती, ऐषाराम किंवा तत्सम गोष्टी यांचा गुरुदेवांच्या राहणी-वाग-

णुकीवर काहीच परिणाम होत नसतो" हे मी आईला पुनःपुन्हा समजावून सांगितले. पण आईची समजूत पटेना. गुरुदेवांचे आपल्या येथील वास्तव्य जास्तीत जास्त सुखकर व्हावे याकरिता ती सारे कष्ट उपशीत होती. इतके की नोकराचाकरांच्याहि मनात असे विचार येऊन गेले असावेत की असा कोण बडा पाहुणा येणार आहे की स्वतः मालकीण इतक्या चोखंदळपणे व निरलसपणे घराची साफसुफी नि रेवठेव करीत आहे? शेवटी एकदा आईच्या मनासारखे सर्व घर व्यवस्थितपणे लावून झाले.

आमचा चहा संपत असेल इतक्यात दारात घोडागाडी थांबल्याचे ऐकायला आले. मी धावतच पुढील दारी गेलो; स्वामीजी उतरले होते; नि गुरुदेव गाडीतून उतरत होते. मी मोठ्याने ओरडलो "गुरुदेव आले" नि धावतच बंगल्याच्या पायऱ्या उतरून त्या दोघां-जवळ गेलो. नोकरही सामान उतरावयाला सरसावले. पण, त्यांना उचलण्यासारखे काही सामानच नव्हते. स्वामीजींच्या हातात दोन गाठोडी होती; तर गुरुदेवांच्या खांद्यावर झोळी असून डाव्या हातात पाण्याचा तांब्या नि उजव्या हातात भला मोठा सोटा होता. कितीतरी दिवसांनी गुरुदेवांची नि माझी भेट होत होती. माझा आनंद गगनात मावत नव्हता. माझ्या तोंडून शब्द फुटेना. डोळ्यातून आनंदाश्रू घळ-घळा वाहू लागून गालावर ओघळू लागले. त्यांचा माझ्यावर एवढा प्रभाव पडला आहे याची जाणीवच तोपर्यंत मला झाली नव्हती. आईवडिलांनी दाराशी येऊन उभयतांचे अत्यादराने स्वागत केले. आम्हा सर्वांवर एकतऱ्हेचे मानसिक दडपण पडल्यासारखे झाले होते. गुरुदेवांच्या सान्निध्यात तो सर्व भार हलका झाल्यासारखे आम्हा सर्वांना जाणवले. गुरुदेव नेहमीसारखेच दिसत होते नि स्वामीजी आज्ञाधारक अबोल शिष्यासारखे वागत होते. मी स्वामीजींना मिठीच मारली. कारण, त्यांना भेटूनही बरेच दिवस लोटले होते; आणि इतक्या दिवसांनंतर भेटल्याचा आनंद हृदयात मावत नव्हता. रामे-श्वर सोडल्यापासून आमची भेट झालीच नव्हती. गुरुदेव किती पटकन

नि सहजपणे आमच्यात समरस झाले. मला नि माझ्या मातापित्यांना भेटायची त्यांना उत्कंठा होती, म्हणून ते आले असे त्यांनी सांगितले. मी माझ्या मलेरियाच्या दुखण्याची व चालू असलेल्या औषधोपचारांची माहिती त्यांना दिली. गुरुदेव व स्वामीजी, त्यांच्याकरिता राखून ठेवलेल्या खोल्यांतून गेले, आणि आईने स्वयंपाकघराकडे मोर्चा वळविला. जेवणाखाण्याची सर्व तयारी तिने जय्यत करून दिली होती. त्यावर तिची जातीने देखरेख होत होती. मी वडिलांना दिवाणखान्यात बसवून स्वामीजी व गुरुदेवांना काही हवे नको विचारायला त्यांच्या खोल्यांकडे वळलो. स्नानानंतर स्वामीजी माझ्या खोलीत आले नि त्यांनी माझे कसे काय चालले आहे याची चौकशी केली. त्यांची मला भेटण्याची फार इच्छा होती, पण बंगालमध्ये त्यांची भ्रमंती चालू होती इतके दिवस; त्यामुळे जमले नाही भेटायला. मद्रासच्या मुक्कामात गुरुदेवांसह माझे दिवस कसे काय गेले याचीही त्यांनी बारकाईने चौकशी केली; नि गुरुदेवांबद्दलच्या माझ्या भावना लक्षात घेऊन त्यांनी माझे अभिनंदनही केले. कारण, गुरुदेवांनीहि माझ्याकडे लक्ष देण्याचे ठरविले असल्याने जीवनातील तो एक अलभ्य लाभ मला घडला होता असे स्वामीजी म्हणाले.सरकारी नोकरीतहि मी चांगल्या हुद्यावर असल्याचे ऐकून त्यांना संतोषच वाटला. पुष्कळ दिवसांनंतर भेट होत असल्याने आम्हाला कितीतरी बोलायचे होते. आमचे बोलणे चालू असता आई माझ्या खोलीत आली नि जेवण तयार असल्याची तिने वर्दी दिली. गुरुदेवांना जेवण फारच आवडले. सुग्रणपणे नि इतकी मेहनत घेऊन प्रत्येक पदार्थ सुरेख बनविल्याबद्दल त्यांनी आईचे मन:पूर्वक आभार मानले. जेवणाच्या टेबलावर इकडच्या तिकडच्या गप्पा चालूच होत्या, त्यातच नगर शहरात राहणाऱ्या त्यांच्या माहितीच्या गृहस्थांबद्दल गुरुदेवांनी माझ्या वडिलांकडे चौकशी केली. गुरुदेवांनी वडिलांना निक्षून सांगितले की त्यांनी आईच्या तब्येतीची विशेष काळजी घ्यायला हवी—कारण तिची प्रकृति तेवढीशी ठीक दिसत नाही. वडिलांनाहि त्यांनी सुचविले की तेहि थकलेले दिसतात;

आणि त्यामुळे प्रकृति जरा नरमगरमच वाटते. वडीलहि उत्तरले की ती दोघेहि आता थकलीभागली घोडी झालेली आहेत नि माधवच त्यांची म्हातारपणची काठी! गुरुदेव यावर काही न बोलता फक्त हसले. "धंद्यातून आता मी निवृत्त झालो आहे नि निवृत्तीचे जीवन जगत कसेबसे उरलेले दिवस घालवायचे झालं!" वडील म्हणाले, "गुरुदेव, तुम्ही आलाच आहात त्यासारखे बरेच दिवस आमच्याकडे राहा. नि मृत्यूनंतर खरोखरच काही जीवन असेल तर ते जीवन सुखासमाधानाने व्यतीत करायला उपयुक्त होणारे काहीतरी आम्हांला शिकवा तरी." गुरुदेवांनी उत्तरादाखल काहीच न बोलता एवढेच म्हटले, "थोडे दिवस राहण्याच्या हेतूने मी इथे आलो आहे यावेळी. कारण, अहमदनगरच्या आसपास असलेल्या कित्येक ठिकाणी मला जायचे आहे." गुरुदेवांना अहमदनगरची नि त्याच्या आसमंतातील प्रदेशाची इतकी बारीकसारीक माहिती दिसली की, ते जेव्हा एकेका ठिकाणाबद्दल बोलू लागले, तेव्हा अहमदनगरला इतके दिवस राहूनहि एवढी बारीकसारीक माहिती आपणालासुद्धा नाही, याचे आम्हा सर्वांना आश्चर्य वाटले. त्यामुळे गुरुदेवांना मी विचारलेसुद्धा की, "अहमदनगर जिल्ह्यात ते किती दिवस राहिले आहेत यापूर्वी?" ते म्हणाले "या भागात मी इतक्या वेळा संचार केला आहे की या टापूतील खडान् खडा माहिती मला आहे. येथील दगडन् दगड नि झाडन् झाड, मी ओळखतो. मी विश्वाची भ्रमंती केलेला मनुष्य, त्यामुळे अखिल हिंदुस्थानात असे एकहि ठिकाण नाही की मी तिथे कधी गेलेलो नाही." जेवणं संपल्यावर स्वामीजी व गुरुदेव आपापल्या खोल्यात विश्रांतीकरिता गेले.

संध्याकाळी आम्ही दिवाणखान्यात बसलो होतो; नि स्वामीजींच्या आगमनाची वर्दी कानी पडताच त्यांना भेटण्याकरिता माझ्या वडिलांची काही स्नेहीमंडळीहि जमा झाली होती. त्यांना पाहून गुरुदेवांनी वडिलांना सुचविले की त्यांच्या आगमनाची शक्यतो जाहिरात व्हायला नको आहे. कारण, काही दिवस शांतपणे घालवायच्या विचाराने ते

यावेळी इथे आले आहेत. त्यामुळे आमचा तेथील मेळावा अगदी घरगुती लोकांचा–छोटया कौटुंबिक संमेलनासारखाच होता. लोकांच्या दर्शनाकरिता झुंडी वगैरे गोष्टींचा अभाव होता. सर्वजण सुखासनावर बसून आमच्या दिलखुलास गप्पा-चर्चा चालू होत्या.

आई म्हणाली, " गुरुदेव, माधव हा आमचा सर्वात धाकटा मुलगा. त्याने आता स्थिरस्थावर होण्याच्या मार्गाला लागावे अशी, म्हातारपणी, आमची दोघांची इच्छा आहे. आता त्याला चांगली नोकरी लागली आहे. तेव्हा आता त्याचे लग्न जितके लवकरात लवकर होईल तेवढं बरं नव्हे का ? पण तो तर म्हणतो की आपण आजन्म अविवाहित राहणार ! तुमचे तो ऐकेल. कारण, तुमचा त्याच्यावर इतका प्रभाव आहे की तुमचा आज्ञाभंग तो करणार नाही. तुम्हालाही नाही का वाटत की, त्याने आता स्थिर व्हावे ?" गुरुदेवांनी स्मित केले. माझ्याकडे एक दृष्टिक्षेप टाकला नि ते वडिलांना म्हणाले, " तुम्हाला तुमच्या मुलाचे हित व्हावेसे वाटते ना ? ते हित तुमच्या पसंतीच्या नि तुम्ही आखून दिलेल्या मार्गाने गेल्यानेच साधणार, नाही तर नाही, असं खरंच का तुमचं मत आहे ?" वडील उत्तरले, " आता जीवनात स्थिर होण्याशिवाय करायचं उरलंय तरी काय ? शिक्षण पुरे झाले, कायमची नोकरी आहे, जे हवे ते सर्व काही आहे. तेव्हा, आम्हा सर्वसाधारण लोकांसारखे त्यानेहि लग्न करून कुठेतरी स्थिर व्हावे यातच आता आमचे समाधान ! आजन्म अविवाहित राहून काय सार्थक व्हायचे आहे हे मला तरी कळत नाही. त्याने त्याच्या पसंतीच्या मुलीशी लग्न करावे; कारण, त्याची पसंती चांगलीच असेल अशी आमची खात्री आहे. नि तशी पसंती करताना त्याने जरी परजातीय व परधर्मीय मुलीशी लग्न केले तरीहि आम्ही त्याच्या आड येणार नाही. आपले हिताहित कळण्याइतका तो मोठा झाला आहे, नि त्याप्रमाणे पावले टाकण्यास तो समर्थहि आहे. आमची म्हातारपणची उरली सुरली इच्छा आता एकच की तो सुखी आहे हे डोळे भरून पाहावे इतकेच." गुरुदेव किंचित गंभीर झाल्या-

सारखे वाटले. ते म्हणाले, " तुम्ही ज्या तऱ्हेने त्याला वाढवलात, जे उच्च शिक्षण दिलेत त्याचा विचार करता; त्याचे त्याने आपले जीवित घडवावे नि तसे घडविण्याइतका तो सुज्ञ व समर्थ आहे असे नाही का तुम्हाला वाटत ? तुम्हाला तो अजून लहान मूलच वाटतो का ? की त्यामुळे स्वतंत्र विचाराने त्याचे त्याने काही ठरवू नये ? तुमच्या मनात मुलाचे हित व्हावे असे खरोखर आहे की, तुम्ही जसे आपले जीवन घालवले, तशीच त्यानेहि आपल्या आयुष्याची मांडणी आखणी करावी या फिकिरीत तुम्ही आहात ? तुम्ही ज्याप्रमाणे आपले आयुष्य घालविले तेच एकमेव आदर्श जीवन आहे, म्हणून त्याप्रमाणेच इतरांनीहि चालावे असे तुम्हाला मनापासून वाटते का ? तुम्ही आजपर्यंत जे वैवाहिक जीवन जगत आलात, त्या जीवनात पदार्पण करीत असताना तुमच्यासमोर खरोखरच एखादा आदर्श ठेवून तुम्ही ते जीवन पत्करलेत असं तुम्ही हमखास म्हणू शकाल ? त्या जीवनात तुम्ही कितपत यशस्वी झालात याचा विचार तरी तुमच्या मनात कधी आला का ?–की तसलीच ध्येये, तसलाच आदर्श पुढे ठेवूनच तुमच्या मुलांनीही आपले कौटुंबिक जीवन उभारावे याबद्दल तुम्ही आग्रह धरावा ?" वडिल म्हणाले, " सुख-शांति-समाधान यापेक्षा कुठला आदर्श नि कुठले ध्येय उदात्त आहे हे मला तरी समजत नाही. "

गुरुदेव म्हणाले, " मला तुमच्याकडून मनःपूर्वक, खरीखुरी कबुली हवी आहे–स्वच्छ नि स्पष्ट कबुलीजबाब हवा आहे की तुमच्या आतापर्यंतच्या आयुष्यात, किंवा आताहि, उत्तर आयुष्यात, तुम्ही खरोखरच सुखी-शांत-समाधानी आहात ! कृपा करून उत्तर देण्याची घाई करू नका. विचारपूर्वक, आतापर्यंत घालविलेल्या जीवनाचे, व आता जगत असलेल्या जीवनाचे डोळसपणे, सावकाश, निरीक्षण व परीक्षण करून तुम्हाला सोयीचे वाटेल त्या दिवशी या प्रश्नाचे उत्तर द्या. तुम्ही सुखी आहात, समाधानी आहात त्यामुळे तुमची मनःशांती अविचल आहे, असे आढळून आले, आता कसल्याहि इच्छा-आकांक्षा राहिलेल्या नाहीत, ना मनाला कसली चिंता वा हुरहूर,

काळजी नि व्यथा, अशी तुमची स्थिति झाली आहे ही खात्री तुमची तुम्हाला पटली असली तरच तुम्ही तुमच्या मुलाला तुम्ही चोखाळला तोच मार्ग बरोबर आहे असे खात्रीने म्हणू शकता ! तसे नसेल तर तुमची विचारसरणी, तुम्ही पत्करलेली जीवनप्रणाली जशीच्या तशी त्याने घ्यावी हे म्हणणे असमंजसपणाचेच ठरेल. कारण, तो जीवनमार्ग पत्करल्यामुळे त्याचेहि जीवन दुःखी-कष्टी वेदनामय होणार. तुमच्या सारख्याच कधीहि न संपणाऱ्या आशा-आकांक्षा यांच्या गुंतवड्यात तो गुरफटला जाणार. त्याचा शेवट तुम्हालाहि न चुकलेल्या असमाधानातच होणार ! मुलाचे हित शोध-णारी प्रेमळ मातापित्यांची ही दृष्टि नव्हे. तेव्हा, मला तुमच्याकडून स्पष्ट उत्तर हवे की, तुमच्या हृदयात तुमच्या मुलांची एकमेव हित-बुद्धि-भले-होण्याची इच्छाच प्रभावीपणे आहे की त्याचे भावी आयुष्य बरबाद होईल याचाच विचार प्रभावी आहे ? फक्त ती बरबादी, वरवर पाहता तुमच्या लक्षात येत नाही इतकेच ! तुमच्यासकट सर्वजणांची जीवनाकडे पाहण्याची हीच दृष्टि असते की आपले जीवन सुखी, संतोपदायक व अढळ मनःशांतीचे कसे घडेल ? तुम्ही इतकी वर्षे अपरंपार मेहनत केलीत,कष्ट उपसलेत; तुम्हाला या तिन्ही पैकी काय नि किती प्रमाणात साध्य झाले आहे ? जर काहीच नसेल, तर तुमचे सारे प्रयत्न, सारे कष्ट व्यर्थ अन् मार्ग चुकीचे होते हेच नाही का स्पष्ट होत ? परिस्थितीच्या कचाट्यात सापडून जीवन-प्रवाहात आपण अडकलो की मध्येच जीवनमार्ग बदलणे शक्यच होऊ शकत नाही हे मी समजू शकतो. किंबहुना तसा ज्या थोड्यांनी प्रयत्न केला ते क्वचितच यशस्वी झालेले आहेत---अशा प्रयत्नात ! कारण प्रवाहाच्या ओघाविरुद्ध पोहून जाणे सोपे नाही, फार चढा मार्ग आहे तो---दमछाक करणारा, तेव्हा अशा प्रवाहात उडी घेण्यापूर्वीच विचार करणे हेच सयुक्तिक ठरत नाही का ? त्याने आयुष्यातील कितीतरी संकटे, अगतिकता, जीवनातील वैफल्य नि अपेक्षाभंग यांना टाळता येते. तुम्हाला तुमच्या मुलाच्या हिताची, खरोखरच,प्रामाणिक तळमळ

असेल, त्याचे अनहित होऊ नये अशी इच्छा असेल, तर कसलाहि आडपडदा न ठेवता तुम्हांला आजपर्यंत आलेल्या अनुभवांशी त्याची तोंडओळख करून द्यायला हवी तुम्ही; की 'मागच्यास ठेच पुढचा शहाणा' या न्यायाने,त्याच्या जीवनात,तुम्ही परंपरागत मार्ग चोखाळल्यामुळे, तुम्हांला ज्या अपेक्षाभंग नि वैफल्यांच्या संकटांशी जन्मभर मुकाबला करावा लागला, तो त्याला तरी करावा लागणार नाही. तुम्ही तुमची जीवनमूल्ये तुमच्या अनुभवाच्या कसावर घासून–पारखून नीट तपासून घ्यायला हवीत.पण भोवताली चालते मात्र असे की आपण वावरत असलेला भोवतालचा समाज त्यातील आपले स्थान नि मानमरातब,सामाजिक रूढी,कौटुंबिक परंपरा, आणि वाडवडिलांची इच्छा यावरच ती मूल्ये मापली-तोलली जातात. जगाच्या नि समाजाच्या दृष्टिकोनातून स्वत:च्या मुलाचे हित पाहणे ही वरवरची दृष्टि झाली. खरी हितैक दृष्टि यापेक्षा सखोल हवी. कारण हा प्रश्नच तेवढा गंभीर आहे. अंतर्मुख होऊन विचार नि अनुभवांनी तुम्हांला आलेले शहाणपण, या दोघांचा समन्वय करून जे ठरवाल तेच एकमेव तुमच्या सुपुत्राच्या हिताचे ठरेल. तेव्हा मला तुम्हा दोघांच्याहि मनावर निक्षून ठसवावयाचे आहे ते हे की, जरा गंभीरपणे या प्रश्नाकडे पाहण्याचे ठरवा. आतापर्यंतच्या जीवनात तुम्हाला आलेल्या अनुभवांची उजळणी करा; आणि मग मला सांगा की तुमच्या प्रिय पुत्राला तुमचा सल्ला काय आहे !

"प्रामाणिकपणे विचार करण्याचे टाळायचे, सूक्ष्म निरीक्षणाने सुस्थिर अनुभवाकडे डोळयास डोळा देऊन पाहायला घाबरायचे कारण जे सत्य आहे ते रुचत नाही. यामुळेच तुम्हां सर्वांच्या जीवनात दु:ख कोंदाटून गेलेले आहे. तुम्ही स्वत: नि तुमच्या परिवारातच हे खरे आहे असे नव्हे, तर संसारातील प्रत्येकाबाबत हे खरे आहे; ती म्हणजे पळवाट ! माणूस त्या पळवाटेलाच समाजहित, श्रद्धास्थाने, धर्म–विचार, रूढि, देशभक्ति, तात्त्विक बैठक नि जगात राहायचे तर चारचौघांसारखे राहायला हवे अशासारखी भडक नावे देतो इतकेच.

ज्याला तुम्ही सुस्थिर समाज म्हणता, सामाजिक रीतिरिवाज म्हणता त्यातच प्रत्येकजण असुखी आहे; आणि तरीहि प्रत्येकाची ही चमत्कारिक धडपड दिसते की या ना त्या पद्धतीने आपल्या मुलाबाळांनीहि आपल्याच चाकोरीतून आपला जीवनक्रम आक्रमावा असा प्रत्येकाचा आग्रह असतो. जगाच्या दुःखात यामुळे अधिकाधिक भरच पडत आहे. या सर्वांला कारण दिसते ते इतकेच की, सर्वसामान्यपणे जगात अज्ञान फार आहे; आणि प्रामाणिक विचार करणे व सूक्ष्म निरीक्षण परीक्षण करणे यांचा संपूर्ण अभाव आहे. तुम्ही जर प्रामाणिकपणे विचार कराल नि आपल्या अनुभवांचे नीटपणे परीक्षण व निरीक्षण कराल तर माझी खात्री आहे की, ज्या चाकोरीतून गेल्याने तुम्ही स्वतः सुखी तर नाहीतच झालात; पण त्याने तुमच्या असुखातच जास्त भर पडली, त्या चाकोरीतून आपले जीवन घडवायचा तुम्ही तुमच्या मुलांना कधीही आग्रह करणार नाही. तेव्हा माझी अशी इच्छा आहे. की तुम्हीच तुमचे भूतकालीन व चालू जीवन जरा डोळसपणे पाहून घ्या.

"त्यावर गंभीरपणे विचार करून जे काय मत बनवायचे ते बनवा. तुमच्या मुलाचे भावी जीवन अपेक्षाभंगाचे, विफल होणार नाही, तुमच्यापेक्षा पुष्कळच कमी गुंतागुंतीचे, जास्त मनमोकळे आणि तुमच्या उदात्तीकरणाच्या कल्पनेप्रमाणे तुमच्यापेक्षा जास्त उदात्त कसे होईल. याची भरीव साधने तुम्ही स्वतः शोधून,तुमच्या मुलांच्या हाती तुम्हीच सुपूर्त करा. मी तुम्हाला विचार करायला भरपूर वेळ देतो. उद्या जेव्हा तुमचे प्रश्न समजावून घेण्याकरिता आपण एकत्र जमू तेव्हा तुमचे म्हणणे ऐकायला मला फार आवडेल. मी तुम्हांला व तुमच्या मुलाला मदत करायला आलो आहे याची खात्री असू द्या. त्याकरिता तुमच्यापासून मला कसल्याहि बिदागीची अपेक्षा नाही की तुमच्या मुलाकडून कसल्या बक्षिसाची ! "

गुरुदेवांचे बोलणे संपले. आम्ही सर्वजण जरा वेळ स्तिमितपणे, गप्प बसून राहिलो होतो. नंतर त्यांनी फिरायला जायची इच्छा प्रगट

केली. स्वामीजींनी व मी गुरुदेवांबरोबर बाहेर पडण्याकरिता दिवाणखाना सोडला. कितीतरी दूरवर आम्ही फिरायला गेलो होतो. परतायला त्यामुळे जरा उशीरच झाला होता. गुरुदेव जेवले नाहीत. त्यांनी फक्त पेलाभर दूध घेतले. जेवत असताना वडिलांनी स्वामीजींकडे चौकशी केली की त्यांचा नि गुरुदेवांचा सहवास किती दिवसांचा आहे. स्वामीजींच्या उत्तरावरून तीस वर्षांहून अधिक वर्षे ते गुरुदेवांना ओळखतात असे कळले. त्यावर आई म्हणाली, " मग एवढ्या प्रदीर्घ अवधीत तुम्ही पुष्कळच ज्ञान संपादन केले असेल नाही ?" स्वामीजी म्हणाले, " त्यात शिकण्यासारखे काहीच नव्हते; विसरायचेच पुष्कळ होते. ज्यामुळे माझ्या आयुष्यात अहंकार प्रभावी होऊन असुखच वाढत होते; ते शिक्षण किंवा ज्ञान किंवा अशा अनेक जाणीवा विसरायला शिकलो मी " वडील त्यावर म्हणाले, " स्वामीजी, तुम्ही निःसंकोचपणे सांगा की तुम्हांला आत्मदर्शन घडलेय का ?" स्वामीजी उत्तरले, " माफ करा 'हो' किंवा 'नाही' या स्वरूपात मला तुमच्या या प्रश्नाचे उत्तर देता येणार नाही. स्पष्टच सांगायचे तर सत्यदर्शन, आत्मदर्शन वगैरे म्हणतात ना तो अनुभव आहे. जे नाही ते मिळवायचे अशा स्वरूपाचे ते साध्य नाही. ज्याचे स्वरूपच जिथे अनिश्चित, 'नेतिनेति' त्याबद्दल निश्चित भाषेत कसं बोलता येईल ? जे 'अज्ञात' च आहे ते 'समजले' असे म्हणणे कसे शक्य आहे ? कारण जे 'अज्ञात' 'ज्ञात' झाले ते कधी 'अज्ञात' नसतेच मुळी, नि 'अज्ञात' राहातहि नाही. जे समजल्याने, न समजण्यासारखे जगात काही उरलेच नाही, अशी जी स्थिति त्याला म्हणतात आत्मदर्शन-सत्यदर्शन. तेथे अज्ञानाचा मागमूसच राहात नाही. ज्ञात्याच्या ठिकाणी म्हणूनच, कुणालाहि सत्यदर्शन झाले असे म्हणता येत नाही. ज्ञानाच्या असीम व अथांग सागरात 'मी' पणाचे अज्ञान नि 'अहंभाव' कुठल्याकुठे लुप्त होतो. नदीचे अस्तित्व कुठपर्यंत ? ती ज्या प्रदेशातून वाहात असताना दोन काठांतून तिचे वेगळेपण दिसते तोपर्यंतच. महासागराला मिळाल्यावर तिचे अस्तित्व उरतेच कुठे ?

अनेक नद्या अनेक भू-भागांतून येऊन सागराला मिळतात. पण, एकदा त्यांचे सागराशी मीलन झाले मात्र, त्यांचे वेगळे अस्तित्व सागर-लहरीतून इतके लुप्त होते की इतरांना राहोच पण त्यांचे त्यांनाही आपले वेगळेपण दाखविता येणे अशक्य होऊन बसते. सागराला नि नदीला त्यांचे त्यांचे असे वेगळे अस्तित्व असतेच; पण एकमेकांत ती मिसळून गेली की सागराला आपले नदीवेगळे अस्तित्व सांगता येत नाही; की नदीला आपली सागरावेगळी ओळख देता येत नाही. त्याचप्रमाणे एकदा आपले अज्ञान नाहीसे झाले, किंवा द्वैत म्हणजे काय नि अद्वैत म्हणजे काय याची एकदा मनोमन खूण पटली की, जो उरतो तो केवळ अनुभव–जेथे 'मी' 'तू' पण यांचे वेगळेपण वा अस्तित्वच राहात नाही. मी काय म्हणतो ते स्पष्ट झाले नसेल तर तो माझा शब्ददारिद्र्याचा किंवा विचार सुस्पष्ट करण्याच्या दुबळ्या सामर्थ्याचा दोष आहे असं म्हणून सोडून द्या झालं."

आईने स्वामीजीना विचारले, "आजन्म ब्रह्मचारी राहण्याचे व्रत पत्करून व सर्वसंगपरित्याग करून तुम्ही असुखाला जिंकलेत आणि त्यामुळे खरेखुरे सुखी समाधानी जीवन जगत आहात असं तुम्हांला मनोमन वाटतं का? तुमचा हा मार्गच अचूक आहे, त्यात प्रतारणा होण्याचा संभव नाही, याची काय हमी आहे तुमच्याजवळ?"

स्वामीजी उत्तरले, "माताजी, तुम्ही प्रश्न विचारला आहेत खरा, पण विचारण्यापूर्वी जरा विचार करायला हवा होतात. परंतु, तो तुमचाही दोष नव्हे. पूर्वग्रहदूषितदृष्टीने या विषयांकडे सर्व सामान्यजन पाहतो; नि त्यामुळे अशा प्रकारे प्रश्न केला जातो. स्पष्टच सांगायचे तर मी सर्वसंगपरित्याग केला आहे हेच मुळात खरे नव्हे. मी फक्त जीवनात नसत्या भानगडी उत्पन्न होण्याचे टाळले आहे. भौतिक सुखे नि सामाजिक जीवन या अनुरोधाने तुम्ही म्हणत असाल तर मला हे प्रथमतःच स्पष्ट करायला हवे की जीवनाची एकचएक आखीव रेखीव पठडी पत्करायची म्हणजे नसत्या भानगडीना आपणहून आमंत्रण केल्यासारखे होते; नि परिणामी फक्त नसत्या कटकटी, भगभग व असुख

पदरात पडते. मी अविवाहित राह्यचे ठरविले तेहि या भानगडी टाळण्याकरिता. शारीरिक गरजेच्या नावाखाली विवाह आणि वैवाहिक जीवन म्हणजे, माझ्यापुरता विचार करताना तरी, आयुष्यात फार जबरदस्त किंमत देऊन मिळविलेली गोष्ट ठरली असती. या सर्वांचा आज परिणाम म्हणजे माझ्यापुढे कसल्याहि समस्या नाहीत. माझी कुणापासून कसलीहि अपेक्षा नाही. त्यामुळे अपेक्षाभंगाचे दुःख मी जाणत नाही नि विफलतेची भावना तर उत्पन्नच होऊ शकत नाही. तेव्हा, मी पूर्णांशाने खरा सुखी आहे नि मनाने अत्यंत समाधानी आहे. तुमच्या प्रश्नाच्या द्वितीयार्धाबद्दल बोलायचे तर उत्तर सोपे आहे. जिथे आयुष्याचा साचेबंद विचारच नाही तिथे प्रतारणा किंवा अचूकपणाचा प्रश्नच उद्‌भवत नाही. आमच्या बाबतीत हे मोठे दुर्दैव आहे की आमच्याबद्दल प्रथमतः काहीतरी अवास्तव कल्पना बाळगल्या जातात आणि त्यामुळे गैरसमज मात्र वाढतात. आमचा जीवनाचा ठराविक साचाच नसल्याने आम्ही कुठल्याहि मतप्रणालीशी निगडित नाही. आमचा पंथ नाही. विशिष्ट धर्माबद्दल आमचा आग्रह नाही. आम्हांला कुणाला काही शिकवायचे नाही की कशाचा आम्हांला प्रचार करायचा नाही. त्यामुळे विशिष्ट रूढी, नीतिनियम किंवा संकेत-निर्बंध पाळण्याचेहि आम्हांला कारण नाही. आम्ही आमची शिष्य-परंपरा उत्पन्न करण्याचाहि प्रयत्न करू इच्छित नाही. पंथाचा विचारच जिथे अस्तित्वात नाही तिथे परंपरेचा नि ती परंपरा टिकवण्याचा जगवण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. प्रामाणिक नि स्वतंत्र विचार, अव्यभिचारी अंतर्निरीक्षण, ना कशाची अपेक्षा वा मोबदल्याची दृष्टि अशा वृत्तीने आम्ही सगळीकडे संचार करतो."

"तुम्हाला अप्रिय होणार नसेल; वा कटु वाटणार नसेल तर विचारतो" वडिल म्हणाले, "हिंदुस्थानच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत तुमची जी हेतुशून्य भ्रमंती चालू असते; त्याचा अर्थ तरी काय? काय साधते त्याने? वा तुम्हांला काय साधावयाचे असते?"

स्वामीजी म्हणाले, "आम्हाला काहीच अप्रिय नाही, कसलीहि

कटु भावनाच आमच्यात नसते. त्यामुळे आमचा अपमान किंवा अवमान झाला असं आम्हाला वाटत नाही किंबहुना त्याची आम्हाला कधीच फिकीर नसते. मी मघाशी सांगितले त्याप्रमाणे माझ्यातला 'मी' जो एकेवेळी माझ्यावर पावलोपावली हुकमत गाजवत होता; किंवा आपल्या अस्तित्वाची मला पदोपदी जाणीव करून देत होता; तोच आता कुठे आहे हे माझे मलाच ज्ञात नसल्याने कसल्याच गोष्टीचा आम्हांला विषाद वाटत नाही; की अवमान वाटत नाही. आम्हांला काहीच मिळवावयाचे नसल्याने आमची भ्रमंति तुम्ही म्हणता त्याप्रमाणे खरोखरीच निर्हेतुक असते. निरनिराळ्या गावांना नि प्रांतांना भेटी देण्यात आमची कालक्रमणा चाललेली असते. परिचितांच्या भेटीगाठी होतात. मानवी दुःखाचा परिहार करता आला तर करतो इतकेच."

जेवण झाल्यावर स्वामीजी आपल्या खोलीत परतले. पण माझे आईवडील मात्र काही तरी गंभीर विचारात गुरफटलेले स्पष्ट दिसत होते. तरीहि गुरुदेवांच्या पायधुळीने आमचे घर पुनीत झाले असेच ती दोघे म्हणत होती.

आई मला म्हणाली, " माधव, गुरुदेवांना समजावून घेणे फार फार कठीण आहे, नि त्यामुळे त्यांच्या चवी-परीची, आवडीनिवडीची मला अजूनहि काही म्हणून काही कल्पनाच करता येत नाही रे."

" आई, तू काही काळजी करू नकोस. त्यांचा आनंद नि त्यांचे रुचिवैचित्र्य यांचा काहीसुद्धा परस्पर संबंध नाही बघ."

वडील म्हणाले, " गुरुदेव आपल्याकडेच आणखी काही दिवस राहावेत अशी मी प्रार्थना करतो. कारण त्यांच्या सहवासात आपले फार मोठे कल्याण होणार आहे हे निश्चित."

●●●

# ७

दुसरे दिवशी गुरुदेव भल्या पहाटेच उठले; व आम्ही तिघेही गावात गेलो. गुरुदेवांनी देवळाप्रमाणे मशिदींनाही भेटी दिल्या नि मला आश्चर्य वाटले ते याचे की दोन्हीही प्राकारात त्यांचे आदरातिथ्य सारख्याच आपुलकीने व भक्तिभावाने झाले. जेथे जेथे ते गेले तेथील लोकांचे ते पूर्वपरिचित होतेसे दिसले. ती सर्व मंडळी आमच्यांत अगदी मोकळेपणाने मिळून मिसळून वागत होती. प्रत्येक ठिकाणी आम्हांला चहा–फराळाचा आग्रह झाला. गुरुदेव थोडेसे काही ग्रहण करीत, पण प्रत्येक ठिकाणी धर्माची बंधने गुरुदेवांच्या तरी आड येत नव्हती हे स्पष्टच दिसत होते. निरनिराळे धर्म–ग्रंथ, दार्शनिक ग्रंथ, निरनिराळे पूजाविधी किंवा साधन मार्ग या सर्वांशी गुरुदेवांचा गाढा संपर्क होता असेहि मला आढळले. जिथे गेलो तिथे काही विशिष्ट सांगण्याचा कसलाहि दुराग्रह नाही. प्रत्येक ठिकाणी उपदेश हाच की आपापल्या धर्ममताप्रमाणे वागा. परंतु विचारात प्रगल्भता नि प्रामाणिकपणा असण्याची मात्र कसोशीने काळजी घ्या. स्वतः गुरुदेवांना कसल्याहि धर्माचे बंधन नाही; किंबहुना धर्माचा कडवेपणा

विसराच अशी त्यांची विचारसरणी स्पष्ट; असे असता ते जमलेल्या निरनिराळ्या धर्मांच्या लोकांना मात्र आपापला धर्म पाळायला सांगतात हे कसे याचा मला तरी उलगडा झाला नाही. त्याच ठिकाणी याबाबत शंका निरसन करून घेणे प्रशस्त न वाटल्याने शक्य झाले नाही. परंतु, संधी मिळताच हा प्रश्न त्यांना विचारावयाचाच असे ठरविले. गावात आमच्या घराची प्रसिद्धी निरीश्वरवादी नि सुधारक अशी असल्याने गुरुदेवांबरोबर मला पाहताच लोक चकितच झाल्या-सारखे दिसले.

जेवणाच्या वेळेपर्यंत आम्ही घरी परतलो. गुरुदेव नेहमीप्रमाणे प्रसन्न मनोवृत्तीत होते. जेवणे होत असतानाच त्यांनी माझ्या आईला विचारले, "मग काय, तुमच्या मुलाच्या लग्नाच्या प्रश्नावर काही विचार झाला की नाही ?" आई उत्तरली, "आयुष्यातील आमचे अनुभव काही का असेनात, मला बापडीला आपले वाटते की, आमच्या मुलाने लग्न करावे नि त्यातच त्याचे सुख आहे. लग्नाशिवाय जीवनात स्थैर्यच नाही मुळी ! लग्नच नाही केले तर मग त्याला घर कुठले ? कारण, घराचे 'घर'पण मुळी पत्नी नि मुलांतच असते. ज्याला घर नाही त्याच्या जीवाला विसाव्याचे स्थान नाही. मग समाधानाचे नावच नको. त्याने स्वतःचे घरकुल उभारले नाही तर त्याचे मित्र नि नातेवाईक त्याच्याकडे राहायला जातील तरी कसे ? समाजातहि त्याला काही स्थान उरणार नाही.मग त्याला विचारणार तरी कोण? वैवाहिक जीवन भोगत असताना, माझी खात्री आहे की, त्याला सुखी नि समृद्ध जीवन सहज जगता येईल. तुमच्या सारख्या साधु पुरुषांचा आशीर्वाद असल्यावर तर त्याला कसलीच काळजी ना कथा !" गुरुदेव मनापासून हसले. आईच्या बोलण्याची त्यांना गम्मत वाटली असावी. गुरुदेवांनी नंतर माझ्या वडिलांकडे पाहिले. ते संथपणे बोलत होते, कारण विचारपूर्वक प्रत्येक शब्द जणू तोलून मापून ते वापरीत असावेत. आईच्या मताशी जरी ते सहमत नसले तरी ते म्हणाले, "मी श्रीमंतीत, ज्याच्या घरी गजान्त लक्ष्मी नांदते आहे अशा घरात

जन्म घेतलेला आहे. माझ्या लहानपणापासून मला आठवते, आपण कुणी तरी मोठे व्हायचे, काही वेगळे करून दाखवावयाचे, मानमरातब पैसा, खूपखूप मिळवायचा अशीच ईर्षा मी बाळगून होतो. तेव्हा, मी जरी चांगला उच्च विद्यालंकृत होतो, घरात कशाचीहि कमतरता नव्हती, तरी सामाजिक प्रतिष्ठा मिळविण्याच्या महत्त्वाकांक्षेपायी, या दिवसापर्यंत, आयुष्यात मी फार मोठा झगडा दिला आहे. सुदैवाने सहचारिणी म्हणून पत्नी मिळाली ती इतकी चांगली मिळाली की वैवाहिक जीवनात मला काही म्हणून काही उणे पडले नाही. माझ्या दोन्ही थोरल्या मुलांना जास्तीत–जास्त शक्य ते उच्च शिक्षण मिळाले, दैनंदिन जीवनात उद्योगव्यवसायातहि ते दोघेहि सुस्थिर झाले आहेत. त्यांची सांपत्तिक स्थितीहि चांगलीच म्हणायला हवी. पण म्हणून आम्ही उभयता सुखी, समाधानी, आनंदी जीवन जगतो आहोत असे मात्र मी हमखास म्हणू शकत नाही." ते पुढे म्हणाले, "माधवाने लग्न करावे अशी आमची मनापासूनची इच्छा आहे. तुमच्या भाषेत म्हणायचे तर आम्ही जगत आलो ते नि तसलेच साचेबंद वैवाहिक जीवन त्याने घालवावे असे आम्हांला वाटते. कारण, तो जर अविवाहित राहिला, तर मानवी जीवनातील स्खलनशीलतेचा धोका लक्षात घेता, तो कदाचित बिघडेल अशी भीति वाटते. मी मी म्हणणाऱ्यांची हुशार नि असामान्य बुद्धिमत्ता व उज्ज्वल भवितव्य असलेल्यांच्या जीवनाची जी परवड झालेली पाहायला सापडते त्या तऱ्हेच्या आयुष्याकडे तो अविवाहित राहिला तर ओढला जाईल, त्या तऱ्हेची पावले पडण्याची मनुष्याची नैसर्गिक प्रवृत्ति होऊ लागते तशी त्याची दैना होईल या कल्पनेने मन भयभीत होते. लग्न ही बेडी तर खरीच पण त्यामुळेच तो जीवनात निष्कारण हेलकावे किंवा गोतेहि खाणार नाही हेहि तितकेच खरे. दगडापेक्षा वीट मऊ या नात्याने केवळ अविवाहितावस्थेतील संभाव्य संकट–परंपरा टाळण्याकरिता त्याने विवाहबद्ध व्हावे असे आम्ही आग्रहपूर्वक म्हणतो." गुरुदेवांनी आईकडे पाहिले. ती म्हणाली, "यांचे वाक्य न् वाक्य खरे आहे. मी

यांच्या म्हणण्याशी कानामात्रा सहमत आहे." गुरुदेव म्हणाले, " कुठलीही चौकट वाईट आहे असे ठरले की तेच ठोकळेबाज बंधन स्वीकारण्याचा आग्रह धरणे, मग तो प्रत्यक्ष स्वपुत्राच्या बाबतीत का असेना, सुसंगत ठरत नाही. तुम्ही स्वतःच्या जीवनाचा विचार करून कबूल करता ना, की तुम्हाला अपेक्षित सुख नि शांति कधीच मिळाली नाही. आता यापुढे विचार व्हायला हवा तो हाच की अपेक्षित सुखसमाधान का मिळविता आले नाही; त्याच्या आड कुणाचा कसला अडथळा आला ? या प्रश्नाचे उत्तर तुम्हांला सापडले की तुमची समस्या सुटली. शारीरिक गरज नि व्यवहार म्हणून, किंवा अनैतिक जीवनात अटळपणे पडण्याचा धोका टळावा म्हणून तुमच्या मुलाने विवाहबद्ध व्हावे असा तुमचा आग्रह असेल तर जन्मभर लग्नाच्या बेडीत हातपाय अडकवून बंदीवानाचे जीवन घालवावे ही भलतीच मोठी किंमत द्यायला तुम्ही त्याला भाग पाडीत आहात ! येवढे करून तो जेव्हा आपल्या उत्तर आयुष्यात पदार्पण करील, नि जीवनाचा आढावा घेईल तेव्हा त्यालाहि शेवटी, तुमच्यासारखीच कबुली घ्यावी लागेल की, सुख नि शांति त्याला कधीच अनुभवावयास मिळाली नाही. विवाहसंस्था ही एक समाजव्यवस्था आहे. या माध्यमातून लग्नबंधनाविरुद्ध मला काहीच म्हणायचे नाही. आपल्यापुढे सध्या प्रश्न आहे तो तुमच्या सुपुत्राच्या लग्नासंबंधी. तेव्हा, मी जे बोलेन त्याबद्दल कुठलाहि गैरसमज होऊ देऊ नका. कारण, माझे विचार यावेळी लग्नसंस्थेबद्दल नाहीत, किंवा नसणार, तर ते असतील फक्त माधवच्या लग्नाबद्दल ! जाणूनबुजून अहितकारक आयुष्यात पदार्पण करायचे, नि अपथ्यकर खाल्ले ते बाधले म्हणून मग औषधांची शोधाशोध करायची हा शहाणपणाचा मार्ग खासच नव्हे ! रोगाचे कारण सापडल्यावर, ते कारण दूर करणे हे बरोबर, की त्या कारणाला हात न लावताच रोगाची तीव्रता कमी करण्याची खटपट करणे हे बरोबर ! रोगाचे मूळ उखडून टाकून रोग होऊ किंवा उलटूच द्यायचा नाही असे करणेच शहाणपणाचे नव्हे का ? तेव्हा

रोग–मूलहारक उपाययोजना केल्याशिवाय रोगापासून कायमची सुटका व्हायची तरी कशी ? तुम्हीच कबूल करता की तुम्हांला जसे व्हावेसे वाटत होते तसे व्हावयाच्या खटपटीत किंवा जे दु:साध्य ते हस्तगत करण्याच्या धडपडीत तुम्ही आपल्या जीवनाची सारी उमेद घालविलीत; पण त्यातून सुख–शांति–समाधान काही निष्पन्न होऊ शकले नाहीच. त्यावरून हे स्पष्टच नाही का होत की, माणसाने जर जीवनात आशा अपेक्षांना उत्पन्नच होऊ दिले नाही तर त्याला सुख–शांति–समाधान प्राप्त होण्याचा जास्त संभव आहे ?"

गुरुदेव बोलायचे एकदम थांबले. आम्ही सर्वजण त्यांच्याकडे आश्चर्यवत पाहात स्तब्ध बसलो होतो. माझे वडील तर जागेवरून उठले व इकडे तिकडे पाहात काय झाले ? असे विचारू लागले. गुरुदेव सस्मितपणे म्हणाले, " सब कुछ ठीक आहे. पण या विषयावर आज आपण संध्याकाळी बोलू. कारण त्यावेळी माधवाचा एखादा हितैषी आपले बोलणे ऐकायला हजर असण्याची शक्यता आहे." त्यांच्या बोलण्याचा कुणालाच कसलाहि बोध न झाल्याने सर्वजण गुरुदेवांकडे कुतूहलाने पाहू लागले. तेवढ्यात दारात कुणाची तरी गाडी येऊन उभी राहिल्याचा आवाज आला. यावेळी कोण बरे आले असेल असा सर्वांच्याच ओठावर जणू प्रश्न रेंगाळत होता. गुरुदेव वडिलांना म्हणाले " तुमचे ज्येष्ठ चिरंजीव आले आहेत वाटते." त्यांचे वाक्य पुरेही झाले नसेल तो जेवणघराच्या दारात वडील बंधू उभे ! गुरुदेव–स्वामीजींना पाहून तोहि चक्रावला असावा. त्यांच्या पुढे आदराने त्याने मान तुकवली व म्हणाले, "होऊ द्या तुमचे जेवण, माझे उरकायला मला जरा वेळ लागेल. तुम्हाला थांबण्याचे कारण नाही." आई म्हणाली," अरे पण काही पत्र निरोप तरी पाठवावयाचा नाही का ? " तो म्हणाला, " कोर्टाच्या कामाकरिता पुण्यापर्यंत आलोच होतो पण तारीख पुढे ढकलली गेली तेव्हा म्हटलं, जाऊन येऊ नगरला. तेवढीच संधी मिळाली यायला. जेवायच्या वेळेपर्यंत पोचण्याकरिताच तर मी सकाळीच पुणे सोडले." त्याने मुंबईचे सर्व

'ऑल वेल्' असल्याचे सांगितले आणि त्याची स्वतःची प्रकृतीहि छानच दिसली. माझ्या लग्नाच्या प्रश्नाची इतक्या गंभीरपणे चर्चा चाललेली असताना तो आला याबद्दल सर्वांनाच बरे वाटले. जेवण संपवून गुरुदेव स्वतःच्या खोलीत गेले. भावाचे जेवणखाण आटोपल्यावर आम्ही सर्वजण दिवाणखान्यात जमलो. तेव्हा, आईनेच त्याला सांगितले की गुरुदेवांसह सर्वजण माझ्या लग्नाच्या चर्चेत सध्या गुंतलो आहोत.

आईने याबद्दल त्याचे प्रांजल मत विचारले. नि त्यानेहि सांगितले की हा आयुष्याचा प्रश्न असल्याने माधवानेच याबाबत शेवटचा निर्णय घेणे हेच सुसंगत ! आपल्या इच्छा काहीही असोत. तो पुढे म्हणाला, " त्याच्या सुखाच्या दृष्टीने काय योग्य नि अयोग्य हे माधवानेच ठरवायचे आहे. इतरेजनांनी आपली वैयक्तिक मते पुढे मांडून त्याची कुचंबणा करण्यात काही अर्थ नाही. स्वतःचे भलेबुरे समजण्याइतका तो वयाने मोठाहि आहे नि सुविद्यसुद्धा आहे. तेव्हा, ज्याचे त्याने आपापले हित पाहणेच योग्य. मी याबाबत इतकेच म्हणेन की काय ठरवायचे ते ठरविण्याला आताइतकी दुसरी सुयोग्य वेळ नाही. त्याला लग्न करायचे असेल तर उगाच वेळ घालविण्यात हशील नाही. कारण, त्याचे आता लग्नाचे वय झालेले आहे. अविवाहितच राहायचे असे त्याने ठरविले असेल तर प्रश्न अलाहिदा ? " माझे वडील त्यावर म्हणाले, " तू म्हणतोस तेच खरे.पण यावर गुरुदेवांना काय सांगायचे आहे ते आपण ऐकू या. माधवाचा त्यांच्यावर गाढ विश्वास आहे आणि तेहि त्याच्या जीवनाची तड योग्य मार्गाला लावण्यास उत्सुक आहेत. सुदैवाने तूहि आला आहेस. तेव्हा या प्रश्नाचा सोक्षमोक्ष आपण एकदा लावून टाकूया. "

● ● ●

# ८

सायंकाळी माझ्या वडिलांचे मित्र नि नातेवाईक मंडळी जी आदल्या दिवशीहि आली होती; ती सर्वजण गुरुदेवांचे बोल ऐकायला जमली होती. सर्वांचा चहा झाला; नि गुरुदेवांनी कालच्या बोलण्याचे सूत्र पुढे सुरू केले, ते म्हणाले, जेवताना स्थगित केलेले बोलणे सुरू करायचे तर आपणांपुढील प्रश्नाचे स्वरूप असे आहे–

" जीवनातून आशा–अपेक्षांचे उच्चाटण करता येणे शक्य होईल का ? प्रथमतः आपण अपेक्षा नि आशा कशाला म्हणायचे ते ठरवू या; तरच त्याचे खरे स्वरूप आपणाला समजू शकेल. त्या उत्पन्न कशा होतात, किंवा त्यांना उत्पन्न करतो कोण ? हे तुम्ही सर्वजण नीट समजू शकाल तर जीवनातून त्यांचे उच्चाटण जास्तीत–जास्त लवकर करणे तुमचे तुम्हांला साधेलच साधेल.

" आपल्याला शारीरिक व इंद्रियांच्या गरजांतून प्रथमतः मुक्त व्हायचे आहे. त्यांच्यांतून ज्या आशा इच्छांचा नैसर्गिकपणे उगम होतो; तो सर्वसाधारण सर्वच थराच्या माणसांना सहज समजणारा असतो. त्यांच्या बाबतीतली उपाययोजनाहि सोपी आहे. कारण, त्या

गरजांचे अस्तित्व क्षणैक असते; म्हणून त्यांचा परिणाम बराच वेळ किंवा कायमचा टिकणाराहि नसतो. परंतु ज्या इच्छेचा उगम त्यापेक्षा खोलवर असतो त्याबाबत विचार खरा महत्त्वाचा आहे. मन, हृदय, बौद्धिक हुशारी,व स्वाभिमानाचा गोषा पांघरून वावरणारा 'अहंकार' यांमधून वेगळेवेगळेपणाने किंवा एकत्रितपणे इच्छांचा उगम होत असतो. लहान मुलांमध्ये या अपेक्षा नि इच्छांचा आढळ असत नाही. यावरून हेच स्पष्ट होते की या इच्छांचा उगम नैसर्गिक असेल; पण जसजसे वय, बुद्धि, मन, हृदय नि स्वत्वाची वाढ होत जाते तस-तशा इच्छा प्रभावी होत जातात, संख्येने नी तीव्रतेनेहि ! इच्छांचे आंतरिक उगमस्थान लक्षात आल्यावर असेहि लक्षात येऊ लागते की त्यांचा उत्पत्ति, जाति, धर्म, मते, तत्त्वे, सामाजिक आर्थिक नि राजकीय उद्दिष्टे व या सर्वांच्या समन्वयाने बनलेली वैयक्तिक जीव-नाची एक अभेद्य लोखंडी चौकट यांतूनही या इच्छांना निरनिराळे वाळसे नि रूप येत असते. या ना त्या रीतीने आपण या चौकटीत आपले जीवन कोंबू इच्छितो; आणि ते करीत असता, सामाजिक सुरक्षितता, स्थैर्य, सुबत्ता, धनार्जन, मिळकत संपादणे वा मालकी प्रस्थापित करणे, सामाजिक स्थान किंवा राजकीय पुढारीपण अशी एक ना दोन ज्यामुळे आपला अहंकार फुंकरून फुंकरून सदैव फुललेला-धगधगत--राहील,याकरिता आपली सारी शक्ति पणाला लावली जाते. म्हणजेच जर आपण चौकटीबाहेर राहण्याचा प्रयत्न करू तर वरील सर्व गोष्टींना आपोआप छेद जाऊन आपली समस्या सुटू शकते. म्हणून मी पुन:पुन्हा आग्रहाने सांगत आहे की, तुम्हांला तुमच्या मुलाच्या हिताची जर खरोखरच कळकळ असेल तर तुम्ही जी जीवन-प्रणाली पत्करली तीच जीवनप्रणाली पत्करण्याची सक्ति मुलावर करून त्याचे जीवन असुखी करण्याचे पाप आपल्या माथी घेऊ नका. तेव्हा खुल्या मनाने तुम्ही या प्रश्नाचा पुन्हा आमूलाग्र विचार करून तुमचा निश्चय काय ठरतो ते मला उद्या सांगा. एक गोष्ट पुन्हा स्पष्ट करून ठेवलेली बरी; मला व्यक्तिशः तुमच्या मुलाच्या लग्नाबद्दल कस-

लेहि अगत्य नाही; आणि म्हणूनच तुमची जीवनप्रणाली त्याने पत्करली काय वा झिडकारली काय मला त्याचे काहीच नाही." वडिलांचे एक मित्र यावर म्हणाले, " माफ करा गुरुदेव, तुमच्या म्हणण्याप्रमाणे साचेबंद जीवन नेहमीच वाईट असे का धरून चालायचे ?-सर्वच साचे टाकाऊ का ठरतात तुमच्या दृष्टीने ? मानवी जीवनाची, विशिष्ट जीवनसरणीची, साचेबंद चौकट नसेल तर ते जीवन जगणे सुसह्य होईल का ? मला तर वाटते असले जीवन ' शून्य जीवन ' ठरेल.त्यात जगण्यासारखे काही असणारच नाही,आणि ज्यात जगण्यासारखे काही नाही, त्या जगण्यात मौज ती काय ?" गुरुदेव म्हणाले, " ठराविक, साचेबंद, आखीव रेखीव जीवनात, फार काय, प्रत्येक पूर्वनियोजित गोष्टीत त्याचे वैशिष्टच व महत्त्व काही का असेना, त्यामध्ये एकतऱ्हेची महत्त्वाकांक्षा, अहंकारपूर्ति नि संरक्षणाची हमी असतेच असते. जुन्या-नव्या; सर्व योजनांतून, ही सर्व कमीअधिक फरकाने, सांभाळलेली असतातच असतात. अनुभवी व प्रकांड पंडितांची प्रज्ञा त्या योजना घडविण्याच्या मागे कार्यरत असतील. पण, त्याचा अवलंब करणाऱ्यांना मात्र आपल्या साऱ्या हयातभर कष्ट करून, झगडून, जीवनाचा आटापिटा करूनहि, त्यातून अपेक्षित सुखानंद अनुभवणे तर राहू देच, पण डोळ्यांनी पाहायला सुद्धा सांपडत नाही असे मात्र भोवतालच्या जगात पाहिले तर दिसते. त्याचे खरे कारण असे आहे की, सुख हे ध्येय कधीच होऊ शकत नाही; की ते कधीकाळी हस्तगत व्हायचे आहे. तो वस्तुत: सोलीव आनंदाचा अनुभव आहे. ध्येये बदलत असतात. महत्त्वाकांक्षा सदैव उंचावत असतात म्हणूनच त्यांच्या पाठीमागे लागणाऱ्यांना समाधानाच्या बिंदूप्रत कधीच पोचता येत नाही.

" तुमच्या लक्षात एव्हाना एक गोष्ट आली असेल की, आपण जे जीवन जगतो ना ते आपले मन, आपण कुणीतरी आपल्याला भरून दिलेल्या किंवा आपणावर लादलेल्या ध्येय-महत्त्वाकांक्षा किंवा आदर्शाच्या काल्पनिक आराखड्यात गुरफटून टाकून जगत असतो. अशा

स्थितीत, आपले मन, स्वतःचे स्वतः निर्णय घ्यायला स्वतंत्र असत नाही. सारी बौद्धिक शक्ति आपण समोर ठेवलेल्या ध्येयाकडे लागलेली असते. आपल्या जीवनाभोवती आपल्या दुरभिमानी व अहंकारी वृत्तीने विशिष्ट जीवन जगण्याची लक्ष्मण रेषा आपणच आखून रेखून घेतो. त्या चाकोरीतच राहिल्याने तुमचे मन, तुमच्या हृदयस्थ भावना, बुद्धीची टोचणी, व दुराभिमानाचे नि अहंकाराचे फूत्कार यांच्या जरबेत हालचाल करीत असते. मोठी केविलवाणी स्थिती आहे ही. त्याने मनाचा गोंधळ इतका होतो की विचारू नका. अशा गोंधळलेल्या मनःस्थितीत अप्रसन्नता. अशांतता आणि असुख यापेक्षा अन्य कशाची अपेक्षा करता येईल ? जेव्हा तुमच्या मनावर कसलेहि दडपण नसेल किंवा कसल्याहि जुनाट परंपरेचे विशिष्ट जीवनसरणीचे, कौटुंबिक रुढीचे किंवा चाली–रीति राखण्याचे काही गमावण्याचे–काल्पनिक किंवा तत्त्वतः–ओझे बुद्धीवर लादलेले नसेल तेव्हाच मन नि बुद्धि आपापले काम करायला स्वतंत्र असू शकतील. तशी ती मोकळी असतील तरच कुठलाहि अडथळा वा निर्बंध न येता आत्मसंशोधन करण्याचे त्याचे सामर्थ्य वाढेल. विचारात प्रामाणिकपणा येईल. निरीक्षण अव्यभिचारी राहील आणि या सर्वांतूनच जी कृति होईल ती ‘ कृति ’ खरी ‘ मनःपूत ’ ! अशा स्वतंत्र मनालाच जीवनात अत्यंत महत्त्वाचे ठरणारे अनुभव ऐकता येतात, पाहता येतात, अनुभवता येतात आणि हा जो साक्षात्कार, हे जे आत्मदर्शन त्यालाच म्हणतात देव ! जे चैतन्य साऱ्या विश्वाला व्यापून राहिले आहे ती शक्ति आणि निसर्ग यांच्याशी असे खुले मनच सुसंवादी होऊ शकते. स्वतंत्र नि मोकळे असल्याने भूत भविष्यात सांपडून त्या मनाची कुतरओढ होत नाही. ते वर्तमानाशी प्रामाणिक असते. ते चालू क्षणाक्षणाशी मिळते घेऊन चालते. कारण त्याच्या पाठीवर ऐतिहासिक, सामाजिक, धार्मिक पंथाच्या वा राजकारणाच्या किंवा आर्थिक विचारांच्या गोण्या नसतात. कुठलाहि विशिष्ट आदर्श नसल्याने त्या मनाचा भविष्याशी संबंध उरत नाही. कारण त्याला

काही मिळवायचे नसतेच. जोपर्यंत ते मन मुक्त आहे, त्यावर कसलेहि दडपण नाही, तोपर्यंत ते सुखी व प्रगाढ शांतभाव भोगीत असते. मला म्हणायचे आहे ते इतकेच की, मोकळे मन—ज्यावर कसल्याहि भूत वा भविष्यकालीन परंपरेचे, रूढीचे दडपण व बंधन नाही, विशिष्ट जीवनसरणीचा हट्ट नाही, अत्याग्रह नाही तेच मन अव्यभिचारी निरीक्षण व परीक्षण करू शकते. प्रामाणिकपणे विचार करू शकते. तुम्ही हे समजावून घेण्याचा प्रयत्न करा, मग माधवसारख्या हुशार, सुविद्य नि होतकरू, तडफदार तरुणाने आपले भवितव्य स्वतःच ठरवावे नि तसे करायला त्याला आपण संपूर्णतया मोकळीक द्यायला हवी असे नाही का तुम्हांला वाटत ?" माझे बंधू उद्गारले "मी तुमच्याशी संपूर्णतया सहमत आहे. नि खरोखरच तुम्ही हा प्रश्न ज्याप्रकारे हाताळलात त्याला तोड नाही. त्याबद्दल तुमचे आभार मानावे तेवढे थोडेच" गुरुदेव यावर काहीच बोलले नाहीत, माझे मातापिता नि इतर जमलेली मंडळी 'अवाक्' होऊन बसली होती. माझे व्यक्तिशः तर असेच मत झाले की गुरुदेवांनी म्हटले ते खरेच की आम्ही सर्वांनी आमच्या मनाची वाढ खुंटवून टाकली; आणि जीवन असुखी करून बसलो. काल्पनिक आदर्शाच्या पाठीमागे लागून आपण नसत्या भावनांच्या आहारी जाऊन स्वतःचा बळी देतो. याचे कारण सत्य आहे तसे मान्य करायला आम्हांला भीति वाटते. या भ्याड वृत्तीने आम्ही जगात वावरतो, मनाच्या कमकुवतपणे ! गुरुदेवांच्या सुस्पष्ट वाणीने आम्हां सर्वांच्या डोळ्यांत झणझणित अंजन घातले. स्वामीजी शांत होते; स्तब्ध होते. पण, गुरुदेवांच्या वक्तव्यावर ते खूष दिसले. स्वामीजी व गुरुदेव, नंतर, गावात कुणालासे भेटायला गेले. मी एकटाच पाय मोकळे करायला बाहेर पडलो. कारण बंधु, त्यानंतर पुणे कोर्टात चालू असलेल्या खटल्याबद्दल वडिलांजवळ कायदेविषयक चर्चा करीत बसले होते. गुरुदेवांना परतायला फारच उशीर झाला होता; नि ते तसेच झोपी गेले होते. गुरुदेव नगरला कसे आले; नि आपण येण्यापूर्वी गुरुदेवांनी

काय सांगितले हे समजावून घेण्याची बंधूंची इच्छा होती; तेव्हा थोडक्यात मी सर्व सांगितल्यावर बंधूंच्या तोंडून सहज उद्गार पडले– "गुरुदेव खरोखरच एक महान व्यक्ति आहे." गुरुदेवांच्या विचार मांडण्याच्या हातोटीबद्दल बंधू तर खूषच होते. आई आपल्या विचारात गुंग होती. तेव्हा, जेवण होताच मीहि आपल्या खोलीत परतलो. बंधू सकाळीच उठून पुण्याला परत गेले; आणि चहाकरिता आम्ही एकत्र जमलो असता आई म्हणाली, "गुरुदेव, तुमच्या कालच्या बोलण्यावर आम्ही विचार केला. मी कबुल करते तुमचेच म्हणणे बरोबर आहे. मला फक्त आता एकच समजावून घेण्याची इच्छा आहे की माधवाच्या सुखाकरिता लग्न नको म्हणता तर दुसरा कोणता मार्ग तुम्ही सुचवणार आहात? तुम्ही दाखविलेल्या मार्गाने माधव निश्चितपणे सुखी होईल याबद्दल माझी नि 'ह्यां' ची तुम्ही खात्री पटवून दिलीत तर आम्ही त्याला लग्नाचा मुळीसुद्धा आग्रह करणार नाही." आईच्या म्हणण्याला पुस्ती जोडता जोडता वडील म्हणाले, "स्पष्टच बोलायचे तर खरे सुख, आनंद, मनोविनोदन किंवा मन:स्वास्थ्य म्हणजे तरी काय याबद्दल आम्ही संपूर्ण अज्ञानीच आहोत. या दिवसापर्यंत तुमच्यासारखा साधुपुरुष आम्हांला न भेटल्यामुळे असेलहि. पण, तुमच्या सांगण्यातल्या सत्यपणाबद्दल माझी खात्री पटली आहे. तेव्हा, जी गोष्ट आम्हांला आमच्या साऱ्या ह्यातीत साधता आली नाही ती माझ्या मुलाला साधावी म्हणून मी माझ्या मुलाचे भवितव्य तुमच्या हाती संपूर्णपणे सोपवायला सुखेनैव तयार आहे, कारण आपल्यासारख्याच्या अविकृत मार्गदर्शनाखाली त्याचे सुख व समाधान निश्चित आहे याची मला खात्री पटली आहे. आपण त्याला त्याच्या शोधात मदत करावी अशी माझी कळकळीची विनंती आहे." गुरुदेव म्हणाले, "माझ्याबद्दल आपल्या मनात येवढा विश्वास उत्पन्न होऊ शकला, तो वाढू शकला, ही आनंदाची गोष्ट आहे. पण, आताच एक गोष्ट स्पष्ट झालेली बरी की तुमच्या मुलाकरिता माझ्यापुढे कसलाहि आदर्श नाही, आराखडा नाही की त्याच्या भवितव्याची योजना नाही. कारण,

कुठलीहि योजना म्हटली की ती त्याच्या जीवनात नको असलेले झगडे-अडथळे उत्पन्न करील. निराळेच प्रश्न उभे राहतील! शिवाय, मनाचे नसते मनोरे उभे राहातील ते वेगळेच. 'सुख नि शांति' संपादनाची गुरुकिल्लीच जी शांत-स्थिर-मोकळे मन व स्वतंत्र बुद्धि तीच त्यामुळे हरवेल! तेव्हा तुमच्या मुलाबाबतीतच नव्हे, तर ज्या ज्या मनुष्याला शांति, समाधान नि सुखी जीवनाची तहान लागली असेल, त्याने आपल्या मन आणि बुद्धीला स्वतंत्र नि मोकळी ठेवण्याची, त्यावर कसलेहि दडपण वा बंधन येऊ न देण्याची काळजी घ्यायला हवी. त्यामुळेच त्याला अचूक नि सुस्पष्ट विचार करण्याची धारणा होईल. परिणामतः खरी जाण येऊन त्याच्या समस्या सुटण्याला त्यामुळे मदत होईल. त्याच्या वागणुकीत, हालचालीत व कृतीत सहजपणा व अकृत्रिम नैसर्गिकपणा येईल. भूत व भविष्यकाळीन विचारांचे दडपण नसल्याने त्याची कुतरओढ थांबेल. त्यामुळे विरोध नि झगडा यांना वावच राहणार नाही. खऱ्या आनंदाचा त्याला अनुभव प्राप्त होऊन, सुख व समाधान आत्मसात होईल. हा अनुभव आहे आणि कितीहि व कसेहि प्रयत्न केले तरी अनुभव शब्दांकित करताच येणार नाही. कारण अनुभव हा सदैव शब्दातीत असतो. म्हणून माझी अशी इच्छा आहे की तुमच्या मुलाने प्रामाणिकपणे सर्वांगाने विचार करावा, नीट सूक्ष्मपणे परीक्षण व निरीक्षण करावे, आणि मगच त्याला जे योग्य व नैसर्गिक वाटेल असे आयुष्य व्यतित करण्याचा संकल्प करावा, निश्चय करावा, ठरवावे. मला कोणत्याहि प्रकारे त्याच्या सध्याच्या जीवनावर किंवा त्याच्या उज्ज्वल भवितव्यावर कसलेहि दडपण वा दबाव आणण्याची इच्छा नाही." त्यांनी माझ्या आईकडे दृष्टिक्षेप टाकीत म्हटले, "माताजी, मी तुमच्या मुलाला संन्यासी करायला आलो आहे, ही भीती तुम्ही मनातसुद्धा येऊ देऊ नका. किंवा त्याने जन्मभर अविवाहित जीवन पत्करावे अशी माझी यत्किंचितहि इच्छा नाही, आग्रहतर नाहीच नाही. माझा तो प्रांत नाही. माझे हे काम नाही. त्याला वाटेल तेव्हा, त्याच्या सुखास येईल तर,

केव्हाहि वैवाहिक जीवनात पदार्पण करायला तो मोकळा आहे. तेव्हा, त्याचे भवितव्य माझ्या हाती सुपूर्त करण्यापेक्षा मी तर म्हणतो, आपण सर्वांनीच असे ठरवू या–त्याचे त्याने आपले हितानहित ठरवावे, व ज्याने तो निश्चित सुखी होईल असे वाटेल तो मार्ग त्याने सुखेनैव चोखाळावा. मला काय म्हणायचे होते ते त्याने ऐकलेले आहेच; तेव्हा त्याची समस्या सोडवायला तो आता समर्थ आहे. यापेक्षा मला अधिक काहीहि सांगायचे असे उरलेले नाही." गुरुदेव बोलायचे थांबले.

स्वामीजी म्हणाले, "आम्ही दोन दिवस वृद्धेश्वरला जाऊन राहावे असे म्हणतो. शक्य असेल तर माधवनेहि आमच्याबरोबर यावे असे आम्हांला वाटते." "माझे वडील उतरले, तिकडे जायला बैलगाडी-शिवाय दुसरे वाहन नाही, तेव्हा, गुरुदेवांना माझी विनंती आहे त्यांनी माझ्या गाडीचा उपयोग जरूर करावा. त्यामुळे एकतर प्रवासात वेळ वाचेल,प्रवास थोडासा सुखकारकहि होईल. गुरुदेवांच्या सेवेशी काही तरी केल्याचे मला समाधान मिळणार आहे ते वेगळेच." गुरुदेव म्हणाले, "मैल न् मैल चालण्याची आम्हांला सवय आहे. पण बरोबर माधवहि आहे. तेव्हा तुमची गाडी नेण्याची सूचना मी मान्य करतो. जेवण होताच आम्ही निघू म्हणतो. काही दिवसांनंतर आम्ही परत येऊ." गाडी तयार ठेवण्याबद्दल वडिलांनी ड्रायव्हरला सूचना दिल्या.

जेवताना आई म्हणाली, "गुरुदेव, माफ करा, तुमच्या दृष्टीने वृद्धेश्वराचे महत्त्व ते काय आहे ? काही विशेष हेतु बाळगून का तुम्ही वृद्धेश्वराला जात आहात ?" गुरुदेव म्हणाले, "माताजी, आमच्या कोणत्याच कृतीत कधीहि नि कसलाच हेतु असत नाही. आमच्या कृति सहजस्फूर्त असतात–नैसर्गिक असतात. त्याला हेतूचे टुमण लागत नाही पाठीशी. वृद्धेश्वराचे महत्त्व व विशेषत्वाबद्दल म्हणाल तर आजपर्यंत अनेक 'मुक्त' पुरुष त्या परिसरात राहिलेले, वागलेले आहेत. त्या सत्संगतीचा परिणाम की काय जणू तेथील

वातावरणातहि जादू आहे की ज्यामुळे मनुष्याला तेथे स्वैर-मनमोकळे विचार सुचतात. विचार करण्याची शक्ति संग्रहित करता येते. तेथे शिवमंदिर आहे; गिरि–कुहरात जेथे शेकडो वर्षांपूर्वी पर्वतराशी होत्या. तेथील नैसर्गिक सौंदर्य तर अवर्णनीय मनोहारी नि चेतोहारी आहे. जनतासंपर्कापासून खूप खूप दूर, आत जंगलात ते ठिकाण असल्याने तेथे गेल्यावर नीरव शांतता अनुभवायला मिळते. जेव्हा जेव्हा मी या भागात येतो ना तेव्हा, जवळ जवळ न चुकता वृद्धेश्वराला जातोच जातो."

●●●

# ९

ज्यामुळे आमची वृद्धेश्वराची सफर जरा आरामशीर होईल अशा कांही किराणामालाच्या वस्तु जेवण झाल्यावर मी गाडींत ठेवल्या. ड्रायव्हरशिवाय हरकामाला म्हणून एक वेगळा नोकरहि बरोबर घेतला होता. बंदुक घेण्याचीही माझी इच्छा होती. पण स्वामीजीच म्हणाले, " अरे माधव, तिची आपणाला जरूर पडणार नाही नि गुरु-देवांनाहि बंदूक घेतली तर आवडणार नाही. माझ्या डोळ्यांसमोरून मद्रासला असताना चेट्टीकरांच्या बागेत नाग निघाल्याचा तो प्रसंग सरकन निघून गेला व त्यावेळी गुरुदेवांनी केलेले वक्तव्य जसेच्या तसे कानात निनादले. दुपारी दोन वाजता वृद्धेश्वराला जायला आम्ही निघालो. रस्ता चांगला नव्हता. त्यामुळे अंतर फार नव्हते तरी प्रवास दगदगीचा होता.

परंतु, गुरुदेव आणि स्वामीजी मात्र अगदी शांत होते, माझ्या डोक्यात गेल्या दोन दिवसांत घरात अखंडपणे चाललेल्या गुरुदेवांच्या विचारसत्राचेच मंथन चालू होते. माझी जीवन-सरिता केव्हा काय वळण घेईल, ती कुठे वाहत जाणार याबद्दल मलासुद्धां काही अंदाज

करता यत नव्हता. मलाहि आता माझ्या आयुष्याबद्दल काही वाटेनासे झाले होते. मी बेफिकीर झालो होतो. असे असूनहि माझ्या उत्साहाला अगदी उधाण आले होते. गुरुदेवांचे सान्निध्य हे त्याचे कारण असेल. त्यांच्या अस्तित्वाने एक विश्वास नक्की आकार घेत होता की जीवनांत मी आता एकटा नाही, माझे भवितव्य घडविण्यात माझ्या पाठीशी कसली तरी शक्ति निश्चितपणे उभी आहे. हेहि खरेच होते की, त्यावेळी तरी, माझ्यासमोर कसलेच संकट उभे नव्हते की असा कुठला प्रश्नहि बिनतोडपणे उभा नव्हता की मी काळजी करावी वा कसली तरी भीती बाळगावी ! वातावरणात एकदम बदल झाल्यासारखे वाटले. भोवतालच्या सृष्टीतील फल-पुष्प वनस्पतीचा एक मंदसा सुगंध वातावरणात दरवळला होता. कानावर मंद–मधुर संगीत ऐकायला येत होते. त्यामुळे वृद्धेश्वराचे ठिकाण जवळ जवळ येत असल्याची जाणीव होत होती. त्या नीरव शांततेतून कुठल्या दिशेने तो आवाज येत आहे, याचा मी कानोसा घेत होतो. इतस्ततः पाहात होतो. गुरुदेवांनी माझ्याकडे सस्मितपणे पाहिले व ते म्हणाले, " आपण वृद्धेश्वराच्या परिसरात आलो आहोत. गेले शतकभर अत्यंत पवित्र तेजःपुंज असा या स्थानाचा महिमा कायम आहे. " मी काहीहि बोललो नाही, कारण मला हे स्थान ठाऊक होते. यापूर्वी शाळेच्या ट्रिप्स् निमित्ताने आम्ही कितीदातरी येथे आलेलो होतो. नंतर, मोठे झाल्यावर शिकारीकरिता मित्र परिवारासह या प्रांतांत आम्ही स्वैरपणे हिंडलो होतो. परंतु, यावेळी या स्थानाबद्दल जी एक वेगळीच जाणीव झाली. तीमात्र खासच गुरुदेवांच्या सहवासामुळेच असावी. अर्धा तास झाला असेल नसेल आमची गाडी वृद्धेश्वर मंदिराच्या दाराशी येऊन उभी राहिली. आम्ही सर्व खाली उतरलो. ड्रायव्हरला गाडी बाजूला सुरक्षित ठिकाणी उभी करायला मी सांगितले. डोंगराच्या जणू तटामध्ये वृद्धेश्वराचे हे जुने शिवमंदिर बांधलेले होते. दोन डोंगरांच्या घळईतच ते उभे होते. बांधलेली अशी देवळाभोवती चौकोनी तटबंदी होतीच. गुरुदेव व स्वामीजी

देवळाच्या पुजाऱ्याचे चांगलेच परिचित असल्याने, त्याने उभयतांचे मोठ्या अगत्याने आगतस्वागत केले. त्याच्या आगमनाने त्याला विशेष आनंद झाल्यासारखा दिसला. त्याने फराळाचे तयार असल्याचे सांगितले. पण गुरुदेव म्हणाले, "आधी स्नान करू या" तोपर्यंत नोकराने सामान आत आणून ठेवले होतेच. आम्ही सर्व स्नानाला निघालो. स्वामीजी आम्हांला एका विहिरीकडे घेऊन गेले. त्या विहिरीचे नाव होते 'ज्ञानवापि.' गुरुदेव म्हणाले, "या ठिकाणाचे ऐतिहासिक महत्त्व फार मोठे आहे. ते मी तुला रात्री सांगेन. माझी खात्री आहे तुलासुद्धा ती माहिती मनोरंजक वाटेल. विहिरीतील पाणी स्फटिकाप्रमाणें स्वच्छ नि बर्फासारखे थंडगार होते. स्नाने उरकून आम्ही देवालयात गेलो. शंभरवर वर्षे उलटून गेली असली तरी देऊळ अजून चांगल्या स्थितीत होते. देवळाचा आकार आहे लहानसाच. त्यात भव्यपणा वगैरे काही नाही. देवळांत शिरताच चांगला ऐसपैस सभामंडप लागतो. तेथे भजन कीर्तनादि गाण्याबजावण्याचे किंवा प्रार्थनेचे कार्यक्रम होतात. आतल्या गाभाऱ्यात शिवमूर्ति आहे. त्या मूर्तीखालून जिवंत झरा सतत वाहात असतो. भोवतालच्या गिरिकंदरामुळे, मला वाटते, हा झरा जिवंत असावा. चार मोठ्या समया अगर नंदादीप तेथे रात्रंदिवस तेवत असतात.पण, तरीही गाभाऱ्यात अंधारच जास्त भासत होता. जरा वेळ मूर्ती स्पष्ट दिसतच नव्हती. मूर्तीवर बिल्वपत्रे नि फुलांचा दाट थर होता. त्यावरून आमच्या आधी येऊन कुणीतरी पूजा उरकून गेलेले असावे. गाभाऱ्यात उदबत्त्यांच्या वासाचा घमघमाट सुटला होता. गुरुदेवांनी आतल्या गाभाऱ्यात प्रवेश केला. साष्टांग नमस्कार घातला. मी व स्वामीजींनी त्यांचेच अनुकरण केले. दर्शनानंतर आमच्याकरिता, पुजाऱ्याने झाडून-साफ करून ठेवलेल्या जागेत आम्ही परतलो. पुजाऱ्याने फराळाचे तयार ठेवलेच होते. माझ्या नोकराने चहा केला. स्वामीजींनी व गुरुदेवांनी फक्त दूध व थोडीशी फळे घेतली. मी चहा व बिस्किटे खाल्ली. चहा झाल्यावर गुरुदेव म्हणाले, "माधव चला,

देवळाच्या पुजाऱ्याचे चांगलेच परिचित असल्याने, त्याने उभयतांचे मोठ्या अगत्याने आगतस्वागत केले. त्याच्या आगमनाने त्याला विशेष आनंद झाल्यासारखा दिसला. त्याने फराळाचे तयार असल्याचे सांगितले. पण गुरुदेव म्हणाले, "आधी स्नान करू या" तोपर्यंत नोकराने सामान आत आणून ठेवले होतेच. आम्ही सर्व स्नानाला निघालो. स्वामीजी आम्हांला एका विहिरीकडे घेऊन गेले. त्या विहिरीचे नाव होते 'ज्ञानवापि.' गुरुदेव म्हणाले, "या ठिकाणाचे ऐतिहासिक महत्त्व फार मोठे आहे. ते मी तुला रात्री सांगेन. माझी खात्री आहे तुलासुद्धा ती माहिती मनोरंजक वाटेल. विहिरीतील पाणी स्फटिकाप्रमाणें स्वच्छ नि बर्फासारखे थंडगार होते. स्नाने उरकून आम्ही देवालयात गेलो. शंभरवर वर्षे उलटून गेली असली तरी देऊळ अजून चांगल्या स्थितीत होते. देवळाचा आकार आहे लहानसाच. त्यात भव्यपणा वगैरे काही नाही. देवळांत शिरताच चांगला ऐसपैस सभामंडप लागतो. तेथे भजन कीर्तनादि गाण्याबजावण्याचे किंवा प्रार्थनेचे कार्यक्रम होतात. आतल्या गाभाऱ्यात शिवमूर्ति आहे. त्या मूर्तीखालून जिवंत झरा सतत वाहात असतो. भोवतालच्या गिरिकंदरामुळे, मला वाटते, हा झरा जिवंत असावा. चार मोठ्या समया अगर नंदादीप तेथे रात्रंदिवस तेवत असतात.पण, तरीही गाभाऱ्यात अंधारच जास्त भासत होता. जरा वेळ मूर्ती स्पष्ट दिसतच नव्हती. मूर्तीवर बिल्वपत्रे नि फुलांचा दाट थर होता. त्यावरून आमच्या आधी येऊन कुणीतरी पूजा उरकून गेलेले असावे. गाभाऱ्यात उदबत्त्यांच्या वासाचा घमघमाट सुटला होता. गुरुदेवांनी आतल्या गाभाऱ्यात प्रवेश केला. साष्टांग नमस्कार घातला. मी व स्वामीजींनी त्यांचेच अनुकरण केले. दर्शनानंतर आमच्याकरिता, पुजाऱ्याने झाडून-साफ करून ठेवलेल्या जागेत आम्ही परतलो. पुजाऱ्याने फराळाचे तयार ठेवलेच होते. माझ्या नोकराने चहा केला. स्वामीजींनी व गुरुदेवांनी फक्त दूध व थोडीशी फळे घेतली. मी चहा व बिस्किटे खाल्ली. चहा झाल्यावर गुरुदेव म्हणाले, "माधव चला,-

आपण या डोंगरांतून फिरायला जाऊ. तेथील महत्त्वाची ठिकाणे मी तुला दाखवतो." असे म्हणून ते पुढे नि आम्ही मागे असे बाहेर पडलो. डोंगराच्या माथ्यावर आम्ही येऊन पोहोचलो. तिथे कुणाची समाधीसारखी थडगी होती. नाथपंथाचे मूळपुरुष मच्छिंद्रनाथ येथे राहात असत असे म्हणतात. गुरुदेव त्या समाधीपाशी गुडघे टेकून नतमस्तक झाले. त्यांच्या डोळयांतून घळघळा अश्रुपातहि होत होता. मी व स्वामीजी वाकलो. स्वामीजींच्या भावना काय असतील कोण जाणे ? पण मला मात्र काही हेलावल्यासारखे झाले नाही. ते दोघे वाकले म्हणून मीहि वाकलो. केवळ उपचार म्हणून इतकेच. जवळच्या छोटयाशा मच्छिंद्रनाथ टेकडीवर गोरक्षनाथांची समाधि आहे. येथे स्वामीजी व गुरुदेव यांनी गुडघे टेकून प्रणाम केला. मीहि ते करीत तसे करीत होतो. देवळाकडे परत येईपर्यंत बरीच संध्याकाळ झाली होती. जेवण उरकून आम्ही देवळाच्या आवारात बसलो होतो. पौर्णिमा असल्याने आकाशात पूर्ण चंद्र होता. आकाशहि स्वच्छ होते. देवळाची ऐतिहासिक माहिती व नाथपंथाबद्दल गुरुदेवांनी काही सांगावे अशी मी त्यांना विनंती केली.

गुरुदेव म्हणाले, "मच्छिंद्रनाथांच्या जन्माबद्दल निरनिराळ्या गोष्टी समाजात रूढ आहेत. आपल्या दृष्टीने त्या जन्मरहस्यात काही महत्त्वाचे नाही; परंतु त्यांना आत्मसाक्षात्कार झाला असल्याने त्या सत्पुरुषाबद्दल एक सिद्ध पुरुष म्हणून आपल्याला माहिती असणे इष्ट आहे. योगविद्या, तिच्या सर्व अंगोपांगासहि आत्मसात करण्याकरिता, त्या पुरुषाने वर्षानुवर्षे घोर तपाचरण केले; व त्यामुळे 'सिद्धि सिद्धि' म्हणून ज्यांचे चमत्काराबद्दल सर्वसाधारण जगात बोलले जाते त्या सर्व सिद्धि त्यांना प्राप्त झाल्या होत्या. असे असूनहि त्यांची निरहंकारी आणि संपूर्णतया अलिप्तपणे वावरण्याची संन्यासीवृत्ति विशेषत्वाने प्रगट झालेली आढळते. असे संन्यासी क्वचितच या अवनीतलावर आढळतात. मच्छिंद्रनाथांच्या या तेजस्वी संन्यासी जीवनाकडे व परमोच्च साधनसिद्धीकडे आकर्षित होऊन अनेक लोक त्यांचे शिष्य झाले.

त्यांच्या शिष्यपरंपरेच्या अभिमान्यांना नाथ–पंथीय म्हणतात. या पंथांच्या शिकवणीचे मूळ सूत्र म्हणजे मन व बुद्धि यांची मुक्तता, अनासक्त जीवन–शरीराबद्दलही त्यांना आसक्ति नाही, भविष्याचा विचार नाही, भूतकालाशी संपर्क नाही त्यामुळे साहजिकच ही मंडळी वर्तमानकाळ–चालू क्षणच फक्त ओळखून वागतात. शरीराबद्दल उदासीनता इतक्या तीव्रतेने बाणलेली की 'भीति' हा शब्द त्यांच्या शब्दकोषातच नाही. अनिर्बंध विचार, अव्यभिचारी निरीक्षण, मुक्त मन व बुद्धि ही या पंथाची मुख्य विरुदे. ही धर्मतत्त्वे नाहीत की ज्यांचा प्रचार करीत हिंडायला हवे. ती प्रयत्नांची शिकस्त करून आत्मसात करण्याची 'वैयक्तिक मनोधारणा' आहे. त्यामुळे सर्वसाधारणपणे याला 'पंथ' म्हटले जात असले तरी वस्तुतः तो 'पंथ' नव्हे. मच्छिंद्रनाथांचे शिष्य गोरक्षनाथ, यांची योग्यता व तपश्चर्या एवढी होती की त्यांना आत्मसाक्षात्कार झाला. हा जीवितमार्ग स्वीकारणारे शिष्य, अविवाहितच नव्हे तर कडक ब्रह्मचाऱ्याचे जीवन पत्करतात. हिंस्रश्वापदांची जिथे वस्ती तिथे यांचे वास्तव्य. संचार सर्व भारतभर अशा प्रकारच्या गिरि–अरण्यवासात! एके काळी येथे मोठमोठ्या नद्या वाहात होत्या. सृष्टि–सौंदर्य चेतोहारी व घनगंभीर असे होते. बाह्य जगाचा येथे यत्किंचित संपर्क लागत नसे. म्हणून त्यावेळी ही मंडळी या ठिकाणी आपली साधना करीत. निर्वेध जीवन व्यतीत करीत. क्वचित इतर ठिकाणीहि ते जात. एकदा येथे मच्छिंद्रनाथांच्या शिष्यांनी यज्ञ आरंभला. राजे–रजवाडे येवढेच नव्हे तर किन्नर–गंधर्वादि दिव्य देव-देवेंद्रांनाहि आमंत्रणे गेली. जगात असा मेळावा यापूर्वी भरला नसेल. महादेव शिवप्रभूंना या यज्ञ समारंभाचे अध्यक्षपद दिले होते. आज देवळात जिथे शिवमूर्ति दिसते ना तिथेच त्या भव्य समारंभाचे अध्यक्षपद प्रत्यक्षतः शिवप्रभूंनी स्वीकारले होते. देवळाची स्थापना नंतर पुष्कळ वर्षांनंतरची असेल पण मूळ बैठक हीच. वृद्धेश्वर म्हणजे शिवाचेच नाव. यज्ञाचा अग्नि मच्छिंद्रनाथांनी प्रज्वलित केला; तो अग्नि अजूनहि तसाच जिवंत ठेवला गेला आहे. शेकडो वर्षे उलटून

गेली तरी लोकांनी तो अजूनहि प्रज्वलित ठेवला आहे. तो देवालयाच्या प्रवेशद्वारी अजूनहि आढळतो. नाथपंथातील शिष्यपरंपरेने या परिसरातील हे दैवी व पवित्र वातावरण आणि माहात्म्य इतक्या पिढ्या झाल्या तरी जसेच्या तसे ठेवलेले आहे; आणि आज प्रत्यक्ष या घडीलाहि या स्थानमाहात्म्याचे मोठेपण व खरेपणहि कोणीहि स्वत: अनुभवू शकतो. अर्थात त्याने खुले मन व बुद्धि ठेवून समजावून घेतले की विचार कसा करावा, चिंतन व मनन कसे करावे ? तरच हे शक्य आहे. ''

त्यावर मी म्हटले, '' गुरुदेव, तुमची मद्रासमधील वक्तव्ये व माझ्या घरी जी नुकतीच बोलणी झाली ती मी सर्व अत्यंत मन:पूर्वक ऐकलेली आहेत. त्याचा इत्यर्थ समजावून घेण्याचा मी कसोशीने प्रयत्न करीत आहे; व त्याचप्रमाणे वागण्याचाहि. परंतु अर्थ लक्षात येऊनहि मनाची विचारशून्य स्थिति काय व कशी असते याचा मी अजूनहि अनुभव घेऊ शकत नाही– किंवा तुम्ही ज्याप्रमाणे ऐकावे, परीक्षण व निरीक्षण करावे असे म्हणता त्या तऱ्हेचे श्रोतृत्वहि मला साधत नाही. तेव्हा सर्व इंद्रियांचे कान करून ऐकायचे म्हणजे कसे ? अव्यभिचारी निरीक्षण म्हणजे काय ? निर्भेळ विचार करायचा तो कसा याबद्दल आपले मार्गदर्शन होईल तर फार बरे होईल. '' गुरुदेव म्हणाले, '' आपण सर्वजण ऐकतो, नि कसे ऐकायचे तेहि सर्वानाच माहीत असते. परंतु लक्षपूर्वक ऐकणे म्हणजे काय हे मात्र आपण कुणीच जाणत नसल्यामुळे ज्या तऱ्हेने आपली समजूत पटायला हवी ना, तशी ती पटत नाही; आणि इथेच तर सारे घोडे पेंड खातेय– मध्यान्ह रात्री जिकडे तिकडे शुकशुकाट असतो. सारे जग झोपलेले नि:स्तब्ध असते. त्यावेळी दूरचा असो किंवा अगदी जवळचा असो आपणाला ' खुट ' झालेला आवाजहि स्पष्ट ऐकायला येतो. असा जेव्हा आवाज येतो– तेव्हा तुमच्या मनात कसला म्हणून कसलाहि विचार असत नाही. तुम्ही आपले सारे लक्ष आवाज ज्या दिशेने आला ती दिशा धुंडाळण्याकडे केंद्रित करता तेव्हाच तो आवाज

कशाचा असेल हे तुम्ही अजमावीत असता, म्हणजे काय करीत असता ? तर एखाद्या जुन्या आठवणीशी तो आवाज संलग्न करीत असता किंवा तुमच्यातच निरनिराळ्या आवाजांचा जो संग्रहित अनुभव असतो त्याच्याशी पडताळीत असता. मग तुमच्या लक्षात येते की वाजली ती माणसाची पावले की विशिष्ट-श्वापदा–प्राण्यांची ! म्हणजेच प्रथमतः पूर्वविचार रहितावस्थेत तुम्ही ऐकता, ते करण्याकरिता सारा जीव मुठीत आणून तो आवाज ऐकायचा प्रयत्न करता–त्यावेळी त्या ऐकण्याच्या क्रियेच्या वेळी-कसलाहि पूर्व अगर भविष्य विचार अस्तित्वात नसतो. कसली आठवण किंवा आधार संदर्भ असत नाही. ही जी विशिष्टावस्था–मानसिक स्थिति त्याला म्हणायचे असते लक्षपूर्वक ऐकणे. लक्षपूर्वक ऐकल्या-नंतर जे काही घडते ते फक्त ऐकू आलेल्या गोष्टींचे स्पष्टीकरण अगर अर्थबोध. एकंदर सर्वच घटना इतक्या निमिषार्धात घडतात की निरीक्षणानेच तुम्ही समजू शकता सर्व काही ! पण समजणे उमजणे ही ऐकल्यानंतर घडणारी स्थिती आहे. अगोदरची नव्हे. म्हणून मला जे काय म्हणावयाचे आहे ते हे की लक्षपूर्वक ऐकणे, कान लावून ऐकणे नि नुकतेच आपण रोज रोज ऐकतो ते ऐकणे यांतला फरक मनात नीट समजावून घ्या. ऐकत असताना आपण आपल्या पूर्वज्ञानाशी त्याच्या परिणामांशी, त्याच्या भवितव्याशी नकळतपणे संतुलन चालवलेले असते.

"जुन्या ऐकलेल्या अगर वाचलेल्या विचाराशी अगर पाहिलेल्या प्रसंगाशी मनात तुलना चालू असते. 'कान देऊन ऐकणे' या प्रकारात ही दोलायमान स्थिति व 'तोल मोल' काही एक हजर नसते. आपण निबिड अरण्यातून किंवा धोकास्पद पण निर्मनुष्य ठिकाणी चालत असू तेव्हा आपण कान टवकारून असतो. कारण एक प्रकारची अबोध भीति तेव्हा असते. जरा आवाज झाला मात्र, शरीरावर रोमांच उभे राहातात. कान आवाज टिपण्याकरिता तिखट झालेले असतात. यालाच म्हणायचे लक्षपूर्वक ऐकणे. अशा प्रकारे ऐकण्याचा तुम्ही कधी

प्रयत्नच केला नसल्याने तुमच्यामध्ये उपजत असलेली ही शक्ति बोथट झाली असेल, संवेदनाशून्य झाली असेल इतकेच. म्हणूनच हा विषय प्रथमदर्शनी मोठा गूढ व समजायला कठीण वाटतो, पण आतापर्यंतच्या विवेचनावरून लक्षात आले असेल की लक्षपूर्वक ऐकायचे कसे हे कुणी कुणाला शिकवायला हवे असे मुळीच नाही."

"तीच गोष्ट निरीक्षणाची. सारी गात्रे एकत्रित करून निरीक्षण करायला हवे. तसे झाले की भोवताली काय चालले आहे याची शुद्ध राहात नाही. तुम्ही जर कशाचे सूक्ष्म निरीक्षण खरोखरच चालविले असेल, तर भोवतालच्या आवाजाचा किंवा बोलण्याओरडण्याचा तुम्हाला अडथळा तर राहोच बोधसुद्धा होणार नाही. तुम्ही स्वतःला संपूर्णतया विसरून गेलेले असाल. मला वाटते आपल्या आयुष्यात एकदा तरी तुम्ही प्रत्येकाने हा अनुभव अनुभवला असेल. तुम्ही जेव्हा एखादी वस्तु पाहता तेव्हा तुम्ही ती पूर्वस्मृतीच्या अपेक्षेत समजावून घेण्याचा प्रयत्न करता. तीच गोष्ट निर्विकल्प निरीक्षणाबाबतीतहि असते. फक्त या ठिकाणी पूर्व स्मृति, आगामी विचार किंवा कसल्याही संदर्भाला जागा नसते. जेव्हा तुम्ही एखाद्या घडलेल्या प्रसंगाचा किंवा प्रश्नाचा विचार करता तेव्हा त्याचा परिणाम तुमच्यावर काय होईल, लोक त्याबद्दल काय म्हणतील, तुमचा तोडगा मान्य होईल की नाही, असा प्रश्न पूर्वी उत्पन्न झाला होता का ? तसा झाला असलाच तर पूर्वीच्या लोकांनी तो कसा सोडवला ? या सर्वांचा पुढच्या पिढ्यांवर काय परिणाम होईल या नि अशा प्रश्नांचा गोंधळ तुम्ही तुमच्या मनात कधीहि होऊ देता कामा नये. विचार करायचा तो एकाच माध्यमातून. अमूक एक विचार मूलतः उत्पन्न कसा झाला, त्यातून काही अपेक्षा, इच्छातृप्ति, समाधान अपेक्षित आहे की काही वैयक्तिक वडेजाव मिरवण्याची हाव अगर खटपट आहे ? आपली कृति किंवा विचार जर याप्रकारच्या प्रामाणिक स्तरावरून केलेले असतील, त्यापाठीमागे जर खरेखुरे मनोविश्लेषण असेल, तर निखालस स्वच्छ विचार करणे म्हणजे काय हे तुम्ही

समजू शकाल." गुरुदेव म्हणाले, " माधव, आतापर्यंतच्या विवेचनावरून कान देऊन ऐकणे व एकचित्त अवलोकन करणे ही मानवाच्या जीवनात केवढी महत्त्वाची साधनें आहेत याची तुला कल्पना आली असेलच. या दोन्हींमध्ये मनुष्य पूर्वग्रहदूषित विचारापासून हमखास दूर असतो. तशी स्थिति असते म्हणूनच तर माणसाला पाहण्याने व निरीक्षणाने ज्याचा खरा बोध व्हायचा तो होतो. निःस्तब्ध मन, विचारशून्य मन या स्थितीला कसे यायचे ते आता आपोआप स्पष्ट होईल. या स्थितीत मन काम करत नाही, मनात विचारसुद्धा उद्भवत नाहींत, काही दिसत नाही काही ऐकायला येत नाही. कसल्याहि स्पष्टीकरणाची गरज उरलेली नसते, सारी अष्टेंद्रिये शरीरात ना कसली हालचाल करीत असतात वा मनात तरंग उठवीत असतात. या अशा निर्विकल्प स्थितीत माणसाला आत्मदर्शन घडते. त्यालाच तो आत्माअनुभव म्हणतो. यापेक्षा कसल्याहि शब्दांनी, उपमा—उत्प्रेक्षांनी तो आपल्या मनःस्थितीचे वर्णन करूच शकत नाही. या अनुभवात कधीहि खंड न पडणारा असीम आनंदाचा, हर्षोत्फुल्ल वृत्तीचा, अतुलनीय आनंदाचा आशय हस्तगत झाल्याचे वर्णनातीत सुख आहे.ही स्थिति कशाने साधायची—मिळविण्याची ही स्थिति नव्हे, तर मनाची मनाला, ज्याची त्यालाच समजणारी, मनोमन पटणारी, अनुभवाची प्रचीति आहे. मी आतापर्यंत सांगत असलेल्या विचारविमर्शाचा असा हा आनंद विसर्जित शेवट आहे."

मी गुरुदेवांना म्हटले " मन लावून ऐकणे नि पाहणे म्हणजे काय ते आता मला समजले, निःस्तब्ध मन मात्र काय ते अजून अनुभवावयाचे आहे. मनःपूर्वक ऐकण्यात व निरीक्षण करण्यात, आपण, क्षणमात्र का होईना, विचारशून्य स्थितीत एकप्रकारच्या निर्वात पोकळ स्थितीत असतो. पण तो कालावधि इतका अल्प आहे की निरीक्षणाला मागे टाकून तो पुढे निघून केव्हा गेला हे ध्यानातसुद्धा येत नाही. हा क्षणच जर कुणाला कशानेहि लांबविता आला म्हणजे जर विचारशून्य स्थितीत मनुष्य पुष्कळ वेळपर्यंत राहू शकेल, तर मला खात्रीने वाटते,

तुम्ही म्हणता ती परमानंदाची व सुखाची स्थिति तो आत्मसात करू शकेल. आता प्रश्न उरतो तो ह्याच की अशी निर्विकल्प स्थिति बराच वेळ कशी टिकवायची ?" गुरुदेव म्हणाले, "ठीक आहे जे इष्ट ते तुला समजले आहे. ही विचाररहित निःस्तब्ध स्थिति कायम राखण्याचे कित्येक मार्ग व साधने, हजारो वर्षांच्या अभ्यासाने या भारतवर्षांत शोधली गेली आहेत. त्यालाच म्हणतात योगशास्त्र. मन आणि संवेदना यांचा सुसंवादी समन्वय या योगमार्गाने साधलेला आहे, या दोघांत जर किंचितसा बदसूर असेल तर त्यात रसहानि होऊन मानवी मनाचा गोंधळ उडतो.

यापूर्वीच तुला स्पष्ट केल्याप्रमाणे जेव्हा मनुष्य लक्षपूर्वक श्रवण करीत असतो किंवा निरीक्षण करीत असतो तेव्हा या दोन्ही क्रियांशी त्याचे मन व इंद्रिये एकसूर लावून बसलेली असतात. दुसऱ्या शब्दात हेच सांगायचे तर ऐकण्यापाहण्यात सारी इंद्रिये व मन केंद्रीभूत झालेली असतात. त्याचप्रमाणे तुझे शरीर, मन व इंद्रिये ही सुसंवादी बनून, तंबोऱ्याच्या तारांप्रमाणे व्हायला हवीत. असे झाले की जे एकात्मतेचे वातावरण व स्थिति उत्पन्न होते ते वातावरण व ती स्थिति मनाला निःस्तब्ध ठेवण्यास साह्यकारी होते. तुम्ही कितीही उत्तम गाणारे असा पण तुमची प्रकृति ठीक नसली, तुमचा दिल आज गाण्याला लागत नाही अशी स्थिती असेल किंवा साथीचे वाद्य बदसूर असेल किंवा बैठकीचे वातावरण काही प्रतिकूल कारणा–प्रसंगाने अनुकूल नसेल तर बैठक रंगेल का; गाण्यात रंग भरेल का ? सारांश काय, अपेक्षित गोष्ट व्हायला अनेक गोष्टींची एकसूर-एकतानता लागतेच लागते. त्याचप्रमाणे निःस्तब्ध मन व्हायला शारीरिक, मानसिक व आत्मिक सामंजस्याची अतीव जरूर भासते. एकदा ही एकतानता साधली; नि साधकाला निःस्तब्ध मनाची ओळख पटली, की तो अनुभवच इतका सर्वस्पर्शी, प्रगल्भ, हुकमी व प्रचोदायी असतो की निःस्तब्ध ही एक अभंग स्थिति होऊन बसते. अशा अक्षय स्थितीत मग काहीहि जमवून आणावे लागत नाही. विनासायास साधणारी

ती सहजस्थिति होऊन बसते. तेव्हा, मनाच्या या अविचल अवस्थेचा अनुभव ज्याला हवाहवासा वाटत असेल त्याने ती स्थिति प्राप्त होण्यास उपयुक्त असे वातावरण स्वत:भोवती निर्माण करायला हवे. इतर पर्यायी साधनांच्या अभावी, योगसाधना, समाधि, ध्यानधारणा नि भक्ति हीच, अशातऱ्हेचे वातावरण उत्पन्न करण्याची हुकमी साधने होत. त्या साधनांची पद्धति, त्या मार्गातील इष्टानिष्ट, फायदे-तोटे नि टाळायची धोकास्पद स्थाने यांचा विचार करायचा तर वेळहि फार लागेल नि तुला ते समजण्याची सध्या गरजहि नाही ! मला म्हणायचे आहे ते इतकेच की अनुभवांनी हे निश्चित झाले आहे की योग, त्यातील समाधि नि विशेषत: निर्विकल्प समाधि जर साधली तर साधकाला निश्चयेकरून, नि:स्तब्ध मन:स्थिति प्राप्त करून घेता येते; इतकेच नव्हे तर त्याला सुयोग्य वातावरण कायम ठेवून ती स्थितीहि अनायास मिळवता येते; त्यातूनच आतापर्यंत चर्चिलेला अनुभवहि प्राप्त होतो." मी म्हटले, "गुरुदेव, तुम्ही म्हणता त्या योग-साधना मला शिकवा असे मी म्हटले तर तो उतावीळपणा नाही ना होणार ? त्या शिकावयाच्या तर माझ्या सध्याच्या आयुष्यक्रमात मला बदल करावा लागेल का ? निराळी राहणी पत्करायला लागेल का ? माझे सध्याचे सर्व उद्योग–कार्यक्रम–सोडावे लागतील का ? योगविद्या आत्मसात करायची, तर आईवडील, नातेवाईक यांचा त्याग करून मला जोगी होऊन धुनी पेटवून जगापासून दूर राहावे लागेल की काय ? " गुरुदेव हसले व म्हणाले, " माधव, तुला यातले काहीहि करायला नको बरं. तुला जे आवडेल ते मी तुला शिकवीन, मग तर झाले ? तुझ्या सध्याच्या जीवनक्रमात योगाभ्यास अडथळे उत्पन्न करण्याऐवजी उपकारकच ठरेल ! एकतर त्यामुळे तुझी प्रकृति कशी छान राहील, मन:स्थिति शांत शांत राहील. शारी-रिक नि मानसिक कामे करायला उत्साहाला उधाण आल्यासारखे वाटेल; आणि माझी तर खात्री आहे, तुझ्या प्रगतीच्या सर्व वाटा खुल्याच होतील. या मार्गात पडणाऱ्या लोकांचा ज्या ठिकाणी कपाळ-

मोक्ष होतो ती धोकास्थाने मी तुला दाखवीन. त्यांना कसे टाळायचे तेही सांगेन." गुरुदेवांच्या या आश्वासनाने मला 'धन्य धन्य' झाले मी जागेवरून उठलो; व गरुदेवांचे पाय धरले. गुरुदेव म्हणाले, "उद्या सुमुहूर्त आहे, तेव्हा योगविद्यचो दीक्षा मो तुला उद्याच देईन."

दुसऱ्या दिवशी पहाटे चार वाजता मी उठलो. तत्पूर्वीच जणु माझी वाट पाहात स्वामीजी व गुरुदेव उठलेले होते. 'ज्ञानवापी' वर आम्ही तिघांनीहि स्नाने उरकली, नि देवळाच्या आतल्या गाभाऱ्यात गुरुदेवांनी योगविद्येचा मला पहिला धडा दिला. या सर्वातून मोकळे व्हायला सकाळचे आठ वाजले; तेव्हा माझा चहा झाला. स्वामीजी व गुरुदेवांनी दूध घेतले. मी ड्रायव्हरला हाक मारून गाडी घरी परत न्यायला फर्माविले व आईवडिलांना निरोप पाठविला की साधारण आठवडा झाल्यावर आम्ही सर्व परतू. माझा नोकरहि ड्रायव्हरबरोबर गेला व सायंकाळी काही जिन्नस घेऊन परत आला. अशा प्रकारे आम्ही तिघेहि वृद्धेश्वरला जवळ जवळ एक आठवडा राहिलो होतो. तिथले एकंदर वातावरण, 'ज्ञानवापी' च्या पाण्याची स्नाने. जी नाथपंथीय प्रत्येक भक्तगण गुरुमंत्रदीक्षेच्या वेळी नेहमीच करतो, ती योगसाधनेला मोठी उपकारक वाटली. घरी आल्यावर माझी प्रकृति पूर्ववत होऊन उत्साहहि चांगलाच आहे असे आईवडील म्हणाले. वृद्धेश्वरच्या मोकळ्या नि आरोग्यप्रद हवेमुळे असेल किंवा गुरुदेवांच्या सान्निध्यात मिळालेल्या योगविद्येच्या संथेमुळे असेल माझ्यात इष्ट बदल झाला होता–सात दिवसांच्या अवधीत–हे मात्र खरेच ! कारण, माझे मलाच कितीतरी बरे वाटत होते. हुशारी वाटत होती. गुरुदेव व स्वामीजी दोन दिवस राहून पंढरपूरला गेले. घर कसे 'ओके ओके' वाटत होते. गणपति गेले म्हणजे कसे होते तसे !

एकंदरीत माझ्या आईच्या मनावर गुरुदेवांच्या बोलण्याचा फारच खोलवर परिणाम झाल्यासारखे दिसले. कारण, ती राहून राहून गुरुदेवांचे बोलणे आठवी. आणि त्यांनी जे जे सांगितले

ते कृतीत आणण्याचा ती प्रयत्न करीत होती.त्या रात्री जेवणे झाल्यावर आम्ही एकत्रितपणे बसलो असता माझी आई म्हणाली, "मन व बुद्धी कसल्याहि विचाराशिवाय किंवा समस्येशिवाय निःस्तब्ध ठेवणे मोठे कठीण होते नाही ?" माझे वडील म्हणाले, "तुझ्या मनात माधवच्या लग्नाबद्दल अजून विचार घोळत असतील ना? आपण आता गुरुदेवांसारख्या समर्थाच्या हाती माधवच्या भवितव्याचा प्रश्न सोपवला आहे; आणि गुरुदेवांनीहि सर्व काही माधववर सोपवलेय— स्वतःला जसे योग्य वाटेल तसे करायला ! माधव आपला मुलगा असल्याने आपण त्याला लहान मूल समजतो. परंतु खरे म्हणजे तो आता वयाने मोठा झाला आहे स्वतःचे भले-बुरे कशात आहे हे ठरविण्याइतकी त्याची बुद्धीसुद्धा चांगली तरल आहे. त्याच्या आयुष्याचा विचार आपण करायचा ह्यासारखा मूर्खपणा नाही हे मला तरी पटलेय्. तेव्हा, तुझे नि माझे काम, आता येवढेच उरलेय की, 'तुका म्हणे उगे राहावे जे जे होईल ते ते पाहावे.' आपले दिवस आता कितीसे उरले आहेत ? असं जरी असलं ना, तरी गुरुदेवांनी जेजे सांगितले ते आपल्या दोघांना सांगितले आहे. आपण नसत्या भानगडीचे नि प्रश्नांचे ओझे डोक्यावर जन्मभर बाळगत आलो. त्यामुळे जन्मभर आपण जीवन खऱ्या अर्थाने जगलोच नाही. कारण, शांति नि समाधान हेच मानवी जीवनाचे इष्ट ईप्सित; नि ते तर नेमके आपल्या उभ्या आयुष्यात आपल्याला साधले नाही; मिळाले नाही. तेव्हा, जे आजपर्यंतच्या आयुष्यात आपल्याला मिळालेले नाही ते मिळविण्याचा आता, उशिरा का होईना, आपण उभयतांनी ठरवून प्रयत्न करूया. चूक दुरुस्त करण्याचा प्रामाणिक प्रयत्न आपण दोघांनीहि केला, तर मला नाही वाटत, आपण अजूनहि शांत,सुखी जीवन आत्मसात करूच शकणार नाही असे ! पण येवढे सर्व ऐकूनहि आपण मात्र जुनेच दळण दळीत आहोत." माझी आई यावर उत्तरली "खरंच गडे, आपल्या सुखाच्या आड ज्या ज्या गोष्टी आल्या त्या सोडून द्यायचा आपण दोघेहि प्रामाणिक प्रयत्न करूया. लग्न झाल्या दिवसापासून,

तुम्ही मला नि मी तुम्हांला, असे परस्परांच्यावर विसंबून आपण एकत्रितपणे काढले. तसेच, हातात-हात घालून, आपण उरलेले आयुष्यहि एकसुरात घालवू या. गुरुदेवांच्या कृपाप्रसादाने, माझी खात्री आहे, आपण आपल्या प्रयत्नात निश्चितपणे यशस्वी होऊ."

रात्री आम्ही तिघेहि मनाच्या प्रसन्नअवस्थेत आपापल्या खोल्यांतून गेलो. पण मला किती तरी वेळ झोपच येत नव्हती. काही तरी वाचण्याचा प्रयत्न करून पाहिला. पण, मनच लागत नव्हते वाचनात. आत्मपरीक्षण चालू होते अंतर्मनात ! लहानपणापासूनचे दिवस आठवले; नि कसकसे आपण वाढलो नि आज कुठपर्यंत येऊन पोहोचलो याचा आढावा मन घेत होते. मी ज्या समाजात वाढलो, ज्या कुटुंबात वावरलो, नि आईबापांनी ज्या तऱ्हेचे जीवन घडविले तसा मी वाढलो, बनलो. साऱ्या आयुष्यात मी प्रत्येक गोष्टीत हिरीरीने वागत आलो. कसली म्हणून कसली मेहनत करायची मी बाकी ठेवली नाही. आमच्या घराचे वैभव, आमच्या कुटुंबाची परंपरा नि वडिलांची जी इच्छा होती त्या सर्वांनुरूप मी आयुष्यात सर्व काही मिळविले. परिणामत: वडिलांचा विश्वास मी संपादन केला आहे. त्यांना माझ्या यशाचा अभिमान वाटतो. माझ्या मित्रमंडळींची नि घरच्या नातेवाईकांचीहि माझ्याकडे पाहण्याची दृष्टि अशीच सहानुभूतिपर आहे. त्यामुळे मी आतापर्यंत जे केले त्याबद्दल मला पश्चात्ताप किंवा खंत वाटण्यासारखे काही घडलेच नाही.

शिक्षणाबाबतीत मी इतक्या विविध विषयांचा अभ्यास केला आहे की बुद्धीला आकलन होत नाही असा कुठला विषयच नाही. प्रत्येक विषयाचे जास्तीत-जास्त ज्ञान मी संपादिले आहे. त्यामुळे मला जीवनात जे हवे ते मी मिळवीनच मिळवीन असा मला आत्मविश्वास वाटतो; आणि खरोखरच, त्यादृष्टीने, मला मिळालेल्या शिक्षणाने चांगलाच हात दिला आहे ! त्यामुळे गेल्या दिवसांबद्दलहि मला खंत वा खेद वाटत नाही. पण आता मनात विचार तरळतो तो हा, की,

पैसा, मानमरातब नि स्वास्थ्यमय ऐषारामी जीवन मिळविणे एवढाच का साऱ्या शिक्षणाचा सार्थ उपयोग ? आतापर्यंत केले ते येवढेच–मनाने कबुलीजबाब दिला. माणसाला जगायला ते काय लागते ?–त्याहिपेक्षा उच्च ध्येये व आदर्श मी माझ्यापुढे काय ठेवली होती नि ती कितपत साध्य झाली आजपर्यंतच्या जीवनात ? गुरुदेवांच्या शब्दात म्हणायचे म्हणजे सारी धावपळ मृगजळाप्रमाणे धावणाऱ्या हरिणासारखी; शक्ति नि बुद्धीचा नुसता अपव्यय होता नव्हे का ? सारेच क्षणभंगुर, काल्पनिक, नव्हते तर काय ? कुठेतरी कणभर तरी मन:शांतीचा अनुभव आहे का या सर्व धडपडीत नि एवढ्या वर्षांच्या दगदगीत ? भावनाविवश होऊन काहीतरी विचार भरकटत जायचे अशी माझी मनोधारणा नाही; अनुभवावर उभी असलेली, सत्याचा शोध घेणारी, माझी वृत्ति आहे. तेव्हा माझ्या दृष्टीने हे ठरले की सध्याचे, चालू जीवन बदलण्याचे कारण काहीच नाही. परंतु, गुरुदेवांच्या उपदेशाप्रमाणेहि वागायचे. त्यातूनच माझ्या अभ्युदयाची गोष्ट कोणती ते आपसूखच ठरेल. तेव्हा भावनेच्या आहारी जाऊन काहीतरी करण्यापेक्षा, आयुष्यात घडतील तशा गोष्टी घडू देत असा मी शेवटचा निर्णय घेतला कारण, मी कोणत्या वातावरणात वाढलो आहे, किंवा मला कशा प्रकारचे शिक्षण मिळाले आहे, या गोष्टी मनुष्याच्या जीवनात महत्त्वाच्या नसून मुक्त विचार नि त्यातून उत्पन्न झालेल्या कृतीच जीवनाला खराखुरा आकार देत असतात, असे मला पटू लागले होते. विचारप्रधान कृति ही मुख्य ! मनुष्याचे जीवन त्याच्या कृतीने बनत असते. म्हणून एखाद्याचे जीवन कृतींने काठोकाठ भरलेले दिसते. कारण, त्याच्या प्रत्येक कृतीमागे विचारांचा फार मोठा स्रोत असतो. जर आपल्या विचारावर आपले लक्ष असेल, तर कृतीवरहि ते लक्ष तितकेच राहील. एखादी व्यक्ति जर स्वत:पलिकडे न बघणारी असेल, तर त्याच्या साऱ्या कृतीहि परिणामांबद्दल पर्वा न बाळगता संपूर्णपणे आपमतलबी, स्वत:चेच बडेजाव संभाळणाऱ्या, केवळ आत्मतुष्टीकरिता

घडून आलेल्या, अशा असतील. तेव्हा, इच्छा नि भावना एकमेकांचे चोजले पुरविण्याकरिता कृतींना जन्म देत असतात. त्याकरिता आपल्या भावना व इच्छा यांजवर सक्त नजर ठेवून माणसाने वागायला हवे; तेव्हाच क्षणाक्षणाला बदलणाऱ्या कृतीचे स्वरूप माणसाच्या लक्षात येईल. अशा प्रकारे माझ्या विचारांना तीक्ष्ण आत्मनिरीक्षणाखाली मी सतत ठेवले—तरच ते विचार सदाचाराच्या चाकोरीतून सुव्यवस्थितपणे आयुष्यभर चालतील, आणि अशातऱ्हेने जन्मभर मी माझ्या विचारांच्या आधीन न राहाता विचार माझ्या ताब्यात राहतील. तदनुषंगाने कृतीहि ! या आणि अशाप्रकारचे विचार करण्यात रात्र बरीच झाली. मी झोपलोहि उशीराच. असे असूनहि मला जाग लवकर आली. त्यावेळी मी यत्किंचितहि थकलेला नव्हतो, मला उत्साह वाटत होता, हुशारी वाटत होती. मी तसाच उठून टेनिस खेळायला क्लबवर गेलो. घरी परत फिरत असताना मनात येऊन गेले की थोडे दिवस बंगलोरला तेथील मित्रांच्या सहवासात घालवावे. बंगलोरचा हवापालट मला जास्त मानवेल.

घरी आल्यावर बंगलोरला जाण्याचे माझ्या मनात का आले याचा माझा मीच विचार करू लागलो.वास्तविक इथे घरी काय कमी होते ? सर्व काही कसे माझ्या स्वास्थ्याकरिता उभे होते. मग माझ्या आयुष्यात सध्या उभे राहिलेले प्रश्न हाताळण्याकरिता येथे राहाणे मला भयावह तर वाटत नाही आहे ना ? नि म्हणून, कुठेतरी दूरवर पळू जाऊ इच्छितोय ? इथे मला हवी ती विश्रांति का मिळत नाही आहे ? या उलटतपासणीत मनाने कौल दिला हे सर्व झूट आहे. नगरची हवा छान होती. मला कसल्याही प्रकारचा येथे त्रास नव्हता; कसलीही वा कोणाचीही भीती नव्हती; प्रकृति उत्तम होती—सर्व काही जिथल्या तिथे छान होते. फक्त मानसिक स्थिति ठीक नव्हती. नगरमध्ये जे नाही, असे बंगलोरला काय आहे, असं मला वाटलं, म्हणून मी तिकडे जाण्याचा बेत करीत होतो ? माझी सध्याची मनाची धारणा आणि काहीतरी चुकीच्या कल्पना यामुळे मी अस्वस्थ

झालो होतो; नि म्हणून मला बंगलोरला जावेसे वाटत होते; हे उघड होते. माझ्या मनाचा हा वाहवत गेलेला चुकीचा निश्चय माझ्या लक्षात येताच माझे मला हसू आले. माझे मनच जिथे चुकीच्या दिशेने वाहवत जाते आहे ते बंगलोरला जाऊन का कुठे स्थिर होईल ? जागेत बदल करून नव्हे तर मनोवृत्तीत बदल केल्यानेच केवळ माझ्या विचारांना योग्य दिशा लागेल. त्यानेच आवश्यक वाटत असलेली मानसिक शांतता व विश्रांती मला मिळू शकेल हे मला स्वच्छ झाले. सूर्योदयानंतर धुके निवळावे तसे माझ्या डोक्यातील बंगलोरला जायचे वेड उगवले तसे मावळले. मी माझ्या घरीच संपूर्ण आरामात होतो. आगामी आयुष्यात विचार कसा करावा याचे जणु प्रात्यक्षिकच या बंगलोर प्रकरणाने मला मिळाले. प्रश्न सुयोग्यपणे सोडविण्याचा हाच एकमेव मार्ग आहे याची मला खात्री पटली. पुढील आयुष्यात या पद्धतीनेच विचार केल्यास कितीतरी गोष्टींचा उलगडा पडेल याबद्दल मला विश्वास वाटला.

●●●



# साद देती हिमशिखरे....

## तिसरा भाग

साद देती हिमशिखरे

# ९

नगरमध्ये रजा घालवून मी धारवाडला कामावर रुजू झालो. तेव्हा अगदी ठणठणीत बरा झालो होतो. एके दिवशी सरकारीरीत्या कळविण्यात आले की लायक व्यक्तींची, मध्यवर्ती सरकारात उच्च-पदस्थ नेमणूक करण्याकरिता विचार चालू आहे. प्रांतीय सरकारांनी अशा कार्यक्षम अधिकाऱ्यांची शिफारस केल्यास त्यांची चाचणी घेण्याकरिता त्यांना नवी दिल्ली येथे बोलावण्यात येऊन, उत्तीर्ण होणाऱ्यांना दिल्लीतील मुख्य कचेऱ्यांतून नेमले जाईल. धारवाडच्या कलेक्टरने माझ्या नावाची शिफारस फार जोरदारपणे केली असल्या-मुळे मुलाखतीकरिता मला दिल्लीला पाचारण आले. त्याशिवाय तेथे चाचणी परीक्षाहि व्हावयाची होती. चाचणी समितीपुढे हजर राहण्या-करिता मी धारवाड सोडले. दिल्लीला निघण्यापूर्वी मनाने विचारलेच की दिल्लीला जाण्याने काय साधणार आहे ? पैशाची—मोठ्या पगा-राची लालूच की वरच्या श्रेणीच्या अधिकारपदाची लालसा ? सध्याच्या आहे त्या ठिकाणी मला कसलाहि त्रास नाही आणि आजन्म अविवाहित राहण्याचा मी निश्चय करून बसलो असताना जास्त पगाराचे अगर मोठ्या हुद्याचे मला आकर्षण होते म्हणून का मी

दिल्लीला जात होतो ? . .तसे नव्हे तर मग...? दिल्लीची चाचणी परीक्षा, तेथे होणारी निवड हे माझ्या बुद्धिमत्तेला आव्हान होते, शैक्षणिक प्रांतात मी जे बौद्धिक प्रावीण्य संपादन केले आहे त्या बुद्धीचा कस दिल्लीत लागेल असे मला वाटले म्हणून ते आव्हान स्वीकारण्याच्या लालसेने मी दिल्लीला जायला निघालो होतो. प्रश्न उभा राहिला, असल्या आव्हानाचा स्वीकार किंवा अव्हेर करणे हे तरी बरोबर आहे का ? मी अजूनपर्यंत कसल्याहि आव्हानापुढे मान वाकवलेली नसल्याने दिल्लीचे बोलावणे नाकारणे म्हणजे मला भ्याडपणा वाटला. डरपोकपणा मला कधीच मान्य नसल्याने मला स्वस्थ बसणे अशक्यच होते. चढाओढ–शर्यंत यात माघार म्हणजे स्वसामर्थ्याबद्दलच साशंकता, यशापयशाबद्दल भीती–माझा आत्म-विश्वास हे मान्य करण्यास तयार होईना. समजा, माझी निवड होऊन मी वरच्या जागेवर नेमला गेलो, तर ती जागा मी माझ्या हुशारीने, कार्यक्षमतेने मिळविणार असल्याने त्यात कुणाच्या हिताआड येण्याचे पाप मी कधीच करणार नव्हतो. अपयश आले तर माझ्यात काय न्यून आहे ते तरी मला कळेल. त्यामुळे आत्मपरीक्षणाला एक नवा पैलू मिळेल. तेव्हा दिल्लीला जाण्यात मी कसलीहि चूक करीत नाही. माझ्या भवितव्याची मी काळजी करण्याचेच सोडले होते नि वारे नेईल तशी जीवननौका या संसारसागरावर जाऊ दे असेच मी ठरविले होते. पुढच्या विचारापेक्षा आज काय घडतेय, या क्षणाला काय घडतेय, याकडे माझे लक्ष होते.

विचारशून्य आचार मला अशक्यच वाटू लागले होते अलिकडे ! विचारशून्य मनातून कधी कृति उत्पन्न होणे शक्य होईल यावर माझा विश्वासच बसेना. गुरुदेवांच्या गेल्या भेटीपासून माझ्यात बदल झाला होता खास ! मला कशाचीहि चिंता वाटनाशी झाली होती. माझे मन कशानेहि क्षुब्ध होईनासे झाले. मन काय म्हणतेय, कुठे चाललेय नि त्याचा शेवट कोणत्या कृतीत होतो आहे हे प्रत्येकवेळी पडताळून पाहण्याची सवयच होऊं पाहात होती. अशा प्रकारे अंतर्मुख होऊन

पाहण्यात मला मोठे सुख वाटू लागले होते. त्याने झाले काय, क्षणाक्षणाला मनावर उमटणारे ध्वनि-प्रतिध्वनी यांची साद माझे मन घेऊ लागले. मनातील एकहि आघात विस्मृतीत नाहीसा होणे अथवा दुर्लक्षिला जाणे अशक्य होऊ लागले. मनात एक तऱ्हेची अखंड जागरूकता साकार होत होती. चित्ताची ही सावधानता उत्तर आयुष्यात साह्यकारी होईल की कसे याचा विचारसुद्धा माझ्या मनाला शिवला नाही. पण एक गोष्ट मात्र निश्चित झालेली अनुभवास येत होती की, आता माझ्या मनातील पुष्कळसा गोंधळ कमी झाला होता. मनाने व शरीराने मी एकप्रकारे सुस्थिर होत होतो. पूर्वीपेक्षा माझ्यात जास्त जोम व उत्साह उत्पन्न झाला होता. वृत्तीनेहि, दिवसानुदिवस, मी शांत व गंभीर बनत होतो. या दिवसांत माझी प्रकृती छान होती. व्यायाम करण्याची तर मला लहानपणापासूनची सवयच होती. त्यातच योगासनांच्या अभ्यासाची भर पडली. हे सर्व करीत असता मला आनंद व समाधान वाटत होते. विशेष म्हणजे या दिवसांत मला कधीच एकाकी वाटले नाही. अलिकडे गुरुदेवांच्या सहवासात आपण सतत असावे असे वाटे; त्याकरिता सर्व सोडून, सारे उर्वरित आयुष्य त्यांच्या सान्निध्यात घालवावे अशी एक चमत्कारिक ओढ मनाला लागून राहिली होती. पण, तशी ओढ का वाटत होती याचे मनाला पटणारे कारण मात्र मी सांगू शकत नव्हतो. त्याचप्रमाणे उर्वरित आयुष्य त्यांच्या सहवासात घालवावेसे वाटत असताना, त्यातून फायदा काय, असे कुणी विचारले तर, त्याचेहि उत्तर माझ्याजवळ नव्हते. तेव्हा, मनात आल्याप्रमाणे कृति करण्याचे लांबणीवर टाकून आयुष्य आपल्या गतीने जसे जात आहे तसे जाऊ दे असे म्हणत मी दिवस ढकलत होतो.

दिल्लीत येऊन दोन आठवडे होऊन गेले होते. परीक्षेला बसण्याकरिता सर्व भारतातून उमेदवार आले होते. त्यामुळे आमचा म्हणजे एक खुशालचेंडु संमिश्र मेळावाच जमला होता. लेखी परीक्षा संपून क्रमाक्रमाने मौखिक परीक्षा चालली होती. माझा क्रम येईपर्यंत वेळ

असल्याने मला काहीच करायचे नव्हते. मी मित्रांना भेटत होतो; अधिकाऱ्यांच्या क्लबात परिचित मंडळी वाढत होती. कारण, तेथेच माझे तात्पुरते वसतिस्थान होते. शेवटी समितीपुढे तोंडी परीक्षा देण्याचा माझा दिवस उजाडला. समितीत सरकारी उच्चपदस्थ अधिकाऱ्यांचा भरणा होता, व समितीहि संपूर्णतया सरकारी पातळी-वरून काम करीत होती. निकालाचा तोल या तोंडी परीक्षेवरूनच ठरायचा होता. समितीतील परीक्षकांनी मला अनेक प्रश्न विचारले, व माझ्या मते मी सर्वांची उत्तरे समाधानकारक दिली होती. निव-डीचा निकाल लागेपर्यंत सर्वच उमेदवारांनी दिल्लीतच राहायचे ठरवले होते, म्हणून मीहि माझी रजा पंधरा दिवसांनी वाढवून घेतली. कारण, तोपर्यंत अपेक्षित निकाल लागणार होता. मोठे मजेत गेले ते दिल्लीतले दिवस. दिवसा प्रेक्षणीय स्थळ पाहात भटकायचे व रात्री अधिकाऱ्यांच्या क्लबात जीव रमवायचा असा कार्यक्रम होता. कॉलेजात असल्यापासून टेनिस व पिंगपाँग या खेळांत मी प्रावीण्य संपादन केलेले होते. ते प्रावीण्य अजूनहि कायम टिकवले होते. कारण, माझा खेळ, अजून तरी सुटला नव्हता. दिल्लीत असताना मला खेळायला संधी तर भरपूर मिळालीच; पण, उत्तमोत्तम खेळाडूंचा खेळ पाहायची संधीहि मिळाली. शिवाय, त्यांच्याशी परिचय झाला तो वेगळाच. दिल्लीत मध्यवर्ती सरकारच्या कचेऱ्या असल्याने तिथे वरिष्ठ दर्जाचे अधिकारी सहकुटुंब राहात होते. धनाढ्य व्यापारी, राजे महाराजे, नबाबजादे नि उच्चभ्रू समाज आपल्या साऱ्या भपक्यानिशी व बडेजावासह दिल्लीत एकत्रित पाहायला सापडला.

इथे कुमारी विनोदिनी गुप्ता नावाच्या एका टेनिस व बॅडमिंटन खेळाडू मुलीशी माझा परिचय झाला. ‘ बडे बापकी बेटी ’, दिल्लीत श्रीमंत घराणे म्हणून महशूर व त्यातच कमालीची सुंदर अशी ती मुलगी होती. एका स्पर्धेत ती माझी सहकारी खेळाडू होती. आम्ही स्पर्धा जिंकली तेव्हा तिच्या खेळातील नैपुण्याबद्दल मी तिचे अभि-नंदन केले. तिचा बापहि एक बऱ्यापैकी टेनिसपटू असल्याने त्यांचा

माझा परिचय होऊन त्याचे रूपांतर मैत्रीत झाले होते. टेनिस कोर्ट-वर दररोज सकाळी, खेळायच्या निमित्ताने आमच्या भेटीगाठी होऊ लागल्या. आमच्या परिचयाची मुळे खोलवर शोध घेऊ लागली. विनोदिनीने आपल्या पित्यासह बराच जगप्रवास केला होता, नि तिचे बरेचसे शिक्षणहि विलायतेतच झालेले होते. ती अजूनहि अवि-वाहित होती. कारण, त्यांच्या जातीत तिला योग्य असा उपवर मुलगा तिच्या वडिलांना आढळेना, व जातिबाह्य विवाह करायचा तर तिनेच आपली निवड करावी असे श्री. गुप्तांचे मत होते. स्वत: श्री. व सौ. गुप्ता सुविद्य व सुसंस्कृत असल्याने, आणि जगप्रवासात अनेक समाज त्यांनी जवळून पाहिले असल्याने, लग्नाबाबत त्यांची मते उदार होती. त्यामुळे विनोदिनीने आपल्या जातिधर्माचाच पती निवडला पाहिजे असा त्यांचा कधीच आग्रह नव्हता. दिवसानुदिवस माझा व विनोदिनीचा सहवास वाढत होता, आणि काय कारण असेल ते असो मला तिचा सहवास हवाहवासाहि वाटू लागला होता.

●●●

# २

निवड-समितीचा निकाल जाहीर झाला. निवड झालेल्या यशस्वी उमेदवारांत मीहि एक होतो. कोणत्याहि जागेवर नेमणूक होण्यापूर्वी मला दिल्लीतच सहा महिने राहून कामाची माहिती करून घेणे अपरिहार्य होते. त्याप्रमाणे मला कळविण्यातहि आले; शिवाय मला प्रादेशिक सरकारी नोकरीतून मोकळे करावे असे हिंदुस्थान सरकार-कडून धारवाडच्या जिल्हाधिकाऱ्यांना कळविण्यात आले.

माझे असंख्य स्नेही; बंधू व आई-वडील यांच्याकडून मला अभि-नंदनाची निरनिराळी पत्रे आली. श्री. व सौ. गुप्तांनाहि निवडीचा

निकाल ऐकून अत्यानंद झाला. विनोदिनीही खुषीत होती. का न कळे, दिल्लीत आणखी काही दिवस राहावे लागणार याबद्दल मलाहि समाधान वाटत होते. धारवाडप्रमाणे कामाचा तगादा फारसा नव्हता. फक्त एका खात्यातून दुसऱ्या खात्यात अशी सर्व खात्यांतील कामांची मला माहिती करून घ्यायची होती. त्यामुळे कामात विविधता मात्र होती. शिरावर कसलीहि जबाबदारी नव्हती. कचेरीच्या ठराविक तासांपेक्षा वेगळे असे मला काही करायचे नव्हते. इतर उलाढाली करायला मला सकाळ सायंकाळ मोकळी होती.

माझा बहुतांश वेळ विनोदिनीच्या गोड सहवासातच जात होता. सकाळी नि सायंकाळी आम्ही दोघेहि क्लबच्या टेनिस किंवा बॅडमिंटन कोर्टावर असायचे.विनोदिनीवर उच्च संस्कारांचे व बौद्धिकतेचे परिणाम झालेले असल्याने तिच्या वागण्या-बोलण्यात सौजन्य व गोडवा विशेष होता. तिचे हंसणे तर वेड लावणारे होते. टेनिसचे डाव खेळून एके दिवशी आम्ही दोघेहि, विश्रांती घेत बसलो होतो. तेव्हा आम्हा उभयतांच्या सहवासाबद्दल नि आमच्या भावी संबंधाबद्दल काहीसे चमत्कारिक उद्‌गार मला ऐकायला आले. विनोदिनीच्या गालावर त्यामुळे रक्तिमा आला नि तिने माझ्याकडे पाहिले. मला स्वतःला ते उद्‌गार तेवढेसे आवडले नाहीत. पण, मी ते सर्व हसण्यावारी घाल-विले. दिल्लीबद्दल माझा अनुभव विचाराल तर मी म्हणेन; दिल्ली-मध्ये कंड्या पिकवणे नि स्वतःपेक्षा इतरांच्याबाबतच अति चोखंदळपणे चांभारचौकशा करणे हेच फार चालते. आमच्याबद्दल बोलणाऱ्या त्या माणसाला चांगला फैलावर घेण्याचा माझा विचार होता. परंतु, प्रथमतः विनोदिनीला तिच्या घरी भेटून झाल्यावर काय ते करायचे मी ठरवले. तेव्हा, मी उठलो; नि माझ्या पाठोपाठ विनोदिनीही उठली. मार्गात कुणीच कुणाशी बोलले नाही. तिच्या घरी पोचल्यावर मी तो विषय काढला; नि तसाच परत क्लबवर येऊन त्या गृहस्थाला छेडले. आश्चर्य हे की, माझा अवतार पाहून त्या गृहस्थाने माझी माफी मागितली; व आपल्या बोलण्यात विशेप गंभीर खोच नव्हती

असे तो म्हणू लागला. विनोदिनीचीहि माफी मागण्याचे त्याने कबूल केले. कुणाचीहि नालस्ती करण्याचा त्याचा इरादा नव्हता. मी त्यावेळी त्याला बजावले की, " ठीक आहे बच्चंमजी; या वेळी सोडून देतो. पण काय बकायचे ते सावधपणे बकत जा. नाहीतर माझ्याशी गाठ आहे–हे लक्षात ठेव. माझ्या वैयक्तिक गोष्टीत कुणीही नाक खुपसलेले मला खपणारे नाही. तुझ्या दृष्टीने असल्या गप्पा असतील हलक्या–फुलक्या, निवळ गमतीच्या पण असल्या बाबतीत गय करणारा मी नव्हे."

---

दुसऱ्या दिवशी मी गुप्तांच्या घरी गेलो तो विनोदिनी क्लबवर खेळायला यायला तयार नाही असे दिसले. अर्थात तिला बरे वाटत नाही की आणखी कुठे जायचे आहे याची मी चौकशी केली. तिने सरळसरळ काहीच उत्तर दिले नाही. फक्त एवढेच म्हणाली, " तुला टेनिस खेळायचेच असेल तर तू एकटा जाऊ शकतोस क्लब-वर." चौकशी करता मग मला कळले की आम्हा उभयतांच्या सलगीबद्दल लोक जे क्लबवर बोलतात ते तिला आवडत नसल्याने ती क्लबवर येऊ इच्छीत नाही. माझ्यासारख्या होतकरू नि उद्यांच्या हुद्देदार अधिकाऱ्याच्या बाबतीत असला काही प्रवाद निघावा हे तिला पसंत नव्हते. ती म्हणाली, " मी हिंदुस्थानात नि परदेशातहि पुष्कळ प्रवास केला आहे; आणि माझ्या सहवासात आतापर्यंत अनेक तरुण येऊन गेले. पण माधव, तुझ्यासारखा तरुण मला अजूनहि भेटला नाही; नि याबद्दल मला फार अभिमान वाटतो." मी तिला मध्येच अडवून म्हटले, " बस्स झालं विनोदिनी. माझ्याबद्दल तू बाळगीत असलेल्या उच्च भावनांबद्दल मी तुझा फार आभारी आहे. पण मी कोण व केवढा आहे हे माझे मला ठाऊक आहे. तुझ्यापुढे तर मी एक अति सामान्य पुरुष आहे. मी त्या सद्गृहस्थांची चांगलीच हजेरी घेऊन आलो आहे. नि तो बेटा तुझीसुद्धा माफी मागायला तयार आहे. आपण येवढ्याशा निमित्ताने क्लबवर एकत्र जायचे टाळू तर मात्र लोकांच्या संशयाला जास्तीच खतपाणी पुरवल्यासारखे होईल.

तेव्हां, माझे म्हणणे असे की, आपण क्लबवर, नेहमीप्रमाणे, रोज जायला हवे, व त्यांना दाखवून द्यायला हवे, की, त्यांच्या गांवगप्पांना आम्ही काहीही किंमत देत नाही. मग ते आपल्या जाण्यायेण्याबद्दल काहीहि बोलोत; व त्याचा काहीही अर्थ लावोत." माझे म्हणणे पटून विनोदिनी क्लबवर आली. क्लबमध्ये शिरत असताना आम्हाला पाहा-ताच आदल्या दिवशीचे ते गृहस्थ घाईघाईने आमच्याकडे आले आणि विनोदिनीपुढे जाऊन ते म्हणाले, "विनोदिनी, मला वाटते, तू तरी मला चांगलीच ओळखतेस. माझ्या कालच्या बोलण्याने तुझ्या भावना दुखवल्या असल्या तर मी खरोखरी दिलगीर आहे. माझ्या उद्‌गारात कसलाहि वाईट हेतू नव्हता. तेव्हा, माझे म्हणणे तूही मनावर घेऊ नयेस. तरीहि तुझी इच्छाच असेल, तर तू सांगशील त्या पद्धतीने, तुझी माफी मागण्याची माझी तयारी आहे. तरी क्षमस्व." विनोदिनी हंसली व त्या गृहस्थाला म्हणाली, "केलेल्या दिलसफाईबद्दल मी आपली आभारी आहे. आपण दिल्लीकर बेजबाबदारपणे बोलतो; अनाहूत काहीतरी मते प्रदर्शित करतो; पण माधवसारखे तरुण बाहेरगावाहून इथे आले आहेत त्यांना असला आगाऊपणा खपत नाही. ते असल्या वाऱ्यावर उडवून दिलेल्या वावड्यांची हजेरी घेतल्याशिवाय राहात नाहीत. तेव्हां, तुम्हांला खुलासाच करायचा असला तर त्यांच्याजवळ करा, माझ्याजवळ नको." त्यावर ते सद्-गृहस्थ उत्तरले "याबाबत कालच माझे नि माधवचे बोलणे होऊन मी त्यांची माफी मागितली आहे."

त्या सायंकाळी आमचा खेळ लवकर आटपला. क्लबवरून आम्ही दोघे फिरायला गेलो. दोघांच्याही मनात आपापले वैयक्तिक प्रश्न घोळत असल्याने असेल, पण रस्त्यात आम्ही कुणीच कुणाशी बोलत नव्हतो. पण या मूक--प्रवासाची मला एकदम जाणीव झाली. म्हणून मी म्हणालो, "विनोदिनी, अजूनहि तुझी खेळकर वृत्ती परत आलेली दिसत नाही. तुला बरे वाटत नसेल तर आपण घरी परतू या ना." विनोदिनी म्हणाली, "छेः रे! मला खरोखरच काहीहि होत नाही

आहे. फक्त जरा थकवा वाटतोय." तिला घरी पोचवून मी माझ्या-खोलीवर आलो. दिवस जात होते: आम्ही एकमेकांना भेटत होतो. जवळ जवळ दर दिवशी! परंतु, त्या दिवसापासून आमच्यातील दिलखुलासपणाला धक्का लागल्यासारखे झाले ते झालेच. मनातील रुखरुख बोलायला तर हवी होती. पण आधी सुरवात कुणी कशी करायची असं काहीसं अवघड झालं होतं.

एका रविवारी श्री. व सौ गुप्तांनी वनभोजनाचा बेत आखला नि आम्ही सर्वजण त्यांच्या गाडीतून दिल्लीबाहेर जायला निघालो. दिल्ली सोडली नि विनोदिनीने एक सुटकेचा सुस्कारा सोडला. आणि मग विनोदिनी-पूर्वीची विनोदिनी–प्रकट झाली. आम्ही आमच्या दिमतीकरिता डाक बंगला राखून ठेवला होता. एकंदरीत सहल फार मजेची झाली. न्याहारी आटोपल्यावर श्री. व सौ. गुप्ता बंगल्यातच आडवरली, व मी नि विनोदिनी भटकायला बाहेर पडलो. एका टेकडीकडे आम्ही आमचा मोर्चा वळविला. रस्ता नीट नव्हता. व चढणहि अवघड होती. त्यामुळे चढून जात असताना पुन:पुन्हा विनोदिनीला माझ्या हाताचा आधार द्यावा लागत होता. चढून गेल्यावर एक मोठे वडाचे झाड आढळले व त्याच्या गर्द छायेखाली आम्ही उभयतांनी बसायचे ठरवले. मी झाडाच्या पारावर चढलो.पण विनोदिनीला तिथपर्यंत येताच येईना. तेव्हा तिचे दोन्ही हात मी धरले व तिला वर खेचून पारावर घेतले. यापूर्वी स्त्री सहवासात इतक्या सलगीने मी कधीच वागलेलो नव्हतो. विनोदिनीचे दोन्ही हात धरून तिला वर ओढून घेताना विनोदिनीने जणू आपले सर्व-स्वच माझ्या हातात दिले आहे असे मला वाटले. मला तर तो अनु-भव अपूर्वच होता. माझ्या सर्वांगातून गोड झिणझिण्या गेल्या आणि हें नेमके काय होत आहे याचा मला बोधच होईना. चढण चढून आल्याने विनोदिनीचे दोन्ही गाल, गुलाबाच्या फुलासारखे लालबुंद झाले होते, त्यामुळे ती जास्तच वेधक दिसत होती. मी तिच्याकडे अनिमिष नेत्रांनी पाहात होतो. तेव्हा तिच्याहि डोळ्यातून आनंद

चमचमत आहे असे मला वाटले. ती लाजली, नि तिने आपले तोंड लपविले. माझ्या डोळ्यास डोळा देववेना तिला. तोंड लपवीतच ती म्हणाली, "मुलीकडे एवढे रोखून पाहण्याची सवय केव्हांपासून पैदा केलीस ?" मीही उत्तरलो "तू इतकी सुंदर दिसते आहेस आज की तुझ्याकडे पाहातच राहावे असे वाटतेय मला," ती घटनाच अगदी विचित्र होती. मनावर येवढा ताण पडला होता; की आम्ही दोघेहि जरा वेळ मुग्ध झालो होतो. त्या अबोलपणात आम्ही एकमेकांना ओळखू लागलो होतो; येवढेच नव्हे तर एकमेकांच्या अंतर्यामी काय चालले आहे तेहि आम्हाला समजत होते. विवेकावर भावनांची झालेली कुरघोडी माझ्या आयुष्यात मी प्रथमतःच अनुभवीत होतो. बुद्धीवर हृदयस्थ भावनांची मात झाली होती. पुढच्या क्षणी मी कसा काय वागेन, माझ्या हातून काय होईल, याची माझी मलाच खात्री वाटेना. काहीतरी अनपेक्षित व कसलीतरी अबोध शक्ती माझा ताबा घेत आहे नि माझ्यावरचा माझा ताबा ढिला पडत आहे असे मला वाटू लागले. स्त्रीसुलभ सहजप्रवृत्तीने तो फरक विनोदिनीच्या लक्षात येत होता; व ती जास्त गंभीर झाली होती. विषय बदलण्याकरिता ती म्हणाली, "माधव, आपण जरा मूकपणे असेच काहीवेळ बसलो, तर कुणाला वाटेल, आपण एकमेकांशी भांडलो आहोत." ती माझ्यापासून थोडीशी दूर सरली; नि म्हणाली, "म्हटलं, आलास की नाही अजून ताळ्यावर ?" मी हसलो नि म्हटले, "अशा सुंदर वातावरणात तुझ्यासारख्या देखण्या मुलीच्या संगतीत मन ताळ्यावर ठेवून वागणे कसे शक्य आहे ?"

ती म्हणाली, "तू काय बोलतो आहेस याचा जरा गंभीरपणे विचार कर. तू सुशिक्षित आहेस, समाजात तू कोणीतरी प्रतिष्ठित सद्गृहस्थ आहेस. तेव्हां असं वागून चालणार नाही याची मी का तुला आठवण करून द्यायला हवीय ?" या तिच्या उद्गारांनी मात्र मी ताळ्यावर आलो. माझी मला लाज वाटली. आणि सभ्यतेचे माझ्याकडून अतिक्रमण झाले असे मला वाटल्यावाचून राहिले नाही. तिच्या असहाय्य-

तेचा मी त्या एकांतस्थळी नको तसला फायदा घेत होतो; नि ज्या विश्वासाने तिच्या आईवडिलांनी तिला माझ्या संगतीत हिंडूफिरू दिले, त्याला मी माझ्या वागणुकीने काळिमा आणला होता. मी म्हटलेहि, "विनोदिनी, मला माफ कर. तुला यत्किंचितहि जरी मी दुखावले असेल तर त्याबद्दल मनापासून मी फार दिलगीर आहे." ती म्हणाली, "मानापमान किंवा मला दुखावण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. पण आपला परिचय झाल्या दिवसापासून कधीही न आढळलेला आडमुठेपणा नि आडदांडपणा तुझ्या वागण्यांत पाहून मात्र मी विस्मित झाल्ये. तुझ्या मनात काय चालले होते ते मी समजू शकते. पण आपले उभयतांचे वय लक्षात घेता, आपण यापेक्षा समंजसपणाने विचार करायला हवा. अशा वागण्याचा परिणाम किती दूरगामी व कसा होईल हे नको का लक्षात घ्यायला ? तू माझ्याशी जसा वागलास त्यात चूक होती असे नाही मी म्हणत. परंतु तुला तसे वागू देण्यास प्रोत्साहन किती द्यायचे याचा मीहि विचार करणे जरूर होते. मलाहि तू चाळविलीस, त्यापूर्वी तू गंभीरपणे विचार करायला हवा होतास. मला असे वाटते की, तुझ्यामाझ्या वागण्यात असे काहीही असता कामा नये, की ज्यामुळे आपल्याला पश्चात्ताप वाटेल, खंत वाटेल ! तुझे पूर्व-चरित्र मला फारच थोडे माहीत आहेत. तुझ्या आवडी-निवडी; जीवनातील ध्येये-महत्त्वाकांक्षा याबद्दल मला फारच थोडी कल्पना आहे. तुझेहि माझ्याबद्दल संपूर्ण अज्ञान आहे. माझे आतापर्यंतचे जीवन गेले कसे व पुढील आयुष्यात कसल्या इच्छा-आकांक्षा ध्येये मी बाळगून आहे. तेव्हा मनोविकारांचे अधिराज्य आपल्यावर व्हावे इतके आपण आता लहान नाही. आगामी जीवनाची कृत्रिम नव्हे तर डोळस चित्रे आपण निश्चितपणे रंगवू शकू. असेच आपले वय आहे. तेव्हा आपण आपली मैत्री आहे तशीच पुढेहि चालू ठेवू या; त्यात बदल करावा, काही निराळे रंग भरावे असे परिचयांती वाटू लागलेच तर त्याचा विचार नंतर करू. मैत्रीचे प्रेमात रूपांतर व्हायला अजून बराच काळ जायला हवा. माझ्याविषयी तुझ्या काय

भावना आहेत हे मला तरी ठाऊक नाही; पण मैत्रीण म्हणून तू माझा स्वीकार केला आहेस, असे मी धरून चालले आहे. तेव्हा कसल्याहि आततायीपणाच्या कृतीने आपल्या मैत्रीतील माधुरी आपण बिघडवू नये. तिला कडवटपणा येऊ देऊ नये असे मला तरी वाटते." या वेळेपर्यंत मी मनाने पुष्कळच सावरलो होतो. म्हणून मी म्हणालो,

"विनोदिनी, तू म्हणतेस ते तंतोतंत बरोबर आहे. माझ्या आयुष्यात, मला वाटते, हा पहिलाच प्रसंग आहे की माझ्या बुद्धीवर माझ्या हृदयस्थ भावनांनी कुरघोडी केली. कोणतीही कृति प्रत्यक्षात आणण्यापूर्वी माणसाने दोनदा विचार करायला हवा हे तुझे म्हणणे मला एकदम मान्य. एका विशिष्ट अतिरिक्त भावनाविवश अवस्थेत मी काही चुकून बोललो असेल तर ते तू विसरून जा. तू मला ताळ्यावर आणलेस याबद्दल तुझे आत्यंतिक आभार मानायला हवेत." त्याच वेळी श्री. व सौ. गुप्ताहि आमच्याच बाजूकडे येत असलेले आम्हांला आढळले. आम्ही दोघेहि ताड्कन उठलो; व त्या दोघांपर्यंत जाऊन पोहोचलोहि. डाकबंगल्यावर पोचल्यावर आमची जेवणे झाली. दुपारचा चहा झाल्यावर आम्ही पुनः दिल्लीकडे कूच केले; वाटेत माझ्या खोलीवर गुप्तामंडळींनी मला सोडले व ती मंडळी पुढे आपल्या बंगल्याकडे वळली.

रात्रीचे जेवण होताच झोपायचे असे मी ठरवले; परंतु बराच वेळपर्यंत झोपच लागेना. दुपारी घडलेल्या प्रसंगाचा विचार मनात येत होता असे नव्हे, तर दिल्लीत पाऊल टाकल्या दिवसापासून आजपर्यंतच्या सर्व घटना माझ्या डोळ्यांपुढून सरकत होत्या. विनोदिनीचा परिचय कसा घडला नि त्याचे रूपांतर मैत्रीत कसे झाले. जसजसे दिवस जाऊ लागले, तसतसे त्या स्नेहाचे स्वरूप प्रेमातच म्हणता आले नाही तरी मोहात पाडणारे—एकमेकांबद्दल भुरळ पाडण्या—इतके कसे ओढाळ झाले याचे चित्र स्पष्ट होऊ लागले. तिच्या सान्निध्यात माझ्या मनोवृत्ती फुलारत. नि तिच्या गैरहजेरीत एकाकी-

पणाची 'सल' मनात टोचत राही ही वस्तुस्थिती मला नाकारता येईना. माझ्या कुटुंबियांपासून नि स्नेहीमंडळींपासून मी किती दूर येऊन पडलो होतो. तिच्या सहवासात, म्हणूनहि असेल, मला एकप्रकारचे सुख वाटत होते निश्चित! आतापर्यंत घडत गेलेले अनेक प्रसंग आठवले आणि तिच्या सौंदर्याने मी कसा भारावलो तेहि माझ्या लक्षात आले. खरे पाहता, त्यात विनोदिनीची काहीच चूक नव्हती. किंबहुना, मला झुलविण्यात तिने कधीच पुढाकार घेतलेला नव्हता. माझ्या संगतीत तिलाहि काही हवेहवेसे वाटण्याचाहि संभव होताच. विचारमंथनांत मला समजून आले की नकळत अहेतुकपणे का होईना, मी जरासा मुर्खासारखाच वागत आहे. दुपारी घडलेल्या प्रसंगी जर मी वेळीच ताळ्यावर आलो नसतो तर...काय झाले असते त्याची मला कल्पनाच करवेना! झालेल्या घटनेचे मला आभारच मानायला हवेत; नि विनोदिनीने माझ्या डोळ्यात वेळीच झणझणीत अंजन घालून कायमचे ऋणी करून ठेवले आहे हे मला पटले! नीति–अनीतीबद्दल माझ्या ठोकळेबाज कल्पना नाहीत त्यामुळे नैतिक अध:पात वगैरे विचारांचा माझ्या मनाला स्पर्शहि झाला नाही. परंतु 'व्यक्ती' म्हणून मी केवढा धोका पत्करीत होतो याची मला पुन: जाणीव झाली नि मी जसा वागलो तसे वागायला नको होते असे वाटल्यावाचून मात्र राहिले नाही. 'विचार नि परीक्षण–निरीक्षण'–यांचा नेमका विसर पडून याच वेळी मी कसा वाहावलो? याला प्रेम म्हणायचे का? का मोह-भूल–भुरळ? की निवळ भोगेच्छा? प्रेमाचे विशुद्ध स्वरूप तरी काय?

प्रेमात, मग ते जिवंत व्यक्तीवर असो, वा काल्पनिक ध्येयादि अचल स्थितीवर असो, एकच गोष्ट अनुस्यूत असते. आपण 'प्रेम करतो' ही एकमेव भावनाच अत्यंत सुखावह, समाधान देणारी व रोचक असते. 'प्रेमासाठी सुखा विसरणे, हीच तयाची पूर्ति, । प्रेमासाठी देहविसर्जन हीच खरोखर मुक्ति!' तिथे देवाणघेवाण नाही; स्वामित्वाची आपमतलबी भावना नाही! प्रेम हा निवळ मनोविकार

असेल तर विनोदिनीला त्या विकाराचे भक्ष्य बनविणे यासारखी माझ्यासारख्या सुविद्य व सुशिक्षित म्हणवणाऱ्याला कमीपणा आणणारी, क्षुद्र ठरवणारी, दुसरी गोष्ट नाही. मग एकमेकांची इच्छापूर्ति हीच का ती भावना होती ? तसे असेल तर विनोदिनीच्या जीवनाशी हा इच्छापूर्तीचा खेळ खेळण्याचा मला अधिकार काय ? तो एक जीवघेणा–निर्घृण–महापातकी खेळ ठरेल ! जर या सहवासात निवळ गंमत किंवा सुखविचार प्रधान असेल तर विनोदिनीच्या जीवनात मी कसले काटे पसरीत होतो, याचा विचार मी करायला हवा होता. तिच्यासारख्या मुलीशी मी हा खेळ खेळायला नको होता. परिणामाची क्षिती न बाळगता विनोदिनीसारख्या सुशिक्षित व सुसंस्कृत मुलीशी माझ्यासारख्याने केवळ इच्छापूर्तीकरिता इतक्या गैर रीतीचे वर्तन करायला नको होते. माझ्या मनात तसं काही नव्हतेच हे म्हणणे आत्मश्लाघेचे आहे. माझ्या संस्कृतीचा नि शिक्षणाचा विसर पडून कसे चालेल ? मी स्वतःची फसवणूक करू शकत नाही. माझे वागणे मला मुळी शोभेसे नव्हतेच ! जन्मभर विनोदिनी माझी होईल व मला सुखशांतीने राहाता येईल, हा तर स्वार्थी विचार त्या वागण्यात नव्हता ना ? केवढा मूर्खपणा ? सक्तीच्या विवाह-बंधनाने कधी सुखशांति मिळत असते का ? अशा तऱ्हेच्या सक्तीच्या विवाहबंधनाने दोन कुटुंबे एकत्रित आली की त्यातून नसते प्रश्न उत्पन्न होऊन जीवन असह्य होण्यातच त्याची परिणती होते ना ? वैवाहिक जीवन पत्करून रोज नवनव्या समस्यांना जन्म देत सुस्कारे टाकीत आयुष्य कंठण्यापेक्षा, माझे सध्याचे जीवन किती सुखावह ? माझी मलाच फक्त काळजी; कसला जंजाळ नाही पाठीमागे ! ! लग्न व्हावे असे खरोखर मला कधी तीव्रतेने वाटलेय का ? माझ्या मनाचा कल तत्त्वज्ञानी जीवनाकडे स्पष्टपणे झुकत असता, लग्न करून, समाजामध्ये मी संसारी सद्गृहस्थ म्हणून कशी मान्यता पावू शकेन का तरी ? स्वामीजी नि गुरुदेवांच्या पाठोपाठ जाऊन जीवनातील सुखसमाधान देणारी गूढे शोधून काढून त्या

गूढवादाच्या मुळाशी पोचायचे अशी ना मी जिद्द बाळगून आहे ?

तर मग मी जर याप्रमाणे ऐहिक सुखोपभोग, भावनिक व शारीरिक गरजा, अशासारख्या अनित्य सुखाच्यामागे लागलो तर मी पत्करलेल्या मार्गात अडचणच नव्हे तर जे माझा मार्ग निष्कंटक व्हावा या सदिच्छेने मला साहाय्य करू इच्छितात त्यांच्याहि पुढे नसता पेचप्रसंग मी निर्माण केल्यासारखे होणार आहे; नव्हे ? तेव्हा माझ्या कृतीचा साधकबाधक विचार सर्व बाजूंनी मीच करायला हवा. वेळ कसा धावत होता कळले नाही. दुसरा दिवस उजाडत होता. मी अगदी थकून गेलो होतो; मला ' नीज ' केव्हा आली ते कळलेहि नाही. नोकराने मला जागे केले. तेव्हा सकाळचे ८ वाजून गेले होते. माझे डोके इतके ठणकत होते की ऑफिसला जावे असेहि वाटेना. ऑफिसात मी चिठ्ठी पाठविली व घरीच राहिलो. बरे वाटत नसल्याने क्लबवर टेनिस खेळायला मी आज येऊ शकत नाही असे विनोदिनीलाहि कळविले. सकाळ मी अंथरुणातच घालविली. दुपारच्या जेवणानंतर छानशी वामकुक्षी झाली; नि संध्याकाळी मला जरा बरे वाटू लागले. मी चहा घेत होतो, तो विनोदिनी माझ्याकडेच येत असलेली दिसली. ती ताजीतवानी दिसत होती. तिच्या चेहऱ्यावर नेहमीचे हास्य विलसत होते. तिने माझ्याकडे पाहिले नि विचारले, " कसे काय वाटतेय् ? रात्री झोप आलेली दिसत नाही आहे स्वारीला. थकल्यासारखा सुद्धा दिसतोय्स. " मी तिला बसायला सांगून चहा पुढे केला. मी म्हटले " छे ग ! आता मला पुष्कळच छान वाटतेय. आता कसलीच तक्रार नाही राहिलीय्. काल रात्री खरेच झोपच लागली नव्हती. तेव्हा दिली ऑफिसला बुट्टी. " विनोदिनी म्हणाली, "माधव माझ्या हातून तुझा काही अधिक्षेप तर नाही ना झाला. त्यामुळे नाही ना तुझी प्रकृती बिघडली ? खरं म्हणशील तर, काल मी जे काही बोलले ते माझे मत निखालसपणे तुला कळावे म्हणून बोललये. ज्या सत्यान्वेषणाच्या अभिनिवेषात मी बोललये त्यामागील सद्धेतू तू लक्षात घ्यावास असे मला वाटते. आपण एकमेकांना नीट समजावून

घेऊन एकमेकांना पूर्ण परिचित झाल्यावर आपण आपले नात्या–गोत्याचे बंध घट्ट करावे येवढाच माझा आग्रह होता. भावनाविवश होऊन, मूढपणे, "आमचे प्रेम जमले म्हणून आम्ही एकत्रित राहायचे ठरवले" असे अगतिकपणे अननुभवी युवक–युवतीप्रमाणे आपण आयुष्यात वागावे असे मला तरी वाटत नाही. माझे आयुष्यातले ध्येय नक्की झाले आहे नि काय मिळाले असता मी सुखी होईन याबद्दल माझ्या कल्पना निश्चित झालेल्या आहेत. आयुष्याबद्दलच्या तुझ्या कल्पना काय आहेत हे मलातरी माहीत नाही. आपण मित्र आहोत नि एकमेकांचा सहवास आपणाला हवाहवासा वाटतो, त्यामुळे आनंद होतो हे खरेच आहे. ह्या परिचयातून आपण आणखी निकट यावयाचे ठरविले तर उत्तर आयुष्यात अपेक्षाभंग टाळण्याकरिता विफलतेचे चटके न बसण्याकरिता, व जन्मभर असुखी, प्रेमहीन जीवन ओढीत राहण्यांचा संभव टाळण्याकरिता, आजच आपण एक-मेकांना अगोदर नीट समजून घेतले पाहिजे असे नाही का तुला वाटत? तेव्हा औपचारिकपणा जरा वेळ बाजूला ठेवून आपण प्रामाणिकपणे दिलखुलासपणे बोलू या. जर मला तू पत्नी म्हणून स्वीकारणार असशील किंवा तुला जर मी पती म्हणून जीवनसाथी पत्करणार असले तर तुझ्या-माझ्या आवडी-नावडी, इच्छा नि आकांक्षा, आशा-अपेक्षा, गुणावगुण, चांगल्यावाईट संवयी नि लहरी, एकमेकांना सुख-समाधान देण्याची पात्रता, उत्सुकता, यांची तुझ्या-माझ्यात तरी सुस्पष्ट कल्पना येणे, निदान आपले वैवाहिक एकत्रित जीवन सुखासमाधानाचे होण्याच्या दृष्टीने, अत्यंत जरूरीचे आहे. खरे ना? मी माझ्या आईबापांची एकुलती एक मुलगी आहे. त्यामुळे त्यांची लाडकी आहे. माझ्यावर कितीही पैसे उधळले तरी पुरून उरतील अशी त्यांची सांपत्तिक स्थिती असल्याने, मी अशा ऐषारामात व लाडात वाढलेली आहे. कुणी 'लाडावलेली पोर' म्हटले तरीही त्यात फारसे चूक होणार नाही. मी म्हणेन ते होईल असे आजपर्यंत घडत गेल्यामुळे मी जराशी हट्टी आहे; नि ज्या तऱ्हेचे ऐषाराम मला

हवेत असे मी म्हणेन ते मला मिळायलाच हवेत. मी आईबापावेगळी राहू इच्छित नाही. अगदी जग कोसळून पडले तरी! प्रेमाकरिता किंवा सुखी वैवाहिक जीवनाकरिता लोक म्हणतात तो 'त्याग' वगैरे करणे मी जाणत नाही; मला तो करता येणार नाही. प्रत्यक्ष नवरा का असेना, वैवाहिक जीवनातसुद्धा मी माझ्याकडे दुय्यमपणा घेऊन कसलेहि कमीपणाचे, जीवन पत्करणार नाही; कारण पडते घेण्याची मला सवय नाही. त्यामुळे माझ्यावर कुणाचाही ताबा मला सहन होणार नाही. तुझ्याबद्दल मला फारसे काहीच ठाऊक नाही; पण जे अल्पसे समजल्यासारखे वाटते त्यावरून तुझा प्रकार जरा वेगळाच आहे. तू स्वतंत्र वृत्तीचा मनुष्य आहेस. संस्कृती, शिक्षण, अत्यंत शालीन वागणूक या सर्वांमधूनहि तुझी ही वृत्ती डोकावल्या-वाचून राहात नाही. तुझी इच्छाशक्ती बलवत्तर आहे. तुला तुझ्या गुणावगुणांबद्दल सुप्त पण निश्चित जाणीव आहे. तुला तुझ्या कर्तृत्वाबद्दल अपार आत्मविश्वास आहे. स्वतंत्र विचाराचा तू, कधी कधी कमालीचा धाडसी व आक्रमक पवित्रा घेणारा असा दिसतोस. तुला या तुझ्या सामर्थ्याचा सार्थ अभिमान आहे; त्याला मधून मधून पुरुषी वरचढपणाचाहि दर्प आल्याशिवाय राहात नाही. तुझ्या बौद्धिक झेपेची मला तर कधी कधी एवढी भीती वाटते की तू तुझ्या बुद्धीने ठरविलेल्या ध्येयाप्रत जाण्याकरिता वाटेल ते दिव्य करायचे पत्करशील! तू त्यापुढे कुणाचीही व कशाचीही तमा बाळगणार नाहीस. मग ते वयाने, अधिकाराने व नात्याने केवढेहि मोठे असोत. तुझ्या स्वभावाचे माझे निदान हे असे आहे. मी माझ्याबद्दल सांगितले; नि तुझ्याबद्दल मला काय वाटते तेही मला जितके समजले तितके आड-पडदा न ठेवता मी तुझ्यापुढे उघडे केले आहे. आता यावर विचार करून तू ठरवायचे आहेस की, सध्याच्या आपल्या स्नेहसंबंधात उभ-यतांच्या हिताच्या दृष्टीने, काही वेगळा बदल करायला हवा की काय ते! माझ्या वतीने मी तुला खात्री देते की तुझ्याबद्दल मला खराखुरा अभिमान वाटतो; नि तुझ्याबद्दल माझ्या मनांत आत्यंतिक स्नेहभावच आहे."

विनोदिनीची आपली बाजू मांडण्याची ही पद्धत मला तरी फार आवडली. स्वतःचे तिने केलेले स्वभावविश्लेषण आणि माझ्या-बद्दल तिला काय वाटते याबाबत कसलाहि आडपडदा न ठेवता तिने केलेले निवेदन कौतुकास्पदच म्हणावे लागेल. आयुष्यात जर प्रत्येकजण, अशाप्रकारे, सत्यान्वेषी होईल. मोकळेपणाने आपले मन बोलून दाखवील तर गैरसमज किंवा घोटाळे होतील कशाला, नि त्यातून उद्‌भवणारे अपेक्षा-भंग तरी का होतील ? विचारात प्रामाणिकपणाचा अभाव नि सत्य आहे तसे न पाहाण्याची खटपट, हेच जगात जे सुख आहे त्याचे मूळ होय. मी म्हणालो, "विनोदिनी, मी काल रात्री या साऱ्या गोष्टींचा खूप खोलवर विचार केला. जगात स्वतःला जे संत नि साधू म्हणवून घेतात त्यांना साध्य असलेले सुखशांतीचे जीवन त्यांनी कसे आत्मसात केले हे गूढ हुडकून काढण्याचे मी माझ्या जीविताचे ध्येय ठरवले असल्याने, मी या निर्णयावर स्थिर झालो आहे,की चार लोकांसारखी कौटुंबिक जबाबदारी स्वीकारणे मला तरी शक्य होणार नाही. जीवनाची शाश्वत मूल्ये काय आहेत त्यांच्या शोधात मी माझे उर्वरित आयुष्य घालवावयाचे निश्चित केले आहे. माझ्या म्हणण्याचे मर्म तुला समजेल, किंवा नाहीही. परंतु, माझ्यापुढे मी ठेवलेल्या आदर्शाच्या आड वैवाहिक जीवन निश्चित येईल; निदान त्यामुळे तो शोध घ्यायला मदत तरी होणार नाहीच नाही, अशी माझी खात्री पटली आहे. तेव्हा, माझा मार्ग निष्कंटक व्हावा म्हणून मी अविवाहित राहायचेच ठरवले आहे." नंतर माझा नि गुरुदेवांचा संबंध, स्वामीजींशी माझे असलेले नाते, गुरुदेवांच्या सान्निध्यात मी अनुभवलेले अनेक प्रसंग यांची मी थोडक्यात तिला ओळख करून दिली. तिला मी हेहि सांगितले की, "पैसा, मानमरातब नि सुखोप-भोगांची रेलचेल असूनहि माझ्या कित्येक स्नेह्यांच्या नि नाते-वाईकांच्या वाट्यास सुखसमाधान आलेले नाही. त्यामुळे त्या मार्गांनी सुख मिळत नसते, समाधान अनुभवास येत नाही, याबद्दल माझी खात्री पटलेली आहे. उलट, त्या सर्वांच्या जीवनात, मला आश्चर्य वाटते, नि

विषादहि वाटतो की, मला जे आढळले ते हे की साऱ्या जीवनात त्यांनी कमालीची धडपड केली, जीवाचा आटापिटा केला, पण कुणाच्याहि ह्याती सुखाचा कणहि लागला नाही.

"समाधान अभावानेच अनुभवास येऊन सर्वदूर नैराश्याचा अंधार दाटलेला आहे. हे स्पष्ट दिसत असता, त्यांच्याच चाकोरीतील जीवन पत्करणे मला तरी अशक्य म्हणून नैसर्गिक साधेसुधे जीवन जगायचे असे मी ठरवले आहे. म्हणजे नसत्या भानगडी नि घोटाळे तरी नकोत. याचा शेवट काय होणार आहे हे मी सांगू शकत नाही, पण आज मी जे अनुभवतो आहे त्यावरून मी एवढेच म्हणेन की जसे आयुष्य माझ्या आईवडिलांचे गेले, माझे बंधु व्यतीत करीत आहेत, किंवा इतर नातेवाईकांनी पत्करिले आहे, त्यापेक्षा माझे आयुष्य वेगळे असणार आहे. क्षणिक, इंद्रियजन्य सुखापेक्षा मला शाश्वत सुखाचा शोध घेण्यात जास्त रस वाटतो. माझे सध्याचे नौकरीचे जीवन हा एक टप्पा आहे इतकेच. जेव्हा यापेक्षा मूर्तस्वरूपात नि ठामपणे माझ्या ध्येयाप्रत जाणारे वळण जीवनाला मिळेल तेव्हा हे सर्व सोडून बेधडक नव्या प्रवाहात मी स्वतःला झोकून देईन. सुज्ञ, विवेकपूर्ण विचारातच, जीवनाची कोडी सुटण्याचे बुद्धिग्राह्य सूत्र सापडते, असा माझा विश्वास आहे. तेव्हा, प्रामाणिकपणे कबूल करायचे तर लग्न नि तदनुषंगी कौटुंबिक सुखे ही माझी कधीही मनीषा होऊ शकत नाही. तुझ्या सौजन्याचा नि सौंदर्याचा माझ्या विवेकावरहि विजय झाला होता नि त्यामुळे माझी बुद्धी चळली होती हे खरेच. ते एक झंजावाती वादळ होऊन गेले. ज्यात माझा सारासार विचार नि बुद्धी अक्षरशः अंधेरून गेली होती, माझा तोल सुटला होता. परंतु, दैवाने खैर केली. तुझ्यासारखी मैत्रीण होती म्हणूनच केवढ्या मोठ्या अधःपातातून मी वाचलो. तू माझ्या मदतीला तेव्हा धावून न येतीस तर!! तू खरी माझी सखी. मी तुझा अत्यंत ऋणी आहे. तेव्हां काल सायंकाळी जो प्रसंग घडला त्याबद्दल तू मला क्षमा कर नि विसरून जा सारे झाले गेले ते. शक्य

असेल तर आजच्यासारखेच आपण आजन्म एकमेकांचे परमस्नेही म्हणूनच राहू या. "

विनोदिनी मनापासून हसली नि माझा हात आपल्या हातात घेण्याकरिता तिने आपला हात पुढे केला. आमचे उभयतांचे हस्त-मीलन झाले. एकमेकांचे हात घट्टपणे धरून, मैत्रीतील स्निग्धता अनुभवीत होतो आम्ही ! बराच वेळपर्यंत–सांजावण्यापर्यंत ती माझे घरी होती. दुसऱ्या दिवशी सकाळी क्लबवर जायला मी येतो असे आश्वासन दिल्यावर ती गेली.

●●●

# ३

दिवसामागून दिवस जात होते–अशीं दोन वर्षे लोटलीं मला दिल्लीला येऊन. मी व विनोदिनी आता जानीदोस्त झालो होतो. मला मिळणाऱ्या फुरसतीचा वेळ, सध्या, बराचसा गुरुदेवांनी दिलेल्या यौगिक संथेतच जात असे. 'विचार करणे व अवलोकन करणे' या प्रथेची मला आता इतकी सवय झाली होती की माझ्या प्रत्येक बोलण्या–चालण्यात–वागण्यात ती गोष्ट आंगवळणी पडली होती. त्याचा, सुस्पष्टपणे एक फायदा निश्चित झाला तो हा की, मला एकतऱ्हेची आत्मिक शांतता नि स्वस्थता अनुभवास येऊ लागली होती. त्यामुळे आनंद ओसंडत होता जणू ! या काळात शारीरिक नसला तरी माझ्या मानसिक जगात फार मोठा फरक घडून आला होता.

मला वाचनाची कोण आवड होती. पण, ती आता नाहीशी झाली होती. कुणाशी मिसळावे वा बोलावे असेहि मला वाटेनासे झाले. माझी प्रकृती अगदी ठणठणीत होती; जोम यत्किंचितसुद्धा कमी झालेला नव्हता, तरी लांबवर आपण एकटेच फिरून यावे, घरीसुद्धा

एकटेच वसावे असे मला वाटू लागले होते. मला वाटते, माझ्या साऱ्या शरीररचनेतहि काहीतरी बदल घडून येत होता. माझ्या आंतरशक्ती तीव्रतर होत होत्या. उदाहरणार्थ, डोळ्यांनी दिसण, नाकांनी वास येणे, कानानी ऐकणे तसाच स्पर्शहि यात एकतऱ्हेचा तिखटपणा आला होता. मी एकटाच असलो की, ज्यांना दिवास्वप्ने निश्चितपणे म्हणता येणार नाही. अशी दृश्ये मला दिसत, ज्या या मर्त्य जगात कधीच आढळणार नाहीत अशा दिव्य वा स्वर्गीय विभूती मला दर्शन देत. अनाहत नाद ऐकू येत. घंटा, संगीत, वाद्यवृंदांचे झंकार. खोलीत नसलेल्या कित्येक वस्तूंचे, वेड लावणारे सुमधुर सुवास, भोवताली दरवळत आहेत. याचा अनुभव येई. प्रथम प्रथम वाटायचे, हे सारे मानसिक खेळ आहेत. पुन:पुन्हा तसे अनुभव आल्यावर तो संभ्रम नव्हे हे ठरले. एकांतात येणाऱ्या या अनुभवां-मुळे भीती वाटली नाही; तर एक अवर्णनीय आल्हाद व सुखमय अवस्था उत्पन्न झाली होती. हे सारे का व कसे होते, याचा मला उलगडा होत नव्हता. मला वाटते, गुरुदेवांनी जी साधना सांगितली होती; व योगासने करायला शिकवले होते, त्यांच्या दैनंदिन चाल-लेल्या माझ्या अभ्यासाचा हा परिपाक असावा. आध्यात्मिक जीव-नाच्या मार्गात असलेल्या साधकांना, साधन चालू असताना, असे अनुभव येतात असे मी वाचले होते. जे होते आहे. ती साधन-मार्गातील प्रगती समजायची की कसे हे मी जाणत नव्हतो. म्हणून त्याबद्दल मी बेफिकीर होतो. गुरुदेवांच्या आदेशांचे तंतोतंत पालन करा-यचे एवढेच मी जाणत होतो. नोकरीशिवाय मला माझा वेळ खाणारे दुसरे काहीच व्यवधान नसल्याने; फावल्या वेळात मी माझी साधना तीव्रतर करण्याचे ठरवले. जे काही घडत होते त्याबद्दल बोलायचे ते, जो कोणी या मार्गातला आहे; व ज्याला अनुभव आलेला आहे—अशाशीच, असेहि मी ठरवले. नोकरीपेशात असल्याने, या मार्गात असणारा मनुष्य आढळणे शक्यच नव्हते. कचेरीत निरनिराळ्या धर्मांचे लोक होते. पण ती मंडळी आपला पंथ, आपली जात, यांचाच

विचार करणारी होती. पोथ्या–पुराणातून आधार काढून त्यांचा काथ्याकूट करणे; व त्याआधारे आपलीच मतप्रणाली बरोबर असा पंडिती आग्रह धरणे एवढीच त्यांची मजल. फार फार तर आपला गुरु, आपला धर्मग्रंथ, आपले पूजातंत्र, आपली श्रद्धास्थानेच काय ती संपूर्ण, परमपूज्य व पवित्र; इतर त्यापुढे हिणकस असे म्हणून साध-काला आपल्या गोटात ओढणे ह्यात इतिकर्तव्यता मानणारेच पुष्कळ. ज्यांच्या वाऱ्याला सुद्धा, मुक्त विचाराची कल्पना येऊ शकत नाही. अशा लोकात जाणे नि तेहि शंकानिरसन करून घ्यायला–मला कधीच पटले नाही. कारण, भूतकालाचा आधार न घेता, व भविष्याची कल्पनाचित्रे न काढता मनुष्य जगू शकतो ही अशा लोकांच्या कल्पना–बुद्धीच्या–कक्षेत सुद्धा येणारी गोष्ट नव्हे ! त्यांना त्यांच्या पूर्वजांचा इतिहास प्रिय, त्यांची परंपरा आदर्शभूत, त्यांचे ग्रंथ, त्यांची मते, त्यांच्या मतप्रणाली, पोथ्या, पुराणे, धर्म, जात, पंथ ही सर्व इतकी प्राणप्रिय की त्यांना क्षणभरहि ही मंडळी विसंबायला तयार होणारी नव्हेत.

तेव्हा, या आध्यात्मिक साधन मार्गात कसलाहि गुरु, किंवा त्याचा उपदेश किंवा धार्मिक आचार यांचा अवलंब न करिता 'निःस्तब्ध मन' नि त्या निर्लेप मानसिक स्वातंत्र्यातून उद्भवलेल्या प्रामाणिक विचारा-तून व अवलोकनातून आत्मसाक्षात्काराचा मार्ग प्रकाशित व्हायचा असतो हे त्यांना कुठले पटायला ? तेव्हा, अशा लोकांजवळ मी माझ्या अंतरीच्या खुणा स्पष्ट करणे शक्यच नव्हते. परंतु माझी तळमळ ओळखू शकेल अशा व्यक्तीशी बोलण्याकरिता मात्र मन त्यावेळी अति उत्सुक झाले होते हे मात्र खरेच ! अशावेळी गुरुदेवांच्या आठवणी मात्र मला तीव्रतेने येत होत्या. कारण, त्यांना माझे अनुभव कथन करून त्यांच्या पुढील मार्गदर्शनाची मला अति गरज भासू लागली होती.

तो दिवस शनिवार होता. आम्हांला त्या दिवशी कसलीशी सुटी होती. सकाळीच टेनिस खेळून मी खोलीवर परतलो होतो; कारण

दुसरीकडे कुठे आमंत्रण नव्हते. तेव्हा, स्वस्थ पडून राहायचे नि आराम करायचा असे मी ठरवीत होतो. कपडे बदलत होतो तो टेलिफोनची घंटा खणाणली.

फोनवर गुप्ता आहेत असं नोकराने सांगितले; नि मनाशी आश्चर्य-करीत मी फोन उचलला. मी काही कामात नाही ना; किंवा इत-क्यात कुणी माझ्याकडे यायचे ठरलेले नाही ना, अशी चौकशी गुप्तांनी केली. मी मोकळा आहे असे सांगताच आम्ही सर्व मंडळी अर्ध्या तासात तुमच्याकडे येत आहोत असे त्यांनी सांगितले. "काही विशेष ?" मी विचारले. त्यावर गुप्ता उत्तरले, "छे:छे : तसं काही विशेष नाही. आमच्या एका मित्राने आम्हा सर्वांनाच बोलावले आहे ; तुम्हांलाहि घेऊन या असे त्यांनी सुचविले म्हणून तुमच्याकडे येऊ व मग सर्वच एकत्रितपणे त्यांच्याकडे जाऊ." मी त्यावर म्हटले, "तुम्ही जरूर या, पण मी मात्र आज बाहेर कुठे पडण्याच्या विचा-रात नाही. आज आराम करण्याचा बेत केलाय मी." मी नंतर त्यांना सुचविले–"तुम्ही असं करा ना. आज आहे सुट्टीचा दिवस; तेव्हा तुम्ही सारीजण माझ्याकडे या जेवायला. खाणेपिणे झाले की संध्याकाळी तुम्हीं म्हणाल तिथे येईन मी तुमच्या बरोबर, मग तर झालं ?" गुप्ता म्हणाले, "बरं तर, आपण समक्षच ठरवू सारा बेत जरा वेळाने !" मी नोकराला गुप्ता मंडळी येत असल्याचे सांगून, चहाची तयारी करायला सांगितले; व कदाचित् मंडळी जेवायलाहि थांबतील, असेहि सुचविले.

गुप्तांची प्रशस्त गाडी अर्ध्या तासात कंपाऊंडमध्ये शिरली. आणि संपूर्ण देशी पेहरावात श्री. गुप्ता खाली उतरलेले पाहून मला आश्च-र्यच वाटले. सौ. गुप्ता व विनोदिनीचा वेषहि यावेळी जणू एखाद्या धार्मिक समारंभाला किंवा लग्नासारख्या खास हिंदू सांस्कृतिक कार्य-क्रमाला हजर होण्यास योग्य असा होता.

दिवाणखान्यात शिरण्याऐवजी बाहेरील व्हरांड्यातच ती मंडळी आसनस्थ झाली. मी विनोदिनीला विचारलेहि की हा "आज कसला

नवा थाट आहे ? कुठे जायचा बेत आहे आज ? देवळात वगैरे काही उत्सव आहे की काय ?"

" गुप्तांनी यावर खुलासा केला. " रायबहादुर हिरालाल दिल्लीतील महशूर उद्योगपति, माझे चांगले स्नेही आहेत. त्यांच्याकडे कुणी सत्पुरुष येणार आहेत. त्यांच्या दर्शनाला आम्हा सर्वांनाच त्यांनी खास निमंत्रण केले आहे. तिकडे जायला निघालो आहोत आम्ही सर्वजण. हे सद्‌गुरु रायबहादुरांचे गुरु आहेत; व म्हणतात की, फार मोठे आध्यात्मिक सामर्थ्य त्यांच्या ठिकाणी आहे. व्यक्तिशः म्हणाल तर हे साधू नि संत, त्यांच्या आत्मिक शक्ती यांच्यावर माझा तरी विश्वास नसल्याने मी सहसा या भानगडीत पडत नाही. परंतु सौ. गुप्तांचा कल आहे या चमत्कारांकडे. त्यामुळे अशा लोकांना भेटावे, त्यांचे दर्शन घ्यावे, असे त्यांना फार फार वाटते. खरे म्हणाल तर रायबहादुरांचे हे आमंत्रण तिने स्वीकारले आहे. मी नि विनोदिनी केवळ तिच्या इच्छेखातर जात आहोत इतकेच." विनोदिनीने पुस्ती जोडली, "मला फक्त या साधूंच्या आत्मिक शक्तीबद्दल कुतूहल आहे; आणि ते काय चमत्कार करून दाखवतात ते मला पाहावेसे वाटतात. तुम्ही स्वतः या मार्गात आहात." माझ्याकडे बोट दाखवून ती म्हणाली, " तेव्हा म्हटले, तुम्हीही आमच्याबरोबर आलात तर तेवढेच बरे. म्हणून तुम्हाला न्यायला आम्ही सर्व आलो आहोत आत्ता."

अनाहुतपणे रायबहादुरांकडे जायला मला संकोच वाटत होता. तेव्हा, सौ. गुप्तांनी आमंत्रणपत्रिका माझ्यापुढे धरून म्हटले. " निमंत्रणात स्वच्छ म्हटले आहे की–तुम्ही आपले स्नेही व आप्तमंडळीसह आल्याने आम्हांस विशेष आनंद होणार आहे." मी त्या उपरहि सांगून पाहिले की–" मला घरी राहून जरा शांत नि स्वस्थ पडून विश्रांति घेणेच आवडेल. कारण, मला कुणाहि साधूला भेटण्याची इच्छा नाही, व त्याने केलेल्या चमत्कारांची मला काडीचीही उत्सुकता नाही. " पण, विनोदिनी व तिच्या आईने मला इतकी गळ घातली की शेवटी मी त्यांच्या बरोबर जाण्यास तयार झालो. चहा–फराळ

उरकताच आम्ही रायबहादुर हिरालाल यांच्या कोठीवर जायला निघालो. त्या आलिशान बंगल्यात आम्ही पाऊल ठेवले तेव्हा सकाळचे १० वाजले होते. आवारात कितीतरी मंडळी जमली होती. एवढा मोठा प्रशस्त दिवाणखाना पण पाहुण्यांनी गच्च भरला होता. दाराशीच रायबहादुर व त्यांच्या पत्नी आमंत्रितांच्या स्वागताला उभ्या होत्या. आम्हां सर्वांचे रायबहादुरांनी विशेष आस्थेवाईकपणे स्वागत केले; नि मला बरोबर आणल्याबद्दल तर विशेष आनंद प्रदर्शित करून, विनोदिनी व सौ. गुप्तांच्या पुढील व्यवस्थेकरिता सौ. हिरालाल त्या दोघींना घेऊन आत गेल्या. रायबहादुरांनी आम्हाला अगदी पुढच्या रांगेत जागा दिल्या होत्या. किनखापी गाद्यांवर जरीकाम करून, खास उभारलेल्या व शृंगारलेल्या उच्चासनावर साधु पुरुष–रायबहादुरांचे गुरुवर्य बसले होते. जिकडे तिकडे रेशमी बिछायत त्यांच्याकरिता होते व लोडतक्येहि तसेच रेशमी प्रावरणांनी झाकलेले होते. साधू दिसावयाला रुबाबदार व्यक्ती होती; त्यांनी पेहेनलेले कपडे सुद्धा गर्भरेशमी नि उंची दिसत होते. आखीव रेखीव बांधा व गोरापान वर्ण होता. चाळीस–पंचेचाळीसीची असामी असावी. स्वच्छ दाढी केलेली नि तेजस्वी डोळे. ते प्रवेश करिते झाले त्यांच्याभोवती असलेल्यांशी बोलत बोलतच ! त्यामुळे त्यांचे आमच्याकडे लक्ष नव्हते. संधी मिळताच रायबहादुरांनी श्री. गुप्ता व त्यांच्या कुटुंबीय मंडळीची व माझी साधुमहाराजांशी ओळख करून दिली.

माझ्याकडे त्या साधूचे लक्ष जाताच ते चमकल्यासारखे झाले हे मलातरी स्पष्टच दिसले; त्यामुळे ते किंचित गोंधळल्यासारखेहि झाले. त्यांनी माझ्याकडे पुन्हा पाहिले, स्मित केले, नि जागेवरून उठून माझा हात आपल्या हातात घेतला; व आपल्याजवळ उच्चासनावरच बसण्यास मला सांगितले. माझ्यासकट सर्वांनाच या त्यांच्या विनंतीचे आश्चर्य वाटले. माझी ओळख दाखविण्यात त्यांचा काहीतरी गैरसमज होतो आहे असे मला वाटले. श्री. गुप्ता व रायबहादुरहि जरा गोंधळलेच; व काय बोलावे ते त्यांना सुचेना. साधू हसत पुनः म्हणाले

"ये इथे बस." परंतु, मी ते आदरपूर्वक नाकारले. 'हे एक माझे स्नेही आहेत' असे साधुमहाराजांना सांगण्याचा रायबहादुरांनी प्रयत्न केला, त्यावर ते साधुपुरुष म्हणाले, "या सद्गृहस्थांची ओळख करून देण्याची काही एक गरज नाही, ते कोण आहेत हे तुम्हालाच फार थोडे ठाऊक आहे. पण यांच्याबद्दल तुम्हाला जे ठाऊक नाही ते मला ठाऊक आहे. माझ्याजवळ, अगदी माझ्या उजवीकडे वसण्याचा त्यांचा अधिकार आहे." असे म्हणून त्यांनी पुन: माझा हात धरला; व मला आपल्यापाशी बसविले. पुन: काही खळबळ, गडबड न व्हावी म्हणून उलट काहीही न विचारता मी साधूंजवळ त्यांच्या म्हणण्याप्रमाणे बसलो. त्यांच्या दर्शनाला लोक येत होते, व या लोकांच्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे ते आशीर्वाद देत होते. या नि अशाप्रकारच्या मेळाव्यांचा नि समारंभाचा त्यांना इतका सराव दिसला की हे सर्व चालले असताना ते कमालीचे स्वस्थ होते. लोक आपल्या अडीअडचणी त्यांना सांगत होते, प्रश्न विचारीत होते, नि यत्किंचितहि न गोंधळता किंवा न अडखळता त्या सर्वांची उत्तरे साधुमहाराज देत होते. ऐकणारांचे समाधान होत होते. ज्याप्रकारे हा जनतासंपर्क चालला होता त्यात मला तरी काही नावीन्य वा अपूर्व वाटले नाही. ते इंग्रजीत बोलत होते. हिंदीतहि उत्तरे देत होते. दोन्ही भाषांवर त्यांचे विलक्षण प्रभुत्व आढळले. दुपारचे १२ वाजले तेव्हा हात जोडून त्यांनी जमलेल्यांना सांगितले की "बराच वेळ झालेला आहे; मीही थकलो आहे. तेव्हा, आता तुम्हां सर्वांच्या परवानगीने मी रजा घेतो." असे म्हणून साधुमहाराज आपल्या जागेवरून उठलेहि. त्यांचा दिल्लीत आणखी थोडे दिवस मुक्काम असल्याने दररोज सकाळी अशाचप्रकारे ते सर्वांना भेट देतील असे आश्वासन देऊन त्यांनी दिवाणखान्यातून आपल्या खोलीकडे गमन केले; व मलाहि मागोमाग यायला सांगितले. या पुरुषाबद्दल या वेळेपर्यंत माझ्यातहि कुतूहल जागृत झाले होते ही व्यक्ती आहे तरी कोण, हे समजून घेण्याच्या आतुरतेने, मीहि त्यांच्या पाठोपाठ गेलो. श्री. गुप्तांनाहि

माझ्याबरोबर यायला मी विनविले. पहिल्या माळ्यावर त्यांच्या-करिता पुष्कळशा खोल्या राखून ठेवलेल्या दिसल्या.

चेहऱ्यावर सर्व प्रकारच्या उत्सुकतेच्या छटा घेऊन श्री. व सौ. गुप्ता, विनोदिनी व रायबहादुर माझ्या पाठोपाठ गुरुमहाराजांकडे जाण्याकरिता येत होती. इतर मंडळी माझ्याबरोबर आलेली पाहून, साधुमहाराज नाराज झालेले दिसले. कारण, मला नंतर समजले की, त्यांना मला एकट्यालाच भेटायचे होते. आम्ही सर्व बसल्यावर रायबहादुरांनी नोकराकरवी सर्वांसाठीच अल्पोपहार मागवला. साधुमहाराजांनी फक्त थोडीशी फळे खाल्ली. आम्ही सर्वांनी मात्र खास केलेल्या गोड–रुचकर पदार्थांवर हात मारला. चहा झाल्यावर साधुमहाराज रायबहादुरांना म्हणाले की, त्यांना फक्त माझ्याशी काही खाजगी बोलायचे आहे–असे म्हणून त्यांनी मला दुसऱ्या एका खोलीत नेले. खोली प्रशस्त होती, सर्व सुखसोयींनी युक्त होती. साधुमहाराजांनी दार बंद करायला मला सांगितले; नि मला बसा-यला सांगून तेहि एका पलंगडीवर ऐसपैस बसले. त्यांच्या चेहऱ्यावर सारखे स्मित होते; व त्यामुळे ते मोकळेपणाने वागत आहेत असे वाटत होते. मलाच फक्त येवढे गुपित काय सांगायचे असणार याबद्दल मलाहि कुतूहल होतेच. माझ्या मनात हाहि विचार येऊन गेला की माझ्यापेक्षा रायबहादुर व श्री गुप्ता व त्यांच्या सर्व कुटुंबीयांना वाटणारे कुतूहल कितीतरी पटीने मोठे असेल.

आम्ही दोघेच आहोत असे पाहिल्यावर माझ्या डोळ्यांकडे पाहात साधुमहाराज मला म्हणाले, "तुझी साधनमार्गातील प्रगति खरो-खरच प्रशंसनीय आहे. तुझ्या मेहनतीला व कष्टांना इतक्या लवकर यश आलेले पाहून मला तर मनापासून आनंद वाटतोय्." उत्तरा-दाखल मी काही बोलण्यापूर्वीच त्यांनी मला विचारले, "गुरुदेवांना भेटून किती दिवस झाले?" त्यांचा हा प्रश्न ऐकून तर मी अक्षरशः थक्क झालो नि त्यांच्या प्रश्नाला सरळ उत्तर देण्याऐवजी मी त्यांनाच उलट प्रश्न केला, "तुम्ही गुरुदेवांना कसे काय ओळखता? आणि

गुरुदेवांचा नि माझा निकटचा संबंध आहे हे तुम्हांला कसे समजले ?" त्यावर ते नुसतेच हसले; नि म्हणाले, "ते फारसे कठीण नाही. गुरुदेवांसारख्या महापुरुषाने तुझ्यात केवढा बदल घडवून आणला आहे. हे मला स्पष्टच दिसतेय. तू खरोखर भाग्यवान आहेस. कारण, श्री गुरुदेवांसारख्यांची कृपादृष्टी फारच थोड्यांच्या वाटचास येत असते." त्यांच्या नंतरच्या म्हणण्याचा आशय असा होता की मला फार मोठ्या सत्पुरुषांचे शिष्यत्व मिळाले आहे. हे भाग्य हेवा करण्यासारखे आहे. तेव्हा, आयुष्यात आता मला कसलीहि फिकीर उरली नाही. कारण, माझ्या आयुष्याला आकार देण्याचे काम प्रत्यक्ष सिद्ध अशा गुरुदेवांसारख्या महापुरुषाने स्वत:कडे घेतलेले आहे. ते पुढे म्हणाले "तू गुरुदेवांवर संपूर्ण विश्वास ठेव नि त्यांच्याबद्दल अव्यभिचारी भक्तिभाव बाळग." जरा वेळ ते विचारमग्न झाल्या-सारखे झाले; नि तात्काळ सहास्य वदनाने म्हणाले, "तू मोठा सत्पुरुष होणार. कारण, गुरुदेवांनी का न कळे, तसे ठरवलेलेच दिसते, त्यांची एकमेव इच्छा; त्यापेक्षा वेगळे होऊच शकणार नाही आता." मी तर या उद्‌गारांनी अक्षरश: थक्क झालो. मी विचारले, "सध्या गुरुदेव कुठे आहेत. तुम्हाला ठाऊक आहे का ? माझी त्यांची इत-क्यात केव्हा भेट होणे शक्य आहे का ?" त्यावर ते उत्तरले "एक दोन दिवसांत त्यांचा ठावठिकाणा तुला समजेल; आणि तुझी त्यांची भेटहि लवकरच होईल बघ ! तू त्यांना भेटायला, स्वत:चे अनुभव सांगायला व त्यांचा पुढील मार्गाबाबत सल्ला घ्यायला किती उत्सुक झाला आहेस, हे मी समजू शकतो. तुझ्या अनुभवांची चिकित्सा न करिता मी येवढेच म्हणेन की जे साधक या मार्गात खरेखुरे प्रयत्न-शील असतात. त्यांना जसे नि जे अनुभव येतात तेच तुलाहि आले आहेत. आत्मसंशोधनात असे होतेच. तेव्हा, तुला कसल्याहि शंका-कुशंका घेण्याचे मुळीसुद्धा कारण नाही. तू फक्त गुरुदेव सांगतील तसे वाग, बाकीचे गुरुदेव पाहून घेतील. मला विचारण्यासारखे काही तुझ्या मनात आहे असे मला वाटत नाही. तेव्हा गुरुदेव भेटल्यावरच

खुलासा करून घे." ते एकदम बोलण्याचे थांबले. मला काहीही विचारायचे नव्हते. तेव्हा उगाच वायफळ गप्पा मारण्याच्या मनःस्थितीत मी नव्हतो; म्हणून मी उठलो. खोलीतून बाहेर पडण्यापूर्वी साधुमहाराजांचा पदस्पर्श करण्याकरिता म्हणून मी वाकलो; पण त्यांनी गाढ आलिंगन देऊन मला वरचेवर उचलले व म्हणाले, "असलं कांही करायच नाही." मला या त्यांच्या वागण्याचा काही बोध होईना. उलट माझ्या मनाचा गोंधळच त्यामुळे वाढला. त्यांचे वागणे, वस्त्रप्रावरणे, त्यांचा एकंदर डौल व ज्याप्रकारे ते रायबहादुरांकडे राहात होते ती राहणी पाहून प्रथमदर्शनी तरी माझे मत असेच झाले की इतर धंदेवाईक गुरूंप्रमाणेच ते एक गुरु आहेत. साधुत्व कमीच! परंतु, त्यांनी मला जी वागणूक दिली, ज्याप्रकारे माझी वास्तपुस्त केली. ज्या आदराने गुरुदेवांचा उल्लेख केला; मी काही न बोलता माझ्या साधनमार्गावर जो अभिप्राय त्यांनी प्रगट केला. माझ्या नि गुरुदेवांच्या नात्याबद्दल उल्लेख करून जो मला उपदेश केला, त्यावरून मात्र माझी खात्री पटली की हे सामान्य साधुपुरुष नव्हेत. आत्मिक शक्ती संपादन केलेलेच नव्हे तर त्यापलिकडील यश अध्यात्ममार्गात संपादलेले हे कुणीतरी खरे 'पहुंचे हुवे' साधुपुरुष आहेत. त्यांच्याबद्दल माझ्या मनात फार पूज्यभाव उत्पन्न झाला; आणि गुरुदेवांची व माझी भेट लवकरच होईल असे ते म्हणाले, तेव्हा तर, या महापुरुषाबद्दलची अधिक माहिती गुरुदेवांना विचारायचीच असे मी ठरविले.

मी दिवाणखान्यात आलो तो रायबहादुर व गुप्तामंडळी माझी प्रतीक्षाच करीत होतीं. माझे नि साधुमहाराजांचे खास काय बोलणे झाले हे समजून घेण्याची त्यांची आतुरता शिगेला पोचली होती. परंतु "आमच्या गप्पा मामुली विषयावर झाल्या येवढेच!" असे जेव्हा मी म्हटले तेव्हां त्यांचा अपेक्षाभंग झालेला स्पष्ट दिसत होता. त्यांना माझे बोलणे खरे वाटत नव्हते हेहि स्पष्ट दिसत होते. विनोदिनी म्हणालीहि, "गुपितच असेल तर नको सांगू हवं तर! पण इक-

डच्या तिकडच्या गप्पा मारायला तुला साधुपुरुष आपल्या कमऱ्यात घेऊन गेले नव्हते खास !" मी त्यावर एवढेच म्हणालो की "यांच्यासारख्या संतपुरुषांचे स्वभाव किती लहरी असतात हे तुम्हांला माहीत नाही म्हणून !" श्री. गुप्ता यावर म्हणाले, " ठीक आहे तसंहि असेल. आम्ही जास्त खोलात जाऊ इच्छीत नाही. पण माधव, तुला त्यांनी विश्वासात घेऊन तुझ्याशी बोलणे केले याबद्दल आम्हां सर्वांना खरंच फार आनंद वाटला. माझी खात्री आहे की एखादे दिवशी तूच लहरीत आलास की तुझे नि साधुमहाराजांचे काय 'गुफ्तगू' झाले ते आपणहून आम्हांला सांगशील." आम्ही रायबहादुरांचे घर सायंकाळी सोडले. वाटेत जाता जाता श्री. गुप्तांनी मला माझ्या खोलीवर सोडले; व ती मंडळी पुढे गेलीं.

दुसऱ्या दिवशी वडिलांचे पत्र हाती पडले. त्यांत त्यांनी लिहिले होते.–

मत्प्रिय माधव

माझे पत्र पाहून तुला आश्चर्य वाटेल. परंतु, तू इथून गेल्यावर काय--काय घटना घडल्या हे थोडक्यात तुला कळविण्याकरिता मी हे पत्र लिहीत आहे. माझ्या दुसऱ्या दोन मुलांना लिहिण्यापेक्षा, तुलाच मी हे पत्र लिहीत आहे. याचे कारण येवढेच की, गुरुदेव, मी स्वतः व तुझी आई यामधला तूच फक्त एक महत्त्वाचा दुवा आहेस. गेल्या वर्षी, किंबहुना निश्चितपणे म्हणायचे तर, बरोबर तेरा महिन्यांपूर्वी गुरुदेव अकस्मात् आपल्याकडे अहमदनगरला आले होते. मला व तुझ्या आईलाहि त्यांना भेटण्यात अतीव आनंद वाटला. ते आपल्याकडे जवळ जवळ आठवडाभर होते. काय योगायोग असेल तो खरा, त्यांच्या कृपेचा वर्षाव आम्हांवर व्हायचा होता, म्हणून केवळ, त्यांचे चरण आपल्या वास्तूला लागले असे नसून खरोखरच त्यांनी आमची अनेक पाशांतून सुटका करून आम्हांला अक्षरशः बंधमुक्त केले. त्यांनी आम्हांला जो अनुभव प्राप्त करून दिला, त्याचे मोल शब्दांनी करणे अशक्यप्राय आहे. कारण, शब्दसंपत्ती तोकडी पडते. त्यांनी आम्हांला

वेगवेगळी 'दर्शने' घडवून आमचा जीवनविषयक दृष्टिकोन बदलला एवढेच नसून, अनुभवांनी मानवी जीवनाचा एकमेव हेतू काय ? हे त्यांनी आम्हाला पटवून दिले. मन व शरीर यांच्यामध्ये सुसंवादित्व आणण्याकरिता त्यांनी आम्हाला काही साधना करायला सांगितली, नियम पाळायला शिकवले. मनाची अविचल नि:संदेह अवस्था प्राप्त करून घेण्याकरिता या साधनांची व नियमांच्या पालनाची परमावश्यकता होती. मनाच्या अशा नीरव–शांत–स्तब्ध स्थितीतच, अनुभवांचे यथातथ्य दर्शन होण्याची शक्यता संभवते; व त्यातून जो उमज, जी समजुत उत्पन्न होते, तीच केवळ निर्विकल्प आत्मदर्शन घडवून आणण्यास उपकारक ठरते. गुरुदेवांनी, आपल्या कृपेने, शिकवणीने, चर्चा करून, आणि मार्गदर्शनांनी आमचा द्वैताभास नि अज्ञान यांना समूळ निपटून टाकले; नि म्हणूनच सत्याचे दर्शन घडण्यास आज आम्ही पात्र झालो. मी नि तुझी आई गुरुदेवांचे परम ऋणी आहोत आम्हा दोघांचेहि ते परात्पर गुरू आहेत, प्रत्यक्ष जीवनदर्शी परमेश्वर आहेत. या विषयावर तब्बल १२ महिने मौन पाळण्याचा गुरुदेवांनी आम्हांला आदेश दिला होता. कारण, उघडच दिसते. कसल्याहि प्रकारचा अहंकार नि देहाभिमान उत्पन्न होऊ नये म्हणून ! ती मुदत होऊन गेली असल्याने, गुरुदेवांनी आम्हा उभयतां-करिता काय केले हे तुलाच फक्त कळावे म्हणून पत्र लिहिण्याची ही पहिली संधी मी घेत आहे. आम्हांला आमची चूक समजून आली आहे; किंवा असे म्हणू या पाहिजे तर की, चुकीच्या मार्गाने आता-पर्यंत आमचे आयुष्य कसे चालले होते ते आम्हांला आता समजून आले आहे. अर्थात् हा सर्व अज्ञानाचा खेळ आहे, नि त्याची फळे आम्ही भोगलीही. परंतु, भाग्याची गोष्ट ही की, आयुष्याच्या कलत्या दिवसांत का होईना, गुरुदेवांच्या कृपेने आम्हाला सत्याचे दर्शन, उशीरा का होईना, पण झाले ! तू नसतास तर आम्हांला या आयुष्यात तरी गुरुदेव भेटणे कधीच शक्य झाले नसते. त्यामुळे, आम्ही उभयता, तुझेहि उपकृत आहोत. आणि तू जरी आमचा मुलगा

असलास तरी ही कृतज्ञता प्रगट करण्यास आम्हांला यत्किंचित्हि अधिक्षेप वाटत नाही. गुरुदेवांसारख्या समर्थाच्या मार्गदर्शनाखाली तू निश्चितपणे सुखी होऊन, तुला समाधान प्राप्त होईल; आत्मदर्शन घडून सत्यान्वेषण घडेल. 'नेति नेति' असे परमेश्वरदर्शन होऊन सच्चिदानंद–सुखाचा तू अधिकारी होशील याबद्दल आम्हा उभयतांची मनोमन खात्री पटली आहे.

गुरुदेवांच्या संरक्षण छत्राखाली अंतिम मार्गदर्शन घडवून आणण्याच्या दृष्टीने तुझी झपाट्याने नि जास्तीत जास्त प्रगती होवो हीच आमची उभयतांची इच्छा उरली आहे. तुझ्या आईची प्रकृती तितकीशी बरी नसते. पण, आम्ही उभयतांहि पैलतीराला लागलो आहोत असेच मला वाटू लागले आहे. शरीराने धडधाकट नसू पण आम्ही दोघेहि मनाने अति प्रसन्नावस्थेत आहोत. जीवनातील एक अटळ घटना याच एका दृष्टीने आम्हांला मृत्यूची भीती वाटत नाही. असे नसून 'वासांसि जीर्णानि यथा विहाय' प्रमाणे आत्म्याचे अंगरे बदलायला झाले आहेत अशीच आमची निर्भय वृत्ती आहे. आमच्यातून 'भीति' हा शब्दच नाहीसा झाला आहे. सर्व आयुष्यभरात जे हव्यासाने मिळविले, जे मालक म्हणून पैदा केले–ते ऐश्वर्य, दौलत, नावलौकिक, कुटुंबाचा दबदबा, मुलेबाळे, सगेसोयरे-या सर्वांना सोडून आपण एकटेच जायचे या एकाकीपणाची भीति प्रत्येकाला मरणात वाटत असावी. ही भयग्रस्त स्थिती वाढविण्यात, 'मरणोत्तर काय ?' याबद्दलच्या अज्ञानाचीही भरच पडत असेल. कारण, सबंध जन्मभर आपण एका विशिष्ट दर्जाने, विशिष्ट समाजात, विशिष्ट पद्धतीने, वाढलेले असतो, जीवन जगत असतो. त्याची सवय झालेली असते. अशा स्थितीत मरणोत्तर येणाऱ्या स्थितीची नीट कल्पना नसल्याने आपल्याला भीति वाटते. लहानपणापासून किंवा आपली स्मरणशक्ती जितकी मागे खेचता येईल तितकी खेचून पाहिले तर जगण्यातला बहुतांश आपण कुणा ना कुणा परिचिताच्या सहवासात आपले जीवन घालवलेले असते. मरणोत्तर बरोबर कोणी येणार

नसते, सारी आप्तमंडळी, मित्र, सहकारी, आणि आपल्याला परिचित असलेल्या सर्व वस्तु इथल्या इथे राहायच्या असतात. अशा प्रकारे अपरिचित जगात, तेहि एकट्याने पाऊल टाकायचे हा नुसता विचार भयचकित करणारा आहे.

श्री गुरुदेवांच्या कृपेने आमच्या ऋणानुबंधाच्या गाठी केव्हाच सुटल्या आहेत. या जगाशी संबंधित आमचे असे आता काहीही उर-लेले नाही. आम्हाला आता कसली महत्त्वाकांक्षा उरली नाही. ध्येय नाही; कसल्या इच्छा आकांक्षा–अपेक्षा राहिलेल्या नाहीत. सद्-गुरूंच्या कृपाप्रसादाने जुन्या आठवणीत आम्हाला रस उरलेला नाही किंवा भूत वा भविष्यावर निर्भरित असे विचार आता आमच्याजवळ शिल्लकच नाहीत. संपूर्णतया एकाकी राहणे म्हणजे काय, हे आता आम्ही समजू शकतो, अनुभवू शकतो. निःस्तब्ध मनातच सर्व विरून जाऊन कसलीही भीति उरत नाही हे आम्हाला समजले आहे. हा सगळा अनुभव केवळ गुरुदेवांचा कृपाप्रसाद आहे.

शारीरिक व्यथा नि दुःखे ही अपरिहार्य असली तरी त्यांची मातब्बरी अज्ञानावस्था आहे तोपर्यंतच.

तुझी प्रकृति छान असेल, व तू आनंदात असशील असे धरून चालतो.

तुझ्या आईचेहि तुला आशीस

तुझा प्रेमळ––

× × ×

मी वडिलांचे पत्र कितीतरी वेळा वाचले असेल. गुरुदेवांचा कृपाप्रसाद त्यांनाहि मिळाला हे वाचून मला फार बरे वाटले. गुरु-देवांची एवढी कृपा आमच्यावर होण्यासारखे आम्ही खरोखरच काय केले होते त्याचाच मला उलगडा होईना. मी गुरुदेवांना भेटायला किती उत्सुक झालो होतो! परंतु, त्यांचा ठावठिकाणाच ज्ञात नव्हता.मनात असेहि येऊन गेले की रजा घ्यावी नि आईबाबांना भेटून यावे, कचेरीत कामाचा ताण इतका असह्य होता की त्या कामात

मी संपूर्णपणे गुरफटून गेलो होतो; व त्याचमुळे रजा मिळण्याचा संभवहि नव्हता. मला वाटतं मला घराची ओढ लागली होती.

●●●

## ४

अशा प्रकारे सहा महिने लोटले पण मला घरीही जाता येईना की गुरुदेव भेटेनात. नाताळापूर्वी काही दिवस वडिलांनी पत्राने कळविले की आई आजारी आहे. कचेरीत कामाचा ताणहि कमी झाला होता. त्याचा फायदा घेऊन एक महिन्याच्या रजेचा मी अर्ज केला, नि रजा मंजूरहि झाली. दुसऱ्याच दिवशी नगरला जाण्याकरिता मी दिल्ली सोडली.

मी नगरला पोचलो तो आढळले की, कुटुंबातील सर्वचजण एकत्र जमली आहेत. एकच दिवस अगोदर, माझे दोन्ही बंधू आपल्या सर्व कुटुंबीयांसह तेथे येऊन पोहोचले होते. माझ्या बंधूंच्या मते, आईला मुंबईला न्यावी म्हणजे तेथे तज्ज्ञांचा सल्ला घेता येईल; व वैद्यकीय मदतहि जास्त चांगली मिळेल असे होते. या बेताला आईचा विरोध होता. आता वैद्यकीय उपचारांनी बरी होण्यासारखी तिची प्रकृती नाहीच असे तिचे म्हणणे ! अहमदनगरला स्वतःच्या घरात पडून राहणे तिला मुंबईला जाण्यापेक्षा जास्त सुखावह वाटणारे होते. माझ्या वडिलांमध्ये एक तऱ्हेची गंभीर स्थिरता आली होती. ते यत्किंचितहि विचलित झालेले आढळले नाहीत. ते आईच्यापाशी सदैव असत व शक्य तेवढा तिला धीर देत होते. त्यांच्यात, लक्षात येण्यासारखा, पण आश्चर्यकारक, फरक पडला होता; असे मला स्पष्टपणे दिसत होते. जणू चमत्कार घडावा त्याप्रमाणे त्या दोघांमध्ये मनःस्वास्थ्य व मनःशांति आली आहे असे जाणवत होते. घडायचे तसे घडत आहे इतक्या थंड व शांतपणे ती दोघे सगळे सहन करीत होती.

त्यात कुठे त्राग्याचा लवलेशहि उमटत नव्हता. आम्ही इतर सर्वजण मात्र काळजीने ग्रस्त झालो होतो.

मी आईच्या जवळ बसून तिचे दोन्ही हात हाती घेतले आणि तिला विचारले, " कसे काय वाटते आता ?" क्षीणपणे हसत ती म्हणाली, " माधव, तुझ्या लक्षात आलेच असेल की माझा शेवट जवळ आला आहे. तुम्हां सर्वांची मी आता, थोड्या दिवसांची किंवा थोड्या क्षणांची सोबतीण आहे. गेल्या वर्षी गुरुदेव येथे येऊन राहून गेले. त्यांचा मला कृपाप्रसाद आहे. मला कसलीही चिंता उरलेली नाही; मी अत्यंत समाधानी आहे–या घटकेला ! गुरुदेवांची कृपा व त्यांचा आशीर्वाद, म्हणून केवळ,मला नि तुझ्या वडलांना थोड्याच दिवसांच्या अवधीत, सुख–शांतीचा अनुभव भोगता आला, आमची सारी हयात-भर झगडून आम्हांला तो कधीच साध्य होता ना! तुम्हां सर्वांना सोडून जाण्याचा या क्षणीसुद्धा मला कसलाहि खेद वाटत नाही; कसलीहि खंत नाही की माझा जीव कशात गुंतून राहिला आहे की कशाची मला काळजी लागली आहे असे नाही. जे जे हवेसे वाटले, ते सर्व, गुरुदेवांनी आमच्यावर कृपा करून, आम्हाला मिळवून दिलेय्, त्यांचे तुझ्यावर प्रेम आहे नि माझी खात्री आहे की एक दिवस ते तुला फार मोठा पुरुष करतील. तसा त्यांचा निश्चयच झालेला दिसतोय् मला ! म्हणून तुला येवढेच सांगायचे आहे कीं त्यांना सोडू नकोस. काहीही झाले,आयुष्यात कसल्याही उलथापालथी झाल्या तरी गुरुदेवांना विसरूं नकोस. ते प्रति-ईश्वर आहेत नि तुझ्या जीवाचे पांग तेच फेडतील. प्राण जाण्यापूर्वी आई म्हणून, मला तुला फक्त हाच सल्ला द्यायचा आहे की, गुरुदेवांवरील विश्वास ढळू देऊ नकोस, नि ते सांगतील त्याप्रमाणे तू काय ते कर एवढे केलेस की बाकी उरलेले ते पाहून घेतील. "

आईने मला जवळ ओढले, माझ्या दोन्ही गालांचे पापे घेतले नि हृदय भरून आशीर्वाद दिला. वडिलांनीहि मला आशीर्वाद दिला व म्हणाले, " तुझी आई म्हणाली ते सर्व खरे आहे नि तिच्याशी मी

संपूर्ण सहमत आहे." माझे हृदय भरून आले, गहिवरून माझ्या गालावर, डोळ्यातून अश्रू ओघळू लागले. माझे वडील म्हणाले, "माधव, तू आता मोठा झालास. आम्हाला जितके म्हणून शक्य होते तेवढे शिक्षण तुला आम्ही दिले, नि आमच्या प्रेमाला व विश्वासाला साजेसे स्थान आयुष्यात तू प्राप्त करून घेतले आहेस. तुझी आई म्हणते त्याप्रमाणे जीवनाकडे पाहण्याच्या आम्हा उभयतांच्या दृष्टिकोनात गुरुदेवांनी इतकी क्रांती करून टाकली आहे, की आमची जीवनदृष्टी साफ वेगळी झाली आहे–आतां ! आपण सर्वचजण सुखासमाधानाच्या शोधात असतो. पण तो आपला शोध अशा ठिकाणी चालू असतो की जिथे ती दोन्ही नेमकी नसतात; आणि त्याचा परिणाम एवढाच होतो की साऱ्या जिवाचे रान करून, आयुष्यभर खटाटोप करून, हाती मात्र काहीच लागत नाही. सर्वांनीच जर संसार सोडले, अगर संसारात पडायचे नाही असे ठरवले, तर जग चालायचे कसे–हा प्रश्न झूट आहे. तसे ठरवून काहीही होत नसते. आम्ही फक्त आमच्या सुखासमाधानाचा विचार करीत आहोत. जीवनमुक्तीकरिता धडपडत आहोत. हा नुसता शब्दांचा खेळ नसता तर तसे खरेखुरे अनुभवास यायला हवे. येनकेन प्रकारेण शाश्वत सुख, अखंड आनंद मिळविणे हेच मानव जीवनाचे एकमेव ध्येय, भोवतालच्या दैनंदिन चाकोरीतून चाललेल्या जीवनातून ते सुख नि तो आनंद कधीच आत्मसात होणारा नाही याची आमची खात्री पटली आहे. जे जे म्हणून दिसते, हाताळता येते, स्पर्शाने कळते ते सर्व मर्त्य आहे. आपले शरीरसुद्धा अक्षय नव्हे. वस्तूच्या क्षणभंगुरत्वाची कल्पना मनात स्थिर झाली की कालाचा प्रश्न तेवढा महत्त्वाचा राहातच नाही. वस्तुवस्तुगणिक झीज होण्याचे व नाहीसे होण्याचे प्रमाण व त्याकरिता लागणारा काळ कमी अधिक असेल एवढेच ! एक मात्र खरे, क्षणभंगुरत्व दिसत असूनहि आपण मात्र अशा प्रत्येक सजीव निर्जीव वस्तूंना शरीराला–जीवनात अवास्तव महत्त्व देतो, ते केवळ अज्ञानाने ! हे सत्य एकदा का मनावर ठामपणे बिंबले की त्या

वस्तूबद्दल किंवा शरीराबद्दल वाटणारी आसक्ती किंवा ममत्व एकदम वितळून जाते. गुरुदेवांनी तुझ्या मनाची कितपत तयारी केली आहे हे मला माहीत नाही. पण, मला विश्वास वाटतो की आम्हा दोघांच्या मृत्यूने तू स्वतःला दुःखात बुडवून घेणार नाहीस. इतक्या दिवसांचा सहवास, आपसात असलेले नाते, व त्या नात्याने उत्पन्न झालेल्या स्निग्धतेने जीवनात एकजीव झालेल्या सुखद स्मृती, यामुळे तू हळ-हळणे अपरिहार्य आहे. परंतु, कालासारखा दुःखनिवारक दुसरा कोणी नसल्याने, जसजसे दिवस लोटतील तसा तू स्वतःला सावरशीलहि. आम्ही उभयता आता पिकली पाने झालो आहोत. परंतु आईबाप म्हणून आमची मुलांबाबतची कर्तव्ये, आमच्या कुवतीप्रमाणे, आम्ही यथायोग्य रीतीने पार पाडली आहेत. तेव्हा, तुम्हाला आम्ही जास्तीत जास्त जे चांगले दिले त्याची आठवण तुम्ही ठेवायची नि उणे पडले असेल ते विसरून जायचे!! सायंकाळ होईपर्यंत मी दोघांजवळ बसलो होतो. आईला देण्याकरिता कसलेसे औषध घेऊन बंधू आले. आम्ही दोघं आईच्या खोलीतून दिवाणखान्यात आलो तेव्हां बंधू म्हणाले, "आईची स्थिती ठीक नाही. दिवसानुदिवस क्षणाक्षणाला तिची प्रकृती ढासळतच आहे. नि या दुखण्यातून उठायची आता आशा नाही."

काय होणार ते डोळ्यांपुढे दिसत असल्याने, सर्व घरावर काळ-जीची पडछाया घनदाट पडली होती. रात्रीची जेवणे उरकून सर्व-जण दिवाणखान्यात जमलो होतो. पण, कोणीहि काही बोलण्याच्या मनःस्थितीत नव्हते. वातावरणातील ताण कमी करण्याकरिता माझे ज्येष्ठ बंधू रमाकांत यांनी मला विचारले, "दिल्लीतील गमतीजमती सांग ना. तिथे तू सार्वजनिक कार्यातहि भाग घेत असशीलच." मी उत्तरादाखल दोन चार शब्द बोललो; नि बोलण्याचा ओघ पुनः आईच्या आजाराकडेच वळला. माझी थोरली वहिनी म्हणाली, "मुंबईहून मोठा डॉक्टर बोलावून आईची तब्येत त्याला दाखवावी." त्यावर माझे डॉक्टर बंधू म्हणाले, "मी फोनवरून

आईच्या आजारपणाबद्दल त्यांच्याशी अगोदर बोललो आहे; व त्याप्रमाणे ते डॉक्टर उद्या इथे येऊन पोहोचतीलच. " परंतु, त्यानेहि शेवटी सुस्कारा टाकून सुचविलेच की, आशा करायला फारशी जागा राहिलेली नाही. कारण, आता कोणच्याच औषधांना ती दाद देत नाही अशी अवस्था होती. तरीही त्यांनी आपल्या डॉक्टर मित्रांना एकदा येऊन, रोगी स्वत: पाहून उपचारांत बदल हवा असला तर सुचवावा म्हणून आग्रहाने बोलावले होते. अशा स्थितीतहि, माझ्या आईची मानसिक स्थिती आश्चर्य करण्याइतकी शांत नि गंभीर आहे, असे म्हटल्यावाचून त्याला राहावले नाही. शेवटच्या क्षणीं, मृत्यूशी इतक्या शांतपणे मुकाबला करणे, हे तिच्या बाबतीत जितके कौतुकास्पद, तितकेच, वडिलांनीहि जो संयम व जी सहनशीलता दाखवली आहे तीही तेवढीच अगम्य व स्पृहणीयच ! रमाकांत म्हणाला, " ही सर्व गुरुदेवांची किमया आहे. उभयतांच्या जीवनात एकदाच गुरुदेव डोकावून गेले. पण, सध्याच्या आणीबाणीच्या संकटकाळीही आईवडिलांनी जी मन:शांती टिकवून धरली आहे, ती गुरुदेवांनी त्यांना दिलेली मोठी देणगी आहे. "

साहजिकच साऱ्या गप्पा गुरुदेवांबद्दल सुरू झाल्या. वहिनींनी गुरुदेवांना पाहिले नसल्याने त्यांना त्यांच्या भेटीबद्दल, अर्थातच, कुतूहलात्मक उत्सुकता होती. माझा नि गुरुदेवांचा निकटचा संबंध असल्याने गुरुदेवांबद्दल माझे मत अजमावण्याची सर्वांनाच जरूरी वाटत होती. मांझ्या बंधूंनी तर मला सरळच सवाल टाकला. " तुझ्यासारख्या आधुनिक शिक्षणाने अलकृत असलेल्या व सरकारी नोकरीत उच्चपदस्थ असलेल्याने, आध्यात्मिक खुळांवर नि पारलौकिक साधना मार्गांवर विश्वासून राहायचे, हे एक आश्चर्यच आहे. " मी एवढेच उत्तर दिले की " गुरुदेवांचा नि माझा परिचय तसा फारसा दीर्घकालीन नाही. त्यामुळे त्यांच्याबद्दल मलाहि इतकी थोडी माहिती आहे की त्यांच्या कर्तृत्वाबद्दल वा अन्य शक्तीबद्दल मला यथार्थ ज्ञान झाले आहे असे मला तरी म्हणता येत नाही.

मला ते महान संत वाटतात आणि माझ्या दृष्टीने मला वाटते की जीवनात 'पूर्णत्व' म्हणून ज्याला म्हणतात, ते त्यांनी मिळविलेले आहे. हर एक विषयाबद्दल त्यांचे ज्ञान अगाध आहे. दिसायला अगदी साधे आहेत पण त्यांची शारीरिक नि मानसिक शक्ती, जोम व उत्साह असीम आहे. असं असूनहि त्यांना त्यांच्याजवळ असलेल्या अमोघ शक्तीबाबत यत्किंचित्‌हि अभिमान नाही की गर्व नाही. भोग, आसक्ति यापलिकडे ते पोचले आहेत. कसल्याहि प्रकारच्या ऐहिक सुखाची त्यांना मातवरी नाही; नि त्यामुळे तिकडे ते ढुंकूनहि पाहात नाहीत. मग ती सुखे आत्मसात करण्याची धडपड तर राहोच." माझे दोन्ही बंधू म्हणाले, " हे सर्व सारासारबुद्धीला पटत नाही. इतकें वैराग्य असणारा मनुष्य जगेल तरी कशाला ? तू केलेले सारे वर्णन तर्क विसंगत असंबद्ध वाटते." मी त्यावर एवढेच बोललो, की, " प्रत्यक्ष भेटीतच, मी म्हणतो ते खरे की खोटे, हे ठरणार आहे, त्याशिवाय नाही. माझी नि गुरुदेवांची गाठ पडली तेव्हां माझीतरी अशी स्थिती झाली की माझी सारी हुशारी, माझे सारे शिक्षण, माझी वादविवादकुशलता, सारा युक्तिवाद त्यांच्यापुढे लटका पडला. त्यांना साधे समजून घेण्यातहि माझी सारी बुद्धिमत्ता पांगळी ठरली. अपुरी ठरली."

यावर वहिनी म्हणालीहि की " संत-महंतांबद्दल इतके उपेक्षेने कोणी बोलू नये." ती पुढे म्हणाली. " मी अनेक ग्रंथांतून वाचले आहे नि अनेक संत-महात्म्यांबद्दल ऐकलेलेहि आहे की साऱ्या जगाने आश्चर्याने थक्क होऊन जावे इतके प्रचंड सामर्थ्य या संतमहंतांनी वेळोवेळी प्रगट केले आहे." माझे बंधू यावर म्हणाले, " हा सारा वेड्यांचा बाजार आहे. मूर्ख अज्ञानी लोक या लोकांचा बडेजाव माजवितात नि ही मंडळीहि जगात साधु, संत, महंत, संन्यासी नि दार्शनिक किंवा अध्यात्मवादी म्हणून म्हणवून घेतात, मिरवतात झालं ! ज्या चमत्कारांचा अर्थ आधुनिक बुद्धिमान सुशिक्षिताला नि पुढारलेल्या अद्ययावत् विज्ञानशास्त्राला लावता येत नाही असा कसलाहि

चमत्कार करण्याचे अलौकिक वा अद्भूत सामर्थ्य कुणाहि मनुष्यात नाही." आमच्या अशाच-गप्पा चालल्या होत्या, नि जेव्हा आई-बाबांना झोप लागल्याचे लक्षात आले; तेव्हा आम्हीही आपापल्या खोल्यांत झोपायला गेलो.

दुसऱ्या दिवशी आई बरीच हुशारीत होती. तेव्हा दुखणे सावरले असे वाटू लागले. माझा डॉक्टरभाऊ आपल्या सहकाऱ्यांना उतरवून घेण्याकरिता स्टेशनवर गेला होता. आमचा चहा होतो न होतो तोच मुंबईतील प्रख्यात रुग्णविशारदांना घेऊन माझा भाऊ आला. त्यांची आमची पूर्वीचीच ओळख असल्याने आम्हाला ते दोघेहि नवखे नव्हते. घरी येताच त्या दोघांनी आईची तपासणी केली; व निर्णय दिला की आई हुशारीत दिसत असली तरी शारीरिक परिस्थिति बिकट आहे. माझ्या डॉक्टरबंधूंची औषध-योजना ठीक असल्याने तीच पुढे चालू ठेवायची ठरले.

मी सकाळपासून आईपाशीच बसून होतो. तिच्या चेहऱ्यावरून तरी वाटत होते की ती बरी आहे, डॉक्टरांशिवाय इतर सर्वांना वाटत होते की अशीच हुशारी कायम टिकली तर तिची प्रकृति सुधारून संकट टळेल. वडील मात्र फारसे आशावादी दिसत नव्हते. आलेल्या डॉक्टरांचे त्यांनी हार्दिक स्वागत केले, नि त्यांच्याशी मन-मोकळेपणाने वागले—बोललेहि. मुंबईच्या तज्ञांचे आगमन आणि आईच्या एकंदर प्रकृतीतील सुधारणा यामुळे घरच्या वातावरणातील आणि सर्वांच्या मनावरील ताण बराच कमी झाला होता.

तीन वाजण्याचा सुमार होता. आमचा चहा नुकताच संपला होता. इतक्यात काही एक आगाऊ न कळविता, गुरुदेव घरात प्रवेश कर-ताना पाहून सर्वांच्याच आश्चर्याला पारावार राहिला नाही. नेहमी-प्रमाणे ते आनंदित होते; व कसलाहि औपचारिकपणा न दाखविता ते सरळ घरात आले. मी पुढे होऊन त्यांच्या पायांवर मस्तक ठेवले. त्यांच्या आगमनाने मला कितीतरी हायसे वाटत होते. त्यांनी मला वर उचलून गाढ आलिंगन दिले. घरातील इतर सर्वजण त्यांना

पाहाताच उभी राहिली. माझ्या बंधूंनी गुरुदेवांची नि त्यांच्या नवागत मित्रांची ओळख करून दिली. गुरुदेवांचे आमच्या घरांत होत असलेले स्वागत पाहून, उभयता डॉक्टरांना आश्चर्याचा धक्काच बसल्यासारखा दिसला. गुरुदेवांनी आईच्या प्रकृतीची चौकशी केली; व स्वतःच ते तिच्या खोलीकडे वळले. मी धावतच आईकडे गेलो व म्हटले, " आई, हे बघ गुरुदेव आले आहेत." गुरुदेवांना पाहून आई-वडिलांना आनंदाचे भरते आले; उभयतांच्या डोळ्यांत आनंदाश्रूंनी गर्दी केली होती. गुरुदेव दृष्टीस पडताच आई उठून बसू लागली, पण गुरुदेवांनीच तिला पडून राहायला सांगितले. गुरुदेव स्वतःच आईच्या बिछान्यावर टेकले व त्यांनी हळुवारपणे तिचा हात आपल्या हातात घेतला. पाहुण्यांसकट सर्वांनीच आईच्या खोलीत गर्दी केली होती. कारण पुढे काय होतेय असा सर्वांच्याच मनांत प्रश्न होता. " कसं काय वाटतं ?" गुरुदेवांनी विचारले. आई म्हणाली, " गुरुदेव, माझी जीवनयात्रा संपत आली आहे हे तुम्ही जाणताच. " तोंडावर स्मित आणून ती पुढे म्हणाली, " मी मृत्यूला सन्मुख आहे. ना मला मरणाची भीती की मला कसला खेद ! मला वाटलंच होतं नि त्याप्रमाणे तुम्ही आलात ! मी तुमची वाटच पाहात होते. इतरांबद्दल मला नव्हती वाटत येवढी आतुरता !" माझ्या वडिलांनीही गुरुदेवांच्या पदतलावर मस्तक ठेवले, व ते म्हणाले, " या कठिण प्रसंगी गुरुदेव आम्हाला तुमचीच आस लागून राहिली होती. आलात. अत्यानंद झाला."

आई म्हणाली, " गुरुदेव, मला किती आनंद झाला आहे, नि तुमच्याबद्दल मला काय वाटते आहे हे स्पष्ट करायला माझ्याजवळ शब्द नाहीत. तुमची पूजा बांधायला मी हीनदीन आहे. मी नि हे तुमचे जन्माचे ऋणी आहोत. " गुरुदेव म्हणाले, " आई, तुम्हाला कबूल केले होते ना त्याप्रमाणे मी आलो आहे. आता तुमच्याकरिता नि तुमच्या पतिराजांकरिता मी काय करू ते सांगा. तुमचा हा उत्साह व आनंदी वृत्ती पाहून मला फार समाधान वाटले. माधवबद्दल सारी

जिम्मेदारी मी पत्करली आहे. आणि तुमच्या इतर कुटुंबीयांकडेहि माझे लक्ष असेल, यापेक्षा मी काय सांगू यावेळी ? मला जे तुम्हाला सांगायचे होते ते सांगून झाले आहे. माझ्या सदिच्छा व ईश्वरीकृपा सदैव तुमच्या पाठीशी असतील." आईने यावर आम्हां सर्वांना विचारले, "पण गुरुदेवांना दूध तरी दिलेत् का ?" नि मग आम्हांला आठवण झाली की एवढा साधा पाहुणचार करायला आम्ही विसरलो होतो. गुरुदेव त्यावर हसले व म्हणाले, "आई, तुम्ही कसलीही काळजी करू नका. मी का नवखा का आहे या घरात ? मी माझी सारी सोय करून घेईन–कसलाहि औपचारिकपणा न बाळगता!" मी गुरुदेवांना हातपाय धुवायला विनविले. त्यांच्याजवळ नेहमीप्रमाणे त्यांचे असे काहीच सामान नव्हतेच. मी त्यांना माझ्या खोलीत घेऊन गेलो व त्यांना लागणाऱ्या वस्तू दिल्या. अर्ध्या एक तासाने गुरुदेव आम्ही बसलो होतो त्या दिवाणखान्यात आले. फराळाला त्यांनी बोट लावले नाही. फक्त कपभर दूधमात्र घेतले. आईच्या प्रकृतीबद्दल माझ्या बंधूंनी त्यांच्यापाशी चौकशी केली. गुरुदेव जरा गंभीर झाले व म्हणाले, "मुंबईहून तज्ज्ञ डॉक्टर आले आहेत. तेव्हा माझ्यापेक्षा त्यांचे मत याबाबत जास्त ग्राह्य." त्यावर एक डॉक्टर म्हणाले, "माफ करा महाशय, रोग्याची एकंदर परिस्थिति काळजी करण्यासारखीच गंभीर आहे. विशेषत: रोगी आता कोणत्याच औषधोपचाराला दाद देण्याच्या स्थितीत नाही. आम्ही आमच्या प्रयत्नांची शिकस्त केली आहे तरीही प्रकृति ढासळतच आहे, त्यामुळे भीती वाटते, आला प्रसंग टळत नाही." माझे बंधू म्हणाले, "गुरुदेव, तुमची हरकत नसेल तर आमची अशी इच्छा आहे की आपण आपल्या दैवी सामर्थ्याचा उपयोग करून आमच्या आईचे प्राण वाचवावे." दिवाणखान्यातील सर्वांचे लक्ष गुरुदेवांच्या चेहऱ्याकडे व बोलक्या डोळ्यांकडे केंद्रित झाले होते. सर्वांकडे दृष्टिक्षेप टाकून गुरुदेव म्हणाले, "तुम्हीच म्हणता की रोग्याचे शरीर औषधांना साथ देत नाही आणि प्रकृती ढासळत आहे, खचत आहे. तेव्हा, दुरुस्ती-

पलिकडे गेलेल्या अशा शारीरिक परिस्थितीत मी काय करावे अशी तुमची अपेक्षा आहे ? जास्तच स्पष्ट करून सांगायचे तर असे पाहा, दुरुस्तीपलिकडे गेलेल्या मोडकळीस आलेल्या घरात, राहायला तुम्हाला तरी आवडेल का ?

" अर्थात दुसरे चांगले घर मिळण्याची शक्यता लक्षात घेऊनच मी तुम्हाला विचारतो, तुम्ही अशा स्थितीत नवे घर पत्कराल की जुन्याच पडझड झालेल्या घरात राहण्याचा हट्ट धराल ? तुमच्या नातेवाईकांना वाटते की, तुम्ही तुमची जुनी वास्तु सोडून जाऊ नये; तेव्हा तुम्ही त्याच मोडकळीस आलेल्या घरात राहावे, किती निर्घृण व दुष्टपणाचा हा आग्रह ठरेल नव्हे का ? तेव्हां, नातेवाईकांच्या भावना नि परंपरेचे प्रेम हे अशातऱ्हेच्या खिळखिळ्या घरात राहाण्याचा आग्रह करीत असेल तर तो आग्रह अप्रस्तुतच नव्हे तर मूर्खपणाचा असल्याने त्याचा विचार करणेहि गौण नाही का ठरत ?– विशेषतः उत्तम घर राहायला मिळण्याची शक्यता असताना ! येथेहि असाच प्रश्न आहे की मी काय करू शकतो, यापेक्षा, मी जास्तीत जास्त योग्य नि चांगले काय करावे हा ! आपल्या भावना किंवा इच्छा यावेळी आईच्या प्रकृतिस्वास्थ्याच्या आड किंवा त्यांच्या दुखण्याच्या नैसर्गिक परिवर्तनाच्या आड येणे सद्यःस्थितीत कितपत बरोबर आहे ? शरीर जिथे जीव तगवू शकत नाही; प्राण, आपणामध्ये ठेवायला, शरीर जिथे कमकुवत ठरले आहे, थकले–भागले आहे, अशा परिस्थितीत जर जीवाला त्या जीर्णशीर्ण शरीरातच राहण्याची आपण सक्तीच केली तर तो राहीलहि बापडा. पण, शरीर दर क्षणाला दगा देईल ते ? तेव्हां तुमची आई या ना त्या दुखण्याने सतत हैराण होऊन दीर्घकालपर्यंत आंथरुणावर खितपत पडावी असे तुम्हाला खरोखरच वाटते का ? जी व्यक्ती या क्षणी सुखी आहे, आनंदित आहे, तिला दीर्घकालपर्यंत रोगाशी झगडत ठेवण्याचा आग्रह करणे अमानुषपणाचे नाही का होणार ? तेव्हा तुम्हा सर्वांना काय करावेसे वाटते ते मला समजायला हवे आहे.

एक गोष्ट मात्र स्पष्टपणे लक्षात असू द्या. की, मी माझी जबाबदारी कदापिही टाळू इच्छित नाही. किंवा मला माझ्या ज्ञान-सामर्थ्याचे प्रदर्शन मांडण्याचा हव्यासहि नाही आहे. किंवा तुमच्या सांगण्या-प्रमाणे करायला मी भितो असेहि नाही. माझी इच्छा इतकीच आहे की, या प्रश्नाचे खरे स्वरूप, नागडे–उघडे–स्वरूप, दृष्टिआड न करिता तुम्ही काय ते मला सांगावे."

गुरुदेव गंभीर झाले, कसलाहि आडपडदा न ठेवता आखीव रेखीवपणे प्रश्न हाताळण्याच्या ह्यांच्या धैर्याचे सर्वांना कौतुक वाटले, आश्चर्यहि वाटले; नि त्यांच्या आस्थेबद्दल व कळकळीबद्दलहि सर्वांची खात्री पटली. थोरले बंधू म्हणाले, "आम्हाला यात मतच नाही. कारण तुम्हीच या प्रश्नाची योग्य तड लावू शकाल. तेव्हा या प्रसंगी योग्य नि अयोग्य तुम्हीच ठरवायचे आहे. आमची इच्छा आम्ही प्रदर्शित केली की आई वाचावी नि तिची प्रकृति सुधारावी" गुरुदेव म्हणाले, "मी काय म्हणतो आहे हे तुम्ही अजूनहि समजू शकत नाही असे दिसते. सर्वच गोष्टींना मर्यादा आहेत–मानवी शरीरालाहि ! मानसिक चिंता, वाढते वय आणि इतर अनेक कारणे यांनी शरीर खंगते. हळू हळू ढासळू लागते, कोसळते ! मनुष्याच्या इच्छा–आशा–आकांक्षांना तर शेवटच नाही. तुमच्या आईचा जीव मी वाचवला; तर तुम्हाला खात्री आहे का, की अशा स्थितीत त्या सुखी होऊ शकतील ? जगात सुख कशात आहे; सुख म्हणजे तरी काय याचा कधी तुम्ही आजपर्यंत विचार तरी केला आहे का ? आपण धरून चालू की तुमच्या आई एकवेळ वाचल्या; तुमच्या वडिलांबद्दल काय ? ते जर तिच्या आधी जग:सोडून गेले तर आईच्या दु:खाला काही पारावार आहे ? वडिलांच्या पश्चात् तिला वैधव्यात दिवस काढायची वेळ आली. तर तुमचेहि वय वाढतेच आहे ! तुम्हा मुलांचा तिने काय विचार करायचा ? तुमच्या पत्नी–मुलांची काय खात्री ? अंमळ शांत विचार कराल तर आईचे आयुष्य वाढविणे हा खरा आजच्या परिस्थितीतून पार पडण्याचा तोडगा होऊ शकत

नाही. तिला आजच्या मरणातून ओढून काढायचे झाले तर तसे घडवून आणणाऱ्याला उत्तर आयुष्यात तिला सुख लागावे म्हणून तिच्या भोवतालच्या, तिच्या साऱ्या नात्यागोत्याच्या मंडळींच्या प्रकृतीची काळजी घ्यायला हवी. तेव्हा, मला तुम्हांला पुन: कळकळीची विनंती करायची आहे ती ही की, जरा गंभीरपणे खोलवर विचार करा. स्वत:च्या इच्छा नि भावना जरा वेळ बाजूला ठेवून या घटनेकडे व प्रश्नाकडे पाहा; नि मला मग सांगा–आहे या परिस्थितीत मी काय करावे अशी आपली इच्छा आहे ? कारण या मर्त्य जगात प्रत्येकाला आज ना उद्या मरायचे हे आहेच ! अकाली आलेल्या मृत्यूमुळे त्रास होणे, त्रस्त वाटणे व गोंधळ होणे शक्य आहे; हे मी समजू शकतो पण वृद्धावस्थेत मृत्यू येणे, ही अटळ गोष्ट नव्हे का. जे निसर्गाला धरून आहे त्याबद्दल चिंता वाटण्याचे अगर त्यामुळे गोंधळून जाण्याचे कारणच काय ? पिकले फळ झाडाला सोडून गळून पडायचे तद्वत प्राण शरीराला सोडून देहपात होणे ही आयुष्यातील एक अटळ घटना असेल तर त्यासंबंधी अपेक्षाच करायची; प्रयत्नच करायचे, तर ‘ शेवटचा दीस गोड करी ’ या स्वरूपात, प्राण सुखाने कसा जाईल याचाच फक्त. तुमच्या मातापित्यांची या गंभीर प्रसंगी मानसिक अवस्था जरा सूक्ष्मपणे अवलोकन करा. मला तरी सांगायला समाधान वाटते की, ती दोघेहि अति आनंदात आहेत. त्यांना कसल्याही शारी-रिक वेदना नाहीत, की मानसिक विवंचना नाहीत. त्यांचे मन कसे शांत सुखाधीन आहे. होऊ घातलेल्या घटनेबद्दल ते संपूर्णतया बेफिकीर आहेत–ही काय लहानसहान साधना आहे ? परस्परांना कायमचे दुरावणार या कल्पनेनेच तुम्ही विव्हल झाला आहात. पण त्यात भावनातिरेक आहे; विचाराचा भाग अत्यल्प आहे. किंबहुना मुळीच नाही !” यावर हजर असलेल्यांपैकी एक डॉक्टर म्हणाले, “ शरीराच्या अवस्थेकडे इतक्या बेफिकीरपणे पाहण्याची रोग्याच्या मनाची तयारी पाहून आम्ही तर विस्मयचकित झालो आहोत. आईंना कळतेय की त्यांची स्थिती चिंताजनक आहे; दुखण्यातून बाहेर पडण्याचा

सुतराम संभव नाही. तरी, त्यांच्या मनाची शांती ढळलेली नाही." गुरुदेव म्हणाले "मरायचेच आहे तर अशा अविचल मनःस्थितीत राहून मरण सोसावे ही मनोधारणा यथायोग्य नाही वाटत तुम्हाला डॉक्टर ? मला तर वाटते, की आई व वडील यांनी आपल्या मनाची चांगलीच तयारी केली आहे; अगदी या क्षणाला, देहविसर्जन करावे लागले तरी ! माफ करा, गैरसमज करून, मला क्रूर म्हणू नका. माझ्या दृष्टिकोनातून तुम्ही या घटनेकडे पाहा एवढीच माझी विनंती आहे."

सर्वजण निःस्तब्ध होते, काही क्षण कोणी काहीच बोलले नाही. आम्हा सर्वांना दिसत होते. पुढच्या क्षणी काय होणार आहे ते. परंतु, आई आमच्यातून जाणार–कायमची जाणार-ही कल्पनाच करवत नव्हती. आम्ही सारेजण त्यामुळे अक्षरशः हादरून गेलो होतो.

गुरुदेव म्हणाले, "भावनातिरेकाने तुमची स्थिती केविलवाणी झाली आहे. मनाच्या गोंधळलेल्या अवस्थेत बुद्धि बधिर होऊन सत्यापासून दूर अलग पडत आहे. तेव्हा, निश्चित असे मत देणे तुम्हा कुणालाच शक्य नाही."

बंधू म्हणाले, "खरं आहे गुरुदेव. अपंग स्थितीत वाढते आयुष्य घालविणे कुणालाहि रुचणारे नव्हे. आईच्या दृष्टीनेहि त्या यातना नकोत. आम्हांलाहि ते पाहावणार नाही. तिच्या वृद्धापकाळात जर तिला दुःख भोगणे एवढेच आयुष्याचे इतिकर्तव्य राहणार असेल, तर तसे आयुष्य नकोच. तुम्ही सत्य परिस्थिती आमच्या पुढचात चांगलीच मांडलीत. तुमच्या म्हणण्यातला इत्यर्थ आमच्या लक्षात आला आहे. तिला असुखी करून तिचे जीवित वाचावे असे मी तरी कधीच इच्छिणार नाही." एक डॉक्टर मध्येच म्हणाला, "माफ करा गुरुदेव, मृत्यूलाहि अडवणारी चित्शक्ति किंवा दैवी शक्ती कुणाजवळ या जगात असेल असे मलातरी वाटत नाही. तुम्ही जीवनाबद्दल जो दृष्टिकोन मांडलात किंवा मृत्यू टाळण्यापासून होणाऱ्या घटनांचे जे विवरण केलेत ते अर्थातच मला मान्य आहे. परंतु, सर्व उपाय

थकल्यावर एखाद्या होतकरू तरुणाचे अवेळी येणारे मरण, दैवी शक्तीने टळणे हा चमत्कारच म्हणावा लागेल." गुरुदेव म्हणाले, "चमत्कारांच्या गोष्टी बोलण्याची ही वेळ नव्हे. नि तसे चमत्कार करून दाखवायला मी आलेलाहि नाही. पण, जग ज्याला चमत्कार नि दैवी शक्ती म्हणते, तसे काहीही या जगात नाही, हे मात्र खरे. जो घटना आपणाला समजू शकत नाही, किंवा ज्या प्रसंगाबद्दल बुद्धीला पटणारे उत्तर आपणाला सापडत नाही त्यांना 'दैवी' म्हणण्याची प्रथा आहे–लोकांना तशी सवय आहे इतकेच. स्वतःचे अज्ञान कबूल करण्याचा, किंवा झाकण्याचा म्हणू या पाहिजे तर, तो एक प्रयत्न आहे झाले!

"ज्याला वैद्यकीय ज्ञान नाही, त्याला, जेव्हा एखादा डॉक्टर, योग्य रोगनिदान करून, औषध देऊन अगर शस्त्रक्रिया करून, रोगी बरा झाल्याचे दिसते तेव्हा डॉक्टरच्या यशाला तो दैवी चमत्कारच समजत असतो. अक्षरशत्रू रानात राहणाऱ्या आदिवासी लोकांना 'बोलका ढलपा' हा सुद्धा चमत्कारच. दारिद्र्यात खितपत पडणाऱ्यांच्या दृष्टीने, संपत्तीच्या जोरावर होणाऱ्या गोष्टी म्हणजे चमत्कारच! जगात सुप्रसिद्ध असलेले 'सात चमत्कार' माणसानेच ना घडवून आणले आहेत? आधुनिक विज्ञानाने तर आश्चर्याने गुदमरून टाकणारे कितीतरी चमत्कार करून दाखविलेले आहेत? टेलिफोन, टेलिग्राफ, बिनतारी संदेश, नि आकाशवाणी हेही चमत्कारच पण आपण तसे ते मानीत नाही. कारण साधने आपल्या वापरात आहेत व त्यांच्या संबधी अत्यंत प्राथमिक स्वरूपाचे का होईना, आपणाला ज्ञान आहे. हे सर्व कसे झाले? तर सृष्टीची मूलतत्त्वे वर्षानुवर्षांच्या अभ्यासाने आपण समजावून घेतली, त्यांवर प्रभुत्व मिळविले, त्यांचा उपयोग करण्याकरिता अतोनात मेहनत घेतली, कष्ट उपसले, अनेक वर्षांचा त्याचा पद्धतशीर अभ्यासक्रम आखला. नि ते ज्ञान सर्वांना उपलब्ध करून देता आले म्हणूनच ना?"

"ज्यांनी निरनिराळ्या 'योगां'चा अभ्यास करण्यात वर्षे घाल-

विली. ध्यान–धारणा, प्राणायाम, नि आसने यांचा कटाक्षाने अवलंब करून, अध्यात्मशास्त्रातील अतींद्रियविद्येचा वेध घेतला, त्यांनी याही प्रांतात स्वतःचे असे विशिष्ट प्रभुत्व संपादन केले. त्यांच्या कृति, प्रयोग, किंवा त्यांनी दाखविलेल्या घटना लोकांना चमत्कार वाटतात याचे कारण त्या अतींद्रियशास्त्राबद्दल त्यांचे गाढ अज्ञान; व ते स्वतः शिकण्याबाबतची त्यांची अनास्था ! असे प्रयोग करणारांना निष्कारण महत्त्व दिले जाते, कारण, ते अज्ञानजन्य असते. नाहीतर, ते प्रयोग जे करीत असतात ते, त्यांच्या ज्ञानात पारंगत असल्यात, त्यांच्या दृष्टीने मामुलीच असतात. योगविद्या, अध्यात्मशास्त्र, अतींद्रियविद्या हीही इतर शास्त्रांप्रमाणे शास्त्रेच आहेत. ती शिकण्याकरिता फार वेळ खर्च करावा लागतो. कारण, ज्या मूलतत्त्वापासून या जगाची निर्मिती झाली आहे, त्या तत्त्वांवर आपली हुकमत चालविण्याची शक्ति स्वतःमध्ये जागृत करायची असते. ज्यांनी ह्या शास्त्राच्या अभ्यासाकरिता आपले सारे आयुष्य वेचिले, त्यांना अतींद्रियविद्या करतलमलवत् वाटते. कोणी जरी त्यांचे प्रयोग इथे करून दाखविले तरी तेवढ्या प्रदर्शनाने समजण्याइतके ते शास्त्र सोपे नाही. कारण, निवळ कल्पना किंवा विचार करून आकलन होण्यासारखे ते शास्त्र नव्हेच मुळी ! जो चमत्कार घडला तो कसा घडला हे तुम्हाला कळायचे नाही, नि कळून घेण्याचा प्रयत्न कराल तर या शास्त्रातील, या एका दालनाचा अभ्यास करायला आयुष्याची वर्षेच्या वर्षे घालवायला हवीत. जगात आपण चमत्कार दाखवू या इर्षेने या शास्त्राचे अवगाहन करण्याचे ठरवून अभ्यासाला लागलेले लोक मला पुष्कळ माहीत आहेत. परंतु, जसजसे ते या ज्ञानात खोलवर शिरू लागले तसे त्यांचे त्यांना आढळून आले की आपण अत्यंत मामुली व अत्यंत क्षुद्र गोष्टीकरिता आयुष्यातली बहुमोल वर्षे अक्षरशः फुकट घालविली. कारण, त्यांनी मिळविलेल्या ज्ञानाने चमत्कारातील झगझगीतपणाच निष्प्रभ झाला, नाहीसा झाला ! तेव्हा, अध्यात्मविद्येत जर काही महत्त्वाचे असेल तर ज्याने अगम्य परमात्मस्वरूपाचा बोध होईल असे सत्यान्वे-

पण, आत्मानुभव. शरीराच्या अपेक्षेत आपण जोपर्यंत विचार करतो तोपर्यंतच काय ती मरणाची भीती. पण, ज्या क्षणी मनुष्याला हे मनोमय पटेल की मानवी शरीर मर्त्य आहे, जन्मोजन्मी त्याला नव-नवे रूप घ्यायचे आहे, मिळायचे आहे. स्वतः एकाकी कसे राहायचे याचा अनुभव एकदा आला किंवा समजले, म्हणजे जगातील कोण-त्याहि वस्तूबद्दल किंबहुना स्वतःच्या शरीराबद्दलहि आसक्ती झडून जाईल नि तेव्हाच ज्याला आत्मदर्शन म्हणतात, त्याचा अनुभव येऊ शकेल. मी काय म्हणतो आहे ते कदाचित् तुम्हाला समजणार नाही. याबद्दल मी दिलगीर आहे. नि अध्यात्मशास्त्रावर मला प्रवचनही द्यायचे नाही. तरीही, मी अनेक गोष्टींचा, ओघात आल्या तसा उलगडा केला आहे, अर्थात माझ्या कुवतीप्रमाणे ! तरी, तुम्ही सम-जून घेण्याचा प्रयत्न करावा असे मला वाटते."

गुरुदेव इतक्या तळमळीने बोलत होते की सर्व जणू अवाक बनले होते. जेवण तयार असल्याचे सांगण्यात आल्यावरून आम्ही सर्व उठून जेवणघरात गेलो. गुरुदेवांनी फक्त थोडीशी फळे घेतली व दूध घेतले तेहि कपभरच !

जेवणे उरकल्यावर आम्ही सर्व दिवाणखान्यात पुनः जमलो. गुरु-देव आईचा समाचार घेत तिच्या खोलीत बसले होते. गुरुदेवांच्या वक्तव्याने प्रत्येकावर खोलवर परिणाम झालेला दिसत होता. माझे बंधू म्हणालेहि की, " गुरुदेव ही असामान्य विभूती आहे. आणि कुणाच्या मनात जे येईल ते घडवून आणण्याचे त्यांना सामर्थ्य प्राप्त झाले असावे हे निश्चित. त्यांना आपण समजू शकत नाही. कारण, आपले ते सोडण्याची, स्वतःचे अज्ञान कबूल करण्याची आपली तयारी नाही म्हणून !" तेवढ्यात वडिलांची हाक ऐकू आल्याने मी आईच्या खोलीत गेलो. आई नि वडील गुरुदेवांशी मोठ्या मजेत गप्पा मारीत असलेले पाहून मला फार आनंद झाला. आई म्हणाली, " हे बघ माधव, या क्षणाला आम्ही आनंदाच्या अगदी अत्युच्च शिखरा-वर आहोत; आणि तुझ्या दृष्टीने अत्यंत वाईट ठरेल त्यालाहि

सामोरे जायला आमची तयारी आहे. गुरुदेवांनी तुझी काळजी घेण्याची सारी जिम्मेदारी पत्करली आहे. तेव्हा आमच्यापेक्षा त्यांच्या समर्थ हाती तुला सोपवणं आम्हाला सुखावहच वाटते. ते तुझे गुरू, मार्गदर्शक आणि त्यामुळे आमची खात्री झालीय की, आम्हां कुणाला जे साधले नाही ते तुला साध्य होईल. आमचे एवढेच सांगणे आहे की गुरुदेवांवर अढळ विश्वास ठेव. बाकीचे ते पाहून घेतील." माझ्या डोळ्यांत अश्रू जमा होऊन माझा घसा दाटला. मी आईच्या कुशीत शिरलो ! मी हमसाहमशी रडत होतो. माझ्या केसावरून हात फिरवीत, आईने माझ्या कपाळाचे चुंबन घेतले, व म्हणाली, " माधव, तू असे नाही करता कामा. वाईट वाटण्यासारखे काहीही झालेले नाही. आमच्यात जे आहे, त्याबद्दल तुला प्रेम असेल तर आम्ही तुझ्या सदैव सन्निधच आहोत." मी बराच वेळ आईजवळ होतो. गुरुदेवांचा आवाज आला नि मी जागा होऊन ऐकू लागलो. " माधव आतापर्यंत तू अनेक गोष्टी शिकलास तेव्हा आत्तासारखा स्वत:वरचा तावा जाऊ देता कामा नयेस. शाश्वत काय, अशाश्वत काय, मर्त्य कोणते व शाश्वत टिकणारे कोणते, याचा विवेक तुला करता याय-लाच हवा." मी त्यांच्या पदकमलांवर माझे मस्तक ठेवले. त्यांनी आपल्या तळहातांनी माझ्या कपाळाला स्पर्श केला, आणि आपले दोन्ही हात जरावेळ माझ्या मस्तकावर ठेवले. विजेचा स्रोतच जणू सर्वांगातून जात आहे असा मला भास झाला. त्याच बरोबर एका विशेष अननुभूत सुखावह आनंदाची लहरही सर्वांगात संचरते आहे असे वाटले. मी शांत नि स्थिर झालो होतो व एकाएकी स्पष्टतेची अरुणप्रभाही माझ्या गढूळलेल्या मनाच्या आकाशात फाकत आहे असा मला अनुभव येत होता. शब्दात न सांगता येण्यासारखा, पण स्पष्टपणे अनुभवास येत असलेला कसलातरी फरक, अंतर्यामी होत आहे हे मला जाणवत होते. गुरुदेवांनी मला वर उचलले होते नि एकप्रकारच्या देहातीत तंद्रीतच मी जवळच्या खुर्चीवर बसलो होतो. माझ्या मातापित्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडत असलेला मी पाहात

होतो. ते म्हणाले, " माधव, तुझे काम झाले आहे. आमची एक मोठी महत्त्वाकांक्षा आज सुफलित झाली." गुरुदेव उभे राहिले व म्हणाले " वरं तर मी निघतो आता." माझ्या मातापित्यांनी त्यांची चरण-धूळ स्वमस्तकी धारण केली. त्यांना आशीर्वाद देऊन गुरुदेवांनी त्यांचा निरोप घेतला. आम्ही एकत्रच दिवाणखान्यात आलो. गुरु-देवांनी सर्वांचा निरोप घेतला. माझ्या दोन्ही बंधूंनी, विशेषतः भाव-जयांनी " मुंबईला याल तेव्हा आमच्याकडे राहायला अवश्य या " असा आग्रह गुरुदेवांना केला. रात्री १० वाजता स्टेशनवर मी गुरु-देवांना निरोप दिला. त्याच रात्री डॉक्टरद्वयहि मुंबईला परतले.

गुरुवार सकाळची ती वेळ होती. गुरुदेवांना जाऊन थोडेच दिवस झाले होते. माझ्या खोलीचे दार नोकर ठोठावत होता. मी घाईने आंथरुणावरून उठून पुढे झालो " आईंना अस्वस्थ वाटतेय " असे नोकराने सांगितले. मी आईच्या खोलीत येऊन पोहोचलो. दोघेहि बंधू तिथे अगोदरच येऊन बसले होते. आईचा श्वास जड होत होता वडील आईच्या केसांवरून हात फिरवीत तिच्या जवळच बसले होते. आईने संथपणे डोळे उघडले. तिच्या तोंडावर स्मित होते, एक तऱ्हेचा वेगळाच तजेला होता. शरीराला एक झटका बसला; आणि ती आम्हा सर्वांना सोडून गेली. वडिलांनी तिचे मस्तक स्वतःच्या मांडी-वर घेतले व अति हळुवारपणाने तिचे शेवटचे चुंबन घेतले. रडण्याचा एकच कल्लोळ झाला; आणि आई आम्हाला सोडून गेल्याचे सर्वांनाच एकदम कळले. स्त्रियांना आवरणे फार कठीण होते; नि आम्ही, आम्हाला तरी कुठे सावरू शकत होतो ? वडील मात्र कमालीचे शांत व गंभीर होते. त्यांच्या तोंडून एवढेच शब्द बाहेर पडले, " माझी जीवनसाथी मला एकट्याला सोडून पुढे गेली." त्यांच्या म्हणण्याचा त्यावेळी तरी आम्हांला काहीच बोध झाला नाही. वडिलांच्या डोळ्यात थबकलेले अश्रू आणि गळ्यातून भरून आलेला घोगरा स्वर फक्त जाणवला. सारे कुटुंब तिथे जमा झाले होते. नि शेजारीपाजारी येण्याला सुरवात झाली होती. सकाळी ६ च्या सुमाराला आईचे प्राणो-

त्क्रमण झाले होते. आम्ही हात धरून वडिलांना खोलीबाहेर आणले; नि ते पडतील की काय अशी भीती वाटून त्यांना एका खुर्चीवर दिवाणखान्यात आणून बसविले. स्पष्ट आवाजात ते माझ्या वडील बंधूंना म्हणाले, " मी माझे मृत्युपत्र केले आहे नि ते तुला तिजोरीत ठेवलेले सापडेल. त्यात साऱ्या चीजवस्तू व जमीनजुमल्याची नोंद केलेली आहे. प्रत्येक बारीक सारीक बाबीचा मी सुस्पष्टपणे उलगडा केलेला आहे. तेव्हा, त्यातील सूचनांप्रमाणे वाटण्या करायच्या एवढेच आता उरले आहे. काना–मात्रा त्यात बदल करायला नको. तुझ्या मार्गदर्शनाकरिता, दिलेल्या सूचनांचे, फक्त तू अक्षरश: पालन मात्र करायचे. तू सर्वांत वडील मुलगा म्हणून, माझ्या पश्चात् कुटुंबाची सर्व जबाबदारी तुझ्यावर. तू अशा कुटुंबात जन्म घेतला आहेस की त्या घराण्यात आतापर्यंत नामवंत पुरुष घडविले गेले. माझी खात्री आहे की तुझ्याहि रक्तात ती परंपरा असल्याने घराण्याचे नाव व प्रतिष्ठा–इभ्रत–तू चांगल्या प्रकारे संभाळशील. माझ्या टेबलाच्या खणात तिजोरीच्या किल्ल्या तुला सापडतील. " ते असे का बोलता-हेत याचा मात्र आम्हाला उलगडा होईना. परंतु, आपल्या भावनांना वाट करून देत असतांना अडथळा होऊ देणेहि इष्ट नव्हते म्हणून आम्ही सर्वजण स्वस्थपणे ऐकत होतो.

"ते एकदम उठून उभे राहिले व आपल्या खोलीकडे निघाले. चार पावले चालले असतील नसतील, तो त्यांचे पाय त्यांच्याच पायात घुटमळू लागले; व तोल सावरून धरणे त्यांना अशक्य झाले. आम्ही त्यांच्या मदतीला धावलो तो ते कोसळलेच. त्यांना ग्लानी आली होती. त्यांना उचलून आम्ही अंथरुणावर निजवले. नि स्मेलिंग सॉल्टची बाटली स्वत:च्या बॅगेतून आणण्याकरिता माझा डॉक्टरभाऊ धावला. बाटली घेऊन तो वडिलांजवळ पोचण्यापूर्वीच वडिलांचेहि प्राणोत्क्रमण झाले होते. एका तासाच्या अल्पावधीत आम्ही सर्व मुले पोरकी झालो. आई नि वडील दोघेहि इहलोकची यात्रा संपवून आम्हांला सोडून गेली.

सर्व गावात ही बातमी विद्युल्लतेप्रमाणे पसरली. लोकांची झुंबड उडाली. जवळजवळ सर्व गाव आईवडिलांच्या अंतिम दर्शनाला लोटले होते. त्याकरिता त्यांचे मृतदेह दिवाणखान्यात ठेवले होते. दोघांनाहि एकदम मरण–सर्वांना चमत्कार वाटत होता. उभयतांवर पुष्प हारांचा अक्षरश: खच पडला होता. स्मशानातहि गावातील सर्वजण जमले होते. गावातील प्रतिष्ठित मंडळी सरकारी अंमलदार यांची वडिलांच्या गुणवर्णनपर भाषणेही स्मशानात झाली. प्रथितयश वकील म्हणून व समाजसुधारक म्हणून वडिलांचा अनेकांनी स्तुतिपर शब्दांत गौरव केला. माझ्या आईचाहि उल्लेख तिच्या सामाजिक कार्यांच्या अनुषंगाने करण्यात आला. कोर्टकचेरी व बाजार त्या दिवशी वडिलांच्या दुखवट्यानिमित्त बंद ठेवण्यात आला होता.

सुतकातले दिवस जाता जाता फार कष्ट वाटले. आईवडिलांच्या गैरहजेरीत घरात राहणे महाकर्मकठीण वाटत होते. कारण, त्यांचे सान्निध्य पावलोपावली जाणवत होते, आठवणीवाचून एक क्षण जात नव्हता. त्या उभयतांच्या गैरहज़ेरीत सारे घर ओकेबोके वाटत होते नि खायला येत होते. कुणा परक्याच्या यजमानरहित घरात आम्ही राहात आहोत असे वाटत होते. माझे दिवस कसे गेले हे तर मला सांगताच येत नाही. सर्व घरभर भीषण शांतता पसरलेली होती. त्यातच प्रत्येकाच्या मनावर विमनस्कतेचे एवढे जाड पटल पसरले होते की जो तो जड अंत:करणाने, व अवघडलेल्या पायाने मूकपणे इकडे तिकडे फिरत होता.

तेराव्या दिवशी हिंदुशास्त्राप्रमाणे श्राद्धविधी उरकल्यावर आम्हा सर्वांच्या समोर वडील बंधूंनी तिजोरी उघडली. वडिलांचे काही स्नेही व सरकारी अधिकारी सुद्धा आम्ही मुद्दाम बोलावले होते. मृत्युपत्र सर्वांसमोर वाचण्यात आले. त्यात कुठेहि नाव ठेवायला फट नव्हती. आम्हा तिघांमध्ये, जमीन, जुमला, स्थावर जंगम इस्टेट, पैसा–अडका दागदागिने यांची समान वाटणी केलेली होती. निरनिराळ्या संस्थांना देणग्या होत्या. तसेच नोकरांना बक्षिसे होती.

त्क्रमण झाले होते. आम्ही हात धरून वडिलांना खोलीबाहेर आणले; नि ते पडतील की काय अशी भीती वाटून त्यांना एका खुर्चीवर दिवाणखान्यात आणून बसविले. स्पष्ट आवाजात ते माझ्या वडील बंधूंना म्हणाले, " मी माझे मृत्युपत्र केले आहे नि ते तुला तिजोरीत ठेवलेले सापडेल. त्यात साऱ्या चीजवस्तू व जमीनजुमल्याची नोंद केलेली आहे. प्रत्येक बारीक सारीक बाबीचा मी सुस्पष्टपणे उलगडा केलेला आहे. तेव्हा, त्यातील सूचनांप्रमाणे वाटण्या करायच्या एवढेच आता उरले आहे. काना–मात्रा त्यात बदल करायला नको. तुझ्या मार्गदर्शनाकरिता, दिलेल्या सूचनांचे, फक्त तू अक्षरशः पालन मात्र करायचे. तू सर्वांत वडील मुलगा म्हणून, माझ्या पश्चात् कुटुंबाची सर्व जबाबदारी तुझ्यावर. तू अशा कुटुंबात जन्म घेतला आहेस की त्या घराण्यात आतापर्यंत नामवंत पुरुष घडविले गेले. माझी खात्री आहे की तुझ्याहि रक्तात ती परंपरा असल्याने घराण्याचे नाव व प्रतिष्ठा–इभ्रत–तू चांगल्या प्रकारे संभाळशील. माझ्या टेबलाच्या खणात तिजोरीच्या किल्ल्या तुला सापडतील. " ते असे का बोलताहेत याचा मात्र आम्हाला उलगडा होईना. परंतु, आपल्या भावनांना वाट करून देत असतांना अडथळा होऊ देणेहि इष्ट नव्हते म्हणून आम्ही सर्वजण स्वस्थपणे ऐकत होतो.

"ते एकदम उठून उभे राहिले व आपल्या खोलीकडे निघाले. चार पावले चालले असतील नसतील, तो त्यांचे पाय त्यांच्याच पायात घुटमळू लागले; व तोल सावरून धरणे त्यांना अशक्य झाले. आम्ही त्यांच्या मदतीला धावलो तो ते कोसळलेच. त्यांना ग्लानी आली होती. त्यांना उचलून आम्ही अंथरुणावर निजवले. नि स्मेलिंग सॉल्टची बाटली स्वतःच्या बॅगेतून आणण्याकरिता माझा डॉक्टरभाऊ धावला. बाटली घेऊन तो वडिलांजवळ पोचण्यापूर्वीच वडिलांचेहि प्राणोत्क्रमण झाले होते. एका तासाच्या अल्पावधीत आम्ही सर्व मुले पोरकी झालो. आई नि वडील दोघेहि इहलोकची यात्रा संपवून आम्हांला सोडून गेली.

सर्व गावात ही बातमी विद्युल्लतेप्रमाणे पसरली. लोकांची झुंबड उडाली. जवळजवळ सर्व गाव आईवडिलांच्या अंतिम दर्शनाला लोटले होते. त्याकरिता त्यांचे मृतदेह दिवाणखान्यात ठेवले होते. दोघांनाहि एकदम मरण—सर्वांना चमत्कार वाटत होता. उभयतांवर पुष्प हारांचा अक्षरशः खच पडला होता. स्मशानातहि गावातील सर्वजण जमले होते. गावातील प्रतिष्ठित मंडळी सरकारी अंमलदार यांची वडिलांच्या गुणवर्णनपर भाषणेही स्मशानात झाली. प्रथितयश वकील म्हणून व समाजसुधारक म्हणून वडिलांचा अनेकांनी स्तुतिपर शब्दांत गौरव केला. माझ्या आईचाहि उल्लेख तिच्या सामाजिक कार्यांच्या अनुषंगाने करण्यात आला. कोर्टकचेरी व बाजार त्या दिवशी वडिलांच्या दुखवटयानिमित्त बंद ठेवण्यात आला होता.

सुतकातले दिवस जाता जाता फार कष्ट वाटले. आईवडिलांच्या गैरहजेरीत घरात राहणे महाकर्मकठीण वाटत होते. कारण, त्यांचे सान्निध्य पावलोपावली जाणवत होते, आठवणीवाचून एक क्षण जात नव्हता. त्या उभयतांच्या गैरहजेरीत सारे घर ओकेबोके वाटत होते नि खायला येत होते. कुणा परक्याच्या यजमानरहित घरात आम्ही राहात आहोत असे वाटत होते. माझे दिवस कसे गेले हे तर मला सांगताच येत नाही. सर्व घरभर भीषण शांतता पसरलेली होती. त्यातच प्रत्येकाच्या मनावर विमनस्कतेचे एवढे जाड पटल पसरले होते की जो तो जड अंतःकरणाने, व अवघडलेल्या पायाने मूकपणे इकडे तिकडे फिरत होता.

तेराव्या दिवशी हिंदुशास्त्राप्रमाणे श्राद्धविधी उरकल्यावर आम्हा सर्वांच्या समोर वडील बंधूंनी तिजोरी उघडली. वडिलांचे काही स्नेही व सरकारी अधिकारी सुद्धा आम्ही मुद्दाम बोलावले होते. मृत्युपत्र सर्वांसमोर वाचण्यात आले. त्यात कुठेहि नाव ठेवायला फट नव्हती. आम्हा तिघांमध्ये, जमीन, जुमला, स्थावर जंगम इस्टेट, पैसा—अडका दागदागिने यांची समान वाटणी केलेली होती. निरनिराळ्या संस्थांना देणग्या होत्या. तसेच नोकरांना बक्षिसे होती.

मी अविवाहित असल्याने रोख रकमेतून मोठा हिस्सा व ठेवीकर्ज रोख्यातून अडकवलेल्या पैशांचा माझ्याकडे मोठा वाटा आला होता. वडिलांनी नमूद केले होते की वडिल बंधूंच्या सल्ल्याने मी रोख रक्कम योग्य ठिकाणी गुंतवावी म्हणजे आयुष्यभर त्यावरील व्याजातून मला भरपूर पैसे पुरावेत. मला स्वतःला हे पसंत नव्हते व त्याप्रमाणे माझ्या वाटयातून बंधूंनी उचल करावी असे मी सुचविलेहि. मी अविवाहित राहायचे ठरविले आहे, मी माझ्या मिळकतीतून शिल्लकहि बरीच टाकली आहे; तेव्हा येवढया मोठया रकमांची मला गरजच नाही असे समजावून सांगण्याचा मी पुष्कळ प्रयत्न केला पण माझ्या दोन्ही बंधूंनी माझ्या वाटयातून कपर्दिकहि घेण्याला साफ नकार दिला. ते म्हणाले, वडिलांची शेवटची जशी इच्छा आहे तसेच वागायचे. त्यांच्या म्हणण्याला मान द्यायलाच हवा. शिवाय त्यानीच लिहून ठेवले आहे की मृत्युपत्रात दिलेल्या सूचनांची अक्षरशः अंमलबजावणी व्हावी. सुदैवाने आम्ही दोघेहि जीवनात सुस्थिर झालो आहोत. नि आमच्या वाटयास जे आले आहे ते अपेक्षेबाहेर जास्त असल्याने त्यावर आम्ही खूष आहोत. मृत्युपत्र वाचन संपले नि वडिलांच्या इच्छेप्रमाणे वाटण्या केल्या गेल्या.

आमच्या नावावर कागदपत्रे करणे व इतर कायदेशीर तंत्र पुरी व्हायला आठवडा लागला. आमचे घर, माझ्या वडील बंधूंच्या वाटयास आले होते त्याला कुलूप लागले. दोन नोकर घराची साफसुफी व देखरेख यासाठी ठेवले होते. बागेची निगा आमचा माळी पाहणार होता. वडिलांपासून जो आमची शेतीवाडी पाहात होता त्याच्याकडेच ती व्यवस्था ठेवण्यात आली. आमच्या गैरहजेरीत स्थावर मिळकतीवर देखरेख ठेवण्याचे आमच्या वडील बंधूंनी मान्य केले. नोकरीवर रुजू होण्याकरिता मी दिल्लीचे प्रस्थान ठेवले.

●●●

# ५

सहा महिने होऊन गेले. कालपुरुष आपले काम करीत होता. आई-वडिलांच्या आठवणी मंद मंद होत चालल्या होत्या. जीवनात काहीच रस वाटेनासा झाला होता. ज्यांना ना काही शेंडा ना बुडखा असे माझे कार्यक्रम चालू होते. दिवसानुदिवस मी एकाकी होत चाललो होतो. स्वतःला गुंतवून घेण्याच्या इराद्याने, भोवती, जी कामे लावून घेतली होती त्यातही माझे मन रमेनासे होऊ लागले होते. गुरुदेवांच्या शिकवणुकीने माझ्यात बदल होत होता. तरीही, निश्चितपणे काय घडत आहे हे माझे मलाच समजत नव्हते. मानसिक दृष्टचा मी दिवसानुदिवस जास्त तल्लख, जागरूक व दक्ष होत होतो. अंतर्यामीं नव्या घडामोडी होत होत्या. बाह्यात्कारी मात्र जीवन अत्यंत कंटाळवाणे व अहेतुक बनत होते. नोकरीत वरच्या जागेवर बढती मिळावी, किंवा पगारात वाढ व्हावी याबद्दल मी कमालीचा उदासीन होतो. ती ईर्षाच राहिलीही नव्हती. थोडक्यात म्हणजे माझे लौकिक जीवन व आंतर जीवन ही इतकी बदसूर झालेली होती की, मी अक्षरशः गोंधळून गेलो होतो. हे काय होत आहे ते नीटसे आकलन होत नव्हते. काहीतरी घडते आहे असे वाटत मात्र होते. माझी ही चाललेली कुतरओढ माझ्या दिल्लीतील स्नेह्यांच्याहि लक्षात आली असावी. पण त्यांनाहि त्यांची कारण-परंपरा सांगता येत नव्हती. तेव्हा थोडीशी अल्पमुदतीची मी रजा घेतली व माझ्या बंधुद्वयाकडे राहायला म्हणून मुंबईला आलो. माझ्या मनःस्थितीत झालेल्या चमत्कारिक बदलाचा त्यांनाहि उलगडा होत नव्हता. माझ्या आई-वडिलांचा मी सर्वात लहान मुलगा; तेव्हा जरासा लाडका, त्यामुळे त्या उभयतांच्या मृत्यूने मी मनाला फार लावून घेतले असावे, असा बंधुद्वयांचा समज झाला होता. त्यांचे म्हणणे पडले—याला उतार एकच व तो म्हणजे मी आता विवाह-

बद्ध होऊन, एकलेपणाचे जीवन संपवावे—त्याने जीवनात नवा रंग येईल, एकलकोंडेपणा नाहीसा होईल नि आई-वडिलांच्या आठवणीहि कमी होतील. मी त्यांना निक्षून सांगितले की 'लग्नाची गोष्टच विसरा; कारण अविवाहित राहण्याचा माझा निश्चय पक्का झाला आहे.' मी उलट त्यांना हेहि सुचविले की कदाचित आहे ती नोकरी सोडून मी जगप्रवासाला तरी जाईन किंवा एखाद्या सामाजिक कार्यात स्वतःला गुंतवून ठेवीन. मी असेही म्हणालो की उर्वरित आयुष्य गुरुदेवांच्या सान्निध्यात घालविता आले तर फारच उत्तम. तसे नाहीच घडले तर जनताजनार्दनाची सेवा हे माझे ध्येय राहील. माझ्या म्हणण्यातील तथ्य त्यांना समजत होते. परतु चालू घडी विस्कटून, काहीतरी आगंतुक चळवळीत पडल्याने माझा काही फायदा होणार आहे असे मात्र त्यांना वाटत नव्हते. सामाजिक कार्यकर्ता म्हणून मी कितपत यशस्वी होईन, किंवा देशभक्ताचे खडतर जीवन मला कितपत झेपेल याबद्दलही ते साशंक होते. आणि संशयाम्पद यशसिद्धी असलेल्या ध्येयासाठी एवढ्या सोन्यासारख्या उच्चपदस्थ मानाच्या सरकारी नौकरीवर पाणी सोडायचे ही कल्पना निवळ अव्यवहार्यच नव्हे तर त्यांना चमत्कारिक वाटत होती. गुरु-देवांबरोबर उर्वरित आयुष्य घालविणे तर त्यांना वेडेपणाचेच वाटत होते. ती कल्पनाच त्यांना इतकी बालिश, मूर्खपणाची व हास्यास्पद वाटत होती की त्याचा विचारहि ते करू इच्छीत नव्हते.

मी मात्र मनाशी ठरवून टाकले होते की सरकारी नोकरी लवकरात लवकर सोडायची. फक्त ती सोडण्यापूर्वी गुरुदेवांचा सल्ला घ्यायचा. मुंबईच्या वास्तव्यात मी माझी सर्व रोख मिळकत एकत्रित केली; व थोरल्या बंधूंच्या सल्ल्याने त्यातील बहुतांश रक्कम, खात्रीच्या व्याज देणाऱ्या ठेवीमध्ये अडकवून टाकली. उरलेली रक्कम, माझ्या बँकेत भरून टाकली माझ्या या व्यवस्थेबद्दल माझ्या दोन्ही बंधूंनी मला साथच दिली. मुंबईत आल्याने, थारेपालट म्हणून, चांगलाच फायदा झाला. आणि दिल्ली सोडली त्यावेळेपेक्षा दिल्लीत पुनः पाऊल ठेवल्या-

वर मला किती तरी बरे वाटते आहे असे आढळून आले. मला आता गुरुदेवांना भेटायची घाई झाली होती नि त्यांचा ठावठिकाणा शोधण्याची माझी जोरात खटपट चालू होती.

तो रविवार होता; तरीहि कुठेहि बाहेर न जाता घरीच स्वस्थ असायचे असे मी ठरविले होते. श्री गुप्ता त्यांच्या कुटुंबीयांसह माझ्याकडे जेवायलाच आले होते. त्यांच्या सहवासात तो दिवस चांगला गेला असताहि. तसे म्हटले तर गुप्ता–मंडळी हंसून खेळून मजेत वागणारी. पण, मी मात्र नाही म्हटले तरी जरा अलिप्त मनानेच वागत होतो. विनोदिनीने सारखे बोलत राहून माझा हा घुमेपणा घालविण्याचा पुष्कळच प्रयत्न केला. सौ. गुप्ताहि म्हणाल्या, " ते काही नाही माधव, उगाच फुकट दिवस घालवीत आहात झालं. लवकरच लग्न करून टाका." श्री. गुप्तांनीहि पत्नीच्या सूचनेला दुजोरा दिला, व म्हटले, " इतके सर्व काही व्यवस्थित असता, तुम्ही लग्न का नाही करीत हे मोठे कोडे आहे बुवा " मी त्यांना स्पष्टपणे सांगितले की, मी अविवाहित राहण्याचाचं केवळ निश्चय केला आहे असं नसून, सर्वसंगपरित्याग करण्याच्या विचारात मी सध्या आहे. उर्वरित आयुष्य अध्यात्मशास्त्र व तदनुषंगी तत्त्वज्ञानाच्या अभ्यासात व्यतीत करावेसे म्हणतोय मी. माझा हा मनोदय ऐकताच ते हादरलेच व म्हणाले, पण "हे सर्व का ?–कशासाठी ? याने काय साधणार आहे ? काय फायदा असे करण्यात ? हातचे सोडून पळत्याच्या पाठी मागे लागण्यासारखे आहे हे. तुमच्यापुढे केवढे उज्ज्वल भवितव्य आहे नि तुमचा मगदूर सुद्धा तुम्ही कोणी बडे असामी होण्याचा आहे. पण तुम्ही जाहीर केलेला मनोदय आकाशातला चंद्र मिळविण्यासारखा केवळ मूर्खपणाचा आहे. आहे त्यापेक्षा जास्त मिळविण्याच्या आशेने सर्वस्वावर पाणी सोडणारा जुगारी मी समजू शकतो. पण, ज्याच्यापासून काहीहि फायदा नाही अशाकरिता आपल्या सर्वस्वाचा होम करायचा; आपले उत्कृष्ट कर्तृत्व पणाला लावायचे हे अजब वाटते." मी फक्त हसलो नि म्हणालो, " गुप्तासाहेब, खरी गोष्ट ही

आहे की शाश्वत काय नि क्षणभंगुर काय, काल्पनिक काय याची तुम्हीच गल्लत करीत आहात. कारण त्याबद्दल तुम्ही संपूर्ण अज्ञानी आहात. तुम्ही ज्याला विश्वसनीय अगर भरीव यश म्हणता ना, ते मी पाहिले आहे. कारण ते, मी आतापर्यंतच्या जीवनात सर्व बाजूंनी मिळविले आहे. तुम्ही ज्याला यशस्वी-पराक्रमी-आयुष्यक्रम म्हणता ना, त्याची मला पुरेपूर ओळख झाली आहे, आता आयुष्याच्या दुसऱ्या बाजूकडे माझे लक्ष वेधले आहे. आतापर्यंत ज्याकरिता धडपडलो त्यापेक्षा ते वेगळे आहे, नि त्यातहि मी यशस्वी होईनच होईन अशी आशा करायला मी आतापर्यंत त्या दिशेने जी पावले टाकली आहेत त्यांचा विचार करता मला जागा आहे. श्री. गुप्ता म्हणाले, "काही तरी घाईगर्दीत कृति करून परिणामी पश्चात्तापाला कारणीभूत होऊ नये एवढेच मला वाटते. तुझ्या मनाचा कल तुलाच जास्त माहिती हे खरेच. पण, मला वाटते, जरा अधिक सखोल विचार करून माणसाने काय ते करावे." सौ. गुप्तांनी दुसरेच विषय काढले नि आम्ही मग त्यावर 'गप्पा मारीत बसलो. जेवणे उरकली नि गुप्तामंडळींनी राहायचे ठरवले होते तरी ती सगळीजणे लवकरच परत गेली.

माझ्या आईवडिलांना जाऊन, वर्षाहून जास्त दिवस झाले होते नि तेवढ्या अवधीत नमूद करण्यासारखे काहीहि घडले नव्हते. मला दिल्लीतील नोकरीच्या जीवनाचा उबग आला होता. परंतु, त्यातून बाहेर मात्र पडता येत नव्हते. काही ना काही म्हणून, ते कंटाळवाणे दिवस मी तसेच रेटीत होतो. गुरुदेवांचाहि काही ठावठिकाणा समजेना की त्यांच्याशी संपर्क साधता येईना.

एके दिवशी कचेरीत असताना तार आली की माझे वडील बंधू अत्यवस्थ असून मी तावडतोव मुंवईला जावे. रजा घेऊन मी मुंबई गाठली. घरी आलो तो बंधूंना टायफाईडचा ताप असून परिस्थिती काळजी करण्यासारखी होती. जास्तीत जास्त उत्तमोत्तम उपचार करूनहि म्हणण्यासारखा गुण आढळत नव्हता. सर्वांचेच चेहरे काळजी-

ग्रस्त झाले होते; व थोरल्या वहिनींचा धीर सुटत चालल्यासारखे स्पष्ट दिसत होते. हें संकट आम्हा सर्वांवर अनपेक्षितपणे कोसळले होते. आम्हा सर्वांच्या मनात काय चालले आहे हे आमच्या रुग्णाइत बंधूंनाहि समजत होते. त्याचीहि मरण्याची इच्छा नव्हती. पण पुढे कसले ताट वाढून ठेवले आहे याची मात्र त्याला कल्पना असावी. त्याने मला आपल्याजवळ अथरुणाशी बसवत म्हटले, "माधव, डॉक्टर काहीहि म्हणाले तरी माझी प्रकृती काळजी करण्यासारखी झाली आहे हे मी समजून आहे. ते सर्वजण मला वाचविण्याचा आटोकाट प्रयत्न करीत आहेत, हेहि मला समजते आहे; पण, ईश्वरेच्छा बलीयसी; तिथे पामराचे काय चालणार? अशा परिस्थितीत जर कुणी काही निश्चितपणे करू शकेल तर ते फक्त गुरुदेवच. ते इथे येऊ शकतील तरच माझे जीवित ते वाचवू शकतील याची मला तरी खात्री आहे. तू त्यांना बोलाव शकतोस का? जर शक्य असेल तर त्यांच्याशी संपर्क साधून त्यांना तू बोलवावेस. कारण वेळ मोठी कठीण आहे. प्रसंग मोठा बाका आलाय्" मी बंधूंना आश्वासन दिले की, गुरुदेवांचा ठावठिकाणा सापडला तर पाहातो. वहिनी तर साश्रु नयनांनी म्हणाल्या; "भावोजी, काय हो प्रसंग आला आहे! तुम्हीच यातून आम्हाला वाचवा." त्या क्षणी गुरुदेवांना कुठे शोधायचे हा तर माझ्यापुढे प्रश्नच होता. सारे वातावरण तर हृदय पिळवटून टाकणारे होते. मी कुणाशी काहीहि बोललो नाही. माझ्या खोलीत गेलो. कडी लावून स्वस्थपणे ध्यान लावून बसलो, माझ्या डोळ्यांतून अश्रुधारा ओघळत होत्या. मी आर्तपणे हाक मारून म्हटले, "गुरुदेव, जिथे कुठे असाल तिथून धावत या नि बंधूना वाचवा. आज त्याचा प्राण त्याला व सर्व कुटुंबाला फार मोलाचा आहे हो. तुम्ही, केवळ तुम्ही एकटेच, त्याचे प्राण वाचवू शकाल, इतरांचे ते काम नव्हे. तुमच्या मदतीशिवाय आम्ही असहाय्य आहोत. तुम्हीच नाही म्हटलेत तर आम्ही कुणाच्या तोंडाकडे पाहायचे बरे?" जवळ जवळ तासभर या अवस्थेत, ही प्रार्थना करीत, मी माझ्या खोलीत होतो. बंधूंची

प्राणज्योत तेवत ठेवण्याची आळवणी चालविली होती; नि काय आश्चर्य, माझ्या कानात गुरुदेवांची वाणी ऐकू आली. ते म्हणाले, "वत्सा, काही काळजी करू नकोस. थोड्याच वेळात मी येतो नि मग सर्व काही ठीक होईल." माझे मन शांत झाले. माझे मलाच समाधान वाटले मी दार उघडून बंधूंकडे गेलो नि सांगितले, "गुरु-देवांनी माझी हाक ऐकली नि ते थोड्याच वेळात इथे येतील. एवढेच नव्हे तर त्यांनी मला ग्वाही दिली आहे की प्रकृतीबद्दल काही काळजी करण्यासारखे नाही. तेव्हा चिंता नको." हे ऐकताच वहि-नींनी भक्तिभावाने हात जोडले; व एक नि:श्वास टाकला. ती म्हणाली, "माझी गुरुदेवांवर पूर्ण श्रद्धा आहे. आणि म्हटल्याप्रमाणे ते करतीलहि." माझे डॉक्टरबंधु यावर काहीच बोलले नाहीत. माझी त्यांची जेव्हा दिवाणखान्यात गाठ पडली तेव्हा ते मला म्हणाले,"माधव, विनायकाची प्रकृती फार फार गंभीर आहे रे! त्याच्या प्रकृतीत अधिकाधिक गुंतागुंत होत आहे; नि हृदय तर घटकेघटकेनी क्षीण होतेय. आम्ही डॉक्टरांनी तरी सर्व आशा सोडलीय. जास्तीत जास्त जे करण्यासारखे आहे ते सर्व आम्ही केले आहे, करतोहि आहोत. तेव्हा, तुझी तुलाच संपूर्ण खात्री असल्याशिवाय उगाच वहि-नींचा जीव आशेला लावू नकोस. खोट्या आशा दाखविण्यात काय फायदा आहे ?" मी म्हणालो, "तुझे वैद्यकीय मत व ज्ञान काहीहि असले तरी गुरुदेव काय करू शकतील हे तुला अजून अज्ञात आहे. कारण, त्यांना तू अजून ओळखलेले नाहीस. मी म्हटले ते बरोबर आहे आणि माझी खात्री आहे की विनायकदादांची प्रकृती आता सुधारू लागेल." त्यावर तो म्हणाला, "अरे माधव, तसा चमत्कार झाला तर मलाहि कितीतरी उपकार झाल्यासारखेच वाटेल आणि लक्षात ठेव, तसे झाले तर मीही गुरुदेवांचा जन्मभर ऋणी राहीन."

संध्याकाळी बंधूंची प्रकृती जास्तच बिघडली. डॉक्टरांची सभाच भरली होती त्याच्या अंथरुणाभोवती. त्यांनी धीर सोडला होता; व आता फक्त प्रश्न राहिला आहे 'तो वेळेचा' असेच त्यांचे सर्वांचे

मत दिसले. रोगी निश्चितपणे खचत होता. माझे कान मात्र गुरु-देवांचे परिचित पदरव ऐकण्याकडे लागले होते. काही वेगळे होण्याच्या आत ते यावेत म्हणून माझे अंतर्मन सतत प्रार्थना करीत होते.

इतक्यात नोकर येऊन सांगू लागला की बाहेर एक साधुपुरुष आला आहे; आणि त्यांना आत यावयाचे आहे. मला हे ऐकून केवढे हायसे वाटले ! मी धावतच बाहेर गेलो. गुरुदेव त्यांच्या नेहमीच्या स्मितवदनाने दारात उभे होते. मी त्यांच्या पायांवर मस्तक ठेवले; व त्यांनी मला वर उचलून धरले. मी त्यांच्या बाहूंत लहान मुला-सारखा हमसाहमशी रडत होतो. बाकीचेही लोक काय झाले हे पाहा-यला बाहेर आले. माझ्या डॉक्टर बंधूंनी गुरुदेवांच्या पायांना स्पर्श केला. तेव्हा वहिनीहि वाकली. गुरुदेव दिवाणखान्यात आले; व रोग्याच्या प्रकृतीची चौकशी करू लागले. सर्व डॉक्टरांना गुरुदेवांचे आगमन व त्याहीपेक्षा त्यांचे प्रश्न आवडल्यासारखे दिसले नाहीत. माझ्या डॉक्टरबंधूंनी जेव्हा त्याच्या सहकारी डॉक्टर्सना सांगितले की ते आमच्या कुटुंबाचे गुरुदेव आहेत, फार मोठे महंत आहेत, तेव्हा डॉक्टर वर्गाचे आश्चर्य ओसरले. डॉक्टरांचे मत ऐकायलाहि न थांबता गुरुदेव तडक विनायकदादाच्या खोलीत गेले. आम्ही सर्व त्यांच्या पाठो-पाठ गेलो. मोठ्या वहिनी गुरुदेवांना पाहताच साश्रुनयनांनी त्यांच्या पायावर जणू कोसळल्याच. "गुरुदेव आले आहेत." मी म्हणालो. विनायकदादाला मी काय बोललो ते समजले असे दिसले. त्याने डोळे उघडण्याचा प्रयत्न केला. पण अशक्तपणाने त्याला तेहि करता येईना. गुरुदेवांनी त्याच्या कपाळावर हात ठेवला व डोक्यावर हळुवारपणे थोपटीत ते म्हणाले, "विनायक, तू बरा झालास असे समज. कसलीही चिंता करायची नाही आता." गुरुदेव काय म्हणाले ते बंधूंना समजले असावे. कारण, त्यांच्या चेहऱ्यावर त्या स्थितीतहि हास्य उमटले. गुरुदेव रोग्याच्या आंथरुणावर थोडा वेळ बसून होते. काय होते आहे हे पाहायला साऱ्या डॉक्टरांचा घोळका जमला होता. दहा मिनिटे कोणी काही बोलत नव्हते. गुरुदेव उठून खोलीबाहेर आले. बंधूंनीं

गाढ झोप लागल्याप्रमाणे डोळे मिटले होते. गुरुदेव म्हणाले, " त्याला आपोआप जाग येईपर्यंत, कृपा करून, कोणीही उठवू नका. ते खोली-बाहेर पडून दिवाणखान्यात आले. सर्वजण त्यांच्या पाठोपाठ तिथे जमले. वहिनीने चिंतातुर स्वरात विचारले, " माधव, तुला काय वाटतं ?" तिच्या डोळ्यात आशा होती, पण चेहरा काळजीने काळ-वंडला होता. मी तिची खातरजमा केली की आता विनायकदादाच्या जीवाला धोका नाही. संकट टळले. मी म्हटले, " गुरुदेवांनी म्हटलेय ना, आता तो निश्चितपणे बरा होईल. दुखण्यात आजपासून हळूहळू उतार पडेल. मृत्यूवर मात करून तो बरा होईल." मी दिवाणखान्यात येऊन पोहोचलो तर गुरुदेवांनी तोंडाला दुधाचा कप लावला होता. आपल्याजवळ बसायला सांगून गुरुदेव मला म्हणाले, " माधव, अरे तू इतका का भयभीत झाला आहेस ? तुझी हाक ऐकताच मी धावत नाही का आलो ?" मी म्हटलं, " खरंच गुरुदेव, इतक्या थोड्या वेळात तुम्ही कसे आलात हो ? तुम्ही इथे केव्हा आलात ?" ते म्हणाले, " मी मुंबईतच होतो व तुझ्या बंधूना भेटण्याचा विचार चाललाच होता. तेवढ्यात तुझी हाक ऐकू आली. नि काय, झालेय तरी काय हे पाहायला धावतच आलो." गुरुदेवांच्या खुलाशावर माझा तरी विश्वास बसला नाही. मी एवढेच धरून चाललो, की ते आले कुठून हे गुरुदेवांना प्रगट करण्याची इच्छा नसावी. परंतु, हेहि खरेच होते की ते कुठेहि का असेनात, माझी हाक त्यांच्या कानी पडली नि अविलंबेकरून माझ्या बंधूंचा प्राण वाचवण्याकरिता ते धावत आले. डॉक्टरांपैकी एक म्हणाला " माफ करा गुरुदेव, विनायक वाचेल असं तुम्हांला खरंच का वाटतं ? त्याला बरं करण्याकरिता तुम्ही काही करू शकाल काय ? कारण, आम्ही आमच्याकडून प्रयत्नांची शिकस्त केली. पण, आम्हाला यश येईलसे मुळीच वाटत नाही," गुरुदेव हसले व म्हणाले, "विनायकच्या प्रकृतीला धोका नाही हे निश्चित आणि त्याच्या प्रकृतीवरून तुम्हाला ते आढळेलच. मात्र, आता त्याला विश्रांती घेऊ द्या. तो जागा होईपर्यंत कुणी त्याला

उठवू नका. जाग आल्यावर मग तुम्हांला वाटले तर त्याची प्रकृती पुनः तपासा " गुरुदेवांच्या बोलण्यात एकप्रकारची आत्मविश्वासाची धार होती. त्यामुळे, की काय, त्यांना आणखी प्रश्न विचारण्याच्या भानगडीत कुणी पडलेच नाही. ते म्हणाले, " माधव, तुझी खोली कुठाय ती दाखव; मी फार थकलोय. तेव्हा विश्रांती घेईन म्हणतो." मी ताडकन् उठलो त्यांना माझी खोली दाखविली. तिथे त्यांनी स्वच्छपणे हातपाय धुतले व माझ्याच बिछान्यावर ते लेटले.मी आणखी काही ' हवे नको ' विचारले तेव्हा " दमल्यामुळे एकांतच फक्त हवा " असे त्यानी सांगताच खोलीचे दार ओढून मी खाली दिवाणखान्यात आलो. मी बंधूंच्या खोलीत जाऊन पाहिले. त्यांना गाढ झोप लागली होती. माझी वाट पाहातच जणू सर्व डॉक्टर्स दिवाणखान्यात बसले होते. बोलण्याचा मुख्य विषय गुरुदेव हाच होता. डॉक्टरांपैकी एकाने विचारले, " माधव, आम्हांला गुरुदेवांबद्दल थोडी जास्त माहिती सांग ना. आमचा चमत्कारावर विश्वास नाही. आणि मृत्यूला आव्हान तर कोणीच देऊ शकत नाही. साधू, संन्यासी, नि फकीर यांच्याजवळ दैवी सामर्थ्य असते, नि त्यांच्या या सामर्थ्याचा उपयोग करून ते पुष्कळ अद्भुत चमत्कार करून दाखवितात. अशा गोष्टी पुष्कळ ऐकल्यात आजपर्यंत. पण प्रत्यक्ष पाहिलेले नाही. मृत्यूला जर कुणी खरोखरच थोपवू लागला तर जगात निसर्गाचे कामच स्थगित होऊन नुसता गोंधळ माजेल. अर्थात् विनायकच्या बाबतीत काय होते आहे ते दिसेलच. तुला खरंच का वाटतं की विनायकला मृत्यूच्या जवड्यातून ओढून आणण्याचा नि जीवदान देण्याचा चमत्कार तुझे गुरुदेव करू शकतील ?" मी म्हटले, " त्याचे असे आहे की ज्याबाबत ना मला समजते ना तुम्हांला, त्या बाबतीत वितंडवाद करण्यात काय अर्थ आहे ? माझी गुरुदेवांवर आत्यंतिक श्रद्धा आहे आणि ते जे ठरवतील वा म्हणतील ते तेच फक्त करू शकतील—घडवून आणू शकतील—या-बद्दल मला अणुमात्र शंका नाही. त्यांच्या आध्यात्मिक साधनेची झेप मला कधीच अजमावता आलेली नाही. त्यामुळे मला त्याबद्दल काहीच

सांगता येण्यासारखे नाही. विनायकच्या आयुष्याची दोरी आता तुटत नाही. तो खात्रीने सुधारणार ! खडखडीत बरा होणार !"

विनायकदादाला शांत झोप लागून दोन तास होऊन गेले होते. त्याच्या खोलीतून बोलावणे आले म्हणून मी गेलो. विनायकदादा सावकाशपणे डोळे उघडीत होता. त्याच्या तोंडावर हसू होते. त्याने जवळ बोलावले म्हणून त्याच्याशी जाऊन उभा राहिलो. क्षीण आवाजात तो म्हणत होता, " मी तुझा फार आभारी आहे. गुरुदेवांनी माझ्याकरिता काय केले आहे याची तुला कल्पना नसेल. माझा पुनर्जन्म घडवून आणलाय त्यांनी. शरीर सोडून पळत चाललेल्या प्राणाला थोपवलेय ! ते निवळ अतिमानव—महापुरुष—नव्हते तर वदनीय प्रत्यक्ष परमेश्वरस्वरूप आहेत. त्यांचे उपकार कोणत्या शब्दांनी मी व्यक्त करू ? माझ्याजवळ शब्दच नाहीत !" मी त्याला पुढे बोलू न देता म्हटले, " विनायकदादा, थांब आता. तू आधीच कमालीचा अशक्त झाला आहेस. त्यात बोलण्याचे श्रम नकोत. त्याने प्रकृती मात्र बिघडेल. गुरुदेवांनी स्वस्थ पडून जास्तीत जास्त विश्रांती घ्यायला सांगितलेय् नि त्यांची आज्ञा तुला पाळायलाच हवी." तो म्हणाला, " ठीक आहे. तुझी इच्छा. गुरुदेवांची आज्ञा मला शिरसावंद्य आहे." तेवढ्यात माझा डॉक्टर बंधू आपल्या सहकारी डॉक्टरांसह खोलीत आला, विनायकने डोळे उघडले असल्याचे पाहून सर्वांच्याच चेहऱ्यावर समाधान उमटले होते. त्यांनी त्याला विचारले, " कसं वाटतंय आता ?" विनायकदादा म्हणाला, " मला आता पुष्कळच बरं वाटतंय आणि संकट टळलंय असंही वाटतंय." त्यांनी त्याची नाडी व छाती तपासली. हृदय व नाडीच्या ठोक्यात पडलेला अनुकूल फरक पाहून त्यांना आश्चर्यच वाटले. त्याला विश्रांती घेण्याचे सुचवून आम्ही सर्व त्याच्या खोलीतून हॉलमध्ये आलो. मी माझ्या डॉक्टर बंधूंना विचारले, "काय वाटते विनायकच्या प्रकृतीबद्दल आता ?" " वाः प्रकृतीत बदल आहे, नि तोही चांगल्याकडेच झुकणारा. पण, —तो चाचरला. " ही प्रगती टिकेल की नाही याबद्दल आम्ही साशंक

आहोत. अशीच प्रगती राहिली तर मात्र एक दोन दिवसांत रोगी सुधारेल." त्याचे डॉक्टर मित्र म्हणाले–"आणि झाली आहे ती सुधारणाहि काही कमी नाही. एवढा अनुकूल पालट हाहि एक चमत्कारच आहे. कदाचित् गुरुदेवांच्या आगमनाने रोग्याच्या मनावर झालेला तो परिणाम असेल." आणखी एक डॉक्टर म्हणाले, "पण, मनावर होणारे हे असले परिणाम फार वेळ टिकत नाहीत. अल्पजीवी असतात. आणि निव्वळ मानसिक परिणामाने थंडावणारे हृदय पूर्ववत चालू शकेल किंवा बेशुद्धावस्थेतील रोगी नीट शुद्धीवर येऊन बोलू शकेल असे वाटत नाही." मी त्यांना एवढेच सुनावले की तुमची वैद्यकीय मते काहीहि असोत, रोग्याच्या स्थितीत जो इष्ट दिसणारा बदल झाला आहे तो केवळ गुरुदेवांच्या कृपेनेच होय; आणि त्यांनी अगोदरच सांगितल्याप्रमाणे विनायकदादाची प्रकृती संपूर्णतया बरी होऊन तो खडखडीत बरा होईल हेहि तुम्ही पाहालच. दुसऱ्या दिवशी सकाळी रोग्याची प्रकृती तपासायला येऊ असे सांगून सर्व डॉक्टर बाहेर गेले. आहे तीच औषधयोजना पुढे चालू ठेवायला त्यांनी माझ्या डॉक्टर बंधूंना जाण्यापूर्वी बजावले. जेवण तयार होते म्हणून गुरुदेवांना बोलावण्याकरिता मी माझ्या खोलीत गेलो. तेव्हा गुरुदेवांना गाढ झोप लागली होती. मी खुर्चीवर टेकलो. आमच्या कुटुंबाकरिता गुरुदेवांनी जे काही केले त्याबद्दल माझ्या मनात विचार चालू होते. त्यांच्या उपकाराची फेड कशाने तरी होण्यासारखी आहे का? त्यांच्या कृपेच्या संदर्भात आम्ही त्यांच्याकरिता काय केले आहे? काहीच नाही; अन् त्यांना तरी कुठे कशाची अपेक्षा आहे! होय असेल तसं; पण आम्ही त्यांची साधी सेवाहि केलेली नाही कसल्याहि प्रकारची. असं असूनहि ते आमच्याकरिता एवढे कष्ट का घेतात कळत नाही–मोठाच प्रश्न आहे हा; नाही का? मी या विचारात गढलो असता, गुरुदेवांनी डोळे उघडले व ते म्हणाले, "माधव, अरे नुसता विचार करून गोष्टी समजत नसतात." मी ताड्कन उठलो नि त्यांच्या पायावर मस्तक ठेवून म्हणालो, "गुरुदेव,

तुम्ही एवढे कृपाळू आहात; आमच्याकरिता तुम्ही इतके केले आहेत की मला तुमच्याबद्दल काय वाटते. किंवा तुमच्या उपकारांबद्दल मला वाटणारी कृतज्ञता कोणत्याही शब्दात प्रगटच करता येत नाही. तुम्हांला समजावून घेण्याचा मी आटोकाट प्रयत्न केला. पण, माझी बुद्धी त्याबाबत निष्प्रभ ठरते. लंगडी पडते. याबाबत मी जेवढा जास्त विचार करतो तेवढे ते कोडे आणखीच अगम्य होत जाते. माझा सारा जीवनोघच तुम्ही बदलून टाकला आहात. याचा शेवट कुठे नि कशात व्हायचा आहे मला तरी कळत नाही. मी फक्त एकच जाणतो, की माझे जीवित, कसे का घडायचे असेना, ते तुमच्या हाती सुरक्षित आहे नि हेच केवढे तरी मोठे समाधान आहे. मला परिणामाची क्षिती नाही. मी त्यांची पर्वाहि करीत नाही. मनाची एकच आस आहे की हे शरीर तुमच्या सेवेशीं लागावे. पण ते व्हावे कसे या विचाराने मन तडफडतेय्; आणि येवढे करूनहि मी तुम्ही केलेल्या उपकारांचा अल्पांशाने तरी उतराई होईन की नाही याबद्दल मन साशंक आहे."
गुरुदेवांनी प्रेमभराने माझ्या डोक्यावर थोपटले व ते म्हणाले, "माधव, तू अजूनहि लहान बालक आहेस. तुला अजूनहि किती तरी गोष्टी शिकायच्या आहेत. जसजशी तुझी या मार्गात प्रगती होईल तसतसा उमज आपोआप पडेल! मी खरोखरच तुझ्याखातर वेगळे असे काहीच केलेले नाही. तेव्हा, उपकाराने भारावून जाण्याचे व तसला विचार करण्याचे काहीच कारण नाही. अजून आपणा दोघांना बरेच अंतर काटायचे आहे; आणि तुला एकदा मी सांगितले आहे ना, भूत आणि भविष्यकाळाबद्दल तूं यत्किंचितहि चिंता करण्याचे कारण नाही. वर्तमानकालाचा, चालू क्षणाचा, जास्तीत जास्त चांगला उपयोग करून घेण्याचे काम तुझे, आणि त्याही दृष्टीने तुला सांगतो, तुझी प्रगती छानच आहे." ते आंथरुणावरून उठले व आम्ही जेवणघरात आलो. जेवणे झाल्यावर आम्ही विनायकदादाच्या खोलीत गेलो; व रोग्याच्या प्रकृतीत इष्ट तो फरक पडत आहे हे पाहून गुरुदेवांनी समाधान व्यक्त केले. विनायकने डोळे उघडले व गुरुदेवांना 'दोन्ही

कर जोडून ' अभिवादन केले. गुरुदेव म्हणाले, " विनायक तुला आता कसलीहि काळजी नको. संकट टळलेय्, फक्त तू विश्रांती घे. उद्या सकाळी आपण पुनः भेटूच."

गुरुदेवांकरिता खोली तयार करण्यात आली; नि त्यांना घेऊन मी त्यांच्या खोलीत गेलो. विनायकदादाची प्रकृती सुधारत आहे हें पाहून मलाहि बरे वाटले. त्या दिवशीं आम्ही सर्वजण जरा लवकरच झोपलो. शांत झोप लागली त्या रात्री, व दुसऱ्या दिवशी उठलो तेव्हा चांगले ताजेतवाने वाटत होते. मी गुरुदेवांच्या खोलीत जाऊन ते झोपले आहेत की काय हे पाहायला गेलो. तो खोली रिकामीच होती. चौकशी करता कळले की मोठ्या पहाटेच गुरुदेवांनी स्नान उरकले, व ते बाहेर गेले आहेत. वहिनीने सांगितले की ती जागी होती. तिने सकाळचे दूध गुरुदेवांना दिले व कुणालासे भेटायला गुरुदेव बाहेर गेले आहेत. तिने हेहि सांगितले, त्यांच्या दिमतीला तिने आपली मोटारहि दिली आहे. १० वाजेपर्यंत परत यायचे गुरुदेवांनी कबूल केले आहे. " मला का उठवले नाहीस " असे मी विचारले तेव्हा वहिनी म्हणालीं, " गुरुदेवच म्हणाले, ' नको.' झोपू द्या त्याला."

सकाळचे ९ वाजले. बंधूची प्रकृती तपासायला डॉक्टरांचे त्रिकूट आले. प्रकृतीत झपाट्याने सुधारणा होत असलेली पाहून त्यांनाहि आश्चर्य वाटले. आता संकट तर टळले होतेच. पण प्रकृतीहि झपाट्याने सुधारत होती, असे त्यांचेहि मत पडले. ते म्हणालेहि, " विनायक, तुझ्या प्रकृतीत एकदम आराम पडला याबद्दल तुझे अभिनंदन. जी सुधारणा झाली ती आमच्या औषधयोजनेने झालेली नाही हे आम्ही एकमुखाने कबूल करतो. ही सर्व गुरुदेवांच्या कृपेची देणगी आहे. आम्ही तर खरोखरच चक्रावून गेलो आहोत." विनायकला बोलता येण्याइतकी आता शक्ती आली होती. तो म्हणाला, " केवळ गुरुदेवांमुळे मी वाचलो." घरात आनंदीआनंद पसरला होता. मोठ्या वहिनींना तर भावनावेग आवरत नव्हता. " प्रकृतीची काळजी घेऊन प्रकृतीत दिसणारा फरक कायम टिकवा. नि छान बरे व्हा " असे

रोग्याला सांगून डॉक्टर खोलीबाहेर पडले. दिवाणखान्यात जमलेल्या सर्वांना चहा दिला. तोच गरुदेवांनीहि दिवाणखान्यात प्रवेश केला. सर्वजण अत्यादराने उठून उभे राहिले. गुरुदेवांचा नेहमीसारखा हसतमुख चेहरा होता. ते एका खुर्चीवर येऊन बसले. व त्यांनी सर्व डॉक्टर्सना विचारले की रोग्याची तपासणी झाली का ? सर्व डॉक्टरांच्या माना खाली झुकल्या; व ते म्हणाले, "गुरुदेव ही सर्व आपली लीला होय. आम्ही आमचा पराजय मान्य करतो. खरोखरच हा एक आध्यात्मिक चमत्कार म्हणावा लागेल. इतके दिवस मनुष्य कोणकोणत्या शक्ती आत्मसात करू शकेल याबद्दल नुसते ऐकत होतो. आज आम्ही प्रत्यक्ष पाहिले. आम्ही आमच्या वैद्यकीय ज्ञानाबद्दल निःशंक होतो. आणि आम्ही खात्रीपूर्वक या निर्णयाप्रत आलो होतो की विनायकाला कोणतीही शक्ती आता वाचवू शकत नाही. त्याची प्रकृती सुधारण्यापलीकडे–हाताबाहेर–गेली आहे. आता आमचा भ्रमनिरास झाला आहे. आम्हाला अज्ञात, कदाचित रूढ विज्ञानालाहि अगम्य अशी शक्ती जगात आहे की जी मृत्यूच्या दाढेतूनहि ओढून मानवाला आयुष्य-प्रदान करू शकते. तो निवळ चमत्कार नाही. पण जे घडले ते कसे हे बुद्धीच्या आवाक्याबाहेरचे एक सत्य मात्र आहे खास !"

गुरुदेव म्हणाले, "यात काहीही अलौकिक नाही, अगम्य नाही की अशास्त्रीय नाही. आपण ज्या समाजात वावरतो, ज्या तऱ्हेचे शिक्षण आपण घेतलेले असते, ज्या स्थितीत व भोवतालच्या वातावरणात आपण वाढतो त्यातून एकप्रकारचा अहंभाव उत्पन्न होत असतो की, मी मोठा विद्वान–चतुर, ज्ञानी बुद्धीच्या जोरावर मी काहीहि समजू शकतो, जाणू शकतो, कसल्याहि विषयात अवगाहन करू शकतो, वाटेल ते आकलन करू शकतो. कुठलीहि गोष्ट, घटना किंवा अपूर्व देखावा आपल्यासमोर आला आणि त्याबद्दल आपणाला काही समजू शकले नाही, किंवा बुद्धीने त्याचा अन्वय लावता आला नाही की त्याला चमत्कार, आध्यात्मिक गूढ, अतिमानवी शक्ती वगैरे नामाभिधान देण्याची सर्वसामान्य प्रथाच आहे. दुसऱ्या शब्दात म्हणायचे

तर आपले त्याबद्दलचे अज्ञान झाकण्याकरिता या शब्दाचा अवलंब केलेला असतो. शिक्षण काय, किंवा विज्ञान काय, आपण एका विशिष्ट पठडीतून किंवा चाकोरीतूनच घेत असतो. जसजशी प्रगती होते तसतसे आपण त्याला नवीन संशोधन, नवा शोध असे नाव देऊन काहीतरी नवे शोधून काढल्याचा दावा सांगू लागतो. ज्याचा अजून शोध लागलेला नाही. जे अजून अज्ञातच राहिले आहे ते समजावून घेण्याचा आपण प्रयत्नच करीत नाही. कारण, ती वाट तितकीशी वहिवाटीची मळलेली नसते. धोपट-मार्ग सोडून जो ह्या नव्या प्रांतात डोकावतो त्याला अतिमानुष किंवा ईश्वरी म्हणून त्याच्या कृतींना अलौकिक अद्‌भुत या सदरांत ढकलावयाचे एवढेच आपल्याला ठाऊक असते. यापलिकडे जाऊन कोणी शोध करू इच्छित नाही, खोलात शिरू इच्छित नाही. पण तेच एखाद्याने करायचे ठरवले, नि या अद्‌भुततेच्या मुळाशी जाण्याचा, ते काय आहे ते तपासण्याचा, निश्चय करून, गूढ रहस्य उकलण्याचा प्रयत्न एखाद्याने केला, –अर्थात त्याला अतिशय, चिकाटी दीर्घोद्योग, व मेहनत हवीच– तर आढळून येईल की हेहि एक स्वतंत्र शास्त्र आहे. आणि त्यांची फलिते–निर्णय किंवा सिद्धांतहि तुमच्या भौतिक शास्त्रातील शोधाप्रमाणेच शास्त्रशुद्ध आहेत. त्या शोधांचा उपयोग दैनंदिन जीवनात केला जात नसेल, नि त्याला तशी कारणेहि आहेत. हजारो वर्षे खर्च करून शेकडो बुद्धिमंतांनी या मार्गात जे ज्ञान मिळवले आहे त्याचे, आपल्या हाताशी सध्या असलेल्या थोडया अवधीत, काहीच विवरण करता येणार नाही; नि केले तरी तुम्हाला ते सहजी समजणार नाही. कारण, हे शास्त्रच असे आहे की त्याचा गंभीरपणे व सतत निदिध्यासाने अभ्यास केला तरच त्याचा एकाद दुसरा कण हाती लागायचा ! दीर्घकालीन तपश्चर्या आहे–ती विद्या आत्मसात करायची तर ! अपरंपार कष्ट आहेत त्यात आणि तेहि किती ?–वर्षानुवर्षाचे. कदाचित् सारी हयातहि खर्ची घालायला लागायची ! !"

यावर एक डॉक्टर म्हणाले, "गुरुदेव, तुमचा मुंबईत मुक्काम

किती दिवसांचा आहे ? तुमचे या विषयावर एखादे व्याख्यान ठेवले तर ?" गुरुदेवांनी यावर फक्त स्मित केले. ते म्हणाले, " मी लवकरच मुंबई सोडून जाणार आहे. तेव्हा, तुमची इच्छा असेल तर पुढील खेपेला जेव्हा मी मुंबईला येईन तेव्हा या विषयावर मी तुम्हांला आणखी माहिती देईन. " त्याच दुपारी गुरुदेवांनी बंधूंना सुचविले की सायंकाळी ते मुंबई सोडून जाणार आहेत. माझ्या बंधूंनी विनंती केली काही थोडे दिवस आणखी गुरुदेवांनी राहावे. वहिनींनी तर गुरुदेवांना गळच घातली की " यांना बरे वाटेपर्यंत तरी राहा. " गुरुदेव म्हणाले, " हे बघ विनायक. संपूर्ण बरे वाटायला अजून थोडे दिवस लागतील " विनायकदादाने मान तुकावली; व आग्रह केला नाही. गुरुदेवांनी लागलीच आजाऱ्याची खोली सोडली. मीही त्यांचे पाठोपाठ बाहेर पडलो. खोलीत शिरताच त्यानी दाराला कडी घातली व ते खुर्चीवर बसले. मी त्यांच्या पायाशी बसलो. गुरुदेव म्हणाले, " माधव मी काय सांगतो ते नीट ऐक. " ते काय सांगतात याबद्दल मला कुतूहल होते म्हणून त्यांच्या तोंडून पडणाऱ्या शब्दांची मी अवधानपूर्वक वाट पाहात होतो.

गुरुदेव म्हणाले, " तुझी प्रगती पाहून मी फार खूष झालो आहे. परंतु एवढ्यावर संपलेले नाही. अजून फार मोठा पल्ला गाठायचा आहे. तेव्हा आता जरा वेग वाढवावयाला हवा. मी सांगितलेले आसनादि प्रयोग नि उपासना तू छान केली आहेस. अंतर्मनाचे अवलोकन कसे करायचे तेहि तुला साधले आहे. परंतु, या दोघांमध्ये जो समन्वय साधायला हवा तो आलेला नाही. त्यामुळे अनुभव व त्यातून ज्ञान पैदा करण्याची प्रक्रिया अजून साधायची आहे. मी जे सांगितले ते नि तसे तू यथास्थित केलेस, पाळलेस. परंतु तू जे केलेस त्याबाबत निरीक्षण करून तू जे काय करीत आहेस. व तुला जो अनुभव येत आहे. त्याचा परस्पर संबध काय हे तू अजूनहि पडताळून पाहिलेले नाहीस. नुसते सांगितले तसे करण्यात ही चूक होत आहे. आणि ते न्यून घालविणे जरूर आहे. नि त्याचाच मी सदैव निषेध करीत आलो आहे. "

गुरुदेवांची नि माझी यापूर्वी जी भेट झाली त्यावेळेपासून या क्षणापर्यंत मला आलेले अनुभव मी त्यांना निवेदन केले. ते म्हणाले, " ठीक आहे. मला आनंद आहे तो ह्यात की, तू योग्य मार्गावर आहेस. परंतु, हे जे तुझे अनुभव आहेत ते या मार्गात असणाऱ्यांच्या दृष्टीने इतके प्राथमिक नि मामुली अनुभव आहेत की, त्यामुळे तू स्वतःची फसवणूक करून घेऊ नकोस. या अनुभवांकडे फक्त एवढ्या एकाच दृष्टीने पाहायचे की आपली साधना बरोबर, योग्य मार्गाने चालली आहे की नाही याचे ते निकष आहेत. त्यामुळे साधनेत शैथिल्य येता कामा नये. जीवनात ही वेळ अत्यंत आणीबाणीची आहे, नि तुला सावधपणे राहायला हवे. माझी खात्री आहे की तू आपल्या प्रयत्नांत हमखास यशस्वी होशील आणि मीही माझ्याकडून कोशीश करून राहिलो आहे की तुझ्याबद्दल मी बाळगलेल्या अपेक्षांना तू तंतोतंत उतरशील." मी त्यांच्यापुढे नतमस्तक झालो आणि त्यांनी आपले दोन्ही हात माझ्या मस्तकावर ठेवले. मी माझे डोळे मिटले. कसलीतरी सुखसंवेदना होत होती. एक तऱ्हेचा प्रवाहच माझ्या शरीरातून वाहात आहेसा वाटला. तो अनुभव अत्यंत सुखाचा वाटला. तशा स्थितीत थोडाच वेळ मी होतो. मी जेव्हा डोळे उघडले तेव्हा गुरुदेव खुर्चीत तसेच बसलेले आढळले. माझे मस्तक त्यांच्या पायावर होते. गुरुदेव म्हणाले, " माधव, तू तुझ्या सध्यांच्या जीवनक्रमाबद्दल किंवा नोकरीपेशाबद्दल यत्किंचित्हि चिंता करू नकोस. त्यात आपोआप, अगदी नैसर्गिक रीत्या, बदल घडून येईल." नंतर आम्ही दोघेहि जेवणघरात आलो. घरातील सर्वजण गुरुदेवांना त्यांच्या गमनापूर्वी अभिवादन करायला जमली होती. ते माझ्या बंधूंच्या खोलीत गेले. त्याला आशीर्वाद दिला नि सर्वांचा निरोप घेऊन ते बाहेर पडले. मी त्यांना पोचवायला स्टेशनवर गेलो होतो व त्यांनी सांगितल्याप्रमाणे मी त्यांचे मद्रासचे तिकीट काढून त्यांना दिले.

माझ्या बंधूंच्या प्रकृतीत झपाटयाने सुधारणा होत होती. आठवडाभरात मी पुनः दिल्लीला आलो. अर्थात मुंबई सोडण्यापूर्वी घरातील

किती दिवसांचा आहे ? तुमचे या विषयावर एखादे व्याख्यान ठेवले तर ?" गुरुदेवांनी यावर फक्त स्मित केले. ते म्हणाले, " मी लवकरच मुंबई सोडून जाणार आहे. तेव्हा, तुमची इच्छा असेल तर पुढील खेपेला जेव्हा मी मुंबईला येईन तेव्हा या विषयावर मी तुम्हांला आणखी माहिती देईन. " त्याच दुपारी गुरुदेवांनी वंधूंना सुचविले की सायंकाळी ते मुंबई सोडून जाणार आहेत. माझ्या वंधूंनी विनंती केली काही थोडे दिवस आणखी गुरुदेवांनी राहावे. वहिनींनी तर गुरुदेवांना गळच घातली की " यांना बरे वाटेपर्यंत तरी राहा. " गुरुदेव म्हणाले, " हे बघ विनायक. संपूर्ण बरे वाटायला अजून थोडे दिवस लागतील " विनायकदादाने मान तुकावली; व आग्रह केला नाही. गुरुदेवांनी लागलीच आजाऱ्याची खोली सोडली. मीही त्यांचे पाठोपाठ बाहेर पडलो. खोलीत शिरताच त्यानी दाराला कडी घातली व ते खुर्चीवर बसले. मी त्यांच्या पायाशी बसलो. गुरुदेव म्हणाले, " माधव मी काय सांगतो ते नीट ऐक. " ते काय सांगतात यावद्दल मला कुतूहल होते म्हणून त्यांच्या तोंडून पडणाऱ्या शब्दांची मी अवधानपूर्वक वाट पाहात होतो.

गुरुदेव म्हणाले, " तुझी प्रगती पाहून मी फार खूष झालो आहे. परंतु एवढयावर संपलेले नाही. अजून फार मोठा पल्ला गाठायचा आहे. तेव्हा आता जरा वेग वाढवावयाला हवा. मी सांगितलेले आसनादि प्रयोग नि उपासना तू छान केली आहेस. अंतर्मनाचे अवलोकन कसे करायचे तेहि तुला साधले आहे. परंतु, या दोघांमध्ये जो समन्वय साधायला हवा तो आलेला नाही. त्यामुळे अनुभव व त्यातून ज्ञान पैदा करण्याची प्रक्रिया अजून साधायची आहे. मी जे सांगितले ते नि तसे तू यथास्थित केलेस, पाळलेस. परंतु तू जे केलेस त्याबाबत निरीक्षण करून तू जे काय करीत आहेस. व तुला जो अनुभव येत आहे. त्याचा परस्पर संबध काय हे तू अजूनहि पडताळून पाहिलेले नाहीस. नुसते सांगितले तसे करण्यात ही चूक होत आहे. आणि ते न्यून घालविणे जरूर आहे. नि त्याचाच मी सदैव निषेध करीत आलो आहे. "

गुरुदेवांची नि माझी यापूर्वी जी भेट झाली त्यावेळेपासून या क्षणापर्यंत मला आलेले अनुभव मी त्यांना निवेदन केले. ते म्हणाले, "ठीक आहे. मला आनंद आहे तो ह्यात की, तू योग्य मार्गात आहेस. परंतु, हे जे तुझे अनुभव आहेत ते या मार्गात असणाऱ्यांच्या दृष्टीने इतके प्राथमिक नि मामुली अनुभव आहेत की, त्यामुळे तू स्वतःची फसवणूक करून घेऊ नकोस. या अनुभवांकडे फक्त एवढ्या एकाच दृष्टीने पाहायचे की आपली साधना बरोबर, योग्य मार्गाने चालली आहे की नाही याचे ते निकष आहेत. त्यामुळे साधनेत शैथिल्य येता कामा नये. जीवनात ही वेळ अत्यंत आणीबाणीची आहे; नि तुला सावधपणे राहायला हवे. माझी खात्री आहे की तू आपल्या प्रयत्नांत हमखास यशस्वी होशील आणि मीही माझ्याकडून कोशीश करून राहिलो आहे की तुझ्याबद्दल मी बाळगलेल्या अपेक्षांना तू तंतोतंत उतरशील." मी त्यांच्यापुढे नतमस्तक झालो आणि त्यांनी आपले दोन्ही हात माझ्या मस्तकावर ठेवले. मी माझे डोळे मिटले. कसलीतरी सुखसंवेदना होत होती. एक तऱ्हेचा प्रवाहच माझ्या शरीरातून वाहात आहेसा वाटला. तो अनुभव अत्यंत सुखाचा वाटला. तशा स्थितीत थोडाच वेळ मी होतो. मी जेव्हा डोळे उघडले तेव्हा गुरुदेव खुर्चीत तसेच बसलेले आढळले. माझे मस्तक त्यांच्या पायावर होते. गुरुदेव म्हणाले, " माधव, तू तुझ्या सध्यांच्या जीवनक्रमाबद्दल किंवा नोकरीपेशाबद्दल यत्किंचित्हि चिंता करू नकोस. त्यात आपोआप, अगदी नैसर्गिक रीत्या, बदल घडून येईल." नंतर आम्ही दोघेहि जेवणघरात आलो. घरातील सर्वजण गुरुदेवांना त्यांच्या गमनापूर्वी अभिवादन करायला जमली होती. ते माझ्या बंधूंच्या खोलीत गेले. त्याला आशीर्वाद दिला नि सर्वांचा निरोप घेऊन ते बाहेर पडले. मी त्यांना पोचवायला स्टेशनवर गेलो होतो व त्यांनी सांगितल्याप्रमाणे मी त्यांचे मद्रासचे तिकीट काढून त्यांना दिले.

माझ्या बंधूंच्या प्रकृतीत झपाट्याने सुधारणा होत होती. आठवडाभरात मी पुनः दिल्लीला आलो. अर्थात मुंबई सोडण्यापूर्वी घरातील

सर्वांना मी जाणीव दिली होती की, सरकारी नोकरी सोडून मी माझे उर्वरित आयुष्य शाश्वत सुख व सत्याचा शोध घेण्यात घालवावयाचे ठरवले आहे. मला वैवाहिक जीवनाची ओढ नाही; ना अशी मला ईर्षा उरली आहे कीं नोकरीत पगारवाढ किंवा अधिकारपदात बढती मिळावी. सरकारी नोकरी करीत राहण्यात आतां काही जीवच उरलेला नाही. शिवाय, अविवाहित राहून जन्मभर पुरेल इतकी तरतूद माझी अगोदरच झालेली आहे. या विचाराच्या अनुरोधाने प्रत्यक्ष पाऊल उचलण्यापूर्वी त्यांना मी आगाऊ कळविण्याचे अर्थातच आश्वासन दिले होते.

● ●

## ६

दिवस जात होते. मुंबई सोडून जवळ जवळ वर्ष होऊन गेले होते. माझी प्रकृती छान होती; नि माझे चालले होतेहि सर्व काही छान. मी माझ्या मार्गात मोठ्या उत्साहाने व जोमाने प्रगती करीत होतो. जीवनहेतु स्वतःहूनच माझ्यापुढे उकलत होता. एकएक गोष्ट अशा तऱ्हेने स्पष्ट होत जात होती की जीवनातील सत्ये, त्यांच्या निरनिराळ्या पैलूंसह, उलगडत होती. एकाकी जीवन व्यतीत करताना मला एकप्रकारचे सुख वाटू लागले होते. सामाजिक चळवळींचा रंग माझ्यापुरता तरी उडून गेला होता, मला त्याबद्दल काहीच आकर्षण राहिले नव्हते. त्याचे वैय्यर्थ मला दिवसानुदिवस जास्तच उमगू लागले होते. जीवनाकडे पाहण्याच्या माझ्या दृष्टिकोनात होत असणारा बदल माझ्या मित्रांच्याहि लक्षात येऊ लागला होता; आणि त्याबद्दल त्यांनी अनेक वेळा आश्चर्यहि प्रदर्शित केले. पण, मी यत्किंचित्हि विचलित झालो नव्हतो—होत नव्हतो.

सकाळचे वर्तमानपत्र वाचून संपल्यावर चहा घेण्याच्या तयारीत

मी होतो इतक्यात लक्षात आले की विनोदिनी बंगल्याचे फाटक उघडून आत प्रवेश करीत आहे. तिची प्रकृती—'टंच' दिसत होती; नि एकंदर नूरहि चांगला होता. टेनिस खेळून घरी जाता जाता ती मध्येच थांबली होती. मी तिला खुर्ची दिली व नोकराला तिच्याकरिता चहा आणायला फर्माविले. तिच्या चेहऱ्यावरून दिसत होते की काहीतरी गंमतीदार हकीगत सांगायला ती मुद्दाम आलेली आहे. ती म्हणाली, "माधव, कारण काहीहि असेल, पण अलीकडे तू आम्हांला टाळीत असतोस. याबद्दल आमचे सर्वांचे एकमत झाले आहे. असे करण्याचे कारण तरी काय हे निदान मलातरी सांगशील का ? आमच्यापेक्षा, इतर कुठे मन रमण्यासारखी मित्रमंडळी तुला मिळाली आहेत असे मलातरी वाटत नाही. ऑफिसात काम फार असते म्हणून तुला आमच्याकडे यायलासुद्धा वेळ मिळत नाही, असे कारण सांगशील तर तेहि पटण्यासारखे नाही. तेव्हा, आज मी ठरवूनच आल्ये आहे की राजश्री आम्हाला का टाळतात याची एकदा शहानिशा करूनच मग घरी परतायचे. माझ्या मातापित्यांचे म्हणणे आहे की, तुझ्या या रुसव्याला मी कारण आहे. तूं अलीकडे क्लबवर खेळायलाहि येत नाहीस; त्यामुळे तुझ्या खेळकर सहवासाच्या अभावी सर्वांना कसे चुकल्याचुकल्यासारखे वाटतेय."

मी यावर मोठ्याने हसलो; नि म्हटले, "कुमारी गुप्तादेवी, तुम्ही एकेवेळी इतके प्रश्न एकदम विचारले आहेत की त्या सर्वांची एकदम उत्तरे देणे मला तरी कठीण झाले आहे. विश्वास ठेव अगर नको ठेवू. पण पहाटे ४ वाजल्यापासून रात्री १० पर्यंत मी कामात इतका गुंतलेला असतो सध्या की, बंगल्याबाहेर पाऊलसुद्धा टाकायला मला फुरसद मिळत नाही. रात्री १० नतर मग मी दमून झोपतो. क्लबवर जायला किंवा मित्रमंडळींना भेटायला मला मोकळा वेळच उरत नाही बघ."

विनोदिनी म्हणाली, "माधव खरं सांग. ऑफिस सुटल्यावर रे कसले तुला काम असते की ज्यामुळे तुझ्या स्नेह्यांनासुद्धां भेटता

येऊ नये ? " मी उत्तरलो, " ऐक तर माझ्या कामाचे स्वरूप; तुला सांगितले तर तुला कळणार नाही नि तरीही मी ते सांगितलेच तर तू मला मूर्खातच काढशील. कारण, माझ्या कामाचे महत्त्व तुला पटण्यासारखे नाहीच मुळी. तू बडे बापकी बेटी, लाडावलेली, जीवनात गंभीरपणे विचार करायचा असतो याचा ओझरतासुद्धा विचार तुझ्या डोक्यात येणे शक्य नाही आहे ! "

ती म्हणाली, " ठीक आहे म्हटलं दुढ्ढाचार्य. तुमच्या कामाबद्दल नुसती ओझरती कल्पना तर द्याल. पाहू या कितपत मला त्याचा बोध होतो तो ! " मी म्हणालो," थोडक्यात सांगायचे तर मी संन्यास घेण्याची तयारी करीत आहे, नि म्हणूनच मी जनसंपर्क टाळतोय् नि त्यातल्या त्यात तुझ्यासारख्या सुंदर मुलीचा सहवास तर सर्वप्रथम ! तरुण संन्याशाच्या दृष्टीने तुझ्यासारख्या मुलीचे लावण्य किती धोकादायक असते याची तुला कल्पना असेल. तेव्हा, तुझ्या लक्षात आले असेल की माझे हे सारे प्रयत्न स्वतःला वाचविण्याकरिता चालले आहेत." विनोदिनी म्हणाली, " तुझ्या एकाही शब्दावर माझा विश्वास नाही; खरे कारण लपविण्याकरितां माझी भलावण चालविली आहेस असंच मला वाटतंय्. आता मुद्याला हात घालायचा तर आज सकाळीच मी तुझ्याकडे आल्येय ती आज तू आमच्याकडे जेवायला यावेस म्हणून आमंत्रण द्यायला. नुसते बोलावणे करून तू येणार नसलास तर तुला खेचून घेऊन येण्याबद्दल मला माझ्या आईवडिलांनी सांगितले आहे." मी म्हणालो, " तुझ्या मातापित्यांची ही आज्ञाच असेल तर ती मी जरूर पाळीन." नंतर, आम्ही जवळ जवळ तासभर आमच्या दोघांच्या मित्रमंडळींबद्दल व परिचितांबद्दल गप्पा मारल्या; आणि सायंकाळी ठीक ७ वाजता आलेच पाहिजे असे पुनः बजावून विनोदिनी घरी गेली.

विनोदिनी गेली नि तिच्या बोलण्यावरच मी विचार करू लागलो. मी ठरवूनच माझ्या स्नेही व मित्रमंडळींना गेले कित्येक दिवस टाळीत होतो, नि कित्येक दिवसात क्लबवर मी खेळायलाहि गेलो

नव्हतो. दिवसानुदिवस परिचितांपासून मी अलग पडत चाललो होतो. कारण, समाजात मिसळण्याचा मला उबग आला होता.

गेल्या वर्षभरात मी काय साधले हा एक प्रश्नच होता. मी वर्षाचा आढावा घेऊ लागलो तेव्हा लक्षात आले की जमेच्या बाजूला मला कितीतरी नवनवे अनुभव आले आहेत जे आतापर्यंत कधी माझ्या कल्पनेतसुद्धा आले नव्हते. जीवन–दृष्टीमध्ये ज्याप्रमाणे कमालीचा फरक पडला होता त्याप्रमाणे जीवनातील एकेका गोष्टीचे मूल्य-मापन करण्याचे गमकहि साफसाफ बदलले होते, बुद्धिनिष्ठ दृष्टि-कोनातून ते कधीच अनुभवास आले नसते. कारण, बुद्धीच्या टप्प्यातच नाहीत असे अनुभव मी गेल्या वर्षात घेतले होते. त्या अनुभवांचे अज्ञात स्वरूप, चमत्कारिक रीत्या माझ्यापुढे उकलत उकलत गेले होते. अर्थात गुरुदेवांनी ज्या कृति अगर साधना मला करायला शिकवल्या व दररोज करायला सांगितल्या त्याचे हे फलित होय हे उघड होते. इतके असूनहि मी कुठे जात आहे, माझ्यापुढील ईप्सित काय, नि त्याप्रत मी जातो आहे की कसे याची उकल मात्र काहीच निश्चितपणे अजून तरी झालेलो नव्हतो. अर्थात एकदा मी स्वतःला गुरुदेवांच्या स्वाधीन सर्वस्वी केल्यावर माझ्या भवितव्यात काय आहे याचा विचारसुद्धा गौण ठरतो. गुरुदेवांच्या सूचनांप्रमाणे मला वागता येत आहे याचाच मला फार आनंद वाटत होता. म्हणूनहि असेल कदाचित्, या सर्व साधनांचा शेवट काय यावद्दल मी संपूर्ण बेफिकीर होतो. एक गोष्ट येथे नमूद करण्यासारखी नि आश्चर्यकारक आहे की ऑफिसातील अति अवजड काम व घरी आल्यावर साधन–मार्गातील होणारा शारीरिक व मानसिक ताण एवढा पडत होता तरी मला कधी थकवा वाटत नव्हता की दमल्यासारखे वाटत नव्हते. माझी शरीरप्रकृती उत्तम होती; व मनानेहि मी सदैव ताजातवाना होतो, आता गुरुदेवांना भेटण्याची व्याकुलताहि नव्हती. कारण, अंतर्यामी एक प्रकारची खात्री वाटत होती. की योग्य वेळी ते आपणहून भेटतीलच. साधनांची तीव्रता जितकी मी वाढवीत जात होतो, तेवढा

उत्साह व शक्ति वाढत होती, नव्हे, मला पुरून उरत होती. हे लक्षात येण्याइतके स्पष्टपणे अनुभवास येत होते. ती शक्ति मी हाती घेतलेल्या कार्याकडे लावायची, एवढेच माझ्या स्वाधीन होते. त्यामुळें मी इतर चळवळी अगर हालचालीत माझा शक्तिव्यय होऊ देत नव्हतो. त्याकरितां त्यांना मी छेद दिला होता. माझ्या आई-वडिलांच्या मृत्यूपासून, नाही म्हटले तरी, माझ्या कुटुंबियांपासून मी वेगळा पडलोच होतो. त्यामुळे त्यांच्याबद्दलहि चिंता करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नव्हता. माझी पैशाबाबतची व्यवस्थाहि इतकी सुसूत्रपणे आखली गेली होती की त्यांबाबतहि काळजी मिटलेली होती. अशा प्रकारे, सर्व दृष्टींनी, भगभगीपासून दूर असे शांत व आरामशीर जीवन मी जगत होतो. कसला म्हणून कसलाहि त्रास असा मला नव्हताच.

रात्री बरोबर ७ च्या सुमाराला मी गुप्तांचे घरी भोजनासाठी गेलो. मला पाहाताच उभय पतिपत्नींना मनापासून बरे वाटले असे दिसले. विनोदिनीने जे प्रश्न मला सकाळी विचारले तेच प्रश्न पुन: त्या दोघांनीही विचारले. कोणा समर्थ गुरूच्या मार्गदर्शनाखाली मी अध्यात्मातील गूढ तत्त्वांचा मागोवा घेत आहे, हे श्री. गुप्तांच्या लक्षात आले होते व त्यांचा त्यावर विश्वासही बसला होता. तरीपण त्यांनी मोठ्या तळमळीने मला सांगितले की-माझा हा प्रयत्न म्हणजे विस्तवाशी खेळ आहे. त्यांनी मला हेहि ऐकवले की, कितीतरी 'मी मी' म्हणवणाऱ्या बुद्धिवंतांनी या अध्यात्माच्या नादाने आपल्या उज्ज्वल कर्तृत्वाची व भव्य भवितव्याची राखरांगोळी केली आहे. कारण, ते जगच काल्पनिक आहे, भ्रामक नि फसवे आहे. आध्यात्मिक जीवन पत्करून मन:शांति आत्मसात करायला भौतिक जीवनाचा बळी देण्याचे कारणच नाही मुळी. कारण-ते पुढे म्हणाले, " भौतिक जगात ऐश्वर्य संपादून, आध्यात्मिक जगातहि अधिकार कमावलेले लोक माझ्या पाहण्यात आहेत. तुझ्यासारख्या होतकरू, कर्तृत्ववान तरुणाने आयुष्यातील सर्व सुखांना पायाशी लोळण घ्यायला लावायचे

ते सोडून जे बुद्धीला पटत नाही नि म्हणून शहाणपणाचे ठरत नाही त्या प्रांतात पाऊल टाकायचे ठरवणे कसेसेच वाटते. जे व्यक्त आहे, ठाम आहे, ते सोडून अव्यक्ताच्या काल्पनिक सुखाच्या मागे धावणे मलातरी वेडेपणाचे वाटते. तेव्हां, अजूनहि वेळ गेलेली नाही. गंभीरपणे तू काय करीत आहेस त्याबद्दल पुन: विचार करून पावले टाक. वयाने तुझ्यापेक्षा मी मोठा आहे. म्हणून केवळ मी हा उपदेश करीत नाही. तर तुझ्याबद्दल माझ्याहि हृदयात एक कोपरा आहे तेथे कळ उठते म्हणून मी इतके पोटतिडकेने बोलतोय. ज्याच्या स्वरूपाबद्दल निश्चित कल्पना नाही अशापायी तुझ्या यशस्वी जीवनाचा होम तू करू नयेस."

जेवण फारच रुचकर झाले होते व आमच्या गप्पाहि इकडच्या तिकडच्या विषयावर चालल्या होत्या.

सौ. गुप्तांनी गुरुदेवांबद्दल, त्यांनी सांगितलेल्या साधन मार्गाबद्दल व मी त्याप्रमाणे कसे आचरण करतो याबद्दल प्रश्नांची फैर धरली. मी त्यांची मामुली उत्तरे देऊन माझी कशीबशी सुटका करून घेतली कारण, या वायफळ प्रश्नांची उत्तरे देण्याच्या मनस्थितीत मी नव्हतो. घरी परतायला रात्रीचे १०॥ होऊन गेले होते.

मला कितीतरी वेळ झोपच येईना. प्रत्यक्षाला सोडून काल्पनिक अप्रत्यक्षाकडे मी निरर्थकपणे धावत आहे या श्री. गुप्तांच्या शेऱ्याने माझ्या डोक्यात विचारांची गर्दी उसळली होती. काहीतरी काल्पनिक नि मायावी गोष्टींच्या पाठीमागे लागून मी खरंच का बहुमोल जीवन मातीमोल करीत आहे हा खरोखरच विचार करण्यासारखा प्रश्न होता. प्रत्यक्ष ठाम–म्हणजे तरी काय ? परंपरागत विचारांनी किंवा ऐतिहासिक सत्य म्हणून ठरलेले–जी आठवणपूर्वक जाण तेच ना आपण ठाम प्रत्यक्ष म्हणून मानतो ? श्री. गुप्तांनी इतकी माया जोडली आहे. त्यांचे कुटुंबहि फक्त तीन माणसांचे–सीमित–पण म्हणून ते नक्की सुखी आहेत का ? भौतिक जगात स्वप्रयत्नाने मिळविलेले यश वा संपत्ती जर मानवाला सुख देऊ शकत नसेल तर

भौतिक सुखाच्या मागे धावत जीवन व्यतीत करण्यासारखा मूर्खपणा नि अधःपात तो कुठला ? मनुष्याला आपले सारे आयुष्य, सर्व शक्ति विषयप्राप्तीकरिता ऐहिक जीवनात यशस्वी होण्याकरिता खर्च करावे लागते, आणि शेवटी इतकी धडपड करूनहि सुख—समाधानाचा कणहि हाती लागला नाही म्हणून भ्रमनिरास होऊन जीवन फुकट गेले असे म्हणत म्हणत भग्नहृदय होऊनच त्याला शेवट गाठावा लागतो ना ? असे जर आहे तर ज्या मार्गाने जाऊन संत-महंत जीवनात सुखशांतिसमाधानाचे मेरुमणी झाले तो मार्ग धरणे जास्त सयुक्तिक व शहाणपणाचे ठरत नाही काय ? बहुतांश लोकांच्या चालीने, ती वाट मळलेली नाही, म्हणून ती त्याज्य कशी ठरू शकते ? स्वामीजी नि गुरुदेव ही दोन उदाहरणे तर माझ्या समोर आहेत. ते नुसते वरवर सुखी नि समाधानी दिसतात हे खरे नसून ते त्यांच्या म्हणण्याप्रमाणे सुखसमाधानी जीवन जगत आहेत हे खरंच नव्हे का? इतक्या दिवसाच्या त्यांच्या सहवासात, ते खोटे बोलत असतील, असं मला तरी म्हणवत नाही. नि खोटे बोलून वाईट मार्गाला लावायचे त्यांना तरी प्रयोजन काय ? मी कुटुंबातून अलग पडलोच आहे आणि लौकिक जगात अडकून पडण्यासारखे मला काहीहि बंधन उरलेले नाही. सुखाच्या कल्पनेत इंद्रियांना उपभोगायला मिळणारे सुख येवढेच अभिप्रेत असेल तर जे आंतरिक सुख मला मिळत होते, त्याची सर कशालाच येण्यासारखी नव्हती. ऐहिक सुखे क्षणैक, पण आध्यात्मिक आंतरिक सुख निश्चितपणे शाश्वत सदैव टिकून राहणारे. स्वामीजी व गुरुदेवांची भेट झाल्यापासून मी जे जे काय करीत आलो त्याबद्दल खंत वा खेद वा पश्चात्ताप वाटण्यासारखे अजून एकदाहि काहीहि झालेले नाही. तेव्हा, उर्वरित आयुष्यात अतींद्रिय शक्तींची उपासना करणे हेच माझे ध्येय. अध्यात्मशास्त्रातील गूढ विद्यांचा व ते गूढ आपण उकलावे याचा माझ्या मनावर इतका पगडा बसला आहे की आता पाय मागे घेणे नाही. माझा निश्चय कोणत्याही अर्थाने अंधारात झोकलेली उडी नसून, अंधाऱ्या मार्गातून

ज्ञानमय ज्योतीकडे माझा प्रवास चालला आहे, त्यामुळे माझे जीवन उजळूनच निघणार अशी माझी खात्रीची भावना होती जे आयुष्यात फारच थोड्यांना आजपर्यंत साधले ते साधून, त्यात मी यशस्वी होणार असा मला आत्मविश्वास वाटत होता. या नि अशा विचारात मध्यान्हीनंतर मला केव्हातरी झोप लागली असावी.

दुसऱ्या दिवशी सायंकाळी कचेरीतून घरी आलो तो गुप्ता पति–पत्नी माझी वाट पाहात थांबली होती असे आढळले. ते का आले असावेत याचा अंदाज मला काहीच करता येईना. वाटलं, आले असतील झालं सहजच ! इकडच्या तिकडच्या औपचारिक गोष्टी झाल्यावर मी विचारले, "काय इकडे कुठे आजच ? नि तेहि दोघेहि! काही विशेष ?" श्री गुप्ता म्हणाले, "होय ; मनात काही योजूनच आलो आहोत तुझ्याकडे. एका महत्त्वाच्या विषयावर तुझ्याशीं बोलायचेय आम्हांला." थोडा वेळ थांबून ते म्हणाले, "विनोदिनीचे लग्न शक्य तितक्या लवकर उरकावे असे म्हणतो आहोत आम्ही. मी तिला पुरेसे शिक्षण दिले आहे व त्याकरिता पैसा खर्च करायला मी मागेपुढे पाहिलेले नाही. मी नि सौ. आता वृद्ध होत चाललो. तेव्हा, आपल्या डोळ्यादेखत तिचे दोनाचे चार हात करून द्यावेत. नि संसारात तिला सुखी झालेली पाहावी असे साहजिकपणे वाटू लागलेय. तिने आपला जोडीदार स्वतःच निवडावा म्हणून आत्तापर्यंत सर्व काही केले. पण, इतक्या दिवसांच्या अनुभवावरून तशी निवड तिला करता आलेली दिसत नाही. तेव्हा, आता आम्हीच तिच्याकरिता स्थळे पाहायला सुरवात करायचे ठरवलेय." पुनः जरा वेळ थांबून ते पुढे म्हणाले, "माझे स्वतःचे लग्न, आम्ही उभयतांनीं ठरवले. आमचा प्रीतिविवाह आहे नि कदाचित् तुला ठाऊक नसेल आंतरजातीय–विवाहहि आहे. फारच थोड्यांना हे सत्य माहीत आहे. मी माझ्या जातीच्या बाहेरच्या मुलीशी लग्न केल्यामुळे, मला वाळीत टाकण्यात आले; नि वडिलांनीही माझा संबंध तोडल्याने मला माझ्या लहानपणीच घरदार सोडून बाहेर पडावे लागले. आरंभीची कित्येक वर्षे

आम्ही अत्यंत हालात काढली. तुटपुंजी मिळकत, कुणाचाही आधार नाही. कारण आम्ही बहिष्कृत ! परंतु मोडेन पण वाकणार नाही अशी जिद्द बाळगून दिवसाची रात्र केली. अपरंपार कष्ट उपसले नि हा दिवस दिसला. वडिलांनी, शेवटी शेवटी, माझ्यावरील राग सोडला होता. पण तोपर्यंत वेळ निघून गेली होती. कारण, तोपर्यंत मी पुष्कळच सावरलो होतो. जीवन स्थिरस्थावर केले होते. साहजिकच माझ्या मुलीने आपल्या जातीच्याच मुलाशी लग्न करावे असा माझा कधीच आग्रह नव्हता. मात्र मुलगा हुशार, तरतरीत व होतकरू, कर्तृत्ववान असावा एवढीच आमची अपेक्षा होती. माझे नि आमच्या बाईसाहेबांचे तुझ्याबाबत फारच चांगले मत झालेले आहे. तेव्हा, तुलाच विचारावे असे ठरवून आम्ही आलो आहोत विनोदिनीची व तुझी इतक्या दिवसांची चांगली ओळख आहेहि. तेव्हा तिच्याशी लग्न करण्याबद्दल तुझे काय मत आहे ? " मी उत्तरलो, " स्वतःच्या मुलीसाठी मागणी घालण्याइतके माझ्याबद्दल तुमचे मत चांगले आहे याबद्दल प्रथमतः तुमचे आभार. माझेहि विनोदिनीबाबत फार चांगले मत आहे. पण तुम्हांला मी कालच सांगितले ना, की, लग्नाच्या फंदात पडायचे नाही असे मी ठामपणे ठरविले आहे. कारण, मला आजन्म अविवाहित राहायचे आहे. पुष्कळ दिवसपर्यंत सर्व बाजूंनी यथातथ्य विचार करूनच मी हा निर्णय घेतला आहे. या निर्णयाप्रत यायला कसलीहि प्रतारणा किंवा अपेक्षाभंग किंवा मनोभंग कारण झालेला नाही. विनोदिनीला उत्तम जीवनसाथी मिळून तिचा संसार सुखाचा व्हावा असे मलाहि वाटते. नि आता तिचे लग्न करायचा तुमचा बेत निश्चितच झाला आहे. तर मीही तिच्याकरिता चांगले स्थळ मला दिसले तर आपणाला जरूर कळवीन. " त्यावर श्री. गुप्तांनी माझ्याच ऑफिसमध्ये काम करीत असलेल्या माझ्यापेक्षा दुय्यम श्रेणीच्या अधिकारावर असलेल्या श्री. सेन नावाच्या बंगाली तरुणाबद्दल माझ्याजवळ चौकशी केली. मी एकदम म्हणालो, " खरंच सेन व विनोदिनीचा जोडा छानच जमेल. श्री. सेन हा चांगला उमदा,

होतकरू मुलगा आहे. तरुण आहे. उच्च शिक्षण लाभलेला नि बंगाल-मधील सुप्रतिष्ठित श्रीमंत घराण्यातला मुलगा आहे. प्रकृति उत्तम, देखणा नि त्याच्याभोवतालच्या लोकांत त्याच्याबद्दल चांगलेच उद्‌गार काढले जातात. मला वाटते, विनोदिनी व त्याची यापूर्वी अनेकदा भेट–मुलाखत झालेली आहे; नि माझा ग्रह बरोबर असेल तर सेन विनोदिनीला ओळखतोहि." सेनजवळ मी हा विषय काढून कानोसा घ्यावा व त्यांना काय ते कळवावे, अशी विनंती गुप्ता दंपतीने केली; व मीही ती कामगिरी पत्करल्याचे त्यांना अभिवचन दिले. तीं दोघें गेली तोपर्यंत दिवस बराच सांजावला होता.

दुसऱ्या दिवशी सायंकाळी क्लबवर जाऊन मी श्री. सेनला गाठले. "हॅलो, श्री. सेन." मी त्याला पाचारले, "कसे काय ? ठीक–अरे यार लग्नबिग्न करण्याचा काही विचार; लाडू केव्हा घालणार ?" माझा हा प्रश्न त्याला अनपेक्षित असावा. तेव्हा चमकून माझ्याकडे पाहात तो म्हणाला, "काय थट्टा चालवली आहे ही आज. काय मनात तरी काय आहे तुझ्या ? इतक्या दिवसांनंतर आपण भेटतोय नि एकदम ही सरबत्ती तेव्हा काहीतरी मनात योजून विचारतीय स्वारी. स्पष्टपणे बोल ना यार ?" मी म्हटले, "हे बघ सेन. अरे लग्न करून हे एकाकी ब्रह्मचाऱ्याचे जीवन संपवायची वेळ अजून नाही का आली? अर्थात मी स्वतः अविवाहित असताना तुला असला सल्ला देण्याचा मला फारच थोडा अधिकार आहे हे मलाहि कबूल. पण, माझी गोष्टच वेगळी आहे. कारण, मी कधीच लग्न करायचे नाही असेच ठरवले आहे." नंतर माझे नि गुप्ता–पति–पत्नीचे झालेले संभाषण मी त्याला सांगितले. त्याला ते सर्व ऐकून इतके आश्चर्य वाटले की त्याचा त्यावर विश्वासच बसेना. तो म्हणाला, "आमच्या कंपूतले सर्वच तुझ्याकडे गुप्तांचा भावी जावई म्हणूनच पाहातात. नि तू हे काय सांगतो आहेस ?" तेव्हा मी म्हटले, "अरे मी नुसताच अविवाहित राहाण्याचा बेत केलेला नाही तर नोकरीवर सुद्धा लाथ मारून ध्यान–धारणा–समाधि या मार्गात अध्यात्मविद्येत

माझे जीवन व्यतीत करायचे ठरवले आहे ?" हे ऐकून तर तो पुरा हादरला. तेव्हा तो अजीजीने म्हणाला. " तू म्हणतोस ते खरे असेल तर खरंच इतकी दुःखाची गोष्ट नाही. तुझ्यासारख्या होतकरू नि कर्तृत्ववान माणसाने हाती आलेली संधी—लाथाडून असला मार्ग पत्करावा! केवढा हा त्याग? तुझ्याबद्दल मला केवढा आदर वाटतो पण तुझा निश्चय ऐकून, म्हटल्यावाचून राहावत नाही. की, हे वेड व्यर्थ आहे."

मी म्हटले, " ते राहू दे. माझ्या भवितव्याची चर्चा आपण मग करू, केव्हातरी, सावकाशपणे. मला फक्त एक सांग, गुप्तांकडून विनोदिनीचे स्थळ तुला सांगून आले तर तू लग्नाला तयार आहेस की नाही." त्यावर तो म्हणाला, " मला जरा विचार करायला अवधी हवा. मी पुढच्या रविवारी सकाळी तुझ्या घरी येतो. नि मग आपण बोलू. सायंकाळी, फोनवरून श्री. सेनशी माझे झालेले बोलणे श्री. गुप्तांना कळविले. दोन दिवसांनंतर विनोदिनी माझ्या घरी येऊन सेनबद्दल मला कितपत माहिती आहे, हे विचारू लागली. " इतर कोणा तरुणांपेक्षा सेनबद्दलची येवढी चौकशी चालवलीय." मी मुद्दाम विचारले, " काही विशेष कारण दिसतेय—सेनबद्दल तू स्वतः विचारीत आहेस" तेव्हा . . तिच्या गालावर रक्तिमा पसरला, पण न चाचरता ती म्हणाली, " स्थळ म्हणून सेनचे नाव मला सुचविण्यात आले आहे. तेव्हा भावी पती कसा आहे, या कुतूहलाने त्यांच्याबद्दल जेवढी जास्तीत जास्त माहिती मिळेल तेवढी मला हवी आहे." मी म्हटले, " पण स्थळ म्हणून तुला कसा काय वाटतो सेन?" ती उत्तरली, " सेन आहे छानः पण लग्न करायचे तर त्यापेक्षा जरा अधिक माहिती हवी त्यांची." मी त्यावर म्हणालो, " सेन माझा मित्र आहे नि त्याला मी चांगला ओळखतो. त्याच्या हौशी स्वभावाची, आनंदी वृत्तीची नि चांगल्या वागणुकीची मी हमी देऊ शकतो. सरकारी अधिकारी म्हणून पुढे त्याचे भवितव्य उज्ज्वल आहे; आणि कलकत्यातील महशूर कुटुंबातला तो असल्याने घरचीही चांगलीच

श्रीमंती असावी. मलातरी वाटते की तू हे स्थळ पत्करावेस. कारण जीवनसाथी म्हणून तू त्याचा स्वीकार केलास तर तुमचे वैवाहिक जीवन निश्चितपणे सुखाचे जाईल असे मला तरी खात्रीने वाटते."

रविवारी सकाळी, ठरल्याप्रमाणे, सेन माझ्याकडे आला व म्हणाला "गेल्या आठवड्यात तुम्ही सांगितलेत त्यावर मी विचार केला खूप. नि कुमारी गुप्तांशीही मी या विषयावर बोललो. माझ्या आईवडिलांनाहि मी सर्व हकीगत कळवून त्यांचे मत घेतले. आणि मला सांगायला आनंद वाटतो की पति-पत्नी या नात्याने एकत्र यायला माझी नि विनोदिनीची कसलीही आडकाठी नाही." त्याने घेतलेल्या शहाणपणाच्या निर्णयाबद्दल मी त्यांचे अभिनंदन केले व म्हटले, "विनोदिनीच्या सहवासात फार सुखी होशील तू आयुष्यभर!" त्यांच्या लग्नाचा साखरपुडा होऊन दुसऱ्या दिवशी थाटाची मेजवानी देऊन श्री. गुप्तांनी लग्न ठरल्याचे जाहीर केले. विनोदिनीचे लग्न ठरले यामुळे का न कळे, पण एक तऱ्हेचा मानसिक ताण हलका झाल्यासारखे मलातरी वाटले.

ही घटना घडून पंधरा दिवस लोटले नसतील तेवढ्यात कु. मालती गोखलेचे मला पत्र आले. ती इंग्लडहून परत आली असून मुंबई सरकारच्या शिक्षणखात्यांत तिला अधिकारपदाची नोकरी मिळाली असे तिने लिहिले होते. त्यातच तिने हीहि माहिती लिहिली होती की माझा स्नेही रमेश हाहि अमेरिकेहून उच्च पदवी घेऊन आला असून, मुंबईतील एका कॉलेजचा व्हाइस-प्रिंसिपॉल म्हणून रुजू झाला आहे. त्यातच तिने आणखी गोड बातमी लिहिली होती कीं तिचे रमेशशी लग्न ठरले असून, लवकरच ती दोघं विवाहबद्ध होतील. मी त्या उभयतांचा मित्र असल्याने त्यांच्या लग्नाला मी हजर राहणे अत्यावश्यक आहे असेहि तिने आग्रहपूर्वक सुचविले होते.

दोन वर्षे लोटली. विनोदिनी व मालती या दोघी विवाहित होऊन आपापल्या संसारात गोडी 'गुलाबी' ने रमल्या होत्या. बंधूंची वारंवार पत्रे येऊनहि मी बऱ्याच दिवसांत मुंबईला गेलो नव्हतो. दिवसा-

नुदिवस भोवतालच्या समाजापासून किंवा स्नेह्यांपासूनच नव्हे, तर नात्याच्या माणसांपासूनहि मी वेगळा–अलग–पडत चाललो होतो. त्यांच्याबद्दलची आत्मीयता अगर मनाचा ओढाच कमी कमी होत होता; क्षीण होत होता. गुरुदेवांनी जे जे करायला सांगितले होते ते संपूर्णतया मी केले होते; नि एक तऱ्हेची निर्मळ शांतता सुस्पष्ट स्थिरता, मी अनुभवीत होतो. ज्या गोष्टी यापूर्वी मलासुद्धा अलौकिक किंवा किंवा अद्‌भुत वाटत होत्या त्या आता तशा वाटेनाशा झाल्या. कारण, त्यांच्या पाठीमागील कारणपरंपरा व परिणाम मला स्वच्छपणे कळले होते. माझा बराचसा वेळ चिंतनात–ध्यान धारणेत जाऊ लागला. एकेवेळी मनाची एकाग्रता करण्याकरिता कोण आटा–पिटा करावा लागे; आता ती सहजसाध्य गोष्ट होऊन बसली होती. संदर्भ किंवा आधार शोधण्यापलीकडे मला आता पुस्तकांची गरज वाटेनाशी झाली. विचार करणे ही प्रक्रिया आता निवळ निरीक्षण या अवस्थेत शिल्लक राहिली होती; व मनाचे अधिराज्य संपले होते. जीवनात बदल घडवून आणणाऱ्या वळणावर गुरुदेवांची वाट पाहात मी उभा होतो. कारण, ती दीक्षा गुरुदेवांनीच द्यायची होती.

कितीतरी वर्षांनंतर मला पुनः स्वप्न पडले व बर्फाच्छादित शिखरावर यापूर्वीच्या स्वप्नात दिसलेला साधुपुरुष पुनः मला स्वप्नात भेटला. त्यांना पाहताच मी ओळखले. मला पाहातांच त्यांना अत्यानंद झालेला स्पष्ट समजत होता. ते म्हणाले "बेटा, तुझी प्रगति पाहून मला फार संतोप वाटतो. नि तू आपली गुहेतील जागा घ्यायला लवकरच येशील–पाहा." मी दचकून जागा झालो. पण आश्चर्यमात्र वाटले नाही. आगामी घटनांचे सूचकच ते स्वप्न असावे असे मात्र वाटले.

'तो सोनियाचा दिवस' उगवला. एके दिवशीं भल्या पहाटे गुरुदेव माझ्या बंगल्यात प्रवेशतांना मला दिसले. गुरुदेव आले, इतक्या जवळ आले, माझ्या घरी आले; खरं वाटेना. शब्दांनी माझ्या भावना स्पष्ट करताच येत नाहीत. आनंदातिशयाने जरा वेळ माझ्या तोंडून

शब्द फुटेना. त्यांनी मला उचलून दृढालिंगन दिले. ते माझ्याकडे दोन दिवस राहिले. त्यांच्या सहवासात वेळ कसा उडून गेला कळले नाही. त्यांनी आणखी काही सूचना केल्या नि माझ्या भवितव्याबद्दलहि मी त्यांच्याशी चर्चा केली. मला आलेल्या अनुभवांबद्दल मला पुष्कळच बोलायचे होते. त्यांनी सर्व ऐकून घेतले. आत्मीयतेने माझ्या सर्व अडचणींची उकल करून दिली. संशयनिरसन केले. आम्हा दोघांत एकतऱ्हेचे सामंजस्य उत्पन्न झाले होते. माझ्याबाबत त्यांच्या योजना अगदी स्पष्ट होत्या. त्यामुळे, मला माझ्या भवितव्याचा विचार काडीमात्र करण्याची जरूरी नव्हती. माझा मार्ग साधा नि खुला होता. यावेळी गुरुदेवांनी सारा वेळ माझ्या सान्निध्यात घालविला. दिल्लीत दोन दिवस असूनहि ते कुणालाहि भेटायला गेले नाहीत, व ते दिल्लीत आले आहेत असे मीहि कुणाला सांगितले नाही. नंतर, ते हिमालयाच्या कुशीत असलेल्या ऋषिकेशला गेले.

पुढील सहा महिन्यांत मी माझ्या नोकरीचा राजीनामा दिला. माझा राजीनामा स्वीकारताना सरकारने फार खळखळ केली. माझ्या कामगिरीचे चीज–कौतुक म्हणून सरकारने मला निवृत्ति–वेतनहि दिले; माझी तशी यत्किंचित्हि इच्छा नसताना ! माझ्या मित्रांना व परिचितांना माझ्या राजीनाम्याने फार वाईट वाटले. माझ्याशिवाय इतर सर्वांना माझ्या निवृत्तीबद्दल मनापासून खेदच वाटत होता. मी माझे सामानसुमान आवरून दिल्लीला रामराम ठोकला. मला निरोप द्यायला गुप्ता पति–पत्नी, विनोदिनी व तिचा नवरा सेन, शिवाय, माझे दिल्लीतील फार मोठे मित्रमंडळ स्टेशनवर हजर होते. नोकरीच्या जोखडातून मी मुक्त झालो असल्याने मी त्यांना केव्हाहि भेटायला आता मोकळा आहे असे सर्वांना सांगितले. मी मुंबई गाठली.

●●●

नुदिवस भोवतालच्या समाजापासून किंवा स्नेह्यांपासूनच नव्हे, तर नात्याच्या माणसांपासूनहि मी वेगळा–अलग–पडत चाललो होतो. त्यांच्याबद्दलची आत्मीयता अगर मनाचा ओढाच कमी कमी होत होता, क्षीण होत होता. गुरुदेवांनी जे जे करायला सांगितले होते ते संपूर्णतया मी केले होते; नि एक तऱ्हेची निर्मळ शांतता सुस्पष्ट स्थिरता, मी अनुभवीत होतो. ज्या गोष्टी यापूर्वी मलासुद्धा अलौकिक किंवा किंवा अद्भुत वाटत होत्या त्या आता तशा वाटेनाशा झाल्या. कारण, त्यांच्या पाठीमागील कारणपरंपरा व परिणाम मला स्वच्छपणे कळले होते. माझा बराचसा वेळ चिंतनात–ध्यान धारणेत जाऊ लागला. एकेवेळी मनाची एकाग्रता करण्याकरिता कोण आटा–पिटा करावा लागे; आता ती सहजसाध्य गोष्ट होऊन बसली होती. संदर्भ किंवा आधार शोधण्यापलीकडे मला आता पुस्तकांची गरज वाटेनाशी झाली. विचार करणे ही प्रक्रिया आता निवळ निरीक्षण या अवस्थेत शिल्लक राहिली होती; व मनाचे अधिराज्य संपले होते. जीवनात बदल घडवून आणणाऱ्या वळणावर गुरुदेवांची वाट पाहात मी उभा होतो. कारण, ती दीक्षा गुरुदेवांनीच द्यायची होती.

कितीतरी वर्षांनंतर मला पुनः स्वप्न पडले व वर्फाच्छादित शिखरावर यापूर्वीच्या स्वप्नात दिसलेला साधुपुरुष पुनः मला स्वप्नात भेटला. त्यांना पाहताच मी ओळखले. मला पाहातांच त्यांना अत्यानंद झालेला स्पष्ट समजत होता. ते म्हणाले "बेटा, तुझी प्रगति पाहून मला फार संतोप वाटतो. नि तू आपली गुहेतील जागा घ्यायला लवकरच येशील–पाहा." मी दचकून जागा झालो. पण आश्चर्यमात्र वाटले नाही. आगामी घटनांचे सूचकच ते स्वप्न असावे असे मात्र वाटले.

'तो सोनियाचा दिवस' उगवला. एके दिवशीं भल्या पहाटे गुरुदेव माझ्या बंगल्यात प्रवेशतांना मला दिसले. गुरुदेव आले, इतक्या जवळ आले, माझ्या घरी आले; खरं वाटेना. शब्दांनी माझ्या भावना स्पष्ट करताच येत नाहीत. आनंदातिशयाने जरा वेळ माझ्या तोंडून

शब्द फुटेना. त्यांनी मला उचलून दृढालिंगन दिले. ते माझ्याकडे दोन दिवस राहिले. त्यांच्या सहवासात वेळ कसा उडून गेला कळले नाही. त्यांनी आणखी काही सूचना केल्या नि माझ्या भवितव्याबद्दलहि मी त्यांच्याशी चर्चा केली. मला आलेल्या अनुभवांबद्दल मला पुष्कळच बोलायचे होते. त्यांनी सर्व ऐकून घेतले. आत्मीयतेने माझ्या सर्व अडचणींची उकल करून दिली. संशयनिरसन केले. आम्हा दोघांत एकतऱ्हेचे सामंजस्य उत्पन्न झाले होते. माझ्याबाबत त्यांच्या योजना अगदी स्पष्ट होत्या. त्यामुळे, मला माझ्या भवितव्याचा विचार काडीमात्र करण्याची जरूरी नव्हती. माझा मार्ग साधा नि खुला होता. यावेळी गुरुदेवांनी सारा वेळ माझ्या सान्निध्यात घालविला. दिल्लीत दोन दिवस असूनहि ते कुणालाहि भेटायला गेले नाहीत; व ते दिल्लीत आले आहेत असे मीहि कुणाला सांगितले नाही. नंतर, ते हिमालयाच्या कुशीत असलेल्या ऋषिकेशला गेले.

पुढील सहा महिन्यांत मी माझ्या नोकरीचा राजीनामा दिला. माझा राजीनामा स्वीकारताना सरकारने फार खळखळ केली. माझ्या कामगिरीचे चीज–कौतुक म्हणून सरकारने मला निवृत्ति–वेतनहि दिले; माझी तशी यत्किंचित्‌हि इच्छा नसताना ! माझ्या मित्रांना व परिचितांना माझ्या राजीनाम्याने फार वाईट वाटले. माझ्याशिवाय इतर सर्वांना माझ्या निवृत्तीबद्दल मनापासून खेदच वाटत होता. मी माझे सामानसुमान आवरून दिल्लीला रामराम ठोकला. मला निरोप द्यायला गुप्ता पति–पत्नी, विनोदिनी व तिचा नवरा सेन, शिवाय, माझे दिल्लीतील फार मोठे मित्रमंडळ स्टेशनवर हजर होते. नोकरीच्या जोखडातून मी मुक्त झालो असल्याने मी त्यांना केव्हाहि भेटायला आता मोकळा आहे असे सर्वांना सांगितले. मी मुंबई गाठली.

●●●

# ७

मी घेतलेला निर्णय माझ्या बंधूंना आगाऊ कळवलाच होता व दिल्ली सोडण्यापूर्वी मुंबईला येत असल्याचेहि कळविले होते. वाटेत कुठेहि न उतरता मी थेट मुंबईला आलो. स्टेशनवर दादा आला होता. उभय बंधूंकडे मी थोडे दिवस राहिलो. मी नोकरी सोडली यात शाहाणपणाचा भाग कोणता हे त्यांना पटवून देणे सोपे नव्हते. विनायकदादाच्या सल्ल्याने माझ्या पैशाची व्यवस्था पुरी करून मी नगरला आलो. गुरुदेवांची पुनः भेट होईपर्यंत नगरला राहायचे असा मी बेत केला होता. आमचे जुने घर. आईवडिलांच्या असंख्य आठवणी, नि त्यांच्या सहवासात घालविलेले ते सुखाचे दिवस–पण आता काय त्याचे ?–सारे काही बदलले होते. आईवडिलांशिवाय रित्या असलेल्या घरात राहणे ओकेओके वाटत होते. नोकरांनी घर झाडून पुसून व्यवस्थित ठेवले होते. मी आलो आहे नि थोडे दिवस राहणारहि आहे, असे कळताच जुने नोकर येऊन हजरहि झाले होते. पावलोपावली जुन्या आठवणी येत. नि माझ्या प्रिय मातापित्यांच्या त्या घरात एकटे राहणे सोपे नाही याची जाणीव देत. माझ्या ध्यान–धारणा–साधनांच्या कार्यक्रमात माझा बहुतांश वेळ जात असल्याने भावनावेग आवरून मी कसेवसे दिवस ढकलीत होतो. मी मोठ्या हुद्याच्या सरकारी नोकरीचा राजीनामा देऊन नगरला आलो आहे हे स्थानिक लोकांना अगोदरच कळले असावे. एवढी मानाची व पगाराची नोकरी सोडण्याचे कारण तरी काय हे जाणून घेण्याची उत्सुकता माझ्या सर्व परिचितांत मित्रमंडळीत व नातेवाईकात दिसली. नोकरीचा कंटाळा आल्याने मी नोकरी सोडली व आता निवृत्त जीवन घालवायचे मी ठरवले आहे असे सर्वांना मी सांगे. पण ते त्यांना पटत नव्हते. काही लोकांच्या मते हा संपूर्ण मूर्खपणा होता. तर काहीजण या माझ्या निर्णयात शहाणपणा कितपत आहे याबद्दल शंका दर्शवीत. परंतु, जसजसा काळ लोटला तसतशी याबाबतची

खळवळ कमी झाली व सर्वांनी ती एक वस्तुस्थिती आहे हे मान्य केले.

महिनाभराने माझे दोघेहि बंधू–सहकुटुंब नगरला राहायला आले. त्यामुळे रिकामे घर कसे एकदम भरल्यासारखे झाले. सर्व कुटुंबियांचे ते गोड संमेलन झाले होते. माझ्या भवितव्याची पुन: चर्चा झाली; व मी शेवटचे सांगून मोकळा झालो की, गुरुदेवांच्या मार्गदर्शनाखाली शाश्वत सुख–शांतीच्या शोधात मी माझे उर्वरित आयुष्य घालवायचे ठरविले आहे–ही आता काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे! मला अध्यात्मवाद म्हणजे काय व आत्मसाक्षात्कार होऊन प्रत्यक्ष परमेश्वराच्या अस्तित्वाचे ज्ञान–संपादणे म्हणजे काय हे नुसते समजावून घ्यायचे आहे असे नसून याच देही याच डोळा ते पडताळून पहायचे आहे. जगातील सत्य व खरे प्रेम याचा अनुभव घेण्याची मला तळमळ लागून राहिली आहे. अशा स्पष्ट शब्दांत व ठामपणे मी माझा मनोदय व्यक्त केल्यावर मग कुणीच तो विषय पुन: काढला नाही. माझ्या बंधूंच्या सल्ल्याने मी माझ्या मालमत्तेची शेवटची व कायमची व्यवस्था करून टाकली. कारण, यानंतर कुटुंबाशी माझा फारच थोडा संबंध उरणार होता. त्यांनी माझ्याकडून कबूल करून घेतले की मी माझ्या प्रकृतीची उगाच आबाळ करणार नाही, नि वेळोवेळी शक्य होईल तसे माझा ठावठिकाणा व माझ्या मार्गातील प्रगती मी त्यांना कळवीत जाईन. अशाप्रकारे, मी आता पाशरहित होऊन आकाशात अवगाहन करणाऱ्या पक्ष्यांप्रमाणे अनिर्बंधपणे संचार करायला मोकळा झालो होतो. मुंबईला परत जाण्याला माझ्या बंधुद्वयांच्या कुटुंबाना दोन दिवस राहिले होते. इतक्यात गुरुदेव येऊन उभे राहिले. त्यांच्या आगमनाबद्दल मला खात्री वाटत होती, नि कोणत्याही क्षणी ते इथे येऊन पोहोचतील असे मी मनात म्हणतच होतो. माझ्या बंधूंना मात्र गुरुदेवांनी काय करायचे ठरवले आहे हे गुरुदेवांच्याच तोंडून ऐकण्याची आत्यंतिक तळमळ लागून राहिली होती. त्यामुळे घरातील एकूण एक व्यक्तीकडून गुरुदेवांचे मन:पूर्वक

स्वागत झाले हे सांगायला नकोच. माझ्या वडील बंधूंनी विचारताच गुरुदेव म्हणाले, "नक्की असा आखीव रेखीव कार्यक्रम काहीच नाही. माधव हा स्वतःचा स्वामी आहे. व स्वतःच्या आयुष्याची घडण कशी करायची हे ठरवावयाला त्याचा तो समर्थ आहे. मी सध्या भारत संचाराला निघालो आहे. आणि त्याला आवडले तर त्याने माझ्याबरोबर यावे. मी येवढेच आश्वासन देतो की त्याच्या प्रकृतीबद्दल व जीवितावद्दल जिम्मेदारी माझी. मी सर्व ती काळजी घेईन, त्यावद्दल तुम्ही निखालस निश्चित असावे." माझे बंधू म्हणाले, "गुरुदेव, माधवची सर्व काही काळजी घेतली जाईल याबद्दल आम्हांला पूर्ण भरंवसा आहे. आम्हांला चिंता वाटतेय ती फक्त त्याच्या भवितव्याची ! त्याने नोकरीचा राजीनामा तर दिलेलाच आहे. पण पुढे येवढे आयुष्य पडले आहे तेव्हा तो यानंतर करणार आहे तरी काय हेच आम्हांला काही केल्या कळेनासे झालेय्. माधवला विचारले तर तो म्हणतो की उर्वरित आयुष्य गुरुदेवांच्या मार्गदर्शनाखाली व सहवासात घालवावयाचे त्याने ठरवले आहे. पण, येवढ्यावरून आम्हांला तरी काहीहि अर्थबोध होत नाही. आमची आपली अशी समजूत आहे की हे त्याचे करणे म्हणजे नसत्यापाठीमागे, काल्पनिक गोष्टीमागे नुसते धावणे आहे झाले ! तो आमचा सर्वात लहान नि आवडता भाऊ आहे. तेव्हा आम्हाला आपले वेड्यासारखे वाटते की त्याच्या जीवनात विफलता उगवू नये. त्याने सुखी असावे. मग तो जगाच्या पाठीवर कुठेहि का असेना व काही का करीना. आमची खात्री आहे की, तुम्ही त्याची देखभाल चांगलीच कराल. आणि जेव्हा जेव्हा आमची गरज लागेल तेव्हा आमच्या मदतीचा स्वीकार तुम्ही केलात तर आम्हांला त्यात कृतकृत्य झाल्यासारखेच वाटेल. आमच्या मातापित्यांचीही शेवटची हीच इच्छा होती की, माधवचे भवितव्य तुमच्या हाती सुपूर्त करावे. त्याप्रमाणे तुमच्याबरोबर त्याने जाण्यात आमचा यत्किंचित्हि विरोध नाही." गुरुदेवांचा चेहरा गंभीर झाला. ते म्हणाले, "माझ्याबद्दल तुम्ही जो कमालीचा विश्वास दाखविलात

याबद्दल मी तुमचा आभारी आहे. तुमची माझ्यावर श्रद्धा असेल नि माधवचे भले करण्याच्या माझ्या सामर्थ्याबद्दल संदेह नसेल तर त्याच्या कल्याणाबद्दल अगर स्वास्थ्याबद्दल तुम्ही निश्चित असा. तुम्हीच कबूल करता त्याप्रमाणे तुमच्या मातापित्यांनी माधवची जिम्मेदारी माझ्यावर सोपवली आहे; आणि त्यांच्या इच्छेप्रमाणे तुम्ही त्यांचे सुपुत्र वागतहि आहात. त्यांच्या इच्छेआड येणार नाही आहात. माधवच्या गाठीं ऐहिक अनुभव पुष्कळच आला आहे; व मला तरी निदान त्याच्यापासून काहीहि मिळवावयाचे नाही. माझ्या माहितीप्रमाणे गूढवादाचा मूलगामी शोध घेण्याचे त्याने ठरविले आहे. अध्यात्मशास्त्रात अवगाहन करून ते आत्मसात् करण्याचा त्याने निश्चय केला आहे; नि सत्याचा शोध घेण्याचा चंग बांधला आहे. या त्याच्या उद्दिष्टसाध्यात मला थोडाफार हातभार लावता आला, म्हणजे मी माझे कर्तव्य केल्याचा आणि त्याच्या पित्यानी माझ्यावर सोपवलेले काम पुरे केल्याचा, मलाहि आनंद मिळणार आहे. तो नि मी जोपर्यंत एकत्र आहोत तोपर्यंत त्याची सर्वतोपरी काळजी मी घेईन. पण, काही कारणाने त्यानेच माझ्यावेगळे, एकाकी आयुष्य कंठायचे ठरविले तर त्याच्या आड मात्र मी येणार नाही. काहीहि झाले तरी माझे निर्णय मी त्याच्यावर लादणार नाही किंवा माझी इच्छा पाळण्याची त्याच्यावर मी सक्ती करणार नाही. मी एवढे आश्वासन देतो की, त्याच्या जीवनक्रमात जेव्हा जेव्हा काही बदल होईल तेव्हा तेव्हा, ताबडतोब तुम्हाला मी तो बदल जरूर कळवीन. तुमच्या सर्वापेक्षा अगदी वेगळ्या प्रकारची माधवच्या जीवनाची घडण घडली आहे. हे तुमच्या लक्षात एव्हाना आले असेलच. त्याचे कारण व्यक्तीव्यक्तीला जीवनात निरनिराळी भूमिका पार पाडायची असते हे आहे. माणसाच्या आयुष्याची घडी बसवण्यात ज्याला प्रारब्ध किंवा दैव किंवा कर्मगती म्हणून म्हणतात तिचाहि हात असतो—तो असा. मनुष्य प्रथमतः हे मानणार नाही. परंतु, प्रामाणिकपणे जर तो अवलोकन करील व जीवनातील निर्णायक

घटनांचा नीट अन्वय लावील तर त्याला हे मान्य करावेच लागेल. तुमची जर अशी कल्पना असेल की स्वामीजी किंवा मी माधवच्या आयुष्याशी कुठल्यातरी बंधनाने निगडित आहोत; नि आम्हांला त्याचे जीवन घडवायचे आहे. तर ती गोष्ट निखालस खोटी आहे. आम्हांला त्याच्या जीविताशी काहीहि कर्तव्य नाही. तुम्ही त्याला दैव नाव द्या की तुम्हाला जे प्रिय वाटेल ते नाव द्या, तुमच्या–माझ्यापेक्षाहि प्रभावी अशी आणखी वेगळीच शक्ती त्याचे जीवन घडवीत आहे. पुढील आयुष्यात काय लिहिले आहे हे कुणीच कुणाला सांगू शकत नाही. कारण, आपण सर्वच त्याबाबतीत संपूर्ण अज्ञानी आहोत. पण, मला खात्रीपूर्वक वाटते की, माधवच्या जीवनात कुणाला कल्पनासुद्धा करता येणार नाही असे काहीतरी भव्योदात्त नि महत्तम घडायचे आहे. यापेक्षा, या क्षणी, मला आणखी काही बोलता येत नाही पण, कुठल्याहि–क्षेत्रात का होईना, त्याला देदीप्यमान सुयश लाभो एवढेच मी चिंतितो." माझे दोघेहि बंधू यावर काहीच म्हणाले नाहीत. दोन दिवसांनी, दोन्ही बंधू कुटुंबियांसहित मुंबईला परतले. मी घरात नसताना जवळ जवळ दोन तासपर्यंत माझ्या बंधूंचे नि गुरुदेवांचे काहीतरी खलबत झाले. मला मागे ठेवून जाताना माझ्या दोन्ही बंधूंच्या डोळ्यांत अश्रू जमा झाले; भारत संचारानंतर मी त्यांना भेटण्याचे आश्वासन देऊनहि त्यांना दु:खावेग आवरेना. बहुतेक माझ्या आश्वासनावर त्यांचा विश्वास बसला नसावा. बंधु गेल्यानंतर दुसऱ्या दिवशी घराला कुलूप ठोकून मीही गुरुदेवांसह बंगालकडे प्रयाण केले. प्रवासांत तसे विशेष काहीच घडले नाही. आम्ही कलकत्त्याला सुखरूपपणे येऊन पोहोचलो.

● ● ●



# साद देती हिमशिखरे ....

## चौथा भाग

...ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ... ५९८ ... विः ... प्रवास
... ५४७ ... नों दि ... २३।१।५८

# १

माझी कल्पना अशी होती की कुठल्यातरी बंगाली सद्‌गृहस्थाकडे किंवा मारवाडी व्यापाऱ्याकडे आमचा कलकत्त्याला मुक्काम पडेल. पण, माझा अपेक्षाभंग झाला. कारण, गुरुदेव नि मी एका देवालया-लगतच्या चांगल्या बंदिस्त इमारतीत उतरलो होतो. त्या इमारतीचे नाव होते 'आनंदाश्रम', त्यात एक संन्यासी राहात असे; आणि त्या आवारातहि अनेक साधु व संन्यासी राहात असत, उतरत असत. आमचे यजमान कृष्णानंद महाराज म्हणजे, बंगालमध्ये एक सुप्रसिद्ध व्यक्ति होती; ब्रह्मचारी होते ते. गुरुदेवांचा नि त्यांचा चांगलाच घनिष्ट संबंध असावा. आम्हांला पाहाताच त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद इतका सुस्पष्ट होता की गुरुदेवांची बडदास्त जास्तीत जास्त चांगली ठेवण्याची त्यांची खटपट पाहून मला तरी आश्चर्य वाटले नाही. तेथे असलेल्या संन्यासी व साधूंशी गुरुदेव इतके मिसळून गेले की गुरुदेवांबद्दल त्यांनी दाखविलेला आदर ठीकच होता. मला मात्र सारे वातावरण नवखे असल्यामुळे चुकल्या-चुकल्यासारखे वाटत होते. त्या साधु-संन्याशांची राहाणी मला इतकी अस्वच्छ वाटली की कुठून

या घाणीत येऊन पडलो असे मला झाले. अशा लोकांत मी किती काळ राहू शकेन याबद्दल माझी मलाच शंका येत होती. अर्थातच माझ्या शिक्षणाचा नि आतापर्यंत ज्या वातावरणात मी वाढलो-राहिलो त्याचा हा परिणाम होता.

माझ्या मनाची ही अवघडलेली स्थिति गुरुदेवांच्या लक्षात आली असावी, तरीहि त्याबद्दल त्यांनी अवाक्षर काढले नाही. गुरुदेव व साधु-मंडळी यात अनेक विषयांवर गप्पागोष्टी चालायच्या, पण मी स्वतःला, त्या सर्वांपासून अलिप्त ठेवले होते. मी त्या गप्पात भाग घेत नव्हतो. शनैः शनैः इतरांच्या आग्रहाने नि रोजच जे माझ्या सहवासात येत त्यांच्या प्रयत्नाने, मी गप्पात भाग घेऊ लागलो; नि सात-आठ दिवस लोटल्यावर मी त्या वातावरणात मिसळूनहि गेलो. हळूहळू त्या जीवनाशी समरस होऊ लागलो. आता मला त्या जीवनाची सवय होऊ लागली होती; नंतर मग माझ्या लक्षात आले की ही मंडळी ज्या तऱ्हेचे जीवन व्यतीत करत आहेत त्यापाठीमागे प्रतिकूल परिस्थिति किंवा साध्या राहणीचा हट्ट वगैरे काही नसून मनुष्यामध्ये जो अहंकार-मी कोणीतरी आहे-असा दंभ अगदी वज्र-लेप होऊन बसलेला असतो, तो कमी करणे हाच त्यात हेतु अभिप्रेत आहे. आध्यात्मिक जीवनात याला वेगळेच शैक्षणिक महत्त्व आहे. गुरुदेवांनी मला इथे का आणले ते आता माझ्या लक्षात आले. राज-शाही वातावरणात राहण्यापेक्षा आश्रमात येऊन राहण्याचा हा हेतु स्पष्ट होता. कलकत्त्यातील धनाढ्य लोक आश्रमात येत होते. गुरु-देवांनी आपल्याकडे यावे म्हणून ते आग्रह करीत; पण, या ना त्या निमित्ताने गुरुदेवांनी त्यांच्या निमंत्रणाचा इन्कार केला, त्यांच्या वाऱ्यालाहि उभे न राहण्याचा गुरुदेवांचा ठामपणा स्पष्ट दिसत होता. कारण, आमंत्रणे नाकारताना ते ज्या सबबी सांगत त्या मला-तरी फारच क्षुल्लक वाटत. पंधरा दिवसांपेक्षा जास्त दिवस आम्ही कलकत्त्यात होतो. मठातील लोकांशी व वेळोवेळी मठात येऊन जाणाऱ्या साधु-संन्याशांशी मी मिळून मिसळून वागावे असाहि गुरु-

देवांचा मला सल्ला होता. ते स्वतः आमच्या मठाधिकारी यजमानाकडेच राहात. बाहेर कधीच गेले नाहीत. आयुष्यात अशाप्रकारच्या मंडळींशी माझा संपर्क यापूर्वी आलेला नसल्याने,या नव्या वातावरणाचा माझ्यावर काय परिणाम होत आहे, नि मी सर्वांशी कसा वागतो-बोलतो ह्याकडे त्यांचे लक्ष असावे. मठात जे जे मला भेटले ते या ना त्या गुरूचे शिष्य होते; व त्यांचा म्हणून एखादा पंथ किंवा मेळा होता. जीवनाचे हे बहुविध पैलू, नि राहण्या–वागण्या–बोलण्याच्या तऱ्हा अवलोकन करणे हाहि एक मनोरंजक अभ्यासच होता. या सर्वांच्या संगतीत असताना मला आठवले की, प्रत्येक साधु अगर संन्यासी, स्वतःला काय ते सत्य समजले आहे; आपणाला सिद्धी प्राप्त झाल्या आहेत असे म्हणत असला, तरी अध्यात्म शास्त्रांची सुस्पष्ट व स्वच्छ कल्पना, जी मला माझ्या गुरुदेवांमध्ये अगर स्वामींजीत आढळली, ती त्यांपैकी कोणांतहि आढळली नाही. ही मंडळी चाचपडत होती तर स्वामीजी व गुरुदेव यांच्या पुढे सारे कसे स्वच्छ, स्पष्ट, अविकल्प होते. माझ्या मते, भोवतालचे साधुसंताचे जग हे कुणाचे तरी शिष्यत्व पतकरून चालले होते; आखून दिलेल्या चाकोरीत ती मंडळी हिंडत होती; नि पुस्तकातून–अगर पोथ्या-पुराणातून जे वाचले किंवा कथा-कीर्तनातून ऐकले ते साधायचीच फक्त त्यांची धडपड होती. तिथे बौद्धिक स्वातंत्र्य नव्हते, तर बुद्धि गहाण टाकून सर्व अंधपणे चालले होते. त्यात गूढाचा शोध घेण्याची बौद्धिक भूक अगर तळमळ नव्हती; तर निवळ शारीरिक कसरत होती. काही साधनमार्ग, पूजा-प्रकार किंवा भक्तिभावना यांच्या साहाय्याने कित्येक जणांनी बरीच प्रगति केल्यासारखी दिसत होती; असे त्यांच्यापैकी, कांहीजण, आपले जे अनुभव सांगत त्यावरून वाटे, पण, त्यांना सत्यदर्शन, आत्मदर्शन किंवा पारमार्थिक दर्शन ओझरते का होईना, घडले होते असे मात्र दिसले नाही. ज्यांच्याशी माझा निकटचा संबंध आला होता, त्यांनी गुरुदेवांपासून मी काय शिकलो हे पडताळून पाहण्याचा प्रयत्न केला. कारण, त्या सर्वांचे एका बाबतीत एकमत होते की

गुरुदेवांचा साधन मार्गातील अधिकार फारच मोठा आहे; आणि त्यांचे गुरुपद व मार्गदर्शन मिळणे ही परमभाग्याची गोष्ट होय. कित्येकांनी मला अनेक मंत्र शिकविण्याचा प्रयत्न केला तर काही जणांनी चमत्कार करून दाखविले. पण मंत्र–तंत्रांबद्दल मी उदासीन आहे; आणि मंत्राच्या शिवाय चमत्कार घडू शकतात असे मला वाटते, हे ऐकून अनेकांची निराशाच झाली. उलट मीच त्यांच्यावर बिंबवण्याचा प्रयत्न करीत होतो. की जर जीवन चित्–शक्तीचा आविष्कार झाला, नि 'सत्य' दर्शन झाले तर सिद्धी मिळविणे ही मोठी कष्टाची गोष्ट नाही, मला या प्रांतात काहीच समजत नाही असे म्हणून ते मोकळे होत, कारण, त्यांना माझे बोलणे समजणे त्यांच्या आवाक्याबाहेरचे होते. एतावता माझे आश्रमातील दिवस ठीक चालले होते.

कलकत्त्याला आल्यापासून माझ्या प्रकृतीबद्दल व माझ्या ठाव-ठिकाणाबद्दल मी माझ्या वडील बंधूंना दोन पत्रे लिहिली होती. जेवणे संपवून एका सायंकाळी, आम्ही कलकत्त्यातच असताना, एक-मेकांना माहीत असलेल्या संतमहंतांच्या गोष्टी बोलत बसलो होतो. माझ्याबद्दल एका साधूला मोठे कुतूहल होते. त्याने तिथेच बसलेल्या गुरुदेवांना म्हटले, "माफ करा महाशय, पण तुमचे हे शिष्य बोल-ताना वारंवार जीवनशक्ति, चिच्छक्तीबद्दल व आत्मदर्शनाबद्दल उल्लेख करीत असतात. इतर पूजाअर्चनाची, क्रिया–कर्म साधनाची, उपेक्षा करतात, साधकाच्या जीवनात, आमच्या दृष्टीने ती फार मह-त्त्वाची बाब आहे. तेव्हा, क्रिया–कर्म–पूजा–उपासना प्रकार हा कालाचा व शक्तीचा अपव्यय आहे असे तुमच्याही मते ठरते काय ? या साधनांचा दैनंदिन अवलंब केल्याशिवाय ज्ञान व सत्यदर्शन होणे शक्यतरी आहे का ? मंत्राशिवाय सिद्धी प्राप्त होणे कसे शक्य आहे ?" त्या प्रांगणातील गडबड एकदम बंद होऊन, टाचणी पडली तरी आवाज होईल इतकी शांतता पसरली. गुरुदेव आपले मत काय देतात हे ऐकण्याकडे सर्वांचे अवधान लागले. "तुमचा प्रश्न तुम्ही विचारलात

खरा" गुरुदेव म्हणाले, "पण खरे ज्ञान म्हणजे काय, यथार्थ जाणीव अगर अनुभव म्हणजे काय, हे न कळल्यामुळे तुम्ही हा प्रश्न विचारला आहे. तीच गोष्ट मंत्राबद्दलहि. मंत्राचा अर्थ काय, ते कशाकरिता उपयोगात आणायचे, त्यांचे फलित काय, याचाहि तुम्ही थोडादेखील विचार केलेला दिसत नाही. तुमच्यापैकी कित्येकजण मंत्राचा जप करीत असतील, त्यापासून कुणाला फायदाहि दृश्यमान झाला असेल. पण, ते मंत्र कार्यसाधक किंवा परिणामकारक कशामुळे होतात याचा कुणी कधी विचार केलाय् का? तुम्ही जो प्रश्न, ज्या तऱ्हेने, उपस्थित केला आहे तो वाटतो तितका मामुली स्वरूपाचा नाही आहे. माझे त्याबाबतचे होकारार्थी अगर नकारार्थी उत्तर मिळाल्याने त्या प्रश्नाच्या अति गंभीर बाजूची कल्पना सुस्पष्ट व्हायला मदत होणार नाही; की तुमचे तुम्हांला वाटते तसे समाधानहि होणार नाही. त्या प्रश्नाचे उत्तर द्यायचे तर या जगाच्या उत्पत्तीपासून, हे जग आकारात कसे आले, परमात्मा म्हणून ईश्वरस्वरूप म्हणतात ते काय, माया कशाला म्हणतात, विश्वाची निर्मिती कशी झाली; ते तुमच्या, माझ्या अस्तित्वापर्यंत कसे चालले आहे–इतक्या सर्वांचा विचार करावा लागेल. इतका विस्तृत विचार करायचा तर फार वेळ लागेल. तेव्हा एकदम एवढ्या विस्तृत प्रश्नाला हात घालण्यापेक्षा, माझी सूचना अशी आहे की, तुम्ही एखाद्या विशिष्ट घटनेबद्दल, विशिष्ट अपूर्व दृक्‌चमत्काराबद्दल प्रश्न विचारावा. म्हणजे मलाहि त्याबद्दल बोलणे ठीक होईल व तुम्हालाहि मी काय बोलतो ते समजण्यास सोपे पडेल."

त्यावर आमचे यजमान कृष्णानंद महाराजच म्हणाले, "माफ करा गुरुदेव. तुमच्या तोंडून चार गोष्टी ऐकण्याकरीता आम्ही सर्वजण संधि पाहात होतो. तेव्हा, तुमचे विचार जर आम्हांला कळले तर आम्ही स्वतःला फार भाग्यवान समजू." असे म्हणून त्यांनी गुरुदेवांना श्रोतृमंडळात मुख्य स्थानी आसनस्थ होण्याची विनंती केली व इकडे तिकडे विखुरलेल्या श्रोत्यांना त्यांनी गुरुदेवांभोवती बसविले. 'ज्यांना गुरुदेवांचे वक्तव्य ऐकायचे असेल त्यांनी दिवाण-

खान्यात जमावे ' असा त्यांनी आश्रमांत सर्वांना निरोपही पाठविला. थोड्याच अवधीत ती जागा मुंगीला वाव नाही इतकी ठेचून भरली. बहुतांश श्रोतृवर्ग साधु-संन्याशांचा होता. जे थोडे, त्यावेळी, देवळात होते तेवढेच बाहेरचे सामान्यजन. गुरुदेवांनी आपल्या स्पष्ट व कर्णमधुर आवाजात बोलायला सुरुवात केली. त्यांचा शब्दन् शब्द प्रत्येकाला स्पष्ट ऐकू येत होता.

गुरुदेव म्हणाले, " तुमच्या प्रश्नांची उत्तरे देण्याकरिता मी इथे उपस्थित आहे. माझ्या कुवतीप्रमाणे मी त्यांची उत्तरे देईन. तुमच्या वेगवेगळ्या समस्यांची उकल करीन; एक गोष्ट प्रथमतःच स्पष्ट करणे जरूर आहे की काहीतरी निश्चितपणे समजावून घेण्याच्या तळमळीने जे लोक इथे थांबले असतील त्यांच्याकरिताच माझे हे वक्तव्य आहे. तेव्हा, तुमच्या ज्या काही अडचणी, शंका-कुशंका असतील त्या मला कळू देत. " श्रोत्यातून एक आवाज आला, " माफ करा; पण ब्रह्म नि माया म्हणजे काय याचा उलगडा कराल तर बरे होईल. माया जर मिथ्या असेल तर ब्रह्म ह्या सत्यमय ज्ञानाला ती कशी झाकाळू शकते ? मायेमुळे सामान्यजनाला ब्रह्माचे सत्यदर्शन होऊ शकत नाही असे म्हटले जाते. तेव्हा माणसाने या मायेच्या तावडीतून आपली मुक्तता तरी कशी करायची ?" गुरुदेव म्हणाले, " ब्रह्म आणि माया ह्या गूढांची उकल करण्यापूर्वी आपणाला सत् व असत्—खरे नि मायावी काय हे प्रथमतः समजून घ्यायला हवे. माया व ब्रह्म ही दोन्हीहि तत्त्वतः काल्पनिक असल्याने, प्रत्यक्षात दिसणारी नसल्याने, त्यांच्याबद्दलचा समज किंवा ज्ञान शब्दांनी व्हायचे तर उपमा नि रूपकांनीच करून घ्यावे लागेल. कारण, माया व ब्रह्म यांची सुस्पष्ट जाण येणे हा एक अनुभव आहे. आणि व्यक्ति-व्यक्तिगणिक, प्रत्येकाचा अनुभव, व्यक्तिनिष्ठच असणार ! उदाहरणच द्यायचे तर ऊन तळपत असता मृगजल दिसते ते सर्वांनीच पाहिले असेल. तो भास इतका खरा असतो, की ज्याला त्याबद्दलचे पूर्वज्ञान नाही त्याला ते पाणीच वाहात आहे असे वाटते. फार कशाला, कुणी

त्या अज्ञानी माणसाला ते पाणी नाही म्हणून कितीही समजावून पटविण्याचा प्रयत्न करील, तर जे डोळ्याने प्रत्यक्ष दिसतेय तेच ते नाही म्हणणारा नि तसे समजावून देण्याचा प्रयत्न करणाराच मूर्ख ठरेल. तेव्हा, अशा दुर्विदग्धांचे समाधान व्हायचे म्हणजे त्याला स्वतःला अनुभव घेऊन खोटेपण पटणे याशिवाय अन्य मार्ग नाही. फार कशाला ज्याला जीवनशक्ति किंवा चैतन्य किंवा ब्रह्म म्हणतात त्याच्यामुळेच माया ही उत्पन्न होते असे म्हटले तर ते कुणाला पटेल अगर समजेल ?

" सारांश, काय तर मायेचे खोटेपण पटायचे तर ते अनुभवानेच येणारे शहाणपण असल्यामुळे नुसते सांगून समजणारी ती गोष्ट नव्हे. सूर्य जोपर्यंत तळपत आहे तोपर्यंतच मृगजलाचे अस्तित्व; सूर्य उगवण्यापूर्वी किंवा सूर्य मावळल्यावर त्याचे अस्तित्वच नाही. 'माया' सुद्धा तेव्हाच अस्तित्वात येते जेव्हा 'पुरुष' किंवा 'ब्रह्म' चैतन्य जीवनशक्ति जोमात कार्य करीत असते. जास्त स्पष्ट करून म्हणायचे तर जेवढे चैतन्याचे स्फुरण जास्त, कार्यक्षम तेवढे मायेचे अस्तित्वहि सुस्पष्ट ! त्या मृगजलातहि झाडेझुडपे दिसतात; प्रतिसृष्टि तिच्यात उत्पन्न होते. मृगजळ संपले की त्या सृष्टीची नामोनिशाणीही राहात नाही. सूर्य उगवताना तेवढा तीव्र नसतो. त्यावेळी मृगजलहि नसते. पण, जेव्हा तो माथ्यावर येऊन भोवतालची सृष्टि तापून जाते तेव्हाच मृगजलहि सुस्पष्ट होत होत आपल्यापुढे खऱ्याप्रमाणे वाहाताना दिसते. माया नि ब्रह्माचे परस्परावलंबित्व असेच आहे. ब्रह्माबरोबरच मायेचे अस्तित्व व नसतेपण अवलंबून आहे. हीच उपमा पुढे पुढे नेली, अर्थात विषय समजावून घेण्याच्या दृष्टीने, तर सूर्य कधीच उगवत नसतो किंवा मावळत नसतो. पृथ्वी स्वतःभोवती फिरत असताना त्याच्या सामोरी येते किंवा पाठ फिरवते. नि आपण म्हणतो : सूर्य उगवला नि मावळला. वस्तुतः सूर्य आहे तिथेच असतो. कारण, तो अपरिवर्तनीय, अविनाशी, चैतन्यस्वरूप आहे. पण मृगजळ मात्र क्षणजीवि आहे; त्याचा जन्म नि मृत्यू अगर विनाश सूर्याच्या

अस्तित्वावर आहे, सूर्याच्या तळपण्यावर आहे. त्याच अनुरोधाने तुमच्या लक्षात आले असेल की ब्रह्म हे जीवनशक्तिस्रोत–चैतन्यरूप आहे. त्याला जन्म नाही नि मृत्यूहि नाही. पण मायेच्या बाबतीत मात्र ती गोष्ट खरी नव्हे. ज्याला ज्याला जन्म–मृत्यु आहे, आदि–अंत आहे, जे नाशवंत आहे, अनित्य आहे, नश्वर आहे, अशाश्वत आहे ते सर्व थोडक्यात म्हणायचे म्हणजे 'माया'–स्वरूप आहे. मला वाटते, मी हा मुद्दा पुष्कळच सुस्पष्ट केला आहे आणि तो सर्वांना समजलाहि असेल.

"आता प्रश्नाचा उत्तरार्ध विचारात घेऊ. 'ब्रह्मावर मायेचे आवरण कसे? सूर्यामुळे मृगजळ उत्पन्न होते हे आपण पाहिले. मृगजळाचे कारण सूर्य; त्याचे अस्तित्व सूर्यावर अधिष्ठित तसाच त्याचा शेवटहि ! पण तुम्ही जर मृगजळ नीट अवलोकन केले असेल तर त्या मृगजलात ज्याप्रमाणे झाडे–झुडपे दिसतात त्याप्रमाणे त्याच्या पाण्यात सूर्याचे प्रतिबिंबहि उमटलेले दिसते. हा सारा चमत्कार, क्षणभर स्वतःला त्या मृगजलात स्थापन करून, पाहण्याचा प्रयत्न करा. स्वतः सूर्यच ते मृगजळ घडवून आणण्यात स्वतः मश्गूल झाला आहे. ते घडवून आणण्यात स्वतः सूर्यालाच एक विशिष्ट आनंद वाटत आहे; तोच मृगजलात आनंदाने डुंबतो आहे. असे तुम्हाला वाटेल. मृगजळावरील माणसाला हे असे वाटणे त्याच्या अनुभवाप्रमाणे बरोबर असेल कदाचित्. पण वस्तुतः या म्हणण्यात कितपत तथ्य आहे? यात काहीही सत्यांश नाही हे तुम्ही सर्व कबूल कराल. सूर्याला या मृगजळाशी काहीही कर्तव्य नाही; त्याच्या किरणांनी गुंफले गेलेले ते एक फक्त हालते-चालते चित्र आहे. फार काय आपल्यामुळे मृगजळे होत आहेत. याची जाणीवसुद्धा सूर्याला नसते. मग, मृगजळाबाबत त्याला कसला खेद नि खंत? मृगजळ उत्पन्न झाले काय, दिसले काय, नि नाहीसे झाले काय–सूर्याला त्याबाबत कसली आली आहे फिकीर? त्याचप्रमाणे, ब्रह्म-पुरुष, परमात्मा अगर चैतन्य, त्या सत्स्वरूपाला तुम्ही काहीही नामाभिधान द्या, ते

स्वरूप 'माया'जालात कधीही गुरफटत नाही. किंवा 'माया' त्यावर कसलेहि आवरण घालू शकत नाही. तिच्या अस्तित्वाबद्दल ना ब्रह्म-पुरुषाला आनंद किंवा तिच्या नसण्याबद्दल खेद. तिच्या अस्तित्वाची त्याला जाणीवच नसते मुळी.

"आता प्रश्न उरला मनुष्य मायेत गुरफटतो म्हणजे काय नि मायेतून बाहेर कसे पडायचे ? पुनः पूर्वीचीच सूर्य व मृगजलाची उपमा डोळ्यापुढे ठेवा. प्रथमतःच सांगितल्याप्रमाणे मृगजल खरे कुणाला वाटते ? ज्याला त्याचा अनुभव नाही, ज्ञान नाही त्याला. तुमच्या सर्वांच्या पाहण्यातला हा अनुभव आहे की पाण्याने भरलेल्या बादलीत जेव्हा सूर्याचे किंवा चंद्राचे प्रतिबिंब पडते तेव्हा लहान मुलाला वाटते की सूर्य किंवा चांदोबा पाण्यात पडला आहे. यावरून हेच सिद्ध होते की ज्ञान व अनुभव यांच्या समन्वयानेच मायेपासून सुटका होत असते. ब्रह्म आणि माया यांचा परस्पर–संबंध स्पष्ट व्हावा म्हणून केवळ, वरील उपमेचा उपयोग केला आहे. त्यापेक्षा त्या उपमा ताणीत बसून विचार करण्याचे कारण नाही, हे ध्यानात धरायला हवे. इथपर्यंतच्या विवेचनावरून तुम्हाला हे स्पष्ट झाले असेल की मायेला जन्म देणे हा ब्रह्मतत्त्वाचा कधीहि हेतु होऊच शकत नाही. 'ब्रह्म' हा एक चैतन्यस्रोत, शक्ति आहे. आणि अखिल विश्वात ती संक्रमित झालेली आहे. मायेची सृष्टि ही त्या ब्रह्मतत्त्वाच्या कक्षेबाहेरची गोष्ट आहे. म्हणूनच ब्रह्माची शक्ति व प्रभाव विश्वातील सजीव व निर्जीव दोन्ही सृष्टीत दृग्गोचर होतो. म्हणजेच मायेच्या साऱ्या सृष्टीतहि तो आढळतो. या विश्वात असंख्य योनी, व सृष्ट पदार्थ आहेत त्यांचा आकार कसाहि का असेना, अखिल विश्वाच्या सांदीकोपऱ्यातून ब्रह्म व्यापून राहिले आहे. ते चैतन्य वस्तु–वस्तूमध्ये प्राणीसृष्टीमध्ये दिसेल अगर निर्जीव सृष्टीमध्ये अनुभवास येईल ती चित्–शक्ति कधी दृश्यमान होईल, तर केव्हा सुप्तरूपाने ती वसत असेल. पण तिच्याविरहित असा कुठलाहि अवकाशच नाही. हा मुद्दा आणखी स्पष्ट करायचा तर तुम्हा सर्वांना वीज ठाऊक आहे. या दिवाणखान्यात,

आपण सर्वजण बसलो आहोत. इथे, कितीतरी दिवे लागलेले आहेत. विद्युत्केंद्रात किती वीज तयार होते याचे साधारणतः आपणाला ज्ञान नसते, किंवा ते करून घेण्याची दैनंदिन जीवनात आवश्यकताहि वाटत नाही. परंतु, त्या विजेचा किती निरनिराळ्या प्रकारांनी आपण उपयोग करून घेतो ते मात्र आपणाला माहीत असते. बटण दाबले की आपला दिवा लागतो. इस्त्री वगैरे इतर साधने कार्यक्षम होतात. मोठमोठ्या अवाढव्य यंत्रांना गति मिळते. आता कुणी असे म्हणेल की जिथे दिवा जळतो आहे तिथेच फक्त विजेची शक्ति आहे किंवा विजेची उपकरणे अगर यंत्रे जिथे काम करतात तिथेच फक्त विजेचे अस्तित्व आहे. ज्या तारातून ती वीज दिव्यापर्यंत, उपकरणापर्यंत किंवा यंत्रापर्यंत पोचली त्या तारेत तिचे कोठेहि अस्तित्व नाही. तर ते म्हणणं बरोबर होईल का ? निखालस नाही. कारण, त्या तारांतूनच तर वीज वाहात येते; आणि जिथे जिथे त्या तारांना तोंड फुटते तेथे तिचा आविष्कार होतो, तीच गोष्ट ब्रह्म, चैतन्य, ईश्वरी सत्ता यांना लागू आहे. चित्स्वरूप सर्वव्यापक सर्व विश्वात, अणुरेणूत कोंदाटून राहिले आहे. नि त्याच्या अस्तित्वाची जाणीव प्रत्येक सृष्ट पदार्थातून होत असते. यावरून हे स्पष्ट होईल की मायेनेच ब्रह्म प्रगट होत असते. किंवा निराळ्या शब्दांत म्हणायचे तर माया ही ब्रह्माची प्रकटदशा आहे. विश्वातील प्रत्येक वस्तूत ब्रह्मतत्त्वाचा, अगर चैतन्याचा, आविर्भाव तुम्हाला आढळेलच आढळेल. फरक एवढाच की काहीमध्ये तो चैतन्याचा प्रभाव बराच काळ टिकून राहील; तर काहीमध्ये तो क्षणभरच प्रगट होईल. हा फरक पडण्याचे कारण एकमेव हेच की प्रत्येक वस्तूचे घटक वेगवेगळे असतात. अस्सल–कम–अस्सल–मालमसाल्यापासून त्या वस्तूची घडण झालेली असते. पण, प्रत्येक वस्तु, आज ना उद्या नाश पावायची, नष्ट व्हायची हे अपरिवर्तनीय तत्त्व मात्र प्रत्येक वस्तूबाबत खरे आहे, मग नष्ट व्हायला वेळ कमीअधिक लागेना का! जेव्हा विजेच्या दिव्याची झगझगीत तार तुटते तेव्हा, बल्ब काळवंडून पुनःप्रकाश

देण्याचे त्याचे सामर्थ्य संपते. तेथे पुनः उजेड यावा म्हणून आपण विजेचा नवा प्रवाह आणीत नाही तर फक्त बल्ब नवा आणून लावतो. याचाच अर्थ विजेचा प्रवाह अखंड व अव्याहत; अप्रतिहत चालूच असतो नि तो प्रकट होतो फक्त ग्लोब बदलल्यामुळे म्हणजेच नाशवंत गोष्ट बदलल्यामुळे किंवा फुकट गेलेला ग्लोब फेकून देऊन नवा लावल्याने! यावरून सिद्ध हेच होते की ज्या माध्यमातून विजेचे प्रकाशतत्त्व प्रगट होते तो ग्लोब–ही–वस्तु–मुख्य नाही. कारण ती नादुरुस्त होते. तिला एक तर दुरुस्ती लागते किंवा तिचा त्याग करून तिच्या जागी दुसरी वस्तु आणावी लागते. जे काम देईनासे झाले, मृत झाले ते फेकून द्यावे लागते; मूळ विजेचा प्रवाह व त्याची प्रकाश देण्याची शक्ति कायमच असते. हाच न्याय सृष्टि-निर्मितीला लावून पाहिलात तर सारे विश्व निरनिराळ्या आकाराच्या सजीव किंवा निर्जीव वस्तुरूपाने बनलेले असते, त्यांच्यात जीवचैतन्य, प्रकाश, जोम, उत्साह, ज्या चित्‌शक्तीने उत्पन्न होतो ते अनादि–अनंत–सतत स्फुरण पावणारे मूलतत्त्व हे खरे महत्त्वाचे ते चैतन्यच त्या वस्तूंच्या माध्यमाने प्रगट होते.

"आपण असेहि पाहातो. एक बल्ब मंद प्रकाश देईल तर इतर काही त्यापेक्षा जास्त जास्त प्रखरपणे प्रकाश देतील. बल्बच्या प्रकाश-देण्याच्या (कॅण्डल पॉवर) शक्तीवर ते अवलंबून असते. यावरून वस्तुवस्तूतील प्रकाशमान होणारे तत्त्व, ती वस्तु ज्या मालमसाल्याने व युक्तीने बनविली असेल त्यावर अवलंबून असते असेच सिद्ध होते. मानवी जीवनातहि, ज्याच्या चरित्रातून अगर आयुष्यातून ते चैतन्य-तत्त्व जास्त प्रगल्भपणे व भोवतालच्या मानवाला प्रकाश देण्याइतके प्रखरपणे प्रगट होते त्यांना आपण 'अवतार' म्हणतो. महान संत-विभूति म्हणतो. वस्तु बनविण्यात उत्तमोत्तम, सूक्ष्म व शुद्ध पदार्थांचा आपण जितका उपयोग करू तेवढी ती वस्तु सतेज, तल्लख व चित्-शक्तीचा प्रकाश सहजपणे प्रकट करण्यास अधिक कार्यक्षम होईल.

"मानवाचे जीवन जेवढे पवित्र, त्याचे ज्ञान जितके सूक्ष्म, विचार,

समज व अनुभव जितके विशाल तेवढे त्याच्यातील चैतन्य, ब्रह्मतत्त्व, किंवा ईश्वरी पुरुषोत्तमत्व जास्त ठळक होत जाते."

श्रोत्यांतील एकजण म्हणाला, "मध्येच बोलतो याबद्दल क्षमा करा महाराज, तुम्ही म्हणालात की 'माया' ब्रह्मापासूनच उत्पन्न होते; आणि माया तेव्हाच अस्तित्वात येते जेव्हा पुरुष किंवा ब्रह्म किंवा चैतन्य किंवा जीवनशक्ति जोमात कार्य करते. म्हणजे भरतीओहटी-प्रमाणे जीवनशक्ति किंवा चैतन्य यांनाहि प्रगट होण्याच्या दृष्टीने चढउतार असतो असे का समजायचे? का चैतन्य केव्हा केव्हा जागृत असते नि केव्हा केव्हा सुप्त असते असे सुचवायचे आहे आपल्याला?"

गुरुदेव उत्तरले, "माझे बोलणे तुम्ही अवधानपूर्वक ऐकले नाहीत याबद्दल वाईट वाटते. मी स्पष्टपणे सांगितले होते, विषयाच्या स्पष्टीकरणाला सोपे जावे म्हणून उपमा देऊन बोलायचे असते. उपमेची ताणाताण करायची नसते. आपल्या ग्रहणशक्तीवर तुम्ही जर कल्पनांचा साज चढवलात; व मी सांगत आहे त्या विषयाकडे अवधान न देता तुम्हाला त्या विषयाबद्दल जी माहिती आहे असे तुमच्या बुद्धिमत्तेला वाटते, त्या माध्यमातून, मी विषय कसा सांगत आहे, याचाच विचार केलात तर तुम्हांला कोणताच विषय कधीही आकलन होणेच शक्य नाही. तुमच्यापुढील प्रश्नांचे कोडे न उलगडता जसेच्या तसेच—कूटप्रश्न म्हणूनच ते राहील. तेव्हा पुन: तोच प्रश्न अजूनहि अनुत्तरित आहेसे वाटत असेल तर मला एवढेच म्हणायचे आहे की, सूर्याची उष्णता ही नेहमीच कायम आहे. ऋतुपरत्वे त्या तपमानात आपल्याला फरक वाटतो. त्याच्या उष्णतेने जीवनसृष्टि निरनिराळी रूपे घेते. आपण सूर्याची उष्णता ग्रहण करतो, ती बद-लत्या कोनांतून—कधी तिरकी तर कधी सरळ किरणातून ग्रहण करीत असतो—पृथ्वी स्वत:भोवती फिरत असते नि सूर्याभोवतीहि निर-निराळ्या कोनातून फिरत असते. त्यामुळे कालमानाप्रमाणे सृष्टीतील वातावरणात सारखे बदल होत असतात; आणि इतरहि भौगोलिक किंवा तात्कालिक कारणे असतात. सूर्याच्या उष्णताप्रदान करण्याच्या

कार्यावर व शक्तीवर या कारणांचा सुतराम् काहीहि परिणाम होत नसतो. चैतन्याबाबतसुद्धा हाच नियम लागू पडतो. जीवसृष्टीत चलन-वलन होते ते या जीवनशक्तीमुळेच; शून्याकार अवकाशातून ती शक्ति सृष्टीवरील वस्तूंवर संक्रमित होते; नि त्यातूनच 'माया' उत्पन्न होते. सूर्याने मृगजळाला जन्म दिला जातो हे खरेच; पण पृथ्वीच्या प्रत्येक पृष्ठभागावर तो होत नाही तर साहारा वाळवंटासारख्या प्रदेशातच किंवा माळरानावरच ते दृश्य उमटते. मायेचा जन्महि जीवनाच्या पोकळीत उत्पन्न व्हायलाहि काही गोष्टींची आवश्यकता आहेच. परंतु त्यांचा चैतन्याशी काहीही संबंध नाही."

जवळजवळ दोन तासांपेक्षा जास्त वेळ गुरुदेव बोलत होते. आणि त्यांचा खणखणीत आवाज त्या आवारात एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत जात होता व दिवाणखान्यात टाचणी पडली तरी आवाज होईल इतकी शांतता नांदत होती.

त्यावेळी आमचे यजमान कृष्णानंदजी महाराज म्हणाले, "गुरुदेवांनी जवळजवळ दोन तासांवर प्रवचन केले आहे. तेव्हा त्यांना आणखी त्रास देऊ नये हेच उचित. आधीच उशीर झाला आहे. नि कित्येकांना यापुढे घरी पोचायचे आहे." गुरुदेवांकडे वळून ते विनंतिवजा शब्दांत पुनः म्हणाले, "उद्या सायंकाळी ७ वाजता आपण जमूंया. हे सुरू केलेले ज्ञानसत्र पुढ चालवू या." अनेकांना हे वक्तव्य अडथळ्यासारखं वाटले. कारण, गुरुदेवांनी एकंदर विषयच इतक्या सहजतेने व सुंदरपणे मांडला होता; त्यावरून त्यांचे या विषयावरील प्रभुत्व स्पष्ट होत होते. सारी श्रोतेमंडळी इतकी भारावून गेली होती की हे ज्ञानसत्र तसेच पुढे चालावे थांबूच नये असे त्यांना वाटत होते. परंतु, यजमानांनी जे म्हटले तेहि खरेच होते. सभा दुसऱ्या दिवशीच्या सायंकाळपर्यंत स्थगित झाली. दिवाणखाना सोडून जाण्यापूर्वी गुरुदेवांच्या दर्शनाकरिता गर्दी उसळली; पण प्रत्येकाला गुरुदेवांचा चरणस्पर्श साधल्यामुळे लोक समाधानाने घरोघरी परतले होते.

●●●

# २

दुसऱ्या दिवशी सायंकाळी गुरुदेवांचे प्रवचन ऐकायला फारच गर्दी जमली होती. अध्यात्मज्ञानावर गुरुदेव बोलणार आहेत याची गावात कुणकुण लागल्याने त्या सायंकाळी बहुसंख्येने लोक जमा झाले होते. साहजिक दिवाणखान्यात सारा जमाव मावणे शक्य नसल्याने देवळाच्या आवारात मोकळ्या जागेवर सभा भरवली होती. मुद्दाम उच्चासन तयार केले होते; तेथून गुरुदेव आज बोलणार होते. ठीक ७ वाजता गुरुदेव आपल्या स्थानावर येऊन बसले. सर्व आवार खच्चून भरले होते, तेव्हा या टोकापासून त्या टोकापर्यंत गुरुदेवांचे भाषण ऐकू तरी जाईल की नाही अशी पुसटशी शंकाहि माझ्या मनात डोकावून गेली. गुरुदेव शांत नि गंभीर होते नि स्वतःला कसलाहि जास्त ताण न देता ते बोलत होते. गुरुदेव म्हणाले, " कालचा विषय पुढे चालविण्यापूर्वी कालच्याच मुद्यावाबत काही शंका असल्यास त्या विचाराव्या म्हणजे आजचे व्याख्यान सुरू करण्यापूर्वी त्यांचे निराकरण झालेले बरे. श्रोतृवर्गातून एक संन्यासी म्हणाला, " काल आपण माया व ब्रह्म याबद्दल इतके सुंदर विवेचन केले आहे की त्यावद्दल आपले आभार मानावे तेवढे थोडेच. ज्ञानानेच अज्ञानाचा निरास होईल; आणि तोच एकमेव सत्यदर्शनाचा मार्ग आहे. अवतार कुणाला म्हणतात तेहि आपण काल विशद केले. पण प्रत्यक्ष परमेश्वर जर अवताररूपाने या जगात प्रगट होतो, तर हे अवतारी पुरुष वेगवेगळी धर्ममते मांडून, आध्यात्मिक पूर्णता साधण्याचे वेगवेगळे मार्ग सांगतात हे कसे ? यामुळे जगात सुसूत्र विचारसरणीचा प्रादुर्भाव होण्याऐवजी गोंधळच जास्त माजला असं नाही का आपणाला वाटत ? अशा स्थितीत सामान्य माणसाला एका विशिष्ट अवतारी पुरुषाच्या सांगण्याप्रमाणे जीवन व्यतीत करायला लागणारी अढळ श्रद्धा उत्पन्न करणे किती दुरापास्त होते ?"

गुरुदेव म्हणाले, " ज्यांना खरे ज्ञान प्राप्त होऊन, निःसंदेहस्थिती

आत्मसात झाली आहे, व सत्याचे दर्शन झाले आहे त्यांनाच अवतार; महात्मे, महान योगी वा महर्षि म्हणतात. ते या पदाला पोचले याचे कारण त्यांनी जीवनाचे सर्व पैलू 'जाणले'; व ते जाणण्याचे विशेष शास्त्र आत्मसात केले म्हणून! ज्ञानसंपादनाचे, अगर जीवनातील सत्याचा शोध घेण्याचे जे मार्ग आहेत, ते मार्ग किंवा त्या वाटा ज्याच्या त्याने शोधायच्या असतात. तो एक आत्मसंशोधनाचा प्रकार आहे. आपल्या अंतर्यामीं वेळोवेळी वेगवेगळ्या स्वरूपात उठणारे तरंग, उठतात कसे, याचे सूक्ष्म अवलोकन, मनाच्या चाललेल्या उलाढालींचे व हालचालीचे सम्यक् ज्ञान म्हणजेच अध्यात्मातील 'जाणणे.' फार थोड्यांच्या बाबतीत ही 'जाण' जन्मतःच किंवा तदनंतर आपोआप उदय पावलेली आढळते; तर अनेकांच्या बाबतीत प्रदीर्घ तपाचरणाचे व तैलबुद्धीचे व चिकाटीने केलेल्या आत्मविश्लेषणाचे व आंतरिक तळमळीते ते फलित असते. सर्व अवतारी पुरुषांचे अनुभव, व त्यावर त्यांनी बसवलेले आपले आडाखे यांत तत्त्वतः फारसा फरक आढळत नाही. फरक असलाच तर ते आडाखे ज्या तऱ्हेने ते जगापुढे मांडतात त्या तऱ्हांमध्ये, पद्धतीमध्ये असतो.

"पद्धतीतील हा फरक अवतारागणिक वैयक्तिक असतो; आणि तसा तो फरक पडतो याचे आणखीही कारण तो विशिष्ट काल, ती, विशिष्ट परिस्थिती वातावरण, विशिष्ट सामाजिक चौकट हेही असते. तेव्हा अवतारकार्यातील तात्त्विक बैठक, मुख्य बैठक कशी आहे तिला महत्त्व आहे. पद्धति गौण आहे. पण होते काय की, सर्वसामान्यतः तत्त्वापेक्षा तत्त्वाची मांडणी कशी केली गेली आहे या पद्धतीला महत्त्व दिले जाते; आणि मत–मतांचा गलबला माजतो तो यामुळे. संतांची शिकवण आणि त्यांनी प्रसृत केलेली विचारधारा वस्तुतः असते एकच. परंतु, त्यांचा भक्तगण शिकवण विसरतो. विचारधारेचे पावित्र्य व प्रभावीपणा दुर्लक्षिला जातो व बाह्यावडंबराचा मात्र अतिरेक होतो. मुख्य हेतु व तत्त्व राहाते बाजूला व कर्मकाण्डाचा पसारा मात्र वाढत

जातो. आपले अनुयायी असे काही करतील याची या संतांना कल्पनाही नसते.

"आता प्रश्न उरतो की तथाकथित साधुसंतांनी खरोखरच काही समाजहिताचे कार्य केले आहे का ? त्यांच्या शिकवणींनी सर्वसामान्य मनुष्याचा किंवा मानवाचा उद्धार झाला की जे केवळ या अध्यात्म-मार्गात होते त्यांचेच फक्त हित झाले ! ज्यांनी मृगजळ पाहिलेच नाही त्यांची भलावण ज्यांनी ते, एकदा का होईना, पाहिले असेल ते नक्कीच करू शकतील—म्हणजेच ज्याला ज्ञानाचा अत्यल्प का होईना कण चिकटला तो अज्ञानी माणसाला त्याच्या कुवतीप्रमाणे, अत्यल्प प्रमाणात का होईना, 'ज्ञानप्रकाश' देऊ शकेल. पण संपूर्ण ज्ञानकला संपादन करून 'ज्ञानी' होणे हा एकमेव वैयक्तिक अनुभव आहे. तो कुणी कुणाला आपल्याजवळचा काढून देऊ शकणार नाही. संत हे साधकांचे पांगुळगाडे होऊ शकतात. चालायला शिकवण्यापर्यंत त्यांची मर्यादा, मग ज्याची त्यानेच पावले टाकायची असतात. तीच गोष्ट या ज्ञानमार्गाची व 'ज्ञानी' होण्याच्या अनुभवसंपादनाची आहे. दुसरे उदाहरण देऊन हाच मुद्दा स्पष्ट करायचा तर ज्याला झोप लागून स्वप्न पडले आहे अशा माणसाची गोष्ट घेऊ या. स्वप्नात आढळणारे दृश्य व त्यामुळे उत्पन्न होणाऱ्या सुखदुःखाच्या संवेदना इतक्या खऱ्या असतात की स्वप्नी त्या जगात सुखेनैव रमलेला असतो—आपोआप जाग येईपर्यंत किंवा त्याला कुणीतरी उठवीपर्यंत ! याचाच अर्थ स्वप्नाला धक्का द्यायला काहीतरी घडावे लागते. स्वप्नाबाहेरचे कसले तरी साहाय्य लागते. हालवून अगर आवाजाने दचकून तरी मनुष्य जागा व्हायला पाहिजे किंवा स्वप्न संपून तरी माणसाला जाग यायला हवी.

"तीच गोष्ट प्रत्यक्ष आयुष्यातहि अनुस्यूत आहे. अंतिम सत्याचे ज्ञान व्हायला तीन गोष्टींची आवश्यकता आहेच. आपण जगतो ते स्वप्न आहे याची जाणीव होऊन अज्ञानाची झोप अगर झापड साफ उडून जागृति येण्यासारखे काही तरी आयुष्यात घडले पाहिजे, काही

तरी झाले पाहिजे म्हणजे अज्ञानांधःकारातून ज्ञानज्योतीने प्रकाशमान झालेल्या जगात त्याला प्रवेश करणे भाग आहे. एखाद्याच्याच सुयोगाने अशी ज्ञानजागृति आपाततः होऊ शकते.

"दुसरी शक्यता म्हणजे ही झोप नाहीशी व्हायला बाह्य मदत मिळणे. त्याकरिता एकाच गोष्टीची अत्यंत आवश्यकता असते नि ती ही की अवधानपूर्वक ऐकणे—सार्‍या इंद्रियांचे कान करून ऐकणे ! ही जागृति आत्मसात करण्याचे तळमळीचे व कळकळीचे प्रयत्न ज्यांचे असतील, त्यांना साहाय्य करायला अनुभवी, मानवहितैषी साधुसंत नेहमीच तयार असतात. त्यांच्या ह्या मदतीचा फायदा कितपत होईल हे मात्र झोपणाराच्या ग्रहणशक्तीवर व त्याच्या झोपाळूपणाच्या चिवट अगर बिनचिवट सवयीवर अवलंबून असते. झोपलेल्यांना जागे करता येईल. पण झोपेचे सोंग घेणार्‍यांना कोण कसा जागे करील असे म्हणतात, ते अशाच दुर्विदग्ध सूर्यवंशीयांना उद्देशूनच ! साधुसंतांचा ज्ञानसूर्य उगवला, डोक्यावर आला तरी यांची झोप उडत नसेल तर काय व्हावयाचे ? साधुसंताच्या शिकवणीने व मार्गदर्शनाने ज्यांचा फायदा झाला ते साहजिकच साधुसंतानी दिलेल्या मदतीचा उल्लेख कृतकृत्यबुद्धीने करीत असतात. एकाला ते साहाय्यकारी वाटतील, तर उलट, अनेकांना साधुसंतांची नसती कटकटहि वाटेल ! तेव्हा ज्यांना ज्ञानाची जागृतीच आली नाही; किंवा जागृति येऊनहि जे अज्ञानजन्य सुखासीन जीवनाची-आंथरुणाची ऊबच सोडायला तयार नाहीत अशा लोकांनी संतांच्या कार्यावर अभिप्राय दिला तर तो कसा असेल ते वेगळे सांगायची गरजच उरत नाही. त्याचप्रमाणे झोपेत असलेल्यांनी किंवा आंथरुणात लोळणारांनी जागे झालेल्यांवर टीका करणे तेवढेच मूर्खपणाचे ठरेल. यावरून एकच गोष्ट स्पष्ट होत नाही का की, ज्यांनी वेळीच जागे होऊन ज्ञानसूर्याचे दर्शन घेतले ते सामाजिक दृष्ट्या किंवा मानवतेला उपकारकच ठरले. कारण, सत्याचा शोध घेणारांना ते तळमळीने शोधणार्‍या साधकांना त्यांनी उत्तम उदाहरण घालून दिले असे होईल.

" तिसरा पर्याय उरला तो स्वप्नच संपण्याचा; नि त्यामुळे निद्रिस्ताला जाग येण्याचा. अशांच्या बाबतीत काळ नि वेळेचा प्रश्नच येत नाही. कल्पांतापर्यंत यांना कदाचित थांबावे लागेल; जेव्हा आयुष्यातील सारी स्वप्ने संपून जातील ! "

" असं जर आहे " एक म्हणाला, " तर अशांचा उद्धार कल्पांतापर्यंत व्हायचाच नाही. 'संभवामि युगे युगे' म्हणवणाऱ्या भगवंतांचा अथवा संत-महंताचा मानवतेच्या दृष्टीने उपयोग तो काय राहिला ? "

गुरुदेव म्हणाले, " ज्याप्रमाणे आपाततः जागृति येऊन ज्ञानमार्गात प्रवेश करणाऱ्या अत्यल्प भाग्यवंतांचा आपण विस्ताराने विचार केला नाही त्याचप्रमाणे नियमाला अपवाद असतातच, या न्यायाने कल्पांतापर्यंत थांबावे लागणाऱ्या झोपाळू अज्ञान्यांचाहि मुद्दाम वेगळा विचार करायला नको. तुम्ही लाख म्हणाल झोपून राहायचे. पण भोवती जेव्हा निरनिराळे आवाज होऊ लागतात किवा खडखडाटांचा कल्लोळ माजतो तेव्हा तुमची झोप उडून जाऊन किंवा झोप लागणे अशक्य झाल्याने, त्रासिकपणे का होईना तुम्ही उठताच ना ! मानवी आयुष्यातहि असंच घडतं. तुमची इच्छा असो वा नसोः अशा काही घटनांचा बनाव भोवती घडत असतो की त्या कटकटीने तुमची झोप साफ उडते. साधु–संतांच्या शिकवणीचेहि असेच असते. त्यांच्या संदेशातील प्रखर सत्य, अपरोक्षपणे भोवतालच्या वातावरणात असा प्रभावच उत्पन्न करीत असते की, तुम्ही आपले नाक–कान–डोळे कितीही बंद करून चालायचे ठरवलेत तरी मानवतेला सत्यशोधनाच्या धडपडीत त्यांचा उपदेशाचा प्रकाशच मार्गदर्शक ठरतो. येथे, पुनः काळवेळ ही गौण असतात. आता, प्रश्नाचा शेवटचा भाग म्हणजे संतांच्या शिकवणुकीने जगात सामान्य मनुष्याच्या जीवनात मतामतांचा गोंधळच उत्पन्न केला–हा आरोप. तोहि निखालस खोटा आहे अज्ञानजन्य आहे. भोवती जो गोंधळ माजलेला दिसतो, मतामतांचा गलबला ऐकू येतो; कुणाचा पायपोस कुणाच्या पायांत नाही अशी

अनवस्था दिसते त्याला जबाबदार संत–महंत–अवतारी पुरुष नसून त्यांचे म्हणवणारे भक्तगणंग आहेत. ही भक्तमंडळी आपला स्वार्थ व बडेजाव माजवण्याकरिता संतांच्या शिकवणीतून पंथोपपंथ अर्थांचे अनर्थ व धार्मिक थोतांडांचा प्रचार करू लागतात. महात्म्यांच्या शिकवणुकीचा खरा अर्थ कळला तो फक्त मला. मीच त्यांचा एकमेव सत्‌शिष्य असा अहंकार बाळगणारे कंपू, त्यांतून निर्माण होणारे झगडे, उलटसुलट प्रचार इत्यादींचे पेव फुटते; व लोकांना आपल्या मताकडे वळवून घेण्याचा खटाटोप सुरू होतो. परिणामतः जो तो आपापल्या मताला नि फायद्याला अनुकूल असा त्या शिकवणीचा अर्थ लावू लागतो. वस्तुस्थिति अशी असता चोराला सोडून संन्याशाला बळी देण्याप्रमाणे संतांच्या भक्तगणंगांनी चालविलेल्या गोंधळाचा आरोप संतांवर लादून त्यांना जबाबदार ठरवायचे हे कुठले शाहाणपण ? "

गुरुदेव म्हणाले, " मी माझ्या कुवतीप्रमाणे तुम्ही उत्पन्न केलेल्या समस्येची सर्व बाजूंनी छाननी करून उत्तरे दिलेली आहेत. एखादा मुद्दा अस्पष्ट असेल तर तो आताच स्पष्ट करून घ्या; किंवा एखादा विशिष्ट प्रश्न विचारायचा असेल तर तोहि विचारायला हरकत नाही. मला त्याचे उत्तर द्यायला आनंदच वाटेल. " येवढे बोलून गुरुदेव थांबले. कसलाहि नवा प्रश्न विचारण्यात आला नाही. इकडल्या तिकडल्या जुजबी गोष्टी होऊन ९ वाजता सभा संपली. सर्वंजण बौद्धिक मेजवानी मिळाल्याच्या आनंदात घरोघरी परतले.

दुसऱ्या दिवशी सकाळी ८ वाजण्याचा सुमार असेल मी देवालयात होतो, नि गुरुदेव बागेत बसले होते. दोन बंगाली तरुण आले. त्यांनी माझ्याकडे जरा वेळ पाहिले; नि तडक आतल्या गाभाऱ्याकडे वळून त्यांनी भक्तिभावाने काही मिनिटे डोळे मिटले. काही विशेष कारण नव्हते. तरीही, मी त्यांची हालचाल जरा कटाक्षानेच टेहळीत होतो. ते सरळ माझ्याकडे वळले व त्यांनी मला विचारले, " गुरुदेव ज्यांना म्हणतात ते संन्यासी आपणच का ? " मी हसलो; नि प्रतिप्रश्न केला, " काय हो, ह्या कुडत्या पायजम्यात मी संन्याशासारखा दिसतो

तरी का ? तुमच्या आदरोल्लेखाबद्दल मी आपला आभारी आहे; पण गुरुदेव या नामाला सार्थ होईल अशी ही मूर्ती दिसते का तुम्हाला ? काही हरकत नाही. या, जरा बसा; नि गुरुदेवांजवळ आपले काय स्वरूपाचे काम आहे ते तर सांगाल." त्या दोघांपैकी एक म्हणाला, "आम्ही ऐकले, गुरुदेव म्हणजे एक महान संत आहेत. तेव्हा कुतूहल म्हणून त्यांना भेटायला आलो आहोत आम्ही !" मी त्यावर म्हणालो, "तुमच्या कामाचे स्वरूप काय ते तुम्हाला सांगायचे नसेल तर नका सांगू. पण निवळ कुतूहलाने येवढया सकाळी गुरुदेवांना कोणी भेटायला येईल असे मला नाही वाटत." तेव्हा दुसऱ्याने प्रश्न केला, "त्यांचे सुशिक्षित शिष्य, माधव म्हणून कुणी आहेत असे ऐकले तेच आपण नव्हे ना ?" मी म्हणालो, "वा; तुम्ही माझ्याबद्दल बरीच माहिती मिळविलेली दिसत्येय. पण मी मात्र तुम्हाला ओळखू शकलो नाही. हरकत नसेल तर आपण कोण, आपले नाव काय–सांगू शकाल ?" ते आपली माहिती जास्त उघडपणे सांगायला नाखुष दिसले. तेव्हा, फारसे ताणून न धरता मी सांगितले, "चला आपण बागेत जाऊ तिथे गुरुदेव बसले आहेत."

गुरुदेव एका झाडाखाली अर्धोन्मीलित नेत्र करून बसले होते. आमच्या पावलांच्या आवाजाने त्यांनी डोळे उघडले. "आपल्या दर्शनाकरिता दोन तरुण आले आहेत–" असे मी गुरुदेवांना सांगितले. त्या दोघांकडे आपादमस्तक थोडा वेळ पाहात गुरुदेव म्हणाले, "बसा, माधव इथे उभा असला तरी बिचकू नका. तो माझ्या विश्वासातला माणूस आहे. तेव्हा, तुमचे गुपितहि तो तितक्याच कसोशीने ठेवील." हे शब्द ऐकून त्या दोघांना धक्काच बसला. नि ते जरा बावचळल्यासारखे झाले. गुरुदेव हसले व पुनः म्हणाले, "खरंच सांगतो. माझी किंवा माधवची तुम्हांला भीती वाटण्याचे मुळीसुद्धा कारण नाही. तुम्ही कोण आहात नि तुमचे काय काम आहे हे मी ओळखलेय." दोघेही तरुण चुळबुळू लागले. गुरुदेव म्हणाले, "कशाला खिशातल्या पिस्तुलांना चाचपता आहात ? नको तेव्हा उडण्याची त्यांना

वाईट खोड आहे." गुरुदेवांचा हा शेरा ऐकून तर त्यांच्या चेहऱ्यावर शोध-ज्योत टाकल्याप्रमाणे वारंवार फरक पडू लागला. ते अवाक् झाले; व शेवटीं गुरुदेवांचे त्यांनी अक्षरशः पाय धरले. "शांत व्हा –शांत व्हा आता" गुरुदेव म्हणाले, "नि अगदी कसली म्हणून कसली चिंता करू नका. निर्धास्त असा." ते तरुण म्हणाले, "गुरुदेव, तुमचे दर्शन घ्यावे नि आशीर्वादही मिळवावा म्हणून आम्ही दोघे इथे आलो आहोत. आम्ही काय हेतूने आलो आहोत हे जाणताच तुम्ही, त्या महाकार्यात तुमच्यासारख्या संतांचा सदिच्छात्मक आशीर्वाद हवाय आम्हाला." त्यावेळी बागेत कुणीही नव्हते. नि मुद्दाम येऊन त्रास देण्यासारखे कुणी येणारही नव्हते. नेहमीच्याच शांत व स्पष्ट आवाजात गुरुदेव म्हणाले, "तुम्ही अजून लहान मुले आहात, त्यामुळे तुम्ही काय करीत आहात याची तुमची तुम्हालाच कल्पना नाही. हिंसेने तुम्ही तुमच्या देशाची पारतंत्र्याची बंधने तोडू पाहाता आहात. तुमचा विश्वास आहे की, तुमची संघटना सर्व दृष्टीने संपूर्ण कार्यक्षम असून तुम्ही परकीय सत्ताधाऱ्यांना देशाबाहेर घालवू शकाल. तुमच्या भावनेशी मी संपूर्णपणे सहमत आहे. नि देशस्वातंत्र्याकरिता तुम्ही उभारलेल्या झगड्याबद्दल मला सहानुभूतीच आहे. तुमची देशभक्ति इतकी भव्य, उच्च, नि पवित्र आहे की तिचा आदर झालाच पाहिजे. आपल्या मायभूमीच्या स्वातंत्र्यरक्षणार्थ तुम्ही आपल्या जीवाचे बलिदान करण्याची तयारी केली आहेत हे साधे स्पृहणीय व उदात्त कृत्य नसून, त्याहीपेक्षा त्याचे महत्त्व फारच मोठे आहे. परंतु, परकीयांच्या सत्तेखाली तुमचा देश कसा आला याचा कधी तुम्ही विचार केलाय का? कोट्यवधी भारतीयांवर मूठभर परकीय अधिसत्ता गाजवतात ते कशाच्या जोरावर याचा कधी विचार केलात? तुमचे ईप्सित साध्य होण्याकरिता काही थोड्या परकीयांना कंठस्नान घालण्याने, मग ते राज्ययंत्रणेतील कोणत्याहि दर्जाचे घटक असोत, काहीही साधायचे नाही. कारण, तेवढ्याने राज्यतंत्र खिळखिळे होत नाही, होणार नाही. तुम्ही तुमच्या देशाचे

स्वातंत्र्य घालवून बसलात याची कारणे तुमच्यातील आपापसातील दुफळी. एकमेकाबद्दल हेवेदावे, भांडणे, असूया, सत्तेची अपरंपार हाव, आणि निरनिराळे पंथोपपंथ व जातिजातींनी खिळखिळा झालेला समाज हे आहे. जोपर्यंत स्वातंत्र्यसंपादनाकरिता देशात एकध्येयाने प्रेरित होऊन लोक उठाव करीत नाहीत तोपर्यंत भारताला स्वातंत्र्य मिळणे अशक्य! काय पडेल ती किंमत देऊ; पण देशाकरिता सर्वजण एकत्रित होऊन स्वातंत्र्य लढा लढू अशी जिद्द बाळगून जेव्हा सारा देश उठेल तेव्हाच परकीय सत्तेला राज्य करणे अशक्य होऊन तिला हा देश सोडून मिनतवारीने किंवा जबरदस्तीने जावे लागेल.

"हिंसेने फक्त हिंसा वाढेल; व सध्याची राज्यसत्ता तुमची चळवळ म्हणजे त्यांना आव्हान आहे असे धरून तुमच्याशी मुकाबला करण्याचा प्रयत्न करील. त्या सत्तेचे प्रतिनिधी त्यांच्याजवळ असलेल्या सर्व दमनशक्तीचा, सूक्तासूक्त विचार न करता, ही चळवळ चिरडून टाकण्याकडे ते उपयोग करतील; आणि इतकी भयानक दडपशाही होईल की, राष्ट्राला स्वतंत्र करण्याच्या तुमच्या प्रयत्नांनाच लुळे पांगळे केले जाईल." ते तरुण म्हणाले, "म्हणजे गुरुदेव तुमचे असे का म्हणणे आहे की, आपली भारतमाता कधीच स्वतंत्र होऊ नये?" या प्रश्नात इतकी तळमळ स्पष्ट दिसत होती की, हृदय पिळवटून, पोटतिडकीने ते बोलत आहेत असा भास मला तरी झाला. त्या नव तरुणांकडे—मी मोठ्या आदराने पाहिले. गुरुदेव म्हणाले, "तुम्ही त्रस्त होण्याचे कारण नाही. कारण, भारतमाता निश्चितपणे मुक्त होणार आहे. जो कोणी या मायदेशाला स्वातंत्र्य मिळवून देईल तो या देशात सत्य नि अहिंसेच्या निशाणाखाली सारा देश एकत्र आणील. या शस्त्रानेच तो सरकारी जडयंत्राला खिळखिळे करून, स्वातंत्र्य मिळवून देईल. येत्या २५–३० वर्षांत हे घडून येईल याबद्दल मी तुम्हांला ग्वाही देतो. पण, तो उज्ज्वल दिवस पाहायला तुम्ही असाल असा मात्र मला भरंवसा वाटत नाही. मी तुम्हांला हेही आश्वासन देतो की एक दिवस नक्की उजाडेल की

ज्या दिवशी तुमच्या राष्ट्राच्या इतिहासात तुमचे नाव सुवर्णाक्षरांनी नोंदलेले असेल. माझा सल्ला तुम्हाला मानवणार नाही हे मी ओळखून आहे. पण ही गोष्ट कायमची ध्यानी धरा की भव्योदात्त कामाकरिता केलेले बलिदान कधीही फुकट जात नाही." त्यापैकी एक म्हणाला, "गुरुदेव, तुम्ही म्हणता ते खरे असेलहि. तुम्ही म्हणता त्याप्रमाणे येत्या २५–३० वर्षांत आमची मायभू स्वतंत्र होणार असेल तर त्यासारखी दुसरी आनंदाची गोष्टच नाही–मग तो मंगल दिवस पाहायला आम्ही नसलो तरी बेहत्तर! आमचा झगडा सर्व भारतीयांकरिता आहे. त्यात वैयक्तिक स्वार्थाचा लवलेशहि नाहीं. हातीं घेतलेल्या कार्यात अपयश आले तर आमचा शेवट काय होईल. याची पूर्ण कल्पना आहे आम्हाला. हे सतीचे वाण अंधतेने घेतलेलेच नाही आम्ही." दुसरा म्हणाला, "पण गुरुदेव, आम्हाला एका गोष्टीचा अजूनहि उलगडा झालेला नाही, नि तो हा की, तुमच्यासारखे लोक देशाला पारतंत्र्यापासून मुक्त करण्याकरिता काय करीत आहेत? तुम्हांला स्वदेशाबद्दल प्रेम आहे की नाही?" गुरुदेव म्हणाले, "धीमेपणाने कार्य करीत राहणे हाहि गुणच आहे. तुमच्या अधिरेपणाने कार्याला मदत होत नाही. झाली तर कार्यहानीच होते. कारण, असे पहा. जे उद्याच घडायचे आहे ते काही केल्या आज कसे आकारास येईल?–मग तुमची इच्छा कितीहि तीव्र असो वा प्रामाणिक असो. तुम्हांला सूर्योदय पाहायचा आहे ना, मग आणखी चोवीस तास थांबलेच पाहिजे. तुमच्या तीव्र इच्छा, तुमच्या पवित्र भावना, नि उतावळेपणा अगर अधीरता या कशानेहि दिवस काही लवकर उजाडणार नाही. त्याचप्रमाणे ज्या गोष्टी काही कालांतराने व्हावयाच्या त्या आताच कशा दिसतील?–मग तुमचे प्रयत्न कितीही कसोशीचे असोत वा तुमची इच्छा कितीही प्रबळ असो. अर्थात भोवती जो स्वातंत्र्यसंग्राम चालू आहे, त्याच्या मुळाशी देशस्वातंत्र्यासारखा उदात्त हेतु असल्याने तो प्रयत्न विफल कधीच ठरणार नाही. कारण, स्वतंत्रतेच्या ध्येयाप्रत पोचण्याच्या दृष्टीने या संग्रामाचे अतुलनीय

महत्त्व आहे. माझ्या देशप्रेमाबद्दल गोष्ट काढलीच आहे तेव्हा सांगतो, की जसजशी अनुभवाची कक्षा वाढत जाते ना तसतशी मानवी ज्ञानाची प्रभाहि फाकत जाते. नि देशाबद्दल किंवा मानवतेबद्दल वाटणाऱ्या प्रेमाचे स्वरूपहि विशाल बनत जाते. तुम्ही जेव्हा लहान बच्चे होता तेव्हा तुम्हाला तुमच्या आईवडिलांबद्दल नि घरातील चार भिंतीआड जे जे होते त्याबद्दलच ओढ वाटत होती. प्रेम वाटत होते. आज तुमचे ज्ञान वाढताच तुमच्या प्रेमाचा विस्तार होऊन तुम्हाला तुमच्या आसिंधुपर्वतापर्यंत पसरलेल्या भारत देशाबद्दल व त्यातील कोडोंनी राहणाऱ्या भारतीयांबद्दल तुमचा जीव तिळतीळ तुटतोय. आता जर तुम्हांला तुमच्या माता-पित्यांबद्दल किंवा घराबद्दल, किंवा जन्मस्थळाबद्दल प्रेम वाटते का विचारले तर तुम्हालाच तो प्रश्न फार संकुचित मनोवृत्तीचा व अपमानास्पद वाटेल. कारण, तुम्ही आता समस्त देशबांधवांबद्दल व देशाबद्दल प्रेम बाळगता आहात; त्यात तुमच्या खेड्यातल्या घरासारखी असंख्य घरे सामावली आहेत. तुम्ही जेव्हा राष्ट्रविमोचनाच्या लढ्यात सामील होता तेव्हा तुमच्या खेड्यातील जमिनीच्या तुकड्याकरिता किंवा गाडग्या–मडक्यांकरिता चाललेली भांडणे नि कज्जेदलालीं तुम्हाला कमीपणा आणणारी वाटते; याबद्दल गंभीरपणे विचार करणे हे मनाच्या संकुचितपणाचे लक्षण वाटते. याच सूत्रातून जरा कल्पना करा की ज्याने तुमच्यापेक्षा जास्त अनुभव व ज्ञान मिळविले आहे व त्यामुळे साहजिकच त्याच्या प्रेमाची कक्षा आता अखिल मानवतेवर प्रेम करण्यात परिणत झाली आहे. जात–धर्म–पंथ–देशाभिमान फार काय भौगोलिक मर्यादाहि त्याच्या प्रेमाला राहिलेल्या नाहीत. अशा माणसाला, तुमच्याप्रमाणे, एका जनसमूहाचे दुसऱ्या जनसमूहावरील आधिपत्य असणे याचे महत्त्व तुमच्या इतके तीव्रतर वाटणारच नाही, अर्थात एका बलिष्ठाने दुसऱ्या कमकुवत जनसमूहावर केवळ आपल्या बलसंपदेने, दास्यत्व लादावे असे तो कधीच म्हणणार नाही. किंवा त्याला ते आवडणारेहि नाही. तो याबाबतीत

अशा माध्यमाच्या शोधात जरूर असेल की ज्यामधून समर्थ पक्षाला तो पटवू शकेल की निवळ बळजोरीने एकाने दुसऱ्यावर, समर्थाने असमर्थावर, दास्यत्वाचे बंधन लादणे व्यर्थ–हानिकारक–आहे; निरर्थक आहे. कोणत्याही परिस्थितीत, असा विश्वप्रेमी पुरुष दंडेली किंवा रक्तपाताला प्रोत्साहन देणार नाही, कारण, त्याचे प्रेम अखिल मानवांवर असते. जगातील सर्व सृष्टपदार्थावर प्रेम करण्यानेच, एके दिवशी या अवनीतलावर सुख शांतीची स्थापना होणार आहे; एक दिवस नक्की उजाडणार आहे की ज्यावेळी जगातील एकूण एक मानव प्रेमाचा खराखुरा अर्थ समजू शकेल. महान तपस्वी–संत–महात्म्यांचे जीवनसाफल्य यातच साठविलेले आहे. तेच त्यांचे कार्य नि तेवढाच त्यांचा जगाला उपयोग. माझ्याबद्दल कसलाहि गैरसमज करून घेऊ नका. तुम्ही असाल तिथे माझे प्रेम तुमच्या पाठीमागे असेल." एवढे बोलून गुरुदेव उभे राहिले व देवळाकडे जायला निघालेहि. दोघां तरुणांनी पुनः नमस्कार केला व दुसऱ्या दरवाजाने ते बागेबाहेर पडले.

## ३

दोन दिवसांनी आम्ही जगन्नाथपुरीला जाण्याकरिता कलकत्ता सोडले. आमचे यजमान श्रीकृष्णानंद महाराज व इतर साधूहि आमच्याबरोबर पुरीला आले होते. प्रवासात तसे विशेष काहीच घडले नाही. पण, साधूंच्या मेळाव्यात प्रवास एकंदरीत छान झाला. श्रीकृष्णानंद महाराजांनी देवालयाच्या मुख्य पुजाऱ्याला गुरुदेव येणार असल्याचे आगाऊ कळविले असल्याने स्टेशनवर गुरुदेवांच्या स्वागताला प्रचंड जनसमुदाय जमला होता. गुरुदेवांवर अक्षरशः पुष्पमालांचा खच पडला होता. जगन्नाथ पुरीच्या मंदिराच्या मुख्य पुजा-

ऱ्याचे आम्ही पाहुणे होतो. तेव्हा, आमची सोय पुजाऱ्याच्या अलिशान निवासस्थानी झाली होती. गुरुदेव, मी व श्रीकृष्णानंदजी असे तिघेहि एकत्र राहिलो होतो. आमच्याबरोबर आलेल्या इतरेजनांची व्यवस्था निरनिराळ्या धर्मशाळांतून केली होती.

पुरीला पोहोचताच आम्ही सर्वजण प्रथमतः समुद्रस्नानाला गेलो. जगन्नाथपुरीचा सागरकिनारा प्रेक्षणीय आहे. तो विस्तृत तर आहेच; पण मोठा मनोवेधकहि आहे. जवळजवळ तासभर आम्ही पाण्यात डुंबत होतो. कारण, स्नान करणे मोठे सुखावह वाटत होते. स्नानानंतर दर्शनाकरिता आम्ही परस्पर देवळाकडे गेलो. देवस्थान शेकडो वर्षांपासून उभे असून त्याला ऐतिहासिक पार्श्वभूमि आहे. यात्रिकांचे ते एक सुप्रसिद्ध ठिकाण असून दरवर्षी लाखो लोकांची तेथ ये–जा असते. आमच्या यजमानाने मला मंदिराचा इतिहास थोडक्यात निवेदन केला, व धार्मिक दृष्टया या स्थानाचे महत्त्व केवढे मोठे आहे हे समजावून सांगितले. हिंदुस्थानभर विखुरलेल्या भारतीय संस्थानिकांनी व क्रोडोपतींनी जगन्नाथाला हिरेमाणके व इतर देणग्या कसकशा दिल्या आहेत त्याचीही माहिती त्यांनी मला सविस्तरपणे सांगितली. थोडा वेळ देवळात घालवून आम्ही घरी परतलो. तेथील प्रथेप्रमाणे थेट देवळातूनच देवाचा प्रसाद म्हणून आमचे जेवण आले. जेवणात सर्वच पदार्थ उत्तम असून त्यात वापरलेल्या जिनसाहि 'महाग' म्हणता येतील अशा मौल्यवान होत्या–श्रीमंत होत्या. गुरुदेवांनी अल्पसा प्रसाद ग्रहण केला. आम्ही पोटभर जेवलो.

थोडी विश्रांति घेतल्यावर गाव पाहायला मी बाहेर पडलो. थोडीशी खरेदीहि केली. घरी परत आलो तो संध्याकाळ होऊन बराच वेळ झाला होता. चौकशी करता, गुरुदेव देवळाकडे निघून गेल्याचे कळले. तेव्हा, मीही तिकडेच वळलो. तेथे गुरुदेव व आमचे यजमान भेटले.

देवालयाच्या इमारतीतून आम्ही बाहेर पडत होतो; तेवढ्यात

प्रतिष्ठित घराण्यातली एक स्त्री आरडा ओरडा करीत बेफामपणे हातवारे करीत असलेली आढळली. तिला काही लोक देवळाकडे जबरदस्तीने खेचून नेत असलेले दिसले. एकंदर दृश्यच इतके चमत्कारिक व अपरिचित होते की, ह्या प्रकार आहेतरी काय हे मला तरी समजेना. आम्ही प्रवेशद्वाराच्या पायऱ्यांवर उभे असल्याचे पाहून त्या गर्दीतील काही मंडळी पुढे सरसावली व गुरुदेवांसमोर हात जोडून उभी राहिली. ते म्हणाले " गुरुदेव, आपण महान संत आहात. समोर दिसतात त्या बाई आमच्या नात्यातील आहेत. त्यांना भुतानी झपाटले असल्याने, त्या वेड्यासारखे करीत आहेत. आम्ही त्याना घेऊन येथे मुद्दाम आलो आहोत. आमची नितांत श्रद्धा आहे की आपण त्यांना संपूर्णपणे मुक्त करू शकाल." तेवढ्यात त्या स्त्रीला देवळाजवळ आणण्यात आले, तिचे वेडेचार चालू होते. आरडा-ओरडाहि चालू होता. लोक तर जमा झालेच पण साधु व संन्यासीही जमा होऊन पुढे काय घडते ते पाहण्यास उत्सुक दिसले. सर्वांचे डोळे गुरुदेवांकडे वळले. त्या सर्वांच्या दृष्टीत एक प्रकारचे सापेक्ष कुतूहल होते.

स्वत: गुरुदेव पायऱ्यांवर टेकले; व सर्वांना त्यांनी बसायला सांगितले. आमच्या बरोबर कलकत्त्याहून आलेल्या एका साधूला हाक मारून ते म्हणाले, " झपाटलेल्या या स्त्रीवर तुझ्या मंत्राचा प्रयोग करून सुटका कर." सर्वांची दृष्टि त्या साधूकडे वळली; त्यामुळे तो साधु मात्र गोंधळून गेल्यासारखा दिसला. तो म्हणाला, " गुरुदेव, माफ करा; पण भूतबाधा होऊन झपाटलेल्यांचे भूत काढणारा मंत्र माझेजवळ आहे हे तुम्हाला कसे ठाऊक?" गुरुदेव उत्तरादाखल काही बोलले नाहीत; फक्त हसले. त्या झपाटलेल्या स्त्रीला आवाहन करून ते म्हणाले, " ह्या साधूला भूत उतरवणारा मंत्र येत आहे. माझी खात्री आहे तुमचे भूत काढून टाकायला त्याचा उपयोग होईल."

साधूने त्यानंतर थोडे पाणी घेतले. त्या स्त्रीवर शिपडले व तोंडाने

मंत्र म्हणायला सुरवात केली. ती स्त्री साधूला शिव्या देऊ लागली, पूर्वीपेक्षा जास्तच बेफामपणे वागू लागली आणि जास्तच उर्मट व बेतालपणे त्या साधूशी वागू लागली. असे थोडा वेळ चालले होते; आणि काहीही का कारणाने असेना, ते भूत ताळ्यावर येण्याची लक्षणे दिसेनात. साधु जेवढा जास्त प्रयत्न करी तेवढी ती स्त्री जास्तच बेफाम होत चालली. शेवटी तो साधु हताशपणे म्हणाला, " गुरुदेव, पिशाच्च महाखट दिसतेय, थोडक्या वेळात सहज ते ' झाड '-म्हणजे भूतबाधा झालेल्या झपाटलेल्या बाईला—सोडील असं वाटत नाही. निदान एकदोन दिवस तरी मला त्याला घालवायला लागतील. मौझी खात्री आहे की मी हे भूत उतरवीन खास, मग ते केवढेहि मोठे असेना. " त्या बाईचे नातेवाईक साधूची करणी पाहात तिथेच बसले होते; ते यावर म्हणाले, " आम्ही हे सर्व यापूर्वीही केले आहे. अनेक मांत्रिकांनी आतापर्यंत प्रयत्न करून पाहिले, पण, सर्वांनी हात टेकले आहेत. कारण सगळेच कबूल करतात की, पिशाच्च फार खटयाळ व जबरदस्त आहे—तुम्ही काहीही म्हणा. आम्ही तुमच्याकडे आलो आहोत ते या एकमेव खात्रीने की तुम्ही मनात आणाल तर या पिशाच्चाची हकालपट्टी सहज करू शकाल. या बाईंना हा त्रास कितीतरी दिवसांचा आहे. नि त्यांची स्थिती काय आहे ती तुम्ही पाहाताच आहात. तेव्हा, तुम्हीच कृपा केलीत तर आम्ही तुमचे जन्माचे ऋणी होऊ. त्या बाईची स्थिती इतकी हृदयद्रावक होती, नि एकंदर दृश्यच इतके वेदनामय होते की मी गुरुदेवांना विनविले कीं काहीही करा, या बाईंना या यातनांतून सोडवा एकदाच्या ! कृष्णानंदजी महाराज व आमचे यजमान यांनीहि माझ्या म्हणण्याला दुजोरा दिला. गुरुदेवांनी मांत्रिक साधूला विचारले की, त्यांनी जर भूत उतरवावयाचा प्रयत्न केला तर त्याला त्याचा अधिक्षेप झाल्यासारखे तर वाटणार नाही ना ? साधु—पुरुष अहंमन्य नव्हता; चांगला होता. आणि म्हणून तो म्हणालाहि, " गुरुदेव, आपण अधिकारी व्यक्ति आहात. तुम्हांला बाईंची सुटका करण्यात यश आले तर मला त्यात कसला

आला आहे कमीपणा ? त्यात मला पराजित झाल्यासारखे वाटण्याचे काहीच कारण नाही. हा माझ्या प्रतिष्ठेचा प्रश्नच नाही. ज्याने बाईंना लवकरात लवकर आराम पोचेल ते करणे हाच यावेळी मुख्य प्रश्न आहे. बाईंची स्थिति खरोखरच दयनीय आहे. आणि त्यातून त्यांची लवकर मुक्तता झाली तर मलाहि धन्य धन्यच वाटेल." गुरुदेवांनी त्या बाईकडे दृष्टि रोखली व जबरीच्या आवाजात ते म्हणाले, "खाली बस," बाईंनीही गुरुदेवांकडे जरा वेळ तुच्छतेने व रागीटपणे पाहिले; आणि दातातल्या दातात काहीतरी पुटपुटत शेवटी ती जमिनीवरच बसली. गुरुदेवांनी आपली दृष्टि त्या बाईवर एकदोन मिनिटे रोखली नि म्हणाले, "तू कोण आहेस हे मी चांगले जाणतो. पण, या बाईंना त्रास देण्यात तुझा काय हेतु आहे हे मात्र मला ठाऊक नाही." आमच्या सर्वांच्या आश्चर्याला पारावार राहिला नाही. जी बाई इतका वेळ बेहोष वाटत होती ती बाई उद्धटपणे म्हणाली,"ह्या बाईंनीं माझा घोर अपमान केला आहे. त्याचा सूड म्हणून मी यांना झपाटले आहे. साऱ्या जन्मभर त्यांना सुख म्हणून लागू द्यायचे नाही असे मी ठरवलेय. तिचे जीवन बरबाद झालेच आहे आणि या विश्वात तिला सोडवणारे कोणीही नाही." गुरुदेव मोठ्याने हंसले व म्हणाले, "तू महामूर्ख आहेस. तुला तरी समजतेय का, तू काय बोलतो आहेस ते ? या बाई माझ्या संरक्षणाखाली आल्या आहेत. त्यांना त्रास देण्याची ताकद आता याच जगात काय पण त्यापलिकडील विश्वातहि कुणामध्ये नाही. समजलास ! मुकाट्याने मी आणखी काही कारवाई करण्याच्या आत बाईचा पिच्छा सोडतोस की नाही ?—बोल ! माझ्या प्रश्नाचे उत्तर देण्यापूर्वी दोनदा विचार कर; नि बाईंना सोडून जाण्यापूर्वी तुला काही विचारायचे असेल तर विचार. माझी ही आज्ञा अखेरची आहे; आणि बाईना सोडून तुला गेलेच पाहिजे."

बाईंनी गुरुदेवांच्या डोळ्याला डोळा लावून क्षणभर पाहिले; नि मग पडखाऊ आवाजात त्या बोलल्या, "तुम्ही महान संत आहात.

तेव्हा, तुम्ही कोणत्याही प्रकारे पक्षपाती असून चालणार नाही. माझ्या सारख्या पिशाच–योनीत असलेल्याच्या बाबतीतहि ! तुमच्याकडून मी न्याय अपेक्षितो." गुरुदेव त्यावर हसले व म्हणाले, "अरे तू तुझ्या ऐहिक मिळकतीवरचा ताबा केव्हाच सोडला आहेस; तुझ्या मित्रांना नातेवाईकाना इथेच सोडून तू इहलोक सोडलास. अशा स्थितीत फक्त सूड घेण्याच्या भावनेला मात्र अजून चिकटून राहाण्याची इच्छा धरतोस – हे चमत्कारिक नव्हे का ? वास्तविक सूडभावना बाळगणे हे या जगातहि तिरस्करणीयच नि आता तू ज्या जगात वावरत आहेस त्यातही फारच तिरस्करणीय. खरं म्हणशील तर जितक्या लौकर तूं तुझ्या इच्छा–आकांक्षा–महत्त्वाकांक्षा इत्यादीपासून मुक्त होशील तितक्या लवकर तुझे हे आजचे जीवन आहे त्यातूनहि तू मुक्त होशील."

बाई म्हणाल्या, "माझे सध्याचे जोवन मी मागितलेले नाही. किंवा मला त्याबद्दल कसली आत्मीयताहि वाटत नाही. मी जेव्हा तुमच्या जगात वावरत होतो त्यावेळी तुमच्यासारख्या साधुपुरुषाचा सहवास मला लाभला नाही–ते जग सोडण्यापूर्वी एकदाहि लाभला नाही ! हा काही माझा प्रमाद नव्हे. तुझ्यासारख्या सत्पुरुषांनीच वास्तविक आमच्यासारख्या ज्ञानहतांवर कृपावत होऊन, कोणत्याहि जीवनात आम्ही असलो तरी त्या वासनामय आयुष्यातून आमची सुटका करायला हवी. नुसती प्रवचने नको आहेत. ज्यावेळी मी मनुष्यरूपाने तुमच्या मर्त्य जगात वावरत होतो तेव्हा पुष्कळ ऐकली आहेत प्रवचने नि पुष्कळ प्यायलो आहे उपदेशामृताचे घुटके ! तत्त्वज्ञानाचे वाचन नि अभ्यास मी कितीतरी केलाय्; पण हे लांछनास्पद आयुष्य काही सपून सपत नाही, नुसत्या तत्त्वज्ञानाचा काहीएक उपयोग नाही. जरूर आहे ती रूपपरिवर्तनाची व मोक्षाची. ते रूपपरिवर्तन किंवा मोक्ष, काय म्हणशील ते, घडवून आणण्याचे तुझ्यात सामर्थ्य आहे; आणि तू मनात आणशील तर तो मोक्ष तू मला मिळवून देऊहि शकशील. तेवढी कृपा कर. मग मी तुला आश्वासन देतो की या

बाईंना मी ताबडतोब सोडून जाईन." गुरुदेव म्हणाले, "तू स्वतःला सूड घेण्याच्या भावनेने बांधून घेतोस आणि मलाच सांगतोस त्यापासून मला सोडवा म्हणून-काय मूर्खपणा चालवला आहेस हा ? तू काय करीत आहेस याचा जरा क्षणभर विचार कर; सूड-भावनेचे ओझे फेकून दे; बाईंना एकटी सोड; नि बघ तू मुक्त झाला आहेस की नाही ते. तुझे प्राक्तन संपले आहे, तू जे इच्छिशील ते आता होईल." बाई एकदम उठल्या; व त्यांनी गुरुदेवांचे पाय धरले. गुरुदेवांनी आपले दोन्ही हात त्या बाईच्या मस्तकावर ठेवून तिला अभय दिले. पाठीवरून वात्सल्यभराने थोपटले. ती उभी राहिली; पण प्रयत्न करूनहि तिला स्वतःला सावरता येईना. गुरुदेवांनी तिला आपल्या कवेत घेतली नि तिची शुद्धच हरपली. तिच्या चेहऱ्यावर गार पाण्याचा शिडकावा केला, तेव्हा तिने आपले डोळे उघडले. डोळे उघडून आश्चर्याने तिने सर्वांकडे पाहिले. ती गोंधळली होती व स्वतःच्या केसांकडे व वस्त्रप्रावरणांकडे तिचे लक्ष जाताच तिला विस्मयाचा धक्काच बसला. गुरुदेव म्हणाले, "बेटा, आता कसलीहि चिंता करू नकोस. तूं आता संपूर्णपणे बरी झाली आहेस." आणि त्यांनी तिच्या नातेवाईकांना तिला घरी घेऊन जाण्यास सांगितले.

एकहि शब्द न उच्चारता गुरुदेव उठले व तडक समुद्रकिनारी गेले. कोणीही काही बोलून त्यांना त्रास देऊ नये अशी त्यांची मुद्रा आढळली. तेव्हा इतरांना मी सांगितलेहि की गुरुदेवांना एकटेच राहू द्या. नि मी त्यांच्या पाठोपाठ गेलो.

पुळणीवर गुरुदेवांची व माझी गाठ पडली. नंतर आम्ही खूप दूर-वर चालत गेलो. मी चौकशी केली की, त्यांना कसला त्रास होतोय? की प्रकृति बरी नाही ? त्यावर त्यांनी उत्तर दिले, मला कसलाहि त्रास झालेला नाही की अस्वस्थता वाटत नाही. प्रकृतीलाहि काही झालेले नाही. जरा वेळाने तेच म्हणाले, "माधव, या जगाची नि तुझी फारच थोडी जानपहचान आहे. नि अध्यात्मशास्त्र तर तुला काहीच माहीत नाही. अध्यात्मशास्त्रात नि अतींद्रिय शक्तींच्या

गूढवादाच्या अभ्यासात जर कशाची काळजी घ्यायची असेल तर ती याचीच की लौकिक– सिद्धी किंवा ज्या कृतीने आपण विख्यात होऊ–त्या गोष्टी कटाक्षाने टाळायला हव्या असतात. आता हे स्थान सोडून आपल्याला गेलेच पाहिजे. नाहीतर आपल्याभोवती हजारोंचा गराडा जमेल नि त्यांच्या अनेक व्याधि बऱ्या करण्याकरिता ते गळ घालतील. नियतीच्या गतीमध्ये कोणालाच बदल करता येत नसतो, आणि कोणीहि, कुणालाच, कायमचा आराम अगर रोग विकृतीपासून–मुक्ति देऊ शकत नाही. सर्वसामान्य माणसाला काहीहि समजावून घ्यायला नको असते. त्यांना स्वत:ला मन लावून कसलेहि प्रयत्न करायला नकोत; आयुष्याला शिस्तबद्ध वळण लावून घेण्याची कोणाचीही तयारी नाही; शिकण्याचे कष्ट नकोत, ज्ञानप्राप्तीकरता कसल्याहि हाल–अपेष्टा वा तपश्चर्या करायला नकोत. त्यांना साऱ्या गोष्टी देणगीरूपाने हव्यात. फक्त चमत्कार पाहायला हवेत, फक्त गंमत म्हणून, जिज्ञासा म्हणून बस्स! स्वत:ची दु:खे किंवा त्रास, कष्ट नि अडचणी दूर करण्याकरिता स्वत:च्या जीवनात एवढा एवढा देखील बदल करायची तयारी नसते त्यांची ! मन मानेल तसे बेछूटपणेच वागणे एवढेच त्यांना ठाऊक असते."

आम्हांला घरी परतायला सायंकाळचे ७ वाजले, जेवणे उरकल्यावर आमच्या यजमानांनी विनंती केली की, कलकत्त्याप्रमाणे गुरुदेवांनी चार शब्द येथेहि सांगावेत. गुरुदेव त्या रात्री काही बोलण्याच्या मन:स्थितीतच नव्हते. शिवाय ते तितकेसे प्रवचनाला अनुकूलहि नव्हते. परंतु, आग्रहच असेल तर, थोडा वेळ बसून लोकांच्या काही प्रश्नांची उत्तरे देण्याचा प्रयत्न करीन. तसे करण्यांत मला आनंदच वाटेल, असे ते म्हणाले; तेव्हा, आमच्या यजमानांनी त्यांच्या बंगल्याच्या गच्चीवर एक औपचारिक बैठक घेतली.

जगन्नाथपुरी हे चारधाम यात्रेपैकी एक प्रसिद्ध स्थान असल्याने तिथे यात्रेकरूंची रोजच गर्दी असते. तेव्हा गुरुदेव बोलणार आहेत

ही कुणकुण लागताच रात्री ९ च्या सुमाराला गच्ची भरून गेली–श्रोत्यांनी ! नेहमीप्रमाणे सुरवात करीत गुरुदेव म्हणाले, " तुम्हा, सर्वांच्या इच्छेप्रमाणे मी इथे आपणासमोर बसलो आहे. तेव्हा, तुम्हांला काय विचारायचे असेल ते विचारा. पण, प्रश्न मात्र सुटसुटीत असावेत." श्रोत्यांतून एक आवाज उठला, "गुरुदेव, आज सायंकाळी भुताने झपाटलेल्या बाईची भूतबाधा आपण दूर केली ते दृश्य आम्ही सर्वांनी पाहिले आहे. कृपा करून पिशाच्चबाधा म्हणजे काय व ती होते कशी याचे विवरण केल्यास बरे होईल. पिशाच्च माणसाच्या मानगुटीवर का बसते आणि बाधा झालेल्याच्याच मुखातून आपल्या अतृप्त कामना कशा प्रगट करते ?"

गुरुदेव म्हणाले, " तुमच्या प्रश्नाचे विस्ताराने उत्तर द्यायचे तर फार वेळ लागेल. तरी थोडक्यात मी या प्रश्नाचा उलगडा करतो. लक्षपूर्वक ध्यान मात्र असू द्या. पुनर्जन्म वगैरेच्या भानगडीत मी यावेळी शिरत नाही. परंतु, एवढेच सांगतो ते ध्यानात असू द्या की, मनुष्याचा मृत्यू व पुनर्जन्म यामध्ये भूत–पिशाच्चांची एक अवस्था असते. त्यांचे एक निराळेच जग आहे. काहींना त्या मध्यस्थितीतून अवस्थांतर होण्यापुरतेच त्या स्थितीतून जायचे असते; तर काहीजणांचा मुक्काम त्या अवस्थेत जास्त असतो. कृपा करून असा मात्र गैरसमज करून घेऊ नका की प्रत्येक मृतात्म्याला त्या अवस्थेतून जावेच लागते. पण, काहींना जाणे जरूर असते एवढे खरे; व त्यांच्याचबद्दल फक्त आपण आता बोलणार आहोत. मृतात्मा पिशाच्चभूत–योनीत कशामुळे प्रवेश करतो ? तो प्रश्न प्रस्तुत नसल्याने त्याबद्दल पुढे बोलू किंवा पुन: केव्हा आपणाला एकत्रितपणे गप्पा मारण्याची वेळ येईल तेव्हा बोलू. मनुष्य जेव्हा मरतो तेव्हा जन्मभर त्यानी उराशी बाळगलेल्या तऱ्हतऱ्हेच्या कामना-वासना-भावना-आवडी–नावडी आणि अशाच कितीतरी गोष्टी शरीर मृत होताच, त्याला सोडून जातात. या सर्व अतृप्त वासना भूतपिशाच्च योनीमध्ये अगर मधल्या स्थितीत एकत्रित होतात.

मनुष्याच्या शरीराच्या दोन अवस्था असतात. एक घनस्वरूप नि एक सच्छिद्र. शरीराच्या घनस्थितीतून काही आरपार जाणे कठीण असते पण त्याच्या छिद्रा–रंध्रातून घाम आदि द्रव व वायुरूप पदार्थ सहज जाऊ शकतो. व्यक्ति तितक्या प्रकृति हा केवळ वाक्प्रचार म्हणून खरा नसून, वस्तुस्थिति तशी आहे. मनुष्याचे शरीर असंख्य जालकांनी (Tissues) तंतुमय गुंतवणुकीने बनलेले असते आणि प्रत्येकाचे हे तंतु वेगळे असतात. सर्वसाधारण नियम करायचा तर स्त्रियांचे जालक पुरुषांपेक्षा जास्त सच्छिद्र असतात. अशा सच्छिद्र जालकाचे पुरुषसुद्धा असतात. भूत नि पिशाच्च योनी अदृश्य योनी आहे; कारण ती वायु अगर धुरापेक्षाहि सूक्ष्म आहे. तीच या सच्छिद्र शरीरातून सहजगत्या आतबाहेर वावरू शकते. आणि आपली जरब ती भुते अशा शरीरावर बसवतात. म्हणून भूतबाधा झालेल्यांत पुरुषांपेक्षा स्त्रियांची संख्या जास्त असते. भुते स्त्रियांच्या सच्छिद्र शरीरस्थितीचा व मन:स्थितीचा सुद्धा फायदा घेतात व त्यांना पछाडतात. स्त्रिया या पुरुषांपेक्षां मनाने हळव्या असतात. त्या मनावर सहज परिणाम करवून घेणाऱ्या असतात; त्यामुळे भूत–पिशाच्चे त्यांना पाहिजे तसा त्यांचा उपयोग करून घेतात. अतृप्त वासनांचा भुते हा एक गठ्ठा असतो त्यामुळे भूत ज्यांच्या मानगुटीवर बसते त्या 'झाडा'च्या माध्यमातून ते आपल्या अतृप्त राहिलेल्या गोष्टींचा पाढा वाचते. तृप्ति होईपर्यंत ते 'झाडा'ला सोडून जात नाही. पुष्कळदां सूडाच्या भावनेने पेटलेले भूत अगर पिशाच्च 'झाडा'चा विदारक शेवट करूनच त्याचा पिच्छा सोडते. त्या भूत–पिशाच्चावर तावा मिळविण्याच्या अनेक युक्त्या आहेत; त्यांपैकी एक : मंत्रसामर्थ्य होय. मंत्राचे सामर्थ्य त्याच्या परिणामातून ओळखता येते."

" मंत्राचा परिणाम सर्वच पीडितांवर होत नाही असे आपल्याला म्हणायचे आहे का ? सायंकाळी तुम्ही बाईची भूतबाधा दूर केली ती मंत्राने केलीत की दुसऱ्या काही साधनाने ?" श्रोत्यातून एकाने विचारले. गुरुदेव म्हणाले, " मंत्र हे कुऱ्हाडीसारखे असतात. कुऱ्हाड

ज्या वस्तूवर चालवावी तिचे दोन तुकडे करू शकते. ती जर कठीण पदार्थावर आपटली तर ती स्वतःच दुभंगून निरुपयोगी होते. मंत्रांचेहि तसेच आहे. ज्याच्यावर मंत्र टाकायचा त्या वस्तूच्या सामर्थ्यावर मंत्राचे परिणामकारकत्व अवलंबून आहे. सायंकाळच्या प्रकाराबद्दल म्हणायचे तर हे लक्षात असूद्या की मंत्रापेक्षाहि सामर्थ्यवान् अशा इतर समर्थ कृति आहेत, ज्यानी जगातील मूलतत्त्वाशीहि मुकाबला करता येतो. ज्याला हे विश्व नि ते ज्याचे बनले आहे ती मूलतत्त्वे यांची पुरेपूर ओळख आहे, त्याला मंत्राची जरूरच पडत नाही. त्यांच्याशिवाय त्याला कित्येक गोष्टी लीलया करता येतात. मला वाटते, उपस्थित केलेल्या प्रश्नाचे मी समाधानकारक उत्तर दिले आहे. तेव्हा इत्यलम्. मला आता विश्रांतीची जरूर आहे." येवढे बोलून गुरुदेव उठलेच व सरळ गच्चीच्या पायऱ्या उतरून खाली गेले. मीही त्यांच्या पाठोपाठ गेलो नि त्यांना काही हवे आहे काय याची चौकशी केली. ते म्हणाले, " माधव, जरा आपण बाहेर फिरून येऊ या-समुद्रकिनारी ! "

पुळणीवर आल्यावर मला आढळले की गुरुदेव बोलण्याच्या लहरीत आहेत. ते म्हणाले, " माधव, मंत्रांच्या पाठीमागे लागून अनेक लोक आपल्या आयुष्याचा उगाच अपव्यय करतात. सर्वसाधारणपणे नैसर्गिकरीत्या जे कुणी करू शकणार नाही ते करून दाखविण्याच्या ईर्षेने मनुष्य पेटतो; नि तो या मंत्र-तंत्रांच्या आहारी जातो. सर्वसामान्य जनता अज्ञानी असते. मांत्रिकांच्या कृतींना ते अर्थातच चमत्कार म्हणू लागतात. पण खरे म्हणशील, तर हा काळ, वेळ, व मानवी शक्तीचा निष्कारण होत असलेला अपव्यय आहे. त्याने खरोखरच काहीही साध्य होत नाही. नसता दंभ नि अहंकार मात्र दिवसानुदिवस वाढतो; आणि सारी शक्ति नित्य नव्या फसवेगिरी करण्याच्या लांड्यालबाड्या करण्यात मात्र खर्च होते, त्याने थकवा वाढत जातो. नि मंत्राने जी शक्ति केंद्रीभूत केलेली असते ती झपाट्याने क्षीण होऊन ते अक्षरशः निष्प्रभ होतात. मन एकाग्र करणे

दुरापास्त होते. मंत्र सुफलित होत नाही; नि नंतरचे जीवन इतके भयानक, दयनीय, दुःखमय व कष्टप्रद होते की विचारू नकोस. माझ्या पाहण्यात असे शेकडो लोक आहेत की, ज्यांनी या मंत्रविद्येच्या नादी लागून आपले आयुष्य संपूर्णपणे बरबाद करून घेतले आहे, आणि ही सारी धडपड कशासाठी ? चार लोकांना चमत्कार दाखवून झुलविण्यासाठी, त्यामुळे मिळणारी प्रसिद्धी, नाव, पैसा झगमग यासाठी ! ज्ञानसंपादन करण्याच्या व सत्याचा शोध घेण्याच्या मार्गांतील ही फार मोठी दरी आहे. तेव्हा, मला एवढेच सांगायचे आहे कीं हा अध:पात होऊन, कपाळमोक्ष टाळायचा असेल तर जगाच्या डोळ्यावर येणारे, लोकांना दिपवणारे प्रयोग करण्याच्या मोहात तू कधी पडू नकोस."

मी विचारले, "गुरुदेव, तुमच्या या आदेशाचा अर्थ असा तर नव्हेना की, जर कुणी आपल्या सामर्थ्याचा अगर संपादन केलेल्या गूढ विद्येचा उपयोग चमत्कार करण्यात किंवा एखाद्या रुग्णाइताला बरा करण्यात करील तर त्याला त्याची शारीरिक शक्तिही घालवावी लागते ? नाहीतर तुम्ही म्हणता तो थकवा कुठून व कसा येईल ?"

गुरुदेव म्हणाले, "मन थकले म्हणजेहि शरीराला थकवा येतोच. चमत्काराच्या मागे लागलेला मनुष्य आपल्या मानसिक शक्तीचा एवढ्या मोठ्या प्रमाणात, पण नकळत, उपयोग किंवा अपव्यय करीत असतो की सतत होणारा हा व्यय शेवटी शरीर-सामर्थ्य ढासळून टाकल्याशिवाय राहात नाही. जे अध्यात्मशास्त्रात व ज्ञानमार्गात असतात ते, एक तऱ्हेचा शक्तिसंचय करीत असतात. आणि रोगमुक्तीसारखी चमत्कृतिजन्य आश्चर्ये तेही करू शकतात. अशा माणसांचा सारा उद्योगच इतरेजनांपेक्षा भव्योदात्त असे संपादन करण्याचा असल्याने, साध्या मांत्रिकापेक्षा त्यांची शक्ति कितीतरी पटीने जास्तच असते. परंतु, असली माणसेहि प्रसिद्धी, कीर्ति, नावलौकिक नि त्यापासून मिळणारी संपत्ति नि वैभव यांच्या आहारी जाऊन, सर्वस्व गमावून बसतात. ज्यांच्या जीवनाची अशी

शोकांतिका झालेली आहे, अशी थोडीथोडकी उदाहरणे नाहीत. एकदा या झगझगाटाकडे लक्ष लागले की, ज्या आत्मानंदाकरिता ते या मार्गाला लागले ते आत्मानंदाचे ध्येय दृष्टीआड होते. तेव्हा, या आयुष्यक्रमात पडताना या अध:पातापासून किंवा ध्येयविचलनापासून आपण दूर कसे राहू याची काळजी प्रथमपासूनच घ्यायला हवी. ध्येयाप्रत पोचेपर्यंत इकडे तिकडे पाहायचे नाही असे एकटक चालण्याचा हा अध्यात्मदर्शनाचा मार्ग आहे." मी म्हटले, गुरुदेव, "जेव्हा गुरु आपल्या शिष्याला मार्गदर्शन करीत असतो तेव्हा त्याला आपल्या शक्तीचा व्यय करावा लागतो का? गुरूलाहि त्याच्या सीमित ज्ञानदानशक्तीप्रमाणेच आपली शिष्यसंख्या मर्यादित ठेवणे भाग असते का? तसे जर त्याने केले नाही; तर गुरूला थकवा येईल की नाही?"

गुरुदेव म्हणाले, "तुला जसे वाटते ना, तसे ते खरे नाही. गुरु जेव्हा शिष्याला संथा देतो वा मार्गदर्शन करतो तेव्हा त्याला स्वत:च्या शारीरिक वा मानसिक शक्तीतून उचलून, अगर कमी करून काही द्यायचे असते, असा तो प्रकार नसतोच मुळी. तेव्हा किती शिष्यांना त्याने मार्गदर्शन करायचे ही गोष्ट त्याच्या मानसिक अगर शारीरिक शक्तीवर निर्भरित नसून गुरु स्वत: किती काळापर्यंत शरीराने जगणार यावर, म्हणजे, कालावर ती गोष्ट अवलंबून आहे. दिव्याच्या उजेडात कुणाला उपयोग होवो अगर न होवो तेल असेपर्यंत दिवा जळत राहील. सूर्य ठराविक वेळी उगवेल; ठराविक तास तो उजेड देईल. नंतर मावळेल. नि पुन: तो दुसरे दिवशी पूर्वेकडे उगवेल; उजेडाचा किंवा अंधाराचा कोण किती फायदा घेतो यावर त्याचे उगवणे-मावळणे अवलंबून नाही. त्याचप्रमाणे ज्याला आत्मसाक्षात्कार झाला, किंवा ज्याने ज्ञान संपादन केले व सार्थपणे 'ज्ञानी' हे अभिधान प्राप्त करून घेतले-म्हणून 'गुरुपद' हि मिळविले-त्याला मार्गदर्शन करण्याच्या दृष्टीने शिष्यसंख्येची मर्यादा पडू शकत नाही. तुझ्या मनात असा प्रश्न उद्भवणे साहजिक आहे

की एकाच गुरूच्या सान्निध्यात असलेल्या निरनिराळ्या शिष्यांच्या ज्ञानात समानता का नाही आढळत? याचेहि उत्तर सोपे आहे. पाऊस सगळीकडेच पडत असतो. परंतु पीकपाणी सगळीकडे सारखेच काही आढळत नाही. एका जमिनीत पीक तरारलेले येते. तर दुसऱ्या जमिनीत अक्षरशः खडखडाट आढळतो. का?—तर ती जमीनच नापीक असते. प्रत्येक मनुष्याची घडणहि वेगवेगळी असते. शारीरिक व मानसिक ठेवण माणसागणिक वेगळी असते, तेव्हा गुरु एक असला तरी शिष्यांची बौद्धिक तयारीची पावले वेगवेगळी आढळतात. शिष्यागणिक!"

घरी परतलो तो खूप रात्र झाली होती. दुसऱ्या दिवशी सकाळी दिवाणखान्यात आमच्या यजमानांची नि माझी गाठ पडली तेव्हा आढळले, काहीजण आमच्या यजमानांशी मोठ्या सलगीने बोलत आहेत. माझी नि त्यांची ओळख करून देण्यात आली. ते लोक बंगालमधील बडे जहागिरदार असून जगन्नाथपुरीला आले होते. गुरुदेवांचा त्यांचा अगोदरपासूनचा परिचय असल्याने त्यांना जेव्हा कळले की गुरुदेव इथे आले आहेत तेव्हा त्यांचे दर्शन घेण्याकरिता ते मुद्दाम जमले होते. गुरुदेवांच्या गळ्यात घालण्याकरिता त्यांनी टोपल्या भरभरून हार आणले होते. व त्यांना देण्याकरिता इतर कितीतरी वस्तू आणल्या होत्या. गुरुदेव खाली केव्हा येणार याची त्यांनी माझ्याजवळ चौकशी केली. गुरुदेव काय करीत आहेत हे पाहण्याकरिता मी गुरुदेवांच्या खोलीत गेलो. ते खुर्चीवर स्वस्थ बसले होते; व जवळच्या टेबलावर दूध घेतलेला रिकामा कप होता. मी म्हटले, "गुरुदेव आपल्याला भेटण्याकरिता खाली दिवाणखान्यात लोक थांबले आहेत. आपणाला खाली यायला किती वेळ आहे हे विचारायलाच मी आलो आहे."

गुरुदेव म्हणाले, "तू पुढे होऊन त्यांच्याशी बोलायला सुरवात कर, मी येतोच पाठोपाठ."

मी खाली आलो व गुरुदेव इतक्यातच खाली येत आहेत असे मी जमलेल्यांना सांगितले. अर्ध्या तासाने गुरुदेव आले. त्यांच्या गळ्यात

मोठेमोठे कितीतरी हार घातले गेले. या देणग्यांमध्ये कितीतरी वस्तू होत्या. त्यात प्रमुख म्हणजे एक शालजोडी नि करंडीभरून फळे नि मेवामिठाई होती. त्यांच्यापैकी एकाने माझ्याहि गळयांत हार घालण्याचा प्रयत्न केला. पण, तो मी साभारपणे नाकारला. कारण, मी त्यांना सांगितले की, मी साधुतर नाहीच तर त्यांच्यासारखाच एक मामुली इसम आहे. गुरुदेव जमलेल्यांशी बंगालीत बोलत होते, तरीही थोडयाशा कष्टाने का होईना मला ते काय बोलत होते हें थोडेथोडे समजत होते. गुरुदेवांच्या बोलण्यात आले की पुरीचा मुक्काम लवकरच संपवून त्यांचा बेत दार्जिलिंगला जाण्याचा आहे. त्यावर भेटायला आलेल्यांपैकी एका व्यापाऱ्याने सुचविले की गुरुदेवांनी दार्जिलिंगला त्याच्या बंगल्यात आपला मुक्काम ठेवावा. कारण, त्यावेळी तेथे कोणीच राहात नव्हते. तेव्हा, गुरुदेवांचे तेथील वास्तव्य जास्तीत जास्त सुखसोयीचे होण्याच्या दृष्टीने तो तेथे सारी बडदास्त ठेवील, प्रथमतः गुरुदेवांनी ती कल्पना उडवूनच लावली. पण फार आग्रहच झाला तेव्हा त्यांनी ती मान्य केली. दुसऱ्या दिवशी दार्जिलिंगला जाण्याकरिता आम्ही पुरी सोडली.

●●●

# ४

त्या व्यापाऱ्याने आपल्या नोकरांना आगाऊच कळवून ठेवल्याप्रमाणे आम्हांला उतरवून घेण्याकरिता त्या बंगल्याचा नोकरवर्ग स्टेशनावर हजर होता. आम्ही स्टेशनपासून सरळ बंगल्यावरच गेलो. बंगल्याची निगा उत्तमच ठेवली होती; नि दुसरे कोणीही तेथे नसल्याने सारा बंगला आमच्याच ताब्यात होता. नोकरांचा एवढा मोठा ताफा तेथे होता की आमचे तेथील वास्तव्य खरोखरच आरामाचे झाले होते. प्रत्येक नोकरही आमची सुखसोय पाहण्यात तत्पर होता.

दार्जिलिंग हे हिमालयातील एक निसर्गरम्य गिरिनगर आहे. बंगालच्या गव्हर्नरचे उन्हाळ्यातील वसतीस्थान असल्याने साऱ्या गावाची व्यवस्था विशेष लक्षपूर्वक ठेवण्यात आलेली होती. हवा तर मस्तच होती. दिवसाच्या कोणत्याहि क्षणाला उत्साह इतका वाटत होता की मन सदाचे उल्हसित राहात होते. रात्री मात्र थंड होत्या.

पहिले दिवस भटकण्यात, निरनिराळ्या गिरिटोकांवर (Points) जाऊन, वेगवेगळ्या वेळी दिसणाऱ्या निसर्गसौंदर्याचा स्वाद लुटण्यात गेले. तेथे कुणी भेटायला येणार नव्हते, दर्शनार्थींची गर्दी नव्हती; नि आमच्या पाठीमागेहि कसला तगादा नव्हता. आम्ही अक्षरशः आराम करीत होतो; आणि दोन दिवसांतच मलाहि वाटले माझ्या प्रकृतीत लक्षात येण्याइतका चांगला फरक पडला आहे. मी गुरुदेवांना म्हटलेहि, " इथे नीरव शांतता व मनहि प्रसन्न आहे. आपण एकमेकांना भेटलो त्या दिवसापासून इतका शांत व प्रसन्न काल आपल्याला लाभलाच नाही. तेव्हा माझी इच्छा आहे की तुमच्या सान्निध्याचा जितका जास्तीत जास्त उपयोग करून घेता येईल तेवढा घ्यावा. " मी आतापर्यंत मला आलेल्या वेगवेगळ्या अनुभवांची त्यांना ओळख करून दिली. त्यांनी दिलेल्या सूचनांप्रमाणे काय काय केले ते सांगितले, आणि माझ्या पुढील असंख्य समस्याहि त्यांच्यापुढे ठेवल्या. धीरगंभीरपणे माझे सर्व म्हणणे त्यांनी ऐकून घेतले व ते म्हणाले, " माधव, मी तुला इथे घेऊन आलो ते नेमके तू म्हणतोस त्याच कारणाकरिता. तुझ्या तोंडून तुला आलेल्या अनुभवांची मला माहिती कळायला हवीच होती. अध्यात्मज्ञानमार्गात साधकाला आलेले अनुभव हेच एकमेव गमक असते. त्यावरून साधकाची प्रगति कुठल्या टप्प्यापर्यंत आली आहे ते अजमावता येते. बाकीच्या तुझ्या ज्या समस्या म्हणून तू म्हणतोस ना त्या निव्वळ काल्पनिक, भरकटलेल्या मनाने उभारलेले इमले आहेत. किंवा तुला जे व्हावेसे वाटते त्या इच्छे–लालसेचे ते विकृत स्वरूप आहे इतकेच. असे का होते म्हणशील, तर आपण जन्मभर बौद्धिक प्रगल्भता

संपादण्याच्या नावाखाली जे सतत वाचीत असतो, लोक बोलताना ऐकत असतो, किंवा पूर्वीपासून ज्या माहितीचा गठ्ठा आपण बाळगून असतो त्यातून या इच्छा जन्माला आलेल्या असतात.

"शारीरिक व मानसिक स्थितीचे संतुलन व्हावे म्हणून काही वर्षांपूर्वी, वृद्धेश्वराला आपण गेलो होतो. तेव्हा तुला मी काही योगासने करायला सांगितली होती. त्या आसनांच्या पद्धतशीर व नियमित व्यायामाने फायदा काय झाला हे तू जाणतोसच, आता इथे तुला नवी संथा देणार आहे; ज्याला ' निर्विकल्प समाधि ' असे म्हणतात. या स्थितीत शरीराच्या अस्तित्वाची जाणीव व आठवण संपूर्णतया मनोआकाशातील महाविस्तृत प्रांतात विलीन होते; आंतरिक संवेदनांनी किंवा ज्याला आपण 'समज' म्हणतो त्यांनी उत्पन्न केलेल्या सृष्टीचा संपूर्ण लय होतो. मनाची बाजू एवढी विस्तार पावते की अंतर्बाह्य जाणीवेचा निरास होऊन त्या जगड्व्याळ मनाच्या आवाक्यात काही नाही असे आता काही उरतच नाही. अनुभव नि अनुभवी–अनुभव घेणारा–ह्यामध्ये अलगपणा राहात नाही; आणि त्यामुळे साधक निवळ अनिर्वचनीय अनुभवातच डुंबत राहातो–न ये सांगता बोलता–अनुभव चित्ता चित्त जाणे–असे ज्याचे वर्णन करायचे म्हणून करतात ते !"

दुसरे दिवशी, सकाळीच स्नान उरकल्यावर गुरुदेवांनी त्या दिशेने पाठ द्यायला सुरवात केली, मी त्या स्थितीत किती तास होतो हे मला सांगता येत नाही. कधी कधी तशा स्थितीत मी कितीतरी दिवस असे तर कधी सबंध आठवडाभर सुद्धा ! मला त्या काळात कधी भूक लागली नाही किंवा शारीरिक थकवा–ताण वाढला नाही. मी शरीराने जरासा सडपातळ झालो. पण,चेहऱ्यावर तेज चढले होते. आम्ही दार्जिलिंगला तीन महिने होतो. तेवढ्या अवधीत फक्त एकदाच बंगल्याच्या मालकाने दार्जिलिंगला फेरी टाकली होती. माझी प्रकृति पाहून त्याला तर आश्चर्यच वाटले. खाजगीरीत्या तो मला म्हणालाहि की, माझ्या बाह्यस्वरूपात कमालीचा फरक पडला आहे.

आणि प्रकृति तर फारच चांगली झाली आहे.तो पुढे एवढेहि म्हणाला की तुमचा माझा फारसा परिचय नाही. त्यामुळे तुमची मला काहीच माहिती नाही. पण, कधीकधी तुम्ही गुरुदेवांपेक्षाहि महासाधु दिसता. त्याच्या अभिप्रायाबद्दल त्याचे आभार मानून मी म्हटले, "गुरुदेवांना तुम्ही अजून ओळखलेले नाही; नि गुरुदेवांच्या मानाने मी कणभरहि काही मिळविलेले नाही मी आता कुठे सुरुवात केली आहे. मी त्यांच्या पायाशी बसून धडे घेत आहे."

मी एकटाच असलो की, गुरुदेवांच्या संगतीत गेलेल्या दिवसांची उजळणी होई, नि माझ्यात कसकसा बदल होत गेला याचाहि मी विचार करी. थोड्या महिन्यांपूर्वी मी भारत सरकारचा एक बडा अधिकारी होतो ना, असा माझा मलाच संभ्रम पडे. मला वाटे, माझ्या माणसांची नि माझी पुनः गाठ पडली तर ती मला ओळखतील तरी का? अजूनहि, जरूर तेव्हा, पूर्वीप्रमाणेच भट्टीतून आलेला इस्त्री केलेला पायजमा नि कुडता मी घालीत होतो नि वर लोकरीचा जर्सी चढवीत होतो. अजूनहि पूर्वीप्रमाणेच रोज दाढी घोटीत होतो. माझ्यात फरक झाला होता तो माझ्या दृष्टिकोनात, विचारसरणीत, मनाच्या धारणेत व निरनिराळ्या विषयांवरील माझ्या मतप्रणालीत! एके वेळी मला ज्या गोष्टी समस्याप्रधान नि गुंतागुंतीच्या वाटत त्या आता तशा वाटेनाशा झाल्या होत्या. संधिप्रकाशात अंधुक, भेसूर किंवा जशा नाही तशा दिसणाऱ्या वस्तू सूर्योदय होताच कशा जशाच्या तशा लख्ख दिसतात. तसा समजुतीचा—वेगळ्या प्रकारच्या समजुतीचा—सुस्पष्टपणा माझ्यात उद्भवल्याची मला जाणीव होत होती. चालू परिस्थितीबद्दल मनात कुरबूर राहिली नव्हती. मला समाधान वाटत होते. मी शोधीत असलेल्या अंतिम सत्याजवळ मी आलो आहे अशी अननुभूत भावना मला वारंवार प्रतीत होत होती. गुरुदेवांच्या कृपेला तर सीमाच नव्हती. त्यांच्याजवळ जे जे होते ते सर्व काही, काहीएक न वगळता, मला मुक्तहस्ताने त्यांनी देऊ केले होते व देत होते. परतफेडीची किंवा

गुरुदक्षिणेची अपेक्षा न बाळगता शिष्याला सर्व काही शिकवावयाचे ही जी खऱ्या गुरूची महति ती मला गुरुदेवांमध्ये पावलोपावली प्रतीत होत होती. " आपणांसी जे जे ठावे ते शिष्यासी शिकवावे " असे मुक्त हस्ताने त्यांचे ज्ञानदान चाललेले होते. त्यांत अपेक्षेचा लवलेश आढळत नव्हता. अखिल विश्व सुखी होवो म्हणून ज्याप्रमाणे सूर्य अगर पर्जन्य आपल्या अविरत धारा पृथ्वीवर निरपेक्षपणे ओतीत असतो तीच उपमा केवळ गुरुदेवांच्या कृपेला सार्थ लागू पडत होती.

मी प्रत्येक क्षण सार्थपणे जगत होतो. त्यामुळे, गेल्या आयुष्याबद्दल खंत वाटत नव्हती की भवितव्याबद्दल कसली चिंता ! अविरोधपणे, भरपूर जोमात नि वेगात मी वर्तमानकालात वावरत होतो. मला प्रत्येक क्षण नवनवोन्मेषशाली वाटत होता. त्यात आनंद भर भरून राहिला आहे असे वाटत होते... भविष्यकालाबद्दल विचारच उद्भवत नव्हता. विचारांना बंधन नव्हते की कसल्या पंथोपपंथाची मर्यादा नव्हती. सारे विश्व—अंतर्बाह्य—दृष्टीच्या टप्प्यातले किंवा त्या पलिकडचे आनंदाने, समाधानाने सुखाने जणू परिपूर्ण भरल्यासारखे अनुभवास येत होते.

एके दिवशी गुरुदेव स्वतःच म्हणाले " माधव, तुझी प्रगति पाहून मला अत्यंत समाधान वाटते. मला जे देण्यासारखे होते ते मी सर्व काही तुला देऊन टाकले आहे. आता तुला गुह्यात गुह्यतर तेवढे सांगायचे माझे काम राहिले आहे. तुला ठाऊक नसेल किंवा कल्पनाहि नसेल की आपली दोघांची जी भेट झाली ती अकारण नव्हती. सहज अपघात म्हणून झालेली नाही.ती मुद्दाम घडवून आणलेली होती. माझ्या गुरूंकडून मला आज्ञा झाली होती की मी तुला तयार करावे; त्यांची तुझी मुलाखत होण्यापूर्वी माझ्यावर टाकलेली जबाबदारी मी माझ्या कुवतीप्रमाणे पार पाडली आहे. त्यात मी कितपत यशस्वी झालो आहे ते आता ठरायचे आहे. ते माझे गुरू ठरवतील. माझा तो प्रांत नव्हे. आता ती वेळ नजीक आली आहे—नि माझ्या गुरुवर्यांना भेटायला आपण हिमालयात जाणार आहोत. "

माझ्या आयुष्याच्या घडणीतील हे एक आश्चर्यकारक आविष्करण होते. नि राहून राहून मला कॉलेजात असताना पडलेल्या स्वप्नाची आठवण होत होती. ते स्वप्न माझ्यापुढे जसेच्या तसे पुनः उभे राही. मला स्वप्नात दिसलेली हिमाच्छादित हिमालयाची शिखरे, भेटलेले तापसी, त्यांची बर्फाच्छादित गुहा, आणि त्यांचे ते शब्द मला स्पष्टपणे पुनः ऐकू येत होते. " ही गुहा, तुझी आहे नि एके दिवशीं तू येथे येणार आहेस " माझे हे स्वप्न मी बारीकसारीक तपशिलासह गुरुदेवांना निवेदन केले. ते हसले; नि म्हणाले, " माधव तू त्याच पुरुषाला आता भेटणार आहेस नि त्याच गुहेतही प्रवेश करणार आहेस. नव्हे त्या गुहेत वस्ती करून राहणार आहेस. जगातील सर्वश्रेष्ठ साधु-पुरुषांच्या देखरेखीखाली तुला आता राहायचे आहे. तुझ्या सद्-भाग्याची तुला कल्पना नाही. ज्या अत्यल्प अशा व्यक्तींना त्या महापुरुषाचे–प्रत्यक्ष परमेश्वराचे–कृपाछत्र मिळाले त्यांपैकी तू एक आहेस.

" तुझ्या आता लक्षात आले असेल कीं, त्या परमेश्वर–स्वरूप महात्म्याने,–कारण त्यांचे त्यांनाच ठाऊक,–तुझ्याबद्दल विशेष आस्था दाखविली; व तेच आता तुझ्या जीविताची सरणी ठरवणार आहेत. तुला आवडो अगर न आवडो, तुझे आयुष्य कसे व्यतीत व्हायचे हे त्या महापुरुषाने ठरवले, त्यानुसार सारी व्यवस्था केली. अनुकूल सुसंधि'–प्रसंग-घडवून आणले, की, ज्यामुळे तुझ्या जीविताचा ओघ त्यांनी ठरवलेल्या मार्गाकडेच वळेल; अर्थात, हे सर्व तुझ्या परमहिता-करिता आहे हे तूं आतापर्यंत ओळखले असशीलच–मी केवळ निमित्त झालो. कर्ताकरविता तो महात्मा आहे " माझे हृदय हेलावले -गुरु-देवांच्या तोंडून हे सर्व ऐकताना ! मी गुरुदेवांचे पाय धरले व लहान मुलासारखा रडलो. कारण, मला गहिवर आवरेना. मी सद्गदित आवाजाने म्हणालो, " गुरुदेव ती अद्भुत महान व्यक्ति मला अजून तरी अज्ञातच आहे; नि त्याबद्दल मला कसलीहि चिंताहि नाही. पण, तुम्ही जे माझ्याकरिता आजपर्यंत केलेत त्याबद्दल मी आपला

अत्यंत ऋणी आहे. माझे जे हे परिवर्तन झाले आहे; जीवनौघ साफ बदलण्याइतके परिवर्तन झाले आहे–ते तुमच्यावाचून होते ना ! मला माझ्या भावना कुठल्याही शब्दांत स्पष्टच करता येत नाहीत. पण, तुम्ही माझ्या जीवनात जो आश्चर्यकारक चमत्कार घडवून आणलात तो प्रत्यक्ष परमेश्वराला तरी घडवून आणता आला असता की नाही, कोण जाणे ? इतक्या सहजतेने तुम्ही हे सर्व घडवून आणले आहेत." गुरुदेवांनी मला उठवून दोन्ही हातांत माझा चेहरा धरून माझे 'मुखावलोकन' केले व दोन्ही गालांची चुंबने घेतली.

दोन दिवसांनंतर आम्ही दार्जिलिंगचा मुक्काम हलवला; व पुनः कलकत्त्याला आलो. प्रवासात गुरुदेव म्हणाले, "माधव, मी तुला बंगालमध्ये घेऊन आलो, त्यापाठीमागे माझा हेतु होता नि तो आता सफल झाला आहे; हे तू जाणतोसच. आता पुढील जीवित कसे घालवायचे हे ठरविण्यास तुझा तू मोकळा आहेस. माझे काम आता एवढेच उरले आहे नि ते हे की तुला घेऊन हिमालयात जायचे; तुझ्या त्या प्रवासात तुला साथ करायची. आता तू तुला हवा तसा कार्यक्रम आख नि मला हरिद्वारला येऊन भेट. तू आपल्या नातेवाई-कांना, मित्रपरिवाराला भेट, देण्याघेण्याची काही व्यवस्था करायची असेल ती कर: कसलीही घाई नाही, तुझ्या कलाने सर्व होऊ दे. तू ज्या दिवशी हरिद्वारला येऊन पोहोचशील त्या दिवशी तिथेच मी तुला भेटेन.

मी मुंबईला आलो: नि गुरुदेव हरिद्वारला गेले. मी माझ्या बंधूंना माझ्या आगमनाची आगाऊ सूचना दिली होती; आणि माझा मुंबईला पोचण्याचा दिवसहि रविवारच निघाला. माझे बंधु नि वहिनी मला उतरवून घ्यायला स्टेशनवर आली होती. मला पाहून त्यांना खरोखरच अत्यानंद झालेला दिसला. दोघेहि एकदमच म्हणाले, "माधव, केवढा बदल झाला आहे रे तुझ्यात ? पुनः भेटलास. किती बरं वाटलं." आम्ही घरी पोचलो. मुलांनी माझ्याभोवती गिल्ला करून सोडला. काका भेटल्याचा त्यांचाहि आनंद गगनात मावत

नव्हता; तो आनंद त्यांच्या निरागस चेहऱ्यावर सुस्पष्टपणे उमटला होता. दाढी नि स्नान उरकून मी खाली जेवणघरात आलो तो चहा व न्याहारी तयारच होती. माझे बंधु, वहिनी नि मुले माझीच वाट पाहात थांबली होती. वहिनी म्हणाली, " माधवभाऊजी, आता आम्हांला सर्व काही सांगा; गुरुदेवांच्या सान्निध्यात दिवस कसे गेले; नि साधु होण्याच्या दृष्टीने कुठपर्यंत मजल मारलीत ?" मी म्हणालो " गुरुदेव नेहमीप्रमाणे छान–मजेत होते. त्यांच्या संगतीत गेले सहा महिने मी बंगालमध्ये होतो. मी अजूनहि पूर्वी होतो तसाच आहे; संन्यासी झालो नाही की साधु झालो नाही हे तुम्ही पाहाताच आहात."

माझे बंधु म्हणाले, " तिला का फसवतोस ? तुझ्यात झालेला बदल इतका स्पष्ट आहे की तू बारीक झालेला दिसतोस, वजन कमी झाले असले तरी प्रकृति छानच सुधारलीय की ! तुझ्या चेहऱ्यात एक अपूर्व उत्साह नि तजेला दिसतो आहे. तुझ्या डोळ्यांतले तेज तर लक्षात येण्याइतके स्पष्ट आहे. का नकळे, मला तरी असं वाटतंय की तू बसला आहेस माझ्या अगदी जवळ, पण मनाने म्हण, मानसिक धारणेने म्हण, कशानेहि म्हण, तू दूरदूर गेला आहेस. " मी हसून म्हटलं, " तसं काही झालेलं नाही. सहा महिने दूर होतो म्हणून तुला तसं वाटत असेल झालं ! " त्यावर वहिनी म्हणाली, " ते काही नाही भाऊजी, तुम्ही आमच्यापासून लपवून ठेवता आहात काहीतरी. आम्हांला तरी असं खरंच वाटतंय की तुम्ही आमच्यापेक्षा काहीतरी जास्त कमावून आला आहात, जे आम्हाला साधलेलें नाही. " नंतर मी कलकत्ता, जगन्नाथ–पुरी व दार्जिलिंगला कसकसा हिंडलो तेथे काय काय पाहिले, ऐकले, बोललो नि केले–सारी सारी हकीगत त्यांना विस्ताराने निवेदन केली. माझ्या डॉक्टर बंधूंना सहकुटुंब परिवार जेवायला बोलावणे गेले, त्यामुळे आम्हां भावंडांचे एक छोटेसे कौटुंबिक संमेलनच भरले होते. त्यानीही माझ्यात बदल घडल्याचे विनायकदादा–वहिनी प्रमाणेच मत दिले. पुढे काय करायचे मी ठर-वले आहे, असा प्रश्न बंधूंनी उपस्थित केला. काय करायचे ते केव्हाच

ठरून गेले आहे; त्याचा तपशील एक दोन दिवसांत मी सांगेन असे उभयताना मी आश्वासन दिलें. मित्र–मंडळी व इतर परिचितांना भेटण्यात व ठिकठिकाणी जाण्यात आठवडा संपला. त्यानंतर माझ्या दोन्ही बंधूंना एकत्रित बोलावून मी त्यांना सांगितले की मी हिमालयात जायचे ठरविले असून, तेथून परत केव्हा येईन हे सांगता येण्यासारखे नाही. तेव्हा, पुनः भेट केव्हा होईल हेहि अनिश्चितच. माझ्या आत्मसाक्षात्काराच्या शोधात मी किती टक्के यशस्वी झालो आहे हे सांगणे कठीण; पण अध्यात्मशास्त्र म्हणजे काय हे मात्र मी बरेच समजून घेतले आहे असे मला आत्मविश्वासपूर्वक वाटते. माझ्या आयुष्यातला जगण्याकरिता 'धडपड' हा प्रकार संपलेला आहे. मला काही मिळवावयाचे नाही. मला कोणी व्हावयाचेहि नाही. मी जसा आहे तसा, माझा मी अति सुखी आहे; आनंदात आहे हे तुम्ही पाहाताच आहात. तुमचे नि माझे जग आता वेगळे झाले आहे. कारण तुमच्या दृष्टिकोनातून ज्या गोष्टी महत्त्वाच्या, आवश्यक, त्या मला तशा वाटत नाहीत; नि माझ्यापुरते तरी हे निश्चित झाले आहे की उच्च हेतु, ध्येये, वगैरेंना माझ्या मते, जीवनसाफल्याच्या दृष्टीने, काडीची किंमत नाही. ऐहिक लागेबांधे, इंद्रियांना सुख देणाऱ्या गोष्टी संपादन करण्याची हाव, माझ्या दृष्टीने कमअस्सल ठरली असून तसं म्हणाल तर रूढ जगात वावरायला मी संपूर्णतया अपात्र झालो आहे. त्यामुळे माझ्यापुरते तरी हे निखालस सत्य आहे की चार लोकांसारखे सामाजिक जीवन मी–तरी व्यतीत करू शकत नाही. तुमची गोष्ट वेगळी आहे. तुम्हांला संसारपाश आहेत; समाजात प्रतिष्ठितपणे वावरायचे आहे, आयुष्यात काहीतरी करून दाखविण्याची ईर्षा आहे नावलौकिक मिळवण्यात आनंद वाटतो. शिवाय, मुला–माणसांची जबाबदारी तुमच्या शिरावर आहे. त्यांचे जीवन घडविण्याचे तुमचे कर्तव्य आहे असे तुम्हांला मनापासून वाटते. सुदैवाने या सर्वांपासून मी मुक्त आहे. तेव्हा, मला मागे रोखणारे 'पाश' असे काहीहो नाहीत. सुखी जीवन व

उत्कर्ष–भरभराट–साधण्याचा तुमचा मार्ग वेगळा. तुम्ही तुमच्या मार्गाने जा व कृपा करून, मला माझ्या मार्गाने जाऊ द्या. मग माझ्या यशाच्या कल्पना तुमच्या दृष्टीने चुकीच्या असोत वा बरोबर ! तुम्ही आतापर्यंत माझी काळजी वाहिलीत, हित पाहिलेत. आता या जगात माझ्या हिताची जपणूक करण्यासारखे काही उरलेले आहे असे मला वाटत नाही. तेव्हा, हिमालयात जायला तुम्ही मोकळ्या मनाने मला आशीर्वाद द्यावा–हे उत्तम. तुमच्या सदिच्छा माझ्या पाठीशी असतील तर माझ्या साध्यात मी यशस्वी होईनच होईन." माझ्या दोन्ही बंधूंच्या व भावजयींच्या डोळ्यांत जमा झालेले अश्रू मला स्पष्ट दिसत होते. त्यावर मी म्हणालो, "यांत वाईट वाटून घेण्यासारखे खरोखरच काहीएक नाही. उलट मी आनंदात आहे; व अक्षय्य टिकणारा सुखानंद मिळविण्यासाठी मी जात आहे; याबद्दल तुम्हांला सर्व काही गोडच वाटायला हवे. माझी स्वतःची काळजी घेण्याइतका मी आता समर्थ आहे, नि तुम्हीही खात्री बाळगा की कोणत्याही परिस्थितीत माझ्या जीविताला यत्किंचितहि धोका पोचणार नाही. फक्त एकाच गोष्टीबद्दल मला सध्यातरी निश्चितपणे सांगता येत नाही ती म्हणजे आपली पुनर्भेट केव्हा होईल ते मला ठाऊक नाही. जेव्हा जेव्हा तुम्हांला माझ्या अस्तित्वाची गरज वाटेल तेव्हा तेव्हा या ना त्या रीतीने मी तुमच्या सन्निध असेन याची खात्री बाळगा. मला आता पैशाची गरज लागल असे वाटत नाही नि आता पत्करलेल्या जीवनात मालमत्तेची किंमत माझ्या दृष्टीने तरी शून्यवत् आहे, तेव्हा जे जे माझ्या वाट्याचे आहे ते तुम्ही उभय बंधूंनी आपसात समान वाटणी करून घ्या." माझी ही सूचना माझ्या दोन्ही बंधूंना रुचली नाही. वडील बंधु म्हणालेहि, "हे बघ, चालू व्यवस्थेत काहीही बदल करायचा नाही; नि पुढे काय करायचे ते तू माझ्यावर सोपव. तुला ऐहिक गोष्टीबद्दल आसक्ति नाही त्याचा तू विचार न करणे बरे. नाहीतरी तुझ्या वाट्याच्या मालमत्तेची देखरेख माझ्यावर तू सोपवलेली आहेसच, तीच व्यवस्था पुढे चालू राहील. झालं."

मुंबईत माझे वास्तव्य होते त्या अवधीत माझे स्नेही रमेश व मालती यांची माझी भेट होऊ शकली नाही. कारण ती दोघेहि उत्तर हिंदुस्थानात प्रवासाला गेली होती, व कोणत्या क्षणी परततील याचा नेम नव्हता. एका रविवारी माझ्या बंधूकडे माझ्याबद्दल चौकशी करीत रमेश स्वतःच आला नि अचानकपणे आमची दोघांची भेट झाली. कारण, तो आदल्या दिवशीच आपल्या सहलीवरून परत आला होता व त्याला कळले होते की, त्या दोघांच्या गैरहजेरीत मी मुंबईला आलो आहे! रमेश आता चांगलाच जाडजूड झाला होता. वजन वाढल्याने अंगाने भरला होता. एकंदरीत बेटा सुखावला होता म्हणायचा. नि खुषीतहि दिसला. मला पाहाताच त्याला अत्यानंद झाला नि त्या भरात रात्रीचे जेवणाचेच त्याने आमंत्रण केले. मी मालतीची चौकशी केली. तेव्हा कळले की ती आता दोन मुलांची आई झाली आहे. तिने आपली प्रकृति छान ठेवली आहे व माझी नि माझ्या भाचरांची भेट प्रथमतःच त्या रात्री होणार आहे. सायंकाळी ७ चे सुमारास मी त्यांच्याकडे गेलो. मुंबईतील उच्च समाजातील वस्तीमध्ये एका सुसज्ज फ्लॅटमध्ये त्यांनी आपला संसार थाटला होता. श्रीमंती नि सुबत्ता इतस्ततः दिसत होती, नि ते अपेक्षितच होते. गृहव्यवस्थेत सौंदर्य होते. त्याकरिता मुद्दाम मेहनत घेतली असल्याचे स्पष्ट होते. मालतीने माझे स्वागत केले व आपल्या मुलांची नि माझी—माधवमामा म्हणून ओळख करून दिली. दोन्ही मुले छान गुटगुटीत, नीटनेटकी व देखणी होती. प्राथमिक गप्पा संपल्यावर आम्ही जेवायला बसलो. मुलांची जेवणे अगोदरच उरकून घेऊन त्यांची रवानगी झोपण्याच्या खोलीत झाली होती. आम्ही तिघेच जेवायचे होतो; नि मेजावर सर्व काही जिथल्या तिथे व हवे तसे होते. जेवताना मी मालतीला म्हटले, "तुझ्याकडे पाहून समाधान वाटले. संपन्न नि सुखी झालीस. ठीक झाले. एकंदरीत रमेशसारखा चांगला पोरगा गाठलास तू!—आदर्श पति आहे तो!!" रमेश त्यावर म्हणाला, "तू तर अगदी आजोबासारखा बोलतोस की रे. जगाला

विटलेला, जगापासून संपूर्ण निवृत्त झालेला–तुला संसारात काहीही ओढ राहिलेली नाही, असं समजायचं की काय, आम्ही त्यावरून ? सकाळपासून पाहातोय तुझ्यात हा बदल तरी कसला झालाय् हेच मला कळत नाही. " मालतीने पुस्ती जोडली. " माधव, तू नि तुझे गुरुदेव याबाबत आमच्या कानांवर इतक्या गोष्टी आल्या आहेत की मला तर भीति वाटतेय तू कोणत्याहि घटकेला संन्याशीच होशील. अर्थात, या गोष्टी मी आज कित्येक वर्षे ऐकते आहेच; पण आता अशी वेळ येऊन ठेपली आहे, असं कळतं, की त्या दृष्टीने तू आपला निर्णय केव्हाहि अंमलात आणशील. " रमेश म्हणाला, " तेव्हा आता काहीं एक आडपडदा न ठेवता आम्हाला कळू दे तू पुढील आयुष्यात काय करायचं ठरवलं आहेस. आम्हांला कळलं की, चांगली सरकारी नोकरी सोडून तू कुठेतरी, काहीहि न ठरवता, भटकतो आहेस म्हणून. आता काय नवी टूम शोधून काढली आहेस ते तरी कळू दे. "

मी म्हणालो, " नवी टूम वगैरे आकर्षक प्रयोग काहीही नाहीत. पण मालती आत्ताच म्हणाली त्याप्रमाणे मी गुरुदेवांच्या पावलांवर पावले टाकायचे निश्चित ठरवले आहे. कुणी सांगावे, कदाचित् तुमची माझी आजची ही भेट शेवटचीही ठरण्याचा संभव आहे. मी हिमालयात जाणार आहे नि केव्हा परतणार ते मला ठाऊक नाही. कदाचित् कित्येक वर्षेपर्यंत मी मुंबईला येऊ शकणार नाही. " माझे हे बोलणे ऐकून ती दोघेहि गंभीर झाली. मालतीच्या डोळ्यांत अश्रू तरारले. मी पुढे म्हणालो, " सत्याचा शोध घ्यावा, शाश्वत सुख आत्मसात करावे नि आयुष्यात ज्याच्याकरिता सारी धडपड असते ते खरे शांतिसुख–अखंड आनंद–मिळवावे हे माझे ध्येय आहे. मला कशाबद्दलहि खंत वाटत नाही की जीवनात सर्वसामान्यत: जे हवेसे वाटले ते मला मिळाले नाही असा कधीही व कसलाहि अपेक्षाभंग मला झालेला नाही. आयुष्याकडे पाहण्याचा तुमच्या नि माझ्या दृष्टिकोनात फरक आहे. तुम्ही व मी पाहतो एकाच ठिकाणी, पण दृष्टीत बदल असल्याने, ती वस्तु दिसते मात्र वेगवेगळी ! तुमच्या

चालू आयुष्यावर मी टीका करीत नाही. ते चुकीचे आहे किंवा तुम्ही चुकीच्या मार्गाने चालला आहात असेहि मी म्हणू इच्छित नाही. पण, असे मात्र म्हणूं इच्छितो की, माझे सध्याचे जीवित खात्रीने निर्दोष आहे. माझ्या ध्येयाच्या वाटचालीत मी यशस्वी झालो आहे. तुम्हांला माझे म्हणणे चमत्कारिक वाटेल किंवा तुम्ही त्यावर विश्वास ठेवणार नाही. पण, माझ्या सध्याच्या आयुष्यक्रमात मी अत्यंत सुखी आहे; संपूर्ण सुखी आहे." रमेशने त्यावर विचारले, "तुझ्या मित्र-स्नेही नि नातेवाईकांच्या परिवारात राहून तू तुझ्यापुढे ठेवलेले ध्येय गाठू शकणार नाहीस असे तुला खात्रीलायक वाटते का? त्याकरिता सर्वसंगपरित्याग करून हिमालयातच जाणे अपरिहार्य ठरण्याइतके जरूर वाटते का? वादाकरिता मान्य करू की, अध्यात्मशास्त्रात तू जे साधायचे ते साधलेस; पण त्याचा उपयोग मानवतेला, किंवा तुझ्या सगेसोयरे मित्र-नातेवाईकांना काय नि कसा होणार?" मालतीने पुस्ती जोडली, "माधव, मला बाई असे वाटते, की जंगलात राहण्यापेक्षां तू आमच्यातच राहिलास तर समाजाला तुझा उपयोग जास्त होईल. सामाजिक कार्य तू जास्त करू शकशील."

मी त्यावर म्हणालो, "तुम्ही जे म्हणालात ते मी सर्व समजू शकतो. त्यापाठीमागील तुमच्या सद्भावनाहि मला कळतात परंतु; मी जें माझे जीवितकार्य म्हणून ठरविले आहे त्याच्या परिपूर्तीकरिता मला सध्या हिमालयात जायलाच हवे. तुम्ही आता वयाने मोठी झाला आहात, तेव्हा तुमच्या गाठी जो तुमचा अनुभव नि व्यवहारज्ञान असेल त्यावरून तुम्हीही मान्य करू शकाल, असे मला वाटते, की जीवन मूल्ये सतत बदलतात. तुम्ही ज्याला तुमच्या बालपणात विशेष महत्त्व देत होतात त्याचे आज मूल्य शून्य झालेले असेल. त्याचप्रमाणे आपण राहातो तो आपला समाज, सामाजिक ऋण, सगे-सोयरे, नातेवाईक नि मित्रपरिवार याबद्दलच्या आपल्या भावना व कल्पनाहि, जसजशी स्वतःची समज वाढत जाते, तशा त्या बदलत असतात. माझ्यापुरते बोलायचे तर या सर्वांबाबत माझ्या विचारसरणीत फार मोठा बदल

घडून आला असून, सध्यातरी मी या सर्वांपासून अलिप्त आहे." रमेश म्हणाला, "माधव, वास्तविक मी खरा तत्त्वज्ञानाचा विद्यार्थी. पण, तुला जी दार्शनिक दृष्टि आली आहे ती, दुर्दैवाने, मला कधीच आली नाही. मला तुझ्या एकंदर बोलण्यावरून स्पष्ट दिसते आहे की कोणत्याही वादविवादाने किंवा आवाहनाने तू ठरविलेल्या ध्येयापासून तू जराहि तडजोड करणे शक्य नाही. माझी एवढीच इच्छा आहे की तुला तुझ्या या शोधकार्यात जे अनुभव येतील ते तुला शब्दांकित करणे शक्य झाले तर ते मला अवश्य कळव." आम्ही पानावरून उठलो तो रात्रीचे १० वाजले होते. मी घरी परतलो तेव्हा दोघेहि सद्गदित झालेली दिसली.

• • •

## ५

दुसऱ्या दिवशी, सायंकाळच्या गाडीने, दिल्लीला जाण्यासाठी मी मुंबई सोडली. माझा मित्रपरिवार, नातेवाईक अशी कितीतरी मंडळी मला निरोप द्यायला स्टेशनावर आली होती. श्री. गुप्तांना माझ्या दिल्लीच्या भेटीबद्दल मी कळवले होते. ते दिल्ली स्टेशनावर मला उतरून घेण्याकरिता सपत्निक आले होते. आम्ही थेट त्यांच्या बंगल्यावरच गेलो. तेथे विनोदिनी, तिचे पतिराज व त्यांचे नवागत छबकडे यांची मुलाखत झाली. गुप्ता पतिपत्नी वार्धक्याने वाकली असली तरी प्रसन्न होती. विनोदिनीच्या प्रकृतीतहि छान बदल झाला होता. तिची नेहमीची खेळकर नि रंगेल वृत्ति होती तशीच होती. मी गुप्तांकडे एखाददुसरा दिवसच होतो. दुसऱ्या दिवशी जेवणे उरकून आम्ही सर्वचजण दिवाणखान्यात बसलो होतो; तेव्हा माझ्या आगामी हिमालयीन सफरीचा बेत त्यांना सांगितला. माझे बोलणे कसलीहि टीकाटिपणी न करता श्री. गुप्तांनी गंभीरपणे व शांतपणे

ऐकून घेतले. नंतर ते म्हणाले, "तुझे हित तुला कळते आहेच. तेव्हा तुझा हा निर्णय तू सर्व गोष्टींचा नीट विचार करूनच घेतला असशील. मी तुझ्या प्रत्येक कार्यात फक्त यश चिंतितो. यदाकदाचित् कधी कसली गरजच पडली तर एक सन्मित्र म्हणून तू आपले मन माझ्याजवळ मोकळे करावेस; नि मी तुला आश्वासन देतो की माझ्या कुवतीत जेवढे असेल तेवढे तुला मदत म्हणून करायला मला मनापासून आवडेल." विनोदिनी म्हणाली, "माधव, संन्यासी जीवनात तू फार काळ रुळशील असे मला मुळीच वाटत नाही. माझ्या मते तर तू भलताच मार्ग चोखाळू पाहातो आहेस. जगाकडे पाठ फिरवल्याने, ना तुझा फायदा होणार, ना जगाचा ! मी तर म्हणेन की, तुझा हा बेत चुकीचाच नव्हे तर अगदी आततायी ठरण्याइतका मूर्खपणाचा आहे, मला तर तू त्या जंगली एकाकी वातावरणातून पुनः आमच्यात येऊन मिसळशील तेव्हाच आनंद वाटेल." मी फक्त तिच्याकडे उपेक्षेने पाहात हसलो. सौ. गुप्ता म्हणाल्या, "माधवा, मला बाई तुमचे ते ज्ञान नि योगविद्या–काहीएक समजत नाही. मी तुम्हाला दिसते तशी एक साधी भोळी स्त्री आहे; नि कुटुंबात परंपरागत ज्या धार्मिक गोष्टी चालत आल्या; नित्य-नेम चालत आले त्याचे प्रामाणिक पालन करणे म्हणजे धर्म व आध्यात्म येवढच मी जाणते. मी अनेकांच्या तोंडून ऐकले आहे, नि संतांनी लिहून ठेवलेल्या वाङ्मयात वाचलेहि आहे की देव भक्तीचा भुकेला आहे; नि भक्तीने देवाचा साक्षात्कार होऊ शकतो, आणि भक्तिमार्गात तरी जगाचा नि समाजाचा त्याग करून संन्यासी बना असे सांगितलेले नाही. कारण, भक्तिमार्गात त्याची जरूरच नाही. ऐहिक जीवन, चार जणांसारखे सर्वसामान्य जीवन–घालवीत असताहि भक्तिभाव वाढविता येतो. ह्यात जर काही तथ्य असेल तर मला सांग, सर्वसंगपरित्याग करून हिमालयांत जाऊन संन्यास घ्यायचे तू का ठरवले आहेस ? मला तरी असं वाटतं की तू निष्कारण फारच मोठा त्याग करीत आहेस, जो वस्तुतः करायला नको आहे." श्री. गुप्तांनीही पत्नीच्या या

बोलण्यावर मान डोलवली व आपण तिच्याशी सहमत आहोत असे दर्शविले. मी म्हटले, " तुम्ही म्हणता ते थोडेसे बरोबरच आहे. मी त्या मार्गाने कधीच गेलेलो नाही. पण, एक मात्र सांगू इच्छितो की ऐहिक जीवन इतके गुंतागुंतीचे आहे की त्यातून असंख्य समस्या उत्पन्न होत असतात. त्या समस्यांची उकल करण्यातच सारे आयुष्य खलास होते; नि जीवन सार्थकी लावण्याचे जे काम करणे जरूर असते ते लांबणीवर पडत पडत कधीच हाती घेतले जात नाही. दैनंदिन प्रश्नात मनुष्याने स्वतःला इतके गुरफटवून घेतलेले असते की, ज्याला तो ' भक्ति ' हे नाव देतो ती केवळ एक प्रत्येक दिवशी करायची यांत्रिक कसरत होऊन बसते. ते एक दैनंदिन आन्हिक होते. त्यात कर्तव्य भावना फक्त राहाते, मन मुळीच नसते. भक्तीतील ' भाव ' अभावानेच असतो. अशा भक्तिमार्गातून खरोखरच ' प्रत्यक्ष ' असे काही हाती लागते की नाही याबद्दल मी तरी साशंक आहे. भक्तिमार्गानेच मुक्ति मिळविलेल्या अनेक साधुसंतांची चरित्रे मीही वाचली आहेत. पण, मला त्यांत जे आढळले ते हेच की, त्यांनी आपले जीव संसारातून काढून वैराग्यानेच संसार केला आहे. समाजातील त्यांचे अस्तित्व केवळ शरीराने होते इतकेच. बिनआकाराचे, रेखीवपणा नसलेल्या, चित्रासारखे त्यांचे जीवन होते. तेव्हा, भक्तिमार्गातहि, अंतर्यामी संसारपाश सोडल्याशिवाय आत्मदर्शन घडलेले माझ्या तरी वाचनात नाही. मला हे असले, आत एक नि बाहेर एक, दुटप्पी की दुहेरी, जीवन, दांभिकपणाचे नि अति ढोंगी वाटते. माझ्या प्रकृतीला ते झेपणारे नाही. त्यापेक्षा सरळसरळ जगाचा संबंध सोडून, सत्यशोधना-करितां एकाकी जीवनक्रम पत्करणे जास्त उत्तम नि वांछनीय नव्हे का ? भक्तिमार्ग दोन डगरींवर हात ठेवून आयुष्याची कसरत करीत असतो ते सर्वांनाच जमण्यासारखे नाही. त्यांत सुसंवाद कुठे नाहीच. पण, परिणामी ते शोकपर्यवसायीच ठरते. तुमच्यासारख्या संसारी लोकांना त्या भक्तिमार्गाचे आकर्षण असणे साहजिक आहे. कारण, तुम्हाला ' मुक्ति ' मिळविण्याची तेवढी तळमळ नाही. प्रत्यक्ष साकार

स्वरूपात, काही निश्चित मिळवायचे आहे असा तुमचा आग्रहच नाही. तुम्ही याबाबत तितकेसे गंभीरपणे विचार सुद्धा करू इच्छित नाही. परंतु, माझ्यासारख्याने जे ध्येय निश्चित करून ते प्रत्यक्षत: आत्मसात करायचे ठरविले आहे त्याला हा भोंगळ भक्तिमार्ग पुरा पडेल असे वाटत नाही. माफ करा; तुमची प्रामाणिक भक्तिभावना दुखवावी किंवा तिच्यावर टीका करावी असा माझा हेतु नाही व मला तो अधिकारही नाही. तेव्हा, तुम्हाला दुखावण्याचा प्रश्नच उत्पन्न होत नाही. मला येवढेच तुमच्या मनावर बिबवावे असे वाटते की 'मना सज्जना भक्तिपंथेचि जावे' हे म्हणणे ठीक आहे; पण तो लांबचा पल्ला आहे; नसते आडवळण आहे, त्यामध्ये अनेक अडचणी आहेत, खाचखळगे आहेत. नि माझ्या प्रकृतिस्वभावाला रुचण्यासारखे त्यात काहीही नाही. आमचा पिंडच वेगळा; शेंडी तुटो वा पारंबी तुटो ईप्सित साध्य होईपर्यंत स्वस्थ बसणे नाही असा माझ्यासारख्यांचा खाक्या. त्यामुळे आमच्या सत्यशोधनाच्या मार्गात जे जे आड येईल ते कापून आपला मार्ग चोखाळावयाचा एवढेच आम्ही जाणतो." श्री. गुप्ता म्हणाले, "शाब्बास माधव; मी तुझ्याशी संपूर्णतया सहमत आहे" सौ. गुप्ताहि म्हणाल्या, "तुझ्या कार्यात तू यशस्वी होवोस. माझे तुला आशीर्वाद आहेत" गुप्तांच्या गोड संगतीत एक दोन दिवस घालविल्यावर मी हिमालयाकडे जायला निघालो.

हरिद्वार स्थानकावर मी पाय टेकला तेव्हा पहाटेचा समय होता. थंडी खूप पडली होती. पण, वाटत होते छान! पूर्वेला प्रभातीचे गुलाल उधळण चालले होते. साऱ्या शरीरात एक जोमदार नि गोड शिरशिरी उठली; नि टांगा टाकीतच मी स्टेशनाबाहेर आलो. कुठें उतरावे याचा विचार करीत होतो; तो एक परिचित आकृति जवळ जवळ येत आहे असे त्या अंधुक प्रकाशात लक्षात आले नि मीही त्या व्यक्तीच्या रोखाने धावलो. त्या व्यक्तीने हमालाला माझे सामान न्यायला सांगितले; नि हमालालाहि ते ठिकाण ठाऊक असल्याचे दिसले. गुरुदेवांना त्या गावची खडान् खडा माहिती होती. नि गुरु-

देवांना तेथील सर्वजण ओळखीत होते. आम्ही हरद्वारमध्ये आठवडाभर होतो.

हरिद्वार हे एक असे तीर्थस्थान आहे की भारतभरचे सारे लोक इथे यात्रेला येतात. साधूंचा भरणा जास्त. शिवाय, अनेक भारतीय येथे येऊन कायमचे राहातात, मुक्ति मिळविण्याकरिता, त्यांना सांगितलेल्या मार्गाची वा साधनांची वर्षानुवर्षे अनुष्ठानं करीत ! गंगानदी परम-पवित्र समजलेली गंगामाई इथून वाहात असताना आपले सारे वैभव प्रदर्शित करते आहे असा एकंदर येथे त्या नदीच्या प्रवाहाचा थाट आहे ! तिच्या काठांवर अनेक आश्रम आहेत; पण मला मात्र ते स्थान फार गजबजलेले व इतर तीर्थस्थानांप्रमाणेच भरपूर गर्दी गोंधळाचे अतएव फारसे आवडले नाही. गुरुदेवांनी माझ्याबरोबर हिंडून सारे हरिद्वार मला दाखविले. तेथील महत्त्वाच्या स्थानांची माहिती करून दिली. परंतु दोनदा गंगास्नान व भोवतालच्या टेकड्यांवरून फेरफटका या दोन गोष्टींशिवाय माझे तरी कशातच मन रमले नाही. शहर नगरवासियांपासून दूर-एकीकडे असलेले हे रम्य स्थान, वास्तविक, ध्यानधारणेला नि मनकेंद्रीकरणाला केवढे उपकारक ठरले असते ! परंतु, भिकाऱ्यांचा, पंड्या लोकांचा फेरीवाल्यांचा व बाजार मांडून बसलेल्यांचा इथे इतका सुळसुळाट आहे की त्या इच्छित रम्यतेला मोठेच गालबोट लागलेले आहे. इथे भारतातील श्रीमंतांनी मागचा पुढचा विचार न करिता इतकी देवळे उभारली आहेत; आणि आपल्या दातृत्वाचा व धार्मिकतेचा टेंभा मिरविण्याकरिता व श्रीमंतीचे प्रदर्शन करून प्रसिद्धी मिळविण्याच्या लालसेने इथे संपत्तीचा इतका अनाठायी व्यय होत असतो की त्यामुळे काही भले होण्याचे राहिले बाजूलाच, पण हितापेक्षा अहितच फार झाले आहे. एका आश्रमात आमची राहण्याची सोय झाली होती. संन्यासी व साधुजनांनाच केवळ राहण्यासाठी व मुक्काम करण्यासाठी एवढी भव्य नि प्रशस्त इमारत उठवली होती. वास्तु इतक्या मोक्याच्या ठिकाणी उभी होती की तेथून हिमालयाचे

नयनमनोहर दर्शन घडत होते. मला तर ती जागा फारच आवडली आश्रमीय लोकांचा व गुरुदेवांचा चांगलाच परिचय असावा. आमचे इतक्या आदराने आतिथ्य झाले की गुरुदेवांबद्दल त्यांना वाटणारा दबदवा स्पष्टच होता. इथे कितीतरी उच्चशिक्षित साधकांची भेट झाली. सारेजण सत्याच्या शोधात येथे साधना करीत होते. ऋषि-केशला आम्ही १५ दिवस होतो. कसलेहि बंधन न मानता मला ज्यात बरे वाटेल ते करायला मी मोकळा असल्याचे गुरुदेवांनी मला मुद्दाम सांगितले होते. त्यांचा असा त्यांना वेगळा उद्योग होता नि त्यातच ते गढलेले असत. त्यामुळे, त्यांची माझी भेट फक्त सायंकाळी होई तेवढीच. अध्यात्मात ज्यांनी लक्षात येण्यासारखी प्रगति केली आहे असे कित्येकजण मला इथे भेटले त्यामुळे या मार्गात असलेल्यांच्या अनुभवांशी आपले अनुभव, आपली प्रगति नि आपले ज्ञान-साधन-याचा तुलनात्मक अभ्यास करायला मला उत्तम संधि मिळाली. एके दिवशी गुरुदेव मला म्हणाले, " माधव, उद्या आपण हे स्थान सोडून पुढे जाणार आहोत. आपल्या जवळची सर्व चीज-वस्तु इथेच ऋषिकेशला ठेवायची. कारण, पुढच्या प्रवासात थंडीपासून रक्षणापुरत्या लोकरीच्या वस्त्र-प्रावरणांपेक्षा आणखी काहीही लागणार नाही. आंगावर असलेले कपडे नि पांघरायला एखादे लोकरीचे पांघरूण बस्स ! गिरिकंदरात चढाउतरायला मदत म्हणून ' दंडा ' हवा तो मी तुझ्याकरता आणला आहे. त्याने बर्फावरून चालताना तोल सांभाळायला मदत होईल. बरोबर एक चंबूहि घ्यायला हवा. जो तुला वाटेत उपयोगी पडेल. येथील आश्रमाच्या संचालकांकडे तुला तुझे सर्व सामान सुपूर्त करावे लागेल. गुरुदेवांनी सांगितलेल्या वस्तूशिवाय मी माझी खाकेत अडकवावयाची पिशवी, दैनंदिनी, फाऊंटनपेन नि इतर किरकोळ वस्तु ज्या बरोबर हव्यात असे वाटले त्या घेतल्या होत्या. दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही ऋषिकेशचा मुक्काम हलवला. मकर संक्रमणाचा तो दिवस असल्याने-जानेवारी महिन्याची १३ वी

तारीख–गंगास्नान करायला यात्रेकरूंची 'ही' गर्दी जमली होती. कारण सूर्याचा मकर राशीत प्रवेश हा पुण्यकाल मानला जातो. मोठा रस्ता संपून आम्ही पाऊलवाटेला लागलो; गुरुदेव पुढे नि मी मागे. वाटेत जंगलहि लागले. तिथे पायरस्ताहि बर्फाखाली लुप्त झाला होता.

जंगलात पायी हिंडण्याचा हा काही माझा पहिलाच अनुभव नव्हता. शिकारीनिमित्त, सावजाचा माग काढीत मी अनेक जंगले तुडविली आहेत. त्यावेळी माझ्याजवळ बंदुक होती; आज त्याच हातात फक्त भला भक्कम 'दंडा' होता. आजच्या भटकण्याचा हेतु शिकारीपेक्षा वेगळाच होता. एका दृष्टीने ह्या अनुभवात पुरेपूर नावीन्य होते नि त्याची गोड शिरशिरी सर्वांगातून सळसळत होती. गुरुदेव चालता चालता त्यांच्या आयुष्यातील बहुविध प्रसंग सांगत होते. त्यांचे भाषण म्हणजे नेहमी बौद्धिक मेजवानीच असते. त्यातच ते सांगत होते वैयक्तिक अनुभव, त्यांच्या जीवनांतील जिवंत अनुभव, तेव्हा त्या गोडीत विविधता सांगोपांग साठवली असल्यास काय नवल! सर्व दिवस आम्ही चालत होतो. अगदी काहीही न खाता–पिता. भर दुपारी सुद्धा आम्ही विश्रांतीकरिता कुठे थांबलो नाही कारण थकवाच वाटला नव्हता; नि गुरुदेवांचाहि कल विश्रांति वगैरे न घेण्याचाच दिसला. सूर्य कलत असताना एका बर्फाच्छादित घळईच्या वळचणीला बसलेल्या एका वस्तीत आम्ही प्रवेश केला. तिथे इकडे–तिकडे फक्त थोडच्या झोपडच्या दिसत होत्या. मुले खेळत होती, त्यांच्याजवळ गुरुदेवांनी त्यांच्या ओळखीच्या कुणाचीशी चौकशी केली. गुरुदेव ज्याच्याबद्दल चौकशी करीत होते तोच नेमका त्यावेळी एका झोपडीतून बाहेर पडत होता. गुरुदेवांना पाहाताच जणु धावतच तो पुढे आला व त्याने गुरुदेवांना साष्टांग नमस्कारच घातला. गुरुदेवांच्या आगमनाची बातमी सगळीकडे पसरली नि त्या छोटयाशा वस्तीतील सर्वजण गुरुदेवांना भेटण्याकरिता गोळा झाली. आमच्याकरिता एक स्वतंत्र झोपडी दाखविण्यात आली. चटया व

लोकरीची पांघरुणे जमा करण्यात आली. कारण, आमचे तेथील वास्तव्य जास्तीत जास्त सुखावह व्हावे हीच सर्वांची एकमेव इच्छा. मोठी शेकोटी पेटविण्यात आली; त्यामुळे त्या झोपडीत ऊब आली होती. चपाती, ताजे दूध व थोडीशी भाजी यावर आमची जेवणे उरकली.

जेवणे होताच माझे डोळे पेंगू लागले; नि पाठ जमिनीला टेकताच डोळे केंव्हा मिटले ते कळलेसुद्धा नाही. मला इतकी शांत झोप लागली होती की पहाटे ६ वाजता मला जाग आली तेव्हा मी अगदी नव्या दमाने, ताजातवाना झालो होतो. गुरुदेवांनी मला चहा हवाय का म्हणून विचारले. मी त्यांना म्हणालो, "माझ्या सामान सुमानासकट मी माझे चहापानहि ऋषिकेशला सोडले आहे. तेव्हा यापुढे मला केव्हाहि चहाची गरज नाही." उकळते, गरम गरम, रामपात्र भरून दूध घेऊन आम्ही ती वस्ती सोडून पुढे निघालो. अशा तऱ्हेने, हिमालयाच्या परिसरात, जवळ जवळ आठवडाभर, आमचा पायी प्रवास चालू होता. जेवायला नि रात्रीच्या मुक्कामाकरिताच प्रवास स्थगित करीत होतो तेवढाच; बाकीचा वेळ अखंडपणे चालत होतो आम्ही. गुरुदेवांची जवळीक असल्याने ती एक मोठीच आनंददायी करमणूक होती; व त्यामुळेच मला वाटते, साऱ्या प्रवासभर शीण म्हणून कधी वाटला नाही. तेवढ्या दिवसांत गुरुदेवांनी इतक्या वेगवेगळ्या विषयांना स्पर्श केला की, कितीतरी नव्या गोष्टी मी त्या प्रवासात शिकलो.

एका सायंकाळी, बर्फाच्छादित पर्वतराजीच्या कुशीत असलेल्या एका गुहेत आम्ही शिरलो नि आमची पायपीट संपली. गेल्या पंचवीस तासांत आम्हांला कुठेहि मनुष्याची तुरळक वस्तीही दिसली नाही की वाटेत एखादे खेडेहि लागले नाही. रात्री आम्ही एका झुडपाखाली मुक्काम केला होता. एवढे कष्ट मी आयुष्यात कधीच केलेले स्मरत नाहीत. माझा हा पहिला–वहिलाच अनुभव, पण थकव्याशिवाय मला काहीहि झाले नाही. गुहा दिसली तेव्हा मी इतका थकलो होतो की,

अक्षरशः कसाबसा मी स्वतःला गुहेच्या तोंडाकडे ढकलत होतो. पण, मनात राहून राहून आश्चर्य वाटत होते की, एवढी पायपीट करूनहि गुरुदेवांकडे पाहिले असता थकव्याचे एवढेसुद्धा लक्षण दिसत नव्हते. नेहमीप्रमाणेच ते अगदी हुशारीत व उत्साही दिसत होते; हे काय गुपित आहे हे समजावे याबद्दल मात्र मला तीव्र कुतूहल उत्पन्न झाले होते.

गुहेत प्रथम प्रवेश केला गुरुदेवांनी. मी त्यांच्या पाठोपाठ होतो. आम्ही आत थोडासा प्रवेश केला असेल नसेल मात्र, जणु आमचीच वाट पाहात तेथे वाघाचे दांपत्य पसरलेले आढळले, मी चटकन् गुरुदेवांना धरून मागे खेचले. पण, आश्चर्याची गोष्ट म्हणजे गुरुदेव एकहि पाऊल मागे सरले नाहीत; उलट शांतपणे म्हणाले, " माधव त्यांना भिण्याचे काहीच कारण नाही. ते आपले मित्र आहेत. या जागेचे चौकीदार–पहारेकरी–आहेत." मला कबूल करणे भाग आहे की, मला हा अनुभव अगदी नवा होता. त्या जंगलाच्या राजाराणीच्या दर्शनाने मी नुसताच घाबरलो होतो. एवढेच नव्हे तर त्यांच्याच राज्यात, हातात बंदुक वगैरे नसताना मी केलेला प्रवेश चित्तथरारक होता. गुरुदेव पुढे सटकले तेव्हा त्या दोन्ही श्वापदांनी आनंदाची केवढी कर्णकर्कश आरोळी ठोकली ! गुरुदेव त्यांच्या डोक्यावरून हळुवारपणे हात फिरवीत होते; वाघाने तर आपले दोन्ही पंजे गुरुदेवांच्या खांद्यावर टेकले होते. व शेपटी हालवत तो त्यांच्याकडे पाहात उभा होता. मला माझ्या अवस्थेची अक्षरशः लज्जा वाटली. गुरुदेवांवर ही महाभयंकर श्वापदे इतके प्रेम करतात हे दृश्यच स्तिमित करणारे होते. मद्रासला असताना प्रेमाच्या सामर्थ्याबद्दल गुरुदेव जे बोलले होते त्याची आता मला आठवण झाली. ते कोरड तत्त्वज्ञान नसून त्याचे प्रात्यक्षिकच समोर उभे होते. त्यामुळे माझी खात्री होऊन चुकली की, विचारशक्तीला चकित करणारा नि ज्याची कल्पनाहि करवणार नाही असा चमत्कार प्रेम करू शकते. अर्थात् ते तितकेच निरभिलाषी, निरपेक्ष–केवळ प्रेमाकरिता प्रेम असेल तरच !

श्वापदांचे गुरगुरणे ऐकताच, गुहेच्या तोंडाशी असलेल्या वेलींच्या जाड पडद्यामागून एक फेन धवल केसांचे मुख बाहेर डोकावत असलेले मला दिसले. गुरुदेवांना पाहाताच एक अतिवृद्ध गुहेबाहेर आला, आणि आपले दोन्ही बाहू पसरून गुरुदेवांना प्रेमभराने त्याने आलिंगन दिले. गुरुदेवांनी त्यांचे दर्शन घेण्यास मला सुचविले; नि मीही त्या वृद्धाच्या पाया पडलो. इतके वय झालेले असूनहि त्यांची शक्ति क्षीण झालेली नव्हती. त्यांनी मला सहजपणे उचलले; नि प्रेमनिर्भर आवाजात मला आशीर्वाद दिला; व माझे दोन्ही हात आपल्या हातात घेऊन गुहेत प्रवेश केला.

● ● ●

# ६

गुहा आतून बरीच प्रशस्त होती. पर्वतराजीच्या आत खोलवर ती पसरल्यामुळे तिची लांबी पुष्कळ होती; रुंदीही कितीतरी जणांना सहज सामावू शकेल एवढी होती. अधूनमधून विवरातून आत उजेड येत होता. गुहेत एकंदर बारा व्यक्ती. प्रत्येकजण या ना त्या कामात गढलेला दिसला. आम्हांला पाहाताच ते सर्वजण घाईघाईने उभे राहिले; व गुरुदेव दिसताच त्यांच्यापुढे अत्यादराने त्यांनी माना लवविल्या. तेथील वातावरणातच असा एकप्रकारचा आपलेपणा व मनमोकळेपणा होता की, कुठे परक्या ठिकाणी आपण आलो आहोत असे मला वाटले नाही. सर्व माणसे आपलीच आहेत, फार जुना ऋणानुबंध असलेली, असाच मला भास झाला. वृद्धाने मला बसायला सांगितले; व आराम करा असे सुचविले. गुहेत गवती हातऱ्या पसरलेल्या होत्या; व कोपऱ्यात अग्नि प्रज्वलित ठेवून गुहेला उब आणली होती. गुहेत दालने होती. मी नि गुरुदेव पलिकडल्या दालनात गेलो तेथे स्नानाची व्यवस्था ठेवलेली आढळली. एका

कोपऱ्यात पाण्याचा साठा होता, नि भरपूर गरम पाणीही होते. इतक्या लांबच्या व दमछाक करणाऱ्या प्रवासानंतर गरम पाण्याचे स्नान फारच सुखावह वाटले. कारण, स्नान होताच अगदी ताजे-तवाने झाल्यासारखे वाटले. आम्ही मग मुख्य दालनात आलो; अन्न तयार होते. गव्हासारख्या कसल्य शा धान्याच्या चपात्या व हवे तेवढे दूध—गरम दूध—हेच जेवण. मला वाटते, मी कितीतरी चपात्या खाल्ल्या; व भरपूर दूधहि प्यायलो. गुहेतील मंडळी म्हणाली, ती सर्वजण आमची वाट सकाळी पाहात होती. वृद्धाने आम्ही येत आहोत असे त्यांना आगाऊ सांगितले होते. त्या जागी बाहेरचा पाहुणा क्वचित् येणारा असल्याने आमच्या दोघांच्या येण्याने सर्वांना आनंदच झाला. गुरुदेव वृद्धाशी बोलण्यात गुंतले होते. मी इतर बाराजणांत मिसळलो. माझ्या अपेक्षेबाहेर ती गुहा मोठी होती. गुहेच्या टोकाला गोठा होता; नि त्यात जवळ जवळ बारा गाई चरत होत्या. तेवढ्यात केव्हातरी सूर्यास्त झाला असावा नि काळोख पडू लागला होता. मधल्या प्रशस्त जागेत मशाली पेटवून उजेड केला होता; व आणखी बऱ्याच मशाली एका कोपऱ्यात तयार ठेवलेल्या आढळल्या. थकून भागून आल्याने व जेवताना भरपूर खाल्ल्याने, मी सुस्त होऊन, माझ्या डोळ्यांवर झोप आली होती. गुरुदेव म्हणालेहि, "माधव, तू आता दमला आहेस. तेव्हा स्वस्थ झोप जा." गवताचा थर पसरून त्यावर गवती चटई टाकण्यात आली नि ते माझे आंथरुण म्हणून मला दाखविण्यात आले. मी तात्काळ शरीर आडवे केले, नि डोळे मिटले सुद्धा !

मला जाग आली तेव्हा सकाळ केव्हाच झाली होती. मी माझ्या आंथरुणातच होतो; नि माझ्या आंगावर कोणीतरी दोन लोकरीची पांघरुणे घातली होती. गुरुदेव जवळच उभे होते. त्यांनी हसतच माझ्याकडे आपला हात पसरला नि मी उठलो. "माधव" ते म्हणाले, "आता कसं काय वाटतंय् ? कारण, तू फारच थकला होतास; त्यामुळे तुला झोप चांगलीच-गाढ—लागली होती. सकाळ केव्हाच

झाली आहे नि सर्वजण आपापल्या कामाला लागलेहि." मी पांघरुणांच्या घड्या केल्या, व इतर पांघरुणे ठेवली होती तिथे त्या नेऊन ठेवल्या; व नंतर आम्ही दोघेजण एकत्रच गुहेबाहेर पडलो. मैलभर चालून गेल्यावर, गिरिखडकातून झुळझुळू वाहणाऱ्या एका झरीजवळ आम्ही येऊन पोहोचलो. पाणी बर्फासारखे थंडगार होते. मुखमार्जनानंतर त्या शीतल पाण्यात मी डुबी मारली; अति उत्साह वाटला या शीतल जलाच्या सर्वांग स्पर्शाने! कपडे वगैरे धुऊन, आम्ही गुहेकडे परतलो. गुरुदेव म्हणाले "माधव, इथे आता सर्व ज्याचे त्याने करायचे, येथे नोकर नाहीत की मानसन्मानाचे उपचारहि नाहीत. मी पाहिले तो प्रत्येकजण आपापल्या कामात गर्क होता. विस्तवाजवळ गरम दूध ठेवले होते. त्यातील थोडे गुरुदेवांना मी दिले; व पेला भरून मीहि प्यायलो. "वृद्ध या गुहेचे मुख्य; नि बाकीचे त्यांचे चेले" गुरुदेवांनी सांगितले. "वृद्ध जे जे सांगतील ते ते सारे जण करतात." "त्या वृद्धाचे वय काय असावे?" मी चौकशी केली. गुरुदेव म्हणाले, "ते मला सांगता येत नाही. गेली पन्नास वर्षे या वृद्धाला तो आज दिसतो आहे तसाच पाहातो आहे मी! ते माझ्यापेक्षा वयाने मोठे आहेत हे निश्चित. त्यांच्या हाताखालून शिकून गेलेल्यांची संख्याच केवढी मोठी आहे!" ते याच गुहेत कायमचे राहातात; नि त्यांच्याजवळ जे शिकायला येतात त्यांना ज्ञानदान करतात." मी गुरुदेवांना विचारले, "आपण इथे किती दिवस राहायचे आहे?" त्यावर ते एवढेच म्हणाले, "आपण इथे काही दिवस राहाणार आहोत. तेव्हा, तुझ्या नित्यनैमित्तिक कार्याला आता लाग पाहू."

गुहेत आल्याला आठवडा झाला होता. गुरुदेव म्हणाले, "माधव, उद्या सकाळी तुला निर्विकल्प समाधि लावायची आहे; आणि मी उठवीपर्यंत तू समाधिस्थ राहायचे आहेस." गुरूदेवांनीच ही समाधि कशी लावायची हे मला शिकवले होते. पण, त्यांच्या परवानगीशिवाय ती समाधि मी लावायची नाही अशी त्यांची सक्त ताकीद होती.

तेव्हा, पुन: त्या समाधीत राहायला मिळणार या कल्पनेने मला फार आनंद झाला होता. दुसऱ्या दिवशी सकाळी स्नान वगैरे उरकून गुहेत परत आलो; तो मला आढळून आले की, एका विशिष्ट ठिकाणी मला बसण्याची तयारी केली असून तिथे फुले पसरून ठेवली आहेत; व सुवासिक धूप पेटत आहे. सारे वातावरण कसे प्रसन्न नि पवित्र वाटत होते. त्यातच अगरबत्ती व सुवासिक फुलांचा सुगंध दरवळला होता. मी प्रत्येकाला अभिवादन केले व गुरुदेवांच्या चरणांना स्पर्श केला. मी दर्भासनावर आरूढ झालो. गुरुदेव माझ्यासमोरच वसले होते नि थोडचा अवधीत मी माझे डोळे मिटले.

समाधिस्थिति फक्त अनुभवायची असते; तिचे शब्दांनी वर्णन करताच येत नाही. मी माझे डोळे उघडले तेव्हा गुरुदेव माझ्या सामोरेच बसले होते; नि भोवताली समाधी लावताना जसे होते तसेच सर्व जसेच्या तसे होते. मी उठण्याचा प्रयत्न केला पण ते शक्य झाले नाही. गुरुदेव माझ्याजवळ धावतच आले; व त्यांनी मला प्रेमभराने गाढालिंगन दिले. ते म्हणाले, "माधव, उठण्याचा प्रयत्न करू नकोस." वृद्धाने त्यांच्याजवळ असलेले कसलेसे तेल देऊन आपल्या चेल्यांना मला मालिश करायला सांगितले. मला त्या वृद्धाच्या व मला मालिश करणाऱ्यांच्या सर्वांच्या चेहऱ्यावर एक तऱ्हेचे समाधान झळकत असलेले दिसले. तासभर मालीश करून झाल्यावर मी कसाबसा उठून चार पावले टाकू शकलो. माझ्या शरीराची ही अवस्था लक्षात घेऊन माझे मलाच काही कळेना; मला राहून राहून आश्चर्य वाटत होते, माझे सांधे आखडण्याइतका बराच वेळ मी समाधीत होतो तरी कुठे ? येवढचा थोडचा अवधीत माझी ही शारीरिक स्थिती कशी झाली हे माझे मलाच कळेना. माझ्या शरीरातील सारी चरबी झडून मी कितीतरी बारीक झालो होतो. पण, म्हणून अशक्तपणा किंवा थकवा म्हणाल, तर यत्किंचितसुद्धा वाटत नव्हता. उलट, माझ्या उत्साहाला भरती आली होती. आनंद अणुरेणूंत थवथवत होता. वृद्ध म्हणाले, 'माधव, मला तुझ्या प्रगतीबद्दल अत्यंत समाधान वाटते.

इतक्या थोड्या अवधीत–साधनेत तू मिळविलेले यश खरोखरच कौतुकास्पद आहे ! आणि याचे सारे श्रेय तुझ्या गुरुदेवांकडे जाते." गुरुदेव म्हणाले, "तू समाधिस्थितीत गेले सबंध वर्षभर होतास, नि तुला यातले काहीही ठाऊक नाही;" तेव्हा कुठे माझा वाढलेला जटा-भार, अस्ताव्यस्तपणे वाढलेली दाढी नि मिशा यांची मला जाणीव झाली.' मी दिसतो तरी कसा हे आरशात पाहण्याची मला उत्सुकता उत्पन्न झाली होती. पण ओढ्याच्या वाहत्या पाण्यातील प्रतिबिंबावरच मला ती मनाची ओढ भागवावी लागली. माझ्या शरीरातच नव्हे पण चेहऱ्यातहि इतका फरक पडला होता की मला सुद्धा माझे रूप ओळखेना.

स्नान उरकल्यावर मी थोडेसे दूध घेतले. पातळ पदार्थाशिवाय काही खाण्याची इच्छाच होईना. गुरुदेवांनी सांगितलें की, माझ्या समाधिकाळात ते वर्षभर फिरती करून आले. नि येथे आदल्या दिवशीच येऊन पोहोचले होते. वृद्ध व त्यांचे शिष्यगण यांनी गुरु-देवांच्या गैरहजेरीत माझी काळजी घेतली होती. सारा शिष्यवर्ग इतका चांगला होता, सद्‌गुणी होता, की त्यांचे आभार मानणेसुद्धा त्यांनी मला अशक्य केले. दोन दिवसांनंतर गुरुदेव मला म्हणाले, "माधव, आता आपण आपल्या शेवटच्या टप्प्याला सुरवात करणार आहोत. मी तुला माझ्या गुरूंच्या, म्हणजेच परमेश्वराच्या स्वाधीन करणार; नि मग तुझा माझा संबंध संपला. माझा कार्यभाग आता संपला आहे. तूहि मला आदर्श शिष्य लाभलास." मी म्हणालो, "गुरुदेव, मला तुमचे गुरु कोण माहीत नाहीत. कारण, त्यांना भेटण्याचे मला अजून सद्‌भाग्य लाभलेले नाही. तेव्हा आतापर्यंत ज्या-प्रमाणे करीत आलो त्याचप्रमाणे तुमच्या सूचनांचे अगदी शेवटच्या घटकेपर्यंत मी परिपालन करीन. यापरती, आयुष्यात, मला कशाचीहि चव उरलेली नाही."

दुसऱ्या दिवशी, भल्या पहाटे, आम्ही गुहा सोडली. नेहमीच्या ठिकाणी स्नाने उरकली; आणि पुढील प्रवासाचे प्रस्थान ठेवले. बर्फ

तुडवीत; जरूर तेव्हा विश्रांतीकरिता टेकत आम्ही मार्गक्रमण करीत होतो. जंगलातून नि बर्फातून जवळजवळ आठवडाभर आम्ही चालतच होतो. गुरुदेवांना सारा मार्ग स्वच्छपणे माहीत असल्याने, वाटेत कुठेहि कसलाहि अपघात झाला नाही. एका सुरम्य सकाळी, दिशा फाकू लागत असतानाच आमचे विश्रांतिस्थान सोडून आम्ही चालू लागलो होतो. सूर्य वर आला नि सभोवतालच्या हिमाच्छादित पर्वत-राजीवर सोन्याची पखरण झाल्यासारखे उगवत्या कोवळ्या सूर्य-किरणांनी झाले होते. नीरव शांतता व स्तब्ध वातावरण, नि उत्साहदायक गारवा यामुळे पायी चालण्यात एकप्रकारचा अपूर्व आनंद वाटत होता. आम्ही मैल-दीडमैल चाललो असू-नसू तोच गुरु-देव एकदम स्तब्ध उभे राहिले, चालायचे थांबले. मीहि दचकून ते पाहात होते त्या दिशेकडे पाहू लागलो. कोणीतरी आमच्याकडेच येत असलेले आढळले. ती मूर्ति जवळ येताच गुरुदेव धावतच सामोरे गेले; व त्या व्यक्तीच्या पायांवर त्यांनी डोके ठेवले. झटक्यासरशी, काही वर्षांपूर्वी, मला पडलेल्या स्वप्नाची मला आठवण झाली. मला स्वप्नात ज्यांचे दोन वेळा दर्शन घडले तीच ती मूर्ति होती हे मी ओळखले. गुरुदेवांच्या पाठोपाठ मीही त्या मूर्तीचे पाय धरले. त्या व्यक्तीने मला वर उचलले व प्रेमभराने मिठी मारली. कर्णमधुर आवाजात ती व्यक्ति म्हणाली, "अरे माधव, तू आलास अं! मी तुझी वाटच पाहात होतो." गुरुदेव म्हणाले, "परमात्मन्, तुमच्या आज्ञेप्रमाणे मी त्याला घेऊन आलो आहे. मला वाटतं, मी तुमच्या आज्ञेचे यथातथ्य पालन केले आहे." गुरुदेवांना ते म्हणाले, "बेटा, तुझ्या कामगिरीवर मी खूष आहे. चला, आपण आपल्या ठिकाणावर जाऊ. थोड्याच वेळात स्वप्नात मला दिसलेल्या गुहेपाशी आम्ही सर्वजण येऊन पोहोचलो. स्वप्नात दिसलेले तेच दोन्ही कुत्रे आमची चाहूल लागताच गुहेबाहेर आलेले मी पाहिले. त्या कुत्र्यांच्या डोळ्यातहि मला ओळखल्याची छटा होती. पण, मी मात्र साऱ्या वातावरणाला नवखा होतो. गुरुदेवांच्या मात्र ते दोन्ही

कुत्रे चांगलेच परिचयाचे होते. ती गुहा चांगलीच प्रशस्त दिसत होती; नि आतील व्यवस्थाहि मोकळी नि सुखावह होती. आम्ही सर्व आत येऊन बसलो. गुरुदेव माहितगाराप्रमाणे आणखी आत गेले; व आम्हा तिघांकरिता गरम गरम दूध घेऊन आले. परमात्मन् मला म्हणाले, " माधव, आता तू माझ्याजवळ इथे राहाशील आणि चिदानंद–ज्यांना तू गुरुदेव म्हणून ओळखतोस–ते आपल्या कामगिरीवर रुजू होण्याकरिता परत जातील. त्यालाहि विश्रांतीची जरूर असल्याने, अर्थातच, काही दिवस तो आपल्या समवेत इथेच राहील. तोपर्यंत तूहि इथं रुळशील." गुरुदेव म्हणाले, " माधव, आपण आज ज्या वारी आलो आहोत त्याच वारी पुढील आठवड्यात मी इथून जाईन. तू आता माझ्याशिवाय इथे राहणार आहेस, तेव्हा तुझ्या मित्र मंडळी, नातेवाईक यांना काही निरोप सांगायचे असतील तर ते मी त्यांना पोचते करण्याचे काम जरूर करीन " मी म्हटले, " गुरुदेव, तुम्ही निघण्यापूर्वी मी माझी दैनंदिनी पुरी करून तुमच्या हाती देईन " माझ्याजवळ ऐहिक जगातून, सांसारिक लौकिक–जगातून, आणलेले असे आता उरले होते–फक्त फाउंटन पेन, मनगटी घड्याळ, दैनंदिनी, भावांना नि विनोदिनीला लिहिलेली पत्रे !

माझ्या जीवनहेतूच्या शेवटच्या टप्प्यावर मी आलो असल्याने आता दैनंदिनी लिहिण्याची मला गरज वाटत नव्हती. लहानपणापासून मला दैनंदिनी लिहिण्याची सवय होती. त्यावेळी इंग्रजी शाळेत मी प्रवेश केला असेल. शिक्षकांनी सांगितले रोज घडणाऱ्या गोष्टींचे टिपण दैनंदिनीत करावे. तेव्हापासून मी हे लिखाण करीत आलो आहे; आणि या दिवसापर्यंत मी अचूकपणे माझी दैनंदिनी, का कुणास ठाऊक, लिहीत आलो आहे. आता इतक्या वर्षांचा तो नियम मी स्थगित करणार आहे. तेव्हा, तत्पूर्वी शेवटचे दोन शब्द, उपसंहार म्हणू या हवे तर, लिहून टाकावा असे वाटते. कारण, खरोखरच हाच शेवट असेलहि; कुणी सांगावे ?

आतापर्यंतच्या माझ्या आयुष्याचे सिंहावलोकन केले तर मला म्हणायला हरकत वाटत नाही की माझे आयुष्य फारच चांगले गेले. खंत वा खेद वाटण्यासारखे माझ्या हातून काहीही घडलेले नाही. जे ठरवीन ते नेकीने करायचे, ही माझी लहानपणापासूनचीच सवय आहे. मी कधी कुणापुढे बुजलो नाही किंवा माझ्या मोठेपणाचा टेंभाहि मिरविला नाही. पण, एक मात्र होते की, माझ्या लेखी 'अशक्य' हा शब्द कधीच नव्हता. मनुष्याला जे जे साध्य करिता येणे शक्य आहे ते मी माझ्या मगदुरावर व परिश्रमाने मिळवीनच मिळवीन असा मला सदैव आत्मविश्वास वाटत आला आहे. सुदैवाने चांगली सांपत्तिक स्थिती असलेल्या आईबापांच्या पोटी मी जन्माला आलो असल्याने जीवन–कलह म्हणून ज्याला म्हणतात तो मला कधीच करावा लागला नाही; व म्हणून त्याची मला पुसटशीसुद्धा ओळख नाही. त्यामुळे माझ्या ध्येयसंपादनाच्या आड काहीहि येऊ शकले नाही. माझ्याजवळ भरपूर वेळ होता. शाळेत काय, अगर कॉलेजात काय, वरचा नंबर कायम ठेवणे व खेळात प्रावीण्य मिळवणे हेच माझे ध्येयबिंदु होते; आणि दोन्हीही क्षेत्रांत मी डोळ्यांत भरण्यासारखे यश मिळविलेहि! परंतु, कसे व का ते नकळे, जगात फारच थोड्यांच्या–म्हणजे जवळजवळ कुणाच्याही नाही–आयुष्यात 'सुख नि शांती' चा आढळ मला चुकूनहि दिसला नाही. माझे नातेवाईक, मित्रपरिवार यांच्या दैनंदिन जीवनाचे सूक्ष्म अवलोकन केल्यावर तर माझे निरीक्षण व त्यावरून मी काढलेला अर्थ बरोबर आहे याची माझी खात्री झाली. साहजिकच शाश्वत सुख नि समाधान नि त्यामुळे मन:शांति मिळणे कशाने शक्य होईल याचा मी विचार करायला सुरुवात केली. प्रथमत: स्वामीजी व तदनंतर गुरुदेवांचा सहवास लाभला. स्वामीजींची माझ्यावर चांगलीच छाप पडली. पण, गुरुदेवांचे दर्शन घडल्यावर मात्र मला स्पष्ट झाले की ज्याला सुख व समाधान मिळाले आहे अशी शांत–पवित्र मूर्ति म्हणजे प्रत्यक्ष गुरुदेवच!

मी या विषयावर असंख्य पुस्तके वाचली. पण, त्यात फक्त शास्त्र-चर्चा, उपपत्ति, कोरडे तात्त्विक विवेचनच काय ते आढळे. पण गुरुदेवांच्या रूपाने प्रत्यक्ष आनंद नि समाधान माझ्यापुढे वावरू लागले तेव्हा मला वाटू लागले की, ते खरे सुख--खरा आनंद, खरे समाधान व मनःशांति; ही मिळविता येण्यासारखी गोष्ट आहे. मला ते आव्हान आहे असे वाटले; आणि ते आव्हान स्वीकारून आपण ती गोष्ट मिळवायचीच या ईर्षेला मी पेटलो. वास्तविक त्याचे खरे स्वरूप काय, याची ना मला कल्पना होती, ना ज्ञान. ज्याला सुखी वैवाहिक जीवन म्हणतात ते मिळवणं मला सहजशक्य होते. पण, मला असे आतूनच वाटले की, लग्नाच्या बेडीत मी माझे हातपाय अडकावून बसेन; असले कौटुंबिक जीवन पत्करले तर माझे स्वातंत्र्यच नष्ट होईल. तेव्हा ऐहिक सुखाच्या ओढीपासून, मोहापासून व सांसारिक ऐषारामी सुखाच्या कल्पनेपासून मी मला दूर ठेवण्याचा प्रयत्न करीत राहिलो. तसे न करता जर मी ऐहिक सुखाच्या गर्तेत स्वतःला गुरफटून बसलो असतो तर हा जो एवढा लांबचा पल्ला इतक्या थोडक्या अवधीत मी आक्रमू शकलो ते कधीही शक्य झाले नसते. या सर्वांपासून मला जो लाभ झाला आहे त्याच्याशी तुलना करता माझा तोटा नगण्य आहे; इतका की, शोधू पाहताहि तो सहज आढळणारा नाही.

गुरुदेवांच्या सान्निध्यात येऊन, मी जेव्हा त्यांच्या मार्गदर्शनाखाली पावले टाकायला सुरवात केली, तेव्हा मला पुरेपूर पटले की सत्याचा शोध घेणाऱ्याला मार्गदर्शन लागते—ते वरवरचे असून चालत नाही; किंवा त्याची संपूर्ण उपेक्षा करूनहि भागत नाही. काही थोडे अपवाद वगळले, किंवा तात्काल साक्षात्कार घडून येणारे भाग्यवंत साधक सोडले, तर बहुतांश साधकांना कोणी ना कोणी मार्गदर्शक हा लागतोच, परंतु 'मार्ग', 'साधना', किंवा 'प्रक्रिया' यांचा या प्रांतात इतका चुकीचा अर्थ लावण्यात आला आहे की, लोक अध्यात्माच्या नावाखाली भलत्याच गोष्टी करीत सुटतात. अंतर्मनाचे गंभीरपणे संशोधन

त्याच्या हालचालींचे सूक्ष्म निरीक्षण करीत करीत, अशा निरागस अनुभवावर अधिष्ठित झालेली कृति, यांची वास्तविक आध्यात्मशास्त्रात जरुरी आहे. निवळ बुद्धीने निश्चित केलेले मन, किंवा परंपरेने रूढ झाले तेच सत्य, पुस्तकी शिकवण, पांडित्यप्रचुर व्याख्याने व ज्ञानी लोकांची प्रवचने, यांनी अव्याहत चंचल असलेल्या मनाला शांत ठेवणे, कह्यात ठेवणे अशक्य आहे असे मला वाटते. चंचल मन इतक्या वेगाने धावत असते की, त्याला नीति, अनीति, सभ्यतेचे नियम अगर कायदेकानू, संस्कृति, शिक्षण, विशिष्ट विषयाची निवड किंवा पारख किंवा अंतर यांची ते काहीही तमा बाळगीत नाही. कळते पण वळत नाही असे होते ते यामुळेच. कारण, नुसते समजून, पाहून किंवा शब्दांनी प्रगट करून, मनावर कधीही ताबा मिळविता येत नाही. निरामय प्रकृति व शिस्तीची वागणूकच मनाच्या आंतरिक हालचाली व बाहेरची व्यक्त कृति यात सामंजस्य उत्पन्न करून, सुसंवादित्व प्रस्थापित करू शकते. मनुष्याच्या मानसशास्त्राबद्दलचे गुरुदेवांचे ज्ञान आश्चर्यकारकरीत्या अत्यंत सूक्ष्म व सांगोपांग आहे. त्यामुळे प्रत्येक माणसाची नाडी ते ओळखीत असल्यामुळे प्रत्येकाला अचूक मार्गदर्शन करण्याचे त्यांचे प्रावीण्य वादातीत आहे.

माझा सत्याचा शोध खऱ्या अर्थाने चालू झाला तो तेव्हाच, जेव्हा अनुभवाच्या माध्यमातून मन म्हणजे काय, हे मी समजू शकलो. साऱ्या आसमंतात हवा भरून राहिली आहे; पण तिचे चलनवलन जाणवू लागण्याइतके होते, तेव्हा आपण त्याला 'वारा' असे नाव देतो. नि जेव्हा ते चलनवलन नसते तेव्हा आपण 'वारा पडला' आहे असे म्हणतो. शांत निर्मळ तळ्यात जेव्हा खडा पडलेला नसतो तेव्हा ते निश्चल आहे असे आपण म्हणतो. पण, त्याच्या पृष्ठभागाला कसलाही स्पर्श होताच तरंग उठले की आपण 'लाट' उठली, तरंग लहरला, असे म्हणतो. वास्तविक जलाशयाच्या दृष्टीने काहीही आलेले नसते वा गेलेले नसते. पण, विचलित झालेल्या

वातावरणाला नि पाण्याला आपण वारा नि लाट किंवा तरंग म्हणतो त्याचप्रमाणे मनाची चलबिचल झाली म्हणजेच आपणाला मनाचे आस्तित्व कळते. ही चलबिचल कशाने होते हा प्रश्न स्वतंत्र आहे. गुरुदेवांच्या मदतीने माझ्या सर्व समस्यांची उकल झाली. माझ्यावरचे सारे भूतकाळचे ओझे दूर झाल्यासारखे झाले, भवितव्याची काळजी नाहीशी होऊन मला एकदम अत्यंत हलके हलके व उत्साहवर्धक ताजेतवाने झाल्यासारखे झाले, अंतिम सत्य आणि ज्याला ' नेति ' असे ईश्वरीतत्त्व म्हणतात तो शब्दातीत अनुभव आहे.

माझी सध्याची स्थिति वर्णन करायची तर मी 'सुख–समाधान व शांति'च्या सर्वोच्च शिखरावर मजेत विहार करीत आहे. मी अज्ञाताच्या शोधात निघालो नि स्वतःलाच अज्ञातात घालवून बसलो आहे. माझ्यातला तो ' मी ' संपूर्णपणे नाहीसा झाला आहे. फार तर असं म्हणायला हरकत नाही की नुसत्या लाक्षणिकरीत्या, पण काहीही अर्थ नसलेल्या स्थितीत, तो ' मी ' असलाच तर अस्तित्वात आहे. त्या ' मी ' च्या दृष्टीने शारीरिक अस्तित्व गौण आहे. आणि जग ज्याला एकदा माधव म्हणून ओळखीत होते त्याला सध्यांच्या माझ्याशी फारच अल्प सोहेरसुतक उरले आहे. नुसती पुसटती ओझरत्या ओळखीपुरती ही वस्तुस्थिति थोडीशी स्पष्ट करून उकलून सांगायची, तर असे म्हणता येईल की नदीचे अस्तित्व, निराळे व्यक्तिमत्त्व, ती सागराला मिळेपर्यंतच ! सागराला ती एकदा मिळाली की त्या अगाध जलोदधात ती विसर्जन पावली. तिचे निराळेपण उरलेच कुठे ? सागराला मिळाल्यावर तिच्या पाण्याचे वेगळेपण शोधणे अशक्यच ! कुठले पाणी सागराचे नि कुठले नदीचे; नि कुठल्या नदीचे ? त्याप्रमाणेच अज्ञाताच्या शोधात मी होतो; नि आज माझा मलाच मी अज्ञात झालो आहे.

दैनंदिनीत लिहिण्यासारखे आणखी काहीही आता उरलेले नाही. दैनंदिनीच्या बरोबरच माझ्या अनुभवांचे चोपडे मी पुरे केले आहे. शिवाय, माझ्या बंधूंना, मालतीला व विनोदिनीला पत्रे लिहून ठेवली

या साऱ्या गोष्टी मी गुरुदेवांना दिल्या. ते आम्हाला सोडून परत गेले आहेत.

●●●

## प्रकरण शेवटचे !

हिमालयात जाण्याकरिता म्हणून आमचा निरोप घेऊन गेल्याला माधवला आता दोन वर्षे होतील. त्यानंतर त्याच्याकडील काहीही बातमी अजूनतरी नाही. आत्मदर्शनाच्या, अंतिम सत्याच्या शोधात, काहीही नाव द्या—तो गुरुदेवांच्या संगतीत होता; त्यांच्यावर त्याची अव्यभिचारी श्रद्धा होती; विश्वास होता. परंतु, जसजसे दिवस जात आहेत तसतशी मला नि माझ्या धाकट्या भावाला माधवबद्दलची काळजी जास्तच वाटत आहे. आमच्या या भावनेशी प्राध्यापक रमेश, मालती, श्री. व सौ. गुप्ता नि त्यांची कन्याहि सहदुःखी आहेत. माधवशी संबंध जोडणेहि दुरापास्त; त्यामुळे आमच्यात हवालदिलपणा वाढायला मदतच होते.

रविवारची ती सकाळ होती. मी आमच्या घराच्या बागेत, भेटायला आलेल्या एकाशी बोलत व चहा पीत बसलो होतो. पत्नी घरात नि मुले अभ्यासात गर्क होती. बागेचे फाटक वाजले; व ते कोणीतरी ढकलीत आहे असा आवाज आला म्हणून खुर्चीवरून अर्धवट उठून पाहू लागलो. नवागत अतिथीला पाहाताच, प्रथमतः आश्चर्य वाटले; नि पाय त्याच्याकडे जाण्याकरिता अक्षरशः धावले. तोपर्यंत आत येऊन पाहुणे फाटक पुनः बंद करीत होते. ते गुरुदेव होते. इतक्या वर्षांनंतर त्यांची गाठ पडली असल्याने माझे हृदय आनंदाने उचंबळत होते. मी त्या भरातच त्यांच्या पाया पडलो. क्षणभर माझ्यावरचा माझा ताबा नाहीसा झाला. मला उठवून गुरुदेवांनी मला गाढालिंगन दिले. तेवढ्यात माझी पत्नीही बाहेर आली; व तिनेहि गुरुदेवांना वाकून नमस्कार केला. मला भानावर यावयाला

किंचित् अवधि लागला. पण, ध्यानावर येताच पाहू लागलो तो गुरुदेव एकटेच; माधव कुठे आहे ? माझ्या मनात काय चालले आहे याची गुरुदेवांना दाद होती. तेव्हा, हसतच ते म्हणाले, "अगदी काळजी करू नकोस. माधवची प्रकृति छान आहे; नि तो अगदी मजेत आहे ! सध्या तो हिमालयात आहे; नि त्याने दिलेले पत्र आणले आहे तुझ्या-करता." माझी पत्नी मध्येच म्हणाली, "अहो पण गुरुदेवाना घरात तर येऊ द्या." मी लाजलो. साधा शिष्टाचारसुद्धा मी विसरलो होतो. गुरुदेव मोठ्याने हसले व म्हणाले, "त्यात काही मनाला लावून घेण्यासारखे नाही—चालायचेच. चला, आपण सर्वच घरात जाऊ." तोपर्यंत अगोदर आलेल्या दुसऱ्या पाहुण्याने काढता पाय घेतला होता. त्याच्या मनात काय आले असेल कोण जाणे ! दिवाण-खान्यात आल्यावर मुलांना बोलावून त्यांची व गुरुदेवांची ओळख करुन दिली. गुरुदेवांना दूध व फराळाचे आणण्याकरिता पत्नी स्वयं-पाकघराकडे वळली; नि मी माधवचे पत्र फोडले. मी माझ्या मुलाला सांगितले की काकाला फोन कर आणि गुरुदेव आल्याचे सांगून त्यांना भेटायला सर्वांना इकडेच बोलावले आहे असे सांग." माधवचे पत्र खालीलप्रमाणे होते :

मत्प्रिय विनायकदादा,

पुष्कळ दिवसांनंतर मी लिहीत आहे. अर्थात् तुम्हा सर्वांना माझी काळजी लागली असणारच. पण काळजीचे कारण नाही. कारण, माझी प्रकृति उत्तमच आहे; आणि मी सर्व दृष्टीने अति सुखात आहें. तेव्हा, माझ्याबद्दल कोणत्याहि प्रकारे चिंता करण्याचे कारण नाही—स्वामीजी व गुरुदेवांची भेट झाल्यावर तुम्हांला ठाऊकच आहे की, मी जन्मभर अंतिम सत्य व शाश्वत सुखाच्या शोधात होतो. तुला ऐकायला आनंद वाटेल, मला हवे ते गवसले आहे. आणि माझी शोधाशोध आता थांबली आहे. आज माझ्यापुढे कसलीहि समस्या नाही, मला कसलीहि चिंता नाही, कशाबद्दलहि दु:ख वा खंत नाही. या साऱ्याचे श्रेय गुरुदेवांना आहे. त्यांनी हा अद्भुत चमत्कार घड-